म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २०९.

# ादर्श राज्यघटना

अनुवादक

जनार्दन गणेश जोगळेकर, एम्. ए., एल्एल्. बी.

REFBK-0005856

ुटोची
आदर्श
ज्यघटना

अनुवादक
ग. जोगळेकर

श्री. पांडुरंग सदाशीव पेंडसे यांजकडून
मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे,
या संस्थेस नजर.

८८२६

निबंध ८३८
२०।५८०

सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

# प्लेटोची आदर्श राज्यघटना

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे, यासंस्थेस
श्री. पांडुरंग सदाशिव पेंडसे यांजकडून
नजर

# प्लेटोची आदर्श राज्यघटना

सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो याच्या

REPUBLIC

या ग्रंथाचा अनुवाद

REFBK-0005856

ह्या अनुवाद-ग्रंथास डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी पुणें या संस्थेनें ३५० रुपयांचें पारितोषिक दिलें आहे.

अनुवादक

**जनार्दन गणेश जोगळेकर, एम्. ए., एलएल्. बी.**

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५८५५

१९३९

**किंमत चार रुपये**

प्रकाशकः—
**जनार्दन गणेश जोगळेकर**
१०२ उमासदन,
हिंदुकॉलनी, दादर, मुंबई १४

The present (Marathi) version is based on the English translation, made by John Davies and David Vaughan and published by Macmillan & Co. Ltd; London. I am extremely thankful to Macmillan & Co. Ltd. for granting me permission to publish the same.

102 Umasadan,
Hindu Colony Dadar
Bombay 14.

**J. G. Joglekar.**

प्लेटोच्या Republic या ग्रंथाचा प्रस्तुत मराठी अनुवाद मॅकमिलन कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या जॉन डेव्हिस व डेव्हिड व्हाघान ह्यांच्या इंग्रजी भाषांतराच्या आधारें केलेला आहे. मॅकमिलन कंपनीनें हा मराठी अनुवाद-ग्रंथ प्रसिद्ध करण्यास मला परवानगी दिल्याबद्दल मी कंपनीचा अत्यंत आभारी आहें.

**ज. ग. जोगळेकर.**

मुद्रकः—
**आर. आर. बखले,**
मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४

DEDICATED TO.

Prof. **P. A. WADIA**, M. A.

*Wilson College, Bombay.*

प्लेटोच्या *Republic* या अमर ग्रंथाची मला प्रथम ओळख करून देणारे प्राध्यापक **पेस्तनजी वाडिया**, एम्. ए. ह्यांना हा अनुवाद-ग्रंथ कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे.

**ज. ग. जोगळेकर.**

# अनुक्रमणिका


१ प्रस्तावना ... ... ... १ ते १३
२ अभिप्राय ... ... ... १४ ते १६
३ निवेदन ... ... ... १७ ते १९
४ पुरस्कार ... ... ... २१ ते ३०
५ शुद्धिपत्रक ... ... ...
६ प्लेटोची आदर्श राज्यघटना ... ... १ ते ५३२
७ ग्रीक पुराणांतील कांहीं कथा ... ...५३३ ते ५३४
८ महत्त्वाच्या विषयांची सूचि ... ...५३५ ते ५४८

निबंध
२५१५४०

# प्रस्तावना

कोणत्याही भाषेच्या वाङ्मयाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे वर्ग पाडण्यांत येतात. या वर्गीकरणाची कसोटी म्हणजे एक गूण नव्हे तर गुणसमुच्चय; आणि गुणसमुच्चयानें अन्वित असे जे लेख ते उत्तम वाङ्मय-वर्गांत मोडतात. पण हा गुणसमुच्चय कोणता हें सांगणें सोपें नाहीं. ज्याप्रमाणें काव्याची व्याख्या करणें कठीण त्याप्रमाणें या गुणसमुच्चयाचें स्पष्टीकरण करणें कठीण. एका दृष्टीनें उत्तम वाङ्मय म्हणजे काव्यमय वाङ्मय असे त्याचें पर्यायपदानें वर्णन करतां येईल. काव्यामध्यें खालील गूण व्यक्त झाले पाहिजेत. उदात्त कल्पना, उच्च भावना, रचना-चातुर्य व भाषासौंदर्य; या गुणचतुष्टयानें काव्य बनतें. पहिले तीन गूण कविस्फूर्तीचें फळ होत तर भाषासौंदर्य हें भाषाभ्यासाचें व पूर्व-वाङ्मयपरिचयाचें फळ होय हें निर्विवाद आहे. अशा चतुर्गुणांनीं युक्त वाङ्मय उत्तम वर्गामध्यें मोडतें, व प्रत्येक भाषेंतील असलें वाङ्मय जगद्वाङ्मय या पदवीला पोहोंचतें. दुसऱ्या एका दृष्टीनें वाङ्मय ग्रंथांचें वर्गीकरण केलें जातें. तदनुरूप भाषांतरित ग्रंथ व स्वतंत्र ग्रंथ असे ग्रंथाचे दोन वर्ग पाडतात; एका भाषेंतील वाङ्मयग्रंथाचें यथार्थ केलेलें भाषांतर हा एक वर्ग, व कवीच्या अवलोकनाच्या, वाचनाच्या व विचाराच्या अनुरोधानें स्वतंत्रपणें लिहिलेला ग्रंथ हा दुसरा वर्ग. आतां या दोन वर्गांतील ग्रंथ प्रथमच उल्लेख केलेल्या वर्ग—त्रयींत कोठें बसतात, तें पाहूं.

पण या बाबतींत पुष्कळ मतभेद दिसून येतो. त्याचा विचार प्रथम केला पाहिजे. भाषांतर हें कनिष्ट दर्जाचें वाङ्मय होय, असा समज पुष्कळ सुशिक्षितांचा असतो. निदान आपल्या इकडील पहिल्या पिढीच्या सुशिक्षितांमध्यें व त्यापुढील पिढींतल्या

कांहीं लोकांमध्येंही तो थोडाफार दिसून येतो. या लोकांचें म्हणणें असें कीं, भाषांतर करण्यास दोन भाषांचें साधारण ज्ञान असलें म्हणजे पुरें आहे. स्वतंत्र ग्रंथलेखनासारखें त्यांत कठीण कांहीं नाहीं. त्याला पूर्वतयारी लागत नाहीं, त्याला फारसा विचार करावयास नको व त्याला कविस्फूर्तीची मुळींच जरूरी नाहीं. कारण मूळ ग्रंथ हा वाढून ठेवलेल्या ताटाप्रमाणें लेखकाचें पुढें असतो. त्याला फक्त घासावर घास घेणाऱ्या जेवणाऱ्याप्रमाणें भराभर पानांचें भाषांतर करावयाचें असतें. अशा प्रकारची समजूत अव्वल इंग्रजींत सुशिक्षित पदवीधरांमध्यें प्रचलित असल्यामुळें त्यांचे हातून अशा प्रकारचे ग्रंथ निर्माण झाले नाहींत. आधींच मराठी भाषेबद्दल या पदवीधरांची तुच्छताबुद्धि व त्यांत भाषांतर करणें अगदीं कमी दर्जाचें समजलें गेलेलें. तेव्हां ते अशा उद्योगाकडे ढुंकूनही पहात नसत. अव्वल इंग्रजींत जें कांहीं उत्तम तऱ्हेचें भाषांतरित व स्वतंत्र असें वाङ्मय निर्माण झालें तें पदवीतर सुशिक्षितांकडूनच झालें आहे. पण इतर सुधारलेल्या लोकांमध्यें अशा प्रकारचा समज दिसून येत नाहीं. उदाहरणार्थ इंग्रज समाज घ्या. इतर भाषांतून आपल्या स्वभाषेंत भाषांतर करून आपल्या भाषेची ग्रंथसंपत्ति वाढविणें हें तिकडे स्वतंत्र ग्रंथ निर्मितीच्या इतकेंच मानाचें समजलें जातें. कॉलेजांतील नांवाजलेले परभाषेचे प्रोफेसर अशा तऱ्हेचा उद्योग आजीव करीत राहतात; नव्हें असें करणें त्यांचें काम आहे असें समजतात. सारांश, स्वतंत्र ग्रंथाइतका भाषांतर वाङ्मयाला मान आहे. अर्थात् असलें भाषांतर वाङ्मयाच्या उत्तम वर्गांत पडण्याजोगें पाहिजे हें उघड आहे. उत्तम भाषांतर व उत्तम भाषांतरकार कसा असावा याबद्दलचें सुंदर विवेचन ग्रीक भाषेचे सुप्रसिद्ध प्रोफेसर जॉवेट ( Jowett ) यांनीं आपल्या एका प्रस्तावनेंत केलें आहे. त्यांतील खालील उतारा जशाच्या तसा येथें उद्धृत करतों. त्यावरून भाषांतरकाराच्या करामतीबद्दल यथार्थ कल्पना येईल.

An ( English ) translation ought to be idiomatic and interesting, not only to the scholar, but to the unlearned reader. Its object should not simply be to render the words of one language into the words of another or to preserve the construction and order of the original;—this is the ambition of a school–boy who wishes to show that he has made a good use of his Dictionary and Grammar : but is quite unworthy of the translator, who seeks to produce on his reader an impression similar or nearly similar to that produced by the original. To him the feeling should be more important than the exact word. He should remember Dryden's quaint admonition not to "lacquey by the side of his author, but to mount up behind him." He must carry in his mind a comprehensive view of the whole work, of what has preceded and of what is to follow,–as well as of the meaning of particular passages. His version should be based, in the first instance, on an intimate knowledge of the text; but the precise order and arrangement of the words may be left to fade out of sight, when the translation begins to take shape. He must form a general idea of the two languages, and reduce the one to the terms of the other. His work should be rhythmical and varied, the right admixture of words and syllables, and even of letters, should be carefully attended to; above all, it should be equable in style. There must also be quantity, which is necessary in prose as well as in verse: clauses, sentences, paragraphs, must be in due proportion. Metre and even rhyme may be rarely admitted; though neither is a legitimate element of prose writing, they may help to lighten a cumbrous expression. ( cp. Symp. 185 D, 197, 198 ). The translation should retain as far as possible the characteristic qualities of the ancient writer – his freedom, grace, simplicity, stateliness, weight, precision : or the best part of him will be lost to the ( English ) reader. It should read as an original work, and should also be the most faithful transcript which can be made of the languge from which the

translation is taken, consistently whith the first requirement of all, that it be English easily understood by the reader.

( विद्वानालाच नव्हे तर अविद्वान् वाचकालाही खुबीदार व मनोरंजक वाटेल अशा प्रकारचें भाषांतर असलें पाहिजे. एका भाषेंतील शब्द दुसऱ्या भाषेंत उतरून घेणें अथवा मूळ भाषेंतील वाक्यरचना व अनुक्रम तसाच कायम ठेवणें एवढाच भाषांतराचा उद्देश असूं नये. शब्दकोश व व्याकरण ह्यांचा आपण चांगला उपयोग करूं शकतो, असें दाखविणाऱ्या शालेय विद्यार्थ्याला अशी महत्वाकांक्षा शोभणारी असते; पण ज्याला मूळ पुस्तकासारखाच अथवा जवळ-जवळ तसाच संस्कार वाचकांच्या मनावर करावयाचा आहे, अशा भाषांतरकाराला अशी महत्वाकांक्षा शोभणारी नसते. मूळ शब्दाला हुबेहुब प्रतिशब्द देण्यापेक्षां त्यांतील भाव प्रतिबिंबित करणें अधिक महत्वाचें होय असें त्याला वाटलें पाहिजे. ह्या बाबतींत ड्रायडनची तऱ्हेवाईक सूचना त्यानें लक्षांत ठेवावी. "भाषांतरकर्त्यानें मूळ ग्रंथकर्त्याच्या बाजूनें खिजमतगाराप्रमाणें न चालतां त्याच्या पाठीमागें स्वार होऊन बसलें पाहिजे." मागील व पुढील संदर्भासहित सर्व ग्रंथाची व्यापक कल्पना व त्यांतील विशिष्ट उताऱ्यांच्या अर्थाची कल्पना त्यानें करून घेतली पाहिजे. मूळ ग्रंथाच्या मार्मिक ज्ञानावर त्यानें आपला अनुवाद आधारला पाहिजे हें जरी खरें, तरी अनुवादाला स्पष्ट स्वरूप येऊं लागल्यावर त्यानें मूळांतील शब्दांचा अनुक्रम व रचना दृष्टिआड केल्यास हरकत नाहीं. त्यानें दोन्ही भाषांची सर्वसाधारण कल्पना करून घेतली पाहिजे व नंतर एका भाषेचें दुसऱ्या भाषेंत रूपांतर केलें पाहिजे. त्याच्या अनुवादांत तालबद्धता व विविधता असून शब्द, शब्दावयव व अक्षरें ह्यांच्या योग्य मिश्रणाकडे त्यानें लक्ष पुरविलें पाहिजे. मुख्यत्वेंकरून समतोल भाषापद्धतीनें त्यानें आपला अनुवाद–ग्रंथ लिहिला पाहिजे. गद्यांत व काव्यांत आवश्यक अशी प्रमाणबद्धताही त्यानें

साधली पाहिजे. वाक्यांश, वाक्यें, लेखपरिच्छेद ह्यांच्यामध्यें योग्य प्रमाण राखलें पाहिजे. गद्यलेखनांत छंद व यमक ह्यांचें जरी वास्तविक स्थान नसलें तरी अवजड शब्दांचा अर्थ सुबोध होण्यास त्यांची क्वचित् ठिकाणीं मदत घेण्यांत यावी. मूळ ग्रंथकाराचे विशिष्ट गुण अनुवादांत शक्यतों कायम राखले पाहिजेत. भाषेची स्वतंत्रता, सुंदरता, सरलता, भव्यता, भरीवता, असंदिग्धता हे गूण राखण्यांत आले पाहिजेत. नाहीं तर वाचकांना मूळ ग्रंथकाराच्या कृतींतील उत्तम भागाला मुकावें लागेल. भाषांतरित ग्रंथ हा मूळ ग्रंथासारखा वाटला पाहिजे. पण त्याच वेळीं तो मूळ ग्रंथाचा साध्य तितका यथार्थ अनुवाद असला पाहिजे. परंतु भाषांतरित ग्रंथाचा पहिला गूण म्हणजे सुगमता होय व ती भाषांतरकारानें उत्तम प्रकारें साधली पाहिजे.)

भाषांतर करणें हें काम कमी दर्जाचें नाहीं, या म्हणण्याचें सर्वांना पटण्यासारखें प्रत्यंतर प्रख्यात इतिहासाचार्य राजवाडे यांच्या कृतीचें आहे. त्यांच्या पुढील आयुष्यामध्यें त्यांनीं आपलें तनमनधन इतिहास व इतर विषय यांचें संशोधन करण्यांत खर्च केलें व हजारों कागदपत्र छापून केवढी तरी ग्रंथसंपत्ती मराठींत आणली व या ग्रंथांना स्वतंत्र व निर्भिड विचारांनीं परिपूर्ण अशा प्रचंड प्रस्तावना लिहिल्या. म्हणून त्यांची मोठ्या इतिहाससंशोधकांत गणना होऊं लागली व महाराष्ट्रीयांनीं त्यांना **इतिहासाचार्य** ही मानाची पदवी बहाल केली. पण त्यांच्या पूर्ववयांत व भरउमेदीच्या काळांत त्यांनीं भाषांतराचा उद्योग सुरू केला होता व त्याकरितां 'भाषांतर' नांवाचें स्वतंत्र मासिकही काढलें होतें व त्यामध्यें जगांतील उत्तम वाङ्मय ग्रंथांचीं भाषांतरें छापावीं असा त्यांचा बेत होता. तदनुरूप कांहीं भाषांतरें त्यांच्या मासिकांत प्रसिद्ध झालीं. छापखान्याच्या आकस्मिक आगींत भाषांतर मासिकाचे सर्व अंक (छापलेल्या व छापत असलेल्या अंकांसकट) पुढील अंकाच्या मजकूराकरितां तयार केलेल्या भाषांतराचे लेख व भाषांतरा-

करितां लागणारा इतर पुस्तकसंग्रह—सारांश भाषांतर मासिकाचें सर्वस्व अग्निसात् झालें नसतें तर आणि राजवाडे याजवर कुटुंबाच्या मृत्यूचा अवचित घाला आला नसता तर, कदाचित् राजवाडे यांच्या आयुष्याला लागलें तें वळण लागलें नसतें व वाङ्मय—इतिहासांत त्यांचें नांव विष्णुशास्त्र्यांचें जसें **मालाकार** हें नांव बनलें तसें राजवाड्यांचें **भाषांतरकार** असेंच नांव बनलें असतें.

भाषांतराच्या योग्यतेविषयीं व वाङ्मयांतील त्याच्या पदवीविषयीचे विचार आज सुचण्याचें कारण ज्या पुस्तकाला मी ही प्रस्तावना लिहीत आहे त्याचें प्रसिद्धी करण होय. माझे प्रथम अप्रत्यक्ष विद्यार्थी व पुढें वाङ्मयमित्र बनलेले रा. रा. जोगळेकर यानीं जगद्वाङ्मय असा प्लेटोचा Republic (आदर्श राज्यघटना) नांवाचा ग्रंथ याचें भाषांतर करण्याचा उद्योग तीन वर्षें केला व सध्यां प्रसिद्ध होत असलेला ग्रंथ त्यांच्या श्रमाचें व चिकाटीचें फळ होय. जगप्रसिद्ध वाङ्मय ग्रंथाचीं मराठीमध्यें भाषांतरें करवावीं व त्यांना बक्षिसें द्यावीं अशी योजना डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें या संस्थेनें तयार केली. त्यामध्यें प्लेटोच्या आदर्श राज्यघटनेच्या (Plato's Republic) भाषांतराचा अंतर्भाव केला व उत्तम भाषांतर करणाऱ्यास योग्य बक्षीस देण्यांत येईल असें जाहीर केलें. रा. जोगळेकरांनीं ह्या योजनेनुसार भाषांतर केलें व संस्थेकडे पाठवून दिलें. संस्थेनें रा. जोगळेकरांना ह्या पुस्तकाबाबत ३५० रुपयांचें बक्षिस देण्याचा ठराव केला व रा. जोगळेकरांना त्याप्रमाणें कळविलें. रा. जोगळेकर हे माझे अप्रत्यक्ष विद्यार्थी व प्रत्यक्ष मित्र असल्यामुळें मी त्यांच्या विनंतीवरून भाषांतरास प्रस्तावना लिहिण्याचें काम करण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. आनंद वाटण्याचें दुसरें कारण हें कीं प्लेटोच्या Republic या ग्रंथाचें भाषांतर करावें, असें हें पुस्तक एम्. ए. वर्गाला शिकवीत असतांना माझ्या मनांत वारंवार येत असे. कारण

त्या ग्रंथांतील तत्वें सनातन स्वरूपाचीं असून विशेषतः तीं हिंदू समाजाच्या सद्यःस्थितीस लागू पडणारीं आहेत असें मला दिसून आलें. पण माझ्या इतर व्यवसायामुळें भाषांतर करण्यास आवश्यक असणारी वेळाची सवड मला माझ्या कॉलेजच्या कामाच्या गर्दीमुळें झाली नाहीं. सेवानिवृत्ती नंतर मला पुष्कळ वेळ होता खरा. पण या सुमारास मी मराठी वाङ्मयाच्या अभ्यासास सुरवात करून त्यासंबंधीं एक इतिहास लिहिण्याची योजना केल्यामुळें व ती आजतागाईत चालू असल्यामुळें मला दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयकामास हात घालणें शक्य नव्हतें. तेव्हां जोगळेकरांच्या भाषांतरानें मला खरोखरींच आनंद झाला. मला वाटलें, आपल्या हातून नाहीं तर नाहीं पण दुसऱ्याच्या हातानें कां होईना मराठी भाषेंत एका उत्तम ग्रंथाची भर पडत आहे हें किती चांगलें आहें. म्हणून अशा या वाङ्मयकार्याच्या पूर्तीस व प्रसिद्धीस प्रस्तावनारूप हातभार लावण्याची आलेली संधी मी साधली. येथपर्यंत या प्रस्तावनेची पूर्वपीठिका संपली. आतां नेहेमींच्या शिरस्त्याप्रमाणें मूळग्रंथ व त्याचा प्रख्यात ग्रंथकार व भाषांतरकार व त्याचें नवेंच भाषांतर यांचा वाचकांस परिचय करून द्यावयाचा.

परंतु या कार्यचतुष्टयापैकीं पहिलें कार्य प्लेटोच्या ग्रंथाच्या बाबतींत तरी फार कठीण आहे. कारण प्लेटोचा ‘आदर्श राज्यघटना’ हा ग्रंथ दहा भागांचा व पांचशें पानांचा आहे. शिवाय त्यांत नानाविध तात्त्विक सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयांचें विवेचन असून प्रचलित मतांच्या पेक्षां जास्त विलक्षण व क्रांतीकारक मतांचा त्यांत पुरस्कार केलेला आहे. अशा अवघड ग्रंथाचा परिचय करून देणें म्हणजे त्याचा सविस्तर सारांश दिला पाहिजे व असा सारांश सहज एका भागाइतका तरी लांब होणार. संक्षिप्त सारांश हे निरुपयोगी असतात नव्हें ते बेकनच्या प्रख्यात उक्तीप्रमाणें ‘वाङ्मयाचे हृद्रोगच असतात.’

तेव्हां मी सारांश न देण्याचें ठरविलें आहे. या योगानें वाचकांस जोगळेकरांचें भाषांतर वाचण्याची उत्सुकता कायम राहील.

प्लेटोचा परिचय करून देणें सोपें आहे. कारण प्लेटोची पुष्कळ चरित्रें इंग्रजींत प्रसिद्ध झालेलीं आहेत. मात्र प्लेटोविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. प्लेटोनें स्वतः इतके मोठमोठे ग्रंथ लिहिले असतां—कीं ज्यांच्या भाषांतरांचें पांचपांचशें पानांचें पांच भाग प्रो. जॉवेट यांनीं प्रसिद्ध केले आहेत—त्या समग्र ग्रंथांमध्यें प्लेटोचें नांव निवळ एक दोनदांच आलें आहे.

या बाबतींत प्लेटो व इंग्रजी कवी व नाटककार शेक्सपीयर यांचें-मध्यें विलक्षण साम्य आहे. ज्याप्रमाणें आपल्या पंचवीस तीस नाट-कांत व दोन तीन काव्यांत कोठेंही स्वतःची माहिती किंवा स्वतःचीं मतें शेक्सपीयरनें दिलीं नाहींत, त्याप्रमाणें प्लेटोनें आपल्या ग्रंथांत आपली माहिती व मतें नमुद केलीं नाहींत. कारण शेक्सपीयरच्या नाटकाप्रमाणेंच प्लेटोचे ग्रंथ संभाषणात्मक आहेत. तीं एक तात्विक विवेचनपर नाटकेंच आहेत म्हणाना! या नाटकांत प्लेटोनें आपले विचार आपला गुरु सॉक्रेटीस याच्या मुखानें वदविले आहेत. यामुळें ग्रीक भाषाभिज्ञांना सॉक्रेटीसाचे विचार कोणते व प्लेटोचे कोणते हें शोधून काढणें कठीण झालेलें आहे. आतां प्लेटोची जी कांहीं दंतकथात्मक माहिती पूर्व चरित्रकारांनीं दिली आहे तिकडे वळणें बरें.

हिंदु लोकांच्या प्रवृत्तीप्रमाणें ग्रीक लोकांमध्येंही एक प्रवृत्ती दिसून येते. ती ही कीं अलौकिक पुरुषाला देवपण किंवा देवावतारपण द्यावयाचें. तदनुरूप प्लेटो हा अपोलो देवाच्या ( सूर्य देवाच्या ) पुत्राचा अवतार होता असें दंतकथा सांगते. शिवाय आईच्या बाजूनें तो ग्रीक लोकांतील प्रख्यात कायदेकानुकार सोलन याच्या घराण्याशीं संबद्ध होता. त्याचा जन्म क्रिस्तपूर्व ४२७ या वर्षीं अथेन्समधल्या एका उच्च वर्गांतील

कुटुंबांत झाला. त्याच्या बापाचें नांव अरिसटन व आईचें नांव पेरिक्टियन असें होतें. एजिना ( अथेन्स नजीकचें एक बेट ) येथें त्याच्या बापाला मोठी इनाम जमीन दिलेली होती. प्रत्येक ग्रीक नागरिकाला आवश्यक असलेलें बौद्धिक, शारीरिक व कलाविषयक शिक्षण प्रख्यात गुरूचें हातीं प्लेटोला मिळालें होतें. त्याला भूमितीशास्त्राची फार आवड होती. ही गोष्ट त्याच्या ग्रंथावरून व विशेषत: त्याच्या विद्यालयाच्या दरवाज्यावर खोदलेल्या नियमावरून स्पष्ट दिसून येते. तो नियम असा, ' भूमिती न शिकलेल्या शिष्याला या विद्यालयांत प्रवेश मिळणार नाहीं.' वयाच्या वीसाव्या वर्षी प्लेटोची व सॉक्रेटिसाची प्रथम भेट झाली. प्लेटोसारख्या बुद्धिवान् व चौकस तरुणाच्या मनावर सॉक्रेटिसाच्या शिकवणीचा विलक्षण परिणाम झाला व प्लेटोला सॉक्रेटिसाबद्दल फार आदर व भक्ति वाटूं लागली. इतकीं कीं, पुढें ग्रंथ लिहिण्यास घेतल्यावर प्लेटोनें ते संभाषणात्मक पद्धतीनें लिहिले ( कारण हीच सॉक्रेटिसाची आवडती शिक्षणपद्धती होती ) व त्यामध्यें सॉक्रेटिसाला मुख्य वक्त्याची भूमिका दिली. प्लेटो सॉक्रेटिसाला विष प्राशन करण्याची शिक्षा होईपर्यंत त्याच्या सहवासांत होता. सॉक्रेटिसाच्या त्या हृदयद्रावक प्रसंगाचें हुबेहुब व इतक्या काळानंतरही वाचकांच्या डोळ्याना पाणी आणविणारें वर्णन प्लेटोनें आपल्या एका संभाषणांत केलें आहे. त्यानें सॉक्रेटिसाच्या आयुष्याच्या अखेरच्या काळावर एकंदर चार संभाषणें लिहिलीं आहेत व तीं ' सॉक्रेटिसाचे शेवटचे दिवस ' या नांवानें इंग्रजींतील ' गोल्डन ट्रेझरी ' सिरिजमध्यें छापलेलीं आहेत. प्लेटोच्या सर्व ग्रंथांमध्यें वाङ्मयदृष्टीनें सर्वसामान्य वाचकास समजण्यासारखा व अत्यंत मनोवेधक व हृदयाला चटका लावणारा ग्रंथ हाच होय. पण प्लेटोच्या ग्रंथसौंदर्यानें मीं वाहवत चाललों. तेव्हां आधीं त्याचें राहिलेलें चरित्र संपवूं या.

आपल्या वयाच्या २८ व्या वर्षी अॅथेन्समधून मॅगारा येथें जाऊन

प्लेटो प्रख्यात भूमितीशास्त्रज्ञ युक्लिड (ज्याचें नांव आजतागाईत भूमितीशास्त्राला दिलें जात असतें) याचे जवळ भूमिती शिकला व तेव्हांपासून त्याला त्या शास्त्राची विशेष गोडी लागली. मॅगारा येथें कांहीं दिवस राहिल्यावर तो सेरिन येथें थिओडरस या गणितज्ञाकडे गेला व तेथें गणीतशास्त्र शिकला. तेथून तो इटलीला गेला व त्यानें पॅथागोरियन पंथाची माहिती मिळविली. शेवटीं तो इजिप्तला जाऊन तेथें त्यानें उपाध्यायाकडून इजिप्त येथील धर्माची व समाजाची माहिती मिळविली. याप्रमाणें नाना देश पाहून प्लेटोनें पुष्कळ अनुभव, नवें ज्ञान व बहुश्रुतपणा मिळविला. मग तो देशीं परत आला. यावेळीं तो परिणतप्रज्ञ झाला होता व त्याचीं तत्वज्ञानविषयक मतें ठाम व निश्चित झालीं होतीं. अशा तऱ्हेनें तयारी झाल्यावर त्यानें अथेन्स येथील एकॅडेमी नांवाच्या बागेंत आपलें विद्यालय स्थापन केलें व तें त्यानें आमरण चालविलें. त्याच्या शिष्यांपैकीं प्रख्यात शिष्य म्हणजे अरिसटॉटल (Aristotle) होय. आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं ग्राक समाजांत जे अलौकिक तत्ववेत्ते होऊन गेले त्यांची ही त्रयी शिष्यपरंपरा होती. असें दुसरें उदाहरण सबंध जगाच्या इतिहासांत सुद्धां सांपडणें कठीण आहे. असो. जरी प्लेटो हा मुत्सद्दी व राज्यशास्त्रज्ञ होता तरी त्यानें राज्यकारभारांत प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं. कारण त्याला अथेन्समधील लोकसत्तात्मक राज्याबद्दल आदर वाटत नसे. मोठेपणीं त्यानें आपल्या आदर्श राज्यघटनेप्रमाणें सिसिली बेटामध्यें राज्यव्यवस्था घडवून आणण्याचा प्रयत्न केला व त्याकरितां तो सॅराक्युज (सिसिली बेटाची राजधानी) येथें तीनदां गेला. तो प्रथम तेथें गेला तेव्हां डायोनिशियस नांवाचा एकतंत्री राजा गादीवर होता. पण त्याच्याशीं प्लेटोचें पटलें नाहीं. उलट डायोनीशिअसला प्लेटोचा राग आला व रागाच्या भरांत त्याला ठार करण्याचा त्यानें बेत केला. पण प्लेटोच्या मित्रांच्या विनंतीवरून त्या जुलमी

राजानें प्लेटोला एका स्पार्टनच्या स्वाधीन केलें. त्यानें त्याला एजिनाबेटास नेलें व तेथें गुलाम म्हणून विकण्याकरितां बाजारांत आणलें. पण तेथून त्याची कशीतरी सुटका झाली व तो अथेन्सला परत आला. जेव्हां डायोनीयसचा तरुण राजपुत्र गादीवर आला, तेव्हां पुन्हां एकदां प्लेटो सॅराक्युजला गेला. पण आपल्या तत्वानुरूप एक वसाहत स्थापन करण्याचा प्लेटोचा बेत सिद्धीस गेला नाहीं. याप्रमाणें सॅराक्युजच्या त्याच्या तिन्ही खेपा फुकट गेल्या. या कटु अनुभवानें प्लेटोला वाईट वाटलें खरें, पण त्यायोगें तो अधिक शहाणा व अधिक व्यावहारिक झाला. समाजाच्या सद्यःस्थितीमध्यें आपल्या आदर्श कल्पना व आदर्श राज्यघटना सत्य सृष्टींत अवतरणें दुरापास्त, नव्हे अशक्यप्राय आहे, असें प्लेटोला दिसून आल्यामुळें त्यानें आपल्या वृद्धापकाळीं लिहिलेल्या 'कायदे' ( Laws ) नावाच्या प्रचंड संभाषणात्मक ग्रंथांतील मतें व संस्था 'आदर्शराज्यघटना' ग्रंथातील मतें व संस्था यांपेक्षां पुष्कळच व्यावहारिक केलीं आहेत. पण कितीही व्यावहारिक स्वरूपाचा असला तरी 'कायदे' हा प्लेटोचा ग्रंथ वाङ्मय दृष्टया व तत्वज्ञानदृष्टया कमी योग्यतेचा झाला आहे हें निर्विवाद आहे. त्या मानानें प्लेटोचा 'आदर्शराज्यघटना' हा ग्रंथ दोन्ही दृष्टीनें अप्रतिम झालेला आहे यांत शंका नाहीं. म्हणून सामान्य वाचकांस प्लेटोच्या 'कायदे' या ग्रंथाचें नांवही ठाऊक नसतें; पण प्लेटोचा 'आदर्शराज्यघटना' हा ग्रंथ व त्यांतील मतें सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येक माणसाला विदित असतात. म्हणूनच तो जगप्रसिद्ध ग्रंथ समजला गेला आहे. अशा या जगप्रसिद्ध ग्रंथाचा विशेष काय येवढें सांगून मी हें ग्रंथपुराण आटोपणार आहे.

हा ग्रंथ मनोरंजक आहे. तो काव्यस्फूर्तीनें रचलेला आहे व त्यामध्यें विलक्षण रचनाचातुर्य आहे हें स्पष्ट आहे. पण अशा त्रैगुण्यानें युक्त असे ग्रंथ पुष्कळ भाषांत आहेत. प्लेटोच्या आदर्श राज्यघटनेचा विशेष

एका शब्दानें व्यक्त करतां येतो. तो शब्द 'अर्वाचीनत्व' हा होय. तेव्हां आतां प्लेटोचें अर्वाचीनत्व कशांत आहे तें आपण पाहूं. हा ग्रंथ वाचूं लागलें म्हणजे राहून राहून खालील विचार मनांत येतात. हा ग्रंथ जुन्या काळांत एका लहानशा समाजाच्या अनुभवाच्या आधारावर व विशिष्ट परिस्थितींत लिहिला असतांना सुद्धां तो हल्लींच्या आपल्या काळाला अनुसरून लिहिला आहे कीं काय असा पदोपदीं भास होतो. हल्लींचे कोणतेही बिकट प्रश्न घ्या. शिक्षणाचा प्रश्न असो, स्त्रियांच्या समान दर्जाचा प्रश्न असो, कुटुंबरचनेचा व विवाहासंबंधाचा प्रश्न असो, भांडवलवाले व मजूर यांच्या तंट्याबद्दलचा प्रश्न असो, समाजसत्तावादाचा प्रश्न असो किंवा खासगी मिळकत समाजांत असावी किंवा नाहीं असा प्रश्न असो, अशा प्रकारच्या सर्व वादग्रस्त प्रश्नांचा उहापोह व एका प्रकारचा निकाल प्लेटोच्या ग्रंथांत सांपडतो, हें आश्चर्यकारक नव्हे काय? पण या सर्व प्रश्नांवर प्लेटोनें सांगोपांग विचार केलेला आहे असें त्याच्या ग्रंथावरून दिसून येतें. यांतच प्लेटोचें अर्वाचीनत्व आहे व त्याच्या ग्रंथाचा विशेष आहे. आतां शेवटचें गोड काम म्हणजे भाषांतरकार व भाषांतर यांचा वाचकांना परिचय करून देणें. तेवढें केलें कीं प्रस्तावनेचें कार्य संपलें.

मागें उल्लेख केल्याप्रमाणें रा. जोगळेकर हे माझे अप्रत्यक्ष विद्यार्थी होत. वास्तविक ते विल्सन कॉलेजचे विद्यार्थी. तेथून ते तत्वज्ञान हा विषय घेऊन एम्. ए. पसार झाले. मग पुनः एम्. ए. करितां त्यांनीं समाज–शास्त्र हा ऐच्छिक विषय घेतला व निबंध देऊन पदवी मिळविण्याचा बेत केला.

"Evolution of Social life and Ideals in Maharashtra" या निबंधाची तयारी करतांना रा. जोगळेकर हे माझा सल्ला घेण्याकरितां मजकडे एक दोनवेळां आले होते व मीही त्यांना सल्लामसलत व माहिती दिली होती. या दृष्टीनें ते माझे अप्रत्यक्ष विद्यार्थी असा मी

उल्लेख केला. पुढें ते चांगल्या प्रकारें पुनः एम्. ए. व नंतर एल. एल. बी. होऊन जळगावीं वकीली करूं लागले. मी माझ्या कामाकरितां एकदां जळगावास गेलों असतांना त्यांची माझी पुनः गांठ पडली व स्नेह जमला. पुढें हा स्नेह दृढ होत गेला. मुंबईस रामनारायण रुईया नांवाचें कॉलेज निघालें. त्या ठिकाणीं त्यांना प्रोफेसरची हंगामी जागा मिळाली. यामुळें मुंबईस भेटीचे प्रसंग जास्त वेळ येऊन मी त्यांचेकडे उतरून त्यांचा पाहुणचार घेऊं लागलों. पुढें या प्लेटोच्या भाषांतराच्या कामांत त्यांच्या माझ्या पुष्कळदां भेटी झाल्या. या सर्व भेटींमध्यें मला दिसून आलें कीं, जोगळेकरांना तत्त्वज्ञानाची खरोखरीच आवड आहे व ते एखाद्या कॉलेजांत प्रोफेसर होऊन तत्त्वज्ञान हा विषय शिकविण्यास योग्य गृहस्थ आहेत.

भाषांतर कसें असावें व भाषांतरकारामध्यें कोणते गुण असावेत, याबद्दल प्रख्यात प्रो. जोवेटचा मी उतारा दिला आहे. जोगळेकर यांचें भाषांतर तंतोतंत त्याप्रमाणें उतरलें आहे असें जरी म्हणतां येणार नाहीं, तरीपण मी वाचकांची इतकी खातरजमा करतों कीं, हें भाषांतर मराठींतील पहिल्या प्रतीच्या भाषांतरांत गणिलें जाईल इतकें तें चांगलें उतरलें आहे. तेव्हां या भाषांतराला चांगला व पुष्कळ वाचकवर्ग मिळो व जोगळेकरांचें हें ग्रंथरूपी वाङ्मयापत्य चिरंजीव होवो असा आशीर्वाद देऊन मी ही घाई घाईनें व मनःस्वास्थ्य नसतांना लिहिलेली प्रस्तावना पुरी करतों.

महाड जि. कुलाबा
ता. ६।११।३८ } **गोविंद चिमणाजी भाटे**

---

# अभिप्राय

**सुप्रसिद्ध साहित्यिक प्रो. वामन मल्हार जोशी, एम्. ए. ह्यांचा अभिप्राय —**

प्लेटोच्या ' रिपब्लिक ' या विद्वन्मान्य ग्रंथाचें प्रो. जनार्दन गणेश जोगळेकर यांनीं मराठींत भाषान्तर केलें आहे. या भाषान्तराचे तीस एकतीस छापील फॉर्म मी मधून मधून वाचून पाहिले, व मुळाशीं ताडून पाहिले. **भाषांतर चांगलें साधलें आहे. प्रो. जोगळेकर हे व्यासंगी तत्त्वजिज्ञासु असल्यामुळें त्यांनीं हें भाषांतर हौशीनें व कळकळीनें केलें आहे.** हौस आणि कळकळ असल्याशिवाय असल्या मोठ्या ग्रंथांचीं भाषांतरें करतो कोण ? आणि प्रो. जोगळेकर यांना तत्त्वज्ञानाचें चांगलें ज्ञान असल्यामुळें हें भाषांतर यथामूल व विद्वदभिमत झालें आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. मूळ ग्रंथाची योग्यता इतकी आहे कीं तो जगांतील उत्तम १०० ग्रंथाच्या यादींत मानाचें स्थान पटकावील. आजकाल राजकारण व समाजकारण यांच्या मूलभूत तत्त्वांची चर्चा सर्वत्र चालू आहे आणि ती चालू रहावीही. ही चर्चा करताना जगांतील मोठ्या विचारी, दूरदर्शी, मूलगामी आणि प्रतिभावान् ग्रंथकारांच्या मतांचा विचार करणें आवश्यक आहे. हीं मतें मराठी वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रो. जोगळेकर हे अभिनंदनास पात्र आहेत. हा ग्रंथ राजकारण व समाजकारण यासंबंधीं तत्वचर्चा करणारा असला तरी तो अत्यन्त मनोवेधक आणि कांहीं ठिकाणीं काव्यात्मक आहे. हा ग्रंथ प्रत्येक जिज्ञासूनें वाचावा अशा योग्यतेचा आहे एवढें म्हटलें म्हणजे अधिक कांहीं म्हणण्याची जरूर नाहीं.

**वा. म. जोशी.**

## जळगांव ( पूर्वखानदेश ) येथील सुप्रसिद्ध महाराष्ट्र शाहीर व कवि श्री. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी ह्यांचा अभिप्राय

पाश्चात्य राष्ट्रांतील विद्वानांना देखील ज्या तात्विक ग्रंथानें मोहून टाकिलें तो ग्रंथ म्हणजे 'प्लेटोची आदर्श राज्यघटना'. या ग्रंथाचा आजवर मराठी वाचकांस कोणाही आंग्लविद्या-विभूषितानें संपूर्ण स्वरूपांत परिचय करून दिला नव्हता. तो माझे स्नेही प्रो. ज. ग. जोगळेकर यांनीं करून दिला ही समाधानाची गोष्ट आहे. मी हें पुस्तक घेऊन वाचूं लागलों, तों त्यानें मला आकर्षून आपल्या बरोबर नेलें ! **तीं तीं सुंदर प्रमेयें व त्यांचें स्पष्टीकरण, ते ते सिद्धांत व त्यांचें दृढीकरण, ह्यांनीं सुविद्य व प्रगल्भ वाचकांचें मन अगदीं मोहून जावें इतकी सहज व ओघवती मराठी भाषा प्रो. जोगळेकरांच्या लेखणींतून अवतरली आहे.** ग्रंथ मूळचाच सुंदर खरा, परंतु अनुवादकाची जर विषयाशी तद्रुप होण्याची पात्रता नसेल आणि त्याची भाषा ललित नसेल तर सौंदर्यातील सुवास निघून जातो. या दृष्टीनें प्रो. जोगळेकर यांनीं हें अनुवादाचें कार्य इतकें उत्तम केलें आहे कीं मराठी वाङ्मयांत एका अमोल ग्रंथाची भर घातल्याचें श्रेय त्यांना प्राप्त झालें आहे.

तत्त्वज्ञान हा प्रो. जोगळेकरांचा आवडीचा विषय. यामुळेंच या ग्रंथाला अधिकारी व्यक्ति लाभली असें म्हणावें लागतें. नाहींपेक्षां तत्वज्ञानासारख्या अंमळ गहन विषयाला कोण हात घालणार? या ग्रंथाला डे. व्ह. ट्रॉ. सोसायटी या महाराष्ट्रांतील श्रेष्ठ संस्थेनें मान्यता देऊन ३५० रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. तसेंच अंमळनेरच्या तत्वज्ञान मंदिराचे सहाय्यक दानशूर श्रीमंत प्रतापशेट यांनीं २००रु. दिले आहेत. या दोन देणग्या या ग्रंथाची उत्कृष्टता सिद्ध करावयास पुरेशा आहेत. मराठी भाषेचा अभिमान वाहणारे व तिच्यांतील साहित्याचा उत्कर्ष चिंतणारे साहित्यिक तर महाराष्ट्रांत आहेतच परंतु

संस्थानिक व राजेरजवाडेही या भावनेंचे आहेत. त्यांनी या ग्रंथाचा योग्य परामर्ष घ्यावा. तेणेंकरून श्री. जोगळेकर यांस उत्तेजन मिळेल व मराठीचें या विषयासंबंधीं रितें दिसणारें दालन ते भरून काढतील.

**द्वा. आ. तिवारी.**

**डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें प्रस्तुत भाषांतर तपासण्याकरितां नेमलेल्या परिक्षकांपैकीं एका विद्वान् व व्यासंगी परीक्षकाचा अभिप्रायः—**

रा. जनार्दन गणेश जोगळेकर यांनीं सदरहु पुस्तक डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें जाहिरात दिल्यावरून तयार केलेलें आहे. हें पुस्तक ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो याच्या 'Republic' नांवाच्या ग्रंथाचें भाषांतर आहे. ग्रीक तत्वज्ञानाची तऱ्हा एतद्देशीय तत्वज्ञानाच्या तऱ्हेशीं विसदृश असल्याकारणानें ग्रीक भाषेंतील तात्विक ग्रंथाचें मराठी वाचकांना सुबोध होईल असें भाषांतर करण्याचें काम सोपें नाहीं. प्लेटोच्या तात्विक विचारांचें हृद्गत कळून तें केवळ मराठी वाचकांना पटेल अशा रीतीनें मराठींत उतरविण्याचें काम हिंदी व ग्रीक तत्वज्ञानाचा चांगला व्यासंग असणाऱ्या गृहस्थासच साध्य आहे. रा. जोगळेकर यांचा अशाप्रकारें अधिकार असल्यामुळें भाषांतराचें काम समाधानकारक झालें आहे. **मूळ ग्रंथांतील शब्दांचा अर्थ नीटपणें ध्यानांत येण्याकरितां मराठींतील अनुरूप शब्दांची निवड करण्याची हातोटी रा. जोगळेकर यांस चांगली साधली आहे.** या संबंधांत पुष्कळ विचार करून होतां होईल तितकें सुबक आणि वाचकांस समजेल अशा तऱ्हेचें भाषांतर झालें आहे. एकंदर काम फार परिश्रमाचें आणि तें त्यांतूनही योग्यता असलेल्या मनुष्याकडूनच होण्यासारखें आहे. आणि तसें झाल्याबद्दल रा. जोगळेकर हे अभिनंदनास पात्र आहेत. माझ्या मतें रा. जोगळेकर यांचें हें काम प्रशंसनीय झालें आहे, आणि त्यांस जाहीर केल्याप्रमाणें पारितोषिक देणें आवश्यक आहे.

---

# निवेदन

प्रस्तुत अनुवादक १९२२–२३ सालीं विल्सन कॉलेजमध्यें तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. चा अभ्यास करीत होता. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असतांना सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो याच्या अमर ग्रंथाची म्हणजे Republic (आदर्श राज्य–घटना) या ग्रंथाची ओळख झाली. विल्सन कॉलेजमधील विद्वान् व मर्मज्ञ प्राध्यापक पेस्तनजी वाडिया ह्यांच्या आकर्षक व उत्साहजनक व्याख्यानांचा त्याला लाभ झाला होता. प्राध्यापक वाडिया प्रस्तुत ग्रंथ शिकवीत असतांना इतके रंगून जात असत व शिष्यवर्ग सुद्धां इतक्या तन्मयतेनें ऐकत असे कीं, दोघानाही तास संपल्याची घंटा ऐकूं येत नसे! प्लेटोसारख्या प्रतिभासंपन्न तत्ववेत्त्याच्या अद्वितीय ग्रंथाचें मार्मिक ज्ञान करून देण्यास पेस्तनजी वाडिया हे प्राध्यापक लाभणें सद्भाग्यच होय. त्यावेळच्या शिष्यवर्गाला प्लेटोचें विस्मरण होणें जसें शक्य नाहीं, तसेंच आपल्या गुरूचें म्हणजे प्रो. वाडिया ह्यांचेंही विस्मरण होणें शक्य नाहीं!

प्लेटोच्या प्रस्तुत ग्रंथाचा बी. ए. च्या वर्गांत अभ्यास करीत असतांना त्याचा मराठींत अनुवाद करावा असें वाटत असे. परंतु त्यावेळेस प्रयत्नाला सुरवात झाली नाहीं. पुण्याच्या डेक्कन व्हर्न्यॅक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें The Republic of Plato ह्या ग्रंथाचे भाषांतरास बक्षीस देण्याचें जाहीर केल्यामुळें प्रस्तुत लेखक जळगांवीं वकीली करीत असतांना भाषांतर करण्यास उद्युक्त झाला. सदरहू संस्थेनें बक्षिसाची योजना जाहीर केली नसती तर भाषांतराचें काम हातीं घेण्यास चालना मिळाली नसती, हें उघडच आहे. एखाद्या

कार्याची स्वतःला इच्छा असली तरी तें कार्य हातून घडून येण्यास चालना मिळावी लागते. म्हणून डे. व्ह. ट्र. सोसायटी या संस्थेचा प्रस्तुत लेखक अत्यंत आभारी आहे. ह्या संस्थेच्या उत्तेजनाच्या अभावीं सदरहू पुस्तकाच्या भाषांतराचें काम पार पडणें अशक्यप्रायच होतें.

प्लेटोचा व त्याच्या आदर्श राज्यघटना या ग्रंथाचा परिचय, तत्त्वज्ञानाचे सुप्रसिद्ध प्राध्यापक व मराठी वाचकांना आपल्या अनेक लहान व मोठ्या ग्रंथांनीं सुपरिचित असलेले, प्रिन्सिपाल गोविंद चिमणाजी भाटे यांनी मार्मिक प्रस्तावना लिहून करून दिला आहे. कौटुंबिक आपत्तीमुळें त्यांचें मन खिन्न असतांनाही त्यांनीं प्रस्तुत लेखकाच्या विनंतीस मान देऊन सदरहू प्रस्तावना लिहून दिली, ह्याबद्दल त्यांचे आभार जितके मानावे तितके थोडेच होणार आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या कामांत त्यांनीं मधून मधून योग्य सूचना देऊन व काळजीपूर्वक लक्ष घालून लेखकाला कायमचा ऋणी केलें आहे.

प्राध्यापक वामन मल्हार जोशी व जळगांवचे महाराष्ट्र शाहीरकवि व सेवानिवृत्त मराठी शिक्षक श्री. दुर्गाप्रसाद तिवारी ह्या ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध साहित्यिकानी प्रस्तुत ग्रंथाचे सुटे फॉर्म वाचून आपले अभिप्राय लिहून दिले व ते प्रसिद्ध करावयास परवानगी दिली म्हणून त्यांचे व डे. व्ह. ट्र. सोसायटीनें एका परीक्षकाचा अभिप्राय प्रसिद्ध करावयास परवानगी दिली म्हणून त्या संस्थेचे प्रस्तुत लेखक कृतज्ञतापूर्वक आभार मानीत आहे.

अमळनेरच्या तत्वज्ञान-मंदिराचे दानशूर संस्थापक श्रीमंत प्रतापशेट यानीं या ग्रंथाला २०० रुपयांची उदार देणगी देऊन प्रकाशन कार्याला मदत केली आहे. तसेंच मुंबई विश्वविद्यालयानें या ग्रंथाच्या प्रकाशनाला मदत म्हणून चांगली देणगी दिली आहे. श्रीमंत प्रतापशेट व मुंबई विश्वविद्यालय ह्यांचा प्रस्तुत अनुवादक कृतज्ञतापूर्वक ऋणी

आहे. ह्या दोन देणग्यांमुळें प्रकाशनकार्य समाधानकारक रीतीनें पार पडूं शकलें आहे.

शेवटीं सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या मुंबईवैभव छापखान्यानें हा ग्रंथ आस्थापूर्वक मेहनतीनें छापून दिल्याबद्दल छापखान्याच्या चालकांचे आभार मानून व मराठी वाचकाना ह्या ग्रंथांतील विचार स्फूर्तिदायक वाटतील अशी आशा बाळगून निवेदनाचे दोन शब्द पुरे केले आहेत.

हिंदु कॉलनी दादर, १६।४।३९. **जनार्दन गणेश जोगळेकर**

The author acknowledges his indebtedness to the University of Bombay for the substantial financial help it has granted towards the cost of the publication of this book.

102 Umasadan
Hindu colony
Dadar Bombay 14.

J. G. JOGLEKAR.

# पुरस्कार

[ १ ]

सध्यांच्या नाजुक आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें भारतवर्षाला साहित्यिकांपेक्षां सैनिकांची, कलेपेक्षां कर्तृत्वाची व सुरेल संगीतापेक्षां धीरगंभीर रणरागिणींची अधिक आवश्यकता आहे.

प्लेटोनें आपल्या आदर्श राज्यघटनेंत कवि व कलावन्त यांना हद्दपार केलें आहे ! 'काव्य व कला हीं वस्तुस्थितीपासून दुप्पट दूर असतात' असें प्लेटो म्हणतो. ईश्वर प्रत्येक आदर्श वस्तु निर्माण करतो; त्या वस्तूचें विकृत स्वरूप म्हणजे व्यावहारिक वस्तु; व हिचें पुनर्विकृत स्वरूप म्हणजे चित्र, नाटक किंवा काव्य.

ईश्वरनिर्मित वस्तु म्हणजे वस्तूचें मूलतत्त्व किंवा आदर्शभूत परिपूर्ण स्वरूप. हें पूर्णपणें व्यक्तदशेस कधींच येत नाहीं. आदर्श वस्तूंची सृष्टि स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे. व्यावहारिक जगांत आदर्श वस्तूंचीं विकृत प्रतिबिंबें उपलब्ध होत असतात.

व्यावहारिक वस्तु ही आदर्श सद्वस्तूपासून एकपट दूर असते. कलात्मक वस्तु सद्वस्तूपासून दुप्पट दूर राहते. कलेचे आविष्कार व आदर्श सद्वस्तु, यांमधील अंतर अशा रीतीनें द्विगुणित झालें असल्यामुळें कवि व कलाकार हे प्रातिभासिक, मायावी, अवास्तव, काल्पनिक जगांत वावरणारे वेडेपीर असतात. आदर्श राज्यघटनेंत त्यांना थारा देणें हें मूर्खपणाचें व आत्मघातकी धोरण होय, असें प्लेटोचें स्पष्ट विधान आहे.

रशियांतील साम्यवादी लेखक व तत्त्वज्ञ मॅक्झिम गॉर्की यानेंही असेच विचार एके ठिकाणीं प्रकट केले आहेत. काल्पनिक व अवास्तव (unreal) आनंदाच्या निर्मितींत जीवनशक्तींचा वेच करणें हा गुन्हा आहे.

शिवाय, सर्व कलांमध्यें अनुकरणाचें तत्त्व अंतर्भूत असतें. चित्रें, कविता व गायन हीं घेतलेल्या पूर्वानुभवाचे प्रतिध्वनि किंवा अनुकृति होत. अनुकरणात्मक आचारविचार मनुष्याला परावलंबी, पंगु व निर्जीव करतात. इमर्सन म्हणतो, Imitation is Suicide—अनुकरण म्हणजे

आत्महत्या होय. "What good have they done?" ललित कलांनीं आजपर्यंत जगाचें काय कल्याण केलें आहे, असा स्पष्ट प्रश्न प्लेटो विचारतो.

भारतीय व विशेषतः महाराष्ट्रीय तरुणांनीं सध्यांच्या राजकीय परिस्थितींत क्षात्रतेज, युद्धशास्त्र व संघटित राष्ट्रीयत्व यांची उपासना करणें आवश्यक असल्यामुळें त्यांना प्लेटोचें रिपब्लिक अभ्यसनीय वाटेल. आपल्या राष्ट्राच्या सद्यःस्थितीविषयीं, भवितव्याविषयीं व संघटनेविषयीं प्लेटोच्या या ग्रंथाच्या वाचनानें तरुण महाराष्ट्रीयांच्या मनांत एक नवजागृति निर्माण होईल. आजच्या भारतवर्षाकरितां आदर्श राज्यघटना कोणती याविषयीं सध्यां सर्वत्र चर्चा सुरू आहे. अशा प्रसंगीं रिपब्लिकचें सहाय्य फार मोलाचें व प्रासंगिक ठरेल.

[ २ ]

राज्यघटनेचें आदर्श स्वरूप कसें असावें या विषयाची पद्धतशीर व शास्त्रीय मीमांसा करणारा प्लेटो हा पहिला तत्त्वज्ञानी होय. वाल्मीकीच्या रामायणांत रामराज्याविषयींची रूपरेषा वाचतांना प्लेटोच्या रिपब्लिकची आठवण होते. पण प्लेटोच्या रिपब्लिक मधील विवेचन रामायणापेक्षां अधिक व्यावहारिक व शास्त्रीय स्वरूपाचें आहे.

प्लेटोनंतर रिपब्लिकच्या धर्तीवर आदर्श राज्यव्यवस्थेचीं अनेक कल्पनाचित्रें रेखाटण्यांत आलीं. सिसेरो, सेंट ऑगस्टिन, डांटे, सर थॉमस मूर, बेकन, कॅम्पानेला व अगदीं अलिकडे एच्. जी. वेल्स यांनीं आपापल्या दृष्टिकोनानें आदर्श समाजस्थितीचें चित्रण केलें आहे. पण प्लेटोच्या भव्य कलाकृतीचा–रिपब्लिकचा–ताजमहाल अद्याप अद्वितीय, अनुपमेयच आहे.

रिपब्लिकमध्यें प्लेटोनें कांहीं सनातन, त्रिकालाबाधित सत्यांचा उच्चार केला आहे. त्याच्या प्रत्यक्ष अनुभवाचें क्षेत्र फार विस्तृत नव्हतें. दोन तीन शतकांपलिकडे त्याला ऐतिहासिक ज्ञान नसावें. त्याचप्रमाणें दोन तीन ग्रीक संस्थानांतील राजकारणापलिकडे त्याच्या राजकीय अनुभवाचाही विस्तार गेला नसणार, असें प्लेटोचा मल्लिनाथ डॉ. जोवेट म्हणतो.

आजचें राजकारण जागतिक आहे. आजची हिंदुस्थानांतील राजकीय प्रगति आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम आहे. आज कोणत्याही देशाला

स्वतंत्र व स्वयंपूर्ण राजकारण नाहीं. आंतरराष्ट्रीय आर्थिक व व्यापारविषयक परिस्थिति हीच प्रत्येक राष्ट्राचें भवितव्य निश्चित करीत आहे. अर्वाचीन जीवनांतील अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण यांचे तपशील (details) प्लेटोच्या प्रतिभेच्या आवाक्याबाहेर आहेत हें खरें. तथापि प्लेटोची प्रतिभा सर्वस्पर्शी, मूलगामी व संग्राहक असल्यामुळें रिपब्लिकमध्यें उपलब्ध होणारे सिद्धांत कोणत्याही देशांत व युगांत उपयुक्त, प्रासंगिक ठरतील.

प्लेटोचे प्राचीन भारतीय संस्कृतीशीं जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आहेत व यामुळें प्लेटोच्या शिकवणीचें आकलन भारतीय जनतेस जितकें उपयुक्त तितकेंच आल्हादक वाटेल. कार्लमार्क्सपेक्षां तर प्लेटो भारतीय संस्कृतीस कितीतरी जवळ आहे. आणि प्लेटोंत कार्लमार्क्सच्या साम्यवादाची स्थूल रूपरेषाही अंतर्भूत आहे.

[ २ ]

प्लेटो व भारतीय तत्त्वज्ञ यांच्यांत कांहीं विलक्षण साम्यें आहेत. याज्ञवल्क्याचा आत्मवाद, मनूची वर्णाश्रमव्यवस्था, कपिलाचें सत्व, रज, तम हें गुणत्रय, आचार्यांचा विवर्तवाद, व्यासांचा राजर्षि–या सर्व कल्पनांच्या स्पष्टास्पष्ट प्रतिमा प्लेटोच्या तत्त्वमंदिरांत पहावयास मिळतात.

प्लेटो व सॉक्रेटीस यांचा अन्योन्य संबंधही जणूं काय भारतीय गुरु-संस्थेचेंच उज्ज्वल उदाहरण आहे. सद्गुरूच्या जीवनाशीं समरस होऊन स्वतःच्या व्यक्तित्वाला अंधारांत ठेवण्याची भारतीय तत्त्वजिज्ञासूंची व मुमुक्षूंची प्रथा प्लेटोनेंही आदरिलेली दिसते.

याज्ञवल्क्याचे "आत्मा वा अरे मन्तव्यः" हें सूत्र व प्लेटो सॉकेटिसांचें "Know thyself" हें तत्त्व हीं दोन्हीं स्थूलतः एकच होत. स्मृति-वाङ्मयांतील ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हें वर्णत्रय, व प्लेटोचे गार्डिअन्स (ज्ञानप्रेमी), ऑक्झिलिअरीज (युद्धप्रेमी) व प्रोडयूसर्स (अर्थप्रेमी) या आदर्श राज्यघटनेंतील तीन मानवजाति यांत काय भेद आहे? कापिल-सांख्यांचें सत्त्व, रज, तम हें त्रैगुण्य, व प्लेटोनें रिपब्लिकमध्यें सांगितलेले लॉजिस्टिकॉन्, थ्यूमॉस आणि एपिथ्यूमिया हे व्यक्तिमात्रांतील गुणविशेष या दोहोंमधील साम्य स्पष्टच आहे.

आद्य श्री. शंकराचार्य हे ‘ विवर्तवाद ’ अन्तिम मानतात. विवर्तवाद म्हणजे रज्जूवर ज्याप्रमाणें सर्पाचा भास होतो, त्याप्रमाणें मूलब्रह्मावर जगताचा आभास म्हणजे ‘ विवर्त ’ दिसणें. प्लेटोच्या Theory of Ideas किंवा चिद्वस्तुवाद या उपपत्तीप्रमाणें विश्वांतील विविध वस्तु स्वयंपूर्ण व आदर्श अशा मूलतत्त्वांचीं विकृत प्रतिबिंबें होत: याचाही ध्वन्यर्थ जग हें सत्यस्वरूप नसून आभासमय आहे. या दृष्टीनें प्लेटो व शंकराचार्य एकाच भूमिकेवर आहेत असें म्हणतां येईल.

आचार्यांच्या ‘ हस्तामलकांतील ’ बिंबप्रतिबिंबवाद हा प्लेटोच्या उपपत्तीचें मूलसूत्रच वाटतें. प्लेटोचे Ideas विषयींचे संवाद म्हणजे या लघुस्तोत्रावरील भाष्येंच होत.

गौडपादांच्या कारिकेंतील ‘ अजातवाद ’ ‘ अवच्छेदवाद ’ व विशेषत: ‘ कल्पनावाद ’ यांचें स्मरण प्लेटो वाचतांना वारंवार होतें.

योगवासिष्ठांत ‘ ब्रह्म ’ व ‘ जगत् ’ यांचा संबंध रत्न व त्याची प्रभा यांच्या संबंधाप्रमाणें आहे असें एक रूपक आढळतें. या भूमिकेस ‘ चिद्विलासवाद ’ असें म्हणतात. रत्न व त्याची प्रभा यामध्यें कार्यकारण संबंध नसून स्वभावाविष्कार आहे. त्याचप्रमाणें जगत् म्हणजेही चैतन्याचा विलास आहे, आविष्कार आहे, प्रभा आहे. प्लेटोच्या फीड्रस, फीडो, फिलेबस व लॉज् या चार संवादांत या भूमिकेचाही स्पष्टास्पष्ट निर्देष आढळतो.

त्याचप्रमाणें व्यासांनीं वर्णिलेली राजर्षींची कल्पना व प्लेटोनें रिपब्लिकमध्यें चित्रिलेली ‘फिलॉसफर-किंग’ ही कल्पना यांतील रहस्यार्थ एकच आहे. कठोपनिषदांत अंतिम आत्मतत्त्वाला “ सूर्यो यथा ” ( ३-२-११ ) म्हणजे सूर्याची उपमा दिली आहे. प्लेटोनेंही आपल्या ‘ सद्वस्तु–विश्वांतील ’ ( World of Eternal Ideas ) परमश्रेयाला ( The Good ) सूर्याचीच उपमा दिली आहे. नैयायिकांच्या जातिवादावर ( Doctrine of Universals ). शंकराचार्यांनीं केलेल्या टीकेचें स्मरण, प्लेटोचा चिद्वस्तुवाद व त्यावरील पारमेनिडिसचे आक्षेप, वाचतांना झाल्याशिवाय रहात नाहीं.

प्लेटो मानवी आत्म्याचे तीन विभाग करतो–बुद्धिप्रधान, वीर्यप्रधान व वासनाप्रधान. प्रत्येक विभागाला अनुरूप अशीं तीन प्रकारची धारणातत्त्वें, तीन प्रकारचीं सुखें व तीन प्रकारच्या आकांक्षाही त्यानें मानल्या

आहेत. भगवद्गीतेंतही सात्विक, राजस व तामस अशीं तीन प्रकारचीं सुखें, धृति व स्वभाव सांगितले आहेत.

प्लेटोनें केलेला, मत व सत्यज्ञान (Opinion and Knowledge), यांमधील फरक व मुंडकोपनिषदांतील अपराविद्या व पराविद्या यांतील भेद हे दोन्हीं एकाच दृष्टिकोनानें करण्यांत आले आहेत. प्लेटोच्या 'फीड्रस' नामक संवादांतील सारथी व अश्व यांचें रूपक, व कठोपनिषदांतील "विज्ञानसारथिर्यस्तु मनःप्रग्रहवान्नरः" ही कल्पना यांच्यामध्यें तंतोतंत साम्य आहे.

रिपब्लिकमधील गुहेचें सुप्रसिद्ध रूपक (Parable of the Cave) आणि छांदोग्य उपनिषदांत आलेली गांधार देशांतील डोळे बांधलेल्या एका पुरुषाची हकीकत यामध्येंही पुष्कळसें साम्य आहे. जगाच्या तात्विक वाङ्मयांत प्लेटोच्या गुहारूपकाला (Allegory of the Cave) मानाचें स्थान आहे. गुहेंतील बद्धजीवांस सत्सूर्याचें दर्शन कधींच होत नाहीं. त्यांचा परिचय फक्त पडछायेशीं असतो. ज्ञानी मनुष्याच्या सहाय्यानें कांहीं कालानंतर, बद्ध जीवांच्या अंधारास सरावलेल्या दृष्टीला सत्यदर्शन घडतें.

"राजकारणाचें मर्यादित वर्तुल हीच जणूं काय एक गुहा." (डॉ. जोवेट.) विशाल दृष्टि असलेला तत्त्वज्ञानी या गुहेंत गेल्यावर कांहीं वेळ साहजिकच आंधळ्यासारखा वागतो. पण लवकरच त्याला त्या गुहेचें संपूर्ण ज्ञान होतें. गुहेंमध्यें वास्तव्य करणाऱ्या अल्पज्ञ व्यक्ति एका अर्थी अंधच असतात. त्यांना तत्त्वज्ञानी म्हणजे एक उपहासाचा विषय वाटतो. कांहीं वेळ भांबावून गेलेला तत्त्वज्ञानी चिद्वस्तूचें त्याला ज्ञान असल्यामुळें लवकरच निर्भय होतो, व गुहेंतील अल्पज्ञ लोकांस मार्गदर्शक ठरतो. छांदोग्य उपनिषदांत असाच एक दृष्टांत आहे. गांधार देशच्या एका रहिवाशास चोर लुबाडतात; त्याचे डोळे बांधतात (अभिनद्धाक्षः) व त्याची दिशाभूल करून त्याला रानावनांत सोडतात. तेथें त्याला एक चांगला पांथस्थ भेटतो, तो त्याचे बांधलेले डोळे सोडतो व त्याला योग्य मार्ग दाखवितो. या रूपकांत चोर म्हणजे क्षुद्र मानवी विकार व वासना; पांथस्थ म्हणजे तत्त्वज्ञानी सद्गुरु; गांधारदेश म्हणजे स्थितप्रज्ञ अवस्था.

प्लेटोचें रूपक व छांदोग्य उपनिषदांतील रूपक स्थूलतः एकाच स्वरूपाचीं आहेत. अज्ञानानें होणारी डोळेझांक हें दोन्ही रूपकांचें रहस्य आहे.

प्लेटोच्या वाङ्मयांत, त्यानें स्वतः केलेला भारतीय तत्त्वज्ञानविषयक प्रत्यक्ष असा एकही निर्देश, संदर्भ, अगर उल्लेख नाहीं. प्लेटो व पौर्वात्य तत्त्वज्ञान यांच्यामध्यें असलेलीं विस्मयकारक अप्रत्यक्ष साम्यें लक्षांत घेतलीं कीं, एक कल्पना साहजिक मनांत येते; पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा प्लेटो, हा अखिल विश्वास आर्य करण्याची आकांक्षा धरणाऱ्या ( ' कृण्वन्तु विश्वमार्यम् ') एकाद्या प्राचीन वैदिक ऋषीचा अथेन्समधील अवतार असेल काय ?

[ ४ ]

प्लेटोला सामान्यतः गूढवादी ( Mystic ) समजण्यांत येतें. पण मला वाटतें प्लेटो हा गूढवादी नव्हता; वास्तववादी होता. अर्थात् प्लेटोचा वास्तववाद व कार्लमार्क्सचा वास्तववाद यांच्यामध्यें महत्त्वाचा भेद आहे. प्लेटोचा वास्तववाद अनुभवाच्या " वास्तविक " यथार्थ स्वरूपावर आधारला आहे, कार्लमार्क्सचा केवळ बाह्यवस्तूवर आधारला आहे.

प्लेटोच्या मतें अनुभवामध्यें, व्यक्ति व वस्तु, ज्ञेय व ज्ञाता या दोन्हीं पदांना सारखेंच महत्त्व आहे. कार्लमार्क्सच्या साम्यवादांत मानवी इतिहासाचा केवळ भौतिक दृष्टीनें अन्वयार्थ लावला जातो. यालाच Materialistic Interpretation of History असें म्हणतात. ज्ञेयाकडे, बाह्यवस्तूकडे, भौगोलिक व भौतिक परिस्थितीकडे, संपूर्ण कारकत्व असून ज्ञाता, व्यक्ति, मनुष्य हा एक बाह्यतः निर्णित असा जड परिणाम आहे, ही साम्यवादाची भूमिका. भौतिक शक्ति ही खरी निर्णायक, शासक शक्ति. प्लेटोला ही भूमिका मान्य नाहीं. अनुभव म्हणजे बाह्य भौतिक परिस्थितीची मनावर होणारी केवळ प्रतिक्रिया नव्हे. अनुभव म्हणजे व्यक्ति व वस्तु, ज्ञाता व ज्ञेय, द्रष्टा व दृश्य यांच्या एकमेकांवर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया. वस्तूमुळें, त्याचप्रमाणें व्यक्तीमुळेंही अनुभवाचें स्वरूप ठरत असतें. दर्शनाच्या क्रियेंत बदल केला कीं दृश्यही बदलतें. डोळ्यावरील चामडी किंचित् दाबली तर एका वस्तूऐवजीं दोन वस्तू

दिसूं लागतात. कावीळ झालेल्या डोळ्यांना सर्व पिवळेंच दिसतें; इंद्रिय-दोषानें प्रत्यय-दोष निर्माण होतो व वस्तुप्रतीती भिन्न होते. ज्ञात्याच्या स्वरूपाप्रमाणें, वैशिष्ट्याप्रमाणें ज्ञेयांतही बदल होतो. प्लेटोच्या वास्तव-वादांत अनुभवाचें वास्तविक स्वरूप व्यक्त झालें आहे. प्लेटोच्या भूमिकेंत वस्तु व व्यक्ति या दोन्हीं पदांचा समन्वय झाला आहे. म्हणून प्लेटोला समन्वयनिष्ठ वास्तववादी Synthetic Realist म्हणतां येईल.

[ ५ ]

प्लेटोच्या रिपब्लिकमधील वास्तववादास "व्यवहारवाद" हें नांव अधिक शोभेल. त्याच्या निर्भीड व्यवहारी दृष्टीला सर्वसामान्य व रूढ नीतिचें क्षितिजही मर्यादित करूं शकत नाहीं. स्वतः तत्त्वज्ञ असूनही तत्त्वज्ञानाचें त्यानें अवास्तव स्तोम माजविलेलें नाहीं. तरुणांना तर तत्त्व-ज्ञानाच्या क्षेत्रांत उतरण्याची त्यानें मनाईच केलेली आहे. तत्त्वज्ञान हें पन्नास वर्षांच्या पलीकडील वृद्धांकरतां असून त्याचा अभ्यास चालू असतांही लोकसंग्रहाचें व्रत अव्याहतपणें सुरू पाहिजे असा प्लेटोचा कटाक्ष आहे.

स्त्रिया व पुरुष यांमध्यें स्वभावतः भेद नाहीं; स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें सर्व क्षेत्रांत कार्य करूं शकतील. त्यांना पुरुषांच्या बरोबरीनें व्यायाम, शिक्षण, युद्धकला हीं शिकवण्यांत यावीं असें प्लेटोचें स्पष्ट मत आहे. आधुनिक साम्यवादाप्रमाणें प्लेटोच्या मतें स्त्रिया व मुलें यांवर समाजाची मालकी असून समाजोत्कर्षाकरतां त्यांच्या जीवनाचें स्वामित्व समाजाकडेच असावें. सुप्रजाजनन शास्त्राचा प्लेटो हा आद्य प्रणेता दिसतो. चांगली प्रजा निर्माण व्हावी म्हणून उत्तम स्त्रीपुरुषांना मुद्दाम एकत्र आणण्यांत यावें, वीरपुत्र अधिक निर्माण व्हावे म्हणून कर्तृत्ववान् व झुंजार तरुणांना स्वैरसमागमाची अपवादात्मक परवानगी देण्यांत यावी, युद्ध-नीतीपुढें, सामाजिक नीतीपुढें, वैयक्तिकनीतीनें नमतें घेतलेंच पाहिजे, अशीं मतें रिपब्लिकमध्यें प्लेटोनें प्रकट केलीं आहेत.

विवाह संस्थेबद्दल त्याला आदर आहे, पण ती एक उपयुक्त संस्था म्हणून. विवाह संस्थेच्या धार्मिकतेविषयीं त्याला विशेष उत्साह किंवा आस्था नाहीं.

सख्यभाव (Friendship) त्याला मानवी जीवनांत अत्यंत महत्त्वाचा वाटतो. मित्रत्व ही जवळ जवळ विवाहाइतकी महत्त्वाची संस्था त्याला

वाटेत. परस्पर-स्नेह-भावाच्या प्रगतींत, वृद्धींत अनेक अडचणी असतात हे तो जाणतो. प्लेटोच्या मतें Loyalty म्हणजे निष्ठा हें मित्रांच्या प्रीतिरसायनाचें रहस्य आहे.

प्लेटोची संवादात्मक पद्धति मनोरंजक व उद्बोधक आहेच पण संवादाच्या स्वरूपानें त्यानें एका अभिनव बौद्धिक प्रक्रियेला (Dialectical Method) जन्म दिला आहे. या प्रक्रियेचा पाश्चिमात्य विचारसरणीवर अव्याहतपणें परिणाम होत आहे. प्लेटोचे ईश्वर विषयक विचार तर्कशुद्ध आहेत. सत्यापरता नाहीं धर्म—सत्य तेंचि परब्रह्म, ही भूमिका त्याला मान्य आहे.—We are more certain of our Ideas of Truth, and Right, than we are of the existence of God, and are led on, in the order of thought, from one to the other.

[ ६ ]

प्लेटोच्या आदर्श राज्यघटनेंत समाजशास्त्रदृष्ट्या, नीतिशास्त्रदृष्ट्याही अनेक दोष आहेत. शिवाय ही घटना पूर्णांशानें सत्यसृष्टींत उतरणें सर्वथैव अशक्य आहे. प्लेटोच्या व्यावहारिक दृष्टीला या आदर्श राज्यघटनेची असंभवनीयता, अव्यवहार्यता, स्पष्ट दिसली होती, पण A noble lie एक उदात्त असत्य, ध्येयमूर्ति म्हणून दृष्टीसमोर ठेवणें हितप्रद ठरेल अशी प्लेटोची श्रद्धा आहे.

आजच्या जागतिक अस्वास्थ्याचें एक कारण—पाश्चात्य जगास प्लेटोच्या संदेशाचे ध्वन्यर्थ समजले नाहींत—हें होय. इतिहास म्हणजे प्रामुख्यानें महनीय व्यक्तींचें चारित्र्य. आजच्या जागतिक संस्कृतीच्या व्यक्त, प्रकट इतिहासामागें ज्या महनीय व्यक्ति पार्श्वभूत आहेत त्यांत प्लेटोचें स्थान पहिलें नसलें तरी पहिल्या रांगेतलें निस्संशय आहे. विशेषतः पश्चिम गोलार्धाची आजची संस्कृति प्लेटोच्या तत्त्वप्रणालीचाच एक परिणाम, कांहीं अंशीं विकृत परिणाम आहे. ही विकृति नष्ट करण्यास प्लेटोची भूमिका यथार्थतः, स्वभावतः आकलन झाली पाहिजे.

‘रिपब्लिक’ या प्लेटोच्या ग्रंथांत उच्चोदात्त ध्येयदृष्टि व कटुकठोर वास्तव सृष्टि यांचा सुंदर समन्वय उपलब्ध होतो. या ग्रंथांत सामाजिक समतेवर

प्लेटोनें दिलेला भर आजच्या भांडवलशाही संस्कृतीनें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

रिपब्लिक हा शिक्षणशास्त्रावरीलही एक प्रमुख ग्रंथ समजला जातो. मिल्टन्, लॉक्, रूसो, जीन पॉल व गटे यांच्या शिक्षणविषयक विचारावर रिपब्लिकची चांगलीच छाया आहे. गणित, खगोलशास्त्र, भूमिती, व तर्कशास्त्र, या विषयांवर प्लेटो विशेष जोर देतो. मानवी आत्म्याच्या बुद्धि-प्रधान अंगाची शक्य तितकी वाढ करण्याविषयीं त्याचा आग्रह आहे. वाङ्मय विषयक अभ्यासास तो फारसें महत्त्व देत नाहीं. स्वयंशिक्षण (Self-Education) हें प्लेटोचें ध्येय आहे. प्लेटो पूर्व- व पुनर्जन्मवादी असल्यामुळें व्यक्तिमात्रांत सुप्त असलेल्या स्वाभाविक शक्तींचा विकास करणें हेंच शिक्षणाचे खरें कार्य होय असें त्याचें मत आहे. तथापि, प्लेटोचा शैक्षणिक दृष्टिकोन वैयक्तिक नसून राष्ट्रीय आहे.

राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें संरक्षण कसें होईल, राष्ट्रीय वर्चस्व व संघटना कशी टिकेल, व्यक्तीचे स्वभावसिद्ध गुणविशेष राष्ट्राला अधिकांत अधिक उपयुक्त कसे होतील, या दृष्टीनें प्लेटोनें शिक्षणशास्त्राचा विचार केला आहे. हीच दृष्टि हिंदुस्थानांतील जनतेस आज आवश्यक नाहीं काय ?

मुसोलिनीनें इटलींत सुरू केलेली शिक्षणयोजना राष्ट्रीय दृष्टीची व प्लेटोच्या शिकवणीवर आधारलेली अशीच आहे. महाराष्ट्रांत तरी प्लेटोचे राष्ट्रीय–शिक्षणविषयक व क्षात्रवृत्तीला उत्तेजक असे विचार प्रसृत होणें अतिशय आवश्यक आहे.

[ ७ ]

दिलरुब्याच्या छेडलेल्या एका तंतूवरून दुसऱ्या तंतूवर संबद्ध पण स्वतंत्र असे वेधक ध्वनि प्रकट होतात तसा काहींसा अनुभव प्रो. जोगळेकर यांचा अनुवाद वाचतांना येतो; हा अनुवाद मूलार्थप्रापक तर आहेच आहे पण त्यांत एक स्वतंत्र नादवत्ता आहे, कारण तो जिव्हाळ्यानें लिहिण्यांत आला आहे. प्लेटोच्या उत्तुंग मानससरोवरांत डुंबत डुंबत, त्याच्या तत्त्व शास्त्राशीं पुनः पुनः समरस होऊन प्रो. जोगळेकर यांनीं आपला अनुवाद प्रकट केला आहे. कित्येक मराठी शब्दांच्या अर्थप्रापकतेविषयीं त्यांनीं माझ्याशीं केलेले प्रदीर्घ वादप्रवाद स्मृतींतून अद्यापीही ओघळले नाहींत.

तत्त्वज्ञानाच्या आवडीनें प्रो. जोगळेकरांचें अंतःकरण, सामान्यतः गेलीं पंधरा वर्षें, प्लेटोच्या वाङ्मयवाटिकेंत रमून राहिलें आहे. तेथील मनोज्ञ पुष्पांचे गंधगर्भ लुटणें, लुटविणें हा प्रो. जोगळेकरांच्या बुद्धीचा कित्येक वर्षांचा सहजसिद्ध लीलाविलास आहे. ते स्वभावतः कठोर सत्यनिष्ठचे, चिकित्सक वृत्तीचे समीक्षक, टीकाकार आहेत. या मनोरचनेच्या वैशिष्ट्याचा परिणाम त्यांच्या या लाडक्या कलाकृतीवरही झाल्याशिवाय राहिला नाहीं त्यांच्या अनुवादांत प्रसादापेक्षां अर्थनिष्ठा अधिक आहे–कल्पकतेपेक्षां प्रामाण्यावर, सजावटीपेक्षां सत्यावर, व शब्दसंभारापेक्षां वस्तुदर्शनावर अधिक भर आहे; आणि अनुवादांत ही प्रवृत्ति गुणस्थान आहे–वैगुण्य नव्हे हें काय सांगितलें पाहिजे ?

प्रो. वामन मल्हारांचें प्लेटोचें भाषांतर ( सॉक्रेटिसाचे संवाद ) वाचतांना रसनिष्पत्ति होते–मधून मधून हृदयास गुदगुल्या होतात–प्रो. जोगळेकरांचा अनुवाद वाचतांना वाचकाला बौद्धिक जाग येते. प्लेटोनें उपस्थित केलेलीं प्रमेयें वाचकाच्या विचारशक्तीला, संत्रस्त सैतानांप्रमाणें भंडावून सोडतात. त्याच्या बौद्धिक स्तब्धतेस जोराचा धक्का देऊन त्याला वेडापिसा करतात. रिपब्लिक सारख्या बुद्धिप्रधान ग्रंथाला तरी हीच प्रतिक्रिया इष्ट व आवश्यक आहे. आणि ती निष्पन्न करण्याचें सामर्थ्य प्रो. जोगळेकरांच्या अनुवादांत स्पष्ट असल्यामुळें त्यांचें अंगीकृत कार्य स्पृहणीय यशस्वितेनें पार पडलें आहे. याबद्दल त्यांचें स्नेहस्निग्ध अभिनंदन करून हा पुरस्कार पूर्ण करतों

६२९ शनिवार, पुणें.<br>१२ फेब्रुआरी १९३९ } धुं गो. विनोद

माझे बालमित्र न्यायरत्न विनोद यांच्या लेखणीचें या अनुवाद–ग्रंथास लाधलेलें पुरस्कारात्मक साहचर्य ही माझ्या, व मला वाटतें, त्यांच्याही आयुष्यांतील एक स्नेह-मधुर घटना आहे. सख्य भावाचें सहाय्य फार मोलाचें असतें व आम्हां दोघांसही तें एकमेकांपासून अव्याहतपणें मिळत आहे. श्री. विनोद यानी आपल्या पुस्तकांत प्लेटोच्या तत्त्वज्ञानाची जी स्थूल रूपरेषा विशद केली आहे, त्याच्या संदेशाचें जें मर्म प्रकट केलें आहे तें प्लेटोच्या अभ्यासकांस उद्‌बोधक वाटेल. श्री. विनोद यानी दिलेल्या पुरस्कारात्मक साहचर्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मला विशेष आनंद वाटतो.

ज. ग. जोगळेकर.

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| २ | ३ | विचारिलें, | म्हटलें, |
| १४ | २२ | Steph335 | Steph 334 |
| ३० | ६ | ग्रॅसिमाकससारख्या पुढें | ग्रॅसिमाकससारख्या विद्वानासमोर |
| ५७ | ८ | केली, आहे | केली आहे, |
| ९९ | ९ | आपणास | आपण |
| १०० | ३ | न्याय | न्याय्य |
| १०८ | २० | Steph 367 | Steph 387 |
| १२१ | १९ | त्याच्याबद्दल | त्याच्या |
| १२२ | १० | विणवणी केली, | विनवणी केली. |
| १२३ | ७ | म्हण्याणचा | म्हणण्याचा |
| १२३ | १३ | आहांत ? | आहांत. |
| १२७ | १५ | तिरस्कारणीय | तिरस्करणीय |
| १३६ | १५ | वाढावयास | वाटावयास |
| १४० | ९ | प्रेमाच्या सौंदर्यांत | सौंदर्याच्या प्रेमांत |
| १४३ | ५ | तुलाना | तुलना |
| १४७ | ३ | पोटपाण्याची | पोटापाण्याची |
| १४९ | ५ | डुसऱ्यालाही | दुसऱ्यालाही |
| १५९ | २ | तुम्हला | तुम्हाला |
| १९३ | २४ | ह्यावरील | ह्या वरील |
| २२० | ३ | निर्देष | निर्देश |
| २५२ | ११ | प्रश्रांचाच | प्रश्नांचाच |

| | | | |
|---|---|---|---|
| २८७ | १६ | पाहिजे ? | पाहिजे. |
| ३११ | २१ | बहुजनसमाचें | बहुजनसमाजाचें |
| ३५१ | २१ | संमति | पसंति |
| ३८९ | ५ | 54...मजतो, | 545 न्यायी समजतों, |
| ४०० | १४ | त्याच्याच | त्याचाच |
| ४०३ | २१ | अल्प प्रजासत्ताक राज्यद्धतीनें | अल्पप्रजासत्ताक पद्धतीनें |
| ४३३ | १२ | त्यांच्या विरुद्ध | आपल्या विरुद्ध |
| ४८३ | १ | आपऱ्या | आपल्या |
| ४९३ | २ | सल्यामुळें | सळ्यामुळें |
| ५०६ | १७ | लोकांन | लोकांना |
| ५३८ | १३ | तत्वज्ञान | तत्त्वज्ञान |
| ,, | २२ | तत्वज्ञानी | तत्त्वज्ञानी |

The Republic ( आदर्श राज्यघटना ) हा ग्रंथ Plato प्लेटोनें संवादरूपानें लिहिला आहे. ह्या संवादांत Socrates सॉक्रेटिस ही प्रमुख व्यक्ति असून पुढील व्यक्तींनीं वादविवादांत भाग घेतला आहे.

| | |
|---|---|
| Cephalus सिफालस् | एक वृद्ध मनुष्य. |
| Glaucon ग्लॅकॉन्<br>Adeimantus ॲडिमेन्टस् | प्लेटोचे भाऊ. |
| Polemarchus पॉलीमार्कस् | सिफालसचा मुलगा. |
| Thracymachus थ्रॅसिमाकस् | एक सोफिस्ट ( पैसे घेऊन शिक्षण देणाऱ्या पंथाचा एक प्रतिनिधि ). |
| Cleitophon क्लिटोफोन | थ्रॅसिमाकसचा मित्र. |

सॉक्रेटिसानें बेंडिस देवतेच्या उत्सवाच्या दिवशीं सिफालच्या घरीं हा सर्व वादविवाद केला आहे असें समजावें.

पुस्तकाच्या समासांतून Steph 327, Steph 328 अशा प्रकारचा जो निर्देश आहे तो Stephanus च्या Greek Text ला धरून आहे.

७८५६
निबंध ६३८
२०१५०

# प्लेटोची आदर्श राज्यघटना

## पुस्तक पहिलें

५८५६

काल मी[1], ॲरिस्टॉनचा पुत्र ग्लॅकान्, याजबरोबर बेंडिस[2] देवतेची प्रार्थना करण्याकरितां, पिरिअसला गेलों होतों. पहिल्या
Steph 327 प्रथमच होणारी जत्रा कशी काय होते, हें पहाण्याचाही माझा उद्देश होता. अथेनिअन नागरिकांची मिरवणूक पाहून मला फार आनंद झाला. थ्रेशिअन लोकांची मिरवणूकही कांहीं कमी सुंदर नव्हती. देवीची प्रार्थना आटपून व आमची उत्सुकता तृप्त करून, आम्ही शहराकडे परत जावयास निघालों होतों. इतक्यांत सिफालसचा मुलगा, पॉलिमारकस्, ह्यानें आम्हांला कांहीं अंतरावरून, घरीं येण्यास निघालेले पाहिलें. लगेच त्यानें आपल्या नोकरास आमच्याकडे पाठवून आम्हांला थांबविण्यास सांगितलें. नोकरानें माझ्या पाठीमागें येऊन माझ्या अंगरख्याला धरून म्हटलें, "आमचे धनीसाहेब पॉलिमारकस्, आपणास थांबावयास सांगत आहेत." मी मागें वळून धनीसाहेब कोठें आहेत म्हणून विचारलें. त्यानें उत्तर दिलें, "हे पहा! ते मागून येतच आहेत. आपण त्यांच्याकरितां थांबावें." ग्लॅकान् म्हणाला, "आम्ही थांबतों." थोड्याच वेळानें, ग्लॅकान्चा भाऊ ॲडिमेन्टस्, निसिअस्चा पुत्र निसेरटस् व

१ सॉक्रेटिस. ह्या ग्रंथांतील सर्व संवाद सॉक्रेटिसानें वर्णन केला आहे, अशी कल्पना केली आहे.

२ बेंडिस ही थ्रेशिअन लोकांची देवता होय.

आणखी कांहीं लोक ह्यांच्यासह, पालिमारकस् जत्रेहून परत येऊन आमच्याजवळ आला.

पॉलिमारकस्नें लगेच मला विचारिलें, "सॉक्रेटिस्, तुम्ही शहराकडे जात आहां, असें मला वाटतें."

मी म्हटलें, "तुझा तर्क कांहीं खोटा नाहीं."

पॉलि०:—आम्ही किती मंडळी आहोंत, हें पाहिलेंत ना?

सॉक्रे०:—होय.

पॉलि०:—तर मग, तुमची मंडळी आमच्यापेक्षां प्रबळ आहेत असें तुम्हाला सिद्ध तरी करावें लागेल, अथवा आमच्या म्हणण्याला मान देऊन याच ठिकाणीं रहावें लागेल.

सॉक्रे०—पण आम्हांला जाऊं द्यावें म्हणून जर आम्हीं तुमचें मन वळवलें, तर तुम्हीं जाऊं द्याल ना?

पॉलि०:—जर आम्ही तुमचें म्हणणें ऐकावयासच तयार नसलों, तर आमचें मन तुम्हांला वळवितां येईल काय?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

पॉलि०:—तर मग तुमची खात्री असूं द्या कीं, आम्हीं तुमचें म्हणणें मुळीं ऐकणारच नाहीं.

ॲडिमेन्टस् मध्येंच म्हणाला, "देवतेच्या सन्मानार्थ, संध्याकाळीं
Steph घोड्यावरून मशालींच्या शर्यती व्हावयाच्या आहेत, हें
328 तुम्हाला माहीत नाहीं काय?

मी उद्गारलों, "काय घोड्यावरून! ही एक नवीनच मौज आहे! घोडे धावत असतांना पेटत्या मशाली एकमेकांना द्यावयाच्या, अशाच तऱ्हेची ही शर्यत आहे, असेंच तुम्ही म्हणतां ना?

पॉलि०:—होय अशीच! शिवाय रात्रीं एक जत्रा भरणार आहे. ती बघण्यासारखी आहे. आपण जेवणखाण आटपून मग ती बघावयास

जाऊं. आपणास पुष्कळ तरुण लोक तथें भेटतील व त्यांच्याबरोबर संभाषण करावयास सांपडेल. म्हणून आमच्या विनंतीस मान देऊन तुम्ही येथेंच रहाण्याचें करावें.

ह्यावर ग्लॅकान् म्हणाला, "आपणास येथें रहावें लागणार असें दिसतें."

मी म्हटलें, "तुमची इच्छा असेल तर आपण राहूं या."

अशा तऱ्हेनें पॉलिमारकसच्या घरीं आम्ही गेलों. तेथें त्याचे भाऊ लिसिआस व युथिडिमस, चॅलसिडानचा थ्रॅसिमाकस्, पेनिअनचा चारमनटिडस् व ॲरिस्टानीमसचा पुत्र क्लिटोफोन, हे आम्हाला आढळले. पॉलिमारकसचा बाप सिफालस, हा सुद्धां घरीं होता. मी त्याला पुष्कळ दिवसांनीं पाहिल्यामुळें, मला तो बराच वृद्ध दिसला. अंगणामध्यें यज्ञ करीत असल्यामुळें, डोक्यावर माळा घालून तो एका गादीच्या खुर्चीवर बसला होता. त्याच्याभोंवतीं, लोकांना बसण्याकरितां खुर्च्या मांडलेल्या होत्या, त्यांवर आम्ही बसलों. मला पाहिल्याबरोबर तो माझें स्वागत करून म्हणाला, "तुम्ही पिरिअसला फारच क्वचित् येऊन आम्हाला भेटतां. खरोखरच तुम्ही वारंवार येथें आलें पाहिजे. शहरापर्यंत जाण्याची जर माझ्या अंगांत शक्ति असती, तर तुम्हाला इकडे येण्याची तसदी न देतां तुमच्याकडेच आम्ही आलों असतों. पण मी अशक्त असल्यामुळें तुम्हीच इकडे वारंवार आलें पाहिजे. मी तुम्हाला खचित् सांगतों कीं, ज्या प्रमाणांत शारीरिक सुखाची माझी भूक कमी झाली आहे त्याच-प्रमाणांत तत्त्वज्ञानविषयक संभाषणाच्या सुखाची माझी भूक वाढली आहे. म्हणून म्हणतों, माझी विनंती मान्य करून ह्या तरूण लोकांना आपल्या संगतीचा फायदा देत जा व जिव्हाळ्याच्या मित्राप्रमाणें इकडे आम्हास भेटण्यास वारंवार येत जा."

मी उत्तर दिलें, "सिफालस! खरें सांगावयाचें म्हणजे मला वृद्ध लोकांबरोबर संभाषण करण्यांत फार आनंद वाटतो.

Steph 329 कारण जगाच्या प्रवासांत आमच्यापुढें ते ज्या रस्त्यावरून गेले आहेत, त्याच रस्त्यावरून आम्हास जावयाचें असल्यामुळें, आम्ही त्यांच्यापासून तो रस्ता खडबडीत व कठीण, अथवा गुळगुळीत व सोपा आहे, ह्याविषयीं माहिती करून घेतली पाहिजे, असें मला वाटतें. कवी म्हणतात त्याप्रमाणें, तुम्ही आतां ‘ अन्तकालाच्या उंबरठ्यावर ’ आल्यामुळें, तुमच्या अभिप्रायाची योग्यता कोणापेक्षांही मी अधिक मानतों. म्हणून मी आपणास पुढील प्रश्न विचारतों. अतिवार्धक्याच्या वेळीं आयुष्य दुःखदायक असतें काय? अथवा तुमचें मत काय आहे ?

सिफालस म्हणाला, “ सॉक्रेटिस ! ह्याविषयीं माझा अनुभव मी तुम्हाला सांगतों. जुन्या म्हणीप्रमाणें, मी आणि माझ्यासारखे वृद्ध लोक, ह्याना वारंवार एकत्र भेटण्याची संवय असते. अशा वेळीं त्याना तारुण्यांतील प्रणयचेष्टा, मेजवान्या व मदिरापानाच्या बैठकी आठवून दुःख होतें. तरुणांच्या सुखांचा ते हेवा करून शोक करीत बसतात व असे उद्गार काढतात कीं, “त्या सुखाच्या काळांतच आपण खऱ्या अर्थानें जगत होतों. आतां आपण कसें तरी आयुष्य कंठीत आहोंत, इतकेंच ! ” शारीरिक दौर्बल्यामुळें नातेवाईकांकडून होणाऱ्या अपमानांची गाऱ्हाणीं कांहीं वृद्ध लोक सांगत बसतात व इतरही दुःखकारक गोष्टींचें वर्णन करून, वृद्धपणाची निंदा करीत असतात. पण सॉक्रेटिस, माझ्या मतें, हे लोक आपल्या दुःखाचें खरें कारण विसरतात. कारण वृद्धत्व हें जर खरें कारण असतें, तर मला अथवा माझ्या वयाच्या इतर वृद्धांना सुद्धां तींच दुःखें भासावयास लागून त्रास झाला असता. पण पुष्कळ वृद्ध लोकांचा व माझा तसा अनुभव नाहीं. विशेषतः वृद्ध कवि सोफोक्लिस ह्याच्याविषयीं तुम्हास सांगतों. माझ्यासमोर त्याला कोणी विचारलें, “ सोफोक्लीस, आपणाला प्रेमाबद्दल काय वाटतें ? अजूनही आपण प्रेम करूं शकतां काय ? ” सोफोक्लीसनें उत्तर दिलें, “ छट् ! माफ करा ! ! खरोखर

एका लहरी आणि रानटी धन्यापासून माझी मुक्तता झाली म्हणून मला मोठा आनंद वाटतो." सोफोक्लीसचे हे उद्गार मला त्या वेळेस शहाणपणाचे वाटले व आतांही वाटतात. कारण वृद्धत्व, हें मनुष्यास प्रेम व इतर विकार ह्यांपासून मुक्त करून, मनाला गाढ शांती देतें. वासना थंडावून त्यांचा जोर कमी झाला म्हणजे सोफोक्लीसच्या वर्णनाप्रमाणें, अनेक भयंकर तामसी धन्यांपासून जणूं आपली सुटका झाली, असें वाटतें. वस्तुतः वरील प्रकारचीं दुःखें व नातेवाईकांपासून होणारा अपमान, ह्याना कारण वृद्धत्व नसून मनुष्याचा स्वभाव होय. मन सुव्यवस्थित असून स्वभाव शांत असेल, तर वृद्धत्व असहनीय होणार नाहीं. पण जर अशा प्रकारचा स्वभाव नसेल, तर तारुण्यसुद्धां वृद्धत्वासारखें त्रासदायक होईल."

सिफालसच्या भाषणाचें मला कौतुक वाटलें. त्यानें आपलें भाषण पुढें चालू ठेवावें, या हेतूनें मी म्हटलें, "सिफालस, माझी कल्पना अशी आहे कीं, लोकांना तुमची मतें ग्राह्य न वाटण्याचें कारण, त्यांच्या मतें तुमचा स्वभाव चांगला आहे म्हणून नव्हे तर तुमच्याजवळ पुष्कळ पैसा आहे म्हणून तुम्हाला वृद्धत्व सहन करतां येतें! श्रीमंतांना समाधानी राहण्यास पुष्कळ गोष्टी अनुकूल असतात, हें सुप्रसिद्धच आहे."

सिफालसः—खरें आहे! लोक माझ्यावर विश्वास ठेवणार नाहींत. आणि कांहीं अंशीं त्यांचें म्हणणें खरें आहे, पण ते समजतात इतकें तें खरें नाहीं. सेरिफियननें थेमिस्टोक्लसला कुचेष्टेनें म्हटलें, "तुझी प्रसिद्धी तुझ्या स्वतःच्या गुणांच्या जोरावर नसून तुझ्या देशाच्या कीर्तीवर आहे." त्यावर थेमिस्टोक्लसनें जें उत्तर दिलें, त्यांत पुष्कळ सत्य आहे. तो म्हणाला, "मी सेरीफस देशाचा रहिवाशी असतों तर
Steph मी प्रसिद्धीस आलों नसतों, पण तूं अथीनिअन होऊनही
330 प्रसिद्धीस आला नसतास!" जे श्रीमंत नसून वृद्धपणीं असमाधानी असतात त्यांना असेंच उत्तर देतां येईल कीं, जसा सज्जन

पण दरिद्री मनुष्य वृद्धपणीं आनंदी असूं शकणार नाहीं, तसा वाईट स्वभावाचा श्रीमंत मनुष्यही कधीं समाधानी असूं शकणार नाहीं."

सॉक्रेटिसः—पण सिफालस, तुमची संपत्ति वंशपरंपराप्राप्त आहे कीं स्वकष्टार्जित आहे?

सिफालसः—सॉक्रेटिस, स्वतः मी किती मिळविली असें तुम्ही विचारतां ना? पैसे मिळविण्याच्या बाबतींत, आजोबा व वडील ह्यांच्या मधलें स्थान मी मिळविलें आहे. ज्यांचें नांव मला ठेवण्यांत आलें आहे, अशा माझ्या आजोबांना, सध्यां माझ्याजवळ असलेल्या संपत्तीइतकी संपत्ति वंशपरंपरेनें मिळाली व तिच्या कितीतरी पटीनें ती त्यांनीं वाढविली; पण माझ्या वडिलांनीं म्हणजे लिसेनिअसनीं हल्लीं आहे त्यापेक्षां ती पुष्कळ कमी केली! आतां माझ्याबद्दल विचार करतां, जितकी संपत्ति माझ्या हातांत प्रथम आली तिच्याहून कमी नाहीं पण थोडीबहुत जास्तच, माझ्या मुलांना मला ठेवतां आली, म्हणजे मी समाधान मानीन.

सॉक्रे॰:—मी तुम्हाला हा प्रश्न विचारण्याचें कारण असें कीं, तुम्हांला पैशाची विशेष आवड दिसत नाहीं. ज्यांनीं स्वतः संपत्ति मिळविलेली नाहीं, त्यांच्याविषयीं साधारणतः असेंच म्हणतां येईल. उलट ज्यांनीं स्वतः संपत्ति मिळविलेली आहे, ते इतर लोकांपेक्षां संपत्तीला कितीतरी कवटाळून बसतात. ज्याप्रमाणें कवीचें आपल्या वाङ्मयकृतीवर प्रेम असतें अथवा बापाचें आपल्या मुलावर असतें, त्याप्रमाणें ज्यांनीं स्वतः पैसा मिळविला आहे त्यांचें आपल्या पैशावर, केवळ पैशाच्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें नव्हे (इतर लोकानाही पैशाच्या उपयुक्ततेमुळें पैशाविषयीं प्रेम वाटतेंच) तर, स्वतःच्या श्रमानें तो मिळविला आहे, म्हणून प्रेम असतें. संपत्तीच्या स्तुतीपलीकडे स्तुति करावयास अशा लोकांना विषयच नसल्यामुळें त्यांची संगति इतरांना अप्रिय होते.

सिफा०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—खरेंच आहे! पण तुम्हाला आणखी एक प्रश्न विचारण्याची परवानगी घेतों. श्रीमंत असण्यापासून सर्वांत मोठा फायदा तुम्हाला कोणता मिळाला?

सिफा०:—मी जर तो सांगितला तर तो फारच थोड्या लोकांना पटेल. सॉक्रेटिस, मनुष्याला जेव्हां आपला अन्तकाल समीप आला आहे असें वाटतें, तेव्हां ज्या गोष्टींनीं त्याला त्रास दिला नसेल अशा गोष्टींबद्दल त्याला भीति व काळजी वाटूं लागते. 'ह्या जगांत ज्यानें पापें केलीं आहेत त्याला त्यांबद्दल स्वर्गांत शिक्षा भोगावी लागते', अशा समजुतींची त्यानें पूर्वीं जरी चेष्टा केली असली, तरी मृत्यू जवळ आला असतां, ह्या गोष्टी खऱ्या असूं शकतील अशी त्याला भीति वाटून त्याच्या मनाला त्रास वाटूं लागतो. आणि कदाचित् वार्धक्याच्या दुर्बलतेमुळें म्हणा अथवा पुढील आयुष्याच्या तो समीप येत असल्यामुळें म्हणा, ह्या गूढ गोष्टींबद्दल त्याला सूक्ष्म दृष्टी येऊं लागते. संशय व भीति ह्यांनीं ग्रस्त होऊन आपल्या हातून कोणाचें अनहित झालें आहे काय, असा तो विचार करावयास लागतो. आपल्या हातून बरींच अन्यायाचीं कृत्यें झालीं आहेत, असें जर त्याला आढळून आलें, तर लहान मुलाप्रमाणें तो झोपेंतून घाबरून जागा

Steph 331 होतो; आणि भावी दुःस्थितीचीं भेसूर चित्रें त्याच्या मनश्चक्षूंपुढून केव्हांही हालत नाहींत. परंतु त्याच्या मनोदेवतेनें, आपण एकही दुष्कृत्य केलेलें नाहीं अशी खातरी दिली, म्हणजे पिंडार म्हणतो त्याप्रमाणें, वृद्धापकाळची दयाळू दाई आशादेवी, आपल्या सदैव सान्निध्यानें त्याला आनंद देते. खरोखर सॉक्रेटिस, ज्यानें आपलें आयुष्य न्यायानें व सदाचारानें घालविलें आहे, अशा मनुष्याचें पिंडार कवीनें फारच सुंदर शब्दांत वर्णन केलें आहे. "मर्त्य

१ A fragment from a lost work of Pindar.

लोकांच्या लहरी वासनांना ताळयावर आणणारी आशादेवी, न्यायी व सद्गुणी मनुष्याची, वृद्धापकाळामध्यें गोड सहचारिणी होते, तीच त्याला उत्साह देते व तीच त्याची दाई होते." पिंडारचें हें वर्णन किती अर्थपूर्ण आहे! आणि म्हणून मी म्हणतों, श्रीमंती जरी सर्वांना महत्त्वाची वाटत नसली, तरी सद्गुणी माणसाला ती फारच महत्वाची वाटते. कारण अजाणतेपणानें होणाऱ्या लबाडीपासून अथवा असत्यापासून ती त्याचें रक्षण करते. तसेंच संपत्ति असल्यामुळें, त्याला देवाला केलेलें नवस फेडतां येतात व उसने घेतलेले पैसे देऊन टाकतां येतात. यामुळें मरणसमयीं त्याला मुळींच भीति वाटत नाहीं व तो सुखानें परलोकीं जाऊं शकतो. संपत्तीचे इतरही पुष्कळ उपयोग आहेत. परंतु एकंदरीनें त्यांचा विचार करतां, मला असें वाटतें कीं, आपण देवाचे नवस फेडावयाचे ठेवले नाहींत अथवा कोणाचें देणें ठेवलें नाहीं, असें समाधान वाटूं देणारा संपत्तीचा उपयोग, हा शहाण्या व धोरणी मनुष्याला कोणत्याही इतर उपयोगापेक्षां अधिक महत्त्वाचा वाटेल.

सॉक्रे०:—सिफालस, तुम्ही फार चांगलें भाषण केलें. पण तुम्ही ज्या सद्गुणासंबंधीं–म्हणजे न्यायासंबंधीं–म्हणालां त्याचा आम्ही काय अर्थ समजावा? खरें बोलणें व आपण दुसऱ्याकडून जें घेतलें आहे तें परत देणें–एवढाच न्यायाचा अर्थ समजावयाचा काय? अशा प्रकारचीं कृत्यें कांहीं वेळां न्यायाचीं व कांहीं वेळां अन्यायाचीं असूं शकत नाहींत काय? उदाहरणार्थ, शुद्धींत असतांना एखाद्या माणसानें आपल्या मित्राजवळ अपायकारक हत्यारें ठेवण्यास दिलीं असून, वेडाच्या भरांत मित्राजवळ तीं परत मागावयास तो आला असतांना, मित्रानें तीं हत्यारें परत करणें न्यायीपणाचें होणार नाहीं. तसेंच, तशा स्थितींत असलेल्या माणसाला सत्य सांगणें, हेंही न्यायीपणाचें होणार नाहीं, हें कोणींही कबूल करील.

सिफा०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, सत्य बोलणें व घेतलेली वस्तु परत देणें, अशी न्यायाची मर्यादित व्याख्या, बरोबर होणार नाहीं.

पॉलिमारकस् मध्येंच म्हणाला, "पण सॉक्रेटिस! आपण सायमॉनिडस म्हणतो तें जर खरें समजावयाचें असेल, तर हीच व्याख्या खरी समजली पाहिजे.

सिफा०:—ठीक आहे! पुढील वादविवाद तुमच्यावर सोंपवून मी आतां जातों. कारण यज्ञाकडे जाण्याची माझी वेळ झाली.

सॉक्रे०:—पॉलिमारकस तुमचा वारस आहे ना?

सिफालसनें हंसून म्हटलें, 'अर्थात्'. नंतर तो यज्ञाकरितां निघून गेला. संभाषण पुढें चालवून मी म्हटलें, "पॉलिमारकस्, वारस या नात्यानें तुला वादांत भाग घेण्याचा हक्कच आहे. तेव्हां सायमॉनिडसनें न्यायाची व्याख्या काय केली आहे, ती सांग.

पॉलि०:—ज्याचें जें असेल तें त्याला देणें म्हणजे न्याय होय. मला वाटतें, सायमॉनिडसची ही व्याख्या बरोबर आहे.

सॉक्रे०:—ज्ञानी व प्रतिभावान सायमॉनिडस जें म्हणतो त्यावर विश्वास न ठेवणें कठीण आहे! पण त्याच्या शब्दांचा अर्थ तुला समजला असला तरी मला समजला नाहीं. आपण आतां म्हणत होतों कीं, एखाद्यानें दुसऱ्याजवळ विश्वासानें दिलेली वस्तु, त्यानें वेडाच्या लहरींत परत मागितली असतां ती त्याला परत करावी, असा सायमॉनिडसच्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. आणि अजूनही माझें असें म्हणणें आहे कीं, ठेवीच्या मालकीचा हक्क ठेव ठेवणाऱ्या मनुष्याचाच असतो.

पॉलि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पण वस्तु परत मागणारा मनुष्य, जर शुद्धीवर नसेल,
Steph
332 तर ती कांहीं केलें असतां त्याला परत देणें बरोबर आहे काय?

पॉलि०:—अर्थात् बरोबर नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून सायमॉनिडस जेव्हां म्हणतो कीं, ज्याचें जें असेल तें त्याला देणें न्यायाचें आहे, तेव्हां त्याच्या म्हणण्याचा अर्थ निराळा असला पाहिजे.

पॉलि०:—खात्रीनेंच! कारण तो म्हणतो कीं, मैत्रीचें ऋण एकमेकांचें वाईट न करतां एकमेकांचें चांगलें करून फेडलें पाहिजे.

सॉक्रे०:—मला समजलें! दोन मित्रांमध्यें, एका मित्रानें दुसऱ्या मित्राजवळ पैसे ठेवावयास दिले असतां, पैसे परत करणें व परत घेणें हें जर अपायकारक होत असेल, तर पैसे ठेवणाऱ्याला त्याचे पैसे देणें, हें न्यायाचें नाहीं. सायमॉनिडस असेंच म्हणतो ना?

पॉलि०:—असेंच.

सॉक्रे०:—ठीक! आपल्या शत्रूंचें जें देणें तें आपण दिलें पाहिजे ना?

पॉलि०:—निःसंशय, त्यांचें जें देणें असेल तें दिलें पाहिजे. पण शत्रूंचें देणें म्हणजे त्यांना अपाय करणें हें होय, असें मला वाटतें. कारण, अशा संबंधांत अपाय करणें हेंच योग्य असतें.

सॉक्रे०:—ह्यावरून असें दिसतें कीं, न्यायाचें स्वरूप वर्णन करताना, कवीच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, सायमॉनिडसनें कोड्याचीच रीत वापरली आहे. कारण त्याला असें वाटतें कीं, प्रत्येक मनुष्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें देणें म्हणजे न्याय होय. परंतु अशी कल्पना करा कीं, सायमॉनिडसला पुढें असा कोणी प्रश्न केला असता, "सायमॉनिडस, असें जर आहे तर वैद्यकीच्या कलेमध्यें योग्य काय व तें कोणाला दिलें जातें." तर अशा प्रश्नाला त्यानें काय उत्तर दिलें असतें, असें तुम्हांला वाटतें?

पॉलि०:—शरीरें ह्या घेणाऱ्या वस्तू होत, असें त्यानें उत्तर दिलें असतें, हें स्पष्टच आहे. (सारांश:-औषध, मांस व पेयें शरीराला दिलीं जातात).

८८ निबंध ६३

सॉक्रे०:—पाकविद्येंत योग्य व बरोबर असें काय केलें जातें व तें कोणाला दिलें जातें ?

पॉलि०:—मसाला ही दिली जाणारी वस्तु. पक्वानें ही घेणारी वस्तु. (सारांश—पक्वान्नाला मसाला दिला जातो.)

सॉक्रे०:—मग न्यायानें काय दिलें जातें व कोणास दिलें जातें ?

पॉलि०:—जर आपल्याला पूर्वीच्या उत्तराप्रमाणें म्हणावयाचें, तर मदत व अपाय ह्या दिल्या जाणाऱ्या वस्तू होत व मित्र व शत्रू ह्या घेणाऱ्या वस्तू होत.

सॉक्रे०:—तर मग, सायमॉनिडिसचें म्हणणें असें कीं, मित्रांचें चांगलें करणें व शत्रूंना अपाय करणें म्हणजे न्याय होय.

पॉलि०:—मला असें वाटतें.

सॉक्रे०:—आजारीपणांत, मित्राना बरें करणारा व शत्रूंना अपाय करणारा, असा निष्णात कोण ?

पॉलि०:—वैद्य.

सॉक्रे०:—धोक्याच्या जलपर्यटनप्रसंगीं, मित्रांचें चांगलें करणारा व शत्रूंना अपाय करणारा कोण ?

पॉलि०:—तांडेल.

सॉक्रे०:—ठीक आहे. कोणत्या व्यवहारांत व कोणत्या दृष्टीनें, न्यायी मनुष्य आपल्या मित्राना मदत करूं शकतो ?

पॉलि०:—लढाईच्या कामांत, मित्रांचा पक्ष स्वीकारून, शत्रूंबरोबर युद्ध करण्यांत.

सॉक्रे०:—ठीक. प्रिय पालिमारकस्, तुम्ही कबूल कराल कीं, चांगली प्रकृति असलेल्या माणसाना वैद्याची मदत निरर्थक असते.

पॉलि०:—अर्थात्

सॉक्रे०:—तसेच किनाऱ्यावर असलेल्या माणसाना तांडेलाची जरूर नसते.

पॉलि०:—होय नसते.

सॉक्रे०:—जे युद्ध करीत नाहींत त्यांच्या दृष्टीनें, न्यायानें वागणारा मनुष्य निरुपयोगी असतो काय ?

पॉलि०:—छट् ! मला असें वाटत नाहीं

Steph 333 सॉक्रे:०—तर मग न्यायीपणा शांततेच्या काळांत सुद्धां उपयोगी आहे काय ?

पॉलि०:—होय.

सॉक्रे०:—तशीच शेतीही उपयुक्त आहे ना ?

पालि०:—होय.

सॉक्रे०:—म्हणजे धान्य मिळविण्यास शेती उपयुक्त असते ना ?

पॉलि०:—होय.

सॉक्रे०:—चांभाराची कला उपयुक्त नव्हे काय ?

पॉलि०:—होय.

सॉक्रे०:—म्हणजे जोडे तयार करून मिळण्यास उपयुक्त असते ना ?

पॉलि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—तर मग, शांततेच्या काळांत, तुमच्या म्हणण्याप्रमाणें, न्यायानें कोणता उपयोग अथवा लाभ होऊं शकतो ?

पॉलि०:—करारांचा.

सॉक्रे०:—कराराचा अर्थ संयुक्त भागीदारी समजतां ना ?

पॉलि०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—तर मग, बुद्धिबळें खेळताना चांगला व उपयोगी भागीदार कोण ? न्यायी मनुष्य कीं बुद्धिबळें खेळणारा पटाईत गडी ?

पॉलि०:—अर्थात् पटाईत खेळाडू.

सॉक्रे०:—विटा व दगड रचण्यामध्यें, गवंडी जास्त उपयुक्त कीं न्यायी मनुष्य जास्त उपयुक्त ?

पॉलि०:—न्यायी मनुष्य अर्थात्च उपयोगी नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, संगीतामध्यें जसा सारंगी वाजविणारा, न्यायी मनुष्यापेक्षां जास्त उपयोगी भागीदार असतो, तसा कोणत्या भागीदारीमध्यें न्यायी मनुष्य सारंगी वाजविणाऱ्यापेक्षां श्रेष्ठ आहे ?

पॉलि०:—पैशाच्या भागीदारींत.

सॉक्रे०:—होय. पण पॉलिमारकस्, पैसे खर्च करण्याच्या बाबतींत न्यायी मनुष्य भागीदार असून उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ, एखादा घोडा विकावयाचा असेल अथवा खरेदी करावयाचा असेल, तेव्हां अश्वपरीक्षा असणाराच भागीदार उपयुक्त होईल, असें मला वाटतें.

पॉलि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—जेव्हां एखाद्या जहाजाची विक्री अथवा खरेदी करावयाची असेल, तेव्हां जहाजें बांधणारा अथवा तांडेलच चांगला भागीदार ठरेल.

पॉलि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—असें जर आहे तर, सोनें अथवा चांदी ह्यांच्या संयुक्त उपयोगाची अशी कोणती संधि असते कीं, ज्यावेळेस न्यायी मनुष्याचा उपयोग इतर मनुष्यांपेक्षां जास्त होतो ?

पॉलि०:—जेव्हां विश्वासानें व सुरक्षितपणानें पैसे ठेवावयाचे असतात तेव्हां.

सॉक्रे०:—म्हणजे पैसे खर्च न करतां नुसते ठेवावयाचे असतात तेव्हां काय ?

पॉलि०:—होय. अशाच वेळीं.

सॉक्रे०:—तर मग, जेव्हां पैशाचा उपयोग करावयाचा नसतो, तेव्हांच पैशाच्या बाबतींत न्यायीपणाचा उपयोग होतो.

पॉलि०:—होय. असें दिसतें !

सॉक्रे०:—कोयता फक्त सुरक्षित ठेवण्याचें बाबतींत न्यायीपणाचा उपयोग असतो. परंतु त्याच्या उपयोगाची वेळ आली असतां, न्यायापेक्षां द्राक्ष खुडण्याची कलाच उपयोगी पडते.

पॉलि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—तर मग, जेव्हां ढाल अथवा वीणा, उपयोगाशिवाय ठेवावयाचीं असतील तेव्हांच न्यायाचा उपयोग आहे, पण जेव्हां त्यांचा उपयोग करावयाचा असेल, तेव्हां युद्धकला अथवा संगीतकला उपयोगी पडते, असें तुमचें म्हणणें आहे काय ?

पॉलि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—आणि इतर सर्व वस्तूंबद्दलही असेंच म्हणता येईल. जेव्हां वस्तूंचा उपयोग करावयाचा असेल, तेव्हां न्याय निरुपयोगी असतो. परंतु जेव्हां वस्तूंचा उपयोग करावयाचा नसेल, तेव्हां न्याय उपयुक्त असतो.

पॉलि०:—होय. असें ठरतें.

सॉक्रे०:—तर मित्रा, जर न्यायीपणाचा उपयोग निरुपयोगी वस्तूंच्या बाबतींतच होण्यासारखा असेल, तर त्या न्यायीपणाला विशेष महत्त्व देतां येणार नाहीं. तथापि आपलें विवेचन पुढें चालू ठेवू या. जो मनुष्य बाहुयुद्धांत प्रतिस्पर्ध्याला ठोसे देण्यांत निष्णात असतो, तोच मनुष्य ठोसे टाळण्यांतही तसाच निष्णात नसतो काय ?

पॉलि०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—जो मनुष्य रोगाचा प्रतिकार करण्यांत अथवा रोग टाळण्यांत निष्णात असतो, तो मनुष्य दुसऱ्यामध्यें तो रोग उत्पन्न करण्यांतही फार पटाईत नसतो काय ?

पॉलि०:—होय असतो.

Steph 335 सॉक्रे०:—तसेंच, ज्या मनुष्याला शत्रूंवर अचानक छापा घालतां येतो, तो मनुष्य सैन्याचा उत्तम संरक्षक नसतो काय ?

पॉलि०:—निःसंशय असतो.

सॉक्रे०:—म्हणजे जो चोरी करण्यांत निष्णात असतो, तो संरक्षणही उत्तम प्रकारें करूं शकतो.

पॉलि०:—होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—तर मग, जर न्यायी मनुष्य पैशाचें संरक्षण करण्यांत निष्णात असेल, तर तो चोऱ्या करण्यांतही पटाईत असला पाहिजे ?

पॉलि०:—वादाचा निष्कर्ष असा होतो, हें मला कबूल आहे.

सॉक्रे०:—तर आतां हें पूर्णपणें सिद्ध झालें कीं, न्यायी मनुष्य हा एक प्रकारचा चोर आहे. हें तत्त्वज्ञान तुम्ही होमर-पासून शिकलां असाल. ओडिसिअसच्या आईचा बाप आटोलिकस, हा होमरचा आवडता असून, त्याच्याविषयीं होमर म्हणतो, "चोरी करण्यांत व खोटें बोलण्यांत आटोलिकसनें सर्व माणसावर ताण केली." म्हणून होमर, सायमॉनिडस व तुम्ही, ह्या तिघांच्या मताप्रमाणें, न्यायीपणा म्हणजे एक चोरी करण्याची कला आहे व तिच्यामुळें आपल्या मित्रांना मदत करतां येऊन शत्रूंना अपाय करतां येतो. असेंच तुमचें म्हणणें ना ?

पॉलि०:—असा माझ्या म्हणण्याचा मुळींच अर्थ नाहीं. तथापि माझ्या म्हणण्याचा अर्थ मला कळेनासा झाला आहे ! तरीपण, मित्राना मदत करणें व शत्रूना अपाय करणें म्हणजेच न्याय होय, असें अजूनही मला वाटतें.

सॉक्रे०:—पण दिखाऊ प्रामाणिक मनुष्य व अस्सल प्रामाणिक मनुष्य, ह्या दोहोंपैकीं खरा मित्र तुम्ही कोण समजाल ? शत्रूंचीही व्याख्या ह्याच तत्त्वावर तुम्ही ठरवाल ना ?

पॉलि०:—माझ्या मतें, जे लोक प्रामाणिक आहेत, असें मनुष्याला वाटतें, त्यांच्यावरच त्यानें प्रेम करावें व जे दुष्ट आहेत असें त्याला वाटतें, त्यांचा द्वेष करावा.

सॉक्रे०:—परंतु मनुष्यें, ह्या बाबतींत चुका करीत नाहींत काय ?

जे लोक खरे प्रामाणिक नसतात, ते प्रामाणिक व जे खरोखर दुष्ट नसतात, ते दुष्ट, असें त्यांना वाटत नाहीं काय ?

पॉलि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, असे लोक सज्जनांना शत्रु व दुर्जनांना मित्र समजत नाहींत काय ?

पॉलि०: - होय. असें समजतात.

सॉक्रे०—आणि असें असूनही, अशा माणसांनीं अशा वेळीं दुष्टांना मदत करणें व सज्जनांना अपाय करणें न्यायाचें असतें.

पॉलि०:—असें बाह्यतः दिसतें खरें !

सॉक्रे०:—तथापि सज्जन हे न्यायानें वागतात व अन्याय हा त्यांच्या स्वभावाशीं विसंगत असतो.

पॉलि०—हें खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, तुमच्या तत्वाप्रमाणें, जे लोक कांहीं अन्याय करीत नाहींत त्यांना अपाय करणें, म्हणजे न्याय होय.

पॉलि०:—सॉक्रेटिस, देवदयेनें असें न घडो ! ( शांतं पापम् ! ) हें तत्वज्ञान दुष्टपणाचें दिसतें !

सॉक्रे०:—तर मग, अन्यायी लोकांना अपाय करणें व न्यायी लोकांना मदत करणें, म्हणजे न्याय होय.

पॉलि०:—पूर्वीपेक्षां न्यायाची ही व्याख्या बरी दिसते.

सॉक्रे०:—पण पॉलिमारकस्, ह्यामुळें असें होईल कीं, ज्या पुष्कळ उदाहरणांत लोकांनीं आपले शत्रु व मित्र चुकीनें ठरविले आहेत, त्यांमध्यें त्या लोकांनीं खऱ्या मित्रांना अपाय करणें न्यायाचें होईल. कारण चुकीच्या समजुतीनें खरे मित्र दुष्ट ठरले गेले आहेत. तसेंच कांहीं लोकांना चुकीनें सज्जन समजल्यामुळें ते शत्रूंना मदत करतील. आणि अशा तऱ्हेने, सायमॉनिडसच्या म्हणण्याचा आपण जो अर्थ केला, त्याच्या अगदीं उलट आपलें म्हणणें होईल.

पॉलि०:—असा परिणाम खात्रीनेंच होईल. पण आपण आपल्या बाजू बदलूं या. कारण मित्र आणि शत्रु ह्यांच्या आपल्या व्याख्याच बहुतकरून चुकीच्या होत्या.

सॉक्रे०:—पॉलिमारकस्, आपली काय व्याख्या होती ?

पॉलि०:—जो मनुष्य आपल्याला प्रामाणिक दिसतो तो मित्र होय.

सॉक्रे०:—मग आपली नवीन व्याख्या काय ?

पॉलि०:—जो दिसावयास प्रामाणिक आहे, एवढेंच नव्हे तर जो खरोखरच प्रामाणिक आहे, तोच मित्र होय. आणि जो
Steph खरा प्रामाणिक नसून, दिसावयास मात्र प्रामाणिक आहे,
335 तो खरा मित्र नसून निव्वळ दिखाऊ मित्र होय. शत्रूची व्याख्याही मी या तत्वावरच करतों.

सॉक्रे०:—ह्या व्याख्येप्रमाणें, सज्जन मनुष्य बहुधां मित्र होईल व दुष्ट मनुष्य शत्रु होईल.

पॉलि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग मित्रांना मदत करणें, आणि शत्रूंना अपाय करणें अशी जी न्यायाची व्याख्या आपण पूर्वी केली ती पुरेशी होणार नाहीं. म्हणून, जर आपला मित्र सज्जन असेल तर त्याला मदत करणें व आपला शत्रु वाईट असेल तर त्याला अपाय करणें म्हणजे न्याय होय, अशी सुधारलेली व्याख्या आपण स्वीकारली पाहिजे.

पॉलि०:—माझ्या मतें, ही व्याख्या अगदीं बरोबर होईल,

सॉक्रे०:—न्यायी मनुष्यानें एखाद्याला अपाय केलाच पाहिजे काय?

पॉलि०:—नि:संशय, आपल्या दुष्ट शत्रूंना त्यानें अपाय केलाच पाहिजे.

सॉक्रे०:—घोड्यांना दुखापत केली असतां, ते सुधारतात कीं वाईट होतात ?

पॉली०:—वाईट होतात.

सॉक्रे०:—घोड्यांच्या गुणांच्या बाबतींत ते वाईट होतात कीं, कुत्र्यांच्या गुणांच्या बाबतींत ?

पॉलि०:—घोड्यांच्या.

सॉक्रे०:—तसेंच कुत्र्यांनाही दुखापत केली असतां, घोड्यांच्या नव्हे तर कुत्र्यांच्या गुणांच्या दृष्टीनें, ते वाईट होतात ना ?

पॉलि०—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मित्रा, ह्याच तत्वाप्रमाणें माणसांना दुखापत केली असतां, ते मानवी सद्गुणांत कमी प्रतीचे होत नाहींत काय ?

पॉलि०:—अर्थात् होतात.

सॉक्रे०:—न्याय हा मानवी सद्गुण नव्हे काय ?

पॉलि०:—तो निःसंशय सद्गुण आहे.

सॉक्रे०:—तर मग मित्रा, ज्याना अपाय होतो ते निःसंशय कमी न्यायी होतात.

पॉलि०:—होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—संगीतज्ञ, आपल्या कलेनें, माणसांना अरसिक करतील काय ?

पॉलि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—अश्वविद्येचा निष्णात्, आपल्या कलेनें, माणसांना वाईट घोडेस्वार बनवील काय ?

पॉलि०:—नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, न्यायी मनुष्य, न्यायीपणाचीं कृत्यें करून मनुष्यांना अन्यायी बनवील काय ? थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे सज्जन लोक, सज्जनपणानें, मनुष्यांना दुर्जन करतील काय ?

पॉलि०:—नाहीं. हें अशक्यच आहे.

सॉक्रे०:—उष्णतेपासून थंडपणा निर्माण होईल काय ?

पॉलि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे:०—अवर्षणानें ओलसरपणा कधीं उत्पन्न होईल काय ?

सं. ता. ठाणें

पॉलि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच सज्जन कोणाला अपाय करतील काय ?

पॉलि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—आणि न्यायी मनुष्य सज्जन असतो ना ?

पॉलि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—तर मग पॉलिमारकस्, मित्रांना अथवा शत्रूंना अपाय करणें, हा न्यायी मनुष्याचा धर्म असूं शकत नाहीं. अन्यायी मनुष्याचाच असा धर्म असतो.

पॉलि०!—साक्रेटिस, तुम्ही म्हणतां तें अगदीं बरोबर आहे, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—म्हणून प्रत्येक मनुष्याचें जें देणें असेल तें त्याला देणें म्हणजे न्याय होय, असें जर कोणी म्हणेल व त्या म्हणण्याचा अर्थ, न्यायी माणसानें आपल्या शत्रूंना अपाय करणें व मित्रांना मदत करणें, असा जर त्यानें केला, तर तें म्हणणें अज्ञानी माणसाचें असून खरें नाहीं असें समजावें. कारण, कोणालाही दुखापत करणें, हें कधींही न्यायीपणाचें होणार नाहीं, असें आपण सिद्ध केलें आहे.

पॉलि०:—तुमचें म्हणणें मला मान्य आहे.

सॉक्रे०:—तर मग सायमॉनिडिस अगर बिआस अथवा पिटाकस अथवा दुसरा कोणी ज्ञानी व विशेष प्रसिद्ध, अशा माणसाचें असें मत आहे, असें जर कोणी म्हणूं लागला, तर तुम्ही आणि मी त्याला विरोध करूं.

पॉलि०:—ठीक आहे. तुमच्या वतीनें विरोध करण्यास मी अगदीं तयार आहे.

सॉक्रे०:—आपल्या मित्रांना मदत करणें व शत्रूंना अपाय करणें
Steph म्हणजे न्याय होय, ह्या तत्त्वाचा जनक मी कोणाला
336 समजतों, हें तुम्हाला माहीत आहे काय ?

पॉलि०:—कोण जनक आहे ?

सॉक्रे०:—पिरिआँडर अथवा परडिकास अथवा क्सरसिस अथवा थीब्सचा इसमिनिअस अथवा स्वतःला मोठा शक्तीमान् समजणारा एखादा श्रीमंत मनुष्य, वरील तत्वाचा जनक असावा, असें मला वाटतें.

पॉलि०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—पण ज्या अर्थी, न्याय आणि न्यायीपणाचीं कृत्यें, ह्यांच्या व्याख्या करण्यांत आपण पुनः अयशस्वी झालों आहों, त्याअर्थी दुसरी कोणती व्याख्या आपल्याला सुचवितां येईल ?

आमचा वादविवाद चालू असताना, थ्रॅसिमाकस त्यावर आक्षेप घेऊन आमचें संभाषण थांबविण्याच्या अनेकदां विचारांत होता. परंतु ज्यांना वादविवाद शेवटपर्यंत ऐकून घेण्याची इच्छा होती, ते थ्रॅसिमाकसला प्रत्येक वेळीं दाबीत होते. तथापि माझें शेवटचें वाक्य बोलून झाल्यावर, जेव्हां आम्ही थोडा वेळ थांबलों, तेव्हां थ्रॅसिमाकसला स्वस्थ बसवेना. एखाद्या रानटी पशूप्रमाणें, जणूं कांहीं आम्हाला फाडून टाकण्याच्या इराद्यानें, त्यानें आमच्यावर झडप घातली. पॉलिमारकस व मी घाबरून दचकलों. दूरच्या मंडळींना ऐकूं जाईल, अशा मोठ्या आवाजांत ओरडून थ्रॅसिमाकस म्हणाला, "सॉक्रेटिस, पॉलिमारकस व तुम्ही कोणत्या मूर्खपणानें इतका वेळ पछाडले होतां? दोघेजण मूर्खपणानें काय बडबडत होतां ? सॉक्रेटिस, जर न्याय म्हणजे काय हें तुम्हाला समजून घेण्याची इच्छा असेल, तर तुम्ही नुसते प्रश्न विचारीत बसूं नका, किंवा दुसऱ्याकडून मिळालेली उत्तरें खोडून टाकण्याचा निव्वळ देखावा करूं नका ! तुम्हाला माहीतच आहे कीं, उत्तरें देण्यापेक्षां प्रश्न विचारणें फार सोपें असतें. तुम्ही स्वतः काय उत्तर द्यावयाचें तें द्या आणि तुमच्या मतें न्यायाचें स्वरूप काय आहे तें आम्हाला सांगा. न्याय म्हणजे कर्तव्य अथवा फायदा अथवा लाभ अथवा आपद्धर्म, असली न्यायाची व्याख्या करूं नका, अशी मी तुम्हाला विनंती करतों. तुमची जी कांहीं

व्याख्या असेल, ती स्पष्ट व थोडक्यांत सांगा. वरील प्रकारची मूर्ख बडबड मात्र, मी आतां ऐकून घेणार नाहीं. ”

हें भाषण ऐकून मी थक्कच झालों आणि भीतीनें वक्त्याकडे न्याहाळून पाहूं लागलों. आणि मला वाटतें कीं, जर त्यानें माझ्याकडे पहाण्यापूर्वी मी त्याजकडे पाहिलें नसतें, तर मी एकदम मुखस्तंभच झालों असतों ! पण जेव्हां आमच्या संभाषणामुळें त्याचा संताप वाढत होता, तेव्हां मीच त्याच्याकडे प्रथम पाहिलेलें असल्यामुळें, त्याला उत्तर देणें मला शक्य झालें. थोड्या कंपित स्वरानें मी म्हटलें, “ थॅसिमाकस, आमच्यावर एवढे निष्ठुर होऊं नका ! आमचें प्रस्तुत विषयाचें परीक्षण चालू असतां, पॉलिमारकस अथवा मी स्वतः जरी चुका करीत असूं, तरी त्या आम्ही मुद्दाम करीत नाहीं, अशी तुमची खात्री असूं द्या ! सोन्याच्या तुकड्याच्या शोधांत असतांना, एकमेकांच्या चुकांकडे कानाडोळा करून, सोनें शोधण्याची संधी आम्ही फुकट घालवूं, असें तुम्ही समजणार नाहीं. मग सोन्याच्या असंख्य तुकड्यापेक्षां ज्याची किंमत जास्त आहे, त्या न्यायाच्या स्वरूपाचा शोध चालू असतांना, तें स्वरूप स्पष्ट करण्याची शिकस्त केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसूं, असें कां समजतां ? माझ्या मित्रा, तुम्हाला काय वाटत असेल तें वाटो. पण माझ्या मतें, हा विषय आमच्या शक्तीच्या बाहेरचा आहे. म्हणून, तुमच्यासारख्या हुशार

Steph 337

माणसांनीं आमच्यावर रागावण्यापेक्षां आमची कींव करावी, हेंच रास्त आहे.

माझें हें उत्तर ऐकून तो अतितिरस्कारानें हंसून म्हणाला, “ वारे वा हिरक्युलस ! सॉक्रेटिसाच्या दिखाऊ नम्रपणाचें हें पहा उदाहरण ! मला हें माहितच होतें. तुम्ही अज्ञानाचें पांघरूण घेऊन, कोणी प्रश्न विचारलां असतां कांहींतरी करून उत्तरें देण्याचें टाळाल, असें मी येथील मंडळीना अगोदरच बजावलें होतें.

सॉक्रे०:—होय थ्रॉसिमाकस! तुम्ही ज्ञानी आहांत! तुम्हाला माहित आहे कीं, एखाद्याला बारा ह्या आकड्याचे भाग किती पडतात असें विचारून, जर त्याला बजावलें कीं, "बारा हे सहाच्या दुप्पट, चाराच्या तिप्पट, दोहोंच्या सहापट किंवा तीनाच्या चौपट अशापैकीं उत्तरें देतां कामा नये व असें उत्तर दिलें असतां तें मूर्खपणाचें होईल," तर खात्रीनें कोणीही मनुष्य तुम्हांला उत्तर देणार नाहीं. पण अशी कल्पना करा कीं, त्यानें तुम्हांला उलट विचारलें, "थ्रॉसिमाकस, तुमचें म्हणणें स्पष्ट कराल काय? तुम्ही त्याज्य म्हणून ठरविलेल्या उत्तरांपैकीं एखादें उत्तर खरें असलें, तरीसुद्धां मी तें देतां कामा नये, असा तुमचा आग्रह आहे काय? मग सत्यापासून भिन्न उत्तर मी द्यावयाचें, असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ होतो ना?" थ्रॅसिमाकस, तुम्ही याला काय उत्तर द्याल?

तो उद्गारला, "ओहो! जणूं कांहीं ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत!" मी म्हटलें, "त्या सारख्या असण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. तथापि त्या सारख्या नाहींत अशी कल्पना करूं. पण वरीलपैकींच एक उत्तर बरोबर असून तेंच उत्तर खरें आहे, असा जर उत्तर देणाऱ्या मनुष्याचा विश्वास असला, तर आपली मनाई असो वा नसो, तेंच उत्तर देण्यापासून तो परावृत्त होईल काय?"

थ्रॅसि०:—ज्या उत्तराना मी बंदी केली आहे, त्यांपैकींच एक उत्तर देण्याचा तुमचा विचार आहे काय?

सॉक्रे०:—विचारांतीं त्यांपैकींच एखादें उत्तर मला बरोबर वाटलें, तर तसें उत्तर मी खात्रीनेंच देईन.

थ्रॅसि०:—मी त्याज्य ठरविलेल्या उत्तरांहून निराळें व श्रेष्ठ असें उत्तर मी दिलें, तर तुम्ही कोणती शिक्षा सोसण्यास तयार व्हाल?

सॉक्रे०:—अडाणी मनुष्यानें जी शिक्षा भोगणें योग्य आहे, ती शिक्षा मला द्यावी. आणि ती म्हणजे सूज्ञ माणसाकडून शिकविलें जाणें! ही शिक्षा मी व इतर मंडळी भोगण्यास तयार आहोंत!

थ्रॅसि०:—खरोखर तुम्ही मला फार गमती मनुष्य दिसतां ! शिकण्या-खेरीज तुम्ही मला पैसे दिले पाहिजेत.

सॉक्रे०:—माझ्याजवळ पैसे असले तर मी देईन !

ग्लॅकान म्हणाला:—थ्रॅसिमाकस ! पैशाचीच बाब असेल तर तुमचें भाषण चालू ठेवा. सॉक्रेटिसाकरितां आम्ही पैसे देऊं.

थ्रॅसि:—हो खात्रीनेंच द्याल ! सॉक्रेटिसानें आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें स्वतः कांहीं उत्तर न देतां, दुसऱ्यांनीं दिलेल्या उत्तरावर टीका करून तें खोडून काढावें, अशी तुमची इच्छा असणारच !

सॉक्रे०:—माझ्या हुशार मित्रा ! ज्या मनुष्याला कांहीं कळत नाहीं व जो तसें स्वतः कबूल करतो, तो मनुष्य उत्तर देऊं शकेल काय ? शिवाय, एखाद्या विषयावर त्याचे स्वतःचे कांहीं विचार असले, तरी अत्यंत विद्वान् अशा माणसाकडून त्याला आपले विचार सांगण्याची बंदी झाली असतां, तो काय उत्तर देणार ? ह्या विषयाचें ज्ञान असून आपल्याला कांहींतरी सांगावयाचें आहे, असें ज्याअर्थीं तुम्हीं जाहीरपणें म्हणतां, त्याअर्थीं तुम्हीच बोलण्यास
Steph 338 सुरवात करणें वाजवी आहे. तेव्हां तुमचें उत्तर सांगून माझें समाधान करा आणि ग्लॅकान् व इतर मंडळी ह्यानाही आपल्या ज्ञानाचा फायदा करून द्या.

मी असें म्हटल्यावर, ग्लॅकान व इतर मंडळी ह्यांनीं त्याला भाषण करण्यास विनंती केली. स्वतःपाशी असलेल्या नामी उत्तरानें आपण कीर्ति मिळवूं, अशी थ्रॅसिमाकसला खातरी असल्यामुळें, तो भाषण करण्यास उत्सुक होता, हें उघडच दिसत होतें. परंतु मी अगोदर उत्तर द्यावें, अशी तो बाह्यतः बतावणी करीत होता. शेवटीं त्यानें सुरवात करण्याचें कबूल केलें. तो म्हणाला:—"साक्रेटिसाचें हें शहाणपण पहा ! स्वतः तो शिकवीत नाहींच, पण लोकांकडून शिकून घेऊन, तो त्याबद्दल कधीं कृतज्ञताही दाखवीत नाहीं !

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, मी लोकांकडून ज्ञान मिळवीत असतों, हें तुमचें म्हणणें खरें आहे. पण मी त्यांचे आभार मानीत नाहीं, हें तुमचें म्हणणें साफ चुकीचें आहे. माझ्याजवळ पैसे नसल्यामुळें, मी त्यांची फक्त प्रशंसा करूं शकतों. एखाद्यानें चांगलें भाषण केलें, असें जेव्हां मला वाटतें, तेव्हां मी त्याची वाहवा करण्यास किती तयार असतों, हें तुम्ही उत्तर दिल्यावर तुम्हाला लागलीच दिसून येईल. कारण तुम्ही चांगलें उत्तर देणार अशी माझी अपेक्षा आहे.

थ्रॅसि०:—तर मग ऐका ! 'बलिष्ठ माणसाचें हित म्हणजेच न्याय होय,' असें माझें मत आहे. आतां तुम्ही माझी स्तुति कां करीत नाहीं ? स्तुति करण्यास तुम्ही नाखूष आहां असें दिसतें.

सॉक्रे०:—असें नव्हे. मला तुमच्या म्हणण्याचा अजून अर्थ कळला नाहीं, म्हणून मी थांबलों आहे. तुमचें म्हणणें असें कीं, 'बलिष्ठ माणसाचें हित म्हणजेच न्याय.' पण ह्याचा अर्थ तरी काय ? तालिमबाज पॉलिडॅमस, हा आमच्यापेक्षां सशक्त आहे व शारिरीक संपत्ति वाढविण्याकरितां गोमांस खाणें त्याच्या हिताचें आहे, म्हणून असें अन्न (गोमांस) आमच्यासारख्या अशक्त माणसानींही खाणें, आमच्या हिताचें असून, न्याय्य आहे, असें म्हणण्याचा तुमचा विचार नाहीं ना ?

थ्रॅसि०:—सॉक्रेटिस, हा निव्वळ खोडसाळपणा आहे ! ज्यामुळें माझ्या मताचा सहजच पाडाव करतां येईल, असाच अर्थ तुम्ही करतां !

सॉक्रे०:—छे ! छे ! असा माझा मुळींच हेतु नाहीं. पण तुम्ही आपलें म्हणणें अधिक स्पष्ट करावें, असें मला वाटतें.

थ्रॅसि०:—कांहीं राज्यें अरेरावसत्तात्मक, कांहीं बहुसत्तात्मक व कांहीं उत्तम लोकांच्या तंत्रानें चालविलीं जाणारीं असतात, हें तुम्ही जाणतां ना ?

सॉक्रे०:—अर्थात् मी जाणतों.

थ्रॅसि०:—प्रत्येक राज्यामध्यें राज्याधिकारीमंडळांतच जास्त शक्ति एकवटलेली नसते काय ?

सॉक्रे०:—अर्थातच असते.

थ्रॅसि०:—आणि प्रत्येक सरकारकडून स्वतःच्या हिताला सहाय्य-कारक असेच कायदे केले जातात. बहुसत्तात्मक सरकार, बहुसत्तेला अनुकूल कायदे करतें आणि अरेरावसत्तात्मक सरकार, दडपशाहीचे कायदे करतें. अशा रीतीनें कायदे करून, हे सर्व राज्यकर्ते,' जे त्यांच्या हिताकरितां आहे तें प्रजेच्या दृष्टीनेंही न्याय्यच आहे ', असें जाहीर करतात; आणि ह्या तत्त्वाचें जो उल्लंघन करतो त्याला बेकायदेशीर व अन्याय्य वर्तन करणारा म्हणून शिक्षा करतात. म्हणून

Steph 339 माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, अधिष्ठित सरकारच्या हिताचें जें असेल तेंच सर्व राज्यांमधून न्यायाचें समजलें जातें. आणि ज्याअर्थीं सरकारच्या बाजूला अधिक सामर्थ्य असतें, त्याअर्थीं योग्य विचारानें असाच शेवटीं निष्कर्ष ठरतो कीं, बलिष्ठांचें हित हेंच सर्व ठिकाणीं न्याय्य समजलें जातें.

सॉक्रे०:—तुमच्या म्हणण्याचा अर्थ आतां मला समजला. म्हणून तुमचें म्हणणें बरोबर आहे किंवा नाहीं, हें पहाण्याचा मी प्रयत्न करतों. थ्रॅसिमाकस, न्यायाची व्याख्या करितांना ' हित ' हा शब्द तुम्हीं वापरला. परंतु तो शब्द वापरण्यास मला मात्र तुम्ही प्रतिबंध केलात ! असो. तुमच्या व्याख्येमध्यें ' बलिष्ठाचें हित ' असे शब्द घालून तुम्ही भर टाकलीत, ह्यांत शंका नाहीं.

थ्रॅसि०:—तुमच्या मतें ही भर अगदीं क्षुल्लक असेल कदाचित् !

सॉक्रे०:—ती महत्त्वाची आहे कीं नाहीं, हें पहावयाचें आहे. तुमच्या तत्वाच्या खरेपणाविषयींची चर्चा आम्हास केलीच पाहिजे. आपणा दोघांना ही गोष्ट कबूल आहे कीं, न्याय हा हिताशीं सुसंगत

आहे. पण तुम्ही ह्या विधानाला पुस्ती देऊन असें म्हणतां कीं, बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय होय. ह्या व्याख्येला माझी हरकत असल्यामुळें, ह्या विषयाची अधिक चर्चा करणें जरूर आहे.

थ्रॅसि०:—ठीक. चर्चा चालू ठेवा.

सॉक्रे०:—प्रजाजनांनीं राज्यकर्त्यांच्या आज्ञा पाळणें न्यायाचें आहे, असें तुम्ही म्हणतां ना?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०—प्रत्येक राज्यांत, राज्यकर्त्यांकडून चुका होणें अगदीं अशक्य आहे किंवा त्यांच्याकडून कांहीं वेळां चुका होणें शक्य आहे?

थ्रॅसिः—निःसंशय! त्यांच्याकडून चुका होणें शक्य आहे.

सॉक्रे०:—जेव्हां ते कायदे करण्याचें काम अंगावर घेतात, तेव्हां त्यांचें काम कधीं बरोबर व कधीं चुकीचें होत नाहीं काय?

थ्रॅसिः—होय. तसें होत असलें पाहिजे.

सॉक्रे०:—त्यांच्या हिताला अनुकूल म्हणजे बरोबर व त्यांच्या हिताला प्रतिकूल म्हणजे चुकीचें, असेंच तुम्हीं म्हणाल ना?

थ्रॅसिः—होय असेंच.

सॉक्रे०:—आणि राज्यकर्त्यांनीं जे कांहीं कायदे केले असतील, ते प्रजेनें पाळणें म्हणजेच न्याय होय, असेंही तुम्ही म्हणाल ना?

थ्रॅसिः—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, तुमच्या म्हणण्याप्रमाणें, बलिष्ठांच्या हिताचे कायदे करणें एवढेंच न्यायाचें नसून त्यांच्या हिताविरुद्ध कायदे करणेंही न्यायाचें होय, असें सिद्ध होतें.

थ्रॅसि०:—तुम्ही काय म्हणतां, तें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—तुम्ही जें म्हटलें तेंच मी म्हटलें आहे. तथापि ह्या मुद्याचा आपण अधिक विचार करूं. जेव्हां अधिकारी लोक, आपल्या प्रजेवर कायदे लादतात, तेव्हां कधीं कधीं आपल्या हिताला अनुकूल कोणते

हें समजण्यांत त्यांची चूक झालेली असते; आणि त्यांनीं केलेले कायदे पाळणें प्रजेच्या दृष्टीनें न्यायाचें असतें–हीं विधानें तुम्हीं कबूल केलेलीं नाहींत काय?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, तुम्हांला असें सांगण्याची मी परवानगी घेतों कीं, ज्याअर्थी तुम्ही असें म्हणतां कीं, अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळणें हें प्रजेच्या दृष्टीनें न्यायाचें आहे, त्याअर्थी ज्यावेळीं अधिकारीमंडळ स्वतःला अहितकारक असे अजाणतेपणानें कायदे करतें, त्यावेळीं अधिकारी व बलिष्ठ मंडळाच्या हिताविरुद्ध वागणें, हेंही न्यायाचें आहे, असें तुम्ही कबूल करतां! सूज्ञ थ्रॅसिमाकस, ह्यावरून तुमच्या तत्त्वाच्या अगदीं विरुद्ध वागणें हेंही न्यायाचें आहे, असा सरळ निष्कर्ष होत नाहीं काय? कारण बलिष्ठांच्या हिताला अपायकारक वागणें, अशक्तांवर लादलें जातें, हें उघड आहे.

पॉलि०:—होय, सॉक्रेटिस, हें अगदीं स्पष्ट आहे.

Steph 340 क्रिटोफोन मध्येंच म्हणाला, "सॉक्रेटिसाच्या बाजूचे तुम्ही साक्षीदार असल्यामुळें तुम्ही असेंच म्हणणार!"

ह्यावर पॉलिमारकस म्हणाला, "साक्षीदार कशाला पाहिजेत? थ्रॅसिमाकस स्वतःच कबूल करतो कीं, सत्ताधिकारी कांहीं वेळां स्वतःला अहितकारक असे कायदे करतात आणि अशा कायद्यांच्या आज्ञा प्रजाजनांनीं पाळणें न्यायाचें असतें."

क्रिटोफोन०:—पॉलिमारकस, असे नव्हे. थ्रॅसिमाकस असें म्हणतो कीं, राज्यकर्ते जी आज्ञा करतील ती पाळणें, हें न्यायाचें आहे.

पॉलि०:—होय, क्रिटोफोन. आणि त्यानें असेंही म्हटलें कीं, बलिष्ठांचें हित म्हणजेच न्याय. ही दोन मतें प्रतिपादून, त्यानें आणखीही कबूल केलें कीं, बलिष्ठ सत्ता स्वतःच्या हिताविरुद्ध कधीं कधीं प्रजेला आज्ञा पाळावयास लावते. ह्यावरून असा निकर्ष निघतो कीं, बलिष्ठांच्या

हिताचें हें जितकें न्यायाचें असतें, तितकें त्यांच्या जें अनहिताचें असतें, तेंही न्यायाचें असतें !

क्लिटोफोन:—पण बलिष्ठांचें हित, ह्याचा अर्थ थ्रॅसिमाकस असा करतो कीं, बलिष्ठ आपल्या हिताचें जें समजतात तें व हें अशक्तांनीं पाळणें म्हणजेच न्याय होय, असा त्याचा अभिप्राय आहे.

पॉलिमारकसनें उत्तर दिलें, "पण असें तो म्हणाला नाहीं, "

सॉक्रे०:—पॉलिमारकस, कांहीं हरकत नाहीं. थ्रॅसिमाकस जर आपलें मत आतां तशा तऱ्हेनें मांडीत असेल, तर त्याला आमचा प्रत्यवाय नाहीं. थ्रॅसिमाकस मला सांगा कीं, बलिष्ठांना आपल्या हिताचें जें वाटतें, तें खरोखरीं त्यांच्या हिताचें असो वा नसो, तेंच न्यायाचें, अशी तुम्ही व्याख्या करतां काय ?

थ्रॅसि०:—अर्थात्‌च नाहीं. जेव्हां मनुष्य चुकी करतो, तेव्हां त्या चुकीच्या वेळीं तो बलिष्ठ असतो, असें मी कसें म्हणेन ?

सॉक्रे०:—तुम्ही असेंच म्हणतां असें मला वाटलें. कारण राज्यकर्ते स्खलनशील असतात, इतकेंच नव्हे, तर ते खरोखरींच कांहीं चुका करतात, असें तुम्ही कबूल केलें आहे.

थ्रॅसि०:—सॉक्रेटिस, तुम्हीं वादविवादांत शब्दच्छल करणारे आहांत ! जेव्हां एखादा वैद्य रोग्याच्या उपचारांत चूक करतो, तेव्हां त्याला आपण खरा वैद्य म्हणतों काय ? तसेंच एखाद्यानें हिशोबांत चूक केली असतां, त्याला चांगला हिशोब करणारा, असें आपण म्हणतों काय ? आपण एवढेंच म्हणतों कीं, त्या वैद्यानें अथवा कारकुनानें अथवा लिहिणाऱ्यानें चूक केली. परंतु वस्तुतः ह्यांपैकीं प्रत्येकजण खरा धंदेवाईक, ह्या नात्यानें चुका करीत नसतो. खरें म्हणावयाचें म्हणजे, कोणीही कारागीर चुकत नसतो. कारण, अज्ञानामुळें मनुष्य चुका करतो आणि जेव्हां तो चुका करतो, तेव्हां तो खरा कारागीर नसतो ! अमुक वैद्य अथवा राज्यकर्ता चुकला होता, असें लौकिक अर्थानें जरी

Steph 341 म्हणण्यांत येत असलें, तरी कोणीही कारागीर अथवा तत्त्वज्ञानी अथवा राज्यकर्ता, जेव्हां आपल्या धंद्याप्रमाणें वागत असतो, तेव्हां तो चुकत नसतो! ह्या अर्थानें मी नुकतेंच दिलेलें उत्तर तुम्ही समजावें, अशी माझी इच्छा आहे. अगदीं यथार्थानें म्हणावयाचें म्हणजे, राज्यकर्ता हा राज्यकर्ता ह्या नात्यानें कधींही चुकत नसतो आणि अशी जोपर्यंत वस्तुस्थिति असते, तोपर्यंत त्याच्या हिताचेच तो कायदे करतो आणि तेच कायदे प्रजेनें पाळावयाचे असतात. म्हणून ज्याप्रमाणें मी आरंभीं म्हटलें होतें, त्याप्रमाणें मी पुनः म्हणतों कीं, 'बलिष्ठांचें हित म्हणजेच न्याय होय.'

सॉक्रे०:—छान् थ्रॅसिमाकस ! मला तुम्ही शब्दच्छल करणारा म्हणतां काय ?

थ्रॅसि०:—होय. अगदीं पटाईत वितंडवादी !

सॉक्रे०:—वादामध्यें तुमची बाजू लंगडी पडावी म्हणून, बुद्ध्या खोडसाळपणानें मी तुम्हास वरील प्रश्न विचारले, असें तुम्हाला वाटतें काय ?

थ्रॅसि०:—होय. मला खात्रीनेंच असें वाटतें. तथापि तुम्हाला ह्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं. मला वादांत बेसावधपणें तुम्हाला पकडतां येणार नाहीं आणि उघडपणें माझा पराभव करणेंही जमणार नाहीं.

सॉक्रे०:—प्रिय मित्रा ! मी असा प्रयत्न करण्याचें मनांतसुद्धां आणणार नाहीं. परंतु गैरसमजुतीचा प्रसंग पुनः उद्भवूं नये, म्हणून मला असें सांगा कीं, राज्यकर्ते बलिष्ठ असल्यामुळें त्यांच्या जें हिताचें असेल तेंच, अशक्त प्रजाजनानीं केलें पाहिजे असें जेव्हां तुम्ही म्हणतां, तेव्हां 'राज्यकर्ते व बलिष्ठ' हे शब्द तुम्ही लौकिक अर्थानें वापरतां, कीं आतां विवरण केलें त्या अर्थानें वापरतां ?

थ्रॅसि०:—राज्यकर्ते हा शब्द मीं खऱ्या अर्थानेंच वापरतो. आतां तुम्ही खोडसाळपणा व शाब्दिक लटपट करण्याची आपली शक्ति उपयोगांत आणा! मला तुमच्या दयेची मुळींच जरूरी नाहीं. तुमचे प्रयत्न निष्फळच होणार, अशी माझी खात्री आहे!

सॉक्रे०:—सिंहाच्या आयाळीला हात घालण्याचा प्रयत्न करण्याइतका मी मूर्ख आहे काय? थ्रॅसिमाकससारख्या पुढें शाब्दिक लटपट करण्यास मी धजावेन काय?

थ्रॅसि०:—थोड्या वेळां पूर्वीं असा प्रयत्न तुम्ही केलातच! अर्थात् तो निष्फळ झाला ह्याला तुमचा नाइलाज आहे!

सॉक्रे०:—ही चेष्टा आतां पुरे! मला सांगा, जो खरा वैद्य आहे तो पैसे मिळविणारा असतो, कीं रोग्याना बरें करणारा असतो? एवढें लक्षांत ठेवा कीं, तुम्हाला अस्सल वैद्याबद्दल विधान करावयाचें आहे.

थ्रॅसि०:—अस्सल वैद्य रोग्याना बरें करणारा असतो.

सॉक्रे०:—खरा तांडेल हा खलाशी असतो, कीं खलाशांचा नायक असतो?

थ्रॅसि०:—तो खलाशांचा नायक असतो.

सॉक्रे०:—माझ्या मतें, तो जहाजावर असतो, हा मुद्दा विचारांत घेण्याची जरूर नाहीं. तसेंच, त्याला खलाशी म्हटलें नाहीं तरी चालेल. कारण तो जहाजावर असतो, म्हणून त्याला कोणी तांडेल म्हणत नाहींत. त्याच्यापाशीं असलेल्या कलेमुळें आणि खलाशांवर असलेल्या त्याच्या सत्तेमुळेंच, त्याला तांडेल म्हणतात.

थ्रॅसि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ह्या सर्वांना स्वतःचें असें ध्येय नसतें काय?

थ्रॅसि०:—होय असतें.

सॉक्रे०:—आणि हें ध्येय संपादन करणें, हाच प्रत्येक कलेचा खरा उद्देश नसतो काय?

थ्रॅसि०:—होय; असतो.

सॉक्रे०:—प्रत्येक कलेचें ध्येय, आपली पूर्णावस्था गांठणें, हें असतें. दुसरें कांहीं असूं शकेल काय ?

थ्रॅसि०:—तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय ?

सॉक्रे०:—मनुष्याचें शरीर स्वयंपूर्ण आहे किंवा त्याला आणखी कांहीं गोष्टींची जरूर आहे, असें जर मला तुम्ही विचारलें, तर मी म्हणेन कीं, शरीराला इतर गोष्टींची जरूर खात्रीनेंच असते. कारण शरीराला विकृती होत असल्यामुळें, तिच्यापासून शरीराचें रक्षण करण्याची जरूरी असते व म्हणूनच वैद्यकीय कला निर्माण झाली. माझें स्पष्टीकरण बरोबर आहे ना ?

थ्रसि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें डोळ्यांना अथवा कानांना विकार झाला असतां, तो बरा करण्यासाठीं कलेची म्हणजे वैद्यकीय
Steph कलेची जरूर असते, त्याप्रमाणें वैद्यकीय कला अथवा
342 दुसरी एखादी कला दोषपूर्ण असून, तो दोष दूर करण्याकरितां तिला दुसऱ्या एखाद्या कलेची जरूर असते काय ? आणि ह्या दुसऱ्या कलेला तिसरीची, अशा प्रकारें अमर्यादित कला पाहिजेत काय? अथवा कोणतीही कला स्वतःचें हित स्वतःच बघूं शकते? किंवा कोणत्याही कलेंत दोष अथवा व्यंगें नसल्यामुळें, अथवा स्वतःच्या विषयापलिकडे तिला विचार करण्याची जरूर नसल्यामुळें, कोणत्याही कलेला, स्वतः अथवा दुसऱ्या कलेच्या मदतीनें, आपल्या कलेंत असलेल्या दोषांवर योग्य उपाय शोधून काढण्याची आवश्यकताच नसते काय ? शब्दांच्या निश्चित अर्थाकडे लक्ष देऊन, ह्या प्रश्नासंबंधीं विचार करा व मग उत्तर द्या.

थ्रॅसि०:—कोणतीही कला स्वयंपूर्ण असल्यामुळें, तिला दुसऱ्या कलेच्या मदतीची जरूर नसते.

सॉक्रे०:—तर मग, वैद्यकीय कला वैद्यकीय कलेचें हित बघत नसून, ती शरीराच्या हिताकडे बघते ना ?

थ्रॅसिः—होय.

सॉक्रे०:—आणि अश्वविद्या, अश्वविद्येच्या कल्याणाकडे न बघतां, घोड्यांच्या हिताकडे बघते. तसेंच, कोणतीही दुसरी कला तिला कशाचीच जरूर नसल्यामुळें, स्वतःच्या हिताकडे न बघतां तिच्या विषयाच्या हिताकडे बघते.

थ्रॅसि०:—उघडच आहे.

सॉक्रे०: –थ्रॅसिमाकस, कला स्वतःच्या विषयापेक्षां वरिष्ठ असून त्याचें नियमन करणारी असते, हें विधान तुम्ही कबूल कराल.

हें विधान मोठ्या नाखुषीनें त्यानें कबूल केलें.

सॉक्रे०:—तर मग कोणतेंही शास्त्र अथवा कला वरिष्ठांच्या हिताचा विचार अथवा त्यासंबंधी कायदे करीत नसून, अशक्ताचा म्हणजे शास्त्राच्या अथवा कलेच्या विषयाचा विचार व त्याच्यासंबंधीं कायदे करते.

ह्या विधानालाही त्यानें पुष्कळ हरकत केली ! पण शेवटी तें त्यानें कबूल केलें.

ही कबूली मिळाल्यावर मी म्हटलें, "तर मग, खरा वैद्य स्वतःच्या हिताचा विचार न करतां, आपल्या रोग्यांच्या आरोग्याचाच विचार करतो. कारण खरा वैद्य, हा पैसे मिळविणारा प्राणी नसून शरीरावर सत्ता चालविणारा असतो, असें आपण कबूल केलें आहे.

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तसेंच, तांडेल हा नुसता खलाशी नसून खलाशांवर सत्ता चालविणारा असतो.

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, असा तांडेल स्वतःच्या हिताबद्दल विचार न करतां, खलाशी व हाताखालील लोक ह्यांच्या कल्याणाबद्दल विचार करील.

मोठ्या नाखुषीनें हें विधान त्यानें कबूल केलें.

सॉक्रे०:—तर मग, थ्रॅसिमाकस, अधिकाराच्या जागेवर असलेले खरे अधिकारी, स्वतःच्या हिताचा विचार न करतां अथवा स्वतःच्या हिताकरितां कायदे न करतां, ज्यांच्याकरतां ते राजकारणाचा धंदा करतात, अशा प्रजाजनांच्या हिताचाच विचार करतात व त्यांच्या हिताचेच कायदे करतात; प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच जें योग्य असेल तें बोलतात व करतात.

जेव्हां आम्ही वादविवादाच्या ह्या पल्ल्यापर्यंत आलों आणि न्यायाचें स्पष्टीकरण अगदीं उलटेंच्या पालटें झालें असें दिसून आलें, तेव्हां थ्रॅसिमाकस उत्तर न देतां म्हणाला, “सॉक्रेटिस, तुमच्या घरीं दाई आहे काय ?”

Steph 343 सॉक्रे०:—अशा तऱ्हेची चवकशी करण्यापेक्षां, तुम्ही माझ्या प्रश्नाला सरळ उत्तरें कां देत नाहीं ?

थ्रॅसि०:—कारण असें कीं, ती दाई तुमची लाळ गळूं देते व तुमचें नाक कधींही साफ करीत नाहीं. ह्या तिच्या निष्काळजीपणामुळें, तुम्हाला मेंढ्या आणि धनगर ह्यांच्यामधला फरक कळत नाहीं !

सॉक्रे०:—तुम्हाला असें कशावरून वाटतें ?

थ्रॅसि०:—“कारण तुम्हाला असें वाटतें कीं, जेव्हां धनगर अथवा गुराखी, आपल्या मेंढरांची अथवा बैलांची काळजी घेऊन त्यांना लठ्ठ करीत असतात, तेव्हां त्यांचा हेतु स्वतःचा अथवा धन्याचा फायदा करण्याचा नसतो. शिवाय तुम्ही असे समजतां कीं, खरे राज्यकर्ते, प्रजेला मेंढराप्रमाणें कधींही समजत नाहींत अथवा आपल्या स्वतःच्या फायद्याविषयीं ते रात्रंदिवस विचार करीत बसत नाहींत. सॉक्रेटिस, न्याय व अन्याय, न्यायी मनुष्य व अन्यायी मनुष्य, ह्यांच्याविषयीं तुमच्या कल्पना चुकीच्या असल्यामुळें, तुम्हाला न्याय म्हणजे बलिष्ठ व अधिकारी वर्गाचें हित, पण प्रजा व नोकरवर्ग यांचे नुकसान असून

अन्याय ह्याच्या विरुद्ध असतो, हें कळत नाहीं. अन्यायी मनुष्य, सरळ व न्यायी वृत्तींच्या लोकांवर अधिकार गाजविणारा असतो व तो बलिष्ट असल्यामुळें, त्याचे प्रजाजन त्याची सेवा करून त्याचें कल्याण साधून देतात, पण स्वतःचें हित मात्र कांहींच साधूं शकत नाहींत. अत्यंत भोळसट सॉक्रेटिस महाराज! आपण खालील उदाहरणें विचारांत घ्याल, तर असें दिसून येईल कीं, अन्यायानें वागणाऱ्या माणसाशीं तुलना केली असतां, न्यायानें वागणाऱ्या माणसाचा नेहमीं अपजयच असतो. पहिलें उदाहरण खाजगी व्यवहारासंबंधीं घेऊं. न्यायी माणसाची व अन्यायी माणसाची जर भागीदारी असली, तर भागीदारी मोडण्याची पाळी आली असतां, न्यायी माणसाला अन्यायी माणसापेक्षां जास्त तर कधींच मिळणार नाहीं, पण उलट नेहमीं कमीच मिळेल! दुसरें उदाहरण म्हणजे, जेव्हां अशा लोकांचा सरकारशीं संबंध येतो, तेव्हां इस्टेटीवरील कर भरण्याच्या वेळीं, तितक्याच इस्टेटीवर न्यायप्रिय मनुष्य जास्त कर भरील व अन्यायानें वागणारा कमी भरील. आणि सरकारकडून कांहीं मिळवावयाचें असल्यास, एकाला कांहींच मिळणार नाहीं व दुसऱ्याला पुष्कळ मिळेल. अधिकाराच्या जागेवर हे दोघेही आहेत अशी कल्पना केली असतां, आपणांस असें दिसून येईल कीं, न्यायप्रिय माणसाला तोटा जरी सोसावा लागला नाहीं, तरी दुर्लक्ष झाल्यामुळें त्याचे खाजगी कारभार फार अव्यवस्थित होतात. शिवाय त्याची नैतिक तत्वें, सार्वजनिक पैशांतून त्याला कांहीं एक फायदा मिळूं देत नाहींत. आणखी असें होतें कीं, न्यायाची हानी करून, आपल्या मित्रांचें व ओळखीच्या मंडळींचें त्याला कल्याण करतां येत

Steph 344

नसल्यामुळें, प्रत्येक वेळीं त्याला त्यांचा राग सहन करावा लागतो. पण अन्यायी मनुष्याचा ह्याच्या अगदीं उलट प्रकार असतो. अन्यायी मनुष्याचे हातांत सत्ता असली, म्हणजे मोठ्या

प्रमाणावर अन्यायानें तो कसा वागतो, ह्या संबंधीं पूर्वीं म्हटल्याप्रमाणें मी बोलत आहे. अन्यायीपणानें वागणें, न्यायीपणानें वागण्यापेक्षां किती अधिक फायद्याचें असतें, ह्याबद्दल जेव्हां तुम्हाला निर्णय करावयाचा असेल, त्यावेळीं अन्यायी मनुष्य कसा वागतो, इकडेच तुम्ही लक्ष दिलें पाहिजे. अत्यंत पूर्ण असा अन्यायाचा प्रकार आहे, कीं ज्यामुळें अन्याय करणारा मोठा सुखी होतो व अन्याय केला जाणारा पण प्रतिकार न करणारा मनुष्य अत्यंत दुर्दैवी होतो. अशा प्रकाराकडे जर तुम्ही लक्ष वळविलेंत, तर मघाशीं म्हटलेल्या सत्याची कल्पना तुम्हाला लवकर येईल. हा एक जुलमीपणाचा प्रकार आहे. ह्या प्रकारानें, पवित्र अथवा अपवित्र, सार्वजनिक अथवा खाजगी मालमत्ता, उघडपणें अथवा कपटानें, किरकोळ प्रमाणांत नव्हे तर घाऊक प्रमाणांत लांबविली जाते. हे गुन्हे क्षुल्लक बाबतींत करून जर कोणी पकडला गेला, तर त्याला शिक्षा होऊन त्याचें आयुष्य फार कलंकीत होतें. कारण, अशा गुन्ह्यामध्यें पकडले जाणारे अर्धवट गुन्हेगार, ‘भ्रष्ट, नरापहारक, चोर, डाकेखोर, घरफोडे’ म्हणून संबोधिले जातात. परंतु जेव्हां एखादा मनुष्य, आपल्या बांधवांची मालमत्ता काबीज करून, शिवाय त्यांना गुलामही करून टाकतो, तेव्हां स्वकीयांकडूनच नव्हे तर, ज्यांनीं त्याच्या व्यापक अन्यायाची कीर्ति ऐकली आहे अशा परकी लोकांकडूनही, त्याला वाईट नांवें ठेवलीं जाण्याऐवजीं, सुखी व सुदैवी म्हटलें जातें! ह्याचें कारण असें कीं, जेव्हां लोक अन्यायीपणाला नांवें ठेवतात, तेव्हां ते अन्याय करण्यास भितात असें नव्हे, तर अन्यायापासून होणारा जाच सोसण्याची त्यांची तयारी नसते! सॉक्रेटिस, अशा रीतीनें मोठ्या प्रमाणावर केलेला अन्याय, हा न्यायापेक्षां अधिक बलवान्, अधिक उदार व अधिक थोर असतो आणि पूर्वीं मी म्हटल्याप्रमाणें, न्याय हें बलिष्ठांचें हित व अन्याय म्हणजे स्वतःचा फायदा व हित होय.”

हें भाषण करून, आंघोळ घालणाऱ्या नोकराप्रमाणें, आपल्या अखंड वाक्प्रवाहानें आमचे कान भारून टाकून, थ्रॅसिमाकस निघून जाण्याच्या विचारांत होता. परंतु आमच्या सोबत्यांनीं त्याला जाऊं न देतां, त्यानें आपल्या तत्त्वाचें समर्थन करावें असा आग्रह धरला. मी सुद्धां त्याला मोठ्या कळकळीनें विनंती केली. ‘प्रिय थ्रॅसिमाकस! आमच्या तोंडावर अशा तऱ्हेचें भाषण टाकून देऊन, आम्हांला तुमचें तत्त्वज्ञान बरोबर आहे किंवा चूक आहे, हें पटवून न देतां अथवा स्वतः समजून न घेतां तुम्ही निघून जातां, हें ठीक नाहीं. ज्या तत्त्वज्ञानानुसार आयुष्य घालविलें असतां, आपल्याला अत्यंत फायदा होऊन सुख मिळेल, अशा तत्त्वज्ञानाचा आपण विचार चालविला नसून, एखाद्या क्षुल्लक प्रश्नाची चर्चा चालविली आहे, असें तुम्हांला वाटतें काय” ?

थ्रॅसि०—आपण क्षुल्लक प्रश्नाची चर्चा चालविली आहे, असें माझें म्हणणें नाहीं.

सॉक्रे०:—पण तुमचा असा समज झाला आहे, असें आम्हांला वाटतें ! तसेंच, आमच्याबद्दल तुम्ही उदासीन आहांत ! कारण जें ज्ञान तुम्हांला झालें आहे, तें ज्ञान आम्हांला माहीत न झाल्यामुळें, आमचें आयुष्य बरें किंवा वाईट झालें, तरी त्याची तुम्हांला पर्वा नाहीं. महाराज ! कृपा करून तुमचें ज्ञान आम्हांलाही शिकवा. आमच्यावर

Steph तुम्ही जर हा अनुग्रह केलात, तर तुम्हांला चांगली

345 शाबासकी मिळेल. मी तुम्हांला निक्षून सांगतों कीं, अन्यायाला स्वैरपणें वागण्याची पूर्ण मुभा देऊनही, न्यायापेक्षां तो फायदेशीर आहे, असें सिद्ध करतां येईल, असें मला वाटत नाहीं व माझी अशी खात्रीही झालेली नाहीं. माझ्या प्रिय मित्रा, अन्यायीपणानें वागणाऱ्या मनुष्याला, अन्यायीपणाचें वर्तन करण्याचा जरी अधिकार दिला, तसेंच लबाडी अथवा बळजोरी करण्याचीही जरी

त्याला मुभा दिली, तरी सुद्धां अन्यायीपणाचें वर्तन न्यायीपणापेक्षां फायदेशीर होईल, अशी माझी खात्री होत नाहीं. येथील कांहीं मंडळींचें माझ्याप्रमाणेंच मत आहे. म्हणून माझ्या बुद्धिमान् मित्रा, न्यायाला अन्यायापेक्षां श्रेष्ठ ठरविण्यांत आमची चूक होत आहे, अशी आमची खात्री करून द्या.

थ्रॅसि०:—आतांपर्यंत मी केलेल्या भाषणामुळें, जर तुमची खात्री खात्री झाली नाहीं, तर तुमचें मन मी कसें काय वळवूं शकणार? मी तुमच्याकरितां अधिक तें काय करणार? माझें तत्वज्ञान मी तुमच्या डोक्यांत कोंबावें, असें तुम्हांला वाटतें काय?

सॉक्रे०:—शांतं पापम्! तुमच्या विधानाला तुम्ही चिकटून रहावें अथवा तुम्हांला आपली बाजू बदलावयाची असली, तर ती आम्हांला न फसवितां उघडपणें तुम्ही बदलावी, एवढीच आमची इच्छा आहे! कारण थ्रॅसिमाकस, पूर्वी तुम्ही खरा वैद्य कोण ह्याची व्याख्या केली होती, पण खऱ्या धनगराची व्याख्या करताना, पूर्वींच्या अर्थाला चिकटून बसणें तुम्हांला जरूर वाटलें नाहीं! उलट तुम्हीं असें प्रतिपादन केलें कीं, खरा धनगर, आपल्या कळपाच्या कल्याणाकरितां म्हणून मेंढरांना खाऊं घालीत नसून, त्यांची चांगली किंमत यावी अथवा मेजवानीच्या थाटामध्यें मंडळी आनंदीत व्हावी, अशा हेतूनें मेंढ्यांना खाऊं घालतो. ह्याच्या उलट, माझें मत असें आहे कीं, धनगर आपल्या मेंढ्याचेंच हित साधीत असतो. कारण त्यांचें कल्याण साधण्यांतच धनगराच्या धंद्याचा (कलेचा) उत्कर्ष असतो. त्याचप्रमाणें, जोपर्यंत सरकार, सरकार म्हणून कार्य करीत असतें, तोपर्यंत ज्या लोकांवर सत्ता चालवावयाची असले आणि ज्यांचे पालन करावयाचें असतें, अशांच्या कल्याणाकडेच तें बघत असतें. मग ती सत्ता खाजगी स्वरूपाची असो अथवा प्रातिनिधिक स्वरूपाची असो. पण तुमचें मत काय आहे? खरे राज्याधिकारी लोक खुषीनें राज्य करीत असतात, असें तुम्हाला वाटतें काय?

थ्रॅसि०—मला असें वाटतें, एवढेंच नव्हे, तर माझी खात्री आहे कीं, ते खुषीनें राज्य करतात!

सॉक्रे०:—काय? थ्रॅसिमाकस! कोणालाही मनापासून राज्यकारभाराचीं सामान्य कामें करावयास नको असतात व
Steph आपल्या कारभारापासून स्वतःला फायदा न मिळतां
346 लोकांना फायदा मिळतो, ह्या सबबीवर कोणीही पगाराशिवाय काम करावयास तयार नसतो, हें तुमच्या निरीक्षणांत आलेलें नाहीं काय? मी तुम्हाला पुढील प्रश्न विचारतों. प्रत्येक कलेचें, इतर कलांपासून भिन्नता दाखविणारें, असें विशिष्ट कार्य नसतें काय? माझ्या प्रिय मित्रा! स्वतःच्या मताविरुद्ध उत्तर देऊं नका! कारण त्यामुळें, आपली चर्चेमध्यें कांहींच प्रगती होणार नाहीं.

थ्रॅसि०:—प्रत्येक कलेचें विशिष्ट असें कार्य असतें, हें मी कबूल करतों.

सॉक्रे०:—आणि प्रत्येक कलेपासून आपणाला विशिष्ट प्रकारचा फायदा होत नसतो काय? वैद्यकीय शास्त्रापासून आपलें आरोग्य रक्षिलें जातें आणि नौकानयन कलेपासून आपलें जलप्रवासांत रक्षण केलें जातें.

थ्रॅसि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जिच्यापासून पैसे मिळवितां येतील, अशी एखादी कला नसते काय? वैद्यकीय कला व नौकानयन कला, हीं तुम्ही एकच समजतां काय? तांडेलाचे काम करीत असताना, जलपर्यटनामुळें एखाद्याची प्रकृति चांगली सुधारली, तर त्यामुळें नावाड्याची कला व वैद्यकीय कला एकच आहेत, असें तुम्ही म्हणाल काय?

थ्रॅसि०:—नाहीं.

सॉक्रे०:—रोगी बरे करण्याबद्दल पैसे मिळतात, म्हणून वैद्यकीय कलेला तुम्ही पोटभरू कला म्हणाल काय?

थ्रेसि०:—नाहीं.

सॉक्रे० – प्रत्येक कलेचा उपयोग विशिष्ट प्रकारचा असतो, असें आपण ठरविलें नाहीं काय ?

थ्रेसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, सर्व कलावंतांना म्हणून जो सर्वसाधारण फायदा मिळतो, तो एकाच गोष्टीच्या सर्वसाधारण उपयोगापासून मिळत नाहीं काय ?

थ्रेसि०: —असें दिसतें.

सॉक्रे०:—-आणखी आम्ही असें म्हणतों कीं, पैसे मिळवून कलावंताना जो फायदा होतो, तो त्या लोकांनीं आपल्या स्वतःच्या कलेशिवाय पैसे मिळविण्याच्या कलेचा उपयोग केलेला असतो, म्हणून होतो.

हें विधान मोठ्या नाखुषीनें त्यानें कबूल केलें.

सॉक्रे०:—तर मग, कोणालाही कलेपासून वस्तुतः पैसे मिळत नसतात. वैद्यकीय कलेनें आरोग्य रक्षिलें जातें, शिल्पकलेनें घर बांधलें जातें, आणि पैसे मिळविण्याच्या कलेनें ह्या कलावंतांना पैसे मिळतात. दुसऱ्याही कलांबद्दल असेंच म्हणतां येईल. प्रत्येक कला, आपापलें कार्य करून, तिच्या विषयाचा फायदा करीत असते. पण कलावंताला जर पैसे देण्यात आले नाहींत, तर स्वतःच्या कलेपासून त्याला कांहीं फायदा मिळेल काय ?

थ्रेसि०:—मिळणार नाहीं, हें उघडच आहे.

सॉक्रे०:—पण जेव्हां कलावंत मोबदला न घेतां काम करतो, तेव्हां तो कांहींच फायदा करून देत नाहीं काय ?

थ्रेसि०: - मला वाटतें, तो फायदा करून देतो.

सॉक्रे०:—तर मग, थ्रेसिमाकस, आपणास स्पष्ट दिसून आलें कीं, कोणतीही कला अथवा सरकार स्वतःच्या फायद्याकरितां कांहीं करीत नसतें. उलट, कांहीं वेळापूर्वीं आपण म्हटल्याप्रमाणें, कलेच्या विषयाच्या

कल्याणाकरितां कला व प्रजेच्या कल्याणाकरितां सरकार, तजवीज व कायदे करीत असतात. आणि अशा कामांत बलिष्ठांच्या हितापेक्षां अशक्तांच्या हिताकडेच त्यांची दृष्टि असते. ह्या कारणा-
Steph मुळेंच, थ्रॅसिमाकस, आतां मी असें म्हणतों कीं, कोणीही
347 आपखुषीनें अधिकाराची जागा पत्करणार नाहीं किंवा मोबदल्याशिवाय लोकांची सुधारणा करण्याचें काम अंगावर घेणार नाहीं. कारण जो खरा कलावंत आहे, तो स्वतःच्या हिताकडे लक्ष न देतां, फक्त कलेच्या हिताकडेच लक्ष देतो. ह्यामुळेंच अधिकाराच्या जागा पत्करणाऱ्या लोकांना मोबदला दिला पाहिजे. मग तो मोबदला पैशाच्या अथवा कीर्तीच्या अथवा काम नाकारण्याबद्दल शिक्षेच्या रूपानें असो! ग्लॅकान् उद्गारला, "सॉक्रेटिस, तुम्ही काय म्हणालांत? तुम्ही सांगितल्यापैकीं दोन मोबदले मला कळले. पण शिक्षा कोणती व ती मोबदल्याच्या बदली कशी द्यावयाची, हें मला कांहीं समजलें नाहीं.

सॉक्रे०: - ज्या मोबदल्यामुळें, सद्गुणी माणसें अधिकाराची जागा स्वीकारतात, तो मोबदला तुम्हांला माहीत नाहीं असें दिसतें. महत्वा-कांक्षा व लोभ हे खरोखरच दुर्गुण होत, हें तरी तुम्हांला माहीत आहे ना?

ग्लॅकान्:—होय आहे.

सॉक्रे०:—म्हणूनच चांगलीं माणसें, पैशाकरितां व कीर्तीकरितां अधिकाराची जागा पत्करण्यास कबूल नसतात. कारण, उघडपणें आपल्या सेवेचा मोबदला घेऊन, 'भाडोत्री मनुष्यें' असें हिणवून घेण्याची त्यांना इच्छा नसते. तसेंच, गुप्तपणें आपल्या अधिकाराचा उपयोग करून, 'चोर' असें म्हणून घेण्याचीही त्यांना इच्छा नसते. शिवाय ते महत्त्वाकांक्षी नसल्यामुळें, त्यांना कीर्तीचीही पर्वा नसते. म्हणून सक्ती व शिक्षेची भीति, ह्यांच्या जोरावरच त्यांना अधिकाराची

जागा स्वीकारण्यास भाग पाडलें पाहिजे आणि म्हणूनच भाग पाडल्याशिवाय, खुषीनें अधिकाराची जागा पत्करणें कमीपणाचें समजलें जातें. स्वतः अधिकाराची जागा नाकारली असतां, वाईट मनुष्याकडून आपल्यावर अधिकार गाजविला जाणें, ह्यापेक्षां अधिक कडक शिक्षा कोणतीच नाहीं. आणि माझ्या मतें, अशा कडक शिक्षेची भीतीच, अधिकाराची जागा स्वीकारण्यास सद्गुणी माणसाचें मन वळवितें. जेव्हां हे लोक अधिकाराची जागा पत्करतात, तेव्हां आपणांस मोठी जागा मिळाली आहे, अशी त्यांची भावना नसून, केवळ एक आवश्यक कर्तव्य आपण करीत आहों, असें त्यांना वाटतें. अधिकाराच्या जागेवर चैन करण्याची त्यांची इच्छा नसल्यामुळें, केवळ त्यांच्यापेक्षां चांगला अथवा त्यांच्यासारखा मनुष्य, हें काम करण्यास मिळत नाहीं, म्हणूनच त्यांना अधिकाराचें काम करावें लागतें. राज्यांत जर निव्वळ सज्जन लोकच असते, तर अधिकाराची जागा मिळविण्यास हल्लीं जशी स्पर्धा होते, तशी अधिकाराची जागा कशी टाळावी, ह्या विषयीं स्पर्धा झाली असती ! आणि त्यावरून असें दिसून आलें असतें कीं, खरा अधिकारी, स्वतःच्या हिताकडे बघणारा नसून आपल्या प्रजेच्या हिताकडे बघणारा असतो. आणि प्रत्येक सज्जन मनुष्य, स्वतः त्रास सोसून लोकांचा फायदा करून देण्याऐवजीं, लोकांकडून फायदा घेण्याचेंच पत्करणारा असतो. म्हणून कांहींही झालें तरी, 'बलिष्ठांचें हित म्हणजेच न्याय' हें थ्रॅसिमाकसचें तत्व मी मान्य करणार नाहीं. असो. ह्या प्रश्नाचा विचार आपण सध्यां लांबणीवर टाकूं. कारण थ्रॅसिमाकस आतां असें म्हणतो कीं, अन्यायी माणसाचें आयुष्य न्यायप्रिय माणसापेक्षां चांगलें असतें. ह्या म्हणण्याचा विचार करणें, अधिक महत्त्वाचें आहे, असें मला वाटतें. ग्लॅकान्, तूं कोणती बाजू घेतोस आणि ह्यापैकीं कोणतें विधान खरें आहे, असें तुला वाटतें ?

ग्लॅकान्०:—माझें स्वतःचें मत असें आहे कीं, न्यायप्रिय माणसाचें आयुष्य अधिक फायदेशीर असतें.

सॉक्रे०:—अन्यायी मनुष्याच्या आयुष्यांतील आकर्षक गोष्टींची, थ्रॅसिमाकसनें सांगितलेली लांबलचक यादी, तूं ऐकली नाहींस वाटतें?
Steph 348

ग्लॅकान्०:—मी ऐकली पण माझी खात्री झालेली नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, थ्रॅसिमाकस जें म्हणतो तें खरें नाहीं, अशी त्याची खात्री करून देण्याचे, आपण यथाशक्ति प्रयत्न करावेत काय?

ग्लॅकान्०:—अर्थात्!

सॉक्रे०:—प्रथम आपण न्यायी असण्यापासून फायदे सांगून थ्रॅसिमाकसनें उत्तर द्यावयाचें, नंतर पुनः आपण त्याला प्रत्युत्तर द्यावयाचें-अशी जर चर्चेची आपण पद्धत स्वीकारली, तर दोन्ही बाजूचे फायदे मोजावयास लागून, निर्णय करण्यास आपणास न्यायाधीश नेमावे लागतील. पण परस्परांची कबूली घेऊन वाद करण्याची, आपली नेहमींची पद्धत जर आपण स्वीकारली, तर आपल्यालाच वकील व न्यायाधीश, अशी दोन्ही कामें करतां येतील.

ग्लॅकान्०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, तुम्ही कोणती पद्धत पसंत करतां?

ग्लॅकान्०:—दुसरी.

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, आपण वादाला पुनः आरंभ करूं. आम्हाला पुढील प्रश्नाचें उत्तर द्या. पूर्ण न्यायापेक्षां, पूर्ण अन्याय अधिक फायदेशीर आहे काय?

थ्रॅसि०:—निःसंशय. ह्याची कारणेंही मी पूर्वीं सांगितलीं आहेत.

सॉक्रे०:—ह्यापैकीं एकाला सद्गुण व दुसऱ्याला दुर्गुण, असें तुम्ही म्हणाल काय?

थ्रॅसि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—न्याय हा सद्गुण असून, अन्याय दुर्गुण नव्हे काय?

थ्रॅसि०: - वा छान ! ज्याअर्थीं अन्याय मी फायदेशीर म्हणतो व न्याय नुकसानकारक म्हणतों, त्याअर्थीं मी असें कसें म्हणेन ?

सॉक्रे०: - तर मग, तुमचें काय म्हणणें आहे ?

थ्रॅसि०:—ह्याच्या उलट.

सॉक्रे०:—न्यायाला तुम्ही दुर्गुण म्हणतां काय ?

थ्रॅसि०:—नाहीं. पण मी त्याला 'अलौकीक चांगला स्वभाव' म्हणतों.

सॉक्रे०:—तर मग, अन्यायाला वाईट स्वभाव म्हणतां काय ?

थ्रॅसि०:—नाहीं. मी त्याला 'चांगलें धोरण' समजतों.

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस ! अन्यायी मनुष्य शहाणा आणि चांगला असतो, असें तुम्हाला वाटतें काय ?

थ्रॅसि०:—होय. जे लोक पूर्ण अन्यायी आहेत व ज्यांच्या अंगांत शहरांना आणि राष्ट्रांना गुलाम करून घेण्याची ताकद आहे, ते शहाणे व चांगले असतात. हें मी खिसेकापू लोकांबद्दल म्हणतों आहे, असें तुम्हाला वाटत असेल–माझ्या मतें, अशा लोकांची कृत्येंही पकडलीं गेलीं नाहींत तर फायदेशीर असतात–तथापि मी आतां सांगितलेल्या लोकांबरोबर तुलना करण्याइतकी त्यांची योग्यता नाहीं.

सॉक्रे०:—तुमच्या म्हणण्याचा अर्थ मला चांगला समजला. परंतु तुम्ही अन्यायाला सद्गुण व शहाणपण ह्यांच्या वर्गांत घालून, न्यायाला ह्यांच्या विरुद्ध वर्गांत घालतां, याचें मला आश्चर्य वाटतें !

थ्रॅसि०:—अर्थात् ! मी असेंच वर्गीकरण करतों.

साक्रे०:—तुम्ही आतां फार जोरकस बाजू घेतल्यामुळें, काय उत्तर द्यावें हें ठरविणें कठीण झालें आहे ! अन्याय फायदेशीर आहे, असा मुद्दा पुढें मांडूनही, जर तुम्ही अन्याय हा दुर्गुण व हलकटपणा आहे, असें कबूल केलें असतें, तर सामान्य समजुतीप्रमाणें आम्हाला कांहींतरी उत्तर देतां आलें असतें. पण आतां उघडच आहे कीं, तुम्ही

अन्यायाला सुंदर व बलवान् म्हणाल व न्यायाच्या ठिकाणीं, आमच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें जे गुण कल्पिले जातात, ते सर्व
Steph 349 गुण तुम्ही अन्यायाला लावाल. कारण तुम्ही अन्यायाचा दर्जा, सद्गुण व शहाणपण ह्यांच्या बरोबरीचा समजतां.

थ्रॅसि०:—तुमचा तर्क बरोबर आहे.

सॉक्रे०:—जोपर्यंत तुमचें खरें मत तुम्ही सांगत आहां असें मला वाटेल, तोपर्यंत तुमच्याबरोबर वादविवाद करण्याचें मी सोडणार नाहीं. कारण थ्रॅसिमाकस, तुम्ही आतां चेष्टा करीत नसून, तुम्हाला जें सत्य वाटतें, तेंच सांगत आहां.

थ्रॅसि०:—मी तें सत्य अथवा असत्य समजत असलों, तरी तुम्हाला त्याच्याशीं काय करावयाचें ? माझें प्रतिपादन तुम्हाला खोडून काढतां येत नाहीं ना ?

सॉक्रे०:—खरें आहे. तथापि आणखी एका प्रश्नाचें उत्तर द्याल काय ? न्यायप्रिय मनुष्य, कोणत्याही बाबतींत न्यायप्रिय माणसाच्या विरुद्ध जाईल काय ?

थ्रॅसि०:—खास नाहीं ! कारण एरवीं तो बावळट मनुष्य कसा राहील ?

सॉक्रे०:—न्यायाच्या सरळ रेषेबाहेर, न्यायी मनुष्य जाईल काय ?

थ्रॅसि०:—जाणार नाहीं.

सॉक्रे०:—पण तो अन्यायी मनुष्याच्या विरुद्ध जाईल काय ? आणि असें करणें, तो न्यायाचें अथवा अन्यायाचें समजेल काय ?

थ्रॅसि०:—असें करणें, तो न्यायाचें समजेल. पण तसें करण्यास मात्र तो समर्थ होणार नाहीं !

सॉक्रे०:—असा माझा प्रश्न नव्हता. न्यायी मनुष्य, अन्यायी मनुष्याच्या विरुद्ध जाण्याची इच्छा करून निश्चयही करील, पण तो न्यायी मनुष्याच्या मात्र विरुद्ध जाणार नाहीं. हें विधान खरें काय, असा माझा प्रश्न आहे.

थ्रॅसि०:—होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:—पण अन्यायी मनुष्य काय करतो? न्यायी मनुष्याच्या विरुद्ध व न्यायाच्या रेषेबाहेर जाण्यास, तो तयार होतो काय?

थ्रॅसि०:—निःसंशय! कारण तो सर्व बाबतींत सर्वांच्या पुढें जाण्यास तयार असतो.

सॉक्रे०: - तर मग, अन्यायी मनुष्य, दुसऱ्या अन्यायी मनुष्याच्या हिताविरुद्ध जाऊन व अन्यायी कृत्य करून, दुसऱ्या कोणापेक्षांही आपणास अधिक मिळावें, म्हणून धडपड करणार नाहीं काय?

थ्रॅसि०:—होय. करील.

सॉक्रे०:—तर आपण आतां असें म्हणूं—न्यायी मनुष्य स्वसदृश मनुष्याच्या हिताविरुद्ध न जातां, फक्त विरोधी लोकांच्याच विरुद्ध जाईल. पण अन्यायी मनुष्य स्वसदृश लोकांच्याही विरुद्ध जाईल.

थ्रॅसि०:—तुम्ही फारच उत्तम मांडणी केली.

सॉक्रे०:—आणखी असें कीं, अन्यायी मनुष्य शहाणा व चांगला असतो, पण न्यायी शहाणाही नसतो व चांगलाही नसतो.

थ्रॅसि०:—छान्!

सॉक्रे०:—अन्यायी मनुष्य, शहाणा आणि चांगल्या लोकांसारखा असून, न्यायी मनुष्य असा मुळींच नसतो ना?

थ्रॅसि०:—अर्थातच! विशिष्ट स्वभावाचा मनुष्य, तशाच विशिष्ट स्वभावाच्या माणसासारखा असतो, पण विरुद्ध स्वभावांच्या माणसांत साम्य मुळींच नसतें.

सॉक्रे०—प्रत्येकाचा स्वभाव, ज्याच्याशी त्याचा सारखेपणा असतो त्याच्याप्रमाणेंच असतो.

थ्रॅसि०:—तुमचें मत काय निराळें आहे?

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, ठीक आहे. एका मनुष्याला संगीतज्ञ व दुसऱ्याला संगीतानभिज्ञ, तुम्ही म्हणाल काय?

थ्रॅसि०: —होय, मी म्हणेन.

सॉक्रे०—त्यांच्यापैकीं शहाणा कोणाला म्हणाल व अडाणी कोणाला म्हणाल ?

थ्रॅसि०: —संगीत जाणणाऱ्याला मी शहाणा म्हणेन आणि संगीत न जाणणाऱ्या माणसाला अडाणी म्हणेन.

सॉक्रे०:—तुम्ही असेंही म्हणतां काय कीं, ज्या विषयांत मनुष्य शहाणा असतो, त्या विषयांत तो चांगला असतो आणि ज्या विषयांत तो असमंजस असतो, त्या विषयांत तो वाईट असतो ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—असेंच तुम्ही वैद्यकीबद्दलही म्हणाल काय ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०: —माझ्या चांगल्या मित्रा, संगीतज्ञ वीणा वाजवीत असतां, वीण्याच्या तारा घट्ट अथवा सैल करण्याच्या बाबतींत, इतर संगीतज्ञापेक्षां आपलें ज्ञान अधिक समजतो, असें तुम्हाला वाटतें काय ?

थ्रॅसि०:—मला असें वाटत नाहीं.

सॉक्रे०:—पण संगीतानभिज्ञापेक्षां आपलें ज्ञान अधिक आहे, असें तो समजणार नाहीं काय ?

थ्रॅसि०:—अर्थात्‌च समजेल.

Steph 350 सॉक्रे०:—आणि वैद्य कसा वागेल ? पथ्य सांगण्याच्या बाबतींत, तो वैद्याच्या अथवा वैद्यकीय ज्ञानाच्या विरुद्ध जाईल काय ?

थ्रॅसि०: —अर्थात्‌च नाहीं.

सॉक्रे०: —पण वैद्यकीय शास्त्र ज्याला समजत नाहीं, अशा मनुष्याच्या विरुद्ध तो जाईल ना ?

थ्रॅसि०: —होय.

सॉक्रे०:—ज्ञान व अज्ञान, ह्यांच्या प्रत्येक बाबतींत शास्त्रीय

ज्ञान असलेला कोणीही मनुष्य, दुसऱ्या शास्त्रज्ञांपेक्षां जास्त कांहीं करील अथवा बोलेल काय ? त्यांच्यासारखा मनुष्य जें करील, तेंच तो करणार नाहीं काय ?

थ्रॅसि०:—माझ्या मतें, दुसरें म्हणणेंच बरोबर दिसतें.

सॉक्रे०:—पण अडाणी मनुष्य काय करील ? ज्ञानी व अज्ञानी, अशा दोघांच्याही विरुद्ध तो वागणार नाहीं काय ?

थ्रॅसि०:—कदाचित् वागेलही.

सॉक्रे०:—शास्त्रज्ञ हा शहाणा असतो ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—शहाणा मनुष्य सज्जन असतो ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, सूज्ञ व सज्जन मनुष्य, स्वतःसारख्या मनुष्याविरुद्ध जाऊं इच्छिणार नाहीं; पण स्वतःपासून निराळा व विरुद्ध असलेल्याच्या मात्र विरुद्ध जाईल.

थ्रॅसि०:—असें दिसतें.

सॉक्रे०:—परंतु वाईट व अज्ञ मनुष्य, स्वसदृश व विरोधी माणसाच्याही विरुद्ध जाईल.

थ्रॅसि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, आपला अन्यायी मनुष्य स्वसदृश आणि विरोधी माणसाच्या विरुद्ध जातो, असें तुम्ही म्हटलें होतें ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—पण न्यायी मनुष्य, स्वसदृश असलेल्याच्या विरुद्ध न जातां, फक्त विरुद्ध असलेल्याच्याच विरुद्ध जातो ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, न्यायी मनुष्याचें, सज्जन व सूज्ञ माणसाशीं साम्य ठरतें व अन्यायी माणसाचें, दुर्जन व अज्ञ माणसांशीं साम्य ठरतें.

थ्रॅसि०:—होय. असें ठरतें.

सॉक्रे०:—पण आपण असें ठरविलें आहे कीं, प्रत्येकाचा स्वभाव, त्याचें ज्याच्याशीं साम्य आहे त्याच्यासारखा असतो.

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—आणि त्यानंतर आपण असा निष्कर्ष काढला कीं, न्यायी मनुष्य हा सूज्ञ व सज्जन असतो आणि अज्ञानी मनुष्य अडाणी व वाईट असतो.

आतां मी ज्याप्रमाणें वर्णन करीत आहे, त्याप्रमाणें थ्रॅसिमाकसनें वरील विधानें सरळपणें कबूल न करतां, नाखुषीनें व पुष्कळ प्रतिकारानंतर कबूल केलीं. शिवाय हवा उष्ण असल्यामुळें, तो घामाघुम झाला होता. थ्रॅसिमाकसला लाजताना असा ह्याचवेळीं मी प्रथम पाहिला ! न्याय म्हणजे सद्गुण व ज्ञान आणि अन्याय म्हणजे दुर्गुण व अज्ञान होय, असें आम्ही निश्चित करून घेतल्यानंतर, मी वाद पुढें चालू केला.

सॉक्रे०:—ठीक ! हा मुद्दा निश्चित झाला असें आपण समजूं. पण थ्रॅसिमाकस, अन्याय बलवान् असतो, असें आपण म्हटलेलें तुम्हाला आठवतें ना ?

थ्रॅसि०:—होय. मला आठवतें. पण तुम्ही जीं शेवटीं अनुमानें काढलींत, तीं मला मान्य असून, मी उत्तर देण्यास असमर्थ आहे, असें मात्र तुम्ही समजूं नका. माझे विचार जर मी मांडूं लागलों, तर मी पांडित्य दाखवीत आहे, असें तुम्ही समजाल अशी माझी खात्री आहे. म्हणून मला जें बोलावयाचें आहे, तें बोलण्याची मुभा तरी द्या अथवा तुम्हाला प्रश्न विचारावेसे वाटत असतील तर तसें करीत बसा ! म्हणजे ज्याप्रमाणें म्हाताऱ्या बायका गोष्टी सांगत असताना, आपण ‘ छान ! होय ! नाहीं ! ’ असें म्हणून माना डोलवीत असतों, त्याप्रमाणें तुमच्या प्रश्नाला मी उत्तरें देईन !

सॉक्रे०:—असें करून तुम्ही आपल्या मतांची अवहेलना करूं नका.

थ्रॅसि०:—ज्याअर्थी तुम्ही मला बोलूं देत नाहीं, त्याअर्थी तुमच्या इच्छेप्रमाणें होऊं द्या! आणखी तुम्हाला काय पाहिजे?

सॉक्रे०:—कांहीं नको. पण तुमची इच्छा असली, तर मी तुम्हाला प्रश्न विचारतों व तुम्ही उत्तरें द्या.

थ्रॅसि०:—सुरवात करा.

Steph 351 सॉक्रे०:—ठीक आहे. अन्यायाशीं तुलना केली असतां न्यायाचें स्वरूप काय आहे, ह्या विषयाची चर्चा चालू रहावी, ह्या हेतूनें मी तुम्हाला पूर्वी विचारलेला प्रश्नच पुन: विचारतों. अन्याय हा न्यायापेक्षां जास्त शक्तिमान् आहे, असें पूर्वी म्हणण्यांत आलें होतें; पण आतां न्याय म्हणजे ज्ञान व सद्गुण आणि अन्याय म्हणजे अज्ञान, असें ठरल्यानंतर न्याय हा अन्यायापेक्षां शक्तिमान् आहे, हें कोणालाही सहज समजण्यासारखें आहे, असें मला वाटतें. पण थ्रॅसिमाकस! अशा रीतीनें हा मुद्दा मला सिद्ध करावयाचा नसून निराळ्या रीतीनें करावयाचा आहे. एका शहरानें स्वत: अन्यायी पणानें वागावें व इतर शहरांना गुलाम करण्याचा यशस्वी प्रयत्न करून पुष्कळांना गुलाम करून टाकावें, असें तुम्हाला वाटतें काय?

थ्रॅसि०:—अर्थात्! पूर्णपणें अन्यायी असलेलें उत्तम शहर असा नेहमींच प्रयत्न करणार!

सॉक्रे:०—तुमचें म्हणणें मला समजलें. पण दुसऱ्या शहरांना गुलाम करणाऱ्या शहरामध्यें असलेली सत्ता, न्यायाच्या मदतीशिवाय टिकूं शकेल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाची मला चर्चा करावयाची आहे.

थ्रॅसि०:—न्याय म्हणजे शहाणपणा, हें तुमचें मत जर बरोबर असलें, तर न्यायाची मदत आवश्यक आहे. पण माझें मत बरोबर असलें, तर अन्याय आवश्यक आहे.

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, तुम्ही नुसती मान डोलवून उत्तरें न देतां फार चांगलीं उत्तरें देत आहांत, हें पाहून मला फार आनंद वाटतो.

थ्रॅसि०:—केवळ तुमच्या समाधानाकरितांच मी उत्तरें देत आहे !

सॉक्रे०:—तुम्ही फार कृपाळू आहांत म्हणून आमचें आणखी समाधान करा ! कोणतेंही शहर अथवा सैन्य अथवा चोरांची अथवा लुटारूंची टोळी अथवा संगनमतानें अन्यायी कृत्यें करणारी मंडळी, एकमेकांशीं अन्यायानें वागूं लागल्यावर, कोणत्याही कृत्यांत यश मिळवूं शकतील, असें तुम्हाला वाटतें काय ?

थ्रॅसि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—जर ते एकमेकांशीं अन्यायीपणानें वागण्याचें टाळतील, तरच ते यशस्वी होतील ना ?

थ्रॅसि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—ह्याचें कारण, अन्याय, मनुष्यामनुष्यांमध्यें भेद, वैमनस्य व भांडणें उत्पन्न करतो आणि न्याय, एकी व मैत्री उत्पन्न करतो.

थ्रॅसि०:—तुमच्याशीं मला भांडण करावयाचें नाहीं, म्हणून माझेंही मत असेंच आहे असें समजा.

सॉक्रे०:—मी आपला फार आभारी आहे. पण कृपा करून पुढील प्रश्नाचें उत्तर द्या. जर अन्यायाची प्रवृत्ति, जेथें तेथें द्वेष उत्पन्न करणारी असते, तर स्वतंत्र अथवा गुलाम लोकही एकमेकांचा द्वेष करावयास लागून व निराळे पक्ष उभारून, संगनमतानें काम करण्यास नालायक ठरतील ना ?

थ्रॅसि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—अन्याय दोन लोकांमध्यें जरी वसत असला, तरी ते एकमेकांशीं भांडावयास लागून व द्वेष करून, एकमेकांचे व न्यायी मनुष्याचे शत्रु होतील ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे:०—आणि माझ्या मित्रा, मनुष्याच्या हृदयांत अन्यायानें ठाणें दिलें असतां, अन्याय आपली सत्ता घालवील कीं कायम ठेवील ?

५८५६

थ्रॅसि०:—सत्ता कायम ठेवील, असें आपण म्हणूं.

सॉक्रे०:—ज्यामध्यें अन्यायानें ठाणें दिलें आहे, असें कोणतेंही शहर अथवा कुटुंब अथवा सैन्य अथवा दुसरें कांहीं, एकमतानें कांहीं काम करूं शकणार नाहीं. कारण अन्याय, दुही व भांडणें उत्पन्न करतो व तो स्वतःचा, स्वतःविरुद्ध असलेल्याचा व न्यायी मनुष्याचा शत्रु होतो. तुम्हांला असेंच वाटतें ना ?

Steph 352

थ्रॅसि०:—असेंच.

सॉक्रे०:—तसेंच, एखाद्या व्यक्तीमध्यें अन्यायाचा प्रवेश झाला म्हणजेही हेच परिणाम होतात. प्रथमतः, अंतस्थ कलह आणि दुही, हीं त्याला कांहीं करूं देत नाहींत. नंतर तो स्वतःचा व न्यायी मनुष्याचा शत्रु बनतो. असेंच ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, देव हे न्यायप्रिय असतात ना ?

थ्रॅसि०:—आपण असें धरून चालूं कीं, ते न्यायप्रिय असतात.

सॉक्रे०:—तर मग, अन्यायी मनुष्य देवांचाही शत्रु होईल आणि न्यायी मनुष्य देवांचा मित्र होईल.

थ्रॅसि०:—तुमची तृप्ती होईपर्यंत, स्वतःच्या वादविवाद पद्धतीच्या कौशल्याची मेजवानी झोडा व आनंद माना ! येथील मंडळींचा अपमान होईल, म्हणून मी तुम्हांला विरोध करीत नाहीं.

सॉक्रे०:—आमची मेजवानी पूर्ण होण्याकरितां, तुम्ही देत आहांत त्याप्रमाणें आणखी उत्तरें देण्याचा चांगुलपणा दाखवा ! आपण असें सिद्ध केलें आहे कीं, न्यायप्रिय माणसें अन्यायी माणसांपेक्षां अधिक शहाणीं, चांगलीं व काम करणारीं असतात. कारण अन्यायी माणसांना एकजुटीनें कांहींच करतां येणें शक्य नसतें. अन्यायी माणसांनीं एकजुटीनें व जोरानें एकदांतरी काम केलें आहे, असें जर आपण म्हटलें, तर तें

पूर्णपणें बरोबर होणार नाहीं. कारण ते पूर्णपणें अन्यायी असते, तर एकमेकांचा गळा दाबल्याशिवाय कधींच राहले नसते! पण हें उघड आहे कीं, त्यांच्यामध्यें अन्यायबुद्धि अपुरी असून न्यायबुद्धीचा थोडासा अंश असल्यामुळें, आपले मित्र व शत्रु ह्यांना त्यांनीं एकाच वेळीं दुखापत केली नाहीं व त्यामुळें त्यांनीं जें कांहीं साधलें तें साधण्यास ते समर्थ झाले. कारण जे पूर्णपणें अन्यायी व दुष्ट असतात, ते कृति करण्यास अगदीं असमर्थ असतात. माझ्या मतें, हें सर्व म्हणणें खरें असून, तुम्ही जें तत्त्व प्रथम प्रतिपादन केलेंत तें खोटें आहे. असो. न्यायप्रिय माणसें अन्यायी लोकांपेक्षां अधिक सुखी असतात काय, हा प्रश्न आतां आपणास विचारांत घ्यावयाचा आहे. मला स्वतःला असें वाटतें कीं, ते अधिक सुखी असतात. परंतु कोणत्या तऱ्हेनें मनुष्यानें आपलें आचरण ठेविलें पाहिजे, अशा महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल आपण विचार करीत असल्यामुळें, वरील प्रश्नाची अधिक काळजीनें चर्चा केली पाहिजे.

थ्रॅसि०:—होय. चर्चा तुम्ही सुरू करा.

सॉक्रे०:—बरें आहे. मी सुरवात करतों. घोड्याची कांहीं उपयुक्तता असते, असें तुम्हांला वाटतें काय?

थ्रॅसि०:—होय वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, घोड्याच्या उपयुक्ततेचें कार्य साधण्याकरितां, घोड्याशिवाय इतर साधन असूं शकेल काय?

थ्रॅसि०:—मला तुमचें म्हणणें समजलें नाहीं.

सॉक्रे०:—पुढीलप्रमाणें विचार करा. डोळ्यांशिवाय तुम्हाला कांहीं बघतां येतें काय?

थ्रॅसि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—कानांशिवाय ऐकतां येतें काय?

थ्रॅसि०:—नाहीं.

सॉक्रे०—तर मग बघणें व ऐकणें हींच ह्या इंद्रियांचीं कार्यें आहेत, असें आपण म्हणूं ना ?

थ्रॅसि०:—होय.

Steph 353 सॉक्रे०:—द्राक्षाची वेल, चाकूनें, पातळीनें किंवा दुसऱ्या एखाद्या हत्यारानेंही छाटतां येत नाहीं काय ?

थ्रॅसि०:—खात्रीनेंच येते.

सॉक्रे०: —पण त्याच कामाकरितां केलेल्या चाकूनें, जशी ती छाटतां येईल, तशी इतर कोणत्याही हत्यारानें छाटतां येईल काय ?

थ्रॅसि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, त्या चाकूचें कार्य वेल छाटणें, असें आपणांस म्हणतां येईल ना ?

थ्रॅसि०:—अर्थात्

सॉक्रे०:—प्रत्येक वस्तूचें कार्य, तीच वस्तु साधन म्हणून धरल्याशिवाय सिद्ध होणें शक्य आहे काय, असा जो मी तुम्हांला प्रश्न विचारला होता, त्याचा अर्थ, तुम्हांला आतां समजला असेल, असें मला वाटतें.

थ्रॅसि०:—होय. मला समजला. तुमचें म्हणणें मी मान्य करतों.

सॉक्रे०:—ज्या वस्तूचें विशिष्ट असें कार्य असतें, तिच्यामध्यें विशिष्ट गुणही असतो, असें तुम्हांला वाटतें ना ? आपण पूर्वींच्याच उदाहरणाकडे वळूं. डोळ्यांचें विशिष्ट असें कार्य असतें, असें आपण म्हणतों ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, डोळ्यांनाही विशिष्ट गुण असतो ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—तसेंच, कानांनाही विशिष्ट कार्य असतें ना ?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—आणि त्यांनांही विशिष्ट गुण असतो ना?

थ्रॅसि०—होय.

सॉक्रे०:—आणि इतर सर्व वस्तूंच्या बाबतींतही असेंच असतें ना?

थ्रॅसि०—होय असेंच.

सॉक्रे०:—योग्य गुणांचा अभाव असतांना व दुर्गुण शिरला असतांना, डोळे आपलें कार्य करूं शकतील, असें तुम्हांला वाटतें काय?

थ्रॅसि०:—दृष्टीच्या जागीं अंधपणा आला तर ते कसें कार्य करणार?

सॉक्रे०:—माझें म्हणणें एवढेंच कीं, योग्य गुणांच्या अभावीं डोळे कार्य करणार नाहींत. वस्तु स्वतःच्या विशिष्ट गुणांमुळेंच आपलें कार्य बजावूं शकतात व स्वतःच्या विशिष्ट दुर्गुणांमुळेंच कार्य बिघडवूं शकतात, हें खरें आहे काय, एवढेंच मी विचारीत आहे.

थ्रॅसि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—जर कानांनीं आपले गुण गमावले, तर त्यांचें काम वाईट होईल ना?

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—ह्या तत्त्वानुसार, आपल्याला इतर सर्व वस्तूंबद्दलही असेंच म्हणतां येईल ना?

थ्रॅसि०:—आपणांस असें म्हणता येईल, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—आपण आतां दुसऱ्या मुद्याचा विचार करूं. आत्म्यास कांहीं कार्य असून, तें कार्य आत्म्याशिवाय इतर कशानेंही करतां येईल काय? उदाहरणार्थ, देखरेख करणें, अधिकार गाजविणें, विचार करणें—अशासारखीं कामें आत्माच करूं शकतो ना? अथवा दुसऱ्या कोणाला तीं करतां येतील?

थ्रॅसि०:—दुसऱ्या कोणालाही करतां येणार नाहींत.

सॉक्रे०:—जीवित हें आत्म्याचें कार्य होय, असें आपण म्हणूं काय?

थ्रॅसि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आत्म्याचा असा कांहीं विशिष्ट गुण नाहीं काय ?

थ्रॅसि०:—होय आहे.

सॉक्रे०:—तर मग थ्रॅसिमाकस, आत्मा स्वतःच्या विशिष्ट गुणांविरहित कधीं कार्य करणें शक्य आहे काय ?

थ्रॅसि०:—अशक्य आहे.

सॉक्रे०:—तर मग, वाईट आत्मा अधिकार गाजविण्याचें व देखरेख करण्याचें काम वाईट तऱ्हेनें करतो आणि चांगला आत्मा ह्या सर्व गोष्टी चांगल्या तऱ्हेनें करतो.

थ्रॅसि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—न्याय हा आत्म्याचा गुण आहे व अन्याय हा आत्म्याचा दुर्गुण आहे, असें आतां आपण कबूल केलें आहे.

थ्रॅसि०:—होय.

सॉक्रे०:—न्यायी आत्मा आणि न्यायप्रिय मनुष्य, चांगल्या तऱ्हेनें आयुष्य कंठील आणि अन्यायी मनुष्य वाईट तऱ्हेनें कंठील, हें उघड आहे.

Steph थ्रॅसि०:—तुमच्या प्रतिपादनाचा असा निष्कर्ष
354 निघतो खरा.

सॉक्रे०:—आणि जो चांगल्या तऱ्हेनें आयुष्य घालवितो, तो धन्य आणि सुखी होतो आणि जो निराळ्या तऱ्हेनें घालवितो, तो दुःखी होतो. असेंच ना ?

थ्रॅसि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, न्यायी मनुष्य सुखी असतो व अन्यायी मनुष्य दुःखी असतो.

थ्रॅसि०:—होय. असें आपण समजावें.

सॉक्रे०:—पण दुःखाऐवजीं सुखच फायदेशीर असतें.

थ्रॅसि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, थ्रॅसिमाकस, अन्याय हा न्यायापेक्षां कधींही फायदेशीर नसतो.

थ्रॅसि०:—सॉक्रेटिस ठीक ! बेंडिस देवतेच्या उत्सवानिमित्त तुम्हांला ही मेजवानीच समजून ध्या !

सॉक्रे०:—थ्रॅसिमाकस, ह्याकरितां मला तुमचे आभार मानले पाहिजेत. कारण तुम्ही शांत होऊन, माझ्यावर रागावण्याचें सोडून दिलेंत. तथापि मला चांगल्या प्रकारें मेजवानी मिळाली नाहीं, असें वाटतें ! पण हा तुमचा दोष नसून माझाच आहे. कारण ज्याप्रमाणें खादूनंदन, नवीन पक्वान्नाचें ताट वाढलें जात असतां, पूर्वीच्या पक्वान्नाचें सेवन सोडून देऊन, नवीन पक्वान्नांवर झडप घेतात, त्याप्रमाणें माझें वर्तन झालें ! न्यायाचें खरें स्वरूप काय, हा प्रश्न जो आपण प्रथम विचारांत घेतला होता, तो तसाच राहून गेला आहे. त्याचें उत्तर आपण शोधून काढण्यापूर्वीच, न्याय म्हणजे सद्गुण व शहाणपणा अथवा दुर्गुण व मूर्खपणा आहे काय, अशा विषयीं आपण चर्चा करीत बसलों. पण मध्येंच, अन्याय हा न्यायापेक्षां फायदेशीर आहे काय, असा प्रश्न उपस्थित झाल्यामुळें, मूळ विषय सोडून देऊन आपण ह्या प्रश्नाकडेच वळलों. ह्या कारणामुळें, आतां वादाचा शेवट असा झाला आहे कीं, मला कांहींच ज्ञान झालेलें नाहीं ! कारण जोंपर्यंत न्याय म्हणजे काय, हें मला समजलें नाहीं, तोंपर्यंत तो खरोखर सद्गुण आहे अथवा नाहीं, तसेंच न्यायी मनुष्य सुखी असतो अथवा दुःखी असतो, हें मला समजणें शक्यच नाहीं !

# प्लेटोची आदर्श राज्यघटना

## पुस्तक दुसरें

अशा तऱ्हेनें मी बोलल्यावर, मला वाटलें कीं, आमचा वादविवाद संपुष्टांत आला; पण वस्तुतः वादाचा तो केवळ आरंभच होता. कारण सर्व प्रसंगीं विलक्षण चिकाटी दाखविणारा ग्लॅकान्, थ्रॅसिमाकसचा पराभव झालेला पाहून स्वस्थ बसूं शकला नाहीं. तो म्हणाला, "सॉक्रेटिस, प्रत्येक बाबतींत अन्यायानें वागण्यापेक्षां न्यायानें वागणें चांगलें असतें, हें तत्त्व तुम्ही आम्हाला खरोखरच पटवून देणार आहांत काय? अथवा आमची खात्री केली, आहे असें निव्वळ समजून चालणार आहांत?"

Steph 357

मी म्हटलें, "यथाशक्ति तुमची खरोखर खात्री पटवून देण्यांत मला आनंद वाटेल."

ग्लॅकान्०:—पण तुम्ही असें करीत नाहीं, असें दिसतें. मी तुम्हांला पुढील प्रश्न विचारतों. तुमच्या मतें, चांगल्या वस्तूंचा असा एक वर्ग आहे काय कीं, ज्यांतील वस्तु आपल्याला मिळाल्या असतां आपल्याला आनंद वाटतो, पण तो आनंद त्यांच्या परिणामाकरितां वाटत नाहीं? उदाहरणार्थ, निरुपद्रवी सुखें व भोग ह्यांच्यापासून आपणांला तात्कालिक आनंद होतो, पण नंतर त्यांचा आपल्या मनावर कांहींच परिणाम रहात नाहीं.

सॉक्रे०:—अशा वस्तूंचा एक वर्ग आहे, हें मी कबूल करतों.

ग्लॅकान्०:—तुम्हाला आणखी दुसरा एक वर्ग असा आहे असें वाटतें काय कीं, ज्या वर्गातील वस्तु, केवळ वस्तूंकरितां नव्हे तर त्यांच्या परिणामाकरितांही आपणास आवडतात ? उदाहरणार्थ, बुद्धि, दृष्टि व आरोग्य. ह्या वस्तु आपल्याला दोन्ही कारणांनीं आवडतात.

सॉक्रे०:—होय.

ग्लॅकान्०:—तसेंच, तिसराही एक वर्ग तुम्ही मानतां काय कीं, ज्यांत व्यायामाचें शिक्षण, आजारी मनुष्याची शुश्रूषा, वैद्यकीचा धंदा आणि इतर पैसे मिळविण्याचे धंदे, ह्यांचा समावेश होतो ? ह्या वस्तु आपल्याला त्रासदायक असल्या तरी त्या फायद्याच्या अशा आपण मानतों. केवळ त्यांच्याकरितां म्हणून जरी त्या आपण त्याज्य समजलों, तरी त्यांपासून होणारे फायदे आणि इतर सुपरिणाम, ह्याकरितां आपण त्यांचा स्वीकार करतों.

सॉक्रे०—होय. असा तिसरा वर्ग आहे. पण पुढें काय ?

ग्लॅकान्०:—न्यायाला ह्या तीन वर्गांपैकीं, कोणत्या वर्गांत तुम्ही घालाल ?

Steph 358 सॉक्रे०--सर्वांत उच्च वर्गांत म्हणजे ज्या वस्तु त्यांच्या स्वत:करितां व त्यांच्या परिणामाकरितांही खरा सुखार्थी मनुष्य महत्त्वाच्या समजतो, अशा वस्तूंच्या वर्गांत.

ग्लॅकान्०:--तर मग, तुमचें मत बहुजनसमाजाच्या मताप्रमाणें नाहीं. कारण त्यांच्या मतें, न्याय हा त्रासदायक वर्गात मोडतो. कारण त्यांना न्यायाकरितां न्याय, तिरस्करणीय व नापसंत वाटतो; पण त्यापासून कीर्ति व फायदा मिळतो म्हणून ते न्यायाचा स्वीकार करतात.

सॉक्रे०:—असें बहुजनसमाजाचें मत आहे, हें मला माहित आहे. आणि ह्याच मताच्या जोरावर, थ्रॅसिमाकस न्यायाची निंदा करून अन्यायाची इतका वेळ स्तुति करीत होता. पण ग्लॅकान्, मी मंद बुद्धीचा विद्यार्थी असल्यामुळें, त्याचें म्हणणें मला पटलें नाहीं.

ग्लॅकान्०: —तर मग, मी काय म्हणतों तें ऐकून तुमचें मत सांगा. माझ्या मतें, थ्रॅसिमाकस एखाद्या नागाप्रमाणें तुमच्या प्रतिपादनाला तात्काळ मोहून गेला. परंतु आतांपर्यंत न्यायान्यायाचें जें विवरण झालें, त्यानें माझें समाधान झालें नाहीं. न्यायाचे फायदे व सुपरिणाम विचारांत न घेतां, आत्म्याचें ठिकाणीं न्याय व अन्याय ह्यांचें अस्तित्व असतांना, त्यांचें स्वयंभू स्वरूप काय, हें मला समजून घ्यावयाचें आहे. तुमची हरकत नसेल, तर मी आपलें म्हणणें तुम्हांला सांगतों. थ्रॅसिमाकसचें प्रतिपादन मी पुनः उपस्थित करून, न्यायाचें स्वरूप व मूळ ह्याविषयीं सामान्य समजूत काय आहे, ती मी सांगेन. नंतर मी असें प्रतिपादीन कीं, जे न्यायानें वागतात ते स्वतःच्या इच्छेविरुद्ध वागत असतात. कारण ते न्यायाला सद्वस्तु न मानतां अपरिहार्य वस्तु समजतात. आणखी असें म्हणेन कीं, अशा वागण्यांत ते विचारीपणा दाखवितात. कारण त्यांच्या मतें, न्यायी मनुष्याच्यापेक्षां अन्यायी मनुष्याचें आयुष्य अधिक चांगलें असतें. सॉक्रेटिस, माझें स्वतःचें असें मत आहे, असें समजूं नका! पण थ्रॅसिमाकस व इतर हजारों लोक, आमच्या कानींकपाळीं अशा मतांची नेहमीं ओरड करीत असल्यामुळें, मी गोंधळून गेलों आहे. अन्यायापेक्षां न्याय श्रेष्ठ आहे, अशा प्रकारचें समाधानकारक प्रतिपादन मी कधीं ऐकलेंलें नाहीं. न्यायाचें प्रशंसात्मक विवेचन ऐकण्याची माझी इच्छा आहे आणि तें इतर कोणाकडून ऐकण्यापेक्षां तुमच्याकडून ऐकण्यांत मला अधिक आनंद वाटेल. म्हणून मला जितक्या जोरानें अन्यायी मनुष्याची स्तुति करतां येईल, तितक्या जोरानें मी ती करणार आहे. कारण तितक्याच जोरानें अन्यायाची निंदा व न्यायाची स्तुति, मला तुमच्याकडून ऐकण्याची इच्छा आहे. माझी योजना तुम्हांला पसंत आहे काय ?

सॉक्रे०:—अर्थातच. कारण ह्या विषयाशिवाय दुसऱ्या कोणत्या विषयावर सूज्ञ माणसाला पुनः पुनः बोलणें किंवा ऐकणें आवडेल ?

ग्लॅकान्ः—छान् बोललांत! आतां न्यायाचें स्वरूप व मूळ ह्याविषयीं माझें म्हणणें ऐका.

असें म्हणतात कीं, अन्याय करणें हें स्वभावतःच चांगलें असतें आणि अन्याय सोसणें हें वाईट असतें. परंतु अन्याय सोसण्यापासून येणारा वाईटपणा, हा अन्यायाच्या चांगलेपणापेक्षां अधिक असतो. आणि म्हणून अन्याय करणें व सोसणें, असे दोन्ही तऱ्हेचे अनुभव घेतल्यानंतर, ज्यांना अन्याय सोसवत नाहीं आणि अन्याय

Steph 359

करतां येत नाहीं, अशा लोकांनीं अन्यायापासून दूर रहाण्याचें संगनमत केलें. ह्यामुळें मनुष्यामनुष्यांमध्यें कायदा व करार निर्माण झाले. आणि म्हणूनच जें कायद्यानें न्याय्य ठरलें गेलें, तेंच न्याय्य व कायदेशीर, असें म्हणण्याचा प्रघात पडला. असें न्यायाचें स्वरूप आहे व अशा रीतीनें न्याय अस्तित्वांत आला. शिक्षा न होतांना अन्यायाचें कृत्य करणें व प्रतिकाराची शक्ति अंगांत नसल्यामुळें अन्याय सोसणें, ह्या अनुक्रमें उत्तम व वाईट अवस्थांमधील, न्याय ही एक मधली अवस्था होय. न्यायाचें तत्त्व, ह्या दोन विरुद्ध टोकांचा मध्यबिंदु असल्यामुळें, तें एक प्रकारच्या समाधानवृत्तीनें पाळलें जातें. अन्यायी कृत्य करण्याची लोकांमध्यें दुर्बलता असल्यामुळें, न्यायाच्या तत्त्वाला मान्यता मिळते. पण ही मान्यता, न्यायाच्या चांगुलपणाबद्दल नसते. कारण बहुजनसमाजाचें मत असें आहे कीं, ज्याच्यामध्यें मर्दपणा आहे व अन्यायी बनण्याची ज्याच्यामध्यें कुवत आहे, असा मनुष्य एकमेकांनीं अन्यायाचें कृत्य करूं नये, असा करार करण्याइतका दुर्बल होणार नाहीं. सॉक्रेटिस, न्यायाचें स्वरूप व मूळ, ह्याविषयीं अशा तऱ्हेचें प्रचलित लोकमत आहे.

न्यायाचें आचरण लोक नाखुषीनें करतात व त्याचें कारण न्यायाचें उल्लंघन करण्याची त्यांच्यामध्यें ताकद नसते—ह्या माझ्या म्हणण्याची सत्यता, आपण पुढीलप्रमाणें कल्पना केली, तर ताबडतोब लक्षांत

येईल. न्यायी व अन्यायी मनुष्यांना मन मानेल तसें वागण्याला आपण पूर्ण मोकळीक देऊं व मग त्यांच्यावर लक्ष ठेवून, प्रत्येकाच्या मनाचा कल त्याला कुठें नेतो तें पाहूं. असें करीत असतांना, अन्यायी मनुष्याच्याच मार्गानें न्यायी मनुष्य प्रवास करीत आहे, असें आपल्याला आढळून येईल. कारण प्रत्येक प्राणिमात्राचें ठिकाणीं, स्वतःला चांगली वाटणारी अशी लोभी वृत्ति असून, ती सफल करण्याचा तो साहजिक प्रयत्न करीत असतो आणि ही स्वाभाविक प्रवृत्ति, केवळ कायद्याच्या आणि समानतेच्या तत्त्वांनींच दाबली जात असते. प्राचीन काळीं, लिडियाचा राजा क्रीसस याचा पूर्वज गिजीस, याचेजवळ जी शक्ति होती, ती शक्ति जर न्यायी व अन्यायी मनुष्यांना दिली, तर आचारांचें स्वातंत्र्य त्यांना पूर्णपणें अनुभवतां येईल. ती कथा अशी आहे. लिडियाच्या अधिष्ठित राजाच्या नोकरीमध्यें, गिजीस नांवाचा एक धनगर होता. एके दिवशीं मोठें जबरदस्त वादळ होऊन पाऊस पडला आणि जमीन धरणीकंपानें दुभंगून जाऊन, तो मेंढरें चारीत होता त्याठिकाणीं एक मोठा खड्डा पडला. ह्या चमत्काराचें आश्चर्य करीत तो त्या खड्डयांत शिरला. तेथें त्यानें इतर आश्चर्यकारक वस्तूंमध्यें खिडक्या असलेला एक पोकळ पितळी घोडा बघितला. त्यानें आंत जाऊन पाहिलें, तों त्याला मानवी प्राण्यापेक्षां मोठ्या आकाराचें एक प्रेत दिसलें. त्या प्रेताच्या हातांत फक्त एक सोन्याची आंगठी होती, तेवढी घेऊन तो बाहेर पडला. नंतर मेंढरांच्या कळपांचा मासिक अहवाल, राजाकडे पाठविण्याकरितां जेव्हां धनगरांची सभा भरली, तेव्हां इतर धनगरांबरोबर तो हातांत आंगठी घालून सभेला गेला. इतर मंडळींबरोबर तो बसला असतांना, आपल्या हाताच्या आंतल्या बाजूस खड्यानें कोंदण येईपर्यंत, त्यानें ती आंगठी फिरविली. त्याबरोबर
Steph 360 तो शेजाऱ्यांना अदृश्य झाला आणि तो जणूं कांहीं निघून गेला आहे, अशा प्रकारें त्याच्याबद्दल ते बोलूं

लागले. आंगठीच्या ह्या प्रभावाबद्दल तो आश्चर्य करीत असतां, त्यानें पुनः आपली आंगठी उलट फिरविली. खड्याचें कोंदण बाहेरच्या बाजूस झाल्याबरोबर, तो पुनः दृश्यमान झाला. हा चमत्कार पाहून, त्यानें आंगठीच्या प्रभावाची बरेच वेळां प्रचीति पाहिली. त्याला दिसून आलें कीं, कोंदण आंतल्या बाजूला ओढलें म्हणजे तो अदृश्य होई व बाहेरच्या बाजूस ओढलें म्हणजे तो दृश्य होई. हा शोध लागल्यावर, त्यानें राजाकडे अहवाल पोंचविणारा जासूद म्हणून आपली तावडतोब नेमणूक करून घेतली. मग तेथें जाऊन त्यानें राणीला वश करून घेतलें. नंतर तिच्याबरोबर संगनमत करून त्यानें राजाला ठार मारलें व त्याचें सिंहासन बळकावलें.

जर अशा दोन आंगठ्या अस्तित्वांत असल्या आणि जर न्यायी व अन्यायी मनुष्यांनीं त्यांचा उपयोग केला, तर असें दिसून येईल कीं, मोहाचा प्रतिकार करून कोणीही न्यायाचा अवलंब करणार नाहीं. बाजारांत जाऊन, निःशंकपणें मन मानेल तें घेण्याची मुभा असतां, कोणीही आपल्या शेजाऱ्याच्या मालमत्तेला धक्का न लावण्याचा निश्चय करणार नाहीं. कोणाच्याही घरांत शिरून, कोणाबरोबरही संभोग करतां येण्यासारखा असतां अथवा कोणालाही ठार मारणें अथवा तुरुंगातून सोडवणें शक्य असतां अथवा देवाप्रमाणें कांहींही करतां येण्यासारखें असतां, कोणीही अशा मोहापासून अलिप्त राहणार नाहीं. अशा तऱ्हेनें, आपल्या इच्छांची पूर्ति करीत असतांना, न्यायी मनुष्य अन्यायी मनुष्याप्रमाणेंच वागेल आणि दोघेही एकच मार्ग आक्रमीत असतील. खरोखरच हा एक बळकट पुरावा आहे. ह्यानें असें सिद्ध होतें कीं, कोणीही आपखुषीनें न्याय्य वर्तन करीत नसून, नाखुषीनें करतो. कारण न्यायी असणें, हें व्यक्तीच्या हिताचें नसतें आणि कोणताही प्रतिबंध नसला म्हणजे सर्व लोक न्यायाचें उल्लंघन करतात. तसेंच, प्रत्येकाला असें वाटतें कीं, आपल्यापुरता अन्याय

करणें, हें न्यायापेक्षां फायदेशीर आहे; आणि असें वाटणें योग्य आहे, हें ह्या तत्त्वाच्या पुरस्कर्त्यालाही कबूल करावें लागेल. अशी स्वैरपणें वागण्याची परवानगी असतांना, अन्यायी कृत्य एखाद्यानें केलें नाहीं अथवा दुसऱ्याच्या मालमत्तेला स्पर्श केला नाहीं, तर तो मूर्ख व कींव करण्यासारखा प्राणी आहे, असें लोक मनांत म्हणतील; पण अन्यायानें आपणांस वागविलें जाऊं नये, ह्याकरितां वरकरणीं ते एकमेकांच्या समोर अशा मनुष्याची स्तुतीच करतील. ह्याविषयीं एवढें विवेचन पुरे.

परंतु न्यायी व अन्यायी मनुष्यांच्या आयुष्यक्रमांबद्दल निर्णय करतांना, जर आपण पूर्ण न्यायी व पूर्ण अन्यायी अशा मनुष्यांची तुलना केली, तरच बरोबर निर्णय होईल. म्हणून आपण पुढीलप्रमाणें तुलना करूं या. अन्यायी मनुष्याच्या अन्यायीपणांत अथवा न्यायी मनुष्याच्या न्यायीपणांत, कांहींएक कमतरता नसून दोघेही आपआपल्या आचारपद्धतींत पूर्ण आहेत, असें समजूं या. अन्यायी मनुष्यानें निष्णात कारागिराप्रमाणें वागलें पाहिजे, हें उघड आहे. कारण उत्तम तांडेलाला अथवा वैद्याला आपल्या कलेमध्यें व्यवहारोपयोगी कोणतें आहे व कोणतें नाहीं, हें समजत असतें. आणि म्हणून व्यवहारोपयोगी गोष्टी तो करीत असतो व अव्यवहार्य गोष्टी टाळीत असतो. तसेंच, जर एखादें वेळेस त्याच्या हातून चूक झाली असली, तर ती त्याला निस्तरतां येते. अशाच प्रकारें, अन्यायी मनुष्यही आपल्या अन्यायी कृत्यांच्या कामगिरीमध्यें चुका करीत नाहीं आणि पकडला जात नाहीं, असें आपण समजलें पाहिजे. जर तो पकडला गेला तर तो अडाणी असला पाहिजे. कारण न्यायी नसतांनाही न्यायी आहोंत असें दाखविणें, हीच अन्यायाची पराकाष्ठा आहे. तेव्हां पूर्ण अन्यायी मनुष्य परमावधीच्या अन्यायानें वागत आहे, असें आपण धरूं या. शिवाय त्याचेविषयीं असें गृहीत धरूं कीं, अन्यायाची अत्यंत वाईट कृत्यें करीत असूनही, न्यायीपणाबद्दल त्याची

Steph 361

मोठी ख्याती आहे. तसेंच, त्याच्या दुष्कृत्यांबद्दल त्याला जाब विचारण्यांत आला असतां, परिणामकारक भाषण करण्याची त्याच्याजवळ कला असल्यानें आणि धैर्य, शक्ति, मित्रमंडळ व पैसा, ह्या सर्वांचा जरूर पडेल तेथें त्याला उपयोग करतां येत असल्यानें, त्याच्या हातून झालेली चूक त्याला सांवरून घेतां येते, असें आपण समजलें पाहिजे. अशा अन्यायी मनुष्याच्या जोडीला, ऐंश्चिलसच्या मताप्रमाणें, बाह्य सद्वर्तनाचा नव्हे, तर खरोखरच सज्जन, सरळ व उदार, असा न्यायी मनुष्य बसविला पाहिजे. त्याच्या बाह्य वर्तनांतील न्यायीपणा आपण बाजूला काढला पाहिजे. कारण तो न्यायी आहे असें कळलें, म्हणजे त्याची कीर्ति होते व त्यामुळें त्याला मान व देणग्या मिळतात आणि मग त्याचा न्यायीपणा न्यायाच्या प्रीतीमुळें असतो, कीं मान व देणग्या ह्यांच्या प्रीतीमुळें असतो, हें ठरविणें कठीण जातें. न्यायी मनुष्यापासून न्यायाखेरीज सर्व काढून घेतलें पाहिजे. आणि अन्यायी मनुष्याच्या उलट त्याची स्थिति आहे, असें धरलें पाहिजे. अन्यायाचें एकही कृत्य न करतां, अन्यायी म्हणून त्याची वाईट कीर्ति आहे, असें समजलें पाहिजे. कारण ह्यामुळें त्याचा सद्गुण कसोटीला लागून, दुष्कीर्ति व तिचे परिणाम ह्यांच्याशीं तो कशी टक्कर देतो हें दिसेल. तसेंच, मरेपर्यंत जरी तो न्यायानें वागत असला, तरी तो अन्यायी आहे, अशीच त्याची सदैव दुष्कीर्ति आहे, असें आपण गृहीत धरलें पाहिजे. अशा तऱ्हेनें, न्यायाच्या व अन्यायाच्या अंतिम मर्यादेपर्यंत दोघांना आणल्यावर, न्यायी व अन्यायी ह्या दोघांपैकीं अधिक सुखी कोण, हें आपणाला ठरवितां येईल.

सॉक्रे०:—शाबास ग्लॅकान्! तुम्ही किती जोरदारपणें आपलें म्हणणें पुढें मांडलें आहे. जणू कांहीं रेखलेल्या स्वरूपाचे दोन पुतळे

---

1 Seven against Thebes 574

आमच्या पुढें तुम्ही ठेवले आहेत व आतां आम्हांला त्यांच्यामधील तरतम भाव ठरवावयाचा आहे !

ग्लॅकान्‌०:—माझ्या शक्तीप्रमाणें मी वर्णन केलें आहे. असो. न्यायी व अन्यायी मनुष्यांचें वर्णन केल्यावर, मला वाटतें, त्यांचें पुढील आयुष्य कसें होतें, हें वर्णन करण्यांत अडचण येणार नाहीं. म्हणून मी आतां त्या वर्णनास सुरवात करतों. सॉक्रेटिस, वर्णन जर ओबड-धोबड झालें, तर तें माझें नसून, अन्यायाची महति न्यायापेक्षां अधिक आहे, असें मत असणाऱ्यांकडूनच तसें वर्णन केलें जात आहे, असें समजा. तें असें म्हणतात कीं, अशा

Steph 362 परिस्थितींत न्यायी मनुष्याला मारणें, खोड्यांत टाकणें, बांधून ठेवणें, त्याचे डोळे भाजून काढणें, इत्यादि शिक्षा केल्या जातात आणि अशाप्रकारें त्याला छळण्यांत येऊन, शेवटीं त्याला फांसावरही चढविलें जातें. म्हणून खऱ्या न्यायीपणापेक्षां दिखाऊ न्यायीपणाच बरा, असें न्यायी मनुष्याला कळून येईल. एश्चिलसचे शब्द न्यायी मनुष्यापेक्षां अन्यायी माणसालाच जास्त लागू पडतात. कारण अन्यायी मनुष्यच खऱ्या अन्यायाला अनुसरून वागत असतो. नुसत्या दिखाऊ अन्यायीपणानें नव्हे, तर खऱ्या अन्यायीपणानें वागण्याचा निश्चय करून, तो दांभिक आचरण करीत नाही.

१ "त्याचें मन ही एक खोल व सुपीक जमीन असल्यामुळें त्यामध्यें शहाणपणाच्या योजना सहज रुजतात व त्यापासून खूप पीक येतें." न्यायीपणाच्या कीर्तीमुळें अधिकाराच्या जागा त्याला मिळतात. वाटेल त्या स्त्रीशीं त्याला लग्न करतां येऊन, पसंत पडेल त्या घराण्यांत आपल्या मुलांचे शरीरसंबंध जुळवितां येतात. तसेंच, स्वतःच्या पसंतीप्रमाणें कोणाबरोबरही करार व भागीदारी करतां येते. शिवाय लबाडी करण्यास त्याला दिक्कत वाटत नसल्यामुळें, त्याला पुष्कळ फायदे मिळवितां येऊन

1 Seven against Thebes 574.

श्रीमंत होतां येतें. जेव्हां प्रतिपक्षाबरोबर त्याचा खाजगी अथवा सार्वजनिक सामना सुरू होतो, त्यावेळेस शत्रूंचा पाडाव करून तो श्रीमंत होतो आणि आपल्या मित्रांचें कल्याण व शत्रूंचें अनहित करण्यास समर्थ होतो. तसेंच, बड्या थाटांत यज्ञ करून देवांना तो पुष्कळ देणग्या देऊं शकतो. अशा रीतीनें, देवांना व त्याला वाटतील त्या लोकांना प्रसन्न ठेवतां आल्यामुळें, न्यायी मनुष्यापेक्षां अन्यायी मनुष्य देवांना प्रिय होण्याचा अधिक संभव असतो. सॉक्रेटिस, म्हणून लोक असें म्हणतात कीं, न्यायी मनुष्याच्या आयुष्यापेक्षां अन्यायी मनुष्याचें आयुष्य अधिक चांगलें करण्याची तजवीज देवांकडून व मानवांकडून केली जाते.

ग्लॅकान्‌चें असें भाषण झाल्यावर, उत्तर काय द्यावें ह्याचा मी विचार करीत असतां, त्याचा भाऊ ॲडिमेन्टस् उद्गारला, "सॉक्रेटिस, वरील तत्व समाधानकारक रीतीनें स्पष्ट झालें आहे, असें तुम्हांला वाटतें काय?"

सॉक्रे०:—होय वाटतें. पण तुम्हांला अधिक कांहीं सांगावयाचें आहे काय?

ॲडि०—होय. कारण मुख्य मुद्दाच मांडावयाचा राहून गेला आहे.

सॉक्रे०:—तर मग "बंधूच्या मदतीला बंधु उभा राहो" ह्या लौकिक म्हणीप्रमाणें, तुम्ही त्याच्या प्रतिपादनांत जे दोष असतील ते भरून काढा. पण खरोखर, ग्लॅकान् जें म्हणाला, तें माझा पाडाव करण्यास पुरेसें असून, न्यायाच्या मदतीला धांवून जाण्यास मला असमर्थ करणारें आहे.

ॲडि०:—तुम्ही चेष्टेनें कांहींतरी म्हणतां झालें! कृपा करून पुढील मुद्याकडे तुम्ही लक्ष द्यावें. ग्लॅकान्‌च्या म्हणण्याविरुद्ध दुसरी बाजू अशी आहे कीं, जी न्यायाची स्तुति करून
Steph 363 अन्यायाची निंदा करते. ग्लॅकान्‌च्या म्हणण्याचा जो मी अर्थ समजतो, तो स्पष्ट होण्यास ती बाजू पुढें मांडली

पाहिजे. माझी अशी समजूत आहे कीं, आईबाप आणि इतर लोक, आपल्या मुलांना अथवा ज्यांच्याबद्दल त्यांना कळकळ वाटते अशा लोकांना, जेव्हां 'न्यायानें वागलें पाहिजे' असा उपदेश करतात, तेव्हां वस्तुतः ते न्यायाची स्तुति करीत नसून, न्यायापासून जी मान्यता मिळते त्या मान्यतेची स्तुति करतात. त्यांचा हेतु असा असतो कीं, त्यांच्या मुलांची ते न्यायानें वागणारे म्हणून कीर्ति व्हावी आणि त्यामुळें बढती मिळणें, चांगला लग्नसंबंध जुळणें व न्यायी मनुष्याला त्याच्या न्यायीपणाबद्दल ज्या इतर चांगल्या गोष्टी मिळतात, असें ग्लॅकान्नें नुकतेंच वर्णन केलें आहे त्याही मिळणें, हे फायदे व्हावेत. चांगल्या नांवापासून मिळणारे आणखीही फायदे आहेत, असें ते वर्णन करतात. हिजिअड व होमर कवी, सद्गुणी माणसाला ज्या असंख्य देणग्या देवाकडून मिळतात म्हणून वर्णन करतात, त्या देणग्या देवांचें आपल्याविषयीं चांगलें मत करून घेतलें असतां, मिळूं शकतात असें हे लोक समजतात. हिजिअड म्हणतो,

"देवांच्या कृपेनें, न्यायी मनुष्यांच्या ओक वृक्षांची शेंडें ओक-फळांनीं भरलीं जाऊन, वृक्षांच्या मध्यावर मधमाशांचे थवे जमतात आणि त्यांची मेंढरें लोंकरीच्या भाराखालीं दबलीं जातात." अशाच तऱ्हेच्या आणखीही चांगल्या गोष्टी देवांच्या कृपेनें त्यांना मिळतात. होमर म्हणतो, "सद्गुण व शहाणपण ह्या गुणांनीं देवतुल्य व निष्कलंक असा राजा, ज्याप्रमाणें न्यायीपणानें वागतो, तद्वतच असा मनुष्य वागतो. त्याच्या सुपीक जमिनी, यव व गहूं यांचें सपाटून पीक देतात. त्याच्या बागा फळांनीं भरलेल्या असतात. त्याची मेंढरेंही बहुप्रसवी असतात. समुद्रही त्याला विपुलतेनें मासे पुरवितो." म्युझिस आणि त्याचा पुत्र युमोलपस, हे न्यायी मनुष्यांना मिळणाऱ्या

---

1 Hesiod works and Days 231
2 Homer Odyssey XXX 109

देणग्यांचे जें वर्णन करतात, तें याहूनही आनंददायक आहे. मेजावानीच्या वेळीं न्यायी माणसांना, हेड्समध्यें म्हणजे मृतलोकामध्यें आणून, सद्गुणी माणसांशेजारीं कोचावर बसवितात व त्यांच्या डोक्यावर माळा घालून त्यांना मदिरापान करावयास लावतात. जगाच्या अंतापर्यंत मदिरापान करण्यास मिळणें, हेंच त्यांच्या मतें सद्गुणांचें बक्षिस असतें. ह्याच्यापुढेंही कांहीं लोक देवांनीं दिलेल्या बक्षिसांची संख्या वाढवितात. ते म्हणतात कीं, जो सद्गुणी असून आपल्या वचनाला जागला आहे, त्याच्या मुलाच्या मुलांना व वंशजांनाही अशाच प्रकारचें सुख मिळतें. न्यायाची अशा प्रकारें हे लोक मुक्तकंठानें स्तुति करतात. ह्याच्या उलट, वाईट व अन्यायी लोकांना ते हेड्समधील दलदलीत बुडवून टाकतात आणि चाळणींतून पाणी आणण्याची शिक्षा करतात. तसेंच, ते जिवंत असेपर्यंत त्यांची दुष्कीर्ति होईल असें करतात आणि ग्लॅकाननें आतां वर्णन केलेल्या ज्या शिक्षा न्यायी माणसांना ते अन्यायी म्हणून दुष्कीर्ति असल्यामुळें भोगाव्या लागतात, त्याच शिक्षा अन्यायी माणसांना भोगावयास लावतात. ह्यापेक्षां अधिक वर्णन त्यांच्यानें करवत नाहीं. एकाची स्तुति व दुसऱ्याची निंदा करण्याची अशी त्यांची पद्धत आहे.

Steph 364 सॉक्रेटिस, न्याय व अन्याय ह्याविषयीं बोलण्याची आणखी एक तऱ्हा, कवि व सामान्य लोकांमध्येंही जी दिसून येते, तिचाही आपण विचार केला पाहिजे. एकमुखानें सगळे म्हणतात कीं, नेमस्त व न्यायी असणें हें जरी निःसंशय अभिनंदनीय असलें, तरी कठीण व त्रासदायक आहे. ह्याच्या उलट, अनियमितपणा व अन्याय ह्यांपासून मिळणारीं सुखें आनंददायक व सहजप्राप्य असतात व तीं कायदा व सामाजिक मत यांमुळेंच निंद्य ठरविण्यांत आलेलीं असतात. पण ते म्हणतात कीं, प्रामाणिकपणा हा अप्रामाणिकपणापेक्षां कमी फायदेशीर असतो. दुष्ट लोक श्रीमंत अथवा

निवंध ६ ३० २/५

अधिकारी असले, म्हणजे खाजगी व सार्वजनिक रीतीनें त्यांचा सन्मान करून, त्यांना सुखी म्हणावयास असे लोक अनमान करीत नाहींत. ह्याच्या उलट, दुष्ट लोकांपेक्षां अशक्त व गरीब लोक 'चांगले' असतात, असें जरी ते कबूल करतात, तरीसुद्धां त्यांना तुच्छतेनें वागवून त्यांचा अपमान करतात. पण सर्वांत आश्चर्यकारक विधानें ते देवांबद्दल व सद्गुणांबद्दल करतात. ते म्हणतात, देवसुद्धां पुष्कळ चांगल्या लोकांना आपत्ती व दुःख भोगावयास लावून, उलट वाईट लोकांना सुख व आनंद भोगण्यास देतात. ढोंगी व भविष्य कथन करणारे लोक, श्रीमंत मनुष्याकडे जाऊन असें सांगतात, "महाराज! आम्हांला स्वर्गांतून एक शक्ति मिळालेली आहे. ह्या शक्तीच्या सहाय्यानें, मेजवान्या व नाचरंग ह्यांच्या समारंभांत देवांचा उत्सव करून मंत्र म्हटले असतां, स्वतः व पूर्वजांनीं केलेल्या अन्यायाचें परिमार्जन करतां येतें. महाराज! न्यायी अथवा अन्यायी मनुष्याचें आपणास नुकसान करावयाचें असल्यास, आम्ही थोडक्या खर्चांत करून देऊं. कारण कांहीं विशिष्ट मंत्र म्हणून, देवांना आमच्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं काम करावयास लावूं शकतों." त्यांच्या ह्या सर्व म्हणण्याला कवींचा आधारही ते दाखवितात. दुर्गुणांची सुसाध्यता दाखविण्याकरितां ते खालील अवतरणें देतात.

"ज्याला दुष्टपणा शोधावयाचा आहे त्याला तो जनसमूहामध्यें सुद्धां सहज सांपडूं शकेल. दुष्टपणाचा मार्ग सरळ असून त्याचें घर जवळच असतें. सद्गुण मात्र निढळाच्या घामानेंच मिळवितां येतो, असा ईश्वरी निर्णय आहे. आणि त्याचा रस्तासुद्धां लांब व चढणीचा आहे." तसेंच दुसरे कांहीं लोक, देवांनांही त्यांच्या हेतूपासून फिरवितां येतें, हें सिद्ध करण्याकरितां होमर कवीचा पुढील आधार देतात. देवसुद्धां प्रार्थनेनें वश होतात. म्हणून मनुष्यें जेव्हां दुसऱ्यांची आगळीक

---

1 Hesiod works and day 287.

2 Iliad IX 497.

व पापकृत्यें करतात, तेव्हां करुणस्वरानें देवांची प्रार्थना करून व त्यांना बलि, धूप व वितळणारी चरबी देऊन त्यांच्या रागाचें ते दयेंत रूपांतर करतात." शिवाय, सिलीन आणि म्युझिस
Steph ह्यांची मुलें म्हणून ज्यांना समजण्यांत येतें, असे म्युझिअस
365 व ऑरफ्यूस, ह्यांनी लिहिलेलीं धर्मविधींची पुष्कळ पुस्तकें ते दाखवितात. आणि ह्यांवरून कांहीं विशिष्ट यज्ञ व गूढविधि केले असतां, मनुष्य जिवंत असतांना व मेल्यावरही पापापासून मुक्त होऊन शुद्ध होतात, अशी व्यक्तींचीच नव्हे, तर सर्व शहरांची समजूत करून देतात. वरील प्रकार केले असतां, परलोकांतील दुःखापासून आपली मुक्तता होते, पण ते जर केले नाहींत तर भयंकर नाश होतो, अशी ते भीति घालतात.

माझ्या प्रिय सॉक्रेटिस, सद्गुण व दुर्गुण ह्यांना देव व मनुष्यें काय किंमत देतात, ह्याविषयीं अशा तऱ्हेचीं मतें जेव्हां पुनः पुनः उच्चारलीं जातात, तेव्हां चांगल्या व हुशार तरुण लोकांच्या मनावर काय परिणाम होत असेल बरें? ह्या तरुण लोकांना, उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणें सरासरीनें विचार करून, निष्कर्ष काढण्याची संवय असते. अशा तरुणांनीं, उत्तम तऱ्हेनें आयुष्य घालविण्याच्या हेतूनें, कोणता स्वभाव व मार्ग स्वीकारला पाहिजे, ह्याविषयीं काय अनुमानें काढावयाचीं? पिंडारच्या भाषेंत तरुण मनुष्य आपल्याशीं म्हणेल, "ज्या उंच ठिकाणाचा मला किल्ल्यासारखा जन्मभर उपयोग करतां येईल, अशा ठिकाणीं मी न्याय्य मार्गानें चढून जावें कां लबाडीच्या मार्गानें चढून जावें? कारण लोक असें म्हणतात कीं, न्यायी असूनही जर आपण न्यायी आहों अशी कीर्ति नसली, तर त्यापासून कांहीं एक फायदा होत नसून उलट नुकसान व त्रास होतो. पण अन्यायी असूनही, जर मी न्यायी आहे असा माझा लौकिक असला, तर खात्रीनेंच मला अवर्णनीय अशा सुखाचें आयुष्य लाभेल. तर मग, ज्याअर्थीं शहाणे लोक मला असें

सांगतात कीं, बाह्य देखावा अंतर्गत सत्याला मागें टाकणारा असून सुखाचा धनी असतो, त्याअर्थी दिखाऊपणालाच मी पूर्णपणें अनुसरलें पाहिजे. बाह्य देखाव्यासाठीं उपयुक्त असें सद्गुणाचें एक चित्र काढून तें माझ्या पुरोभागीं लावून, अरचिलोकस म्हणतो त्याप्रमाणें, लुच्चेगिरी व चपलता ह्यांचा पुतळाच, अशा कोल्ह्याचें चित्र पार्श्वभागीं ठेविलें पाहिजे. पण, "आपला दुष्टपणा नेहमीं झांकून ठेवणें, ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं."—असा आक्षेप येथें घेण्यांत येईल. त्याला उत्तर असें कीं, कोणतीही मोठी गोष्ट सोपी नसते. सुख हें जर आपलें ध्येय असेल, तर हाच मार्ग आपण अनुसरला पाहिजे, असा वरील वादाचा निष्कर्ष निघतो. वरील प्रकारच्या फसवणुकीला मदत करण्याकरितां आपण गुप्त मंडळें स्थापूं. ह्याशिवाय न्यायसभेचीं व लोकसभेचीं मनें जिच्यामुळें वळवितां येतात, अशी कला शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मदतीनें, चांगल्या वा वाईट प्रकारांनीं आपला हेतु आपण साधूं आणि निर्भयपणें अप्रामाणिक व्यवहार चालू ठेवूं. आणखीही असा आक्षेप घेण्यांत येतो कीं, आपणास देवांना फसवितां येणार नाहीं अथवा आपल्या म्हणण्याप्रमाणें करण्यास त्यांना भागही पाडतां येणार नाहीं. पण देव जर अस्तित्वांतच नसले अथवा असूनही मानवी प्राण्यांच्या व्यवहारांत ते लक्षच घालीत नसले, तर त्यांची काळजी करण्याचें आपणास कारण काय ? आणि जरी ते अस्तित्वांत असून आपल्याकडे लक्ष देणारे असले, तरीसुद्धां प्रचलित
Steph 366 दंतकथा व कवी, ह्यांच्याखेरीज आपल्याला त्यांच्याविषयीं ज्ञान नाहीं आणि हेच लोक आपल्याला असें सांगतात कीं, देवांची मनें, यज्ञ, नम्र प्रार्थना व नवसांच्या देणग्या, ह्यांच्या साहाय्यानें वळविलीं जातात. म्हणून आपल्याला दोन्हीही वर्णनें खरीं मानलीं पाहिजेत किंवा त्यांपैकीं एकही खरें मानतां कामा नये. जर त्यांच्यावर आपण विश्वास ठेवला, तर आपण अन्यायानें वागून

पापाच्या पैशांतून देवाना नवस करूं. कारण न्यायानें आपण वागलों, तर देवांकडून आपणास शिक्षा होणार नाहीं हें जरी खरें असलें, तरी अन्यायापासून होणाऱ्या फायद्यांना आपणांस मुकावें लागेल. जर आपण अन्यायानें वागलों, तर त्यापासून आपणास हे फायदे मिळतील. शिवाय आपण पापें व अपराध केल्यावर, देवांची प्रार्थना करून त्यांच्याकडून मिळणारी शिक्षा आपणास चुकवितां येईल. आपण येथें केलेल्या गुन्ह्यांची शिक्षा, आपल्याला किंवा आपल्या मुलांना हेड्समध्यें भोगावी लागेल, असा आक्षेप जरी घेण्यांत आला, तरी माझ्या मित्रा, ह्या प्रतिपादनाचे पुरस्कर्ते म्हणतील कीं, गूढ मंत्र व पापक्षालन करणाऱ्या देवता, ह्या फार शक्तिमान् असतात. बलाढ्य शहरें, देवांचे पुत्र असे कवी व प्रतिभासंपन्न द्रष्टे, ह्या सर्वांकडूनही आपणास असेंच सांगितलें जातें.

तर मग, आत्यंतिक अन्यायानें वागण्यापेक्षां न्यायानें वागणें चांगलें, असें सांगणारा कोणता मुद्दा शिल्लक रहातो ? जर आपण बाह्य शिष्टाचारासहित अन्याय करीत राहलों, तर आपणास पुष्कळ मोठ्या लोकांच्या म्हणण्याच्या आधारावर, देवांबरोबर व मनुष्यांबरोबर ह्या आयुष्यांत व पुढील आयुष्यांत मनाप्रमाणें वागतां येईल. बुद्धि, सौंदर्य, संपत्ति व कुलीनता, ह्यांनीं संपन्न असा मनुष्य, वरील गोष्टी विचारांत घेऊन न्यायाला कधीं मान देईल काय ? न्यायाची स्तुति चालली असतां, तो हंसल्याशिवाय राहील काय ? आम्हीं जें म्हटलें तें खोटें आहे, असें जर कोणी दाखवूं शकणारा असेल आणि न्यायच श्रेष्ठ असा विश्वास बाळगणारा असेल, तर तो खरोखर अन्यायी लोकांवर रागावण्याऐवजीं, त्यांचें वर्तन क्षम्यच समजेल. कारण त्याला माहीत असतें कीं, अन्यायाचा तिटकारा वाटणारे दैवी स्वभावाचे अथवा खरें ज्ञान प्राप्त झालेले, असे लोक सोडले असतां, कोणीही खुषीनें न्यायी नसतो. भित्रेपणा, वार्धक्य व इतर दौर्बल्य, ह्यांच्यामुळें अन्याय करण्याची

अंगांत धमक नसलेले लोकच अन्यायाची निंदा करतात. ह्या म्हणण्याची सत्यता, ह्या लोकांपैकीं एखाद्याला अधिकाराची जागा मिळाली असतां, अन्यायाचें कृत्य करण्यास तो ताबडतोब तयार होतो, ह्यावरून सिद्ध होते.

आणि साक्रेटिस्, मी आणि माझ्या भावानें, भाषणाचें सुरवातीस जें सांगितलें तेंच ह्या सर्वांचें कारण होय. न्यायाच्या पुरस्कर्त्यांनीं काय किंवा प्राचीन काळापासून तों आजतागायत ज्यांची कीर्ति ऐकिवांत आहे अशा वीर लोकांनीं काय, अशा सर्वांनीं न्यायाची स्तुति व अन्यायाची निंदा, न्यायापासून कीर्ति, मान व देणग्या मिळतात, ह्या मुद्यावरच केली आहे. पण प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यामध्यें वसत असणाऱ्या, न्याय व अन्याय ह्या तत्त्वांची स्वतंत्र शक्ति–जी देवांना व मानवानांही अदृश्य असते.–तिचें वर्णन काव्यांत व गद्यांत कधींही पूर्णपणें झालेलें नाहीं. अन्याय म्हणजे आत्म्याला लागलेला पापरूप कलंक व न्याय म्हणजे आत्म्याचा
Steph 367 पुण्यरूप टिळा होय, असें कोठेंही दाखविलेलें नाहीं. पहिल्यापासून जर तुम्ही अशी भाषा वापरली असती आणि लहानपणापासून आमचें मत तुम्ही असें बनविलें असतें, तर अन्याय करीत असतां पकडतां यावें, म्हणून आम्ही एकमेकांवर पहारा ठेवला नसता. कारण अन्याय केला असतां, आपल्या आत्म्याला पाप जडेल अशी भीति वाटून, प्रत्येकजण स्वतःचाच पहारेकरी झाला असता.

सॉक्रेटिस, न्याय आणि अन्याय ह्याविषयीं थ्रॅसिमाकस आणि इतर लोक, अशा प्रकारें व ह्यापेक्षांही अधिक जोरदार भाषेंत बोलतील व त्या बोलण्यानें न्याय व अन्याय ह्यांचें विकृत स्वरूप करून दाखवितील. मला तुमच्यापासून कांहीं लपवून ठेवावयाचें नाहीं. तुम्ही उलट बाजूचें कसें समर्थन करतां, हें ऐकण्याची माझी फार इच्छा असल्यामुळें, माझें

म्हणणें जितक्या जोरानें मला मांडतां येणें शक्य होतें, तितक्या जोरानें मी मांडलें आहे. म्हणून तुम्ही, न्याय हा अन्यायापेक्षां श्रेष्ठ आहे, एवढेंच प्रतिपादन न करतां, न्यायाचा व अन्यायाचा परिणाम मनुष्यावर कसाकसा होतो व तदनुरूप न्याय हा अनुग्रह कां वाटतो व अन्याय हा कलंक कां वाटतो हें सांगा. तसेंच ग्लॅकान्नें म्हटल्याप्रमाणें, न्याय व अन्याय ह्यांच्या लौकिकाचा विचार सोडून द्या. कारण जर ह्यांचा खरा लौकिक बाजूला सारून त्यांच्यावर तुम्ही खोटा लौकिक आरोपित केला नाहीं, तर आम्हीं असें म्हणूं कीं, तुम्ही न्यायाच्या सत्यस्वरूपाची स्तुति करीत नसून, त्याच्या बाह्य स्वरूपाची करीत आहांत व अन्यायाची वस्तुतः निंदा करीत नसून, त्याच्या बाह्यस्वरूपाची करीत आहांत. आणि लोकांकडून पकडलें जाईपर्यंत अन्यायानें वागणें, असा तुमचा उपदेश असून, न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित, अन्याय म्हणजे अशक्तांच्या हिताविरुद्ध स्वतःचें हित व फायदा, अशाप्रकारच्या थ्रॅसिमाकसच्या म्हणण्याप्रमाणें तुमचेंही मत आहे, असें आम्हीं समजूं. दृष्टि, श्रवणेंद्रिय, बुद्धि व आरोग्य इत्यादि वस्तु, केवळ फलदायी असतात म्हणून नव्हे, तर त्या स्वभावतःच चांगल्या असतात—अशा सद्वस्तूंच्या वर्गांत, न्यायाला ज्या अर्थीं तुम्हीं उच्च दर्जाचें स्थान देतां व न्याय केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच नव्हे तर केवळ न्यायाकरितांही मौल्यवान् होय असें समजतां, त्या अर्थीं न्यायी मनुष्याला न्यायामुळें स्वभावतःच फायदा काय होतो व अन्यायामुळें तोटा काय होतो, ह्या मुद्यावरच न्यायाची स्तुति तुम्ही केली पाहिजे. बक्षिसें व कीर्ति, ह्या मुद्यांवर न्यायाची स्तुति इतरांना करूं द्या. कारण न्याय व अन्याय ह्यांच्यापासून होणारे फायदे व तोटे, कीर्ति व अपकीर्ति, ह्या मुद्यांवर स्तुति व निंदा करण्याची पद्धत, इतर लोकांनीं स्वीकारलेली मला सहन करवेल, पण तुम्हीं स्वीकारलेली मला आवडणार नाहीं. कारण तुम्हीं आपलें सर्व आयुष्य, अशा प्रश्नांचीं उत्तरें

शोधण्यांत घालविलें आहे. म्हणून न्याय हा अन्यायापेक्षां चांगला आहे असें सिद्ध करण्यांत समाधान न मानतां, देवांना अथवा मनुष्य-प्राण्यांना दिसो वा न दिसो, न्याय व अन्याय असा कोणता परिणाम घडवून आणतात कीं ज्यामुळें मनुष्यप्राण्यांवर न्याय हा अनुग्रह व अन्याय हा अपकार वाटतो, तो दाखवा."

Steph 368 ग्लॅकान् व ॲडिमेंटस ह्यांच्या बुद्धीबद्दल मला नेहमींच फार आदर वाटत असे. पण ह्या वेळेस त्यांची भाषणें ऐकून मला फारच आनंद झाला. मी म्हणालों, "मेगाराच्या लढाईत तुम्ही प्रसिद्धीस आल्यानंतर, ग्लॅकान्च्या भाटानें आपल्या काव्यांत पहिल्याच ओळींत वर्णन केल्याप्रमाणें, तुम्ही खरोखरच स्तुतीस पात्र आहांत. तें वर्णन असें 'ॲरिस्टानच्या देवतुल्य पुत्रांनो! प्रसिद्ध पुरुषांचे तुम्ही खरे वंशज आहांत!' माझ्या मित्रांनों, ह्या तुमच्या वर्णनांत बरेंच सत्य आहे असें वाटतें. कारण अन्याय हा न्यायापेक्षां श्रेष्ठ नाहीं, अशी तुमची खात्री झाली नसूनही, तुम्ही त्याचें समर्थन इतक्या चांगल्या तऱ्हेनें करतां, ह्यावरून तुमचीं मनें खरोखरच देवतुल्य आहेत. तुमच्या सर्वसाधारण स्वभावावरून मी असें अनुमान काढतों कीं, तुमची अजूनही खात्री झालेली नाहीं. तुमच्या प्रतिपादनावरूनच जर ठरवावयाचें असलें, तर मी तुमच्यावर विश्वास ठेवतां कामा नये. पण मी जसजसा तुमच्यावर अधिक विश्वास ठेवीत आहें, तसतशी माझी बाजू कशी मांडावी, ह्याविषयीं मी गोंधळून जात आहे. थ्रॅसिमाकसला जें मी उत्तर दिलें, त्यांत न्याय हा अन्यायापेक्षां श्रेष्ठ आहे, असें मी दाखविलें होतें, असा माझा समज होता. पण तें उत्तर ज्याअर्थी तुम्ही असमाधानकारक समजतां, त्याअर्थी मी ह्या कामाला नालायक असून, मी कशी काय मदत करणार, हें मला समजत नाहीं. पण माझ्या शरीरांत प्राण व वाणींत बोलण्याची शक्ति असेपर्यंत, न्यायदेवतेला माझ्यादेखत वाईट म्हटलें जात असतांना,

घाबरून जाऊन तिला सोडून जाणें, मी भयंकर पाप समजतों. म्हणून माझ्या शक्तीप्रमाणें तिला मदत करणें, हेंच माझें कर्तव्य होय."

ह्यानंतर ग्लॅकान् आणि त्याच्या बरोबरीच्या इतर मंडळींनीं, मला न्यायदेवतेस मदत करण्यास सांगून, वादविवाद न थांबवितां, न्याय आणि अन्याय ह्यांच्या स्वरूपाविषयीं पूर्णपणें शोध करून, त्यांच्या विशिष्ट फायद्याविषयीं कोणतें तत्त्व खरें, हें ठरविण्यास विनंती केली. म्हणून मला जें वाटलें तें मी कळकळीनें सांगितलें.

सॉक्रे०:—आपण जी चर्चा चालविली आहे ती यःकश्चित् नसून, माझ्या मतें, तिच्याकरितां तीक्ष्ण बुद्धिमत्तेची जरूर आहे. मी हुशार बुद्धीचा नसल्यामुळें, मी वर्णन करतों त्या पद्धतीप्रमाणें चर्चा सुरू करावी, असें मला वाटतें. अशी आपण कल्पना करूं कीं, आपली दृष्टि विशेष चांगली नसून, आपणास बारीक अक्षरीं लिखाण लांब अंतरावरून वाचावयास सांगितलें आहे. तथापि आपल्यापैकीं एकास जर असा शोध लागला कीं, तेंच लिखाण मोठ्या अक्षरांत व मोठ्या जागेवर लिहिलेलें आहे, तर ही बातमी आपण मोठ्या सुदैवाची समजूं. कारण त्यामुळें, आपल्याला प्रथम मोठ्या अक्षरांचें लिखाण वाचावयास मिळेल व त्यानंतर लहान अक्षरांचें लिखाण वाचून, दोन्हीं एकच आहेत किंवा नाहींत, हें पाहतां येईल.

ॲडिमेंटस०:—खात्रीनेंच. पण साक्रेटीस, आपल्या न्यायाच्या चर्चेशीं ह्या दृष्टांताचा संबंध काय ?

सॉक्रे०: – मी सांगतों. व्यक्तीच्या मनांत न्यायाची जशी वस्ती असते, तशीच शहरांतही असते, असें आपण म्हणत नाहीं काय ?

ॲडि०:—होय. आपण म्हणतों.

सॉक्रे०: —शहर एका मनुष्यापेक्षां मोठें असतें ना ?

ॲडि०:—होय.

Steph 369 सॉक्रे०:—तर मग, न्याय हा कदाचित् अधिक प्रमाणांत मोठ्या विषयांत (म्हणजे शहरांत) रहात असल्यामुळें, त्याचा शोध लवकर होऊं शकेल. म्हणून जर तुमची इच्छा असेल, तर शहरांत आढळणारें त्याचें स्वरूप आपण प्रथम पाहूं या. नंतर तोच शोध व्यक्तीला लावून मोठ्याचें लहान प्रमाणांत स्वरूप पाहूं.

ॲडि०:—खरेंच. तुमची योजना मला चांगली वाटते.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या कल्पनाशक्तीनें शहराची जर क्रमवार रचना केली, तर त्यामध्यें आपल्याला न्याय व अन्याय ह्यांची वाढ दिसूं शकेल ना?

ॲडि०:—होय. कदाचित् दिसूं शकेल.

सॉक्रे०:—जर असें करतां आलें, तर आपल्या शोधाचा विषय लवकर दिसेल, अशीही आपणास आशा बाळगतां येणार नाहीं काय?

ॲडि०: – होय. पुष्कळच लवकर दिसेल.

साक्रे० – तर मग, आपल्या योजनेप्रमाणें आतां आपण प्रयत्न करावा ना? माझ्या मतें, हें लहानसहान काम नसल्यामुळें, तुम्ही ह्याचा चांगला पूर्ण विचार करावा.

ॲडि०:—आम्ही विचार केला आहे. तुम्ही प्रयत्न बेलाशक करा.

सॉक्रे०:—ठीक आहे. माझ्या मतें, मनुष्यांच्या गरजांवरच शहराची उभारणी होते. कारण कोणालाही स्वावलंबी होतां येत नाहीं. उलट प्रत्येकाच्या गरजाच पुष्कळ असतात. शहराच्या उत्पत्तीविषयीं निराळें कारण तुम्ही सांगू शकाल काय?

ॲडि०:—नाहीं. माझें म्हणणें तुमच्यासारखेंच आहे.

सॉक्रे०:—आपल्या गरजा पुष्कळ असल्यामुळें आणि प्रत्येक जणाला स्वतःच्या निरनिराळ्या गरजा भागविण्याकरितां दुसऱ्यांची मदत लागत असल्यामुळें, आपले मित्र व मदत करणारे लोक एकाच ठिकाणीं

असावे लागतात. ह्या एकत्र राहण्याच्या जागेला आपण शहर म्हणतों. असेंच ना ?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—प्रत्येकजण दुसऱ्याला कांहींतरी देतो व त्याबद्दल त्याच्यापासून कांहींतरी मोबदला घेतो. अशी देवघेव करतांना, 'आपण आपले हितच साधीत आहोंत,' असा प्रत्येकाचा विश्वास असतो.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आतां आरंभापासून आपण आपल्या काल्पनिक शहराची उभारणी करूं या. मला वाटतें, आपल्या स्वाभाविक गरजांच्या पायावरच शहराची उभारणी होईल.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—मनुष्यास जगण्याकरितां सर्वांत प्रथम व निकडीची अशी गरज म्हटली म्हणजे अन्नाची होय.

ॲडि०:—अर्थातच.

सॉक्रे०:—दुसरी गरज घराची व तिसरी कपडे वगैरे गोष्टींची.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, इतक्या गोष्टी शहराकडून पुरविल्या जाण्यास कोण लोक पुरेसे होतील, हें आपण समजून घेऊं या. शेतकरी, गवंडी व विणकरी अशांनींच आपण प्रारंभ केला पाहिजे ना ? एवढे लोक पुरतील काय ? अथवा चांभार व आपल्या शारीरिक गरजा पुरविणाऱ्या वर्गांपैकीं आणखी एकदोन लोक घालावेत काय ?

ॲडि०:—बेलाशक घाला.

सॉक्रे०:—तर मग, सर्वांत लहान असें शहर चारपांच लोकांचें होईल.

ॲडि०:—होय. असें आपणास दिसून येतें.

Steph 370 सॉक्रे०:—आतां ह्या लोकांपैकीं प्रत्येकानें आपलें काम वरील लोकांच्या संघापुढें ठेवावयाचें काय? उदाहरणार्थ, शेतकऱ्यानें चार जणांकरितां अन्नाची तजवीज करून व अन्नाच्या तयारीला लागणारा वेळ आणि श्रम चौपट खर्च करून इतरांबरोबर आपला वाटा घ्यावा काय? अथवा इतरांची काळजी न करतां, आपल्या स्वतःच्या $\frac{1}{4}$ अन्नाकरितां $\frac{1}{4}$ वेळ खर्च करून, इतर $\frac{3}{4}$ वेळ घर बांधण्यांत, कपडे करण्यांत आणि जोडे शिवण्यांत घालवावा व आपलें काम आपणच आणि आपल्याकरितांच करून, दुसऱ्यांच्या बरोबर वाटणी करण्याचा त्रास चुकवावा काय?

ॲडि०:—साक्रेटिस, पहिलाच मार्ग दुसऱ्यापेक्षां सोयीस्कर दिसतो.

सॉक्रे०:—होय आणि तो अशक्यही नाहीं. तुमचें उत्तर ऐकल्यावर मला आठवलें कीं, प्रथमतः कोणतीही दोन माणसें अगदीं एकमेकांसारखीं जन्माला येत नाहींत. उलट स्वाभाविक अशा देणगीमुळें प्रत्येकांत भिन्नता असते. एकाला एक काम जमतें, तर दुसऱ्याला दुसरें जमतें. तुम्हांला असें वाटत नाहीं काय?

ॲडि०:—होय वाटतें.

सॉक्रे०:—मनुष्याला उत्तम यश केव्हां मिळतें? पुष्कळ धंदे करण्यांत श्रम केले असतां अथवा एकाच धंद्याला पूर्णपणें वाहून घेतलें असतां?

ॲडि०:—एकाच धंद्यांत पूर्णपणें लक्ष घातलें असतांना.

सॉक्रे०:—शिवाय हेंही उघडच आहे कीं, कोणत्याही कामाचा योग्य काल मनुष्यानें घालविला कीं तो परत येत नाहीं.

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—कारण जें काम करावयाचें असतें, तें कर्त्याच्या लहरीप्रमाणें रेंगाळत रहात नाही. उलट कर्त्यानेंच, तें काम दुय्यम महत्त्वाचें न समजतां, त्याच्या नेहमीं पाठीस लागलें पाहिजें.

ॲडि०:—त्यानें असेंच केलें पाहिजे.

सॉक्रे०:—वरील विचारांवरून असें सिद्ध होतें कीं, प्रत्येक मनुष्य स्वतःच्या स्वभावानुसार असलेल्या धंद्यांत, योग्य वेळीं व इतर गोष्टींच्या फंदात न पडतां पूर्ण लक्ष घालील, तर सर्व वस्तु संख्येनें व गुणानें उच्च दर्जाच्या होऊन, थोडक्या वेळांत तयार करतां येतील.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, आपण वर्णन केलेल्या गरजा पुरविण्याकरितां चार लोकांपेक्षां अधिक लोक लागतील. कारण शेतकऱ्याला नांगर, कुदळ व शेतकीच्या धंद्याला लागणारीं इतर हत्यारें, चांगल्या प्रकारचीं करतां येणार नाहींत. तसेंच बांधकाम करणारा सुद्धां, त्याला लागणारीं असंख्य हत्यारें करूं शकणार नाहीं. हाच प्रकार चांभार व विणकर ह्यांच्या-संबंधानें म्हणतां येईल.

ॲडि०:—होय. खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून सुतार, लोहार आणि तशाच प्रकारचे इतरही कारागीर, आपल्या लहानशा राज्याकरितां लागतील आणि आपली लोकसंख्या वाढूं लागेल.

ॲडि०:—निःसंशय.

साक्रे०:—शेतकऱ्यांना, नांगरण्याकरितां बैल मिळावे, गवंड्यांना व शेतकऱ्यांना, शेताकरितां गाढवें पुरविलीं जावींत आणि विणकर व चांभार, ह्यांना लोंकर व चामडीं मिळावीं, म्हणून आपण गुराखी, धनगर व त्या वर्गांतील इतर लोक, शहरास पुरविले तरीसुद्धां तें मोठें होणार नाहीं.

ॲडि०:—हे सर्व लोक जमेस धरले असतां, तें लहान राज्य असेंही म्हटलें जाणार नाहीं.

सॉक्रे०:—शिवाय, बाहेरून माल आणण्याची गरज पडणार नाहीं, अशा जागेंत खऱ्या शहराची रचना करणें शक्य होणार नाहीं.

ॲडि०:—होय. शक्य होणार नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, शहराला लागणाऱ्या वस्तु बाहेरच्या शहरांतून आणण्याकरितां, आपल्याला दुसरा एक नवीन लोकांचा वर्ग लागेल.

ॲडि०:—होय.

Steph 371 सॉक्रे०:—आपल्या शहराला लागणाऱ्या वस्तु, ज्या लोकांकडून आपणास आणावयाच्या आहेत अशा लोकांकडे, त्याना लागणाऱ्या वस्तु बरोबर न घेतां, आपला अडत्या जर रिकाम्या हातानें गेला, तर त्याला रिकाम्या हातानेंच परत यावें लागणार नाहीं काय ?

ॲडि०:—होय. असें मला वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या शहरानें घरीं स्वतःपुरत्याच वस्तु उत्पन्न न करतां, आपल्याला ज्यांची गरज लागेल अशा लोकांच्या आवडीप्रमाणें व त्यांना पुरतील इतक्या वस्तु निर्माण केल्या पाहिजेत.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या शहराला शेतकरी व इतर कारागीर लोकांची जरूर जास्त लागेल.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—आणि शिवाय, निरनिराळ्या वस्तूंची आयात व निर्यात करण्याकरितां दलालही पुष्कळ लागतील. ह्या दलालांनाच व्यापारी म्हणत नाहींत काय ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आपल्याला व्यापारीही पाहिजेत.

ॲडि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—जर व्यापार जलमार्गानें करावयाचा असेल, तर नौकानयन विद्येंत निष्णात असलेल्या लोकांचीही बरीच गरज लागेल.

ॲडि०:—होय, असे पुष्कळच लोक लागतील.

सॉक्रे०:—पण आपल्या शहरांतच निरनिराळ्या मालाची ते कशी देवघेव करतील? ह्या व्यापाराची प्रगति करण्याच्या हेतूनेंच आपण लोकसंघ स्थापून राज्यही स्थापिलें.

ॲडि०:—विक्री व खरेदी करूनच ते देवघेव करतील.

सॉक्रे०:—ह्याकरितांच बाजाराची स्थापना होऊन, देवघेवीसाठीं हुंडणावळीची गरज भासेल.

ॲडि:—निःसंशय.

सॉक्रे०:—आतां कल्पना करा कीं, एखादा शेतकरी अथवा कारागीर आपला माल घेऊन बाजारांत आला; पण त्याचा माल घेऊन मोबदला देणारा कोणीही त्यावेळेस जर हजर नसला, तर आपला धंदा सोडून, त्यानें बाजारांत आळशीपणानें वेळ घालवीत बसावें काय?

ॲडि०—अर्थात् नाहीं. असे कांहीं लोक असतात कीं, जे अशा वेळीं गिऱ्हाइकी मिळवून देणाऱ्या अडत्याचें काम करण्याचें पत्करतात. आणि सामान्यपणें म्हणावयाचें म्हणजे, सुसंघटित राज्यांत, ज्या लोकांना इतर श्रमांचीं कामें करतां येत नाहींत, असे अत्यंत अशक्त लोकच अशीं कामें करावयास तयार असतात. त्यांचा धंदा म्हणजे बाजारांतील जागेवर हजर राहून, ज्यांना माल विकावयाचा आहे, त्यांना मालाचे पैसे द्यावयाचे आणि ज्यांना माल विकत घ्यावयाचा आहे, त्यांना माल द्यावयाचा.

सॉक्रे०:—अशा प्रकारच्या गरजेमुळें, आपल्या शहरांत किरकोळ मालाचा क्रयविक्रय करणारा वर्ग निर्माण होतो. कारण बाजारामध्यें उभे राहून क्रयविक्रयाची व्यवस्था करणाऱ्या माणसांना, आपण किरकोळ क्रयविक्रय करणारे व एका शहरांतून दुसऱ्या शहरांत जे हिंडतात, त्यांना व्यापारी म्हणत नाहीं काय?

ॲडि०:—होय. बरोबर आहे.

सॉक्रे०:—शिवाय कामकऱ्यांचा आणखी एक वर्ग आहे. त्यांच्याजवळ बुद्धिमत्ता नसल्यामुळें, जरी ते मदतनीस होऊं शकत नाहींत, तरी त्यांची शारीरीक शक्ति कष्टाचें काम करण्यास पुरेशी असते. असे लोक, आपल्या शक्तीच्या मोबदल्याची जी किंमत घेतात, तिला भाडें म्हणतात आणि म्हणूनच त्यांना भाडोत्री कामगार म्हणण्यांत येतें. असेंच ना?

ॲडि०:—होय. बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, भाडोत्री कामगार हा आपल्या राज्याचा एक पूरक वर्ग होय.

ॲडि०:—होय. मला असें वाटतें.

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस्, आपणाला असें म्हणतां येईल काय कीं, आपलें शहर आतां पूर्णपणें उभारलें गेलें आहे?

ॲडि०:—कदाचित् असें म्हणतां येईल.

Steph 372 सॉक्रे०:—न्याय आणि अन्याय आपणाला त्यांत कोठें सांपडतील बरें? आपण शहराच्या उभारणीला जीं आवश्यक तत्वें म्हणून विचारांत घेतलीं, त्यांपैकीं कोणत्या तत्वांबरोबर त्यानीं प्रवेश केला?

ॲडि०—मला कल्पना करतां येत नाहीं. पण कदाचित् वर वर्णिलेल्या मनुष्यांच्या परस्पर संबंधांत त्यांचें अस्तित्व सांपडेल.

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें कदाचित् बरोबर असेल. आपण कच न खातां अधिक संशोधन केलें पाहिजे.

आतां ह्या लोकांची अशी व्यवस्था लावून दिल्यावर, ते कशा तऱ्हेनें आयुष्य घालवितील, ह्याबद्दल आपण विचार करूं. मला वाटतें, ते धान्य, दारू, कपडे व पायतणें तयार करून आपलीं घरें बांधतील. उन्हाळ्यांत, अंगांत आंगरखा व पायांत पायतणें न घालतां ते कामें करतील, परंतु हिंवाळ्यांत योग्य कपडे व

व पायतणें वापरतील. जव व गहूं ह्यांच्या पिठाच्या पोळया व पुऱ्या भाजून त्यावर आपली उपजीविका करतील, गवताच्या चटयांवर अथवा स्वच्छ पानांवर चांगल्या पुऱ्या व पोळया पसरून, यू व मर्टल झाडांच्या फांद्यांच्या आसनावर बसून, आपल्या मुलांबाळांसह आनंदानें भोजन करतील. गळयांत माळा घालून, मदिरापान करून, ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रें गुणगुणत एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेतील व युद्ध अथवा दारिद्र्य ह्यांच्या भीतीनें आपल्या आर्थिक शक्तीबाहेर प्रजोत्पादन न करण्याची काळजी घेतील.

ग्लॅकान्नें मध्येंच मला थांबवून म्हटलें, "भाकरीला चव आणणारें कांहींएक नसतांही तुमचे लोक मजा करीत आहेत, असें तुम्ही वर्णन करता !"

सॉक्रे०:—खरेंच मी विसरलों ! मीठ, ऑलिव्ह फळें, चीज व खेडेगांवांत मिळणारे उकडलेले कांदे आणि कोबी, हे अन्नाला रुची आणणारे पदार्थही त्याना मिळतील. तसेंच अंजीर, वाटाणा, घेवडा, त्याना जेवणानंतरच्या मुखशुद्धीकरितां खाण्यास मिळतील. शिवाय निखाऱ्यांवर मर्टल व बीच फळें भाजून तीं खाण्यास व त्याबरोबर नेमस्तपणानें दारू पिण्यास त्याना मिळेल. अशाप्रकारें, शांततेनें व चांगल्या आरोग्यानें दिवस काढून, ते बहुतकरून पुष्कळ वर्षें जगतील आणि स्वतःप्रमाणेंच आपल्या मुलांना सुखाचें आयुष्य लाभावें, अशी व्यवस्था करून ते इहलोकची यात्रा संपवतील.

ह्यावर ग्लॅकान् उद्गारला, "सॉक्रेटिस, ज्या अर्थी तुम्ही अशा प्रकारच्या अन्नाची व्यवस्था करीत आहांत, त्याअर्थी तुम्ही डुकरांचा संघ स्थापीत आहां, असें मला वाटतें."

सॉक्रे०:—ग्लॅकान्, तुमच्या मतें त्यानीं कसें रहावें ?

ग्लॅकान्०:—सुधारलेल्या आयुष्याला साजेल अशा रीतीनें. जर त्यांना कष्टाचें आयुष्य घालवावयाचें नसेल, तर कोचाला टेकून बसून

टेबलावर त्यांनीं जेवण घेतलें पाहिजे आणि आधुनिक पद्धतीप्रमाणें त्यांचें जेवण व जेवणानंतरचा फलाहार असला पाहिजे.

सॉक्रे०:—ठीक आहे. मला समजलें. केवळ साध्या शहराची वाढ आपण विचारांत न घेतां, विलासी शहराचाही विचार करावा, असें तुमचें म्हणणें दिसतें. ही तुमची सूचना कांहीं वाईट नाहीं. कारण अशा मोठ्या प्रमाणांत विचार केल्यावर, न्याय व अन्याय ह्यांचें मूळ कसें रुजतें, हें आपणास शोधतां येईल. आपण आतांच वर्णन
Steph केलेलें शहर, माझ्या मतें, अस्सल व आरोग्यसंपन्न आहे.
373 परंतु विलासी शहराचा विचार करण्यास जर तुम्ही सांगत असाल, तर माझी कांहीं हरकत नाहीं. असें दिसतें कीं, कांहीं लोकांना आपण वर्णन केलेल्या साध्या आयुष्यांत समाधान वाटणार नाहीं. त्याना कोचें, टेबलें व इतर सामान ह्यांची जरूरी भासेल. तसेंच त्याना विविध प्रकारचीं व विपुल अशी सुवासिक तेलें, अत्तरें, वेश्या आणि मिठाई आवश्यक वाटतील. शिवाय, पहिल्या प्रथम आपण वर्णन केलेलीं घरें व पायतणें, हीं सुद्धां सामान्य गरज भागवणारीं अशीं चालणार नाहींत. आणि म्हणून चित्रकला व शिवण-कला ह्यांची जरूरी लागून, सोनें, हस्तिदंती सामान वगैरे सुंदर वस्तूही आपणास मिळवाव्या लागतील.

ग्लॅकान्०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आपलें शहर सुद्धां आपणांस वाढविलें पाहिजे. कारण आपलें पहिलें आरोग्यपूर्ण शहर पुरेसें होणार नाहीं. म्हणून शहराचा विस्तार वाढवावा लागून, नैसर्गिक गरजा भागविण्यास मुळींच जरूर नसलेले, असे असंख्य धंदे, त्यांत निर्माण करावे लागतील. उदाहणार्थ, पारधी लोक, रंग व आकृति ह्यांच्या सहाय्यानें प्रतिसृष्टि बनविणारे कलावंत, तसेंच गवई, कवि, आणि ज्यांचा कवि उपयोग करून घेतात असे असंबद्ध भाषण करणारे नट, नर्तक आणि

मक्तेदार, सर्व वस्तु निर्माण करणारे आणि स्त्रियांचे पोषाख तयार करण्यांत निष्णात असलेले लोक, त्याचप्रमाणें शिक्षक, दाया (सुख्या व ओल्या), कपडे शिवणाऱ्या बायका, न्हावी, स्वयंपाकी, मिठाईवाले इत्यादि लोक आपणास चाकर म्हणून लागतील. तसेंच, ज्या लोकांची आपणास पूर्वीच्या शहरांत जरूर नव्हती, अशा वडरांची आपणास ह्या शहरांत आवश्यकता वाटेल. आपणाला गुरें ढोरें सुद्धां पुष्कळ व सर्व प्रकारचीं ठेवावीं लागतील. कारण कांहींना त्यांचें मांस खावेंसें वाटेल.

ग्लॅकान्०:—अर्थात् आपणांस ठेवावीं लागतील.

सॉक्रे०:—तर मग, ह्या शहरांत पूर्वींच्या शहरापेक्षां वैद्य लोकांची गरज जास्त भासणार नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय खरेंच.

सॉक्रे०:—तसेंच, आपलें पूर्वींचें शहर लोकांना पुरेसें वाटत होतें, पण आतां तें फारच लहान व अपुरें वाटणार नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, कुरण व शेती, ह्यांना पुरेशी जमीन असण्याकरितां, आपल्याला शेजारच्या जमीनीचा तुकडा घ्यावा लागणार नाहीं काय ? तसेंच, आवश्यक वस्तूंच्या मर्यादेबाहेर शेजाऱ्यांनीं आपल्या गरजा वाढूं दिल्या व संपत्तीच्या अमर्याद सांठवणीकडे त्यांचे मन ओढलें गेलें, म्हणजे तेही आपल्याप्रमाणें दुसऱ्याच्या जमीनीचा तुकडा घ्यावयास लागतील.

ग्लॅकान्०:—साक्रेटिस, असें होणारच.

सॉक्रे०:—तर मग, ग्लॅकान्, युद्ध करणें हीच आपली पुढची पायरी होय, असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय. असेंच.

सॉक्रे०:—तूर्त, युद्ध करणें चांगलें किंवा वाईट ह्याविषयीं आपण चर्चा न करतां, एवढेंच म्हणूं कीं, आपण युद्धाच्या उत्पत्तीचीं कारणें

शोधून काढलीं आहेत आणि ह्याच कारणांमुळें राज्यांतील व्यक्तींवर व सर्व राज्यावर संकटें येत असतात.

ग्लॅकान्०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, आपल्या राज्यांत पुनः आणखी एका महत्वाच्या गोष्टीची म्हणजे सैन्याची भर घातली
Steph पाहिजे. ह्या सैन्यानें, राज्यांतील सर्व मालमत्तेचें व
374 आपण मघांशीं वर्णन केलेल्या लोकांचें रक्षण करण्याकरितां, स्वारी करणाऱ्या लोकांबरोबर युद्ध केलें पाहिजे.

ग्लॅकान्०:—कां ? आपण वर्णिलेले लोक रक्षण करण्यास समर्थ नाहींत काय ?

सॉक्रे०:—आपण राज्याची उभारणी करतांना, जीं तत्वें स्वीकारलीं आहेत तीं बरोबर धरलीं, तर ते समर्थ नाहींत, असेंच आपण म्हटलें पाहिजे. कारण आपण असें तत्व स्वीकारलें कीं, एकाच मनुष्याला पुष्कळ धंदे चांगल्या तऱ्हेनें करतां येणें शक्य नसतें.

ग्लॅकान्०:—खरें आहे.

सॉक्रे०:—युद्धाचा धंदा हा एक स्वतंत्र धंदा नव्हे काय ?

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०:—चांभाराच्या धंद्याविषयीं जितका आपण विचार करतों, तितका युद्धाच्या धंद्याविषयीं विचार करणें योग्य नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय. योग्य आहे.

सॉक्रे०—पण चांभाराला आपण असें बजावलें कीं, स्वतःचें काम उत्तम रीतीनें होण्यासाठीं, त्यानें शेतकरी, विणकरी अथवा गवंडी ह्यांचें काम करण्याचा प्रयत्नसुद्धां करतां कामा नये. तसेंच, प्रत्येक कामगाराला आपण त्याच्या नैसर्गिक आवडीप्रमाणें काम देऊन सांगितलें कीं, इतर गोष्टींकडे लक्ष न देतां, आपला सर्व वेळ, मिळत असलेली संधी न गमावतां, जर त्यानें काम केलें, तर त्यांत त्याला यशस्वी

कामगार म्हणून होतां येईल. युद्धाचें काम चांगल्या तऱ्हेनें होणें, हें अत्यंत महत्वाचें नाहीं काय ? जर बुद्धिबळें अथवा फांसे ह्यांसारख्या खेळांतही, लहानपणापासून विशिष्ट अभ्यास केल्याशिवाय केवळ विश्रांतीच्या वेळांत खेळून, कोणालाही प्राविण्य मिळवितां येत नाहीं, तर शेतकरी अथवा चांभार अथवा इतर धंदा करणारा कामगार, ह्यांना स्वतःचा धंदा सांभाळून, युद्धाचें काम यशस्वी रीतीनें करतां येईल, इतकें तें सोपें आहे काय ? जर इतर हत्यारें नुसतीं वापरून खरोखर मनुष्याला चांगला कामगार व मल्ल होतां येत नाहीं अथवा त्या हत्याराचें सामर्थ्य व व्यावहारीक उपयोग शिकल्याशिवाय, हत्याराचा मनुष्याला उपयोग करतां येत नाहीं, तर ढाल अथवा युद्धाचीं इतर शस्त्रें नुसतीं वापरतां आलीं, म्हणजे त्या मनुष्याला, त्याच दिवशीं, मोठ्या सैन्यांत अथवा लष्करी खात्यांत, आपलें काम उत्तम रीतीनें करतां येईल काय ?

ग्लॅकान्०:—हत्यारें नुसतीं वापरतां आल्याबरोबर, जर तीं युद्धाच्या कामांत निष्णात् करणारीं असलीं, तर तीं अमोलीकच समजलीं पाहिजेत !

सॉक्रे०:—तर मग, आपल्या संरक्षकांनीं ज्याप्रमाणांत असें महत्वाचें काम करावयाचें आहे, त्याप्रमाणांत त्यांना इतर धंद्यापासून मोकळीक मिळाली पाहिजे व युद्धांत असामान्य कौशल्य व अवधान त्यांनीं दाखविलीं पाहिजेत.

ग्लॅकान्०:- मला असेंच वाटतें.

सॉक्रे०:—ह्या विशिष्ट धंद्याला स्वाभाविक प्रवृत्तीची जरूर लागेल ना ?

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, राज्याच्या रक्षणाकरितां, तशा स्वाभाविक प्रवृत्तीचे लोक शोधून काढण्याचें काम आपणाला करावें लागेल.

ग्लॅकान्०: —होय.

सॉक्रे०:—आणि हें काम खात्रीनेंच क्षुल्लक नव्हे. तथापि, आपल्यामध्यें जोंपर्यंत शक्ति आहे, तोंपर्यंत माघार न घेतां, तें आपण केलें पाहिजे.

ग्लॅकान्०:—आपण माघार घेतां कामा नये.

Steph 375 सॉक्रे०:—रक्षण करण्याच्या कामाला लागणाऱ्या गुणांमध्यें चांगल्या अवलादीचा कुत्रा व शूर तरूण मनुष्य, ह्यांच्यात फरक आहे असें तुम्ही समजतां काय ?

ग्लॅकान्०—तुम्ही काय म्हणतां, तें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—त्या दोघांमध्यें शत्रूला हुडकून काढण्याची तत्परता व शोधल्यानंतर त्याच्यावर हल्ला करण्याची चपळता आणि शत्रू समोर आला असतां प्रतिकार करण्याची शक्तीही असलीं पाहिजेत, असें मला वाटतें.

ग्लॅकान्०:—अर्थात् हे सर्व गुण आवश्यक आहेत.

सॉक्रे०:—चांगलें लढतां येण्यासाठीं ते शूरही असले पाहिजेत.

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०—पण घोडा, कुत्रा अथवा दुसरा कोणताही पशु, अंगांत तेज नसूनही शूर असूं शकेल काय ? ज्या तेजामुळें प्रत्येक प्राणिमात्र, कसल्याही संकटप्रसंगीं निर्भय व अजिंक्य होऊं शकतो, असें तेज तुम्ही पाहिलें नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय. पाहिलें आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या संरक्षकांमध्यें शारिरीक गुण कोणते पाहिजेत, हें आपल्याला समजलें.

ग्लॅकान्०:—होय.

सॉक्रे०:—तसेंच मनाचे गुणही समजले. त्यांच्यामध्यें तेजस्विता पाहिजे.

ग्लॅकान्०: —होय.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, असा जर त्यांचा स्वाभाविक गुणधर्म असेल, तर ते एकमेकांशीं व शहरवासीयांशीं दंडेलीनें वागणार नाहींत, असें केलें पाहिजे ना ?

ग्लॅकान्०:—खरोखर, ही अडचण दूर करणें कठीण आहे.

सॉक्रे०:—तथापि मित्रांशीं साधेपणानें त्यांनीं वागलें पाहिजे व फक्त शत्रूंनाच त्यांनीं तापदायक झालें पाहिजे. नाहींतर शत्रूंकडून नाश होण्याची वाट न पाहतां ते स्वतःचाच प्रथम नाश करतील !

ग्लॅकान्०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तर आपण काय करावें ? सभ्य व तेजस्वी असा स्वभाव आपणास कोठें सांपडेल ? सभ्य स्वभाव तेजस्वी स्वभावाच्या विरुद्ध असत नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—तथापि, ज्या मनुष्यांत सभ्यपणा व तेज नाहीं, तो चांगला संरक्षक होऊं शकणार नाहीं. आणि ज्याअर्थी ह्या दोन गुणांचें साहचर्य असण्याचा संभव नाहीं, त्याअर्थी चांगला संरक्षक असणेंही अशक्यच आहे.

ग्लॅकान्०:—असें दिसतें.

ह्या ठिकाणीं मी गोंधळून गेलों. परंतु संभाषणाचा पुनः विचार करून मी म्हटलें, " माझ्या मित्रा, आपण जें उदाहरण म्हणून घेतलें तें सोडून दिल्यावर, आपला गोंधळ झाला हें वाजवीच आहे.

ग्लॅकान्०:—कसें काय ?

सॉक्रे०:—अशा विरोधी गुणधर्मांचें मिश्रण असलेले स्वभाव असूं शकतात, हें आपल्या लक्षांत आलें नाहीं.

ग्लॅकान्०:—असें मिश्रण कोठें सांपडतें ?

सॉक्रे०:—पुष्कळ पशूंमध्यें तुम्हाला तें दिसून येईल. पण विशेषतः ज्या पशूची आपण आपल्या संरक्षकांबरोबर तुलना केली, तो ह्या मिश्रणाचें उत्तम उदाहरण होय. तुम्हाला माहीत असेल कीं, चांगल्या अवलादीचे कुत्रे मित्रांशीं व ओळखीच्या माणसांशीं अत्यंत नम्रपणानें वागतात, पण परक्यांशीं ह्याच्या उलट वागतात.

ग्लॅकान्०: – होय. मला माहीत आहे.

सॉक्रे०:—म्हणून आपल्या संरक्षकांचा असा स्वभाव असावा असा जो आपला प्रयत्न आहे, तो निसर्गाच्या विरुद्ध नसून अशक्यही नाहीं.

ग्लॅकान्०:—अर्थात्च नाहीं.

Steph 376 सॉक्रे०:—तर मग, जो उत्तम संरक्षक व्हावयाचा आहे, त्याचा स्वभाव तत्वज्ञानी व तेजस्वी असावा, असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

ग्लॅकान्:—मला तुमचें म्हणणें समजलें नाहीं.

सॉक्रे०:– पुढील आश्चर्यकारक गुण कुत्र्यामध्यें तुम्हाला दिसून येईल.

ग्लॅकान्०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—परक्या मनुष्यानें, कोणत्याही तऱ्हेनें त्याना चिडविलें नसतांही, कुत्रे त्याच्यावर रागावतात. परंतु ओळखीचा मनुष्य पाहिल्याबरोबर, त्याच्या दयाळूपणाचा कांहीं अनुभव नसतांही, ते त्याच्याशीं नम्रपणानें वागतात. हा प्रकार पाहून तुम्हाला कधीं आश्चर्य वाटलेलें नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—आतांपर्यंत मी इकडे लक्ष दिलें नव्हतें. पण ते अशा तऱ्हेनें वागतात, ह्यांत संशय नाहीं.

सॉक्रे०:—पण कुत्र्यामध्यें अशा प्रकारची उपजत प्रवृत्ति असणें, मनोरंजक असून खऱ्या तात्विकपणाची ती खूण आहे.

ग्लॅकान्०:—कशी काय ?

सॉक्रे०:—कारण मित्राचा चेहरा व शत्रूचा चेहरा, ह्यांमधील भेद ओळखण्याची त्याला एकच खूण माहीत असते व ती म्हणजे मित्रांविषयीं त्याला ज्ञान व शत्रूंविषयीं अज्ञान असतें. परिचित आणि परका, हें जो ज्ञान व अज्ञान ह्यांच्या साहाय्यानें ओळखतो, तो प्राणी ज्ञानाचा भोक्ता असल्याशिवाय कसा राहील ?

ग्लॅकान्०:—निःसंशय, तो ज्ञानाचा भोक्ता असला पाहिजे.

सॉक्रे०:—ज्ञानाची आवड व तत्वज्ञानाचा कल, हीं एकच नव्हेत काय?

ग्लॅकान्०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आपणाला मनुष्याविषयींही खात्रीनें असें म्हणतां येणार नाहीं काय, कीं ज्या मनुष्याला आपल्या ओळखीच्या माणसाशीं व नातेवाईकाशीं नम्र स्वभाव दाखवावयाचा आहे, त्याला ज्ञान व तत्वज्ञान ह्यांची आवड असली पाहिजे?

ग्लॅकान्०:—होय. असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या मतें असें ठरतें कीं, ज्या मनुष्याचा स्वाभाविक कल, राज्याचा उत्तम संरक्षक होण्याची पात्रता दाखवितो, तो मनुष्य तत्वज्ञानी, तेजस्वी, चपळ व सशक्त असला पाहिजे.

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेचा, संरक्षकांचा मूळ स्वभाव असला पाहिजे, हें आपण ठरविलें. पण आपण त्यांचें पालनपोषण व शिक्षण कसें करावें? राज्यांमध्यें न्याय व अन्याय ह्यांची वाढ कशी होते, असा जो आपल्या चर्चेचा मुख्य विषय आहे, त्याला वरील प्रश्नाच्या चर्चेची कांहीं मदत होईल काय? कारण आपल्या शोधनांत जें उपयुक्त असेल तें सोडावयाचें नाहीं व जें पाल्हाळिक असेल त्याचा विचार करावयाचा नाहीं, अशी माझी इच्छा आहे.

ग्लॅकान्चा भाऊ ह्यावर म्हणाला:-" ह्या शोधाचा विचार आपल्या मुख्य उद्देशाला मदत करील, असें वाटतें.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय ॲडिमेंटस, असें आहे तर वेळ लागला तरी आपण हा शोध सोडतां कामा नये.

ॲडि०:—खरोखर आपण सोडतां कामा नये.

सॉक्रे०:—फुरसतीच्या वेळीं गोष्टी सांगणाऱ्या लोकांप्रमाणें, आपण संरक्षकांच्या शिक्षणाचें वर्णन करूं या.

ॲडि०:—होय. करूं या.

सॉक्रे०:—शिक्षण कशा प्रकारचें असावें? शरीराला व्यायामाचें व मनाला × संस्कृतीचें ( Music ) शिक्षण देण्यांत यावें, असें अनुभवांतीं ठरलें आहे. ह्यापेक्षां आपणाला अधिक चांगल्या प्रकारचें शिक्षण क्वचित्‌च सांपडेल.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या शिक्षणक्रमाचा आरंभ सांस्कृतिक ज्ञानापासून आपण करावा ना?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ह्या ज्ञानामध्यें तुम्ही वर्णनात्मक वाङ्मयाचा समावेश कराल ना?

ॲडि०—होय.

सॉक्रे०:—अशा वाङ्मयाचे, खरें व काल्पनिक, असे दोन प्रकार आहेत.

ॲडि०:—होय.

Steph 377 सॉक्रे०:—आपल्या विद्यार्थ्यांना दोन्ही प्रकारच्या वाङ्मयाचें शिक्षण द्यावयाचें. पण काल्पनिक वाङ्मयाचें शिक्षण अगोदर द्यावयाचें ना?

ॲडि०:—तुमच्या म्हणण्याचा अर्थ मला समजला नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हाला माहीत आहे कीं, मुलांना आपण काल्पनिक गोष्टी सांगून, त्यांच्या शिक्षणास प्रारंभ करतों. ह्या गोष्टींत जरी कांहीं

× Music ह्याला प्रतिशब्द संगीत योग्य होणार नाहीं. प्लेटोनें Music हा शब्द, केवळ संगीताचें ज्ञान ह्या अर्थी वापरलेला नाहीं. तथापि Music ह्या शब्दांत संगीत ज्ञानाचा समावेश होतो. 'मनाच्या संस्कृतीला उपयुक्त असलेलें ज्ञान' असा व्यापक अर्थ ग्राह्य समजावा.

सत्य तत्वें असतात, तरी त्या गोष्टी सामान्यतः खोट्याच असतात. ह्या काल्पनिक गोष्टी व्यायामाचे शिक्षण देण्यापूर्वीच आपण त्यांना सांगतों.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—व्यायामाचें शिक्षण देण्यापूर्वी, सांस्कृतिक शिक्षण द्यावें, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होय.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तुम्हाला माहीत आहे कीं, प्रत्येक कार्यामध्यें, विशेषतः नाजूक व तरूण लोकांच्या बाबतींत, आरंभाचाच भाग महत्वाचा असतो. कारण त्या काळांत ज्या गोष्टी शिकविल्या जातात, त्या मनावर लवकर बिंबल्या जाऊन त्यांचें आकलनही जलद होतें.

ॲडि०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—आपण आपल्या मुलांना, वाटेल त्या ग्रंथकर्त्यांनीं लिहिलेल्या वाटेल त्या गोष्टी, कांहींएक आडकाठी न करतां, ऐकूं द्यावयाच्या काय ? आणि त्यामुळें तीं मोठीं झाल्यावर, त्यांच्या मनावर आपल्याला इष्ट असलेल्या मतांच्या विरुद्ध असलेल्या मतांचा परिणाम होऊं द्यावयाचा काय ?

ॲडि०:—नाहीं. आपण असें होऊं देतां कामा नये.

सॉक्रे०:—तर मग, कथालेखकांवर लक्ष ठेऊन, त्यांची चांगली कथानकें निवडून काढून वाईट टाकून देणें, हें आपलें कर्तव्य होय. मुलांची मनें शरीरापेक्षांही चांगली बनावीं, अशा हेतूनें निवड केलेलींच कथानकें, दायांनीं व आयांनीं आपल्या मुलांना शिकवावीं, असें आपण सांगूं. पण असें करतांना, हल्लीं चालू असलेल्या वाङ्मयांतील पुष्कळ कथानकें, आपणांस टाकून द्यावीं लागतील.

ॲडि०:—तुम्ही कोणतीं म्हणतां ?

सॉक्रे०:—मोठ्या आणि लहान गोष्टींचें सर्वसाधारण स्वरूप

एकच असल्यामुळें, मोठ्या गोष्टींतही आपणाला लहान गोष्टींचा नमुना पहावयास सांपडेल. तुम्हांला असें वाटत नाहीं काय ?

ॲडि०:—होय वाटतें. पण तुम्ही मोठीं कथानकें कोणतीं म्हणतां ?

सॉक्रे०:—हिजिअड, होमर आणि इतर कवी, जीं काल्पनिक वर्णनात्मक कथानकें आपणांस सांगतात, त्यांना मी मोठीं समजतों. कारण असलीं मोठीं कथानकें ह्याच लोकांनीं रचलेलीं आहेत व अजूनही तीं चालू आहेत.

ॲडि:—पण त्यांपैकीं कोणत्या कथानकांसंबंधीं तुम्ही म्हणतां व त्यांत तुम्हाला कोणता दोष दिसून येतो, हें मला सांगा.

सॉक्रे०:—कल्पित कथानकांत जर कांहीं सौंदर्य नसेल, तर पुढील दोषांमुळें त्याचा ताबडतोब व तीव्र निषेध केला पाहिजे.

ॲडि०:—असा दोष कोणता ?

सॉक्रे०:—देव व वीर पुरुष, ह्यांच्या स्वभावाच्या वाईट दृश्याचें वर्णन जेव्हां लेखक करतो, तेव्हां त्याचें वर्णन, एखाद्या चित्रकारानें वस्तुस्थितीशीं विसदृश असें चित्र काढावें त्याप्रमाणें होतें. माझ्या मतें हाच तो दोष होय.

Steph ॲडि०:—अशा दोषांचा निषेध करणें अगदीं बरोबर
378 आहे. पण तुमच्या म्हणण्याचा अर्थ, उदाहरणें देऊन स्पष्ट केलात, तर अधिक बरें होईल.

सॉक्रे०:—उरानस[1] कसा वागला व क्रोनसनें त्याचा सूड कसा घेतला, ह्याचें जें हिजिअडनें वर्णन केलें आहे. तें वर्णन म्हणजे कवीकडून मोठ्या विषयावर निरंकुश कल्पकतेनें वाईट व अत्यंत असत्य गोष्ट कशी रचली जाते, ह्याचा नमुना आहे. क्रोनसची[2] कृत्यें व त्याच्या मुलाची त्याच्याशीं वागणूक, ह्या गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी

1 Hesiod Theogony 154.
2 ,, ,, 459.

तरुण व विचारशून्य लोकांपुढें, कांहींएक मर्यादा न राखतां त्या वर्णन करणें, मला बरोबर दिसत नाहीं. उलट अशीं वर्णनें गाळून टाकणें, हेंच उत्तम होईल. अथवा जर कांहीं कारणाकरितां ह्या गोष्टी सांगणें जरूर असलें, तर डुकराच्या नव्हे तर क्वचित् मिळणाऱ्या अथवा फार किंमतीच्या श्वापदाच्या यज्ञप्रसंगीं, त्या मर्यादित श्रोत्यांसमोर गुपित गोष्टी म्हणून सांगण्यांत याव्यात.

ॲडि०:—निःसंशय, ह्या संतापजनक गोष्टी होत.

सॉक्रे०:—आणि म्हणून ॲडिमेंटस, आपल्या शहरांत त्या सांगितल्या जाऊं नयेत. मोठाले गुन्हे करणें म्हणजे विशेष कांहीं अपकृत्य करणें नव्हे, बापानें केलेल्या कृत्याबद्दल त्याचें कशाही रीतीनें शासन करणें म्हणजे अत्यंत श्रेष्ठ देवानें जसें केलें त्याचप्रमाणें करणें होय—अशा तऱ्हेचा उपदेश तरुणांना आपण करतां कामा नये.

ॲडि०:—अशा गोष्टींच्या अप्रयोजकत्वाबद्दल माझें तुमच्याप्रमाणेंच मत आहे.

सॉक्रे०:—तसेंच, आपल्या भावी संरक्षकांनीं एकमेकांबरोबर क्षुल्लक कारणांवरून भांडणें करणें लांछनास्पद आहे, असें जर आपणांस त्यांना शिक्षण द्यावयाचें असेल, तर देव एकमेकांच्या विरुद्ध कावेबाजपणानें लढतात व युद्ध करतात, असें वर्णन करणेंही योग्य नाहीं. राक्षसांच्या लढाया आणि देव व वीर पुरुष ह्यांचे आपसांतील कलहप्रसंग, हे वाङ्मय व चित्रकला ह्यांचे वर्ण्यविषय, आपण होऊं देतां कामा नये. जर संरक्षकांचें मन वळविण्याची शक्यता असेल, तर आपल्या बांधवांबरोबर भांडण करण्याचें पाप राज्यांत कोणीही केलेलें नाहीं, अशी भाषा पहिल्यापासून वृद्ध पुरुषांनीं व बायकांनीं आणि सर्व वडील माणसांनीं स्वतःच्या मुलांसमोर वापरली पाहिजे. आणि अशा भाषेंतच लिहिण्यास आपल्या कवींनाही आपण भाग पाडलें पाहिजे. हिराला स्वतःच्या मुलाकडून बांधण्यांत आलें—आईला (हिराला)

बाप मारीत असतां, हिफिइस्टनें आईची बाजू घेण्याचा प्रयत्न केला म्हणून स्वर्गातून त्याला फेंकून देण्यांत आलें—अशा तऱ्हेच्या देवांमध्यें होणाऱ्या लढाया होमरनें वर्णन केल्या आहेत. त्या रूपकात्मक जरी असल्या तरी आपल्या राज्यांत त्या मना केल्या पाहिजेत. कारण रूपक कोणतें व खरें कोणतें, हें मुलांना कळत नसतें. आणि जें कांहीं त्या वयांत श्रद्धेनें म्हणून स्वीकारलें जातें, तें पक्कें मनांत बसून वज्रलेप होतें. आणि म्हणूनच, ज्या गोष्टी मुलें प्रथम ऐकतात, त्या गोष्टी सद्गुणाला पूर्णपणें पोषक असतील, अशी निवड करणें अत्यंत महत्वाचें काम समजलें पाहिजें.

ॲडि०:—ह्या म्हणण्यांत तथ्य आहे. पण आपणास हीं कथानकें कोणतीं व अशा आदर्शरूप गोष्टी कोणत्या, असें जर कोणी विचारलें, तर काय उत्तर देतां येईल ?

Steph 379 सॉक्रे०:—माझ्या प्रिय ॲडिमेंटस, तूं आणि मी ह्या प्रसंगीं कवी नसून राज्याचे संस्थापक आहोंत. ज्या पद्धतीनीं कवींनी आपलीं कथानकें लिहिलीं पाहिजेत व ज्या पद्धतींपासून कवींनीं ढळतां कामा नये, त्या पद्धतींची संस्थापकांना माहिती असणें जरी आवश्यक असलें, तरी कथानकें सुद्धां त्यानींच लिहिलीं पाहिजेत, असा निर्बंध कोणासही घालतां येणार नाहीं.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. पण ईश्वरविषयक तत्वज्ञानाच्या ( Theology ) काय पद्धती असाव्यात ?

सॉक्रे०:—त्यांचें पुढीलप्रमाणें वर्णन करतां येईल. कवीनें महाकाव्य, भावपूर्ण काव्य अथवा नाट्यकाव्य जरी लिहिलें, तरी त्यांत ईश्वर जसा खरोखरी आहे, तसें त्याचें वर्णन केलें पाहिजे.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—ईश्वर वस्तुतः चांगला आहे, म्हणून त्याचें वर्णनही तसेंच केलें पाहिजे ना ?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जें चांगलें आहे, तें अपायकारक असतें काय ?

ॲडि०:—नाहीं.

सॉक्रे०:—जें अपायकारक नसतें, तें अपाय करतें काय ?

ॲडि०:--मुळींच नाहीं.

सॉक्रे०:--आणि जें अपाय करीत नाहीं, तें कांहीं वाईट करूं शकतें काय ?

ॲडि०:--अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:--आणि जें वाईट करूं शकत नाहीं, तें कोणत्याही वाईट गोष्टीचें कारण असूं शकेल काय ?

ॲडि०:—तें कसें असूं शकेल ?

सॉक्रे०:--जें चांगलें असतें, तें फायदेशीरही असत नाहीं काय ?

ॲडि०:--होय असतें.

सॉक्रे०:—तसेंच सुस्थितीचेंही तें कारण असत नाहीं काय ?

ॲडि०:—होय असतें.

सॉक्रे०:--सत् हें सर्व सदसत् वस्तूंचें कारण नसून फक्त सत्चेंच कारण असतें. कारण सत्पासून वाईट निर्माण होणें शक्यच नसतें.

ॲडि०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—तर मग, ज्याअर्थी ईश्वर चांगला आहे, त्याअर्थी तो लौकिक समजुतीप्रमाणें सर्व वस्तूंचें कारण होऊं शकत नाहीं. मानवी कारभाराच्या थोड्या भागाचाच तो जनक असून मोठ्या भागाचा तो जनक नसतो. वाईट गोष्टींची संख्या चांगल्या गोष्टींपेक्षां अधिक असते आणि चांगल्या वस्तूंचें जनकत्व ईश्वराकडेच असतें. वाईट गोष्टींचीं कारणें आपणाला ईश्वराखेरीज दुसरीकडे शोधलीं पाहिजेत.

ॲडि०:—हें पूर्ण सत्य आहे, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—होमर अथवा दुसऱ्या एखाद्या कवीनें, देवाविषयीं जर पुढीलप्रमाणें मूर्खपणाचें व चुकीचें वर्णन केलें, "झ्यूसनें आपल्या आंगणांत दोन माठ ठेविले असून, त्यापैकीं एकामध्यें चांगल्या गोष्टींचा व दुसऱ्यामध्यें वाईटांचा सांठा केलेला आहे" आणि "झ्यूस दोन्ही माठांचे मिश्रण करून ज्याला तें देतो, त्याला एक दिवस दुर्दैवाचा व एक दिवस अनुग्रहाचा अनुभवण्यास लावतो. पण ज्याला असें मिश्रण देण्याऐवजीं एकाच माठांतून दिलें जातें, त्याला वखवखलेली क्षुधा सर्व पृथ्वीवर पछाडित रहाते." अथवा "झ्यूस हा मनुष्यांच्या सुखदुःखांची वाटणी करणारा होय" तर अशीं वर्णनें आपणास नापसंत केलीं पाहिजेत. कोणी असें म्हणूं लागला, "पॅन्डारसनें ठरविलेल्या शपथा व तहनामे, ह्यांचें उल्लंघन अथिनी आणि झ्यूस ह्यांनीं करविलें" तर हें म्हणणेंही आपण निषिद्ध मानूं.

"देवांमधील भांडणें व स्पर्धा, थेमिस व झ्यूस ह्यांच्या प्रोत्साहनानें घडून आलीं," असें आपण म्हणूं द्यावयाचें नाहीं.

Steph 380 तसेंच, "जेव्हां ईश्वर एखाद्या घराचा नाश करण्यास प्रवृत्त होतो, तेव्हां त्या घरांतील मंडळींमध्यें अपराध व पाप ह्यांचें बिजारोपण करतो." अशा तऱ्हेचे, एश्चिलसचे शब्द, आपल्या तरुण लोकांना आपण ऐकावयास लावतां कामा नये. एश्चिलसनें आपल्या नाटकांत लिहिल्याप्रमाणें जर एखाद्या कवीनें नियोबीचीं दुःखें वर्णन केलीं अथवा पिलोप्सच्या घराण्यावर आलेलीं संकटें वर्णिलीं अथवा ट्रायवर आलेले दुःखप्रसंग वर्णिले अथवा अशाच तऱ्हेचे इतर प्रसंग वर्णन केले, तर त्या प्रसंगांचें कारण देव होता, असें आपण कवीला म्हणूं देणार नाहीं. पण वरील कृत्यांचा कारण ईश्वर आहे, असें जर कवीला म्हणावयाचें

1 Iliad XXIV 527. 2 Iliad XX 69, 3 Iliad XX. 4 In a lost tragedy.

असेल, तर त्यानें आपण शोधित असलेल्या उपपत्तीप्रमाणें उपपत्ति दाखविली पाहिजे. त्यानें असें म्हटलें पाहिजे कीं, ईश्वरानें जें केलें तें न्याय व चांगलें असून, शिक्षा झालेल्या लोकांचें, अशा शिक्षेनें कल्याणच झालें. पण ज्या शिक्षेनें शिक्षा केलेला मनुष्य दुर्दैवी झाला, अशा शिक्षेचा कर्ता ईश्वर होय, असें आपण कवीला म्हणूं देणार नाहीं. दुष्ट लोक शिक्षेस पात्र असल्यामुळें, ते दुर्दैवी होत आणि ईश्वराकडून शिक्षा झाली असतां त्यांचा फायदाच होतो, असें जर कवीनें म्हटलें तर आपण विरोध करणार नाहीं. पण सत्स्वरूपी ईश्वर, कोणाच्या वाईटाचा कर्ता आहे, असें जर कोणी म्हटलें, तर निश्चयानें त्याचा आपण प्रतिकार करूं. अशा विकृत तत्वांचीं कथानकें, सुसंघटीत राज्यामध्यें वृद्धांनीं अथवा तरुणांनीं, गद्यांत अथवा पद्यांत म्हणतां व ऐकतां कामा नयेत. कारण कथानकांतील अशा तऱ्हेची भाषा, अनादरानें लिहिली जाण्याचा संभव असून, ती अपायकारक व आत्मघातकी असते.

ॲडि:—हा कायदा मला समाधानकारक वाटतो. म्हणून तुमच्या-प्रमाणें त्याला माझें अनुमोदन आहे.

सॉक्रे०:—तर मग, ईश्वरविषयक तत्वज्ञानाच्या आदर्शभूत नियमांपैकीं, हा एक नियम आपण शोधून काढला. ईश्वर सर्व वस्तूंचा कर्ता असण्याऐवजीं फक्त चांगल्या वस्तूंचाच असतो, हें तत्व प्रतिपादण्यास वक्त्यांना व लेखकांना आपण भाग पाडूं.

ॲडि०:—तुम्ही हें तत्व फार समाधानकारक रीतीनें सिद्ध केलें.

साक्रे०:—आणखी एका तत्वाचा तुम्ही विचार करा. ईश्वर, विशिष्ट कारणाकरितां निरनिराळ्या वेळीं निरनिराळीं रूपें घेणारा आणि स्वतःचें शरीर निरनिराळ्या आकारांत बदलून, आपणांस कांहीं वेळ फसविणारा अथवा असा फरक झाला आहे असें खोटेंच भासविणारा चेटक्या आहे, असें तुम्हाला वाटतें काय? अथवा ईश्वर, हा एक साधें तत्व

ग्रं. क्र. ५८५६

असून, आपल्या योग्य स्वरूपांत तो नेहमीं स्थिर व अचल असतो, असें तुम्हाला वाटतें ?

ॲडि०:—ह्या प्रश्नाचें उत्तर मला एकदम देतां येणार नाहीं.

साक्रे०:—एखाद्या वस्तूंत जर फरक होऊं लागला, तर तो फरक स्वतः त्या वस्तूकडून अथवा दुसऱ्या वस्तूकडून होत नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ज्या वस्तु उत्तम आहेत, त्या वस्तूंमध्यें बाहेरच्या वस्तूंकडून बदल अथवा बिघाड होण्याचा संभव फारच कमी असतो. उदाहरणार्थ, शरीरामध्यें मांस, मद्य व व्यायाम ह्यांनीं फरक केला जातो आणि प्रत्येक रोपट्यामध्यें सूर्य-प्रकाश, वायु आणि इतर गोष्टींनीं फरक होतो. परंतु जें शरीर अथवा जें रोपटें अत्यंत निरोगी व सशक्त असतें, त्यामध्यें फारच थोडा फरक होऊं शकतो.

Steph 381

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तसेंच मनाच्याही बाबतींत. जे अत्यंत शूर व ज्ञानी आहेत, त्यांच्यावर बाह्य गोष्टींनीं अत्यंत कमी फरक होत नाहीं काय ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—सामान, घरें व कपडे, अशा सारख्या मनुष्यनिर्मित वस्तूनाहीं हेंच तत्व लागू पडेल, असें मला वाटतें. ज्या वस्तु चांगल्या बनविलेल्या आहेत व ज्या चांगल्या स्थितींत आहेत, त्यांच्यावर वेळाचा व इतर गोष्टींचा फारच थोडा परिणाम होईल

ॲडि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—निसर्गानें अथवा कृत्रिमतेनें किंवा ह्या दोन्ही कारणामुळें जी वस्तु चांगली असते, ती दुसऱ्या वस्तूनें फारच कमी प्रमाणांत बदलली जाते.

ॲडि०:—असें दिसून येतें.

सॉक्रे०:—पण खात्रीनेंच, ईश्वर व ईश्वरी वस्तु सर्वप्रकारें अत्युत्तम असतात.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, बाह्य परिणाम ईश्वराला नाना रूपें घेण्यास भाग पाडतील, हें असंभवनीय आहे.

ॲडि०:—फारच असंभवनीय आहे.

सॉक्रे०:—पण तो स्वतःमध्येंच फरक करून, स्वतःला बदलूं शकेल काय ?

ॲडि०:—त्यानें होऊन फरक केला, तरच तो बदलूं शकेल.

सॉक्रे०:—स्वतःमध्यें फरक करून, तो अधिक चांगला व सुंदर होतो कीं अधिक वाईट व कुरूप होतो ?

ॲडि०:—जर तो स्वतः फरक करीत असेल, तर खात्रीनें तो वाईट होतो. कारण ईश्वराच्या सौंदर्यांत व सौजन्यांत अपूर्णता आहे, असें आपणास म्हणतां यावयाचें नाहीं.

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. कोणीही देव अथवा मनुष्य, आपखुषीनें स्वतःला वाईट करून घेईल, असें तुम्हाला वाटतें काय ?

ॲडि०:—मला असें वाटणें शक्यच नाहीं.

सॉक्रे०:—ईश्वराला सुद्धां आपखुषीनें फरक करून घेणें अशक्य आहे. ज्याअर्थी प्रत्येक देव सौंदर्यांत व सौजन्यांत पूर्णावस्थेला गेलेला असतो, त्याअर्थी तो स्वतःच्या स्वरूपांत कांहींएक फरक न करतां, आहे तसाच राहील.

ॲडि०:—हा निष्कर्ष टाळतां येणें शक्य नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, माझ्या प्रिय मित्रा, कोणाही कवीनें आपणास असें सांगूं नये कीं, “भटकत राहणाऱ्या परकी लोकांप्रमाणें, देव

1 Odyssey XVII 455.

असंख्य रूपें घेऊन, ह्या शहरांतून त्या शहरांत फिरत रहातात." तसेंच, प्रोटिअस व थेटिस ह्यांची कोणीही बदनामी करूं नयें अथवा शोकपर्यवसायी किंवा इतर काव्यामध्यें "हिरी आपलें रूप बदलून भिक्षुणीच्या वेषांत आरगॉसच्या इनाच्युस नदीच्या शूर बालकाकरितां भिक्षा मागत हिंडते आहे," असें वर्णन कोणी करूं नये. अशाप्रकारच्या इतर खोट्या गोष्टीही आपण मना केल्या पाहिजेत. कांहीं देव परकी लोकांचा वेष घेऊन रात्रीच्या वेळीं फिरत असतात, अशा तऱ्हेच्या असमंजस गोष्टी, कवींच्या सांगण्यावरून मातांनीं आपल्या मुलांना सांगून भेवडावतां कामा नये. कारण ह्यामुळें मातांकडून देवांची निंदा केली जाऊन, मुलांमध्यें भित्रेपणा उत्पन्न केला जातो.

ॲडि०:—अशी आपण मनाई केलीच पाहिजे.

सॉक्रे०:—पण कदाचित् देवांमध्यें जरी फरक करण्याचा कल नसला, तरी ते जादूनें व फसवणूकीनें निरनिराळीं रूपें घेतात, असें आपणास भासवीत असतील.

ॲडि०:—कदाचित् तें असें करीत असतील.

Steph 382 सॉक्रे०:—आपल्या डोळ्यांसमोर भूत उभें करून, शब्दानें अथवा कृतीनें, देव असत्याला रुकार देईल, असें तुम्हाला वाटतें काय ?

ॲडि०:—मला निश्चितपणें उत्तर देतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—सर्व देवांकडून व मानवांकडून खरें असत्य तिरस्कारलें जातें, अशी तुमची खात्री नाहीं काय ?

ॲडि०:—तुम्ही काय म्हणतां, तें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—आपल्या सर्वोत्तम भागाशीं प्रतारणा करणें व सर्वोत्तम विषयांबद्दल खोटें बोलणें, हें कोणालाही आपखुषीनें संमत नसतें. उलट, प्रत्येकाला सर्वोत्तम भागामध्यें असत्याला थारा देणें भयावह वाटतें.

---

1 Supposed to be quoted from a lost play of Æschylus.

ॲडि०:—अजून तुमचें म्हणणें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—कारण माझ्या बोलण्यांत कांहीं गूढ अर्थ आहे, असें तुम्हाला वाटतें. माझ्या म्हणण्याचा सरळ अर्थ असा आहे कीं, निरुपाधिक सत्–तत्वांविषयीं खोटें बोलणें अथवा फसवणूक होणें, अज्ञानी असणें व आत्म्याच्या भागामध्यें असत्याला थारा देणें, हें कोणाही माणसाला पसंत नसतें. असत्याला आत्म्यामध्यें थारा देणें, सर्वांना तिरस्करणीय वाटतें.

ॲडि०:—होय, फारच तिरस्करणीय वाटतें.

सॉक्रे०:—फसवणूक झालेल्या मनुष्याच्या आत्म्यामध्यें असलेलें अज्ञान, म्हणजेच मी आतां म्हणत होतों, तें खरें असत्य होय. कारण शाब्दिक असत्य, आत्म्याच्या अंतर्गत अवस्थेची एक प्रकारची नक्कल व दृश्य स्वरूप असून, तें शुद्ध व निर्भेळ असत्य नव्हे. माझें म्हणणें चुकीचें आहे काय ?

ॲडि०:—नाहीं. पूर्णपणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, खरें असत्य देवांकडून व मानवांकडूनही तिरस्कारलें जातें.

ॲडि०:—मला असें वाटतें.

सॉक्रे०:—शाब्दिक असत्य, केव्हां व कोणाला उपयुक्त असल्यामुळें तें तिरस्करणीय नसतें, ह्याविषयीं आपण विचार करूं. शत्रूंशीं वागताना तें उपयुक्त नसतें काय ? आपले मित्र, वेडेपणाच्या लहरींत अपायकारक गोष्ट करण्यास उद्युक्त झाले असताना, त्याना त्यांच्या बेतापासून परावृत्त करते वेळीं, असत्य हें औषधाप्रमाणें उपयुक्त होत नाहीं काय ? तसेंच, आपणास प्राचीन काळच्या सत्य इतिहासाचें ज्ञान नसल्यामुळेंच, आपण आतांच वर्णन केलेल्या पौराणिक गोष्टी, खऱ्या धरून चालाव्या लागत नाहींत काय ?

ॲडि०:—होय. अशीच स्थिति आहे.

सॉक्रे०:—ह्यांपैकीं कोणत्या कारणाकरितां खोटें बोलणें ईश्वराला फायदेशीर असतें? जुन्या गोष्टींचें अज्ञान, त्याला असत्याचा अवलंब करावयास लावील काय?

ॲडि०:—असें म्हणणें हास्यास्पदच आहे.

सॉक्रे०:—तर मग, कवीच्या असत्याला ईश्वराजवळ थारा मिळणार नाहीं.

ॲडि०:—मलाही असेंच वाटतें.

साक्रे०:—शत्रूंच्या भयानें ईश्वर असत्य बोलेल काय?

ॲडि०:—मुळींच नाहीं.

सॉक्रे०:—अथवा त्याचे मित्र मूर्ख व वेडे आहेत, म्हणून तो असत्य बोलेल काय?

ॲडि०:—नाहीं. कोणीही मूर्ख अथवा वेडा मनुष्य ईश्वराचा मित्र नसतो.

सॉक्रे०:—तर मग, असत्य बोलण्यास ईश्वराला कांहींच कारण दिसत नाहीं.

ॲडि०:—कांहींच नाहीं.

सॉक्रे०:—कोणत्याही बाजूनें विचार केला असतां, देव व दैवी स्वभावाचे लोक, असत्याचा केव्हांही अवलंब करणार नाहींत.

ॲडि०:—होय. हें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, ईश्वर हा कृतींत व शब्दांत पूर्ण सरळता व सत्यता राखणारा आहे. तसेंच तो स्वतःमध्यें फरक करीत नाहीं व भूतचेष्टेनें अथवा खुणांनीं, स्वप्नामध्यें अथवा जागेपणीं कोणालाही फसवीत नाहीं.

Steph 383

ॲडि०:—तुम्ही हें सांगितल्यावर मलाही तुमच्याप्रमाणेंच तें विश्वासार्ह वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, 'चेटक्याप्रमाणें ईश्वर कधीं रूपांतर करीत नाहीं अथवा शब्दानें व कृतीनें तो आपणास कधींहीं फसवीत नाहीं.'—

ह्या तत्वानुसार ईश्वराविषयीं बोलणें व लिहिणें कवींना करूं दिलें पाहिजे. हें तुम्ही कबूल करतां ना ?

अॅडि०:—होय. मी कबूल करतों.

सॉक्रे०--जरी आपण होमर कवीचे चाहते आहोंत, तरी त्याच्या काव्यांतील, ईयूसनें अॅगमेम्नानला स्वप्न पाडल्याची गोष्ट, आपण मना केली पाहिजे. तसेंच, ज्यामध्यें थेटिस म्हणते कीं, तिच्या लग्नाच्या वेळेस अपोलो गात असतांना........................

"त्यानें माझ्या सुखदायक मातृपदाचें व निरोगी दीर्घायुष्याचें वर्णन केलें. तसेंच, त्यानें देवाच्या आशीर्वादानें सर्व संपन्न बनलेल्या भाग्याचें अत्यंत मधुर आवाजांत वर्णन करून माझ्या आत्म्याला आनंदित केलें. मलाही त्याचे बोल भाविकपणें दैवी, सत्यवादी व भविष्यसूचक वाटले. पण लग्नांतील ज्या पाहुण्यानें हें गीत गाऊन माझ्या भाग्याबद्दल वर्णन केलें, त्यानेंच माझ्या मुलाचा वध केला."

हा एश्चिलसमधील उताराही आपण निषिद्ध मानला पाहिजे. कवी अशी भाषा जर देवांबद्दल वापरील, तर आपणास त्याचा राग येऊन त्याला आपण गायकवर्ग मिळूं देणार नाहीं. आपणास आपले संरक्षक, देवतुल्य व देवभीरू असे तयार करावयाचे असल्यामुळें, अशा कवीचें काव्य, मुलांना शिकविण्यांत येऊं नये, असें आपण शिक्षकांस सांगू.

अॅडि०:—वरील तत्वांच्या उपयुक्ततेला माझी पूर्ण संमति आहे व त्याना कायद्याचें स्वरूप देणें मला आवडेल.

---

1 Iliad II 2 From a lost play.

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक तिसरें

मी पुढें भाषण चालू केलें, " ईश्वराविषयीं कशा तऱ्हेची भाषा वापरली पाहिजे आणि कशा तऱ्हेची भाषा वापरतां कामा नये, हें आपण ठरविलें. ज्यांनीं देवांना व आईबापांना
Steph 386 मान देऊन एकमेकांच्या मैत्रीलाही मान दिला पाहिजे, अशांच्या कानांवर लहानपणापासून चांगले शब्द पडले पाहिजेत.

ॲडिमेन्टस्०:—होय. मला वाटतें, आपलीं मतें बरोबर आहेत.

सॉक्रे०:—ठीक आहे. जर आपल्या नागरिकांना शूर करावयाचें असेल, तर मरणाची भीति त्यांना वाटणार नाहीं, असें शिक्षण त्यांना देणें जरूर नाहीं काय ? मरणाच्या भीतीनें ग्रस्त असलेला मनुष्य, शूर असूं शकतो, असें तुम्हांला वाटतें काय ?

ॲडि०:—मला असें वाटत नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच हेड्स ( मृतलोक ) व त्यांतील भयंकर यातना, ह्यांच्यावर विश्वास ठेवणारा मनुष्य, निर्भय राहून, लढाईमध्यें अपजय व गुलामगिरी सोसण्यापेक्षां मृत्यु स्वीकारील, असें तुम्हांला वाटतें काय ?

ॲडि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, अशा तऱ्हेच्या गोष्टी लिहिणारे व असेच इतर लोक, ह्यांच्यावर निर्बंध घालून, त्यांना अशी विनंती केली पाहिजे कीं, त्यांनीं मृतलोकाची ( हेड्स ) निंदा न करतां, उलट त्याविषयीं चांगलें

लिहावें. कारण अशी निंदेची भाषा खरी नसते व ज्यांना शूर व्हावयाचें आहे त्यांच्या हिताचीही नसते.

ॲडि०:—होय. आपण अशी विनंती केली पाहिजे.

सॉक्रे०:—तर मग, आपणांला पुढील व त्यासारखे इतरही उतारे काढून टाकावे लागतील.

* एखाद्या बेढब शरीराच्या व रित्या धान्यकोठाराच्या धन्याचा नोकर होऊन, त्याच्या शेतावर काबाडकष्ट करण्यास मी तयार होईन; पण नाश पावलेल्या मृतलोकांचा राजा होणें केव्हांही नाकारीन !

(१) आणखी दुसरा उतारा, "देवांनाही ओंगळ वाटणाऱ्या अशा त्या भयंकर ओलसर व कुजट खोल्या, मर्त्य व अमर्त्य लोकांनी बघाव्या."

(२) आणखी दुसरा, "हाय ! हाय ! हेड्समधील घरांत आत्मे व भूतें आहेत, पण त्यांच्यामध्यें बुद्धि नाहीं."

(३) आणखी, "चपळ व काळसर भूतांमध्यें टिरेसिअस फक्त शहाणा होता."

(४) आणखी..."आयुष्याच्या ऐन तारुण्यांत मृत्यूनें झडप घातल्यामुळें, दुर्दैवाबद्दल शोक करीत, त्याच्या शरीरांतून आत्मा अदृश्य झाला व हेड्समध्यें पळून गेला."

(५) आणखी..."त्याच्यांतील आत्मा अस्पष्टपणें बडबडत धुराप्रमाणें पाताळांत अदृश्य झाला."

Steph 367 (६) आणखी..."ज्याप्रमाणें, एखाद्या गुहेच्या भीषण व खोल जागेंतील एखाद्या दगडाच्या राशीला चिकटून असणाऱ्या वाघुळांपैकीं, एखादें वाघुळ जरी दगडावरून निसटलें, तरी तीं सर्व एकमेकांना घट्ट धरून किंचाळत

---

* Odyssey XI489

(1) Iliad XX 64. (2) Iliad XXIII 103. (3) Odyssey XX495. (4) Iliad XVI 856. (5) Iliad XXIII 100 (6) OdysseyXXIV 6.

इकडे तिकडे उडत राहतात, त्याप्रमाणें भूतेंही एकमेकांना घट्ट धरून किंचाळत फिरत होतीं. ”

वरील कविता व तशाच इतर सर्व कविता, आपण काढून टाकून होमर आणि इतर कवी ह्यांना असें सांगूं, “ कविजनहो ! आमच्यावर रागावूं नका. तुमच्या ह्या कविता काव्य–दृष्टीनें वाईट आहेत, असें आमचें म्हणणें नाहीं. अथवा लोकांच्या कानाला त्या गोड लागणार नाहींत, असेंही आमचें म्हणणें नाहीं. पण ज्यांना आम्ही स्वतंत्रवृत्तीचे व मरणापेक्षांही गुलामगिरीला भिणारे असे शूर शिपाई बनविणार आहोंत, अशा मुलांच्या व माणसांच्या कानांवर, ह्या कविता काव्यमय असल्यामुळेंच पडूं नयेत, असें आम्हांला वाटतें.

ॲडि०: – नि:संशय, अशी आपण त्यांना विनंति करूं.

सॉक्रे०:—मृतलोकासंबंधीं कासिटस व स्टीक्स, तसेंच नरक, हाडांचा सांपळा इत्यादि भयावह व गांगरून सोडणारे शब्द, जे वापरण्यांत येतात, ते सर्व आपण काढून टाकले पाहिजेत. अशा भयप्रद गोष्टी इतर कारणाकरितां उपयोगी असतील, पण आपल्या संरक्षकांच्या हिताकरितां त्या त्याज्यच समजल्या पाहिजेत. कारण अशा गोष्टींच्या धाकामुळें, ते तेजोहीन व बायकी बनण्याचा संभव आहे.

ॲडि०:—आपली भीति निराधार नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, असे शब्द आपण त्याज्य ठरविले पाहिजेत ना?

ॲडि०:—अर्थातूच.

सॉक्रे०—ह्याच्या अगदीं विरुद्ध अशी जी आपण आदर्श–पद्धति ठरविली आहे, तिच्याप्रमाणें भाषण व लेखन करूं दिलें पाहिजे ना ?

ॲडि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—तर मग, सुप्रसिद्ध वीरांचे विलाप व शोक आपण काढून टाकले पाहिजेत ना ?

ॲडि०:—होय. जर पहिले त्याज्य तर दुसरेही त्याज्यच.

सॉक्रे०:—हीं वर्णनें काढून टाकणें, योग्य आहे किंवा नाहीं, हें आपण पाहूं. आपलें तत्व असें कीं, सज्जन मनुष्य, स्वतःच्या सज्जन मित्रावर मृत्यूचा प्रसंग आला असतां, तो प्रसंग भयप्रद आहे, असें समजणार नाहीं.

ॲडि०:—होय. असें आपलें तत्व आहे.

सॉक्रे०:—म्हणून भयंकर आपत्ति आपल्या मित्रावर कोसळली आहे, असें त्याला वाटणार नाहीं.

ॲडि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—अशा मनुष्याजवळ, सुखावह आयुष्याला आवश्यक असा गुण पूर्ण प्रमाणांत वसत असतो आणि इतर लोकांच्यावर त्याचें जीवन अवलंबून नसल्यामुळें, असा मनुष्य इतरांपासून स्वतंत्र असतो.

ॲडि०—खरें आहे.

सॉक्रे०—तसेंच, मुलगा, भाऊ, अथवा इतर ऐहिक संपत्ति गमाविली असतां, अशा मनुष्याला इतरांपेक्षां फारच कमी दुःख वाटतें.

ॲडि०—खरें आहे.

सॉक्रे:—स्वतःवर आपत्ति आली असतां, ती तो निमूटमणें व नम्रपणें सहन करील.

ॲडि०—होय. असेंच.

सॉक्रे०—तर मग, प्रसिद्ध लोकांच्या तोंडांत घातलेलीं शोकगीतें काढून टाकून, सामान्य दर्जाच्या बायकांना व हलक्या
Steph दर्जाच्या पुरुषांना तीं म्हणावयास सांगूं. कारण त्यामुळें
388 देशाचे संरक्षक म्हणून ज्यांना आपण तयार करणार आहोंत, त्यांना अशा लोकांप्रमाणें वागणें तिरस्करणीय वाटेल.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—होमर व इतर कवींनीं खालील प्रकारें वर्णनें करूं नयेत, म्हणून त्यांना आपण पुनः विनंति करूं. ( १ ) "देवतेचा पुत्र अचिलस, एकदां कुशीवर पडून, एकदां उर्ध्वमुख तर एकदां अधोमुख होऊन, लोळतो आहे. नंतर उठून वेडाच्या लहरींत अमर्याद सागराच्या किनाऱ्यावर फिरत आहे. ( २ ) दोन्ही हातांत काळीकुट्ट राख घेऊन ती आपल्या डोक्यावर टाकीत आहे व निरनिराळ्या प्रकारांनीं शोक करीत आहे.

( ३ ) देवांचा नातेवाईक, प्रियम, कर्दमामध्यें लोळत आहे व नांवानें प्रत्येक माणसाला हाक मारून मोठ्यानें विनवणी करीत आहे.

( ४ ) तसेंच "किती मी दुर्दैवी आहें! सर्वांत शूर मुलाला मी जन्म दिला पण त्याचा मृत्यू पहाण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे." अशा प्रकारें देवांचें वर्णन करूं नये, म्हणून कवींना आपण कळकळीची विनंति करूं. अथवा सर्व देवांचा जर इतका मान त्यांना ठेवावयाचा नसेल, तर त्यांनीं निदान अत्यंत श्रेष्ठ देवाला खालीलप्रमाणें शोक करण्यास लावूं नये, अशी आपण त्यांना विंनंति करूं ( ५ ) "हाय! हाय! ज्याच्यावर मी प्रेम करतों, त्याचा शहराच्या तटासभोंवार होत असलेला पाठलाग, माझ्या डोळ्यांनीं मी बघत आहे आणि माझ्या हृदयाला वेदना होत आहेत." आणि ( ६ ) "अरेरे! माझ्या दुर्दैवा! मर्त्य लोकांतील माझा अत्यंत प्रिय जो सारपिडान, तो मिनिशसच्या पॅट्रोक्लस नांवाच्या मुलाकडून लढाईत मारला जावा काय?" माझ्या प्रिय ॲडिमेन्टस, जर आपल्या तरुण लोकांनीं अशीं वर्णनें ऐकलीं, तर त्यांच्यापैकीं कोणीही तीं अयोग्य समजून हंसणार नाहीं. त्यांच्यापैकीं कोणी अशी वर्तणूक करतांना सांपडला गेला, तर त्यांत कांहीं लांछनास्पद आहे, असें त्याला वाटणार नाहीं. कारण, देवसुद्धां

---

(1) Iliad XXIV 10. (2) Iliad XVIII 23. (3) Iliad XXIII 68. (4) Iliad XVIII 54. (5) Iliad XXII 168. (6) Iliad XIII 433.

असें करतात, असें तो म्हणेल. लज्जा अथवा आत्मसंयमन ह्यांच्या अभावामुळें, असंख्य शोकगीतें तो गुणगुणत राहील व क्षुल्लक दुःखदायक गोष्टींबद्दल शोक करीत बसेल.

ॲडि०:—तुमच्या म्हणण्यांत पुष्कळ सत्य आहे.

सॉक्रे०:—पण आपल्या वादाच्या निष्कर्षाप्रमाणें म्हटलें म्हणजे त्यानें असें करतां कामा नये. जोपर्यंत दुसरा कोणी आपल्याला अधिक चांगला मार्ग सांगत नाहीं, तोपर्यंत हाच निष्कर्ष आपण ग्राह्य धरला पाहिजे.

ॲडि०:—अर्थात् त्यानें असें करतां कामा नये.

सॉक्रे०:—तसेंच, आपल्या संरक्षकांनीं हसतां कामा नये. कारण मोठ्यानें हसण्याचा तितक्याच जोरानें प्रतिकार होत असतो.

ॲडि०:—मला असेंच वाटतें.

Steph 389 सॉक्रे०:—म्हणून, जेव्हां एखादा कवि मोठ्या माणसांचें हास्य वर्णन करतो, तेव्हां आपण त्याबद्दल नापसंती दर्शविली पाहिजे. देवांचीं वर्णनें जर अशा तऱ्हेचीं असलीं, तर आपण त्यांबद्दल अर्थातच अधिक जोरानें नापसंती दर्शविली पाहिजे.

ॲडि०:—खरोखर दर्शविली पाहिजे.

सॉक्रे०:—म्हणून होमर कवीला देवाविषयीं खालील शब्दांत वर्णन करूं द्यावयाचें नाहीं. (१) "हेफिअस्टसला ह्या खोलींतून त्या खोलींत लगबगीनें जातांना बघून, महाभाग देवांना अनिवार हसूं लोटलें." तुमच्या तत्वांप्रमाणें अशी भाषा वापरावयास आपण परवानगी देतां कामा नये.

ॲडि०:—माझी तत्वें असें तुम्ही म्हणा पाहिजे तर! आपण परवानगी देतां कामा नये, हें निश्चित आहे.

---

(1) Iliad I 599.

साक्रे०:—सत्यालाही आपण फार श्रेष्ठ समजलें पाहिजे. जर आपण म्हटल्याप्रमाणें, असत्य हें देवांना अनुपयुक्त असून मनुष्यांना औषधाप्रमाणेंच उपयुक्त असतें, तर हें उघडच आहे कीं, असत्याचा उपयोग फक्त वैद्यांनाच करूं दिला पाहिजे. अनभिज्ञ लोकांनीं त्यामध्यें ढवळाढवळ करतां कामा नये.

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे० —केवळ राज्याच्या कल्याणाकरितांच असत्याचा उपयोग करून, शत्रूंना अथवा नागरिकांना फसविण्याचा जर कोणाला हक्क असेल, तर तो राज्याधिकाऱ्यांनाच होय. दुसऱ्या कोणालाही नाहीं. राज्याधिकारी लोकांजवळ, खाजगी मनुष्यानें खोटें बोलणें, म्हणजे रोग्यानें आपल्या वैद्याला अथवा विद्यार्थ्यानें आपल्या व्यायाम शिक्षकाला, आपल्या शरीराच्या स्थितीबद्दल खोटें सांगून फसविणें अथवा खलाशानें तांडेलाजवळ आपल्या स्वतःविषयी किंवा जहाजावरील मंडळींच्या स्थितीविषयीं सांगताना, जहाज व जहाजावरील मंडळी ह्यांच्याविषयीं खोटें सांगून फसविणें, असें चुकीचें वर्तन करणें होय.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—जर अधिकाऱ्यांना, "(१) कारागीर, भविष्यवादी, ज्ञानी, वैद्य अथवा सुतार," ह्यांपैकीं कोणीही खोटें बोलणारा आढळला, तर त्याला राज्यामध्यें अशी घातुक संवय पाडण्याबद्दल, त्यानीं शिक्षा केली पाहिजे. कारण जहाजाप्रमाणें राज्यही ह्या घातुक संवयीनें नाश पावतें.

ॲडि०:—शब्दाप्रमाणें त्याची कृतीही अशी असली, तर असें केलेंच पाहिजे.

सॉक्रे०:—आपल्या तरुण लोकांनीं नेमस्त असलें पाहिजे ना?

ॲडि०:—अर्थात्.

(1) Odyssey XVII 383

सॉक्रे०:—अधिकारी लोकांशीं आज्ञाधारकपणानें वागणें आणि क्षुधा, तृष्णा आणि मैथुन इत्यादि इंद्रियविषयक सुखांविषयीं आत्मसंयमन करणें, ह्या मुख्य तत्वांचा नेमस्तपणांत सामान्यतः समावेश होतो ना ?

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—डीयोमिडिसच्या तोंडीं घातलेली होमरची पुढील सर्व भाषा आपण पसंत करूं.

( १ ) " मित्रा, शांतपणें बस व मी म्हणतों तें ऐक ", आणि पुढील ओळी, " रागानें श्वास टाकीत असलेले एचिअन्स, आपल्या पुढाऱ्याला मनामध्यें घाबरत पुढें चालूं लागले, " आणि अशा तऱ्हेचीं इतर वर्णनें.

ॲडि०:—होय. आपण पसंत करूं.

Steph 390 सॉक्रे०:—पण (२) " कुत्र्यासारखें भुंकणारें तोंड व हरणासारखें भित्रें हृदय असलेला दारूडा " व आणखी पुढें येणारे शब्द, तसेंच गद्यपद्यांमधील कनिष्ठांच्या तोंडीं वरिष्ठांच्यासंबंधीं घातलेले उपमर्दकारक शब्द, आपण पसंत करूं काय ?

ॲडि०:—आपण पसंत करणार नाहीं.

सॉक्रे०:—असे शब्द इतर दृष्टीनें जरी करमणूक करणारे असले, तरी ते तरुण लोकांमध्यें गंभीरपणा वाढवीत नाहींत, असेंच तुम्हांला वाटतें ना ?

ॲडि०:—होय

सॉक्रे०:—पण मला सांगा—

( ३ ) " टेबलावर भाकर व मांस हीं भरपूर पसरलेलीं असून, वाढपी लोक मद्याच्या घटांतून उत्तम मद्याचे पेले भरून मंडळींत फिरवीत

( 1 ) Iliad IV 412 (2) Iliad I 225. (3) Odyssey IX 8

आहेत," ह्यापेक्षां आनंददायक दृश्य जगांत कोणतेंही नाहीं, असें वाक्य जेव्हां अत्यंत ज्ञानी माणसाच्या तोंडीं घालण्यांत येतें, अथवा (१) दुष्काळाशीं झगडून क्षुधेनें मरणें अत्यंत दुर्दैवाचें होय' असें वर्णन करण्यांत येतें, तेव्हां तरुण मनुष्याला आत्मसंयमन करतां येईल असें तुम्हाला वाटतें काय? अथवा (२) इतर देव व मनुष्यें गाढ झोंपलीं असतां, झ्यूस एकट्याशींच विचार करीत बसला होता; पण हिराला पाहिल्याबरोबर कामांधतेनें तो सर्व विचार विसरून गेला व 'प्रिय आईबापांच्या नकळत भेट झाली असतांही आपणास इतका जबर विकार उत्पन्न झाला नव्हता,' असें म्हणून तो आपल्या विकाराचें शमन शयनगृहांत जाईपावेतोंसुद्धां लांबवूं शकला नाहीं.'—असें झ्यूसचें वर्णन करावें असें तुम्ही म्हणतां काय? (३) 'हिफिअस्टसनें एरीस व ॲफ्रोडॉईट ह्यांना अशाच कारणामुळें बांधून ठेवलें' ह्या गोष्टीबद्दल तुम्हाला काय वाटतें?

ॲडि:०—अशा गोष्टी सांगणें फारच अयोग्य होय, असें मला वाटतें.

सॉक्रे:०—परंतु संकटप्रसंगीं प्रसिद्ध पुरुषांनीं, शब्दांनीं व कृतींनीं दाखविलेल्या धैर्याचें वर्णन आपण ऐकून घेऊं. उदाहरणार्थ, (४) "छातीवर हात ठेवून, निर्भत्सनेच्या स्वरांत, तो आपल्या हृदयाला म्हणाला, "हृदया, कृपा करून शांत रहा. ह्याहूनही अधिक चीड आणणारे प्रसंग, तूं सहन केले आहेस,"

ॲडि०:—होय. केव्हांही ऐकूं.

सॉक्रे०:—तसेंच, आपल्या लोकांना लांचखाऊ व धनलोभी असण्याची आपण मुभा देतां कामा नये.

ॲडि०:—अर्थात् नाहीं.

---

(1) Odyssey XII 342. (2) Iliad XIV 281
(3) Odyssey VIII 266 (4) Odyssey XX 17.

सॉक्रे०:—तसेंच, ( १ ) " देणग्या दिल्या असतां ईश्वर व भयंकर राजेही वळविले जातात; " असें त्यांच्यापुढें गाऊन दाखविलें जातां कामा नये. आणि अचिलसचा शिक्षक फोनिक्स ह्यानें आपल्या शिष्याला ( २ ) ' अचिअन्सकडून देणग्या मिळाल्या तरच मदत कर व देणग्या मिळाल्या नाहींत तर राग घालवूं नको' असा उपदेश केला, तो शहाणपणाचा होतो, असें आपण समजतां कामा नये. अॅगमेम्नान्‌कडून देणग्या घेण्याइतका व दुसऱ्या एका प्रसंगीं, पैसे घेऊन मृत शरीरें देण्याचें कबूल करण्याइतका, अचिलस स्वतः लोभी होता, ह्यावर आपण विश्वास ठेवणार नाहीं व ठेवूनही देणार नाहीं.

Steph 391

अॅडि०:—अशा गोष्टी मान्य करणें बरोबर नाहीं.

सॉक्रे०—होमरविषयीं मला आदर वाटत असल्यामुळें, अचिलसविषयीं अशा गोष्टी सांगणें अथवा दुसऱ्यांनीं सांगितल्या असतां त्यांवर विश्वास ठेवणें, हें निखालस पाप आहे असें ठांसून सांगण्यास मला जड जातें. अचिलस अपोलोला म्हणाला, ( ३ ) " हे दूरक्षेपका ! तुझ्या इतका नाशकारक देव कोणीही नाहीं. तूंच माझें नुकसान केलें आहेस. खरोखर माझ्या हातांत सत्ता असती, तर तुझा मी सूड घेतला असता. "

( ४ ) " अचिलस उद्धटपणानें जलदेवतेच्या अंगावर धांवून गेला.

( ५ ) " स्परशिअस नदीला पूर्वी अर्पण केलेला आपला केंस, त्यानें पेट्रोक्लसच्या मृत शरीराला अर्पण केला. " ह्या सर्व गोष्टींवर आपण विश्वास ठेवतां कामा नये. तसेंच, ( ६ ) " पेट्रोलक्सच्या थडग्याजवळ हेक्टरला अचिलसनें ओढून आणलें आणि कैद्यांना चितेवर जाळून

( 1 ) Supposed to be from Hesiod. ( 2 ) Iliad IX 515 ( 3 ) Iliad XXII 15. ( 4 ) Iliad XXI 130. ( 5 ) Iliad XXIII 151 ( 6 ) Iliad XXII 394. Iliad XXIII 175.

टाकलें," ह्या गोष्टी खोट्या आहेत असें आपण जाहीर करूं. झ्यूसच्या तिसऱ्या पिढींतील अत्यंत शहाणा राजपुत्र, पेलिअस व देवता ह्यांचा पुत्र व अत्यंत विद्वान् शिक्षक चैरन ह्याचा शिष्य अचिलस, हा हलकट क्षुद्रपणा व देव आणि मनुष्यें ह्यांच्याबद्दल उद्धट तिरस्कार, अशा परस्पर विरोधी विकारांनीं गोंधळून गेला होता, अशा तऱ्हेचें त्याचें वर्णन आपल्या तरुण लोकांपुढें आपण ठेवूं देणार नाहीं.

ॲडि०: – तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—पोसीअडनचा पुत्र थेस्युअस व झ्यूसचा पुत्र पेरीथुअस हे भयंकर जबरी संभोग करावयास गेले अथवा देवोद्भव वीरांनीं भयंकर पापकृत्यें केलीं, असें असत्यपणानें हल्लीं जें म्हटलें जातें, त्यावर आपण मुळींच विश्वास ठेवणार नाहीं. आपल्या कवींना आपण उलट असें कबूल करावयास भाग पाडूं कीं, वरील कृत्यें वरील लोकांनीं केलीं नसलीं पाहिजेत, अथवा केलीं असलीं तर ते देवपुत्र नव्हते. परंतु आपल्या तरुण लोकाना, देव हे पापाचे कर्ते होत व आपले शूर लोक सामान्य लोकांसारखे होत, असें शिकविण्यास जर कवी प्रयत्न करूं लागले, तर त्याना आपण मनाई करूं. हीं वर्णनें अपमानकारक व असत्य आहेत. कारण आपण असें सिद्ध केलें आहे कीं, वाईट गोष्टी देवोद्भव नसतात.

ॲडि०:—निःसंशय आपण असें सिद्ध केलें आहे.

सॉक्रे०:—शिवाय अशी भाषा ऐकणाऱ्यांनाही ती अपायकारक असते. (१) जे झ्यूसचे व देवांचे नातेवाईक आहेत व इडाच्या टेंकडीवर आकाशांत झ्यूस देवाच्या प्रीत्यर्थ ज्यांच्या यज्ञवेदी आहेत व ज्यांच्या नसांतून दैवी रक्त वाहत आहे, असे लोक ज्याअर्थीं वाईट प्रकारचीं कर्मे
Steph करतात, त्याअर्थीं आपणालाही दुर्वृत्त होण्यास हरकत
392 नाहीं, असें वरील वर्णनें ऐकणाऱ्या प्रत्येक इसमाला वाटूं

(1) From the Niobe of Æschylus.

लागेल. म्हणून आपल्या तरुण लोकांची दुष्टपणाकडे प्रवृत्ति होऊं नये, ह्या हेतूनें अशा गोष्टी आपण काव्यांतून काढून टाकल्या पाहिजेत.

ॲडि०:—याला माझें पूर्ण अनुमोदन आहे.

सॉक्रे०:—वर्णनास योग्य व अयोग्य अशा विषयांपैकीं कोणत्या विषयाची चर्चा करावयाची शिल्लक राहिली आहे? देवाविषयीं, उपदेवाविषयीं, शूर लोकांविषयीं व मृतांच्या आत्म्याविषयीं बोलतांना, जे नियम पाळले पाहिजेत ते आपण अगोदरच सांगितले आहेत.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, मनुष्यांविषयीं बोलण्याची पद्धत काय असावी, हाच विषय शिल्लक राहिला नाहीं काय?

ॲडि०:—होय. उघडच आहे.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय मित्रा, प्रस्तुत प्रसंगीं ह्या विषयाचा निर्णय करणें अशक्य आहे.

ॲडि०:—कसें काय?

सॉक्रे०:—कारण पुष्कळ लोक अन्यायी असून सुखी असतात आणि पुष्कळ लोक न्यायी असून दुर्दैवी असतात, अन्याय जर पकडला गेला नाहीं तर फायदेशीर असतो व न्याय हा शेजाऱ्यांना फायदेशीर पण स्वतःला तोट्याचा असतो—अशीं विधानें कवि व गद्यलेखक जेव्हां मनुष्यांविषयीं करतात, तेव्हां ते अत्यंत महत्वाच्या बाबतींत चुका करतात, असें आपणास म्हणावें लागेल; आणि वरील विधानांच्या अगदीं विरुद्ध त्यांनीं आपल्या काव्यांत व कथानकांत वर्णन करावें, अशी त्यांना आपणास आज्ञा करावी लागेल. असेंच ना?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—मीं म्हटलें तें बरोबर आहे, असें तुम्ही कबूल केल्यावर, आपल्या शोधाच्या विषयासंबंधींचें विधान तुम्ही कबूल केलें, असें स्पष्टपणें मला म्हणतां येणार नाहीं काय?

ॲडि०:—तुमचें अनुमान बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून न्यायाचें स्वरूप शोधल्याशिवाय आणि न्याय ज्याच्याजवळ आहे त्या मनुष्याला, तो बाह्यतः न्यायी असो वा नसो, स्वाभाविकच फायदा होतो, हें सिद्ध केल्याशिवाय, मनुष्यांविषयीं बोलतांना काय भाषा वापरावी, ह्याबद्दल ठरविणें आपणास लांबणीवर टाकावयास नको काय ?

ॲडि०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—वर्णनात्मक विषयांसंबंधींचा वाद आपण आतां बंद करूं. मला वाटतें, आपलें दुसरें काम म्हणजे, त्यांची पद्धत काय असावी ह्यासंबंधीं शोधन करणें, हें होय. हें केलें असतां, काय म्हटलें पाहिजे व कोणत्या पद्धतीनें म्हटलें पाहिजे, ह्यासंबंधीं पूर्ण विचार होऊं शकेल.

ॲडि०:—तुम्ही काय म्हणतां तें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—पण तुम्ही तें समजून घेणें महत्वाचें आहे. कदाचित् मी पुढीलप्रमाणें मांडणी केली असतां, तुम्हाला अधिक चांगलें समजेल. कवि व कथालेखक, ह्यांचें सर्व वाङ्मय म्हणजे भूत, वर्तमान व भविष्य काळांतील हकीगतीचीं वर्णनें नव्हेत काय ?

ॲडि०:—दुसरें काय असणार ?

सॉक्रे०:—स्वतः कविकृत वर्णनाच्या पद्धतीनें अथवा कल्पित पात्रांच्या मुखानें अथवा दोन्ही पद्धतींच्या मिश्रणानें, लेखक आपला हेतु साध्य करीत नाहीं काय ?

ॲडि०:—हें सुद्धां मला स्पष्टपणें समजलें नाहीं.

सॉक्रे०:—ज्याअर्थी माझें म्हणणें स्पष्टपणें मांडण्यास मला इतका त्रास पडत आहे, त्याअर्थी शिक्षक ह्या नात्यानें माझी लायकी हास्यास्पदच आहे ! म्हणून सर्वसाधारण प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न न करतां, सामान्य वक्त्याप्रमाणें एक विशिष्ट उदाहरण घेऊन, माझा अर्थ स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करतों. 'खिसिसनें मुलगी सोडून देण्याविषयीं,

अगॅमेम्नॉन्ला विनंति केली व अगॅमेम्नॉन् त्याच्यावर रागावला.' अशा तऱ्हेनें कवि आपणाला सांगतो, तो इलिअडचा
Steph आरंभ तुम्हाला माहीत आहे ना? ह्यानंतर आपली
393 मागणी नाकारली, हें पाहून अचिअन्सचा सूड घेण्या-करितां खिसिसनें ईश्वराची प्रार्थना केली ना?

ॲडि०:—होय. इलिअडचा हा भाग मला माहीत आहे.

सॉक्रे०:—'सर्व अचिअन्सजवळ, विशेषत: अट्रिअसचीं दोन मुलें, जीं सैन्याच्या पुढें चाललीं होतीं, त्यांच्याजवळ खिसिसनें विनंति केली'—ह्या ओळीपर्यंत कवि स्वत:च बोलत आहे आणि ह्यावेळीं कवीशिवाय दुसरा कोणी म्हणत आहे, अशी आपली समजूत होण्यासाठीं, वाचकांचें मन बदलण्याचा प्रयत्नसुद्धां तो करीत नाहीं, हें तुम्हाला माहीतच आहे. परंतु ह्यापुढें खिसिसच्या तोंडानें तो बोलत आहे आणि यथाशक्ति तो आपल्याला असें वाटावयास लावतो कीं, होमर कवि बोलत नसून वृद्ध पुरोहितच बोलत आहे. आणि ह्या पद्धतीनें ट्रोजन युद्धाचें वर्णन, तसेंच इथाकामध्यें घडलेल्या गोष्टींचें वर्णन, ओडिसी काव्यांत त्यानें केलें आहे.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—मधून मधून कवी भाषणें म्हणून दाखवीत असला अथवा दरम्यान होणाऱ्या हकीगतीचें वर्णन करीत असला, तरी तें वर्णनच होत नाहीं काय?

ॲडि०:—नि:संशय.

सॉक्रे०:—परंतु दुसऱ्या कल्पित पात्रांच्या मुखानें जेव्हां होमर कवि भाषण करतो, तेव्हां ज्या मनुष्याचें वर्णन करावयाचें, त्याची हुबेहुब लकब उचलण्याचा तो प्रयत्न करीत असतो, असें आपण म्हणणार नाहीं काय?

ॲडि०:—होय. म्हणूं.

[library stamp]

सॉक्रे०:—जेव्हां एखादा मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या आवाजाप्रमाणें व चेहऱ्याप्रमाणें आपला आवाज व चेहरा करीत असतो, तेव्हां तो त्याची नक्कल किंवा अनुकरण करीत असतो ना ?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—अशा वेळीं होमर व इतर कवि अनुकरणाच्या पद्धतीनें वर्णन करतात.

ॲडि०: – निःसंशय ते असें करतात.

सॉक्रे०:—पण होमर कवीनें आपलें स्वतःचें स्वरूप कोठेंही गुप्त ठेवलें नसतें, तर त्याचें वाङ्मय व वर्णन अनुकरण केल्याशिवाय पूर्ण झालीं असतीं. परंतु हें विधान 'समजलें नाहीं,' असें तुम्ही म्हणूं नये, म्हणून मी तें अधिक स्पष्ट करतों. 'खिसिस दीन अर्जदार म्हणून आपल्या मुलीकरितां खंडणी घेऊन, अचिअन्स लोकांकडे व त्यांच्या राजाकडे आला,' अशा वर्णनानंतर होमर कवीनें, स्वतः खिसिस समजून न बोलतां, स्वतःच्या भाषेंत जर वर्णन केलें असतें, तर ती नक्कल न होतां साधें वर्णनच झालें असतें व हा कथाभाग पुढीलप्रमाणें वर्णन करतां आला असता. मी स्वतः कवि नसल्यामुळें गद्यांतच तो वर्णन करतों.

'पुरोहित आला व त्यानें देवाजवळ प्रार्थना केली कीं, ग्रीक लोकांना ट्राय मिळून सुरक्षितपणें घरीं जावयास मिळावें; पण अगोदर त्यांनीं तो देत असलेली रक्कम घ्यावी व त्याच्याबद्दल देवाबद्दल आदर दाखवून त्याच्या मुलीची मुक्तता करावी. पुरोहितानें असें भाषण केल्यावर, सर्वांना आदरयुक्त भीति वाटून रुकार देण्यास ते तयार झाले. पण अगॅमेमनॉनला राग आला व त्यानें पुरोहिताला चालता होण्यास व पुनः कधींही परत न येण्यास फर्माविलें. अधिकारदर्शक काठी व देवाकरितां आणलेल्या माळा, ह्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं, असेंही कुत्सित-पणानें बोलण्यास त्यानें कमी केलें नाहीं. पुरोहिताची मुलगी, आपणा-बरोबर अरगॉसमध्यें राहून वृद्ध झाल्यावरच, मुक्त करण्यांत येईल असें

त्यानें सांगितलें. शेवटीं अगॅमेमनॉननें अशी धमकी दिली कीं, जर दुखापत न होतां परत जाण्याची पुरोहिताची इच्छा असेल तर आपणाला क्रोध न आणतां त्यानें निघून जावें. हें सर्व ऐकल्यावर, म्हातारा पुरोहित घाबरून जाऊन गडबड न करतां निघून गेला. पण तंबूच्या बाहेर गेल्यानंतर त्यानें अपोलो देवाची प्रार्थना केली. स्वतः देवाप्रीत्यर्थ बांधलेलीं देवालयें व केलेले यज्ञ, ह्यांची अपोलोला आठवण देऊन व सर्व प्रकारच्या स्तुतिस्तोत्रांनीं आळवून, देवानें आपल्या बाणांनीं अचिअन्सचा निःपात करून, त्याच्या ( पुरोहिताच्या ) अश्रूंचें परिमार्जन करावें, अशी भक्तिभावानें त्यानें विनवणी केली, माझ्या मित्रा, अशा रीतीनें अनुकरणाशिवाय साधें वर्णन करतां आलें असतें.

Steph 394

ॲडि०:—होय. मला समजलें.

सॉक्रे०:—आणि मला तुम्हांला हें समजावून द्यावयाचें आहे कीं, जेव्हां कवीचे स्वतःचे शब्द कथाभागांतून आपण काढून टाकून नुसता संभाषणाचा प्रकार ठेवतों, तेव्हां ह्याच्या उलट परिणाम घडून येतो.

ॲडि०:—होय, मला समजलें. शोकरसप्रधान नाटकांची हीच तऱ्हा असते.

सॉक्रे०:—तुमचीं समजूत पूर्णपणें बरोबर आहे. आतां मला तुम्हांला स्पष्टपणें सांगता येईल कीं, काव्य व काव्यलेखन ह्यांची एक शाखा पूर्णपणें नकलेच्या किंवा अनुकरणाच्या स्वरूपाची असते. तिचें उदाहरण म्हणजे शोकरसप्रधान व आनंदरसप्रधान नाटकें. दुसरी अशी शाखा असते कीं, जींत कवि स्वतःच्या भाषेंतच सर्व सांगत असतो. तिचें उदाहरण म्हटलें म्हणजे डिथिरॅम्बिक (आवेशयुक्त रंगेल कविता) काव्य होय. तिसरी शाखा, कवीच्या स्वतःच्या भाषेंत वर्णन व अनुकरणद्वारा वर्णन, अशा दोन्ही प्रकारची असते. महाकाव्यामध्यें व इतर उदाहरणांमध्यें, मी म्हणतों, तसें तुम्हाला दिसून येईल.

ॲडि:०--होय, पहिल्याप्रथम तुम्ही जो उल्लेख केला, तो मला आतां चांगला कळला.

सॉक्रे:०--तर आतां आपण पूर्वी काय म्हटलें होतें, त्याची आठवण करा. आपण असें म्हटलें होतें कीं, वाङ्मयाचा विषय आपण ठरविल्यावर पद्धतीचा तेवढाच विचार करावयाचा उरला.

ॲडि:०--मला आठवतें.

सॉक्रे:०--माझ्या म्हण्याणचा निश्चितार्थ हाच होता कीं, आपल्या कवीनीं कथा सांगताना नक्कलेची पद्धत पूर्णपणें किंवा थोडीफार अनुसरावी अथवा मुळींच अनुसरूं नये आणि अनुसरणें झाल्यास कोणत्या तत्वावर अनुसरावी, ह्याविषयीं एकवाक्यता करणें जरूर आहे.

ॲडि:०--मला वाटतें, आपल्या शहरांत शोकरसप्रधान व आनंदरसप्रधान नाटकें करूं द्यावींत काय, ह्याविषयीं तुम्ही विचार करीत आहांत ?

सॉक्रे:०--शक्य आहे. परंतु ह्यांच्याखेरीज दुसरे विषयही विचारांत घ्यावे लागतील. मला स्वतःलाच अजून त्यांच्याविषयी माहिती नाहीं. पण ज्याप्रमाणें वारा नेईल तिकडे जहाज जातें, त्याप्रमाणें वादविवादाचा ओघ जिकडे नेईल तिकडे आपणास गेलेंच पाहिजे.

ॲडि:०--तुमचे म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे:०--ॲडिमेन्टस ! आपल्या संरक्षकांनीं नकल्ये झालें पाहिजे काय ? असा प्रश्न ह्याठिकाणीं उपस्थित होतो. पण ह्या प्रश्नाचें उत्तर आपण अगोदरच दिलेंले नाहीं काय ? ‘कोणत्याही व्यक्तीनें एकच काम चांगलें करावें--पुष्कळ कामें करूं नयेत. पुष्कळ कामें करण्याचा प्रयत्न केला असतां, कोणत्याही कामांत विशेष प्राविण्य मिळणें शक्य नसतें,’ असें आपण म्हटलें नाहीं काय ?

ॲडि:०--खात्रीनेंच म्हटलें.

सॉक्रे:०--नक्कलेविषयीं हेंच तत्व लागू पडत नाहीं काय ? मनुष्याला एकाद्या गोष्टीची जशी चांगली नक्कल करतां येते, तशी पुष्कळ गोष्टींची नक्कल करतां येणें शक्य आहे काय ?

ॲडि:०--खात्रीनेंच त्याला करतां येणार नाहीं.

सॉक्रे०:--तर मग, जो मनुष्य महत्वाच्या धंद्यांत गुंतला आहे, त्याला विविध गोष्टींची नक्कल करतां येऊन, यशस्वी

Steph 395 नकल्या होणें अगदीं अशक्य आहे. कारण नक्कलेच्या दोन समान शाखाही, एकाच मनुष्याला नैपुण्य मिळविण्याइतक्या साध्य होणें, माझ्या मतें, कठीण आहे. उदाहरणार्थ, सुखान्त ( Commedy ) व दु:खान्त ( tragedy ) काव्यप्रकार, ह्यांची गोष्ट घ्या. ह्यांना तुम्ही आतांच नकलांचे प्रकार म्हणून म्हटलें नाहीं काय ?

ॲडि०:--होय मी म्हटलें. एकाच मनुष्याला दोन्ही प्रकारांमध्यें यश मिळणें अशक्य आहे, हें तुमचे म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:--काव्यगायनाचा व नटाचाही धंदा एकाच माणसाला करतां येणें अशक्य आहे.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—एकाच नटाला सुखान्त व दु:खान्त नाटकांतील कामें साधणार नाहींत. शिवाय हीं कामें अनुकरण-कलात्मकच असतात ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस ! मनुष्यस्वभाव ह्यापेक्षांही अधिक सूक्ष्म तऱ्हेनें विभागला गेला आहे आणि त्यामुळें मनुष्याला पुष्कळ गोष्टी चांगल्या तऱ्हेनें करून दाखविणें साधत नाहीं अथवा नकलांचा ज्यांच्याशीं साम्यपणा आहे, अशा गोष्टीही त्याला करतां येत नाहींत.

ॲडि०:--अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—आपलें पहिलें मत आपल्याला कायम ठेवावयाचें असेल,

तर आपण आपल्या संरक्षकांना इतर कोणताही धंदा करूं देतां कामा नये. कारण देशाच्या स्वातंत्र्याकरितां कराव्या लागणाऱ्या धंद्यांत त्यांना पुष्कळ कौशल्य मिळवावयाचें आहे. या ध्येयाला साधनीभूत तेवढाच धंदा त्यांनीं केला पाहिजे. म्हणून इतर कांहींही गोष्टींची त्यांनीं संवय लावून घेतां कामा नये किंवा इतर गोष्टींची नकल करण्याचा प्रयत्न करतां कामा नये. आणि जर त्यांना नक्कल करावयाची असेल तर लहानपणापासून त्यांच्या धंद्याला योग्य म्हणजे शूर, सभ्य, धार्मिक व सन्माननीय, अशा तऱ्हेच्या लोकांचीच नकल त्यांनीं करावी. पण हलकटपणाच्या अथवा क्षुद्रपणाच्या कोणत्याही प्रकाराची त्यांनीं संवय करतां कामा नये अथवा नक्कल करण्यामध्यें निष्णातपणाही दाखवितां कामा नये. नाहींतर नकलेच्या ऐवजीं खरोखरच तशा तऱ्हेचा वाईटपणा त्यांना बाधावयाचा! शारिरीक हांवभाव, आवाजाचे कंप अथवा विचारांच्या पद्धती, ह्यांच्या नकला जर लहानपणापासून करीत असलें, तर त्या प्रथम संवयी म्हणून जडून, पुढें स्वभावच बनतात. तुम्हीं असें निरीक्षण केलेलें नाहीं काय?

ॲडि०:—अर्थात् केलें आहे.

सॉक्रे०:—तर मग, ज्यांच्याबद्दल आपण काळजी घेत आहों व जे चांगले नागरीक व्हावे अशी आपली इच्छा आहे, त्यांनीं एखाद्या दुर्दैवी, दुःखी अथवा विलापिनी, अशा तरुण अथवा वृद्ध स्त्रीची नक्कल करून, पुरुष जातीला शिव्या देणें अथवा देवांची नालस्ती करणें व त्यापासून सौख्य मानणें, आपल्याला पसंत पडणार नाहीं. एखाद्या आजारी, प्रेमवेडी अथवा कामगार स्त्रीची नक्कल तर त्यांनीं मुळींच करतां कामा नये.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—तसेंच, पुरुष अथवा स्त्री जातीच्या गुलामांचीही नक्कल त्यांना करूं देतां कामा नये.

ॲडि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०—आतां आपण वर्णन केलें त्याविरुद्ध ज्यांची वर्तणूक असते असे भित्रे व वाईट लोक, तसेंच एकमेकांना शिव्या देऊन हास्यकारक नक्कल करणारे, झिंगलेले असतांना अथवा शांत असतांना अचकट विचकट बोलणारे अथवा शब्दांनें व कृतीनें एकमेकांविरुद्ध व दुसऱ्यां-विरुद्ध गुन्हे करण्याची संवय असणारे, ह्यांचेंही आपण अनुकरण करूं देतां कामा नये. कारण पुरुष व

Steph 396

स्त्री जातींतील वेडी व दुष्ट माणसें, संरक्षकांना माहीत असणें जरी योग्य असलें, तरी त्यांच्यासारखे त्यांनी वागतां कामा नये अथवा त्यांची नक्कलही करतां कामा नये.

ॲडि०:—अगदीं खरें आहे.

सॉक्रे:—तसेंच लोहार अथवा इतर कारागीर, वल्हेकरी अथवा गलबतावरील अधिकारी अथवा अशा तऱ्हेचें काम करणारे इतर लोक, ह्यांचें त्यांनीं अनुकरण करावें काय ?

ॲडि०:—अर्थात् नाहीं. कारण अशा तऱ्हेच्या धंद्यांकडे लक्ष देण्याची त्यांना परवानगी देण्यांत येणार नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच घोड्यांचें खिंकाळणें, बैलांचें डुरकणें, नद्यांचा खळखळाट, समुद्राचा गंभीर निनाद, मेघांचा गडगडाट, ह्यांची त्यांनीं नक्कल करावी काय ?

ॲडि०:—अर्थात नाहीं. कारण त्यांनीं स्वतः वेडे असतां कामा नये अथवा वेड्यांचें अनुकरणही करतां कामा नये.

सॉक्रे०:—तुमच्या म्हणण्याचा अर्थ मला समजला असेल, तर असें दिसतें कीं, वर्णनाची अशी एक पद्धत आहे कीं, सभ्य व सुसंस्कृत मनुष्याला कांहीं वर्णन करावयास सांगितलें असतां तिचा तो उपयोग करील, आणि दुसरी पद्धत पहिलीपेक्षां निराळी असून, तिचा अंगिकार जो स्वभावानें व शिक्षणानें विरुद्ध प्रकारचा आहे, तोच मनुष्य करील.

ॲडि०:—ह्या दोन पद्धती कोणत्या ?

सॉक्रे०:—सुसंस्कृत मनुष्याला, जेव्हां चांगल्या माणसाचें भाषण अथवा कृति वर्णन करावयाची असेल, तेव्हां स्वतः समरस होऊन तो वर्णन करील. जेव्हां सज्जन मनुष्याची वर्तणूक निश्चित व शहाणपणाची असेल, तेव्हां तिचें वर्णन करणें त्याला लाजिरवाणें वाटणार नाहीं. पण आजार, प्रेम, मद्य अथवा दुर्दैवाचा आघात, ह्यांच्यामुळें सज्जन मनुष्याच्या मनावरचा ताबा जेव्हां नाहींसा झालेला असतो, अशा स्थितीचें वर्णन तो अल्पावधींत व जपून करील. सुसंस्कृत माणसाला, जेव्हां आपल्यापेक्षां कनिष्ट व अयोग्य अशा स्वभावाचें वर्णन करावयाचें असेल, तेव्हां अशा स्वभावाचा तो विशेष अभ्यास करणार नाहीं. अशा माणसानें केलेल्या चांगल्या कृत्याचें तो थोडावेळ वर्णन करील, पण पुढें त्याचें वर्णन करण्यास त्यास शरम वाटेल. कारण अशा स्वभावांची नक्कल करण्याची त्याला संवय नसते व हलक्या लोकांप्रमाणें आपला स्वभाव बनविणें त्याला पसंत नसतें. केवळ करमणूकी पलीकडे कलेचा उपयोग करणें, त्याला कमीपणाचें व तिरस्कारणीय वाटतें.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे:०—तर मग, सुव्यवस्थित स्वभावाचा मनुष्य, होमर कवीच्या काव्यासंबंधीं आपण बोलत असतांना, ज्या शैलीचें वर्णन केलें तिचाच उपयोग करील ना ? ती म्हणजे नक्कल व साधें वर्णन ह्यांचें मिश्रण करून, थोडाच भाग नकलेच्या पद्धतीनें वर्णन करणें. माझें म्हणणें चूक आहे काय ?

ॲडि०:—नाहीं. अशा मनुष्यानें कोणती पद्धत स्वीकारावी, हें तुम्ही बरोबर सांगितलें.

Steph 397 सॉक्रे०:—ज्या मनुष्याचा स्वभाव असा नसेल, तो मनुष्य ज्या प्रमाणांत तिरस्करणीय असेल, त्या प्रमाणांत त्याला गाळण्यासारखें अथवा कमीपणा आणण्यासारखें

कांहींच वाटणार नाहीं. असा मनुष्य, पुष्कळ लोकांच्या समक्ष, कांहींही न गाळतां, गंभीरपणें सर्व प्रकारची नक्कल करील. मेघांचा गडगडाट, वादळाचा, वाऱ्याचा, चाकांचा व फिरकीचा आवाज अथवा तुतारी, पांवा, अलगुज इत्यादि वाद्यांचा आवाज, इतकेंच नव्हे तर कुत्र्यांचें भुंकणें, मेंढरांचें बें बें करणें आणि पक्ष्यांचे आवाज, ह्या सर्वांचीही तो नक्कल करील आणि त्याच्या पद्धतींत, आवाज व हावभाव ह्यांचाच बहुतेक समावेश असून, साध्या वर्णनाचा थोडाच भाग असेल.

ॲडि०:—अशीच त्याची पद्धत असणार.

सॉक्रे० - ज्या दोन प्रकारच्या वर्णनाच्या पद्धती मी म्हटल्या त्या ह्याच होत.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०—ह्यांपैकीं एका पद्धतींत, फेरफार किरकोळ आहेत आणि जर तुम्हाला योग्य स्वरमेळ व लय साधतां आली, तर पद्धतींत फरक न करतां, एकतानतेंत बरोबर वर्णन करतां येईल आणि फेरफार क्षुल्लक असल्यामुळें, लयही साध्य होईल.

ॲडि०:—हेंच बरोबर आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. पण दुसऱ्या पद्धतींत, असंख्य फेरबदल असल्यामुळें, सर्व तऱ्हेचे स्वरमेळ व ताल ह्यांची जरूर लागत नाहीं काय ?

ॲडि०:—नि:संशय.

सॉक्रे०:—तर मग, कवी व वर्णन करणारे लेखक, ह्या दोन पद्धतीं-पैकीं कोणत्यातरी पद्धतीचा अथवा त्यांच्या मिश्रणानें बनलेल्या पद्धतीचा उपयोग करीत नाहींत काय ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, आपण ह्या तिन्ही पद्धतीना अथवा एकाच

पद्धतीला म्हणजे मिश्रपद्धतीला अथवा शुद्ध पद्धतीपैकीं एकीला, आपल्या राज्यांत शिरकाव करूं द्यावा काय ?

अॅडि०:—माझ्या मतें, जी सद्गुणी मनुष्याचें वर्णन करते, अशा शुद्ध व साध्या पद्धतीलाच आपण परवानगी द्यावी.

सॉक्रे०:—तथापि अॅडिमेन्टस ! मिश्रपद्धति आकर्षक असते. तुम्ही जी पद्धत पसंत केली, तिच्याविरुद्ध असलेली पद्धत मुलांना, मुलांच्या बरोबर असणाऱ्या नोकरांना व सामान्य जनसमूहाला, सर्वांत आकर्षक वाटते.

अॅडि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—पण कदाचित् तुम्ही असें म्हणाल कीं, आपल्या आदर्श राज्यघटनेच्या धोरणाला धरून अशी ही पद्धत नाहीं. कारण आपण प्रत्येकाला एक एक धंदा नेमून दिला असल्यामुळें, दोन धंदे करणारा किंवा पुष्कळ धंदे करणारा मनुष्य आपण मानीत नाहीं.

अॅडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. कारण ती विसंगत पद्धत होईल.

सॉक्रे०:—आणि ह्याच कारणामुळें, केवळ आपल्या राज्यांतच असें दिसून येईल कीं, चांभार चांभाराचेंच काम करतो, त्याच्या जोडीला तांडेलाचें काम करीत नाहीं. शेतकरी शेतीचेंच काम करतो, त्याच्या जोडीला पंचाचें काम करीत नाहीं. शिपाई शिपायाचेंच काम करतो, व्यापारी बनत नाहीं.

अॅडि०:—खरें आहे.

Steph 398 सॉक्रे०:—जो कोणतीही भूमिका धारण करून, कोणत्याही विषयाची नक्कल करून दाखवितो, असा हुषार मनुष्य, आपल्या शहरांत येऊन जर आपल्या बुद्धीची करामत करून दाखवितो असें म्हणाला, तर आपण पवित्र, अभिनंदनीय व सज्जन मनुष्य म्हणून त्याचा सन्मान करूं. पण त्याला

सांगूं कीं, आमच्या राज्यामध्यें अशा मनुष्याला कायद्याप्रमाणें राहूं देतां येत नाहीं ! नंतर त्याच्या डोक्यावर तेल घालून व लोंकरीच्या पट्टयांनीं त्याचे केंस बांधून, त्याला दुसऱ्या शहरांत पाठवून देऊं ! पण आपल्या-करितां व राज्याच्या कारणाकरितां त्याच्यापेक्षां अधिक कणखर वृत्तीचा, कमी आकर्षक असा कथालेखक व कवि आपल्या पदरीं ठेवूं. आपल्या योद्ध्यांच्या शिक्षणाविषयीं विचार करीत असतांना, प्रथमच ज्या पद्धती आपण सांगितल्या, त्यांप्रमाणें असा कवि आपलीं कथानकें लिहून, सद्गुणी मनुष्याच्या रहाणीची पद्धत वर्णन करील.

ॲडि०:—आपल्या जवळ सत्ता असेल, तर आपण असें खात्रीनें करूं.

सॉक्रे०:—तर आतां प्रिय मित्रा ! आपण काल्पनिक व इतर वर्णन-विषयक संगीत शाखेबद्दल पूर्ण विचार केला. कारण आपण त्यांचे विषय व त्यांच्या पद्धती ह्यांचें वर्णन केलें.

ॲडि०:—मला सुद्धां असेंच वाटतें.

सॉक्रे०:—ह्यानंतर स्वरमाधुरी व गीतें, ह्यांच्याबद्दल विचार करावा काय ?

ॲडि०:—अर्थात्.

सॉक्रे०:—आपल्या पूर्वीच्या ठरावाला अनुसरून, आपण त्यांबद्दल काय म्हणावें व त्यांचें स्वरूप काय असावें, ह्याविषयीं कोणालाही विचार करणें कठीण जाईल काय ?

ग्लॅकान् हंसून म्हणाला, "सॉक्रेटिस ! 'कोणालाही' या सदराखालीं मी येत नाहीं. कारण ह्यावेळेला कोणते प्रकार आपण पसंत करावे, ह्याविषयीं मला शंका असल्यामुळें, मला निश्चयात्मक असें कांहींच सांगतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हांला निदान एवढें माहीत आहे कीं, गीतामध्यें तीन भाग असतात. शब्द, स्वरमेळ व लय.

ग्लॅ०:—होय. एवढें मला माहीत आहे.

सॉक्रे०:—आणि गीतबद्ध शब्द व गीतमुक्त शब्द, ह्यांच्यामध्यें आपण नुकत्याच ज्या पद्धती ठरविल्या त्यांच्या दृष्टीनें कांहीं फरक नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—स्वरमेळ व लय शब्दानुवर्ती असलीं पाहिजेत, हें तुम्ही मान्य करतां ना?

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—पण आपण असें म्हटलें कीं, शोकगीतें व आर्तगीतें ह्यांची आपणाला गरज नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तुम्ही संगीतज्ञ आहांत, म्हणून विलापसूचक स्वरमेळ कोणते ते आम्हाला सांगाल काय?

ग्लॅ०:—मिश्रलिडिअन व हायपरलिडिअन आणि असेच इतर.

सॉक्रे०:—हे स्वरमेळ आपण काढून टाकले पाहिजेत. कारण पुरुषांविषयीं तर बाजूलाच राहो, पण बायकाना सुद्धां सद्गुणी बनविण्यास ते निरुपयोगी आहेत.

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—मदिरासक्तता, नाजुकपणा व आळसटपणा, हे दुर्गुण संरक्षकांना न शोभणारे आहेत.

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—नाजुकपणा व मदिरासक्तता दर्शविणारे, असे स्वरमेळ कोणते?

ग्लॅ०:—आयोनियन व लिडिअन. ह्यांना मृदु स्वरमेळ म्हणतात.

Steph 399 सॉक्रे०:—योद्धयांच्या शिक्षणाकरितां तुम्ही त्यांचा उपयोग कराल काय?

ग्लॅ०:—मुळींच नाहीं. आतां फक्त डोरिअन व फ्रिजिअन उरले आहेत.

सॉक्रे०:—मला स्वतःला स्वरमेळ समजत नाहींत, म्हणून युद्धामध्यें अथवा अशाच भयंकर प्रसंगामध्यें, जो वीर पुरुष अपेशी झाला असताना, जखमी झाला असताना, मृत्यू जवळ आला असताना अथवा दुसऱ्या कांहीं अडचणीत असतांना, दैवाचे आघात धीरोदात्त सहनशक्तीनें निवारीत असतो, अशा वीर पुरुषाचे स्वर व आवाज योग्य दाखविले जातील, असा एक विशिष्ट प्रकारचा स्वरमेळ, तुम्ही मला सांगा. शांततेच्या काळांत, ईश्वराची आर्जवानें व विनवणीनें प्रार्थना करीत असताना अथवा दुसऱ्याच्या प्रार्थना, उपदेश व आर्जव ह्यांना मान देऊन शेवटीं आपल्या इच्छेप्रमाणें विजयी होत असताना, उद्धटपणाऐवजीं शांतपणानें व नेमस्तपणानें वागून, कोणताही परिणाम भोगण्यास तयार असणाऱ्या, शांत व निर्भय अशा पुरुषाच्या भावना, ज्यामुळें चांगल्या वर्णन केल्या जातील, असाही एक दुसरा स्वरमेळाचा प्रकार मला सांगा. सारांश, असे आवेशयुक्त व शांत स्वरमेळ मला सांगा कीं, ज्यांमुळें दुःखामध्यें व सुखामध्यें असलेल्या पुरुषाची नेमस्त व धीटाईची वृत्ति दर्शविली जाईल.

ग्लॅ०:—ठीक आहे. जे स्वरमेळ मी आतांच तुम्हाला सांगितले, तेच ह्या कामीं उपयुक्त आहेत. ( डोरिअन व फ्रिजिअन. )

सॉक्रे०:—आपल्या गाण्याकरितां व वाद्यांच्या साहित्याकरितां, आपणाला पुष्कळ तारा असणारें अथवा सर्व सूर उत्पन्न करणारें एकच वाद्य असण्याची जरूर नाहीं.

ग्लॅ०:—मला असेंच वाटतें.

सॉक्रे०:—हार्प किंवा डुलसिमर अथवा ज्याच्यांत पुष्कळ तारा आहेत व ज्याच्यामधून पुष्कळ स्वरमेळ वाजविले जातात, अशा वाद्यांच्या कारागिरांना आपण ठेवणार नाहीं.

ग्लॅ०:—अर्थात्‌च नाहीं.

सॉक्रे०:—पण मुरली करणारे व वाजविणारे, ह्यांना तुम्ही प्रवेश

करूं द्याल ना ? कोणत्याही वाद्यापेक्षां मुरलीमध्यें जास्त सूर असतात आणि पॅनहारमोनियम ही मुरलीचीच नक्कल आहे, हें माझें म्हणणें बरोबर आहे काय ?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—आतां सारंगी व वीणा ही वाद्यें उरलीं आहेत व तीं शहरांतील लोकांना उपयोगी पडतील. खेडेगांवांतील धनगराला एखादा पांवा चालेल.

ग्लॅ०:—आपल्या वादाचा असा निष्कर्ष होतो.

सॉक्रे०:—मारस्यस व त्याची वाद्यें ह्यांच्याऐवजीं अपोलो व त्याची वाद्यें पसंत करण्यांत, नवीन सुधारणा घडवून आणण्याचा आपण गुन्हा करीत नाहीं.

ग्लॅ०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०—ठीक. आतांपर्यंत चैनीच्या वातावरणामुळें झालेली शहरांतील घाण, आपण अबुद्धिपुरस्सरपणें काढून टाकीत आहोंत, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—आणि हें सूज्ञपणाचेंच आहे.

सॉक्रे०—तर मग, घाण काढावयाचें काम आपण पूर्ण करूं या.

स्वरमेळांच्या नियमांविषयीं विचार आपला पूर्ण झाला
Steph आहे. आतां लयांच्या नियमाबद्दल विचार करूं. त्यांच्या-
400 मधील वैचित्र्याकडे आपण लक्ष न देतां अथवा त्यांच्या
सर्व प्रकारांचा अभ्यास न करतां, सुव्यवस्थित व शूर अशा आयुष्याला स्वाभाविक लय कोणते, हें पाहिलें पाहिजे. आणि हे शोधल्यावर, आयुष्य हें गाणें व पदविक्षेप ह्यांना अनुकूल न बनवितां, आयुष्याला अनुकूल असें गाणें व पदविक्षेप अमलांत आणले पाहिजेत. परंतु ज्याप्रमाणें स्वरमेळ तुम्हीच ठरविले, त्याप्रमाणें लय कोणते असावेत हें ठरविण्याचें काम तुमचें आहे.

ग्लॅ०:—पण खरोखरच मला हें ठरवितां येणार नाहीं. मला जें माहीत आहे, त्यावरून एवढेंच सांगतां येईल कीं, ज्याप्रमाणें आवाजाचे स्वरमेळांत रूपांतर करतां येण्यासारखे चार प्रकार आहेत, त्याप्रमाणें लयाचे मुख्य प्रकार तीन आहेत. पण लयाचे कोणते प्रकार कोणत्या प्रकारच्या आयुष्याचें वर्णन करतात, हें मात्र मला सांगतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां आपणास डेमानला बोलविलें पाहिजे. कोणते लय क्षुद्रपणा व उद्धटपणा, वेडेपणा व इतर दुर्गुण दाखवितात व कोणते विरुद्ध गुण दाखवितात, हें डेमान सांगेल. पण मला अशी पुसट आठवण आहे कीं, त्यानें मिश्र क्रेटिक ( Cretic ), डॅक्टिलिक ( Dactylic ) आणि तिसरा हिराईक ( Heroic ), असे लय वर्णन केले होते. त्यांची अनुक्रमणिका त्यानें कशी लाविली, हें मला माहीत नाहीं. प्रत्येक पदाचे लघुगुरु अक्षरांत भाग पाडून, त्यानें आरोह व अवरोह ह्यांची एकतालता दाखविली व एका पदाला आयम्बिक (पहिलें लघु व दुसरें गुरु अशा दोन अक्षरांचा गण) व दुसऱ्या पदाला ट्रोके (पहिलें गुरु व दुसरें लघु अशा दोन अक्षरांचा गण) अशीं नांवें दिलीं. कांहीं वेळां तो पदांच्या गतीची व लयाची अथवा ह्या दोहोंच्या मिश्रणाची स्तुति अथवा निंदा करी, पण ह्याबद्दल मला निश्चयात्मक कांहींच सांगतां येणार नाहीं. हे प्रश्न डेमानपुढें टाकले पाहिजेत. कारण ह्या प्रश्नांची चर्चा करणें कठीण आहे. तुम्हांला कसें वाटतें ?

ग्लॅ०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—सौंदर्य अथवा बेढबपणा, चांगल्या अथवा वाईट लयांचा परिणाम असतो, हें तुम्हाला मान्य आहे ना ?

ग्लॅ०:—अर्थातच.

सॉक्रे०:—चांगले व वाईट लय, स्वाभाविकपणेंच चांगल्या व वाईट पद्धतींचे परिणाम असतात. आपल्या तत्वाप्रमाणें, लय व स्वरमेळ

ह्यांची शब्दाशीं अनुकूलता ठेविली असतां, चांगला व वाईट स्वरमेळ ह्यांबद्दलही असेंच म्हणतां येईल.

ग्लॅ०:—लय व स्वरमेळ ह्यांची शब्दांशीं अनुकूलता असलीच पाहिजे.

सॉक्रे०:—आत्म्याच्या नैतिक प्रवृत्तीप्रमाणें शब्द व पद्धति ह्याचें स्वरूप ठरत नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे:०—आणि इतर सर्व, पद्धतीप्रमाणें ठरविलें जात नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—भाषा, स्वरमेळ, सुशोभीतपणा आणि लय, ह्या सर्वांचें सौंदर्य, साधेपणावर अवलंबून असतें. साधेपणा म्हणजे बावळटपणा नव्हे. नैतिक स्वभावामुळें खरोखर चांगलें व उदार असलेलें मनच साधेपणा दर्शवितें.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर.

Steph सॉक्रे०:—तर मग, आपल्या तरुण लोकांनीं योग्य
401 तें काम करावें अशी जर आपली इच्छा असेल, तर हेच गुण आत्मसात् करण्याचे त्यांनीं प्रयत्न करीत रहावें ना?

ग्लॅ०:—अर्थात्

सॉक्रे०:—हे गुण, विशेषतः चित्रकला व अशाच इतर कला, विणकाम, नकशीकाम, व इतर सर्व कारागिरी ह्यांच्यामध्यें, इतकेंच नव्हे, तर सजीव शरीराच्या रचनेंत व वनस्पतीमध्येंही दिसून येतात. कारण ह्या सर्व वस्तूंत सौंदर्य व कुरूपता हीं असंतातच. सौंदर्य, लय व सुस्वरता ह्यांचा अभाव, वाईट ढब व वाईट स्वभाव ह्यांच्याशीं निकट संबंध दाखवितो. पण ह्याच गुणांचें वास्तव्य, विरुद्ध स्वभाव म्हणजे शूरपणा व शांतपणा ह्यांचा निदर्शक असतो.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें पूर्णपणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—असें जर आहे तर, फक्त कवींच्यावरच आपण देखरेख

ठेवून, काव्यामध्यें चांगल्या नैतिक वर्तनाचे त्यांनीं आदर्श दाखविले नाहींत, तर त्यांना मनाई करण्यांत येईल, असें करावें काय? प्रत्येक धंद्याच्या कारागिरावरही आपण देखरेख ठेवून, त्यानें वाईट स्वभाव, बदफैलीपणा, क्षुद्रता व कुरूपता, ह्यांचीं प्रतीकें जिवंत मनुष्याच्या सादृश्यावर अथवा इमारतींवर अथवा त्यांच्या हातून होणाऱ्या कोणत्याही कारागिरीमध्यें काढतां कामा नयेत, असें आपण करावयास नको काय? अशा तऱ्हेनें ज्यांना काम करतां येणार नाहीं, त्यांना आपल्या शहरांत रहाण्याची आपण मनाई केली पाहिजे ना? ज्याप्रमाणें रोगट कुरणांतील चाऱ्याचा थोडा थोडा संचय करून गुरें त्याचें सेवन करतात, त्याप्रमाणें दर दिवशीं निरनिराळ्या काव्यांमधून दुर्गुणाचा थोडा थोडा संचय करून, हृदयांतील आत्म्यामध्यें अजाणतेपणानें मोठा ढीग रचून, आपले संरक्षक दुर्गुणाचे पुतळे होणार नाहींत, असें आपण करावयास नको काय? ह्याच्या उलट, आपल्या स्वयंसिद्ध बुद्धीनें, सुंदर व शोभिवंत असें जें असतें तें शोधून काढून, आपल्या तरुण मंडळींना निरोगी प्रदेशांत वास्तव्य करीत आहोंत असें वाढावयास लावून, प्रत्येक ठिकाणांतून सत्‌चें सेवन करूं देतील, असे निराळ्या तऱ्हेचे कलावंत आपण शोधून काढणें, बरें नव्हे काय? आरोग्यदायक अशा जमिनीवरून सोसाट्याच्या वाऱ्यामुळें ज्याप्रमाणें आरोग्य वाहत जातें, त्याप्रमाणें संरक्षकांच्या कानावर चांगल्या कृत्यांची कीर्ति आदळेल अथवा दृष्टीला चांगलीं कृत्यें दिसतील व त्यामुळें लहानपणापासून बुद्धीचें खरें सौंदर्य, त्यांना अकळत आपल्याकडे सादृश्यानें, प्रेमानें व सुसंबद्धतेनें ओढून घेईल, असा परिणाम करणारे कारागीर आपण शोधून काढावे ना?

ग्लॅ०:— होय. असें शिक्षण उत्तमच होय.

सॉक्रे०:—ह्याच कारणामुळें, ग्लॅकान्, आपण संगीताच्या शिक्षणाला विशेष महत्व देत नाहीं काय? लय व स्वरमेळ ह्यांचा आत्म्याच्या

गाभाऱ्यांत प्रवेश होतो आणि त्याबरोबर सुशोभितपणा येतो. मनुष्य योग्य तऱ्हेनें शिकविला गेला, तर त्यामुळें तो शोभिवंत दिसतो पण वाईट तऱ्हेनें शिक्षण मिळाल्यामुळें तो कुरूप दिसतो. चांगल्या तऱ्हेनें ज्याचें शिक्षण झालेलें आहे, त्याला कला व मनुष्यस्वभाव ह्यांच्यामधील दोष ओळखण्याची तीक्ष्ण दृष्टि साध्य होऊन, अशा दोषांविषयीं योग्य तिटकारा वाटून सुंदर वस्तूंविषयीं

Steph 402 त्याला आदर वाटेल आणि आपल्या आत्म्यामध्यें त्यांचा आनंदानें स्वीकार करून, त्यांचें मनानें सेवन करून उदार हृदयी व सद्गुणी असा मनुष्य तो बनेल. तसेंच बौद्धिक चिकित्सा करण्याच्या प्रगल्भावस्थेंत तो येण्याच्या अगोदरच, त्याला कुरूप वस्तूंबद्दल तिटकारा वाटून, तो योग्य प्रकारें त्यांची निंदा करील; आणि जेव्हां त्याच्यामध्यें बुद्धीचा उदय होईल, तेव्हां सुशिक्षणामुळें पूर्वपरिचित असलेल्या बुद्धीचें तो मोठ्या आनंदानें स्वागत करील.

ग्लॅकान्०:—अशाच कारणाकरितां आपण संगीताचें ( संस्कृतीचें ) शिक्षण दिलें पाहिजे, ह्याबद्दल मला संशय वाटत नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हाला माहीत आहे कीं, वाचावयास शिकतांना, सर्व शब्दांतून पसरलेल्या अक्षरांना आपण ओळखावयास शिकलों म्हणजे आपणास समाधान वाटत असे. अक्षरांची ओळख झाल्याशिवाय आपण विद्यार्थी म्हणून समजले जाणार नाहीं, असें वाटून लहान अथवा मोठा शब्द असा फरक न करतां, अक्षरांचीच ओळख करून घेण्याची आपणास काळजी वाटत असे.

ग्लॅकान्०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—स्थिरपाण्यांतून अथवा आरशांतून प्रतिबिंबित असलेल्या अक्षरांच्या प्रतिकृती, जर आपणास अक्षरेंच समजत नसलीं तर समजणार नाहींत. कारण प्रथमाकृती व त्यांचें प्रतिबिंब ह्यांच्याविषयींचें ज्ञान, आपणास एकाच कलेच्या अभ्यासापासून होतें.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपणास व आपल्या संरक्षकांस, नेमस्तपणा, धैर्य, औदार्य व दानशूरता अथवा ह्यांच्या सदृश गुणांचीं आवश्यक रूपें व त्यांच्या विरुद्ध गुणांचीं रूपें माहीत झाल्याशिवाय, तसेंच तीं लहान वस्तूंत अथवा मोठ्या वस्तूंत असलीं, तरी त्यांचा अनादर न करतां व त्यांच्या स्वरूपाचें व प्रतिक्रियेचें ज्ञान एकाच कलेच्या अभ्यासानें होणारें आहे असें समजून, इतस्ततः पसरलेलीं तीं स्वतः व त्यांच्या प्रतिकृती, जेथें सांपडतील तेथें तीं ओळखतां आल्याशिवाय, आपण व आपले संरक्षक संगीतज्ञ ( सुसंस्कृत ) होऊं शकणार नाहीं.

ग्लॅकान्०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—तर मग, ज्याला खरी दृष्टि आहे त्याला, आत्म्याचें नैतिक सौंदर्य व बाह्य शारिरीक सौंदर्य ह्यांचा ज्याच्यामध्यें सुंदर मिलाफ झाला आहे, अशा मनुष्याच्या दर्शनापेक्षां अधिक सुंदर कोणतेंच दृश्य दिसणार नाहीं.

ग्लॅ०:—ह्यापेक्षां अधिक सुंदर कांहींच असणार नाहीं.

सॉक्रे०:—जें अतिशय सुंदर असतें, तें अतिशय रमणीय असतें, हें तुम्हाला मान्य आहे ना ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग खरा संगीतज्ञ, ज्यांचें नैतिक आणि शारिरीक सौंदर्य पूर्णावस्थेला गेलें आहे, अशांवरच प्रेम करील. आत्मिक एकतानता नसलेला मनुष्य, त्याला अर्थात् आवडणार नाहीं.

ग्लॅ०:—जर अशा मनुष्याच्या आत्म्यामध्यें दोष असला, तर त्याला तो आवडणार नाहीं. पण जर निव्वळ शारिरीक दोष त्याच्यामध्यें असेल, तर तो क्षम्य समजून त्याच्यावर तो प्रेम करील.

सॉक्रे०:—मी समजलों ! तुझा एकेकाळीं अशा तऱ्हेचा आवडता मनुष्य होता व अजूनही आहे; म्हणून हा मुद्दा मी सोडून देतों ! पण

मला एवढें सांगा कीं, अतिसुखाची, नियमितपणाशीं संगति असूं शकते काय ?

ग्लॅ०:—कशी असूं शकणार ? कारण दुःखाप्रमाणें अतिसुखही मनाला अस्वस्थ करतें.

Steph 403 सॉक्रे०:—सद्गुणाशीं तरी अतिसुखाची संगति असते काय ?

ग्लॅकान्०:—खात्रीनेंच नसते.

सॉक्रे०:—स्वैरपणाशीं व बदफैलीपणाशीं तरी ?

ग्लॅकान्०:—खात्रीनेंच असते !

सॉक्रे०:—प्रेमविकाराच्या तृप्तीमुळें होणाऱ्या सुखापेक्षां अधिक मोठें व अधिक तीव्र सुख, मला सांगूं शकाल काय ?

ग्लॅकान्०:—मला सांगता येणार नाहीं. आणि ह्या सुखापेक्षां अधिक वेडेपणाचें सुखही मला सांगता येणार नाहीं !

सॉक्रे०:—पण खऱ्या प्रेमाला, शांत व सुसंगत अशा स्वभावाच्या सुव्यवस्थित व सुंदर मनुष्याविषयीं प्रेम वाटणें स्वाभाविक नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तर मग, वेडसरपणाला अथवा दुर्वृत्तपणाला, खऱ्या प्रेमाजवळ लगट करूं देतां कामा नये.

ग्लॅकान्०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, अतिसुख, खऱ्या प्रेमाच्या बाबतींत असतां कामा नये. तसेंच ज्यांच्यामध्यें योग्य प्रकारचें प्रेम दिलें व घेतलें जात आहे, अशा प्रेमी जीवानीं अतिसुख घेतां कामा नये.

ग्लॅकान्०:—खरोखरच घेतां कामा नये.

सॉक्रे०:—ज्या तऱ्हेचें राज्य आपण घडवीत आहों, त्यामध्यें असा कायदा करण्यांत येईल कीं, प्रियकरानें आपल्या प्रिय मनुष्यावर प्रेम करावें, त्याच्या संगतीचा फायदा घ्यावा व जर तशी परवानगी त्याच्या-

कडून मिळण्यासारखी असली, तर उदात्तप्रेमानें मुलासारखें त्याला आलिंगन द्यावें. पण ह्यापेक्षां अधिक परिचय त्यानें वाढवितां कामा नये. कारण जर अधिक तऱ्हेनें तो वागला, तर अश्लीलपणाबद्दल व ग्राम्य रुचीबद्दल त्याची निर्भत्सना होईल.

ग्लॅकान्०:—होय. असा आपण कायदा करूं.

सॉक्रे०:—आपलें संगीताविषयींचें विवेचन आतां पूर्ण झालें, असें तुम्हाला वाटत नाहीं काय ? ज्या ठिकाणीं त्याचा शेवट झाला पाहिजे, त्याठिकाणीं तो झाला, असें खास म्हणतां येईल. कारण संगीताचा शेवट प्रेमाच्या सौंदर्यांतच झाला पाहिजे.

ग्लॅकान्०:—मला तुमच्यासारखेंच वाटतें.

सॉक्रे०:—आपल्या तरुण लोकांच्या शिक्षणक्रमांत, दुसरें स्थान व्यायामाला दिलें पाहिजे.

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०:—संगीतामध्यें, तसेंच व्यायामामध्यें, काळजीपूर्वक शिक्षण लहानपणापासूनच सुरू होऊन सर्व आयुष्यभर तें चालू ठेविलें पाहिजे, ह्याविषयीं वादच नाहीं. परंतु माझ्या पुढील मताचा तुम्ही विचार करून पहा. माझ्या मतें, चांगलें शरीर स्वतःच्या उत्तमत्वानें चांगला आत्मा बनवूं शकणार नाहीं. पण ह्याच्या उलट, चांगला आत्मा आपल्या चांगुलपणानें शरीराला पूर्णावस्था आणूं शकेल. तुम्हाला काय वाटतें ?

ग्लॅकान्०:—तुमच्याप्रमाणेंच मला वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, प्रथम मनाला सुसंस्कृत करून, आरोग्याची तपशीलवार योजना करण्याचें काम, आपण मनावरच सोपवूं व विस्तारभयास्तव फक्त सामान्य तत्वांचीच आपण चर्चा करूं. असें करणें बरोबर आहे काय ?

ग्लॅकान्०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आपण पूर्वी म्हटलेंच आहे कीं, संरक्षकांनीं मद्यपाना-

पासून अलिप्त राहलें पाहिजे. कारण मला वाटतें, संरक्षकांनीं दारू पिऊन बेभान होणें व स्वतःला विसरणें अत्यंत अश्लाघ्य होय.

ग्लॅकान्०:—खरोखरच, संरक्षकाला दुसऱ्या माणसाच्या संरक्षणाची जरूर लागणें हास्यास्पद आहे !

सॉक्रे०:—पण आहाराविषयीं आपण काय नियम करावेत ? आपल्या लोकांना अत्यंत महत्वाच्या सामन्यांत भाग घ्यावयाचा आहे ना ?

ग्लॅकान्०:—होय. त्यांना भाग घ्यावयाचा आहे.

Steph 404 सॉक्रे०:—तालीमखान्यांत कुस्ती खेळणाऱ्या मल्लांनीं, ज्याप्रमाणें आपल्या शरीराला खाण्यापिण्याची संवय लावलेली असते, त्याप्रमाणें आपल्या लोकांनी संवय लावणें योग्य होईल काय ?

ग्लॅकान्०:—कदाचित् होईल.

सॉक्रे०:—पण अशी संवय झोंपाळूपणा वाढविणारी असून, आरोग्याला अनिष्ट असते. कारण नियमित व्यायाम घेणारे लोक, व्यायामाव्यतिरिक्त आयुष्य झोंपून काढतात आणि नियोजित आहारापासून थोडेसे जरी ते ढळले, तरी त्यांना भयंकर प्रकारच्या रोगांनीं पछाडलें जातें, असें तुमच्या अवलोकनांत आलेलें नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—होय. आलें आहे.

सॉक्रे०:—तर मग, ज्यानीं रखवाली कुत्र्याप्रमाणें जागरूक राहून, दृष्टि व कान तीक्ष्ण ठेविलीं पाहिजेत आणि युद्धाच्या स्वारीवर असताना खाण्यापिण्यासंबंधींचे निरनिराळे फरक व कडक उन्हाळा व थंडी ह्यांचे आघात, ज्यांनीं सहन केले पाहिजेत, अशा आपल्या योद्ध्यांकरितां, अधिक चांगली पद्धत योजावी लागेल. कारण अनिश्चित आरोग्य त्यांच्या उपयोगी पडणार नाहीं.

ग्लॅकान्०:—मला वाटतें, तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—आपण आतांच वर्णन केलेल्या संगीतशिक्षणाला उत्तम व्यायामपद्धतीची जोड दिली पाहिजे ना ?

ग्लॅकान्०:—तुम्ही कोणती म्हणतां ?

सॉक्रे०:—आपल्या योद्ध्यांना योग्य अशी साधी, नेमस्त पद्धत.

ग्लॅकान्०:—ती कशाप्रकारची असेल ?

सॉक्रे०:—ह्या मुद्यावर आपण होमरकडून माहिती घेऊं. तुम्हाला माहीत आहे कीं, होमर आपल्या योद्ध्यांना जेव्हां रणांगणावर जेवण देतो, तेव्हां हेलेस्पान्टच्या किनाऱ्यावर जरी ते असले तरी त्याना मासे खावयास देत नाहीं; तळलेलें मांस सुद्धां देत नाहीं, फक्त भाजलेलेंच देतो. कारण शिपायांना तें ताबडतोब मिळूं शकतें. तसेंच भांडीं व तवा नेण्यापेक्षां, नुसता विस्तव उपयोगांत आणणें अधिक सोयीचें पडतें.

ग्लॅकान्०:— निःसंशय.

सॉक्रे०:—माझ्या माहितीप्रमाणें, होमरनें चटकदार अन्नाचें कधींही वर्णन केलेलें नाहीं. व्यायाम घेणाऱ्या लोकाना सुद्धां माहीत असतें कीं, शरीर चांगलें कमावण्याची इच्छा असलेल्या माणसानें, अशा तऱ्हेच्या स्वादिष्टपणापासून अलिप्त राहलें पाहिजे.

ग्लॅकान्०:—अशा लोकांना हें तत्व माहीत असतेंच आणि स्वादिष्ट-पणापासून ते अलिप्त असतात, हेंही योग्यच असतें.

सॉक्रे०:—तर मग, तुम्हाला सिराकुसन तऱ्हेची मेजवानी व सिसिलिअन पक्वानें पसंत पडणार नाहींत, हें उघडच आहे.

ग्लॅकान्०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तसेंच, ज्या मनुष्यांचें शरीर चांगल्या स्थितींत असलें पाहिजे, अशांना कोरिन्थ शहरांतील स्त्रियांबद्दल आवड असावी, हें सुद्धां तुम्हांला पसंत पडणार नाहीं.

ग्लॅकान्०:—अर्थातच नाहीं.

सॉक्रे०:—सुप्रसिद्ध अथिनिअन मेवामिठाई तुम्ही निषिद्धच मानाल ना?

ग्लॅकान्०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—खरोखर, अशा तऱ्हेच्या खाण्याच्या व राहण्याच्या पद्धतीची, पॅनहारमोनिअम संगीताच्या पद्धतीशीं तुलना करणें चुकीचें होणार नाहीं.

ग्लॅकान्०:—ही तुलना खात्रीनेंच योग्य होईल.

सॉक्रे०:—संगीतांतील वैचित्र्य जसें आत्म्यामध्यें बदफैलीपणा उत्पन्न करतें, तसें आहारांतील वैचित्र्य शरीरांत रोग उत्पन्न करतें व ज्या प्रमाणें संगीतांतील साधेपणा आत्म्यामध्यें नेमस्तपणा घडवून आणतो, त्याप्रमाणें व्यायामांतील साधेपणा चांगलें आरोग्य उत्पन्न करतो.

ग्लॅकान्०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—पण जेव्हां बदफैलीपणा आणि रोग ह्यांचें शहरांत प्राबल्य होतें, त्यावेळेस न्यायकचेऱ्या व दवाखाने पुष्कळ उघडले जाऊन, चांगले कुलीन लोकही वकिली व वैद्यकी करावयास लागतात व त्यामुळें हें धंदे मोठी प्रतिष्ठा मिरवावयास लागतात.

ग्लॅकान्०—उघडच आहे.

सॉक्रे०:—जेव्हां पहिल्या प्रतीच्या वैद्यांची व न्यायाधीशांची जरूरी, हलक्या लोकांनाच नव्हे तर कुलीन व सुशिक्षित
Steph लोकांनाही वाटते, तेव्हां राज्यामध्यें हलक्या प्रतीचे व
405 दुर्गुण उत्पन्न करणारें शिक्षण चालू आहे, असें सिद्ध करणारा दुसरा पुरावा जरूर आहे काय? घरीं तुटपुंज्या न्यायाचा पुरवठा असल्यामुळें, लॉर्ड आणि न्यायाधीश ह्यांच्याकडून न्याय मागावा लागणें, हा सदोष शिक्षणाचा भक्कम पुरावा असून लाजिरवाणा प्रकार नव्हे काय?

ग्लॅकान्०: – ह्यापेक्षां अधिक लाजिरवाणें कांहींच असूं शकणार नाहीं.

सॉक्रे०: – वादी किंवा प्रतिवादी ह्या नात्यानें न्यायाच्या कचेरींत आपल्या आयुष्याचा बराचसा भाग घालविणें, इतकेंच नव्हे, तर ह्या गोष्टीबद्दल तोरा मिरवून ग्राम्य रुची दाखविणें; तसेंच गुन्हे करण्यांत आपण पटाईत असून, लबाड्या, हिकमती व टाळाटाळी करण्यांत आपण तरबेज असल्यामुळें, न्यायाच्या कचाटींतून आपण कांहींही घडवून आणून शिक्षेंतून निसटूं शकतों, अशा प्रकारें क्षुद्र गोष्टींविषयीं बढाई मारणें, आणि झोंपाळू न्यायाधीशापुढें न्याय मागण्याची गरजच भासणार नाहीं, अशा तऱ्हेनें सुव्यवस्थित आयुष्य घालविणें किती उत्तम व उदात्त आहे, हें माहीत नसणें, खरोखर लाजिरवाणें नव्हे काय ?

ग्लॅ०:—खरोखरच हें पहिल्यापेक्षां अधिक लाजिरवाणें आहे.

सॉक्रे०:—जखम झाली असल्याशिवाय अथवा सांथीच्या तापाशिवाय, वैद्याची मदत घेणें लांछनास्पद नाहीं काय ? आपल्या आळशीपणामुळें व अव्यवस्थित आयुष्यामुळें, आपणास थंडी किंवा प्लीहा होऊन, एक्स्लीपीअसच्या हुषार पुत्राना आमवात ( Flatulance ), शैत्य ( Catarrh ) इत्यादि रोगांची नांवें शोधून काढण्यास लागावीं, हें लाजिरवाणें नव्हे काय ?

ग्लॅकन्०:—रोगांचीं हीं नांवें फार चमत्कारिक, नवीन व भपकेदार अशीं आहेत.

सॉक्रे०:—माझ्या मतें, एक्स्लीपिअसच्या वेळेस हीं अस्तित्वांतही नव्हती. ट्रायमध्यें जेव्हां युरिपिलस जखमी झाला, तेव्हां
Steph एका बाईनें त्याला बार्ली व चीज ह्यांच्या मिश्रणासहीत
406 प्रम्निअन दारूचा घुटका दिला. हें मिश्रण क्षोभकारक असूनही, त्याच्या मुलांनीं तिला दोष दिला नाहीं. तसेंच, पॅट्रोक्लसनें त्याच्या जखमा धुतल्या म्हणून त्याचीही त्यांनीं निर्भत्सना केली नाहीं.

ग्लॅ०:—खरेंच. त्याच्या त्या स्थितींत तसें औषध देणें चमत्कारिक होतें.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें श्रीमंत मनुष्याच्या मुलाची सेवा करण्यास चाकर असतो, त्याप्रमाणें रोगांची शुश्रूषा करण्यास तयार असणारी हल्लींच्या औषधांची पद्धत, हिरोडिकसच्या वेळेपर्यंत एक्स्लीपिअसच्या शिष्यांनीं सुरू केली नव्हती, हें ध्यानांत आणल्यावर युरिपिलसला दिलेलें औषध तुम्हाला चमत्कारिक वाटणार नाहीं. पण हिरोडिकस हा स्वतः व्यायामशिक्षक असल्यामुळें, जेव्हां तो आजारी पडला, तेव्हां त्यानें व्यायाम व औषध घेण्याची अशी कांहीं योजना केली कीं, त्यामुळें स्वतःला त्यानें प्रथम त्रास करून घेतला व नंतर लोकांनाही त्रास दिला.

ग्लॅ०:—हें कसें ?

सॉक्रे०:—आपला मृत्यु लांबणीवर टाकून ! कारण प्राणघातक रोग स्वतःला झाला असतांना, पायरीपायरीनें त्यानें तो वाढूं दिला आणि स्वतः रोग बरा करण्यास तो असमर्थ झाल्यावर, स्वतःच्या शुश्रूषेंतच सर्व काळ घालवूं लागला ! नेहमींच्या खाण्यापिण्यांत जरा कांहीं फरक झाला असतां, तो सारखा त्रासत असे आणि अशा तऱ्हेनें, मृत्यूशीं झगडत असतां स्वतःच्या हुषारीमुळें तो वृद्ध होऊन मेला !

ग्लॅकान्०:—स्वतःच्या हुषारीबद्दल त्यानें चांगलेंच बक्षीस मिळविलें म्हणावयाचें !

सॉक्रे०:—एक्स्‌लीपिअसला ही पद्धत माहीत नव्हती अथवा ती त्यानें पूर्वीं उपयोगांत आणली नव्हती म्हणून त्यानें आपल्या वंशजांना ती सांगितली नाहीं, असें एखादा अडाणी मनुष्यच म्हणेल. सुव्यवस्थित राज्यामध्यें, प्रत्येकाला स्वतःचें नियोजित कार्य करावयाचें असल्यामुळें, कोणाही माणसाला वैद्याचीं औषधें घेत खितपत पडण्यास रिकामपण नसतें. हें तत्व एक्सलिपिअसला माहीत असल्यामुळेंच, वरील प्रकारची

पद्धत त्यानें अमलांत आणली नाहीं. हें तत्व कामकरी वर्गासंबंधीं बोलतांना आपण मान्य करतों. परंतु श्रीमंत व सुखी लोकांसंबंधीं बोलतांना तें हास्यास्पद आहे, असें आपण समजतों.

ग्लॅकान्०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—जेव्हां एखादा सुतार आजारी पडतो, तेव्हां आपला रोग वैद्याकडून औषध घेतल्यानंतर, उलट्या होऊन किंवा शौचास साफ होऊन घालविला जाईल अथवा डाग दिल्यानें किंवा शस्त्रक्रिया केल्यानें तो नाहींसा केला जाईल, अशी तो आशा बाळगतो. पण एखाद्या वैद्यानें जर आहारासंबंधीं फार दिवस पाळावयास लावणारें पथ्य सांगून, डोक्याला पट्या बांधून घेण्याचा उपचार सुचविला, तर अशा वैद्याला तो सांगेल, " महाराज, आजारी असण्यास मला वेळ नाहीं. रोगाबद्दल विचार करण्यांतच वेळ घालवून दिवस कंठणें मला जमण्यासारखें नाहीं. कारण मला माझ्या नेहमींच्या धंद्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. " नंतर वैद्याला शुभसकाळ इच्छून, तो आपल्या नेहमींच्या आयुष्यक्रमाला सुरवात करील आणि आपला धंदा संभाळून प्रकृति सुधारील. अथवा जर त्याची शरीरप्रकृति रोगाशीं टक्कर देण्यास असमर्थ झाली, तर शेवटीं मृत्युमुळें साहजिकच सर्व त्रासांतून तो मुक्त होईल.

ग्लॅकान्:—होय. त्याच्यासारख्या धंदेवाईक माणसानें वैद्याची मदत इतपतच घेणें योग्य होईल.

Steph 407 सॉक्रे०:—स्वतःचें नियोजित कार्य करतां आलें नाहीं, तर जगण्यांत राम नाहीं, असें त्याला वाटतें म्हणूनच ना ?

ग्लॅकान्०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—पण श्रीमंत मनुष्याला नियोजित असें कांहींच काम नसल्यामुळें, तें अपूर्ण राहलें असतां आयुष्य व्यर्थ होय, असें त्याला वाटत नाहीं, असें आपण म्हणतों.

ग्लॅकान्०:—होय. श्रीमंताला कांहीं काम नसतें असें समजण्यांत येतें.

सॉक्रे०:—पोटपाण्याची व्यवस्था झाली म्हणजे मनुष्यानें सदाचारानें वागण्यास लागावें, असें जें फोसीलीडिस म्हणतो, तें तुम्हाला मान्य नाहीं काय ?

ग्लॅकान्०:—माझ्या मतें, ह्याच्यापूर्वींही मनुष्यानें सदाचारानें वागण्यास लागावें.

सॉक्रे०:—ह्या विषयावर त्याच्याशीं आपण वाद करण्यांत अर्थ नाहीं. श्रीमंत मनुष्यांनीं सद्गुण आचरणें आवश्यक आहे काय व त्यांनीं आचरला नाहीं तर त्यांचें आयुष्य निरर्थक होईल काय ? तसेंच, सुतारी अथवा इतर धंद्यांत लागणाऱ्या बुद्धीच्या एकाग्रतेला, सदारोगीपणा जरी विघातक असला तरी फोसीलिडीसच्या म्हणण्याला त्यामुळें बाध येतो काय ? हे प्रश्न आपण विचारांत घेतले पाहिजेत.

ग्लॅकान्०:—खरोखरच, व्यायामापलीकडे शरीराची अतिशय काळजी घेणें, ह्यासारखें विघ्न कोणतेंच नाहीं. कारण घरगुती धंदा अथवा शेतांत काम करणाऱ्या माणसालाही, अथवा घरीं बसणाऱ्या न्यायाधीशालाही, शरीराची अतिकाळजी घेणें त्रासदायक होतें.

सॉक्रे०:—पण ह्यापेक्षांही, ज्ञानार्जन करणाऱ्याला, विचार करणाऱ्याला व स्वतःशीं मनन करणाऱ्याला, प्रकृतीची अतिशय काळजी घेणें, हें मोठें विघ्नच होय. कारण तत्वज्ञानाच्या अभ्यासामुळें आपलें डोकें दुखत आहे, भोंवळ येत आहे, असें माणसाला निष्कारण वाटावयास लागतें. बौद्धिक अभ्यासानें, सद्गुणांचें अस्तित्व व आचरण सिद्ध करण्यास, शरीराची अतिशय काळजी, अत्यंत अडचण आणणारी आहे. कारण तिच्यामुळें मनुष्याला आपण आजारी आहों, असेंच वाटतें आणि आपल्या आरोग्याच्या सदैव काळजीमुळें कधींच विश्रांति मिळेनाशी होते.

ग्लॅ०:—होय. हा स्वाभाविकच परिणाम आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपण असें म्हणणार नाहीं काय कीं, एक्स्लीपीअसला हें सर्व माहीत होतें व त्यानें रोग बरे करण्याची कला, ज्यांची स्वभावत:च शरीरप्रकृति चांगली आहे परंतु ती वाईट संवयीनें बिघडलेली नसून, कांहीं विशिष्ट दुखण्यानें बिघडलेली आहे, अशा लोकांच्या फायद्याकरितांच उपयोगांत आणली? ह्या विशिष्ट तक्रारी, औषधानें अथवा शस्त्रक्रियेनें तो घालवीत असे आणि राज्याच्या हिताला अपाय न व्हावा म्हणून त्यांचे नेहमींचे धंदे त्यांना करूं देत असे. पण शरीरप्रकृति पूर्णपणें रोगांनीं ग्रस्त झाली असतां, आपल्या पद्धतीपासून निराळी पद्धत शोधून काढून व तिच्याप्रमाणें औषधयोजना करून, तो रोग्याला आपलें आयुष्य दु:खांत कंठूं देत नसे व तशा स्थितींत रोग्यांना त्यांच्यासारखींच रोगिष्ट मुलें निर्माण करूं देत नसे. कारण तो असा विचार करी कीं, जो आपलें नेहमीचें कार्य करण्यास समर्थ राहूं शकत नाहीं, तो स्वत:ला व राज्यालाही निरुपयोगीच होय.

ग्लॅ०:—एक्स्लीपिअस हा मोठा राजकारणी पुरुष होता, असें तुम्ही सिद्ध करीत आहां!

सॉक्रे०:—अर्थातच! आणि तो राजकारणी होता म्हणूनच त्याच्या पुत्रांनीं, शूर योद्ध्यांप्रमाणें ट्रायच्या लढाईत काम केलें व
Steph मी वर्णन केल्याप्रमाणें वैद्यकीय कला अमलांत आणली.
408 मिनिलास हा जेव्हां पॅन्डारच्या भाल्यानें जखमी झाला, तेव्हां (१) जखमेंतून निघालेलें रक्त ओढून घेऊन त्यांनीं त्यावर सौम्य उपचार केले. हें तुम्हाला आठवतच असेल. यूरिपिलसच्या बाबतींत जी त्यांनी योजना केली, तिच्यापेक्षां मिनीलासच्या खाण्यापिण्यासंबंधीं अधिक योजना त्यांनीं केली नाहीं. कारण जखमी होण्यापूर्वी जे निरोगी व नियमित आयुष्यक्रम घालविणारे असतात,

---

(1) Iliad IV 218.

त्यांच्यासाठीं वनौषधींचे उपचार पुरेसे असून, जरी त्यांनीं अन्न, दारू व चीज ह्यांचें मिश्रण करून पिऊन टाकलें, तरीसुद्धां बाधा होत नाहीं, अशी त्यांची खात्री असे. पण ज्याची प्रकृति नेहमीं रोगिष्ट असून, जो अनियमित आयुष्यक्रम घालविणारा आहे, त्याचें अस्तित्व त्याला स्वतःला व दुसऱ्यालाही फायदेशीर नाहीं, असें ते समजत असत. आपली कला, अशा लोकांकरितां नसून, मिडासपेक्षां जरी रोगी श्रीमंत असले, तरी त्यांना बरें करण्याचा प्रयत्न करणें चुकीचें आहे, असें त्यांचें मत असे.

ग्लॅ०:—तुमच्या वर्णनाप्रमाणें, एक्सलीपिअसचे मुलगे फार धूर्त होते.

सॉक्रे०: - हें स्वाभाविकच आहे. तथापि शोकरसप्रधान काव्य लिहिणारे कवी व पिंडार, ह्यांचें मत आपल्या विरुद्ध आहे. एक्सलीपीअस हा अपोलोचा मुलगा होता असें कबूल करून ते सांगतात कीं, मरावयास टेंकलेल्या एका श्रीमंत मनुष्याला त्यानें लांच घेऊन बरें केलें व म्हणूनच त्याच्यावर विजेचा आघात झाला. पण आपल्या तत्वांना अनुसरून ह्या दोन्ही विधानांवर आपण विश्वास ठेवणार नाहीं. ह्याच्या उलट, आपण असें म्हणूं कीं, जर तो देवपुत्र होता तर लोभी नव्हता व जर तो लोभी होता तर देवपुत्र नव्हता !

ग्लॅ०:—हें आपलें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण साक्रेटिस, पुढील मुद्यावर तुमचें काय म्हणणें आहे ? आपल्या शहरांत चांगले वैद्य असले पाहिजेत ना ? आणि माझ्या मतें, ज्याप्रमाणें निरनिराळ्या स्वभावांच्या लोकांशीं ज्यांचा परिचय आहे असेच न्यायाधीश उत्तम असतात, त्याप्रमाणें पुष्कळ निरोगी व रोगिष्ट लोकांच्या शरीरप्रकृती ज्यांनीं तपासल्या आहेत असेच वैद्य उत्तम असतात.

सॉक्रे०:—चांगले वैद्य व चांगले न्यायाधीश असावेत, असें मलाही वाटतें. पण मी चांगले वैद्य कोणाला म्हणतो, हें तुम्हाला माहीत आहे काय ?

ग्लॅ०:—मला तुम्ही सांगाल काय ?

सॉक्रे०:—मी प्रयत्न करतों. पण तुमच्या प्रश्नांतच तुम्ही दोन निरनिराळ्या गोष्टींचा निर्देश केला.

ग्लॅ०: – कसा काय ?

सॉक्रे०:—हें खरें आहे कीं, वैद्य लोकांना लहानपणापासून आपल्या धंद्याच्या अभ्यासाच्या जोडीला, पुष्कळ वाईट रोग तपासण्याचा अनुभव व प्रत्येक रोगाचा स्वानुभव असला, तर त्यांच्यामध्यें चांगला निष्णातपणा येईल. स्वतःही ते विशेष निरोगी नसले तरी चालेल. कारण दुसऱ्यांच्या शरीरांच्या व्याधी, वैद्य आपल्या स्वतःच्या शरीरानें बऱ्या करीत नसतो. असें जर असतें, तर वैद्यांचें शरीर कोणत्याही वेळीं रोगानें ग्रस्त असून चाललें नसतें. पण वैद्याचें मन जर खराब झालें असलें, तर निष्णातपणानें कोणताही उपचार त्याला करतां येणार नाहीं. कारण वैद्याचें मनच रोग्याचें शरीर बरें करीत असतें.

ग्लॅकान्:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—परंतु न्यायाधीश हा मनानें मनावर सत्ता चालवीत
असतो. म्हणून त्याचें मन लहानपणापासून दुर्गुणी
Steph मनाच्या लोकांमध्यें वाढूं देतां कामा नये. तसेंच, स्वतःच्या
409 अनुभवावरून त्यानें लोकांचे अपराध शोधून काढण्यांत
हुषार व्हावें, म्हणून स्वतःच सर्व तऱ्हेचे गुन्हे करून
शारिरीक व्याधींच्या बाबतींत चालण्यासारखा स्वानुभव घेऊं नये. जर त्याचें मन, उत्कृष्ठ न्याय देण्याच्या कामांत स्वतःच्या श्रेष्ठत्वानें लायक व्हावयाचें असेल, तर त्या मनाला तारुण्याच्या सुरवातीपासूनच वाईट संवयींच्या कलंकापासून व अनुभवापासून अलिप्त राखलें पाहिजे. चांगले लोक जेव्हां तरुण असतात, तेव्हां वाईट स्वभावाच्या लोकांच्या हिकमतीला सहजपणानें व साधेपणानें बळी पडतात. कारण त्यांना स्वतःला दुष्ट लोकांच्या विकारांची जाणीव नसते,

ग्लॅकान्--खरेंच. ते अशा रीतीनें फसविले जाणें शक्य असतें.

सॉक्रे०:—म्हणून चांगला न्यायाधीश होण्यास मनुष्य तरुण असतां कामा नये, उलट तो वृद्ध असला पाहिजे. अन्याय म्हणजे काय ह्याचें ज्ञान त्यानें आयुष्याच्या वृद्धापकाळापर्यंत मिळविलें पाहिजे आणि तें सुद्धां, स्वतःच्या नव्हे तर इतरांच्या आत्म्यामध्यें रहाणाऱ्या अन्यायाच्या स्वरूपाचें वाईट दृश्य पुष्कळ वर्षें पहात राहूनच मिळविलें पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे स्वानुभवानें न मिळवितां ज्ञानानें मिळविलें पाहिजे.

ग्लॅकान्:—खरोखरच. न्यायाधीशाचा हा उत्तम आदर्श होय.

सॉक्रे०:—आणि चांगल्या स्वभावाचाही होय. ज्याचा आत्मा चांगला तो सज्जनच असतो. पण तुमचा हुषार व संशयी न्यायाधीश, स्वतः पुष्कळ गुन्हे केलेला असतो आणि जेव्हां स्वतःप्रमाणेंच असलेल्या लोकांचा न्याय त्याला करावयाचा असतो, तेव्हां तो आपणास ज्ञानी व हुषार समजून, स्वानुभवामुळें आश्चर्यकारक हुषारी दाखवितो. तथापि जेव्हां वृद्ध व सद्गुणी मनुष्यांशीं त्याचा संबंध येतो, तेव्हां स्वतः जवळ सद्गुणाचा आदर्श नसल्यामुळें, अकालीं संशय घेऊन व सुस्वभावाचें अज्ञान दाखवून, तो आपल्या मूर्खपणाचें प्रदर्शन करतो. चांगल्या लोकांपेक्षां त्याचा दुष्ट लोकांशीं अधिक संबंध येत असल्यामुळें, तो आपणास हुषार समजतो आणि इतरांनाही तो मूर्ख वाटण्याऐवजीं हुषार आहे असें वाटतें.

ग्लॅ:०—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे:०-तर मग, अशा तऱ्हेच्या मनुष्याऐवजीं, आपण पूर्वीं वर्णन केलेल्या वर्गांतीलच मनुष्य, शहाणा व चांगला न्यायाधीश होईल, असें समजणें बरोबर आहे. कारण दुर्गुणाला स्वतःचें ज्ञान असलें तरी सद्गुणाचें ज्ञान असणें शक्य नाहीं. पण सुशिक्षित स्वभावाच्या सद्गुणी मनुष्याला, कालांतरानें सद्गुणाचें व दुर्गुणाचेंही ज्ञान होईल. माझ्या

मतें, सद्गुणी मनुष्यच उत्तम न्यायाधीश होईल, दुर्गुणी मनुष्य कधींही होणार नाही.

ग्लॅ:०—मला तुमचें म्हणणें पटतें.

सॉक्रे:० —तर मग, तुमच्या शहरामध्यें, वैद्यकी व कायदा, हे दोन धंदे, आपण वर्णिलेल्या स्वरूपाचे ठेवणार नाहीं काय ? त्यांचा उपयोग, जे मनानें व शरीरानें सुस्थितींत असतील, अशा नागरिकानांच करूं द्यावयाचा. जे शरीरानें वाईट असतील, त्यांना मरूं द्यावयाचें व स्वभावतःच जे दुर्व्यसनी व सुधारणा होण्यास अशक्य, अशांना खरोखरच मारून टाकावयाचें, असें तुम्ही कराल ना ?

Steph ग्लॅ:—होय, हाच मार्ग रोग्यांच्या व राज्याच्या
410 हिताच्या दृष्टीनें सर्वांत उत्तम असा आहे.

सॉक्रे:०—ज्या साध्या संगीतानें आत्म्यामध्यें सभ्यता उत्पन्न होते, तें ( संस्कृति ) संगीत, जोपर्यंत तरुण लोक उपयोगांत आणीत आहेत, तोपर्यंत कायद्याची मदत घेण्यास ते नाखूष असतील.

ग्लॅ.० – निःसंशय.

सॉक्रे०:—संगीतामध्यें प्रवीणता मिळविलेल्या विद्यार्थाला, आत्यंतिक प्रसंगाशिवाय वैद्यकीय मदत लागणार नाहीं, इतका व्यायामाचा व्यासंग ठेवणें, अशक्य आहे काय ?

ग्लॅ०:—नाहीं. शक्य आहे.

सॉक्रे०:—शिवाय व्यायाम व मेहनत घेताना, त्याचा हेतु शक्ति कमावण्याऐवजीं स्वतःमधील तेजस्वी वृत्ति संवर्धित करण्याचाच असेल. आणि म्हणून तालीमबाज लोकांप्रमाणें, विशिष्ट प्रकारचें अन्न खावून केवळ शक्ति मिळविण्याकरितां तो व्यायाम करणार नाहीं.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, मी असें विधान करतों कीं, संगीत व व्यायाम ह्यांच्या शिक्षणाची योजना करणाऱ्या लोकांना, संगीताचा उपयोग

आत्म्याच्या सुधारणेकरितां असून, व्यायामाचा उपयोग शरीर सुधारणें-करितां असतो, हें तत्व माहीत नसतें व तसा त्यांचा उद्देशही नसतो.

ग्लॅ०—असा जर त्यांचा उद्देश नसेल, तर दुसरा कोणता असणार ?

सॉक्रे०:—कदाचित् दोन्ही विषय ते आत्म्याकरितांच सुरू करीत असतील.

ग्लॅ०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—ज्यांना सर्व आयुष्यामध्यें व्यायामाचीच तेवढी ओळख असून, संगीताची कांहींच नसते, अशा लोकांचे स्वभावविशेष आणि ज्यांचीं मनें ह्याच्या उलट प्रकारचीं आहेत अशांचे स्वभावविशेष, तुम्ही पाहिलेले नाहींत काय ?

ग्लॅ०:—तुम्ही कशा प्रकारचे म्हणतां ?

सॉक्रे०:—पहिल्या प्रकारच्या लोकांमध्यें रांठपणा व चिवटपणा व दुसऱ्या प्रकारच्या लोकांमध्यें नाजूकपणा व सौम्यपणा दिसून येतो.

ग्लॅ०:—होय. जे लोक व्यायामाला केवळ वाहून घेतात, ते लोक असावे त्यापेक्षां अधिक उद्धट होतात व जे लोक संगीतालाच वाहून घेतात, ते वाजवीपेक्षां अधिक नाजूक होतात.

सॉक्रे०:—तथापि आपणाला हें माहीत आहे कीं, उद्धटपणा हा तेजस्वी वृत्तीचा गुणधर्म आहे आणि तो योग्य तऱ्हेनें वाढविला असतां शौर्यांत जमा होतो. पण अयोग्य रीतीनें वाढविला असतां, बहुतांशीं कठोर व पाशवी होतो.

ग्लॅ०:—मला असेंच वाटतें.

सॉक्रे०:—सौम्यपणा हा तात्विक स्वभावाचा गुण नाहीं काय ? हा गुण फार उपयोगांत आणला तर नाजूकपणा उत्पन्न होतो; पण योग्य प्रकारें वाढविला, तर त्याचें सभ्यपणा व सुव्यवस्थितपणा ह्यांच्यांत रूपांतर होतें. हें खरें ना ?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पण आपण असें म्हणतों कीं, आपल्या संरक्षकांमध्यें हे दोन्हीही गुण असले पाहिजेत.

ग्लॅ०:—होय. असले पाहिजेत.

सॉक्रे०:—पण त्या दोन गुणांत सुसंगति असावयास नको काय?

ग्लॅ०:—निःसंशय.

Steph 411 सॉक्रे०:—आणि अशी सुसंगति असली, म्हणजे आत्मा नेमस्त व शूर बनत नाहीं काय?

ग्लॅ०—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—पण सुसंगतीचा अभाव असला, म्हणजे आत्मा भित्रा व गांवढळ होत नाहीं काय?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणि जेव्हां मनुष्य संगीताचें आधीन होऊन, मृदु आणि शोकजनक स्वर कर्णेंद्रियांतून वाहवून, आपला आत्मा भरून टाकतो व आपलें सर्व आयुष्य गाणें गुणगुणून आनंद घेण्यांत घालवितो, तेव्हां असा मनुष्य आरंभीं त्याच्यामध्यें असलेल्या तेजस्वी तत्वाला पोलादाप्रमाणें मऊ करतो आणि ह्या तत्वाच्या भागाला ठिसूळ व निरुपयोगी न करतां उपयुक्त करतो. पण जेव्हां संगीतामध्यें तो पूर्ण आसक्त होतो, तेव्हां त्याच्यांतील वरील तेजस्वीपणा वितळून जाऊन, त्याच्या आत्म्याचे स्नायू नाश पावतात व तो एक निर्बल योद्धा होतो.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—त्याच्यामध्यें स्वभावतःच जर तेजस्वीपणा कमी असला, तर असा परिणाम लवकरच घडून येतो; पण जर जास्त असला, तर संगीतानें तो कमकुवत होतो. क्षुल्लक कारणावरून असा मनुष्य रागानें भडकला जातो व तात्काल थंडावलाही जातो. अशा तऱ्हेनें, असे लोक तेजस्वी होण्याऐवजीं शीघ्रकोपी, चिडखोर व खिन्न स्वभावाचे बनतात.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, जर मनुष्य व्यायामाला सर्वस्वी वाहून घेऊन, संगीत व तत्वज्ञान ह्यांच्यापासून अलिप्त राहून चांगल्या खाण्या-पिण्यांत मनसोक्त आनंद घेईल, तर सुदृढ शरीरप्रकृतीमुळें त्याच्यामध्यें आत्मविश्वास व तेजस्वीपणा प्रथम उत्पन्न होऊन, पूर्वीपेक्षां आपण अधिक शूर झालों आहों, असें त्याला वाटूं लागेल.

ग्लॅ०:—होय. असें वाटेल.

सॉक्रे०:—पण संगीत-देवतेला बाजूला सारून, केवळ व्यायामा-मध्येंच लक्ष घातल्याचा परिणाम काय होईल बरें ? त्याच्यामध्यें विद्येची आवड आहे असें जरी गृहीत धरलें, तरी जर ती ज्ञान, चिकित्सा, वादविवाद व व्यासंग ह्यांनीं कधींही पुरविली गेली नाहीं, तर उत्तेजन व पोषण ह्यांच्या अभावामुळें व इंद्रियें कधींही साफ न केल्यामुळें, ती दुबळी, बहिरी व आंधळी होणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—शेवटीं परिणाम असा होतो कीं, असा मनुष्य तत्वज्ञानाचा द्वेष्टा होऊन अडाणी बनतो. आणि बुद्धिवादाचा त्याग करून, एखाद्या रानटी पशूप्रमाणें, आपला सर्व व्यवहार दांडगाईनें व धसमुसळेपणानें करतो. अज्ञान व वाईट गोष्टी ह्यांच्या वातावरणांत तो राहल्यामुळें, त्याच्यामध्यें बांधेसूदपणा व सौंदर्य कांहीं रहात नाहीं.

ग्लॅ०:—अशीच स्थिती होते.

सॉक्रे०:—देवानें, तेजस्वी व तत्वज्ञानी असे दोन स्वतंत्र स्वभाव वाढविण्याकरितां, मनुष्यांना संगीत व व्यायाम अशा
Steph 412 दोन कला, आत्मा व शरीर ह्यांना वेगवेगळ्या म्हणून नव्हे, ( वेगवेगळ्या समजणें दुय्यम महत्वाचें आहे. ) तर विशेषतः ह्या दोन स्वभावांमध्यें होणारी वाढ अथवा कमतरता योग्य प्रमाणांत राहून, परस्परांमध्यें एकतानता यावी म्हणून दिल्या आहेत.

ग्लॅ०:--होय असें दिसून येतें.

सॉक्रे०:—म्हणून जो मनुष्य, व्यायाम व संगीत ह्यांचा मिलाफ करून, मनावर त्यांचा योग्य परिणाम घडवूं शकतो, अशा मनुष्याला वीण्याच्या तारांवर सूर काढणाऱ्या कलावंतापेक्षांही, अधिक संगीतज्ञ व खऱ्या सुस्वरतेंत पूर्णता पावलेला, असें आपण म्हणूं.

ग्लॅ०:—होय साक्रेटिस, आपणास असें सकारण म्हणतां येईल.

सॉक्रे०:—आपलें आदर्श राज्य टिकावें अशी जर आपली इच्छा असली, तर वरील प्रकारची देखरेख करणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याची आपणास जरूर लागणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—असा अधिकारी आवश्यकच आहे.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें, शिक्षण व व्यायाम ह्यांच्या पद्धतीची आपली रूपरेषा तयार झाली. आतां आपल्या शहरांत कोणते नाच असूं द्यावेत अथवा शिकार, शर्यती वगैरे मर्दानी खेळ कोणते असावेत, ह्यासंबंधीं तपशीलवार विचार करण्याची जरूर नाहीं. कारण वरील प्रकारचे खेळ, आपल्या रूपरेषेप्रमाणें ठरविले असतां, ते शोधून काढण्यास अडचण पडणार नाहीं.

ग्लॅ०:—होय. अडचण पडणार नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. आतां आपण वरील प्रकारचें शिक्षण संपादन केलेल्या लोकांपैकीं, राज्याधिकारी कोण असावेत व प्रजाजन कोण असावेत, हाच प्रश्न विचार करण्यास घ्यावा ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—राज्यकर्ते वृद्ध असले पाहिजेत व प्रजाजन तरुण असले पाहिजेत, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०—आणि त्यांच्यापैकीं उत्तम लोकच राज्यकर्ते असले पाहिजेत.

ग्लॅ०:—हेंही उघडच आहे.

सॉक्रे०:—जे लोक शेतीच्या धंद्याला वाहून घेणारे असतात, तेच उत्तम शेतकरी नव्हेत काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ज्याअर्थी आपणास उत्तम संरक्षकांची जरूर आहे, त्याअर्थी राज्याचें संरक्षण करण्यास जे अत्यंत समर्थ आहेत, असेच लोक आपण निवडले पाहिजेत ना ?

ग्लॅ०: – होय.

सॉक्रे०:—ते बुद्धिमान्, शक्तिमान्, आणि राज्यासंबंधीं काळजी बाळगणारे, असे असावयास नकोत काय ?

ग्लॅ०:—अर्थात् असेच लोक पाहिजेत.

सॉक्रे०:—ज्याविषयीं मनुष्यास प्रेम वाटतें, त्याविषयीं मनुष्याला जास्त काळजी वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—अर्थात् वाटते.

साक्रे०:—आणि ज्याचे हितसंबंध स्वतःच्या हितसंबंधांसारखेच आहेत व ज्याच्या भरभराटींत अथवा विपत्तींत स्वतःचें हितानहित गुरफटलेलें आहे, अशावरच तो खात्रीनें प्रेम करील.

ग्लॅ०:—असेंच.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या संरक्षकांच्या समुदायांतून आपण योग्य परीक्षेनें असेच लोक निवडले पाहिजेत कीं, ज्यांनीं आपल्या सर्व आयुष्यांत राज्याच्या कल्याणाकरितां इतरांपेक्षां अधिक उत्साहानें काम केलें आहे व राज्याच्या अकल्याणाचें काम करण्याचें निग्रहानें नाकारलें आहे.

ग्लॅकान्—होय. हेच लोक योग्य होत.

सॉक्रे०:—आयुष्यांतील प्रत्येक अवस्थेमध्यें, त्यांच्यावर आपण लक्ष ठेविलें पाहिजे आणि ‘ राज्याचें जें हिताचें, तें करणें आपलें कर्तव्य

होय,' अशी बुद्धि ते कायम बाळगतात किंवा मोहामुळें अथवा भीतीमुळें ती सोडून देतात, हें लक्षपूर्वक बघितलें पाहिजे.

ग्लॅकान्—ती सोडून देणें म्हणजे काय?

सॉक्रे०:—मी सांगतों. मनुष्य आपलीं मतें (अथवा निश्चय) स्वेच्छेनें अथवा इच्छेविरुद्ध सोडून देतो. जेव्हां मनुष्याला आपली चूक समजून येते, तेव्हां असत्य मत तो स्वेच्छेनें सोडून देतो. परंतु सत्य मत, हें नेहमीं त्याच्या इच्छेविरुद्धच त्याला सोडावें लागतें.

Steph 413

ग्लॅकान्—'स्वेच्छेनें सोडून दिलेलें' मत, ही कल्पना मला कळली. पण इच्छेविरुद्ध मत सोडून देणें म्हणजे काय, हें मला अजून समजलें नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. चांगल्या गोष्टी मनुष्यांच्या इच्छेविरुद्ध हिरावून घेतल्या जातात आणि वाईट गोष्टी त्यांच्या इच्छेनुसार हिरावून घेतल्या जातात, हें तुम्हांला मान्य आहे ना? आणि असत्याला आपण बळी पडणें, ही वाईट गोष्ट असून, सत्य आपल्याजवळ असणें ही चांगली गोष्ट नव्हे काय? वस्तूंच्या खऱ्या स्वरूपाप्रमाणें जेव्हां त्यांची कल्पना केली जाते, तेव्हां मनुष्याला सत्य समजतें, असें म्हणतां येणार नाहीं काय?

ग्लॅकान्—होय. तुमचें म्हणणें बरोबर आहे. मला वाटतें कीं, मनुष्यांचें खरें मत त्यांच्या इच्छेविरुद्ध हिरावून घेतलें जातें.

सॉक्रे०:—असें जेव्हां होतें, तेव्हां त्याचें कारण चोरी अथवा चेटूक अथवा जुल्म असत नाहीं काय?

ग्लॅकान् —अजूनही मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—मला वाटतें, शोकरसप्रधान नाटकांत जशी दुर्बोध भाषा असते, तशी भाषा मी वापरीत आहे. ज्या मनुष्यांचा विश्वास वादविवादानें नाहींसा होतो किंवा कालांतरानें विस्मृतीमुळें निघून

जातो, अशा लोकांचींच मतें चोरलीं जातात, असें मी म्हणतों. आतां मला वाटतें, तुम्हला माझें म्हणणें समजलें असेल.

ग्लॅ०:—होय. समजलें.

सॉक्रे०:—ज्यांच्यावर जुल्म केला जातो असें मी म्हणतों, ते लोक म्हणजे ज्यांचीं मतें दुःखानें अथवा शोकानें बदललीं जातात असे होत.

ग्लॅ०:—हें मला समजलें. तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि जे मोहून जातात, ते सुखाच्या फुसलावणीनें अथवा भीतीच्या जबरीनें, आपलीं मतें बदलणारे असतात.

ग्लॅ०:—होय. जें फसवितें, तें मोहविणारें असतें.

सॉक्रे०—राज्याचें जें हिताचें म्हणून वाटतें, तें करणें आपलें कर्तव्य होय, अशी ज्यांची मनापासून समजूत आहे, असे उत्तम संरक्षक कोण आहेत ते आपण शोधले पाहिजेत. ज्या गोष्टींमुळें त्यांचा वरील निश्चय नाहींसा होईल अथवा ते फसविले जातील, अशा गोष्टींच्या वातावरणांत त्यांना लहानपणापासून ठेवून, आपण त्यांच्यावर पहारा ठेवला पाहिजे. ज्यांची स्मरणशक्ति भक्कम असून जे फसवणुकीला बळी पडणार नाहींत, असे लोकच त्यांतून निवडून काढून बाकीच्यांना आपण वगळलें पाहिजे. असेंच ना ?

ग्लॅ०—होय.

सॉक्रे०—श्रम, त्रास व वाग्युद्ध, ह्यांच्या वातावरणांत त्यांना ठेवून, त्यांच्या स्वभावाची आपण परीक्षा घेतली पाहिजे.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—तिसरी परीक्षा अशी कीं, त्यांना चेटूक कर्मांत वेष्टून, त्यांचें वर्तन कसें आहे तें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें, उमद्या घोड्यांना गोंगाट आणि कल्लोळ ह्यांच्या सान्निध्यांत नेऊन, ते भित्रे आहेत किंवा नाहींत हें परीक्षलें जातें, त्याप्रमाणें आपलया तरुण लोकांना भीतीप्रद

वस्तूंच्या सान्निध्यांत आणून व नंतर सुखाच्या देखाव्यांत फिरवून, त्यांची सोनें अग्नीमध्यें परीक्षलें जातें त्यापेक्षांही अधिक कसोशीनें परीक्षा घेतली पाहिजे. अशा परिस्थितींत ते चेटुकीला बळी न पडतां, चांगल्या वर्तनानें राहून, स्वतःचे व त्यांनीं शिक्षण घेतलेल्या संस्कृतीचेही संरक्षक बनून, लय आणि स्वरमेळ ह्यांचे नियम प्रत्येक
Steph 414 प्रसंगीं अनुसरून, स्वतःला व राज्याला उपयुक्त होतात किंवा होत नाहींत, हें आपण पाहिलें पाहिजे. बाल्य, तारुण्य व प्रौढता, अशा अवस्थांमधून वेळोवेळीं परीक्षा घेतली जात असताना, जो मनुष्य परीक्षेंतून कांहींही इजा न होतां बाहेर येतो, त्याला शहराचा राज्यकर्ता व संरक्षक नेमलें पाहिजे. आणि तो मेल्यानंतर, सन्मानानें त्याचा प्रेतसंस्कार करून, त्याच्या स्मृतीचें अभीष्ट चिंतनही केलें पाहिजे. ह्याच्या उलट ज्यांचा स्वभाव असेल, त्यांना काढून टाकलें पाहिजे. ग्लॅकान्, माझ्या मतें, राज्यकर्ते व संरक्षक निवडण्याची ही खरी पद्धत असून, तपशिलांत न शिरतां मी तिची रूपरेखा मांडली आहे.

ग्लॅ:०—मी जवळ जवळ तुमच्याच मताचा आहे.

सॉक्रे:०—राज्यांतील नागरिकांना व बाहेरील शत्रूंना कांहीं अपाय करण्याची इच्छा व शक्ति ज्यांच्या कर्तबगारीमुळें रहाणार नाहीं, अशा लोकांनाच आपण पूर्ण अर्थानें संरक्षक असें नांव देणें, बरोबर होणार नाहीं काय? ज्या तरुण लोकांना आपण आतांपर्यंत संरक्षक म्हटलें आहे व ज्यांचें काम राज्यकर्त्यांच्या ठरावांना पाठिंबा देण्याचें आहे, त्यांना सहाय्यक-संरक्षक म्हणणें बरोबर आहे ना?

ग्लॅ:०—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—प्रसंगोचित असत्याविषयीं, आपण कांहीं वेळापूर्वी बोललों होतों. असें असत्य अमलांत आणण्याची, कांहीं विलक्षण युक्ति आपणाला काढतां येईल काय? आपल्या राज्यकर्त्यांना, निदान शहरांतील

इतर मंडळींना तरी, जी विश्वसनीय वाटेल अशी एखादी तेजस्वी कल्पना, आपणास प्रतिपादतां येईल काय?

ग्लॅ०:—कोणत्या तऱ्हेची कल्पना?

सॉक्रे०: - ती कांहीं नवीन नाहीं. ती फोनिशिअन कल्पना असून, तिची उपयुक्तता पूर्वीच सिद्ध झाली आहे, असें कवी वर्णन करतात व मानवजात त्यावर विश्वास ठेवते. परंतु आपल्या काळांत ती मूर्तस्वरूपांत आलेली नाहीं व येण्याचा संभवही दिसत नाहीं. म्हणून ती विश्वासार्ह आहे, अशी खात्री पटवून देण्यास फार प्रयास पडतील.

ग्लॅ०:—ती सांगण्यास तुम्ही बरेच नाखूष दिसतां!

सॉक्रे०:—मी ती सांगितल्यावर, माझी नाखुषी स्वाभाविक आहे, असें तुम्हाला सुद्धां वाटेल.

ग्लॅ०:—तरी पण निर्भयतेनें तुम्ही ती बोलून दाखवा.

सॉक्रे०:—बरें आहे. मला ती उच्चारून दाखविण्यास धैर्य होईल किंवा नाहीं व शब्द सुद्धां सुचतील किंवा नाहीं, ह्याची खात्री देतां येत नाहीं. पहिल्या प्रथम, राज्यकर्ते आणि लष्करी लोक ह्यांची मनें वळविण्याचा प्रयत्न करून, नंतर मी सर्व लोकांना सांगेन, "जेव्हां आम्ही तुम्हाला शिक्षण देऊन तयार करीत होतों, तेव्हां तुम्हाला आमचें हें करणें खरें वाटत होतें. पण तो निव्वळ भास होता. कारण वस्तुतः, पृथ्वीच्या आंतड्यांत असतानांच तुमचें शिक्षण व तयारी चालली होतीं आणि तेथेंच तुम्ही स्वतः, तुमचें चिलखत व इतर आयुधें व सामुग्री तयार केलीं जात होतीं. जेव्हां तीं पूर्ण तयार झालीं, तेव्हां पृथ्वीमातेनें तुम्हाला पृष्ठभागावर आणलें आणि म्हणूनच ज्या भूमीमध्यें तुम्ही राहतां, तिला आपली जन्मदाती व दाई असें समजून तिच्यावर होणारे हल्ले तुम्ही परतवले पाहिजेत. तसेंच, आपल्या नागरीकांना एकाच भूमीचीं लेंकरें समजून, त्यांच्याशीं बंधुप्रेमानें वागलें पाहिजे.

ग्लॅ०:—ही काल्पनिक उपपत्ति सांगतांना, तुम्हाला संकोच वाटत होता, हें सकारणच दिसतें.

सॉक्र०:—खरें आहे. पण पुढील भाग ऐका. आपल्या लोकांना आपण असें सांगूं—" सर्व नागरीक हो ! खरोखरच तुम्ही सर्व एकमेकांचे बंधू आहांत. परंतु ईश्वरानें जेव्हां तुम्हाला निर्माण केलें, तेव्हां तुमच्यापैकीं अधिकार गाजविण्यास जे लोक योग्य आहेत, अशांमध्यें त्यानें सोनें घातलें व म्हणून ते श्रेष्ठ आहेत. त्यानें साहाय्यक वर्गामध्यें रुपें घातलें व शेतकरी आणि इतर कारागीर ह्यांच्यामध्यें लोखंड व तांबें घातलें. पण तुम्ही एकमेकांचे जरी नातेवाईक असले व तुमचीं मुलें तुमच्याप्रमाणेंच जरी साधारणपणें जन्माला येत असलीं, तरी कधीं असेंही घडून येईल कीं, सुवर्ण मातापितरें रौप्यवर्ण मूल जन्माला आणतील, रौप्यवर्ण आईबाप सुवर्ण मुलास जन्म देतील आणि अशा तऱ्हेनें, प्रत्येक आईबाप वरील निरनिराळया प्रकारच्या मुलांस जन्माला आणतील. म्हणून मुलें जन्माला आल्यानंतर, त्यांच्या आत्म्यांमध्यें वरील धातूंपैकीं कोणत्या धातूचा शिरकाव झाला आहे, हें अत्यंत सूक्ष्मपणें राज्याधिकाऱ्यांनीं पाहिलें पाहिजे, अशी देवांनीं त्याना आज्ञा केलेली आहे. संरक्षकांच्या वर्गामध्यें, जर तांबें व लोखंड ह्यांच्या मिश्रणाचें मूल जन्माला आलें, तर कोणत्याही प्रकारें त्याच्यावर दया न करतां, स्वभावतः त्याची जी किंमत असेल, त्याप्रमाणें कारागीर अथवा शेतकरी वर्गामध्यें तें वरील आज्ञेनुसार अधिकाऱ्यानीं घातलें पाहिजे. आणि जर कारागीर अथवा शेतकरी वर्गामध्यें, सोनें अथवा रुपें ह्यांच्या मिश्रणाचें मूल जन्माला आलें, तर त्याची परीक्षा पाहून, संरक्षक अथवा त्यांचा साहाय्यक वर्ग ह्यांच्यामध्यें त्याला वर चढविलें पाहिजे. कारण भविष्यवाणी अशी आहे कीं, " लोखंड आणि तांबें ह्यांनीं जेव्हां शहर संरक्षिलें जाईल,

Steph 415

तेव्हां त्याचा नाश ठरलेलाच आहे." वरील तऱ्हेचें काल्पनिक असत्य, नागरीकांना विश्वसनीय वाटण्यास लावणारी युक्ति, तुम्हाला सांगतां येईल काय ?

ग्लॅ०:—ज्या लोकांतून आपणास नवें राज्य तयार करावयाचें आहे, अशा लोकांना फसविण्याची युक्ति मला कांहींच सांगतां येणार नाहीं. पण मला वाटतें, त्यांचे मुलगे आणि त्यापुढील सर्व पिढ्या, ह्यांना वरील कल्पनेवर विश्वास ठेवण्यास शिकवितां येईल.

सॉक्रे:० – मला तुमची अडचण समजली. पण नागरीकाना शहराबद्दल व एकमेकांबद्दल काळजी वाटावयास लावण्यास, ह्या कल्पनेचा चांगला उपयोग होईल. असो. ह्या काल्पनिक युक्तीचें काय होईल तें होवो ! आपल्या जन्मभूमीच्या ह्या लेंकरांना आयुधांनीं सज्ज करून, तीं शहरांत येईपर्यंत, अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं ठेवूं. त्यानंतर कायदा उल्लंघन करणाऱ्या नागरीकाचें शासन व लांडग्याप्रमाणें हल्ला करणाऱ्या शत्रूचा प्रतिकार, ज्या जागेहून त्यांना योग्य प्रकारें करतां येईल अशी जागा, त्यांनीं शोधून काढून तेथें तळ द्यावा. तळ दिल्यानंतर, योग्य देवतांची प्रार्थना करून, झोंपण्याच्या जागेची त्यांनीं व्यवस्था करावी. हें सर्व बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—होय. बरोबर आहे.

सॉक्रे०:—हिंवाळयांतील थंडी व उन्हाळयांतील उष्मा, ह्यांच्यापासून संरक्षण होईल, अशाच झोंपण्याच्या जागा त्यांनीं शोधावयास नको काय ?

ग्लॅ०: – निःसंशय. रहाण्याची घरेंच तुम्ही म्हणतां ना ?

सॉक्रे०:—होय. पण ही रहाण्याची 'घरें' श्रीमंत लोकांकरितां नसून, शिपायांना योग्य अशींच असावयास पाहिजेत.

ग्लॅ०: – ह्यांतील फरक कोणता समजतां ?

सॉक्रे०:—तो स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करतों. धनगरांनीं आपल्या मेंढरांचें संरक्षण करण्याकरितां, जर अशा अवलादीचे
steph 416 कुत्रे ठेवले कीं, जे बेफाम स्वभावामुळें अथवा भुकेमुळें अथवा इतर कांहीं वाईट खोडीमुळें, मेंढरांचें रक्षण करण्याऐवजीं त्यांना त्रास द्यावयास लागतील आणि कुत्र्याप्रमाणें वागण्याऐवजीं लांडग्याप्रमाणेंच वागावयास लागतील, तर धनगरांचें हें कृत्य अत्यंत निंद्य होईल, असें मला वाटतें.

ग्लॅकान्—निःसंशयच.

सॉक्रे०:—तर मग, इतर शहरवासीयांपेक्षां जास्त बलवान् असलेला सहाय्यक-संरक्षकांचा वर्ग, शहरवासीयांशीं रानटी क्रूर लोकांप्रमाणें न वागतां, मित्राप्रमाणें वागेल अशी आपण काळजी घेणें जरूर नाहीं काय ?

ग्लॅकान्— होय. आपणास घेतलीच पाहिजे.

सॉक्रे०:—त्यांना जर चांगलें शिक्षण दिलें, तर त्यांच्याकडून चांगल्या प्रकारें संरक्षण होईल ना ?

ग्लॅकान् उद्गारला, "पण ते चांगले संरक्षक आहेतच ! "

मी म्हटलें, "प्रिय ग्लॅकान्, ह्याविषयीं इतका आग्रह किंवा विश्वास बाळगणें बरोबर नाहीं. एकमेकांशीं किंवा संरक्षित लोकांशीं ते नम्रपणानें वागतील, असें योग्य शिक्षण त्यांना दिलें पाहिजे, असें जें आपण थोड्या वेळापूर्वीं म्हटलें, त्या म्हणण्याचें समर्थन करणें मात्र जरूर आहे.

ग्लॅकान्—खरें आहे.

सॉक्रे०:—पण हें शिक्षण देऊनही विचारी मनुष्य असें म्हणेल कीं, त्यांच्या रहाण्याच्या जागा व आर्थिक परिस्थिति, हीं सामान्यतः अशा धोरणानें योजिलीं पाहिजेत कीं, ज्यामुळें ते संरक्षकाच्या कर्तव्यापासून ढळले जाणार नाहींत.

ग्लॅकान्—विचारी मनुष्याचें हें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—संरक्षक लोक जर मी वर्णिलेल्या स्वभावाचे व्हावयाचे असतील, तर त्यांच्या जीवनपद्धतीची व निवासाची माझी पुढील योजना तुम्ही विचारांत घ्या. प्रथमतः, कोणाही संरक्षकाजवळ, शक्यतोंवर, खाजगी मालमत्ता असतां कामा नये. दुसरें असें कीं, इतरांना आंत येण्याची मनाई असेल, असें खाजगी घर किंवा कोठी अशा लोकांजवळ असतां कामा नये. नेमस्त व धैर्यशाली योध्यांना ज्या वस्तु आवश्यक असतात, तेवढ्याच शहरवासी बंधूंकडून त्यांना नोकरीच्या वेतनाप्रमाणें नियमितपणें देण्यांत याव्या. आणि ह्या नेमणुकीची रक्कम अशी असावी कीं, ती वर्षाच्या खर्चानंतर शिल्लकही रहाणार नाहीं अथवा तींत तूटही पडणार नाहीं. त्यांचें खाणें एकत्र असावें आणि लष्कराच्या छावणीप्रमाणें त्यांनीं रहावें. सोनें व रुपें ह्यांसंबंधीं आपण त्यांना असें सांगू कीं, ईश्वरानेंच त्यांच्या आत्म्यामध्यें सोनें व रुपें हे मौल्यवान धातु घातले आहेत व म्हणून अशा तऱ्हेची दैवी देणगी सदैव मिळाली असतां, त्यांना पृथ्वीवरील धातूची कांहीं जरूर नाहीं. आपल्यामध्यें असलेल्या अध्यात्मिक संपत्तीची, मर्त्यलोकांत मिळणाऱ्या सोन्याच्या मिश्रणानें, त्यांनीं भ्रष्टता करतां कामा नये. कारण जगांतील
Steph नाण्यांमुळेंच असंख्य अधर्म्य कृत्यें होत असतात.
417 संरक्षकांचा पवित्रपणा कायम रहावा, म्हणून त्यांनीं सोनें व रुपें ह्यांना स्पर्शसुद्धां करतां कामा नये अथवा इतर लोकांप्रमाणें सोन्याच्या घरांत त्यांनीं रहातां कामा नये अथवा पोषाखावर मौल्यवान अलंकार घालतां कामा नये अथवा मौल्यवान धातूच्या पेल्यांतून पेयें पितां कामा नये. हे नियम जर ते पाळतील, तर ते स्वतःचे व शहराचेही संरक्षक होतील. पण जर ते जमिनी, घरें आणि खाजगी संपत्ति, ह्यांचा संग्रह करावयास लागतील, तर संरक्षक

बनण्याऐवजीं ते गृहस्थाश्रमी व शेतकरी होतील; आणि लोकांचे मित्र होण्याऐवजीं विरोधी शत्रु होऊन बसतील. अशा तऱ्हेनें, इतरांचा द्वेष करीत अथवा स्वतः द्वेषिले जाऊन, इतरांविरुद्ध मसलती करीत अथवा स्वतःविरुद्ध मसलती केल्या जाऊन, शहराबाहेरील शत्रूंच्याऐवजीं घरच्या शत्रूंचीच नेहमीं भीति बाळगून, ते आपलें आयुष्य घालवीत बसतील. आणि त्यामुळें त्यांचा व सर्व राज्याचा विनाशकाळ जवळ येऊन ठेपेल. हीं सर्व कारणें लक्षांत आणलीं असतां, संरक्षकांच्या घरासंबंधीं व इतर कामासंबंधीं आपण केलेली योजना बरोबर असून, त्याप्रमाणें आपण कायदे करावे ना ?

ग्लॅकान्०:--बेलाशक करावे.

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक चौथें

ॲडिमेन्टसनें मध्येंच विचारलें, " सॉक्रेटिस! जर कोणी अशी तक्रार केली कीं, विशेषतः ह्या संरक्षक वर्गालाच तुम्ही दुर्दैवी करीत आहांत, तर तुम्ही काय उत्तर द्याल? शिवाय हे
Steph 419 संरक्षक लोक सुखी नसणें, हा सुद्धां त्यांचाच दोष समजला पाहिजे. कारण, खरें पाहिलें असतां, शहराची मालकी त्यांच्याकडे असूनही, त्यांना मात्र त्यापासून कांहीं फायदा नाहीं. उलट, इतर लोक जमिनी विकत घेऊन, प्रशस्त व सुंदर अशीं घरें बांधतात व तीं सुंदर प्रकारच्या वस्तूंनीं सुशोभित करतात. देवांना संतुष्ट ठेवण्याकरितां यज्ञ करतात, आपल्या इष्टमित्रांना मेजवान्या देतात आणि तुम्ही आतांच म्हटल्याप्रमाणें, खरोखरीचें सोनें व रुपें बाळगून, सुखाला आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तु संग्रहीं ठेवतात. ह्या सर्व गोष्टींवरून, शहरामध्यें निव्वळ भाडोत्री सैन्याप्रमाणें, पहारा करण्याच्या कामाकरितांच, जणूं कांहीं, ह्या संरक्षकांना ठेविलें आहे, असें म्हटलें जाईल.

सॉक्रे०:—होय. आणि ह्या कामाकरितां त्यांना पोटापुरेसें अन्न तेवढें
Steph देण्यांत येतें व इतर लोकांप्रमाणें आणखी वेतन दिलें
420 जात नाहीं. त्यामुळें, इतर सुखी लोकांप्रमाणें स्वतःच्या खर्चानें ते दूरदूरचे प्रवास करण्यास अथवा आपल्या प्रेमपात्रास देणग्या

देण्यास अथवा दुसरी एखादी आवड पुरविण्याकरितां पैसे खर्च करण्यास समर्थ होऊं शकत नाहींत ! तुमच्या टीकेंतून, हे आणि इतरही कांहीं खर्चाचे विषय, तुम्ही सोडून दिले आहेत.

ॲडि०:—आपण अशी कल्पना करूं कीं, त्यांचा वरील टीकेंत समावेश झाला आहे.

सॉक्रे०:—ह्या टीकेला, योग्य उत्तर काय द्यावें, असा तुमचा प्रश्न आहे ना ?

ॲडि०:—होय.

थ्रॅसि०:—मला वाटतें, पूर्वीप्रमाणें आपण विचार केला असतां, आपल्याला योग्य उत्तर सुचेल. तें उत्तर हें कीं, संरक्षक वर्ग वरील परिस्थितींत सुद्धां बहुधा अधिक सुखी असतील. पण आपल्या राज्याच्या घटनेंत, एकाच वर्गाला प्रमाणाबाहेर सुखी करावें, असा उद्देश नसून, सर्व राज्यालाच शक्य तितकें अधिक सुखी करावें, हा आहे. कारण अशा राज्यांतच न्यायाचें अस्तित्व असणार व अव्यवस्थित राज्यामध्यें अन्यायाचें अस्तित्व असणार. या दोन प्रकारच्या राज्यघटनांच्या तुलनेनंतर कोणती राज्यघटना अधिक सुखावह आहे, हें ठरवितां येईल. सध्यां आपण सुखी राज्याची घटना करीत आहोंत. ह्या घटनेंत, कांहीं लोक निवडून काढून, त्यांनाच सुखी करावयाचें असा विचार नसून, सर्व राज्यच कसें सुखी करतां येईल, हें बघावयाचें आहे. मग थोड्या वेळानें, आपण विरुद्ध स्वरूपाच्या राज्याबद्दल विचार करूं. असें समजा कीं, पुतळ्यांना रंग देत असतांना, एखाद्या मनुष्यानें आपणास विचारलें, " ज्याअर्थी शरीराचे अत्यंत सुंदर भाग म्हटले म्हणजे डोळे होत, त्याअर्थी त्याना निळा रंग न देतां काळा रंग कां देतां ? " तर पुढीलप्रमाणें आपण उत्तर दिलें असतां, तें पुरेसें होईल. " महाराज, डोळे डोळयांसारखे दिसणार नाहींत अथवा इतर भाग त्यांच्या वास्तविक स्वरूपासारखे दिसणार नाहींत, अशा रीतीनें आम्ही

त्यांचें सौंदर्य वाढवावें, असें तुम्हाला खासच वाटणार नाहीं. म्हणून प्रत्येक भागाला, योग्य असा रंग देऊन, सर्वच शरीर आमच्याकडून सुंदर व उठावदार केलें जातें किंवा नाहीं, ह्याकडे तुम्ही कृपा करून लक्ष द्या." अशाच प्रकारें, प्रस्तुत प्रसंगीं, आमचे संरक्षक, ज्या सुखामुळें आपला संरक्षकपणा गमावतील, असें सुख त्यांना देण्यास आम्हास भाग पाडूं नका. कारण आम्हाला माहीत आहे कीं, अशा तत्वानुसार आमच्या शेतकऱ्यांनीं पायघोळ कपडे घालून व डोक्यावर सोनेरी मुगुट चढवून, मन मानेल तेव्हां शेती करावी,
Steph 421 असें करतां येईल. तसेंच, आमच्या कुंभारांनीं विस्तवाजवळ आरामशीरपणानें कोचावर बसून दारू प्यावी व मजा मारावी आणि चाक एका बाजूस ठेवून, मर्जीला येईल तेवढेंच काम करावें, असें करतां येईल. अशा तऱ्हेनें, सर्व लोकांस सौख्य अनुभवण्यास देऊन, आम्हाला सर्व शहराला सुखी ठेवतां येईल. पण महाराज, असा उपदेश आम्हाला तुम्ही करूं नका. कारण तुमच्या उपदेशाप्रमाणें आम्ही केलें, तर शेतकरी हा शेतकरी राहणार नाहीं व कुंभार हा कुंभार राहणार नाहीं. तसेंच, ज्या धंद्यांमुळें राज्याची उभारणी होते, ते धंदेही योग्यप्रकारें केले जाणार नाहींत. इतर धंद्यांची दुर्दशा झाली असतां विशेष नुकसान होणार नाहीं. कारण चांभारांमध्यें नालायकी, व्यसनाधीनता व ढोंगीपणा हे दुर्गुण असले, तरी राज्याला त्यांपासून धोका नसतो. पण राज्याचे व कायद्याचे संरक्षक जर निव्वळ दिखाऊ योग्यतेचे असले, तर ते सर्व राज्याचा नाश करतात. खरें पाहिलें असतां, राज्याची भरभराट व सौख्य, संरक्षक वर्गाच्या योग्यतेवरच अवलंबून असतात. राज्याचें नुकसान जे सहसा करणार नाहींत, अशा तऱ्हेचे अस्सल संरक्षक बनविण्याचे आपलें ध्येय आहे. पण आपल्या टीकाकाराचें ध्येय, सणाच्या संमेलनप्रसंगीं, मेजवान्या झोडणाऱ्या शेतकऱ्यांचा वर्ग

निर्माण करण्याचें आहे ! असे लोक राज्याचे नागरीक होण्यास अपात्र असून, अशा लोकांचें राज्य, राज्य ह्या संज्ञेस पात्र नाहीं. म्हणून आपल्या संरक्षक लोकांना, सर्वांपेक्षां अधिक सुख मिळवून द्यावयाचें अथवा सर्व राज्यच सुखी करावयाचें, ह्याविषयीं आपण विचार केला पाहिजे. सर्व राज्यच सुखी करावयाचें म्हटलें तर सहकारीसंरक्षक, संरक्षक व इतर लोक, ह्यांचें मन असें वळवलें पाहिजे अथवा त्यांना असें करण्यास भाग पाडलें पाहिजे कीं, ज्यामुळें ते स्वतःचा धंदा उत्तम करण्यापलीकडे कशांतही लक्ष घालणार नाहींत. आणि अशी स्थिति असली, म्हणजे राज्याची भरभराट होऊन प्रत्येक वर्गाला योग्य प्रकारें व शक्य तितकें सौख्य अनुभवितां येईल.

ॲडि०:—तुम्ही म्हणतां तें अगदीं बरोबर आहे, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—अशा प्रकारचें दुसरें एक तत्व तुम्हाला समाधानकारक वाटेल किंवा नाहीं, याची मला शंका आहे.

ॲडि०:—तें कोणतें ?

सॉक्रे०:—इतर कारागीर पुढील कारणांनीं बिघडले जातील किंवा नाहीं, ह्याचा तुम्ही विचार करा.

ॲडि०:—कोणतीं कारणें तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—संपत्ति व दारिद्र्य.

ॲडि०:—ह्यांमुळें ते कसे काय बिघडले जातील ?

सॉक्रे०:—कुंभार श्रीमंत झाल्यावर आपल्या धंद्याकडे लक्ष लावील, असें तुम्हाला वाटतें काय ?

ॲडि०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—पूर्वींपेक्षां तो अधिक आळशी व निष्काळजी होईल ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—ह्यामुळें तो वाईट कुंभार होणार नाहीं काय ?

ॲडि०:—होय. वाईट होईल.

सॉक्रे०:--ह्याच्या उलट, जर दारिद्र्यामुळें, हत्यारें व धंद्याला लागणारीं इतर साधनें त्याला घेतां आलीं नाहींत, तर हलक्या प्रतीच्या जिनसा तो तयार करील व त्याच्या मुलांना व हाताखालील उमेदवारांना, चांगल्या प्रकारचें धंदेशिक्षण त्याच्याकडून मिळणार नाहीं.

ॲडि०: - हें उघडच आहे.

सॉक्रे०:—तर मग, संपत्ति व दारिद्र्य, ह्या दोन कारणांनीं कारागीर व त्यांचीं कामें बिघडलीं जातात.

ॲडि०:--होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—आपल्या संरक्षकांनीं ज्या अनर्थांची काळजी घेतली पाहिजे, तीं आपणांस सांपडलीं. ह्यांच्यावर त्यांनीं पहारा ठेवून, शहरामध्यें त्यांचा प्रवेश होऊं देतां कामा नये.

ॲडि०:—हे अनर्थ कोणते ?

सॉक्रे०:—संपत्ति व दारिद्र्य. कारण संपत्ति, ही चैनबाजी व आळशीपणा निर्माण करते व दारिद्र्य, नीचपणा व व्यसनाधीनता उत्पन्न करतें.

ॲडि०:—बरोबर आहे. पण साक्रेटिस, आपल्या शहरांत संपत्ति
Steph नसल्यामुळें, श्रीमंत व सामर्थ्यवान् राज्याविरुद्ध जर
422 आपल्या शहराला लढाई करण्याचा प्रसंग आला, तर कसें होणार ?

सॉक्रे०:—अशा एकाच राज्याविरुद्ध लढाई करणें कठीण जाईल, पण अशीं दोन असलीं तर सोपें जाईल.

ॲडि०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—प्रथम असें पहा कीं, जर आपल्याला लढणें भाग पडलें, तर आपल्या बाजूला कसलेले योद्धे असतील व आपले प्रतिस्पर्धी निव्वळ श्रीमंतच असतील.

ॲडि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस्, एक निष्णात् मुष्टियोद्धा, मुष्टियुद्धाचें ज्ञान नसणाऱ्या दोन श्रीमंत व लठ्ठ मनुष्यांना, लीलेनें जिंकणार नाहीं काय ?

ॲडि०:—कदाचित्, दोघे एकदम धावून आले असतां जिंकणार नाहीं.

सॉक्रे०:—कां बरें ? सूर्याच्या दाहक उष्णतेंत सामना सुरू असतां, एका प्रतिस्पर्ध्याला दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याच्या पुढें येऊं द्यावयाचें व नंतर त्याच्यावर उलटून त्याला गराडा घालून छापा घालावयाचा. अशा युक्तीचा वारंवार उपयोग करून, वरील दोन प्रतिस्पर्धीच नव्हे तर अधिक प्रतिस्पर्ध्यांनाही असा योद्धा भारी होणार नाहीं काय ?

ॲडि०:—खरोखर ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

सॉक्रे०:—युद्धकलेपेक्षां, मुष्टियुद्धाचें तात्विक व अनुभविक ज्ञान श्रीमंताना अधिक असतें, हें तुम्हाला मान्य आहे ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०—तर मग, आपले कसलेले योद्धे, त्यांच्यापेक्षां दुप्पट व तिप्पट संख्येला भारी होतील, ह्यांत शंकाच नाहीं.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर असल्यामुळें, मी तें मान्य करतों.

सॉक्रे०:—पण अशी कल्पना करा कीं, आपल्या लोकांनीं ह्या दोन प्रतिस्पर्धी शहरांपैकीं, एकाकडे शिष्टमंडळ पाठवून पुढीलप्रमाणें वस्तुस्थिति सांगितली, " आमच्याजवळ सोनें व चांदी मुळींच नसून आम्हाला त्यांचा संग्रह करण्याचीसुद्धां परवानगी नाहीं. म्हणून तुमचें सैन्य घेऊन तुम्ही आम्हाला मिळा व दुसऱ्या शहराची मालमत्ता लुटून तुम्हीच ती सर्व घ्या. " अशी विनंति केल्यावर, क्षीण व किरकोळ अशा कुत्र्यांविरुद्ध युद्ध करण्यापेक्षां, त्यांच्याबरोबर मैत्री करून, लठ्ठ व नाजूक मेंढरांविरुद्ध युद्ध करणेंच, त्या शहराला पसंत पडणार नाहीं काय ?

ॲडि०:—बरोबर आहे. पण एका शहरांत संपत्तीचा संचय झाला असतां, त्यापासून संपत्ति नसलेल्या शहराला धोका नाहीं काय ?

सॉक्रे०:—आपण ज्या तऱ्हेचें शहर रचीत आहों, त्यासारखें जें शहर नसेल त्याला 'एक शहर' असें संबोधणें, अज्ञानीपणाचें आहे !

ॲडि०:—मग तुमचें काय म्हणणें आहे ?

सॉक्रे०:—इतरांना निराळें नांव दिलें पाहिजे. कारण त्यांपैकीं प्रत्येक शहर पुष्कळ शहरांचें बनलेलें असतें. म्हणून सिटीज+(Cities) नांवाच्या खेळाप्रमाणें, एक शहर असें त्याला म्हणतां येत नाहीं. निदान त्यांमध्यें एकमेकांविरुद्ध अशीं दोन शहरें असतात. एक गरीब लोकांचें शहर व दुसरें श्रीमंत लोकांचें शहर. आणि ह्यापैकीं प्रत्येकांत पुष्कळ शहरें असतात. ह्या सर्वांना 'एक शहर' समजण्यांत तुमची निखालस चूक होईल. पण जर
Steph 423 तुम्ही त्यांना पुष्कळ शहरें असें गणलें आणि त्यांपैकीं एका वर्गाला सत्ता, अधिकार व दुसऱ्या वर्गातील लोक दिले, तर तुम्हाला मित्र पुष्कळ मिळतील व शत्रु थोडेच राहतील. आणि जोंपर्यंत तुमचें आदर्श-शहर आतांच घालून दिलेल्या तत्वाप्रमाणें चालविलें जाईल, तोंपर्यंत तें पुष्कळ मोठें असेल. माझें असें म्हणणें नाहीं कीं, तें मोठें आहे अशी त्याची प्रसिद्धी होईल. पण जरी त्यांतील सैन्याची संख्या हजारावर नसली, तरी खऱ्या अर्थानें तें मोठेंच असेल. कारण ग्रीक लोकांमध्यें अथवा रानटी लोकांमध्यें, जरी तुमच्या आदर्श-शहरापेक्षां अनेक पटीनें दिखाऊ मोठीं अशीं पुष्कळ शहरें सांपडलीं, तरी खऱ्या अर्थानें असें मोठें शहर तुम्हाला सहसा दिसणार नाहीं. तुमचें मत भिन्न आहे काय ?

ॲडि०:—अर्थात्च नाहीं.

सॉक्रे०:—आपल्या राज्याचा आकार मर्यादित ठरवून, राज्याची

---

+ चकत्यांनीं खेळला जाणारा एक प्रकारचा खेळ.

जमीनही त्या मर्यादेंतच ठरवावयाची, ह्या हेतूनें आपल्या राज्याधिकाऱ्यांनीं पुढील प्रमाण उपयोगांत आणावें

ॲडि०:—असें कोणतें प्रमाण ?

सॉक्रे०:—जोंपर्यंत ऐक्याचा बिघाड होणार नाहीं, तोंपर्यंतच शहराचा विस्तार होऊं द्यावयाचा, हीच माझ्या मतें योग्य मर्यादा होय.

ॲडि०:—फारच उत्तम प्रमाण आहे.

सॉक्रे०:—शिवाय आपण संरक्षकांना असा हुकूम करूं कीं, शहर फार लहान अथवा फार मोठें नसून, ऐक्य व स्वयंपूर्णता ह्यांनीं विशिष्ट असेल, अशी त्यांनीं काळजी घेतली पाहिजे.

ॲडि०:—त्यांच्यावर ही क्षुल्लक कामगिरी आपण लादीत आहों.

ॲडि०:—ह्यापेक्षांही क्षुल्लक अशी आणखी एक कामगिरी त्यांना सांगावयाची आहे. पूर्वी आपण तिचा निर्देश केलाच आहे. संरक्षकांमध्यें जन्मास आलेल्या कमी प्रतीच्या मुलाला, दुसऱ्या वर्गात त्यांनीं घातलें पाहिजे. तसेंच, दुसऱ्या वर्गात विशिष्ट प्रतीचें उत्तम मूल जन्मास आलें, तर त्याला संरक्षकांच्या वर्गात घातलें पाहिजे. ह्या योजनेमुळें, इतर शहरवासीही आपल्या नैसर्गिक आवडीप्रमाणें, काम करावयास लागतील. प्रत्येकजण आपलें विशिष्ट कार्य करीत राहील आणि तें कार्य करीत असतांना, पुष्कळ माणसांप्रमाणें पुष्कळ कामें न करतां, तो स्वतःचें असें एकच विशिष्ट कार्य करीत राहील. अशा तऱ्हेनें, सर्व शहरांत एकसूत्रीपणा राहून, एकविध शहराची संस्थापना होईल.

ॲडि०:—पूर्वीपेक्षां हें काम कमी महत्वाचें आहे.

सॉक्रे०:—प्रिय ॲडिमन्टस, खरोखर आपल्या ह्या आज्ञा एखाद्याला दुर्धर वाटतील, पण खरोखर त्या तशा नाहींत. जर संरक्षकांनीं एक मुद्दा लक्षांत ठेवला, तर ह्या आज्ञा क्षुल्लक वाटतील. तो मुद्दा मोठा म्हणण्यापेक्षां, आपल्या कामाला पुरेसा म्हणणें अधिक सयुक्तिक आहे.

ॲडि०:—तो मुद्दा कोणता ?

सॉक्रे०:—शिक्षण आणि पालनपोषण. कारण सुशिक्षणामुळें ते विचारी लोक बनले, म्हणजे आतांचे हे सर्व प्रश्न व सध्यां

Steph 424 बाजूला ठेवलेले इतर प्रश्न, त्यांना ताबडतोब सोडवितां येतील. बाजूला ठेवलेल्या प्रश्नांचे विषय म्हणजे स्त्रीपुरुषांचा परस्पर संबंध, विवाह आणि मुलांचे उत्पादन. ह्या सर्व विषयांत त्यांना पुढील म्हणीचा प्रत्यय येईल कीं, मित्रामित्रांमध्यें सर्व वस्तूंवर समाईक मालकी असते.

ॲडि०:—होय. ही योजना बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि खरोखर एकदां राज्य चांगलें चालावयास लागलें, म्हणजे त्याची वाढ वर्तुळाकार प्रगतीनें होते. शिक्षण व पालनपोषण, ह्यांच्या चांगल्या पद्धतीला चिकटून राहल्यानें चांगले स्वभाव उत्पन्न होतात आणि चांगले स्वभाव सुशिक्षणाच्या मदतीनें जास्त चांगले होऊन त्यांच्या प्रजोत्पादनाच्या शक्तीही चांगल्या वाढतात. खालच्या वर्गांतील प्राण्यांमध्येंही आपणांस असेंच दिसून येतें.

ॲडि:—होय. हें स्वाभाविक आहे.

सॉक्रे०:—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, आपल्या राज्यावर देखरेख ठेवणाऱ्यांनीं, पुढील तत्वाला अतिशय चिकटून राहलें पाहिजे. ह्या तत्वाचें संरक्षण अत्यंत महत्वाचें समजून, त्याची हानि होऊं देतां कामा नये. हें तत्व म्हणजे, व्यायाम व संगीतशास्त्र ह्यांच्या ठराविक पद्धतीला चिकटून राहून कोणत्याही प्रकारें त्यांत फरक करूं न देणें. जेव्हां, ‘एखादें नवीन गाणें म्हटलें जाऊन त्याच्या संगीतानें गायक मोहीत होतात,’ तेव्हां गानप्रिय लोकांकडून असें प्रतिपादण्यांत येतें कीं, गायक नवीन गाणीं गात नसून, गाण्याची नवीन पद्धत म्हणून

(1) Odyssey 1. 351.

दाखवीत आहे व म्हणून नाविन्याचा पुरस्कार करण्यांत यावा. पण खरोखर आपण नाविन्याचा पुरस्कार करतांच कामा नये. कारण नवीन तऱ्हेची संगीताची पद्धत, सर्व राज्याचें नुकसान करणारी, म्हणून टाळली पाहिजे. ह्याचें कारण असें आहे कीं, संगीताच्या पद्धतींत फरक केला असतां, त्यापासून महत्वाच्या राजकीय संस्थांवर परिणाम झाल्यावाचून रहात नाहीं. असें निदान डेमानचें म्हणणें आहे व माझा त्यावर विश्वास आहे.

ॲडि०:—ह्या तत्वावर विश्वास ठेवणाऱ्यांपैकीं मीही आहें.

सॉक्रे०:—म्हणून आपल्या संरक्षकांनीं, एखाद्या किल्याप्रमाणें संगीताचें रक्षण केलें पाहिजे.

ॲडि०:—अजाणतेपणानें बेकायदेशीरपणा संगीतामध्यें निःसंशय शिरतो.

सॉक्रे०:—होय. करमणुकीच्या वेषांत तो प्रथम शिरतो व त्यावेळेस तो अपायकारक नाहीं, असें वाटतें.

ॲडि०:—होय. खरें आहे. पण हळुहळु शिरकाव करून तो चालीरीती व आचार ह्यांच्यामध्यें घुसून जातो. चालीरीतींमधून अधिक जोरानें बाहेर पडून तो परस्परसहाय्यक संघांत शिरतो. ह्यांमधून नंतर तो कायदे व राज्यघटना, ह्यांच्यावर आघात करावयास लागून उद्धटपणाचें प्रदर्शन इतकें करतो कीं, त्यामुळें सार्वजनिक व खाजगी गोष्टींची उलथापालथ होऊन जाते.

सॉक्रे०:—हें खरें आहे काय ?

ॲडि०:—होय, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, आपण आरंभीं म्हटल्याप्रमाणें, आपल्या मुलांना
Steph पहिल्यापासून पद्धतशीर करमणुकींतच वाढवावयास
425 नको काय ? कारण करमणुकी जेव्हां गैरशिस्त असतात,

आणि मुलें त्यांचा छंद घेतात, तेव्हां अशीं मुलें राजनिष्ठ व सद्गुणी निघणें अशक्यच असतें.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—पण जेव्हां आपल्या मुलांच्या आयुष्याची सुरवात, योग्य करमणुकींच्या खेळांनीं होऊन, पुढें संगीतामुळें त्यांच्या मनांत राजनिष्ठा शिरते, तेव्हां अगदीं इष्ट परिणाम घडून येतो. कारण एकनिष्ठपणा, त्यांच्या सर्व कृत्यांत दिसून येऊन, त्यांची प्रगति होते. आणि एखादी राजकीय संस्था जर अधोगतीला गेली असली, तर तीही एकनिष्ठपणानें वर आणण्यांत येते.

ॲडि०:—होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:—असे लोक, त्यांच्या पूर्वीच्या लोकांनीं जे नियम क्षुल्लक म्हणून वगळलेले असतात, ते सुद्धां शोधून काढण्याचा प्रयत्न करतात.

ॲडि०:—कोणते नियम तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—वडील माणसांच्या समोर तरुण लोकांनीं दाक्षिण्ययुक्त मौन स्वीकारावें, त्यांना वंदन करावें, ते आंत आले असतां उठून उभें रहावें आणि अशा रीतीनें आपल्या आईबापांना प्रत्येक ठिकाणीं आदर दाखवावा. तसेंच, केसांची रचना विशिष्ट प्रकारें करावी, पोषाख व पादत्राणें विशिष्ट वापरावींत व सामान्यतः शारीरिक सौंदर्य विशिष्ट रीतीनें राखावें, इत्यादि प्रकारचे किरकोळ नियम, वरील लोक करीत बसतात. तुमचें मत असेंच नाहीं काय ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—पण अशा बाबतींत कायद्याचें नियमन असणें मूर्ख-पणाचें होईल, असें मला वाटतें. असें कायदे कोणी करीतही नाहीं, अशी माझी खात्री आहे. शिवाय अशा बाबतींत कायद्यानें केलेले नियम कायम टिकणारेही नसतात.

ॲडि०:—टिकणें शक्यच नसतें.

सॉक्रे:०—ॲडिमेन्टस्, शिक्षणामुळें उत्पन्न झालेली सत्प्रवृत्ति, अशा सामान्य गोष्टींचे नियम ठरवील. कारण सदृश वस्तु, सदृश वस्तूला आकर्षीत असते.

ॲडि:०—खात्रीनेंच.

सॉक्रे:०—आपल्या पद्धतीचा शेवट चांगला अथवा कदाचित् वाईट होणारा असला, तरी तो फार महत्वाचा होईल, अशी आपण आशा बाळगूं.

ॲडि०:—होय. खात्रीनेंच आपणास बाळगतां येईल.

सॉक्रे०:—म्हणून वरील क्षुल्लक बाबतींच्या नियमनाकरितां, कायद्याची मर्यादा वाढवावी, असा प्रयत्न मी करणार नाहीं.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—पण पुनः मला असें सांगा कीं, खाजगी व्यक्तींमध्यें बाजारांत होणारे देवघेवीचे व्यवहार, कारागिरांचे ठराव, अब्रुनुकसानी, मारामारी, कोर्टांतील खटले, पंचांच्या नेमणुकी, जकातीचे प्रश्न, तसेंच बाजारांत अथवा बंदरामध्यें आवश्यक असणाऱ्या दस्तुरीची वसुली, आणि सामान्यतः बाजार, शिपाई, मांडवी व अशांसारख्या संबंधीं नियम, ह्यांविषयीं आपण कायदे करणें महत्वाचें आहे काय ?

ॲडि०: - चांगल्या व सुशिक्षित लोकांना ह्याविषयीं सूचना करण्याची जरूरच नाहीं. कारण जरूरीपुरते कायदे ते स्वतःच करतील.

सॉक्रे०:—होय, माझ्या मित्रा, ज्या तऱ्हेच्या कायद्यांची आपण चर्चा केली, ते कायदे पाळण्याची जर ईश्वर त्यांना शक्ति देईल, तर असें होईल.

ॲडि०:—नाहींतर पूर्णता मिळविण्याच्या हेतूनें, अशा बाबतींत प्रथम असंख्य कायदे करून नंतर ते सुधारीत बसावयाचें, अशा सतत प्रयत्नांतच ते आपलें आयुष्य घालवितील !

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें असें दिसतें कीं, ज्याप्रमाणें खराब प्रकृति असलेले लोक, आत्मसंयमनाच्या अभावीं, घातकी तऱ्हेचा आयुष्यक्रम सोडूं शकत नाहींत, त्याप्रमाणें ह्या लोकांचें आयुष्य होतें.

ॲडि०:—असेंच.

सॉक्रे०:—खरोखर असे लोक मनोरंजक आयुष्य घालवितात. वैद्य लोकांच्या हातांत ते नेहमीं सांपडलेले असल्यामुळें,
Steph 426 त्यांचें दुखणें बरें तर होत नाहींच, उलट त्यांना होत असलेले रोग जास्त गुंतागुंतीचे व दुःसह असे होतात. इतकी अवस्था होऊनही, त्यांना अशी आशा सदैव वाटत असते कीं, कोणीतरी बरें करणारें औषध आपणांस सुचवील.

ॲडि०:—अशा अशक्त प्रकृतींच्या लोकांचें असेंच वागणें असतें.

सॉक्रे०:—‘जोंपर्यंत तुम्ही दारूबाजी, अधाशीपणा, विषयासक्तता व आलस्य टाकून देणार नाहीं, तोपर्यंत कोणतेंही मांसदाहक औषध अथवा शस्त्रक्रिया अथवा मंत्रताईत अथवा इतर उपाय, ह्यांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं’, असें त्यांना जर कोणी खरें सांगूं लागला, तर त्यांच्याकडून तो शत्रु समजला जाणें मनोरंजक नव्हे काय?

ॲडि०:—हें कांहीं विशेष मनोरंजक नाहीं. कारण जो चांगला उपदेश करतो, त्याच्यावर रागावण्यांत कांहीं मौज नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हाला असे लोक आवडत नाहींत असें दिसतें.

ॲडि०:—खरोखरच मला आवडत नाहींत.

सॉक्रे०: – तर मग, सर्व शहर जर अशा तऱ्हेनें वागूं लागलें तर तें तुम्हाला आवडणार नाहीं. वाईट राज्यपद्धति असलेल्या शहरांत, जर कोणी एखादा मनुष्य राज्यपद्धति बदलण्याचा प्रयत्न करूं लागला, तर त्याला अधिकाऱ्यांकडून देहांत-शासनाची धमकी देण्यांत येत नाहीं काय? ह्याच्या उलट, चालू राज्यपद्धतीप्रमाणें, मोठ्या आनंदानें नोकरी करून, राज्याधिकाऱ्यांची मर्जी राखून, त्यांच्या इच्छेप्रमाणें

वागण्याची हुषारी दाखविणारा मनुष्य, उत्तम, ज्ञानगंभीर आणि सत्काराला पात्र, असा समजला जात नाहीं काय? अशा प्रकारें, आपण वर वर्णिलेल्या लोकांप्रमाणेंच, अधिकारी लोक वागत नाहींत काय?

ॲडि०:—होय. मला स्वत:ला ह्या दोन्ही लोकांमध्यें फरक दिसत नाहीं. अशा प्रकारें वागण्याची पद्धत मला मुळींच पसंत नाहीं.

सॉक्रे०:—पण अशा शहरांची सेवा करण्यास, जे तयार व उत्सुक असतात, त्यांचें धैर्य व कौशल्य तुम्ही वाखाणीत नाहीं काय?

ॲडि०:—मी वाखाणतों. पण पुष्कळ लोकांकडून स्तुति झाली असतां, ते जेव्हां असा चुकीचा समज करून घेतात कीं, आपण खरेच राजकारणी पुरुष आहोंत, तेव्हां मात्र मी त्यांना वाखाणीत नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हीं काय म्हणतां? तुम्हीं त्यांना क्षमा करीत नाहीं काय? मोजमाप कसें करावें, हें ज्याला समजत नाहीं, त्याला जर तशाच अडाणी माणसानीं, तो सहा फूट उंच आहे असें सांगितलें, तर तें खरें न वाटणें शक्य आहे काय?

ॲडि०:—अशक्य आहे.

सॉक्रे०:—तर मग, अशा लोकांवर रागावूं नका. कारण ज्यांना आपल्या क्षुद्र कायदेकानूंच्या ठरावांमुळें व त्यांतील
steph 427 दुरुस्तीमुळें, व्यवहारांमध्यें घडून येत असलेल्या लुचे-गिऱ्या आणि नुकत्याच वर्णन केलेल्या गोंधळ करून सोडणाऱ्या गोष्टी, बंद पाडतां येतील असें वाटतें, ते जगामध्यें मोठे गमतीदार लोक असतात. कारण त्यांना कल्पना नसते कीं, हाइड्राचीं[1] डोकीं तोडण्यासारखाच निष्फळ प्रयत्न ते करीत असतात!

ॲडि०:—खरोखर असेंच ते करतात.

---

1 Hydra. ग्रीक पुराणांतील नऊ डोकीं असलेला जलचर राक्षस. ह्याचें एक डोकें तोडलें असतां दोन डोकीं उगवत.

सॉक्रे०:—म्हणून मला स्वतःला असें वाटतें कीं, कायदा व राज्य-कारभार ह्यांच्या क्षुल्लक बाबतींत, अस्सल कायदेपंडितानें, सुव्यवस्थित अथवा अव्यवस्थित राज्य असलें, तरी लक्ष घालूं नये. कारण अव्यवस्थित राज्य असलें, तर असे नियम निरर्थक असून, त्यांपासून कांहींच फायदा नसतो. आणि सुव्यवस्थित राज्य असलें, तर ह्यांपैकीं कांहीं नियम कोणाही माणसाला सहज शोधून काढतां येऊन, बाकीचे नियम पूर्वी घेतलेल्या शिक्षणाचा परिणाम म्हणून साहजिकच पाळले जातात.

ॲडि०:—तर मग, कायदेपंडित ह्या नात्यानें आपणास काय करावयाचें राहिलें आहे ?

सॉक्रे०:—कांहींच नाहीं. पण डेल्फीयन अपोलोनें, अत्यंत महत्वाचीं, अत्यंत उदात्त व अत्यंत श्रेष्ठ अशीं कायद्याचीं कामें करावयाचीं राहिलीं आहेत.

ॲडि०:—तीं कोणतीं ?

सॉक्रे०:—तीं म्हणजे:—देवळांची उभारणी करणें व देव, देवतुल्य वीरपुरुष, ह्यांच्या सन्मानार्थ यज्ञ व इतर विधी करण्याचें ठरविणें; तसेंच, मृतांना जाळण्याची तऱ्हा व परलोकांतील रहिवाशांची मर्जी संपादन करण्याचे प्रकार ठरविणें—हे विषय आपणाला समजण्यासारखे नाहींत, म्हणून राज्याची स्थापना करीत असताना, आपल्या जुन्या राष्ट्रीय व्याख्यात्याशिवाय, ह्या बाबतींत कोणाचेंच विवरण अथवा उपदेश आपण ऐकूं नये. कारण मला वाटतें, पृथ्वीच्या मध्यभागीं ओम्‌फॅलसच्या जागेवर बसून, हाच देव, मानवधर्माचें विवरण करणारा राष्ट्रीय व्याख्याता होय.

ॲडि०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. आपण असेंच केलें पाहिजे.

सॉक्रे०:—अरिस्टानच्या पुत्रा, आतां आपल्या राज्याची व्यवस्था पूर्ण झाली. आपल्या भावाची, पॉलिमारकसची व इतरांची मदत घेऊन

व जिकडून आवश्यक ज्ञान तुम्हाला मिळवितां येईल तिकडून तें मिळवून, ही व्यवस्था परीक्षून पहाणें, हें तुमचें पुढील काम होय. ह्यांत न्याय व अन्याय कोठें सांपडतात आणि त्यांच्यांत फरक कोठें दिसतो, हें बघून, सर्व देवांना व मानवांना माहीत असो वा नसो, पण ज्या मनुष्याला आपण सुखी असावें, अशी इच्छा आहे, त्यानें न्याय व अन्याय ह्या दोहोंपैकीं कोणाचा आश्रय धरावा, हें तुम्ही ठरविलें पाहिजे.

ग्लॅकान् उद्गारला, " तुम्ही टाळाटाळी करून चालणार नाहीं. सर्व शक्ति न्यायाच्या समर्थनाला जर खर्च केली नाहीं, तर तुमच्या हातून तें एक पातक घडेल असें आम्हांला सांगून, तुम्हीच ह्या चर्चेस सुरवात केली आहे.

सॉक्रे०:—तुम्ही म्हणतां तें मला आठवतें. पण तुम्ही सुद्धां मदत केली पाहिजे.

ग्लॅ०:—आम्ही तुम्हाला मदत करूं.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या शोधाचा विषय आपणांस सांपडेल, अशी मला आशा वाटते. आपलें राज्य बरोबर रीतीनें रचलें गेलें असल्यामुळें, तें एक अत्यंत चांगलें राज्य झालें आहे, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—होय. खरें आहे.

सॉक्रे०:—तें ज्ञानी, शूर, नेमस्त व न्यायी असें असलें पाहिजे, हें उघडच आहे.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—राज्यामध्यें जर ह्या गुणांपैकीं कांहीं गुण आपणास सांपडूं शकले, तर अशोधित असे गुणच काय ते शिल्लक राहतील.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—अशी कल्पना करा कीं, कोणत्याही विषयांत समाविष्ट
Steph असलेल्या चार वस्तु आहेत. आणि आपण ह्या चारां-
428 पैकीं एक वस्तु शोधीत आहोंत. ही चवथी जर आपण

इतर तीहींच्या अगोदर शोधली, तर आपणाला समाधान वाटेल. पण इतर तीन जर आपण अगोदर शोधून काढल्या, तर एवढ्यावरून आपणास जी वस्तु शोधावयाची आहे, ती मिळाल्यासारखी होईल. कारण उरलेली शेवटची तीच ही वस्तु, हें उघडच आहे.

ग्लॅ०—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—ज्या अर्थीं प्रस्तुत प्रश्नांत गुणांची संख्याही चारच आहे, त्याअर्थीं शोध करण्याची हीच रीत आपण स्वीकारली पाहिजे ना?

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—तर सुरवात करूं या. प्रथमतः, आपल्या राज्यांतील सद्गुणांमध्यें, शहाणपणा स्पष्ट दिसून येतो. आणि ह्यासंबंधीं विरोधाभासात्मक अशी एक गोष्ट दिसून येते.

ग्लॅ०:—ती कोणती?

सॉक्रे०:—जें राज्य आपण वर्णिलें, तें खरोखर शहाणें होय. कारण सल्लामसलींत तें दूरदर्शी असतें.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—सल्ल्यामधील दूरदर्शीपणा, हा गुण ज्ञानाचाच एक प्रकार आहे. कारण अज्ञानाऐवजीं ज्ञानच, मनुष्यांना दूरदर्शीपणानें विचार करावयास लावतें.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०: –पण राज्यामध्यें ज्ञानाचे पुष्कळ प्रकार असतात.

ग्लॅ०:—निःसंशय असतात.

सॉक्रे०:—राज्यामधील सुताराजवळ सुतारकीचें ज्ञान असल्यामुळें, राज्य शहाणें किंवा सल्लामसलींत दूरदर्शी असतें, असें समजावयाचें काय?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं. अशा ज्ञानामुळें, राज्याला फार तर चांगल्या सुतारांचें राज्य, म्हणतां येईल.

सॉक्रे०:—तर मग, लाकडांचीं उपकरणें कशीं तयार करतां येतील, अशा योजनेकरितां लागणारें जें ज्ञान, त्या ज्ञानानें राज्याला शहाणें म्हणतां येणार नाहीं.

ग्लॅ०:—अर्थातच नाहीं.

सॉक्रे:०--पितळेचीं अथवा इतर प्रकारचीं उपकरणीं, ज्या ज्ञानामुळें करतां येतात तें ज्ञान तरी अशा महत्त्वाचें होईल काय ?

ग्लॅ:०—नाहीं, मुळींच नाहीं.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें जमिनींतून धान्य कसें उत्पन्न करावें, ह्या विषयींचें ज्ञानही, राज्याला शहाणपणा प्राप्त करून देणार नाहीं. फार तर ह्या ज्ञानानें, राज्य कृषिप्रधान आहे, असें म्हटलें जाईल.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—नवीन व्यवस्थेनें उभारलेल्या राज्यांतील शहरवासीयांच्या एखाद्या तरी वर्गात असें ज्ञान आहे काय कीं, जें राज्यांतील एखाद्या गोष्टीबद्दल नियम करण्याऐवजीं, सर्व राज्यासंबंधीं नियम करून राज्याचें आंतस्थ व परराष्ट्रीय संबंध चांगले राखू शकेल ?

ग्लॅ०:—असें ज्ञान आहे.

सॉक्रे०:—हें ज्ञान कोणतें व तें कोणत्या वर्गात आहे ?

ग्लॅ०:—तें ज्ञान म्हणजे संरक्षणाचें शास्त्र. आणि ज्या लोकांना आपण पूर्ण संरक्षक म्हणून संबोधिलें, त्यांच्या वर्गात तें असतें.

सॉक्रे०:—ह्या ज्ञानामुळें राज्य कोणत्या विशेषणानें संबोधितां येईल ?

ग्लॅ०:—सल्लामसलतींत दूरदर्शी व खरोखर शहाणें असें.

सॉक्रे०:—आपल्या राज्यामध्यें कासार लोकांची संख्या जास्त असेल कीं अस्सल संरक्षकांची असेल ?

ग्लॅ०:—कासार लोकांचीच जास्त असेल.

सॉक्रे०:--तर मग, ज्याना ज्ञानाची कांहीं शाखा माहीत आहे व

ज्याना तज्ञ असें संबोधिलें जातें, अशा वर्गांपैकीं सर्वांत लहान वर्ग संरक्षकांचा होणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. सर्वांत लहान.

सॉक्रे०:—तर मग, अत्यंत लहान पण मुख्य व अधिकारी लोकांचा जो वर्ग असतो, अशा वर्गामध्यें जें ज्ञान असेल त्यामुळेंच

Steph 429 स्वाभाविक रचनेवर उभारलेलें राज्य, एकंदरीनें विचार करतां, शहाणें म्हटलें जाईल. सर्व ज्ञानामध्यें ज्याला शहाणपण असें म्हणतां येईल, अशा ज्ञानाचा अभ्यास करून, तें मिळविण्याचा ज्या वर्गाला अधिकार आहे, त्या वर्गाची संख्या अर्थात् स्वाभाविकपणें कमीच असावयाची.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें, कोणत्यातरी रीतीनें, चार गुणांपैकीं एका गुणाचें आपण संशोधन करून, त्याची राज्यांतील जागा सुद्धां निश्चित केली.

ग्लॅ०:—माझ्या मतें, हें संशोधन समाधानकारक झालें.

सॉक्रे०:—आतां धैर्य हा गुण सांपडण्यास खात्रीनेंच अडचण पडणार नाहीं. तसेंच, तो कोणत्या वर्गांत सांपडून, राज्य शूर लोकांचें आहे असें म्हटलें जाईल, हेंही कळणें कठीण जाणार नाहीं.

ग्लॅ०:—तें कसें ?

सॉक्रे०:—राज्य भ्याड अथवा शूर आहे असें ठरवितांना, जो वर्ग राज्याचें संरक्षण करतो व त्याकरितां लढाईवरही जातो, त्या वर्गाखेरीज दुसऱ्या कोणाकडे लक्ष दिलें जाईल ?

ग्लॅ०: - इतर कोणत्याही वर्गाकडे कोणी लक्ष देणार नाहीं.

सॉक्रे०--नाहींच. कारण राज्याचा भ्याडपणा अथवा शूरपणा, इतर वर्गावरून खात्रीनें ठरवितां येत नसतो.

ग्लॅ०:—होय. असेंच.

सॉक्रे०:--तर मग, राज्यामध्यें शूर व शहाणे अशा लोकांचा वर्ग असतो, म्हणून राज्य शूर व शहाणें म्हटलें जातें. शिवाय त्या वर्गांत अशी एक शक्ति असते कीं, जी कायदेपंडितानें ज्या गोष्टींबद्दल लोकांना भीति वाटली पाहिजे असें सांगितलेलें असतें, त्या गोष्टींविषयीं लोकांनीं भीति बाळगली पाहिजे, अशा मताचें सदोदीत रक्षण करते. हिलाच धैर्य असें तुम्ही म्हणत नाहीं काय ?

ग्लॅ०:—तुम्ही काय म्हणतां तें मला नीट समजलें नाहीं. म्हणून पुन: तुमचें म्हणणें सांगण्याची कृपा करा.

सॉक्रे०:—मी म्हणतों, धैर्य हा एक रक्षण करण्याचा प्रकार आहे.

ग्लॅ०:—कोणत्या तऱ्हेचें ?

सॉक्रे०:—शिक्षणाच्या द्वारें कायद्यानें कांहीं गोष्टी व त्यांचे प्रकार ह्यांविषयीं भीति वाटली पाहिजे, असें मत जें तयार केलेलें असतें, त्याचें रक्षण करणें जरूर असतें. आणि सदोदित अशा मताचें रक्षण केलें पाहिजे, असें जें मी म्हटलें त्याचा अर्थ असा कीं, सुख, दुःख, इच्छा व भीति ह्यांच्या प्रसंगीं, अत्यंत पूर्णपणें अशा मताचे संरक्षण करून कधींही त्याचा त्याग करतां कामा नये. तुम्हाला आवडत असेल, तर एका समर्पक उदाहरणानें मी वर्णन करतों.

ग्लॅ०:—मला आवडेल.

सॉक्रे०:—तुम्हाला माहीत आहे कीं, रंगाऱ्यांना जेव्हां लोंकरीला समुद्रवत् जांभळा रंग द्यावयाचा असतो, तेव्हां ते प्रथम पुष्कळ रंगांतून पांढऱ्या रंगाची लोंकर निवडून काढून, ती खूप मेहनतीनें साफसुफ करतात. हेतु हा कीं, असें केल्यानंतर विशिष्ट रंग शक्य तितका उठावदार व्हावा. त्यानंतर ते रंगविण्यास सुरवात करतात. ह्या पद्धतीनें लोंकर रंगविली म्हणजे रंग पक्का होतो. आणि साबणानें धुतलें तरी त्याची झकाकी जात नाहीं. जांभळा अथवा दुसरा कोणताही रंग अशा पूर्वतयारी शिवाय चांगला पक्का होऊं शकत नाहीं.

ग्लॅ०:—अशा तयारीशिवाय कोणताही रंग अगदीं साफ धुवून जातो.

सॉक्रे०:—जेव्हां आपण योद्धे निवडून काढून त्यांना संगीत व व्यायाम ह्या शास्त्रांमध्यें शिक्षण देत होतों, तेव्हां यथाशक्ति
Steph आपण काय घडवून आणण्याचा प्रयत्न करीत होतों,
430 त्याची वरील उपमेवरून तुम्हाला कल्पना होईल.
आपण असें घडवून आणीत होतों कीं, कायद्यांचा जणूं रंगच योध्यांनीं आत्मसात् केला पाहिजे. हेतु हा कीं, ज्या गोष्टींबद्दल भीति बाळगली पाहिजे अथवा बाळगावयास नको, अशा बाबतींत अथवा इतर बाबतींत, त्यांची मतें योग्य शिक्षणामुळें पक्की राहून, त्यांचा रंग, पुढील रामबाण औषधांनीं सुद्धां धुतला जाऊं नये. हीं औषधें म्हणजे, कोणत्याही खार मिश्रणापेक्षां अधिक जोरानें परिणाम करणारीं अशीं सुखें व जगांतील इतर कोणत्याहि द्रावकरसापेक्षां ज्यांचा अधिक प्रभाव असतो अशीं दुःखें, भीति व इच्छा. ज्यांच्याबद्दल भीति वाटली पाहिजे व ज्यांच्याबद्दल भीति वाटतां कामा नये अशा गोष्टींबद्दल, योग्य व कायदेशीर मतांस सारखें चिकटून राहण्याची शक्ति, हीच धैर्याची व्याख्या मी करतों. आणि तुमची हरकत नसल्यास धैर्य असेंच तिला संबोधितों.

ग्लॅ०:—माझी हरकत नाहीं. कारण अशा गोष्टींबद्दल, शिक्षणाशिवाय योग्य मत, पशूंनीं किंवा गुलामानीं ठरविलें असतां, तें बरोबर होणार नाहीं. त्याला तुम्ही धैर्याऐवजीं निराळें नांव द्याल.

सॉक्रे०:—अगदीं खरें आहे.

ग्लॅकान्:—तर मग, धैर्याचें हें वर्णन मी मान्य करतों.

सॉक्रे०:—शहरवासीयांच्या धैर्याचें वर्णन, म्हणून तरी निदान तुम्ही स्वीकारा. तुमची इच्छा असेल तर पुढें एखाद्या प्रसंगीं, आपण ह्या प्रश्नाबद्दल जास्त विचार करूं. आपल्या चर्चेचा विषय न्याय हा

असल्यामुळें, सध्यां धैर्याची चर्चा करणें अप्रस्तुत होय. मला वाटतें, धैर्याबद्दल आपण पुरेसें विवेचन केलें आहे.

ग्लॅकान्--तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:--राज्यामध्यें दोन गोष्टींकडे आपण पाहिलें पाहिजे. नेमस्तपणा व आपल्या चर्चेला कारणीभूत असलेला न्याय.

ग्लॅकान्:--बरोबर आहे.

सॉक्रे०:--नेमस्तपणाची चर्चा टाकून, दुसऱ्या एखाद्या मार्गानें आपणाला न्याय सांपडूं शकेल काय ?

ग्लॅकान्:--मला स्वतःला शक्यच वाटत नाहीं. आणि जर आपणास नेमस्तपणाविषयीं चर्चा करावयाची नसेल, तर न्यायाला प्रथम उजेडांत आणण्याचीही माझी इच्छा नाहीं. म्हणून माझ्या समाधानाकरितां तरी, न्यायाच्या शोधापूर्वी नेमस्तपणाचा विचार करा.

सॉक्रे०:--मी प्रामाणिक असल्यामुळें माझीही तशीच इच्छा आहे.

ग्लॅकान्:--तर मग, चर्चेस सुरवात करा.

सॉक्रे०:--मी करतों. आपल्या प्रस्तुत मताप्रमाणें, पूर्वी वर्णन केलेल्या गुणापेक्षां, नेमस्तपणाचें एकतानतेशीं अधिक सादृश्य असतें.

ग्लॅकान्--कसें काय ?

सॉक्रे०:--मला वाटतें, नेमस्तपणा म्हणजे व्यवस्थितपणा व कांहीं विशिष्ट सुखांच्या प्रकारांवर व इच्छांवर एकप्रकारचें प्रभुत्व होय. आपण लोकांना असें म्हणताना ऐकतों कीं, मनुष्य ह्या नाहीं त्या अर्थानें, स्वतःवर ताबा राखूं शकतो. अशाच प्रकारचीं इतर वाक्येंही उच्चारलीं जातात. त्यांवरही ह्याच अर्थाचा छाप आपणास दिसतो. असेंच ना ?

ग्लॅ०:--निःसंशय.

सॉक्रे०:--पण 'स्वतःचा धनी' ही भाषा हास्यास्पद नाहीं काय ?

कारण जो मनुष्य स्वतःचा धनी असतो, तो स्वतःचा
Steph 431 गुलामही असतो आणि जो स्वतःचा गुलाम असतो, तो धनीही असतो. कारण ह्या प्रकारच्या भाषेचा विषय स्वतः तोच मनुष्य असतो.

ग्लॅः—निःसंशय.

सॉक्रे०:—माझ्या मतें, ह्या भाषेचा अर्थ असा आहे. मनुष्यामध्यें म्हणजे त्याच्या आत्म्यामध्यें, एक चांगलें तत्व व एक वाईट तत्व अशीं दोन तत्वें असतात. आणि स्वाभाविक चांगलें तत्व जेव्हां वाईट तत्वावर प्रभुत्व गाजवितें, तेव्हां मनुष्याला 'स्वतःचा धनी' असें म्हटलें जाऊन त्याची स्तुति केली जाते. परंतु जेव्हां वाईट शिक्षणामुळें अथवा वाईट संगतीच्या परिणामामुळें, चांगल्या तत्वाची कमी शक्ति वाईट तत्वाच्या अधिक बलानें पराभूत केली जाते, तेव्हां अशा स्थितींत सांपडलेला मनुष्य, निंदाव्यंजक शब्दांनीं वर्णिला जाऊन, त्याला स्वतःचा गुलाम व दुर्वर्तनी मनुष्य असें म्हटलें जातें.

ग्लॅः०—होय. हें वर्णन बरोबर दिसतें.

सॉक्रे०:—आतां आपल्या नवीन राज्याकडे लक्ष द्या. ह्यापैकीं एक स्थिति त्यांत दृष्टोत्पत्तीस येईल. तुम्ही कबूल कराल कीं, ज्या स्थितींत चांगल्या तत्वाचा वाईटावर विजय होतो अशी स्थिति, नेमस्तपणा व स्वप्रभुत्व असलेली म्हणून जर वर्णन करतां आली, तर आपलें राज्य 'स्वतःचे धनी' म्हणून म्हणतां येईल.

ग्लॅकान्ः०—तुमच्या म्हणण्यांतील सत्य मी कबूल करतों.

सॉक्रे०:—पुष्कळ व विविध प्रकारचीं सुखदुःखें व इच्छा, मुख्यत्वें-करून मुलें, स्त्रिया व नोकर लोक ह्यांच्यामध्यें आणि नामधारी स्वतंत्र लोकांपैकीं खालच्या वर्गामध्यें आढळतात.

ग्लॅकान्०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—बुद्धि, मत अथवा खरा समज, ह्यांच्या नेतृत्वाखालीं

राहणाऱ्या साध्या व नेमस्त इच्छा, सुस्वभावी व सुशिक्षित अशा थोड्या लोकांतच आढळून येतात.

ग्लॅकान्०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आपल्या राज्यांत या दोन प्रकारच्या इच्छांना जागा असून, बहुजनसमाजाच्या नीचतम इच्छा, अल्पसंख्याकांच्या शहाणपणानें व उच्चतम इच्छांनीं नियंत्रित केल्या जातात.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—जर एखादें राज्य, स्वतःचें व त्यांतील सुखें व इच्छा ह्यांचेंही धनी आहे, असें वर्णितां आलें, तर आपल्या राज्याचें तसेंच वर्णन करतां येईल ना ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ह्याच कारणांवरून त्याला नेमस्तही म्हणतां येईल ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच आपणाला असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—राज्याधिकारी व प्रजा ह्यांच्यापैकीं कोणी राज्य केलें पाहिजे, अशा प्रश्नावर जर कोणत्या राज्यांत एकमत असेल, तर तें आपल्याच राज्यांत होय, असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच मला असें वाटतें.

सॉक्रे०:—शहरवासीयांच्या दोन वर्गांपैकीं कोणत्या वर्गांत नेमस्तपणा वास करतो, असें तुम्ही म्हणाल ? राज्यकर्त्यांमध्यें कीं प्रजेमध्यें ?

ग्लॅ०:—दोन्हीमध्यें, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—नेमस्तपणा हा एकतानतेचा प्रकार आहे, असें जें आपण नुकतेंच म्हटलें, तें खोटें नव्हे, असें आतां तुम्हाला दिसून आलें ना ?

ग्लॅ०:—तें कसें ?

सॉक्रे०:—कारण नेमस्तपणा, हा धैर्य व शहाणपणा ह्यांच्यासारखा नाहीं. धैर्य व शहाणपणा, हे गुण राज्यांतील विशिष्ट

Steph 432 घटकांमध्यें वास करीत असून सुद्धां, सर्व शहर शहाणें व शूर समजलें जातें. पण नेमस्तपणा एकतानतेप्रमाणें सर्व राज्यांत पसरून, बुद्धि, शारिरीक शक्ति, संख्या, संपत्ति अथवा अशा तऱ्हेच्या कांहीं इतर तत्वांवर विभागल्या जाणाऱ्या, अशक्त, सशक्त व मध्यम प्रतीच्या लोकांमध्येंही एकी घडवून आणतो. म्हणून व्यक्ति अथवा राज्य ह्यांच्यामधील स्वाभाविक चांगलें तत्व व स्वाभाविक वाईट तत्व, ह्यांपैकीं कोणी सत्ता गाजवावी ह्याविषयीं जो गुण एकमत करूं शकतो, त्यालाच आपण नेमस्तपणा म्हणूं.

ग्लॅ०:—मी तुमचें म्हणणें पूर्णपणें मान्य करतों.

सॉक्रे०:—ठीक आहे. आपल्या राज्यामध्यें चार तत्वांपैकीं तीन तत्वें आपण शोधून काढलीं. निदान सध्यां तरी अशी आपली समजुत झालेली आहे. आतां ज्यामुळें राज्य सद्गुणी होतें, असें कोणतें तत्व उरलें ? आपण खात्रीनेंच म्हणूं कीं, ' न्याय '.

ग्लॅकान्०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, पारध्यांप्रमाणें आपण आतां झाडीखालीं आलों आहोंत असें समजा ! न्याय आपल्या तावडींतून सुटून दिसेनासा होणार नाहीं, अशी आपण आतां दक्षता बाळगली पाहिजे. ह्याच ठिकाणीं न्याय आहे, ह्यांत संशय नाहीं. म्हणून शोध करून त्याचें दर्शन घेण्याचा जोराचा प्रयत्न करा. कदाचित् तुम्हालाच तो पहिल्या प्रथम दिसेल. तुम्हाला दिसल्याबरोबर मला सूचना द्या.

ग्लॅ०:—त्याचें दर्शन व्हावें, अशी माझी इच्छा आहे. पण ज्याला दाखविलें असतां दिसेल, असा तुमच्या पाठोपाठ येणारा एक मनुष्य म्हणून जर तुम्ही मला समजाल, तर फार बरें होईल.

सॉक्रे०:—माझ्याबरोबर अगोदर प्रार्थना करून, माझ्या पाठोपाठ या.

ग्लॅकान्०:—मी तयार आहें. पण तुम्ही मला मार्ग दाखविला पाहिजे.

सॉक्रे०:—जमीन खरोखर आक्रमण्यास कठीण व झाडीनें व्याप्त अशी आहे. तरीसुद्धां आपण शोध चालूं ठेवला पाहिजे.

ग्लॅकान्०:—होय, ठेवलाच पाहिजे.

ह्याच ठिकाणीं मला अस्फुट दर्शन झालें व मी उद्गारलों, " ओहो ! ग्लॅकान येथें वाट दिसत आहे ! आतां शिकार आपल्या हातून खात्रीनेंच निसटणार नाहीं.

ग्लॅकान्०:—ही चांगली बातमी आहे.

सॉक्रे०:—खरोखर, मोठ्या हास्यास्पद अडचणींत आपण सांपडलों होतों !

ग्लॅकान्०: —कसें काय ?

सॉक्रे०:—कारण भल्या गृहस्था, आतांपर्यंत आपण ज्याचा शोध करीत होतों, तें आपल्या पायासमोर लोळत असूनही आपण त्याकडे बघितलें नाहीं, हें हास्यास्पद नव्हे काय ? ज्याप्रमाणें हातांतच वस्तु असून, लोक तिच्याकरितां इकडे तिकडे शोध करीत सुटतात, त्याप्रमाणें आपण आपल्या वस्तूवर दृष्टि राखण्याचें टाकून, दूर अंतरावर पहात राहलों व म्हणूनच आपल्या शोधांतून आपली वस्तु निसटली.

ग्लॅकान्०: - तुम्ही काय म्हणतां ?

सॉक्रे०:—माझें म्हणणें असें कीं, आपण ज्या वस्तूबद्दल वादविवाद करीत बसलों होतों, ती आपणास ओळखतां आली नाही.

ग्लॅ०:—तुमची प्रस्तावना फार लांबत चालली आहे !

सॉक्रे०:—बरें आहे. माझें म्हणणें ऐकून तें बरोबर आहे किंवा नाहीं हें ठरवा. आपण आपलें काल्पनिक राज्य उभारीत
Steph 433 असतां, सुरवातीसच पुढील तत्व सांगून त्याची पुनरावृत्तीही केली होती कीं, प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक प्रवृत्तीला अनुकूल असा एक विशिष्ट धंदा दिला पाहिजे. ह्या तत्वालाच ' न्याय ' म्हणतात.

सं. ता.

ग्लॅ०:—प्रत्येकानें एकच विशिष्ट काम केलें पाहिजे, असें आपण म्हटलें होतें.

सॉक्रे०: — इतरांच्या धंद्यांत ढवळाढवळ न करतां, प्रत्येकानें आपलें तेवढें काम करीत रहाणें, म्हणजेच न्याय होय असें लोक म्हणत असतात व आपणही असेंच म्हटलें आहे.

ग्लॅ०:—होय, असें आपण म्हटलें आहे.

सॉक्रे०:—मग असें दिसून येईल कीं, विशिष्टप्रकारें आपला धंदा आपण करणें म्हणजे न्याय होय. मी हें कशावरून ठरवितों, हें तुम्हाला माहीत आहे काय ?

ग्लॅ०:—नाहीं. तें सांगण्याची आपण कृपा करा.

सॉक्रे०:—नेमस्तपणा, धैर्य व शहाणपणा हे जे गुण वर्णन केले, ते राज्यांतून बाजूला काढल्यानंतर जो गुण शिल्लक राहतो, तो असाच गुण असला पाहिजे कीं, त्यामुळें वरील तीन गुणांचा प्रवेश शक्य होऊन, त्यांचें रक्षण सुद्धां होईल. आतां आपण म्हटलेंच कीं, चारांपैकीं तीन गुण सांपडल्यानंतर चवथा गुण म्हणजे न्याय होय.

ग्लॅ०:—निःसंशय तोच.

सॉक्रे०:—अधिकारी वर्ग व प्रजा ह्यांच्या मतांमध्यें एकवाक्यता, अथवा कोणत्या गोष्टींची भीति बाळगावयाची व कोणत्या गोष्टींची बाळगावयाची नाहीं अशाविषयीं असलेल्या कायदेशीर श्रद्धेबद्दल सैनिकांची असलेली श्रद्धामूलक चिकाटी, अथवा राज्याधिकाऱ्यांध्यें असलेला शहाणपणा व दक्षता, अथवा राज्यांतील स्त्रिया व मुलें, गुलाम व स्वतंत्र झालेला मनुष्य, कारागीर, अधिकारी व प्रजा, ह्या सर्व लोकांमध्यें ‘ प्रत्येकानें आपलें काम करावें ’ व ‘ दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करूं नये, ’ ह्या तत्वाचें असलेलें अस्तित्व—ह्यावरील चार गुणांपैकीं कोणत्या गुणाच्या अस्तित्वामुळें राज्याचा उत्कर्ष होईल, हें सांगतां येणें कठीण आहे.

ग्लॅ०:--निःसंशय. ह्या प्रश्नाचा निर्णय करणें कठीण आहे.

सॉक्रे०—म्हणून असें दिसतें कीं, राज्याच्या उत्कर्षाची वाढ करीत असतांना, जी शक्ति प्रत्येक व्यक्तीला आपलें काम करावयास लावते ती शक्ति, राज्यांतील शहाणपणा, नेमस्तपणा व धैर्य ह्यांच्याशीं स्पर्धा करील.

ग्लॅ०:--निःसंशय.

सॉक्रे०--वरील सद्गुणांबरोबर स्पर्धा करणारें तत्व, जर कोणतें असेल तर तें न्याय नव्हे काय ?

ग्लॅकान्०: - खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्या प्रश्नाकडे दुसऱ्या दृष्टीनें पाहून, ह्याच निर्णयाला तुम्ही पोंचतां किंवा नाहीं, तें पहा. राज्याधिकाऱ्यांकडे तुम्ही कोर्टांतील खटल्यांचा निकाल करण्याचें काम द्याल ना ?

ग्लॅ०: —अर्थात्च.

सॉक्रे०:--कोणीही दुसऱ्याची वस्तु वापरूं नये अथवा कोणाचीही वस्तु हरण केली जाऊं नये, ह्या तत्वानुसारच त्यांच्याकडून निकाल दिले जातील ना ?

ग्लॅ०:--मुख्यत्वेंकरून असाच त्यांचा प्रयत्न असणार.

सॉक्रे०:—कारण तो न्यायाचा आहे म्हणून ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०—तर मग, ह्या दृष्टीनेंसुद्धां, जें आपलें आहे तें आपल्या
Steph जवळ असणें आणि आपलें आहे तेंच काम करणें
434 म्हणजे न्याय होय, हें मान्य केलें जाईल.

ग्लॅकान्०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आतां माझें मत, तुम्हाला मान्य आहे किंवा नाहीं ह्याचा विचार करा. आपलीं हत्यारें व विशिष्ट कामें ह्यांची अदलाबदल करून

अथवा एकाच मनुष्यानें दोन्ही धंदे त्यांतील फरकांसह करावयाचे असें ठरवून, जर एखाद्या सुतारानें चांभाराचें काम पत्करलें अथवा चांभारानें सुताराचें पत्करलें, तर त्यापासून राज्याचें फार नुकसान होईल काय ?

ग्लॅकान्०:—फार नुकसान होणार नाहीं.

सॉक्रे०:—पण जर एखादा स्वभावसिद्ध कारागीर अथवा शेतकरी, श्रीमंती, मोठ्या नात्याचा संबंध, शरीरसंपत्ति इत्यादि कारणांनीं गर्विष्ठ होऊन सैनिकांच्या वर्गांत शिरूं लागला, अथवा एखादा सैनिक, कायदा करणाऱ्या लोकांमध्यें किंवा संरक्षकांच्या वर्गामध्यें अपात्र असतां शिरूं लागला व असे लोक आपलीं कामें करण्याची शस्त्रें व कर्तव्यें जर बदलूं लागले, अथवा एकच मनुष्य हीं सर्व कामें एकदम करण्याचा प्रयत्न करूं लागला, तर मला वाटतें, तुम्ही माझ्या मताप्रमाणें म्हणाल कीं, असा फरक व दुसऱ्याच्या कामांत होणारी ढवळाढवळ, राज्याच्या हानीला कारण होतील.

ग्लॅ०:—खात्रीनेंच होतील.

सॉक्रे०:—ज्याअर्थी तीन स्वतंत्र वर्ग आहेत, त्याअर्थी ह्यापैकीं कोणत्याही वर्गानें दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणें अथवा दुसऱ्याचें काम करणें, राज्याला अपायकारक असून ती एक अत्यंत वाईट गोष्ट होय.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—स्वतःच्या राज्यासंबंधीं अत्यंत वाईट गोष्ट करणें म्हणजे 'अन्याय' होय, हें तुम्हाला कबूल आहे ना ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे:०—ह्यालाच तर अन्याय म्हणतात. ह्याच्या उलट, आपण असें म्हणूं कीं, व्यापारी, सैनिक व संरक्षक ह्या तीन वर्गांतील लोकांनीं

आपापलें काम करण्याची चिकाटी दाखविणें, ह्यालाच न्याय म्हणतात आणि ह्याच गुणामुळें राज्यही न्यायी बनतें.

ग्लॅ०:—ह्या मताला माझी पूर्ण संमति आहे.

सॉक्रे०:—इतक्या निश्चितपणानें आपण अजून बोलतां कामा नये. जर न्यायाची कल्पना, व्यक्तीमात्राला राज्याप्रमाणें लावतां येऊन, तिचें सत्य प्रस्थापित करतां आलें, तरच आपण निःसंदेह होऊं. नाहींतर नवीन चर्चा सुरू करूं. सध्यां आपण मोठ्या विषयांत जर न्यायाचें स्वरूप सांपडलें तर व्यक्तीमध्यें तें सांपडण्यास सोपें जाईल, अशा हेतूनें जी चर्चा सुरू केली आहे ती पूर्ण करूं. आपणाला मोठ्या विषयामध्यें म्हणजे राज्यामध्यें न्याय दिसून आला आणि म्हणून चांगल्या शहरांत न्याय वसत असलाच पाहिजे, ह्या खात्रीनें आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपण उत्तम राज्याची उभारणी केली. त्यावेळेला आपण जी कल्पना शोधून काढली, ती आतां व्यक्तीमात्राला आपण लावून पाहूं व ती जर व्यक्तीच्या ठिकाणीं जुळली तर आपणाला समाधान होईल. पण त्यांत जर भिन्नपणा दिसून आला, तर आपल्या आदर्श शहराकडे आपण वळूं व आपल्या कल्पनेची पुनः छाननी करूं. राज्य व व्यक्ति ह्यांची उदाहरणें जवळ जवळ मांडून, त्यांचें एकमेकांवर घर्षण करूं; म्हणजे ज्याप्रमाणें लांकडाच्या सुक्या तुकड्यांच्या
Steph 435 घर्षणानें विस्तव चमकतो, त्याप्रमाणें अशा घर्षणानें न्याय चमकलेला दिसेल. अशा तऱ्हेनें, न्याय दृश्यमान झाल्यावर, त्याला आपण मनामध्यें भक्कमपणें सांठवून ठेवूं.

ग्लॅकान्०:—तुमच्या कल्पनेंत व्यवस्थितपणा दिसतो. आपण तसें करूं या.

मी विचारण्यास सुरवात केली, "एक मोठी व एक लहान, अशा दोन वस्तु जेव्हां एकाच नांवानें संबोधल्या जातात, तेव्हां एकच नांव जोपर्यंत त्याना लावण्यांत येतें, तोपर्यंत त्या सारख्या असतात कीं भिन्न असतात?

ग्लॅकान्०:—सारख्या.

सॉक्रे०:—तर मग, न्यायी मनुष्य न्यायी राज्यापासून भिन्न असणार नाहीं. कारण न्यायाची कल्पना, ह्या दोघांमध्यें गोंवलेली असल्यानें दोन्हीं सारखींच असणार.

ग्लॅकान्०:—होय.

सॉक्रे०:—ठीक. पण आपण असें ठरविलें कीं, जेव्हां तिन्हीं वर्गांतील लोक आपआपलीं कामें करण्यांत मग्न असतात, तेव्हां राज्य न्यायी असतें आणि ह्याच वर्गांच्या वृत्तींमुळें व स्थितीमुळें तें, नेमस्त, शूर, व शहाणें समजलें जातें.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—व्यक्तीविषयींसुद्धां आपण असें ठरवूं. व्यक्तीच्या आत्म्यामध्यें ह्याच तऱ्हेचे भाग असल्यामुळें, राज्यातील वर्गांना जीं नांवें दिलीं आहेत, तींच ह्या भागांना द्यावींत. कारण ह्या भागांच्या प्रवृत्ती राज्यांतील वर्गांच्या प्रवृत्तींसारख्याच असतात.

ग्लॅ०:—असें असणें साहजिकच आहे.

सॉक्रे०:—मित्रोत्तमा, आत्म्याच्या स्वरूपाविषयीं एका साध्या प्रश्नावर आपण पुन: ठेंचाळलों आहोंत. तो प्रश्न म्हणजे आत्म्यामध्यें असे तीन भाग असतात काय?

ग्लॅ०:—हा प्रश्न, मला वाटतें, इतका सोपा नाहीं. पण साक्रेटिस, लौकिक म्हण अशी आहे कीं, सौंदर्य दुष्प्राप्य असतें.

सॉक्रे०:—असें दिसतें. ग्लॅकान्, तुम्हाला स्पष्ट सांगतों कीं, सध्यां आपण ज्या पद्धतीनें वादविवाद करीत आहोंत, त्या पद्धतीनें ह्या विषयाविषयीं आपणास तंतोतंत सत्य कधींहि मिळणार नाहीं. त्या ध्येयाप्रत नेणारा मार्ग फार दीर्घ व त्रासदायक आहे. तरीसुद्धां, आपल्या हल्लींच्या पद्धतीनें आपण पूर्वींइतकें सत्य गाठूं शकूं, अशी मला खात्री वाटते.

ग्लॅ०:—एवढ्यानें आपलें समाधान होणार नाहीं काय? सध्यां पुरतें तरी माझें समाधान होईल.

सॉक्रे०:—मला मुद्दां एवढ्यांतच समाधान वाटेल.

ग्लॅ०:—तर मग, दिरंगाई न करतां चर्चेस सुरवात करा.

सॉक्रे०:—राज्यामध्यें दिसून येणारे स्वभाव-विशेष, आपल्या प्रत्येकामध्यें दिसून येत नाहींत, असें आपणास म्हणतां येईल काय? मला वाटतें, राज्यामध्यें हे जे स्वभावविशेष अस्तित्वांत आले, ते व्यक्तीखेरीज दुसऱ्या कोठून आलेले नाहींत.

Steph 436

राज्यामध्यें असलेल्या तेजस्वी तत्वाचा उगम, व्यक्तिमात्रांत सांपडत नाहीं, असें समजणें हास्यास्पद आहे. कारण थ्रेस, सिथिया आणि मुख्यत्वेंकरून उत्तरेकडचे प्रदेश, ह्यांमध्यें रहाणाऱ्या लोकांचा तेजस्वी स्वभाव विशिष्ट म्हणून समजला जातो. तसेंच, ज्ञानाची आवड मुख्यत्वेंकरून आपल्या देशांतील लोकांना व संपत्तीची आवड फोनिशिअन्स व इजिप्शिअन लोकांना, विशेषतः असते असें समजण्यांत येतें.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ही गोष्ट सत्य असून कळण्यास सोपी आहे.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आपल्या सर्व क्रिया, एकाच वरिष्ट शक्तीनें घडून येत असतात, कीं त्या तीन स्वतंत्र शक्तींनीं घडून येत असतात, अशी शंका ह्या ठिकाणीं उपस्थित होते. एका अंतस्थ शक्तीनें, आपण ज्ञान संपादन करतों, दुसऱ्या शक्तीनें रागावतों व तिसऱ्या शक्तीनें, क्षुधा, तृष्णा व मैथुन, ह्या वासनांची तृप्ति करतों, असें होतें काय? अथवा कोणत्याही क्रियेची प्रेरणा झाल्याबरोबर, ह्या सर्व क्रिया आपला आत्माच करावयास लागतो काय? हे सर्व मुद्दे समाधानकारक रीतीनें सोडविण्याचीच मोठी अडचण आहे.

ग्लॅकान्०:—मला सुद्धां असेंच वाटतें.

सॉक्रे०:—ह्या शक्ती निरनिराळ्या आहेत कीं एकच आहेत, हें ठरविण्याचा आपण प्रयत्न करूं.

ग्लॅकान्०:—तुमची काय योजना आहे ?

सॉक्रे०:—एकाच वस्तूला दोन विरोधी गोष्टी करतां येत नाहींत अथवा एकाच भागामध्यें व एकाच विषयासंबंधीं, दोन विरुद्ध स्थितीं-मध्यें, एक वस्तु जाऊं शकत नाहीं. म्हणून जेव्हां असे विरोधी प्रकार आपणांस आढळून येतील, तेव्हां आपण असें समजावें कीं, ह्या वस्तु एकच नसून अनेक आहेत.

ग्लॅ०:—ठीक आहे.

सॉक्रे०:—आतां मी काय म्हणतों, ह्याचा विचार करा.

ग्लॅ०:—सांगा.

सॉक्रे०:—एकाच वस्तूला, एकाच वेळीं, एकाच भागामध्यें, स्थिर राहणें व गतीमध्यें असणें, शक्य आहे काय ?

ग्लॅ०:—अशक्यच आहे.

सॉक्रे०:—ह्यापेक्षां अधिक स्पष्टपणें जर आपली समजूत झाली नाहीं, तर वादाला सुरवात केल्यानंतर मतभेद होईल. असें समजा कीं, एक मनुष्य स्तब्ध उभा राहून, आपले हात व डोकें हालवीत आहे. असा मनुष्य, एकाच वेळेला स्थिरही आहे व गतिमानही आहे, असें जर म्हणण्यांत आलें, तर त्याला विरोध करून आपण असें म्हणूं कीं, अशा मनुष्याचा कांहीं भाग स्थिर असून कांहीं भाग गतींत आहे. असेंच ना ?

ग्लॅ०: होय. आपण असें म्हणूं.

सॉक्रे०:—विरोध करणारा मनुष्य, आणखी चेष्टा करून असें म्हणूं लागला कीं, एका विशिष्ट जागीं टोंकावर फिरत असलेला भोंवरा, हा

एकाच वेळीं स्थिर असतो व फिरतही असतो, अथवा असें म्हणूं लागला कीं, एकाच जागीं फिरत असलेली कोणतीही वस्तु, ही वरील दृष्टांताचेंच उदाहरण आहे, तर आपण हें त्याचें उदाहरण अमान्य करूं. कारण त्या वस्तु, एकाच भागासंबंधीं स्थितींत व गतींत नसतात. आणि आपण असें उत्तर देऊं कीं, ह्या वस्तूंना व्यास व परीघ असतो. आणि ज्याअर्थी वस्तु कोणत्याही एका बाजूला वांकत नसतात, त्याअर्थी त्यांचा व्यास स्थिर असून, परीघ मात्र वाटोळा फिरत असतो. पण जर फिरण्याची क्रिया चालू राहून, व्यास एकाच वेळीं डाव्या अथवा उजव्या बाजूला, पुढें अथवा मागें वांकत असला, तर मात्र त्या वस्तु कोणत्याही अर्थानें स्थिर आहेत, असें म्हणतां येणार नाहीं.

ग्लॅ०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, एकच वस्तु, एकाच भागामध्यें, एकाच विषया-संबंधीं, दोन विरुद्ध मार्गांनीं परिणाम केली जाईल
Steph 437 अथवा ती स्वतः दोन विरुद्ध प्रकारची होईल अथवा ती दोन विरुद्ध परिणाम घडवून आणील, अशा तऱ्हेनें आपली खात्री करून देण्याचें सामर्थ्य, कोणत्याही आक्षेपांत असूं शकणार नाहीं.

ग्लॅ०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—तथापि, असे आक्षेप विचारांत घेऊन, ते पोकळ आहेत असें सिद्ध करण्यांत वेळ घालविण्याऐवजीं, आपण असें धरून चालूं कीं, हे आक्षेप निरर्थक आहेत व वाद अशा समजुतीवर पुढें चालू ठेवूं कीं, हें तत्व जर असत्य ठरलें, तर ह्या गृहीत तत्वावर उभारलेलीं सर्व अनुमानें कोसळून पडतील.

ग्लॅ०:—होय. हा मार्ग उत्तम आहे.

सॉक्रे०:—बरें आहे. पसंती आणि नापसंती, इच्छा आणि कंटाळा, आकर्षण आणि तिटकारा, हीं परस्परविरोधी द्वंद्वें नाहींत काय?

( तीं परिणामकारक अथवा परिणाम करून घेणारीं असलीं, तरी प्रत्यवाय नाहीं. )

ग्लॅ०:—हीं परस्परविरोधी द्वंद्वें आहेत.

सॉक्रे०:—ठीक आहे. क्षुधा व तृष्णा, सर्वसाधारण इच्छा, तसेंच नुसत्या इच्छा व इच्छेच्या सिद्धीकरितां प्रयत्न करावयास लावणाऱ्या इच्छा, ह्यांना वरील द्वंदांच्या पहिल्या वर्गांत तुम्ही टाकाल ना? उदाहरणार्थ, इच्छेच्या अंमलाखालीं असलेला मनुष्य, इच्छेच्या विषयाच्या प्राप्तीकरितां धडपडत नसतो काय? अथवा जी गोष्ट त्याला पाहिजे असते, तिला तो आपल्याकडे आकर्षून घेत नाहीं काय? अथवा एखाद्या वस्तुच्या प्राप्तीची इच्छा करतांना, इच्छेसंबंधीं जणूं कांहीं मनाला प्रश्न विचारला आहे असें समजून, प्रश्नाला होकारार्थी तो उत्तर देत नसतो काय?

ग्लॅकान्०:—हें खरें आहे.

सॉक्रे०: —कल नसणें, नाखुषी असणें आणि तिटकारा असणें, ह्यांना मानसिक नापसंती व तिटकारा ह्या सदराखालीं घालून, तीं वरील द्वंद्वांतील पहिल्या वर्गाच्या विरुद्ध आहेत, असें तुम्ही समजणार नाहीं काय?

ग्लॅकान्०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, इच्छांचा असा एक वर्ग बनतो व त्यांपैकीं तृष्णा व क्षुधा ह्या अत्यंत विशिष्ट असतात, असें आपण म्हणणार नाहीं काय?

ग्लॅकान्०:—होय. असें आपण म्हणूं.

सॉक्रे०:—एक इच्छा पेयाची व दुसरी अन्नाची असतेना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तृष्णेमध्यें, नुसत्या पेयापलीकडे आणखी कशाची इच्छा असते काय? ह्याचा अर्थ असा कीं, तहान म्हटली म्हणजे उष्ण पेय

अथवा थंड पेय, थोडें अथवा पुष्कळ पेय, अथवा एका शब्दांत म्हणावयाचें म्हणजे एखाद्या विशिष्ट पेयाकरितां तहान, असें म्हणतां येईल काय ? पण तहानेबरोबर उष्णताही भासत असली, म्हणजे थंड पेयाची इच्छा होते आणि थंडी वाटत असली, म्हणजे उष्ण पेयाची इच्छा होते, असें म्हणणें बरोबर आहे. तसेंच तहान पुष्कळ लागली असतां, पुष्कळ पिण्याची इच्छा व कमी लागली असतां, कमी पिण्याची इच्छा होते. परंतु वस्तुतः तहान, स्वतःच्या स्वाभाविक विषयापेक्षां, म्हणजे साध्या पेयापेक्षां अधिक इच्छा करणार नाहीं. तशीच क्षुधाही अन्नापलीकडे इतर कशाचीही इच्छा करणार नाहीं.

ग्लॅकान्०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. प्रत्येक साध्या इच्छेचा विषय साधाच असतो, परंतु विशिष्ट इच्छांचा विशिष्ट विषय असतो.

सॉक्रे०:—मनुष्य नुसत्या तहानेची इच्छा करीत नसून, चांगलें पेय, तसेंच, नुसत्या अन्नाऐवजीं चांगलें अन्न, ह्यांची
steph इच्छा करतो, अशा तऱ्हेचा आक्षेप घेऊन, आपणांमध्यें
438 विचारशक्तीचा अभाव आहे, अशा समजुतीनें कोणीही
आपल्याला अडथळा करूं नये. कारण ज्याअर्थी सर्व लोकांना, चांगल्या गोष्टींची इच्छा असते आणि तहान ही एक इच्छा आहे, त्याअर्थी हें उघडच आहे कीं, ही इच्छा कांहींतरी चांगल्या वस्तूचीच आहे. मग ह्या चांगल्या वस्तूचा विषय, पेय अथवा दुसरें कांहींही असो. हेंच विवेचन सर्व इच्छांना लागूं पडतें.

ग्लॅ०:—वरील आक्षेपांत थोडें तथ्य दिसतें.

सॉक्रे०:—पण असें ध्यानांत आणा कीं, अन्योन्यसंबंधाचे जे शब्द आहेत, त्यापैकीं पहिला शब्द जर विशेषणानें मर्यादित असला, तर दुसराही होतो. पहिला जर केवळ स्वरूपाचा असला, तर दुसराही त्याच स्वरूपाचा होतो.

ग्लॅ०:—तुम्ही काय म्हणतां, तें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०: —'अधिक मोठें' ही संज्ञा सापेक्ष असून, तीपासून दुसऱ्या संज्ञेचा संबंध दर्शविला जातो, हें तुम्हांला समजलें ना?

ग्लॅ०: — अर्थात्च.

सॉक्रे:०—त्यापासून 'अधिक कमी' ह्या संज्ञेचा बोध होतो ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आणि ह्यापेक्षां 'अधिक मोठें,' 'अधिक कमी' दर्शवीत नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—एकदां अधिक मोठें असलेलें, एकदां अधिक कमी असलेलें दर्शवितें, आणि पुढें मोठें होणारें, पुढें कमी होणारें दर्शवीत नाहीं काय?

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—हेंच प्रतिपादन अन्योन्यसंबंध दाखविणाऱ्या, 'अधिक' 'कमी', 'दुप्पट', 'अर्धें', आणि संख्यावाचक सर्व संज्ञांना लागू पडत नाहीं काय? तसेंच, तें अधिक जड, अधिक हलकें, अधिक हळू आणि थंड व उष्ण इत्यादि सर्व विशेषणांना लागू पडत नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय लागू पडतें.

सॉक्रे०:—शास्त्रीय ज्ञानाच्या निरनिराळया शाखांविषयीं काय म्हणतां येईल? हेंच तत्व तेथें लागू पडत नाहीं काय? केवळ ज्ञान, हें ज्ञानगम्य विषयांचेंच असूं शकतें अथवा ज्ञानाचा विषय ज्याला म्हणतां येईल त्याबद्दलच असतें. परंतु विशिष्ट शास्त्र विशिष्ट तऱ्हेचें असलें, तर त्याचा विषयही विशिष्ट तऱ्हेचा असतो. उदाहरणार्थ, घरें कशी बांधावीं ह्याचें शास्त्र निर्माण झाल्यावर, इतर शास्त्रांपासून त्याचा भिन्नपणा ठरून, इमारत बांधण्याचें शास्त्र, म्हणून तें संबोधण्यांत आलें ना?

ग्लॅ०—निःसंशय.

सॉक्रे०—इतर शास्त्रांमध्यें नसलेल्या व त्या शास्त्रामध्यें असलेल्या विशिष्टपणामुळेंच तें स्वतंत्र शास्त्र म्हणण्यांत आलें नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तसेंच हा विशिष्टपणासुद्धां, त्या शास्त्राचा विशिष्ट विषय असल्यामुळेंच दिसून येत नाहीं काय ? इतर सर्व कला व शास्त्रें ह्यांच्याबद्दल आपणास असेंच म्हणतां येणार नाहीं काय ?

ग्लॅ०: – आपणास म्हणतां येईल.

सॉक्रे०: – तर मग, माझ्या म्हणण्याचा वरील प्रकारें अर्थ समजावा. अन्योन्यसंबंध दर्शविणाऱ्या संज्ञांविषयीं असें समजा कीं, त्या संबंधांची पहिली संज्ञा जर निरुपाधिक स्वरूपाची असली तर दुसरीही तशीच असते. दुसरी जर विशेषणांनीं मर्यादित असली तर पहिलीही विशेषणांनीं मर्यादित असते. माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाहीं कीं, दोघांचीं विशेषणें एकच असतात. उदाहरणार्थ, आरोग्यशास्त्र हें निरोगी असतें अथवा रोगांचें शास्त्र रोगट असतें. अथवा असत्‌चें शास्त्र असत् असतें आणि सत्‌चे सत् असतें असा माझा म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण जेव्हां शास्त्र आपला निरुपाधिक विषय सोडून देऊन, एखाद्या विशिष्ट विषयासंबंधीं विचार करावयास लागतें, तेव्हां तें मर्यादित होतें. उदाहरणार्थ, रोगी अथवा निरोगी अवस्थांसंबंधीं जेव्हां एखादें शास्त्र विचार करावयास लागतें, तेव्हां नुसतें शास्त्र असें संबोधिलें जाण्याऐवजीं तें आरोग्यशास्त्र असें संबोधण्यांत येतें.

Steph 439 ग्लॅ०:—मला तुमचें म्हणणें समजलें. शिवाय, तें खरें आहे, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—तहानेबद्दल आतां पुनः विचार करूं. तहानेचें अस्तित्व जर मान्य केलें, तर तिचें सापेक्षत्व दर्शविणारा विषय नसतो काय ?

ग्लॅ०:—होय असतो. माझ्या मतें, पेय हा तिचा विषय होय.

सॉक्रे०:—म्हणून कोणत्याही विशिष्ट पेयाची तहानही विशिष्ट प्रकारची असते. पण निरुपाधिक स्वरूपी जी तहान असते, ती अधिक पेयाकरितां किंवा कमी पेयाकरितां अथवा चांगल्या किंवा वाईट पेयाकरितां नसते. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे, कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या पेयाकरितां नसून केवळ पेयाकरितांच ती असत नाहीं काय ?

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—तहान लागलेल्या मनुष्याच्या आत्म्याला, जोपर्यंत तो तहानलेला आहे, तोपर्यंत पिण्याशिवाय दुसरी कसलीही इच्छा नसते. पिण्याचीच त्याला इच्छा असते आणि पिण्याकडेच त्याची प्रवृत्ति असते.

ग्लॅ०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—म्हणून तृषार्त मनुष्य ज्या गोष्टीमुळें मागें ओढला जातो, ती गोष्ट, त्याला पशूप्रमाणें पिण्याकरितां ओढणाऱ्या तृष्णेच्या तत्वापासून भिन्न असते. कारण आपण म्हटलेंच आहे कीं, एकाच वस्तूनें, एकाच वेळीं, एकाच भागानें, एकाच विषयासंबंधीं, दोन विरुद्ध गोष्टी करणें अशक्य आहे.

ग्लॅ०:—अर्थात्च अशक्य आहे,

सॉक्रे०:—तसेंच धनुर्धारी मनुष्यासंबंधीं जर आपण असें म्हटलें कीं, तो आपल्या हातांनीं एकाच वेळेस धनुष्य स्वतःकडे ओढून घेतो व स्वतःपासून लांबही करतो, तर तें बरोबर होणार नाहीं. कारण वस्तुस्थिति अशी असते कीं, एका हातानें तो धनुष्य स्वतःपासून दूर करीत असतो व दुसऱ्या हातानें स्वतःकडे ओढीत असतो.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—तहान लागलेली असूनही, मनुष्यांना कांहीं वेळां पिण्याची इच्छा नसते, असें होत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. पुष्कळांच्या बाबतींत असें पुष्कळ वेळां घडून येतें.

सॉक्रे०:—ह्या प्रकाराबद्दल असें म्हणतां येणार नाहीं काय कीं, ह्या लोकांच्या आत्म्यांतील एक तत्व त्यांना पिण्याची आज्ञा करतें, पण ह्या तत्वाहून भिन्न व अधिक बलवान् असें दुसरें तत्व, त्यांना पिण्यास मनाई करतें.

ग्लॅ०:—माझें मत हेंच आहे.

सॉक्रे०:—सुखापासून परावृत्त करणारी शक्ती, विवेकबुद्धींतूनच निर्माण होत नाहीं काय ? ह्याच्या उलट, ज्या शक्ती मनाला सुखाकडे ओढून नेतात अथवा प्रवृत्त करतात, त्या विकारी व वाईट अवस्थांमधूनच निर्माण होत नाहींत काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, हीं दोन तत्वें एकमेकांपासून भिन्न आहेत, असें मानावयास आपणास योग्य कारणें आहेत. तसेंच, ज्या आत्म्याच्या भागानें वादविवाद करतां येतो, त्याला विवेचक तत्व म्हणून संबोधणें योग्य होईल. आणि ज्या तत्वामुळें प्रेम, क्षुधा, तृष्णा अथवा इतर वासना अनुभवितां येतात, त्या तत्वाला अविवेकी व विषयोपयोगी तत्व संबोधणें योग्य होईल. कारण अशा तत्वाचें निरनिराळ्या सुखांशीं व चैनींशीं सख्य असतें.

ग्लॅ०:—बरोबर आहे. अशीं दोन स्वतंत्र तत्वें मानणें चुकीचें होणार नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, अशीं दोन तत्वें आत्म्यामध्यें असतात असें सिद्ध झालें. पण ज्यामुळें आपणास राग येतो, असा जो आपल्यांतील तेजस्वीपणा, तो एक भिन्न असें तिसरें तत्व आहे काय ? अथवा वरील दोन तत्वांपैकीं, कोणत्या तत्वाशीं त्याचें सख्य आहे असें समजावें ?

ग्लॅ०:—बहुतकरून विषयोपभोगाच्या तत्वाशीं.

सॉक्रे०:—अशी एक गोष्ट ऐकल्याचें मला आठवतें व तिच्यावर माझा विश्वास आहे. एके दिवशीं, एग्लियानचा पुत्र लिओन्शिअस

परिअसकडून येत होता. बाहेरच्या बाजूनें उत्तरेकडच्या भिंतीजवळ येत असताना, जमिनीवर पडलेलीं मृत शरीरें व त्यांच्या जवळ उभा असलेला मांग, हीं त्याच्या दृष्टीस पडलीं. त्यांच्याकडे बघण्याची त्याला तत्काळ इच्छा झाली, पण लगेच अशा विचाराची त्याला खंत वाटून, आपलें मन दुसरीकडे वळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. कांहीं वेळ आपले डोळे घट्ट मिटून, न पहाण्याचा त्यानें कसून
steph प्रयत्न केला. पण शेवटीं, वरील दृश्य पहाण्याची त्याची
440 इच्छा अनिवार होऊन, स्वतःच डोळे उघडून त्या मृत शरीराकडे तो धांवत गेला आणि उद्गारला, "दुष्ट डोळयांनो! घ्या! ह्या सुंदर देखाव्याच्या दर्शनानें आपली तृप्ति करून घ्या!"

ग्लॅ०:—मी सुद्धां ही गोष्ट ऐकलेली आहे.

सॉक्रे०:—ह्या गोष्टीवरून असें निदर्शनास येतें कीं, दोन स्वतंत्र तत्वें असून, राग कांहीं वेळां इच्छांच्या विरुद्ध युद्ध पुकारतो.

ग्लॅ०:—होय. असें दिसून येतें.

सॉक्रे०:—जेव्हां विवेकबुद्धीच्या आज्ञा धिःकारून, विकारांचें प्राबल्य होतें, तेव्हां मनुष्य स्वतःची निर्भत्सना करतो व विकारांच्या अशा अत्याचारामुळें क्षुब्ध होऊन जाऊन, अशा युद्धामध्यें त्याच्या ठिकाणीं असलेंलें तेजस्वी तत्व विवेकबुद्धीच्या बाजूला वळतें. असा प्रकार आपणास इतर बाबतींतही दिसून येत नाहीं काय? पण जेव्हां बुद्धीची अशी आज्ञा असते कीं, विकारांनीं बुद्धीच्या आज्ञेविरुद्ध वर्तन करतां कामा नये, तेव्हां तेजस्विता विकारांशीं सख्य करते, अशी वस्तुस्थिति, मला वाटतें, तुम्ही स्वतःही अनुभवलेली नसेल व दुसऱ्या कोणाविषयीहीं पाहिलेली नसेल.

ग्लॅ०:—नाहीं. मी पाहिलेली नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, ज्यावेळेस मनुष्य आपलें वर्तन चुकलेंलें आहे

असें समजतो, त्यावेळेस ज्या मानानें त्याचा स्वभाव उदात्त असेल त्या मानानें, त्याला भोगावी लागणारी क्षुधा, थंडी अथवा इतर दुःखें ह्यांच्याबद्दल त्याला राग कमी वाटतो. कारण ज्यानें अशा प्रकारची शिक्षा केलेली असते ती यथायोग्य होय, असा ह्या उदात्त माणसाचा विश्वास असल्यामुळें, त्याच्यामधील तेजस्विता, शिक्षा करणाऱ्या इसमाचा सूड घेण्यास त्याला चेतवीत नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पण ह्याच्या उलट, जेव्हां आपल्याला अन्यायानें वागविण्यांत आलें आहे, असें मनुष्याला वाटतें, तेव्हां तो ताबडतोब गरम होऊन व चरफडावयास लागून, त्याला जी न्यायाची बाजू वाटते त्या बाजूला तो जाऊन मिळत नाहीं काय? तसेंच, जय मिळेपर्यंत क्षुधा तृष्णा व इतर दुःखें ह्यांची तीव्रता, तो सोशीत नाहीं काय? असा मनुष्य, मारीपर्यंत किंवा मरेपर्यंत अथवा धनगर ज्याप्रमाणें आपल्या कुत्र्याला बोलावून आणतो, त्याप्रमाणें त्याच्या विवेकबुद्धीनें त्याला शांत करीपर्यंत, आपल्या उदात्त ध्येयापासून परावृत्त होतो काय?

ग्लॅ०:—वरील दृष्टांत अत्यंत समर्पक आहे आणि म्हणूनच आपल्या राज्यांतील सहाय्यक संरक्षकांना ( कुत्र्याना ), राज्यकर्त्यांच्या ( धनगरांच्या ) आधीन ठेवलें आहे.

सॉक्रे०:—माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हाला बरोबर समजला. पण माझें दुसरें निरीक्षण सुद्धां कळून घेण्याचा तुम्ही प्रयत्न करा.

ग्लॅ०:—कोणतें?

सॉक्रे०—आतांच आपण तेजस्वी तत्वाविषयीं प्रदर्शित केलेलें मत बरोबर उलटें झालें आहे. पूर्वीं आपणांस असें वाटलें कीं, विषयसेवनलोलुप असा त्याचा स्वभाव आहे. पण आपण आतां उलट असें म्हणतों कीं, आत्म्यामध्यें होणाऱ्या लढाईत, बुद्धिवादाच्या तत्वाकडेच तेजस्वीतत्वाचा ओढा असतो.

ग्लॅकान्०:- निःसंशय असतो.

सॉक्रे०:—तर मग, तेजस्वीतत्व विवेचक तत्वापासूनही भिन्न आहे काय ? अथवा तें ह्या तत्वाचाच निव्वळ फेरफार असून, त्यामुळें आत्म्यामध्यें तीन तत्वांऐवजीं दोनच तत्वें, म्हणजे
Steph 441 बुद्धिवादाचें व विषयसेवनाचें, अशीं राहतात काय ? अथवा आपणास असें म्हटलें पाहिजे काय कीं, ज्याप्रमाणें शेतकरी, सहाय्यक व मुत्सद्दी, अशा तीन वर्गांवर राज्य उभारलेलें आहे, त्याचप्रमाणें आत्म्यामध्यें सुद्धां तेजस्विता हें तिसरें तत्व असून, कुशिक्षणामुळें जर तें भ्रष्ट झालेलें नसेल, तर तें विवेचक तत्वाला मदत करणारें आहे ?

ग्लॅकान्०:—होय. हें तिसरें तत्व म्हटलें पाहिजे.

सॉक्रे०:—जर तेजस्वी तत्व, विषयोपभोगी तत्वाप्रमाणेंच विवेचक तत्वापासूनही भिन्न आहे असें ठरलें, तर तें तिसरें तत्व होय.

ग्लॅकान्०:—आणि हें सहजच सिद्ध करतां येईल. कारण लहान मुलांत सुद्धां असें दिसून येतें कीं, जन्मापासूनच त्यांच्यामध्यें तेजस्वीपणा असतो. पण विवेचक तत्व हें त्यांच्यामधील कांहीं जणांना पुष्कळ वर्षांनीं संपादन करतां येतें, तर कांहींना कधींच करतां येत नाहीं.

सॉक्रे०: --खरोखर तुम्ही फार चांगलें बोललांत. हिंस्र पशूंमध्यें सुद्धां तुम्ही म्हणतां तें तेजस्वी तत्व दिसून येतें. पूर्वीं आपण होमरच्या काव्यामधून म्हणून दाखविलेला उतारा, आपल्या मताला आधार देणारा आहे.[1] ‘त्यानें आपल्या छातीवर हात मारून आपल्या आत्म्याचीं निर्भत्सना केली.’ ह्या ओळीमध्यें, कुत्र्याचा चांगलेपणा अथवा वाईटपणा ठरविणारें तत्व, अविचारीपणानें शोक करणाऱ्या तत्वाची निर्भत्सना करीत आहे, असें दाखवून होमरनें वरील दोन तत्वांत फरक करून दाखविला आहे.

---

1 Odyssey XX 17.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—पुष्कळ वेळां गोते खात खात, पण मोठ्या चिकाटीनें आपण आतां किनारा गांठला आहे. राज्यामध्यें असतात त्याप्रमाणेंच व संख्येनेंही तितकेच, प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यांतही वर्ग असतात, असें आतां आपण समाधानकारक रीतीनें ठरविलें आहे.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०—ह्यापासून पुढील निष्कर्ष निघतो. ज्याप्रमाणें आणि ज्यामुळें राज्य शहाणें असतें, त्याप्रमाणें व त्यामुळें व्यक्तीही शहाणी असते. हें विधान बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि ज्याप्रमाणें आणि ज्यामुळें व्यक्ति शूर असते, त्याप्रमाणें आणि त्यामुळें राज्यसुद्धां शूर असतें आणि सद्गुणाला पोषक असें जें एकामध्यें असतें, तें दुसऱ्यामध्येंही असतें.

ग्लॅ०:—असलेंच पाहिजे.

सॉक्रे०:—तर मग, ग्लॅकान्, आपणास असें सुद्धां म्हणतां येईल कीं, ज्याप्रमाणें आपणास राज्य न्यायीपणाचें आढळून आलें त्याचप्रमाणें मनुष्यही न्यायी असतो.

ग्लॅ०:—हा सुद्धां साहजिकच निष्कर्ष आहे.

सॉक्रे०—राज्यांतील तिन्ही वर्ग आपापलीं कामें करीत असतात, म्हणूनच राज्य न्यायी असतें, हें तत्व आपण विसरतां कामा नये.

ग्लॅ०:—होय. विसरतां कामा नये.

सॉक्रे०:—आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, जर मनुष्याच्या स्वाभाविक शक्ती त्यांना योग्य असलेलीं कामें करीत असतील, तर असा मनुष्य न्यायी व आपलें नियोजित काम करणारा होईल.

ग्लॅ०:—निःसंशय. हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

सॉक्रे०:—तर मग, ज्याअर्थीं विवेचक तत्व शहाणें असून, त्याला सर्व आत्म्याची काळजी घ्यावी लागते, त्याअर्थीं त्याचें क्षेत्र अधिकार गाजविण्याचें नाहीं काय? आणि तेजस्वी तत्वानें विवेचक तत्वाशीं सख्य करून, त्याचा नोकर असणें बरोबर नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. खात्रीनेंच.

सॉक्रे०:—कला आणि व्यायामशास्त्र, ह्यांच्या मिश्रणानें ह्या दोन तत्वांमध्यें ऐक्य घडून येणार नाहीं काय? उच्च विचा-
Steph रांच्या आणि शास्त्रीय शिक्षणाच्या योगानें, एका तत्वाला
442 उच्च वातावरणांत नेऊन, दुसऱ्या तत्वाला शांत भाषणानें उपदेश करून, त्यांतील रानटीपणा काढून टाकून, संगीत व व्यायाम शास्त्र ह्या दोन कलांना, ह्यांच्यामध्यें ऐक्य उत्पन्न करतां येणार नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:—हीं दोन तत्वें अशी तयार करण्यांत आल्यामुळें व आपलें काम कसें करावयाचें ह्याचें खरें शिक्षण त्यांना मिळाल्यामुळें, विषय-सेवनाच्या तत्वावर तीं ताबा ठेवूं शकतील. हें विषयसेवनाचें तत्व, प्रत्येक मनुष्याच्या आत्म्याच्या भागांत मोठी जागा बळकावून असून, स्वभावतःच अतृप्त व अत्यंत लोभी असें असतें. वरील दोन तत्वांनीं ह्या तत्वावर बारकाईनें लक्ष ठेवलें, तर शारिरीक सुख-पूर्तीनीं धष्ट व पुष्ट होऊन, आपलें योग्य काम करण्याचें त्याला नाकारतां येणार नाहीं. तसेंच, ज्या वर्गावर अंमल चालविण्याचा त्याला अधिकार नाहीं, अशावर अधिकार मिळविण्याची आकांक्षा बाळगून, सर्व लोकांचें आयुष्य मूलतःच बदलून टाकणें, हेंही ह्या तत्वाला शक्य होणार नाहीं.

ग्लॅ०:—होय. वरील तत्वें असा दाब खात्रीनेंच ठेवतील.

सॉक्रे०:—आत्मा व शरीर ह्यांचें बाहेरील शत्रूंपासून संरक्षण करण्यास, हींच दोन तत्वें योग्य होणार नाहींत काय? त्यांतील एक तत्व

सल्लामसलत करील व दुसरें तत्व अधिकारी सत्तेच्या आज्ञेप्रमाणें मोठ्या शौर्यानें लढाईचें काम करील.

ग्लॅ०:--खरें आहे.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें व्यक्तीमध्यें जें तेजस्वी तत्व असतें, तें जेव्हां सुखाच्या व दुःखाच्या प्रसंगीं, 'कशाला भ्यावें व कशाला भीऊं नये,' ह्याविषयीं विवेकबुद्धीनें केलेल्या आज्ञा एकनिष्ठेनें पार पाडतें, तेव्हांच त्या व्यक्तीला आपण शूर म्हणतों.

ग्लॅ०:—होय, बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि ज्या अधिकारयुक्त अशा लहान भागांतून त्याला ह्या आज्ञा मिळत असतात व ज्या भागाला ह्या तीन तत्वांवर उभारलेल्या व्यक्तीचें व त्यांतील प्रत्येक तत्वाचें हित कशांत आहे ह्याचें ज्ञान असतें, त्या भागाच्या सामर्थ्यावरच मनुष्याला आपण शहाणा म्हणतों.

ग्लॅ०:--बरोबर आहे.

सॉक्रे०:—पुनः असें पहा कीं, ज्या दोन तत्वांवर विवेकबुद्धीच्या तत्वाचा अंमल असतो तीं तत्वें, विवेकबुद्धीला योग्य अधिकारी समजून, जेव्हां तिच्या अधिकाराला विरोध करीत नाहींत, तेव्हां ह्या तत्वांचें सख्य व संगति होते. अशी संगति असली, म्हणजेच आपण मनुष्याला नेमस्त म्हणत नाहीं काय ?

ग्लॅ०--अर्थात्. राज्यामध्यें अथवा व्यक्तीमध्यें असलेल्या नेमस्तपणाचा दुसरा अर्थ शक्यच नाहीं.

सॉक्रे०:—आपण पुनः पुनः वर्णिलेल्या साधनांनीं व मार्गानींच मनुष्य न्यायी होईल.

ग्लॅ०:—निःसंशय होईल.

सॉक्रे०:—आपल्या न्यायाच्या कल्पनेंत असा कांहीं अस्पष्टपणा तुम्हाला वाटतो काय कीं, ज्यामुळें राज्यामध्यें सांपडलेल्या न्यायाच्या तत्वापासून व्यक्तीमात्रांत सांपडणाऱ्या न्यायाची भिन्नता मानावी लागेल ?

ग्लॅ०:—मला असें वाटत नाहीं.

सॉक्रे०:—आपल्या मनांत कांहीं शंका असल्या, तर सामान्य उदाहरणें घेऊन त्या दूर करतां येऊन, आपलें मत पक्कें करतां येईल.

ग्लॅ०:—कोणत्या तऱ्हेचीं उदाहरणें तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—उदाहरणार्थ, न्यायी राज्य आणि शिक्षणानें व स्वभावानें न्यायी राज्यासारखी असणारी व्यक्ति, ह्यांविषयीं जर
Steph आपणास विचारण्यांत आलें, तर न्यायी मनुष्य सोन्याच्या
443 अथवा चांदीच्या ठेवीचा अपहार करण्यास, अन्यायी माणसापेक्षां कमी प्रवृत्त होईल, असें आपण म्हणणार नाहीं काय ? ह्या विधानाला कोणी विरोध करील काय ?

ग्लॅ०:—कोणीही विरोध करणार नाहीं.

सॉक्रे०:—धर्मादायाची चोरी अथवा नुसती चोरी, मित्रांचा विश्वासघात अथवा देशद्रोह, असा मनुष्य करील असें कोणास वाटेल काय ?

ग्लॅ०:—कोणालाही वाटणार नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच, शपथा व करार झालेल्या व्यवहारांमध्यें तो गैरविश्वासूपणा कधींच दाखविणार नाहीं.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें जारकर्म अथवा आईबापांविषयीं अनादर अथवा देवांच्या पूजेबद्दल अनास्था, ह्या बाबतींत तो दोषार्ह कधींच होणार नाहीं.

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—अनुशासित व अधिकारी, ह्या नात्यानें त्याच्यामधील अंतस्थ तत्वें आपापलीं कामें करीत असतात, म्हणून अशा व्यक्तींत वरील प्रकारचा चांगुलपणा निदर्शनास येत नाहीं काय ?

ग्लॅ०:—ह्याचें श्रेय ह्या गोष्टीलाच दिलें पाहिजे.

सॉक्रे०:—अशीं माणसें व अशीं राज्यें उत्पन्न करण्याची, न्याय ही एक शक्ती आहे, ह्यापेक्षां दुसरा कांहीं न्यायाबद्दल खुलासा पाहिजे, असें अजून तुम्हाला वाटतें काय ?

ग्लॅ.० – नाहीं. खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, आपलें स्वप्न खरें झालें अथवा आपण राज्य उभारण्याच्या कामास सुरवात करण्याच्या वेळेपासून, कांहींतरी दैवी योजनेनें न्यायाच्या मूळ स्वरूपाकडे ओढले जात आहों, असा जो आपणास संशय आला होता, तो खरा ठरला.

ग्लॅ०:—होय, खरें आहे.

सॉक्रे०:—ज्या मनुष्याला निसर्गानें चांभार कर्माकरितां बनविलें आहे, त्यानें चांभाराच्या धंद्यालाच चिकटून रहावें आणि ज्याचा सुतारीच्या कामाकडे स्वाभाविक कल आहे, त्यानें सुतारीचेंच काम करावें, ह्या तत्वामध्यें खरोखरच न्यायाची प्राथमिक रूपरेषा ( व उपयुक्तता ) दिसून येत आहे.

ग्लॅ०:—असें दिसतें.

सॉक्रे०:—न्यायही अशाच प्रकारचा असतो. फरक इतकाच कीं, मनुष्यांच्या बाह्य कृतीऐवजीं, न्यायाचा, अंतःप्रवृत्तीशींच संबंध असतो. म्हणून न्यायी मनुष्य, स्वतःमध्यें असलेल्या निरनिराळ्या तत्वांना, त्यांच्या स्वाभाविक कामाशिवाय कांहीं करूं देणार नाहीं. तसेंच, आत्म्याच्या निरनिराळ्या वर्गांना एकमेकांशीं विरोधही करूं देणार नाहीं. उलट, स्वतःच्या मनावर ताबा ठेवून, ज्याप्रमाणें उच्च, कनिष्ट, मध्यम व ह्यांच्यामधील असलेले इतर सूर, ह्या सर्वांमध्यें स्वरसंगति आणली जाते, त्याप्रमाणें वरील तीन तत्वांमध्यें संगति घडवून आणून, शांत व सुव्यवस्थित आयुष्य घालवील. अशा तऱ्हेनें, ह्या तत्वांची एकवाक्यता करून, स्वतःचा नेमस्त व सुव्यवस्थित स्वभाव बनवून, त्याला जें कांहीं काम करावयाचें असेल तें करावयास लागेल. द्रव्यार्जन,

शरीरसंरक्षण, राजकारण अथवा कांहीं खाजगी काम करीत असताना,
त्याचा असा दृढविश्वास असेल कीं, जें वरीलप्रमाणें
Steph मनाला एकतानतेची संवय लावण्यास मदत करतें, तें
444 न्याय्य व सन्माननीय कृत्य होय व अशा कृत्याचें
अधिष्ठान असणारें अस्सल ज्ञान म्हणजेच ‘ ज्ञान ’ होय
व ज्यायोगें अशी संवय नष्ट केली जाते, तें अन्यायी कृत्य असून अशा
अन्यायी कृत्याचें अधिष्ठान असणारें जें केवळ मत तें अज्ञान होय.

ग्लॅ०:—सॉक्रेटिस, तुम्ही जें म्हणतां तें खरें आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. जर आपण असें म्हटलें कीं, न्यायी मनुष्य आणि न्यायी राज्य आणि ह्यांतून आढळणारा न्याय ह्यांचें आपण संशोधन केलें आहे, तर हें आपलें म्हणणें सर्वस्वीं खोटें आहे असें समजलें जाणार नाहीं, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—अर्थात्‌च नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, असें आपण म्हणावें काय ?

ग्लॅ०:—होय. म्हणावें.

सॉक्रे०:—ठीक आहे. आतां आपल्याला अन्याय म्हणजे काय, हें शोधावयाचें आहे.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—वरील तीन तत्वांमध्यें युद्ध असणें, दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ व अडथळा करण्याची प्रवृत्ति असणें, तसेंच ज्या भागानें वरिष्ठ भागाची खरोखर सेवा करावयाची, त्या भागानें योग्यता व अधिकार नसतांही सर्व आत्म्याविरुद्ध बंड उभारून अधिकाराचें स्थान पटकावण्याची महत्वाकांक्षा बाळगणें, म्हणजेच अन्याय नव्हे काय ? अशा प्रकारें गोंधळ व अव्यवस्था असली, म्हणजे अन्याय, बदफैलीपणा, भ्याडपणा, मूर्खपणा, एका शब्दांत म्हणावयाचें म्हणजे सर्व दुर्गुणांचें प्राबल्य होतें.

ग्लॅ०:—होय. बरोबर असेंच.

सॉक्रे०:—ज्याअर्थी न्याय व अन्याय ह्यांचें स्वरूप आपणास माहीत झालें आहे, त्याअर्थी अन्यायीपणाची वागणूक व अन्यायी कसें असावें व न्यायीपणानें कसें वागावें, ह्या सर्वांचें ज्ञानही आपणास स्पष्टच झालेलें नाहीं काय ?

सॉक्रे०:—आत्म्यामधील हे प्रकार शरीरांतील आरोग्य व रोग ह्यांप्रमाणेंच आहेत. रोगीपणा आणि निरोगीपणा, ह्या ज्याप्रमाणें शरीराच्या अवस्था, त्याचप्रमाणें आत्म्याचेही वरील प्रकार होत.

ग्लॅ०:—ते कसे काय ?

सॉक्रे०:—आरोग्याच्या स्थितींत शरीर निरोगी असतें आणि रोगीपणामुळें शरीरांत रोग उत्पन्न होतो.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें न्यायानें वागण्याची पद्धत, न्यायाची संवय व अन्यायानें वागण्याची पद्धत, अन्यायाची संवय लावीत नाहीं काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आरोग्य निर्माण करणें म्हणजे शरीरांतील शक्ती, निसर्ग-नियमानुसार, एकमेकांवर दाब ठेवतील अथवा एकमेकांच्या ताब्यांत राहतील असें करणें; आणि रोग वाढविणें म्हणजे निसर्गाच्या नियमाविरुद्ध शारिरीक शक्तींना सत्ता गाजवूं देणें.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें न्याय उत्पन्न करणें म्हणजे आत्म्यांतील शक्ती अशा बनविणें कीं, ज्यामुळें आदर्श स्वभावाप्रमाणें त्यांचें एकमेकांवर वजन राहील. आणि अन्याय निर्माण करणें म्हणजे आदर्श स्वभावाविरुद्ध आत्म्यांतील शक्तींना सत्ता गाजवूं देणें होय.

ग्लॅ०: – असेंच होय.

सॉक्रे०:—तर मग, सद्गुण म्हणजे आत्म्याचें आरोग्य व सौंदर्य

असून सुस्थिति होय. आणि दुर्गुण म्हणजे रोग, कुरूपता व दु:स्थिति होय.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणि मनुष्य सदाचारानें सद्गुणाप्रत व दुर्गुणानें दुर्गुणाप्रत नेला जात नाहीं काय ?

ग्लॅ०:—नि:संशयच.

सॉक्रे०:—न्यायानें वागणें अथवा अन्यायानें वागणें फायदेशीर आहे काय ? ह्या प्रश्नाचा आतां आपणास विचार
Steph करावयाचा आहे. न्यायीपणाविषयीं प्रसिद्धी असली वा
445 नसली, तरीसुद्धां मनुष्यानें न्यायीपणानें वागणें व उदात्त ध्येयें अनुसरणें फायद्याचें आहे काय ? अथवा शिक्षा चुकवून शिक्षेमुळें होणारा सुपरिणामही टाकून, मनुष्यानें अन्यायानें वागणें व अन्यायी असणें फायदेशीर आहे काय ?

ग्लॅ०:—ज्याअर्थी न्याय व अन्याय ह्यांचें खरें स्वरूप आपणास दिसून आलें आहे, त्याअर्थी वरील प्रश्न, माझ्या मतें, हास्यास्पदच आहे. शरीरसंपत्ति बिघडली असतां, सर्व तऱ्हेचीं खाद्यें, अगणित संपत्ति व सत्ता जरी मनुष्याजवळ असलीं, तरी आयुष्य जगण्यासारखें आहे असें त्याला वाटतें काय ? ज्या तत्वावर आपण जगतों, तें तत्व समूळ नाश पावत असतां, जीव जगविण्यांत अर्थ आहे, असें कोणी सांगेल काय ? ज्या तत्वामुळें दुर्गुण व अन्याय घालवितां येतो आणि सद्गुण व न्याय ह्यांचें संपादन करतां येतें, त्या तत्वालाच तिलांजली दिली असतां, मनुष्याच्या जीवनांत कांहीं अर्थ आहे काय ?

सॉक्रे०:—अशी चर्चा करणें जरी हास्यास्पद असलें, तरी ज्याअर्थी आपण ह्या मुद्यापर्यंत पोंचलों आहोंत, त्याअर्थी धीर न सोडतां, आपल्या अनुमानांची सत्यता अत्यंत स्पष्टपणें ठरवून घेतली पाहिजे.

ग्लॅ०:—कांहींही झालें तरी धीर सोडतां कामा नये.

सॉक्रे०:—तर मग, माझ्या मतें जे दुर्गुणांचे प्रकार संशोधनास योग्य आहेत, त्यांचाच तुम्ही विचार करावयास माझ्याबरोबर या.

ग्लॅ०:—मी तुमच्या पाठोपाठ येत आहे. फक्त मला प्रकारांचीं नांवें सांगा.

सॉक्रे०:—आपण आतां वादाच्या अत्यंत उच्च पायरीवर चढलों आहोंत व त्यामुळें शिखरावरून निरीक्षण करणाऱ्या मनुष्याप्रमाणें मला असें दिसतें कीं, सद्गुणाचा जरी एकच प्रकार असला, तरी दुर्गुणांचे अनंत प्रकार असून, त्यांतील विशेषतः चार निर्देश करण्या-सारखे आहेत.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अधिक स्पष्ट कराल काय?

सॉक्रे०:—राज्यकारभाराच्या विशिष्ट प्रकारांप्रमाणेंच आत्म्याचे विशिष्ट प्रकार आहेत.

ग्लॅ०:—तें किती आहेत?

सॉक्रे०:—राज्यकारभाराचे पांच असून, आत्म्याचेही पांच आहेत.

ग्लॅ०:—ते कोणते?

सॉक्रे०:—आपण जो वर्णन करीत आहोंत, तो एक प्रकार असून त्याची दोन नांवें आहेत. राज्याधिकारी मंडळांत जर एक मनुष्य श्रेष्ठ असेल, तर त्याला राजा असलेलें राज्य म्हणतात आणि सारख्याच योग्यतेचे अनेक असले तर त्याला उत्तम लोकांचें राज्य म्हणतात.

ग्लॅ०: - खरें आहे.

सॉक्रे०:—ह्याला मी एकच प्रकार म्हणतों. कारण श्रेष्ठ सत्ता, एक अथवा अनेक लोकांच्या हातांत असली, तरीसुद्धां जर अशा लोकांचें शिक्षण आपण वर्णिल्याप्रमाणें झालें असलें, तर राज्यांतील महत्वाचे कायदे कधींही बदलले जाणार नाहींत.

ग्लॅ०:—होय. अशी योग्य आशा बाळगतां येईल.

---

# प्लेटोची आदर्श राज्यघटना

## पुस्तक पांचवें

सॉक्रे०:—अशा तऱ्हेची घटना अथवा अशा तऱ्हेचें राज्य मी चांगलें म्हणतों आणि चांगला मनुष्यही असाच असतो.
Steph 449 ही घटना जर योग्य म्हटली तर बाकीच्याना वाईट व अयोग्य असें म्हटलें पाहिजे. राज्याच्या घटनेला व व्यक्तीच्या स्वभावाला ह्या संज्ञा वापरल्या म्हणजे दुष्ट राज्य-व्यवस्थांचे व दुर्गुणांचे प्रकार चार होतात.

ग्लॅ०:—ते कोणते ?

ह्यानंतर त्यांचें अनुक्रमानें वर्णन करून त्यांचें दुर्गुणांत कसकसें रूपांतर होत जातें, हें सांगण्यास मी आरंभ करणार होतों. पण इतक्यांत ॲडिमेन्टसपासून जरा दूर अंतरावर बसलेल्या पॉलिमारकसनें, भावाच्या आंगरख्याला धरून त्याला आपल्या जवळ ओढलें. आणि पुढें वांकून त्यानें त्याच्या कानांत कांहींतरी सांगितलें. आम्हांला त्यांतील पुढील भागच काय तो ऐकावयास आला, " आपण सॉक्रेटिसाला, एक प्रश्न न सोडवितां, पुढें जाऊं द्यावा काय ? " ॲडिमेन्टस् मोठ्यानें म्हणाला, " अर्थातच नाहीं. " त्यावर मी म्हणालों, " कोणाला जाऊं न देण्याबद्दल तुम्हीं बोलत आहां ?

ॲडि०:—तुम्हाला आम्ही जाऊं देणार नाहीं.

सॉक्रे०:—आणि कां ?

ॲडि०:—आमचा असा समज झाला आहे कीं, एक महत्त्वाचा भाग चोरून ठेवून, त्याचें विवेचन करण्याचें तुम्ही टाळीत आहां. त्या विषयाचा ओझरता निर्देष करून तुम्ही पुढच्या विवेचनास लागल्या-बद्दलची गोष्ट, आमच्या लक्षांत आली नसेल अशी तुमची कल्पना झाली असावी. तो निर्देश असा:–‘ प्रत्येकास असें दिसून येईल कीं, मित्रामित्रांमध्यें स्त्रिया व मुलें सुद्धां, इतर वस्तूंप्रमाणें समान मालकीचीं असतात. ’

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस, माझें म्हणणें योग्य नाहीं काय ?

ॲडि०:—होय. पण इतर शब्दांप्रमाणें ‘ योग्य ’ ह्या शब्दाचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. पुष्कळ योजनांपैकीं कोणत्या योजनेनुसार, ही सार्वजनिक मालमत्तेची कल्पना अंमलांत आणावयाची, हें तुम्ही आम्हांला सांगितलें पाहिजे. म्हणून तुमची योजना सांगण्याचें टाळूं नका. मुलांची उत्पत्ति कोणत्या परिस्थितींत करण्यांत यावी, मुलांचा जन्म झाल्यावर कोणत्याप्रकारें त्यांची जोपासना करावी आणि तुमच्या कल्पनेप्रमाणें स्त्रियांवर सार्वजनिक हक्क कसा असावा,
Steph ह्यांविषयीं संपूर्ण विवेचन तुम्ही कराल, अशी आम्ही
450 पुष्कळ वेळ आशा बाळगून होतों. कारण आमचें मत असें झालें आहे कीं, ही योजना ज्या पद्धतीनें अंमलांत आणली जाईल, त्या पद्धतीच्या बरेंपणावर अथवा वाईटपणावर राज्याचें महत्त्व ठरेल. हे मुद्दे निश्चित करावयाचे टाकून देऊन तुम्ही राज्य-घटनेच्या दुसऱ्या एका प्रकाराचें विवेचन करूं लागल्याचें जेव्हां आम्हांला आढळून आलें, तेव्हां तुम्हीं मघाशीं ऐकल्याप्रमाणें, आम्ही असा निश्चय केला कीं, इतर प्रश्नांप्रमाणें हे प्रश्नही तुम्ही विचारांत घेतल्याशिवाय तुम्हांला सोडावयाचें नाहीं.

ग्लॅ०: – माझेंही ह्याला अनुमोदन आहे.

थ्रॅसिमॉकस्०:—थोडक्यांत तुम्ही असें समजा कीं, ह्या बाबतींत आमचें सर्वांचें एकमत आहे.

मी उद्गारलों, "माझ्यावर तुम्ही सगळ्यांनीं हल्ला करून, हें काय आरंभिलें आहे! आपल्या आदर्श राज्याविषयीं, जणूं कांहीं आपण नुकतीच चर्चा सुरू करीत आहों, अशा तऱ्हेनें तुम्ही पुन: हा केवढा मोठा प्रश्न उपस्थित केला आहे! ह्या विषयाचा पूर्ण विचार आपण पूर्वीं केला आहे, ह्या कल्पनेनें मी आनंदीत झालों होतों. तसेंच, वरील मुद्दे जेव्हां मी पूर्वीं निर्देशिले तेव्हांच ते तुम्ही मान्य केले, असें मी समजून चाललों होतों. हे विषय वादाला उकरून काढल्यानें, तुम्ही प्रश्नरूपी कितीतरी मधमाशांना उठवीत आहां, याची तुम्हाला कल्पनाही नसेल! मला त्यावेळींच ही कल्पना आली होती, म्हणून त्रास चुकविण्याकरितां तो विषय मी तसाच सोडून दिला.

थ्रॅसि०:—काय? तात्विक विवेचन ऐकण्याऐवजीं, सोनें कोठें सांपडेल, असल्या शुष्क विषयाचें विवेचन ऐकण्यास आम्ही येथें आलों आहोंत, असें तुम्ही समजतां काय?

सॉक्रे०:—पण तात्विक विवेचनांत सुद्धां योग्य मर्यादा राखली पाहिजे.

ग्लॅ०:—खरें आहे. पण सूज्ञ लोकांच्या दृष्टीनें, सर्व आयुष्यभर तात्विक चर्चा करीत राहणें, हीच योग्य कालमर्यादा होय. म्हणून तुम्ही आमच्याविषयीं काळजी करूं नका. आपल्या संरक्षक वर्गामध्यें, स्त्रिया व मुलें ह्यांजवरील सार्वजनिक हक्काचें स्वरूप काय असावें? जन्मापासून वयांत येईपर्यंत लहान मुलांच्या शिक्षणाची मोठी जबाबदारी असते, म्हणून तें शिक्षण कसें असावें? असे जे प्रश्न आम्ही तुम्हाला विचारले, त्यासंबंधीं तुमचीं मतें मांडण्याचा कंटाळा न करतां, वरील कल्पना कोणत्या तत्वावर अंमलांत आणावी, हें स्पष्ट करून सांगा.

सॉक्रे०:—माझ्या बुद्धिमान् मित्रा, ह्या प्रश्नाची चर्चा करणें म्हणजे सोपें काम नाहीं. आपल्या पूर्वींच्या तत्वांपेक्षांही ह्यांत अविश्वसनीय असा बराच भाग आहे. प्रथम असें कीं, आपल्या योजनांची उपयुक्तता लोकांना पटणार नाहीं. दुसरें असें कीं, ह्या योजना पूर्णपणें अंमलांत

आणल्या गेल्या आहेत, असें समजलें तरीसुद्धां, त्या योग्य आहेत किंवा नाहींत ह्याविषयीं वाद उत्पन्न होईल. माझ्या प्रिय मित्रा, मला कल्पनासाम्राज्यांतच विहार करणारा, असें म्हणण्यांत येईल ह्या भीतीमुळें, ह्या विषयाला हात घालण्याचें काम, मोठ्या नाखुषीनें मला स्वीकारावें लागत आहे.

ग्लॅ०:—तुम्हाला अशी नाखुषी वाटण्याचें कारण नाहीं. कारण तुमचे श्रोते मूर्ख अथवा अश्रद्धाळू अथवा वैरी नाहींत.

सॉक्रे०:—माझ्या चांगल्या मित्रा, तुमच्या ह्या आश्वासनानें तुम्ही मला उत्तेजन देत आहांत, असें मी समजतों.

ग्लॅ०: - होय.

सॉक्रे०:—असें असेल तर, तुमची मोठी चूक होत आहे. प्रस्तुत विषयासंबंधीं मला ज्ञान असल्याबद्दल जर माझी खात्री असती, तर तुमचें उत्तेजन ठीक झालें असतें. कारण विषयाचें चांगलें ज्ञान असलें, म्हणजे हुषार मित्रांच्या संगतींत, अत्यंत महत्वाच्या व मनोरंजक विषयावर बोलणें, ही गोष्ट कोणालाही धैर्यानें व सुरक्षितपणानें करतां येण्यासारखी असते.

Steph 451 परंतु स्वतःच साशंक स्थितींत असतांना, एखादी योजना प्रतिपादन करणें, हा मार्ग धोक्याचा व निसरडा आहे आणि त्यामुळें मला भीति वाटते. ( ही भीति माझें हसें होईल म्हणून नव्हे. कारण असें मानणें पोरकटकपणाचें आहे. ) मला भीति अशी वाटते कीं, माझा सत्याचा आश्रय सुटून जाऊन, ज्या पायरीवर सावधपणें पाऊल टाकावयाचें, त्या पायरीवरच मी माझ्या मित्रांसह कोसळून पडेन! मी जें कांहीं म्हणणार आहे, त्याबद्दल नेमिसिस[1] देवतेनें माझ्यावर कोप करूं नये, अशी मी प्रार्थना करतों.

---

1 Nemesis पापकर्माबद्दल शिक्षा करणारी ग्रीक देवता.

कारण माझा असा विश्वास आहे कीं, एखाद्या मनुष्याची उदात्त, चांगल्या व न्याय्य संस्थांविषयीं फसगत करणें, ह्यापेक्षां अप्रत्यक्षपणें एखाद्या मनुष्याच्या मृत्यूला कारणीभूत होणें, हें अधिक क्षम्य आहे. अशा तऱ्हेचें साहस, मित्रांपेक्षां शत्रूंच्या बाबतींत करणें चांगलें, म्हणून तुम्ही मला उत्तेजन दिलेंत, हें ठीक झालें.

हें भाषण ऐकून ग्लॅकान् हसून म्हणाला, " सॉक्रेटिस, जर तुमच्या प्रतिपादनापासून आमच्या जीवाला कांहीं धक्का पोंचला, तर आमच्या खुनाचा आरोप तुमच्यावर येणार नाहीं, असें आम्ही करूं. आम्हाला फसविण्याच्या आरोपापासूनही आम्ही तुम्हाला मुक्त करतों. आतां तुम्हांला जें कांहीं बोलावयाचें तें धीटपणें बोला.

सॉक्रे०:—कायद्याचें म्हणणें असें आहे कीं, जेव्हां मनुष्याला गुन्ह्यापासून मुक्त करण्यांत येतें, तेव्हां त्याची स्वर्गांतही त्यापासून शुद्धि होते. आणि म्हणून बहुतकरून ह्या लोकींही होते.

ग्लॅ०:–ठीक. वाद चालू करण्यांत ह्या भीतीचा तुम्हाला अडथळा होणार नाहीं.

सॉक्रे०:—आपल्या विषयाच्या ज्या भागासंबंधीं मी योग्य ठिकाणीं विवेचन केलें पाहिजे होतें, त्या भागाकडे मला वळलें पाहिजे. पण कदाचित् आतांचाच अनुक्रम उत्तम होईल. पुरुषवर्गासंबंधानें आपलें विवेचन पुरें झालें आहे. म्हणून आतां स्त्रियासंबंधींच्या विवेचनास लागूं या. ज्या पुरुषांचा जन्म व शिक्षण, आपण वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणें झालेलीं आहेत, त्यांनीं मुलें आणि स्त्रिया ह्यांची प्राप्ति व जोपासना आपल्या स्वाभाविक भावनांच्या अनुरोधानें केली पाहिजे. संरक्षकांनीं, जणूं कांहीं, गुरांच्या कळपाचे संरक्षक–कुत्रे व्हावें, असें आपलें ध्येय आहे.

ग्लॅ०: — होय.

सॉक्रे०:—त्याच ध्येयानुसार, प्रजोत्पादन व मुलांची जोपासना,

ह्यासंबंधीं आपण नियम करूं आणि ते अनुरूप ठरतात किंवा नाहीं हें पाहूं.

ग्लॅ०:—तुम्ही काय म्हणतां ?

सॉक्रे०:—पहारा करणाऱ्या कुत्र्यांच्या स्त्रीजातीनें, कुत्र्यांच्या बरोबरीनें कळपाच्या संरक्षणाची, शिकारीचीं व इतरही कामें केलीं पाहिजेत, असें तुम्हांला वाटतें ना ? अथवा लहान पिलांना जन्म देऊन, त्यांची जोपासना करण्याकरितां स्त्रीजातीनें घरींच रहावें आणि पुरुषजातीनें श्रम करून कळपाच्या रक्षणाची जबाबदारी पत्करावी, असें तुम्हांला वाटतें काय ?

ग्लॅ०:—जें कांहीं करणें आवश्यक आहे, त्यांत स्त्रीजातीनेंही भाग घ्यावा, असें आम्हाला वाटतें. पण स्त्रीजातीला अशक्त व पुरुषजातीला आम्ही सशक्त समजतों.

सॉक्रे०:—एकच शिक्षण दिलें नसलें, तर निरनिराळ्या प्राण्यांना एकच काम करतां येईल काय ?

ग्लॅ०:—नाहीं.

Steph 452 सॉक्रे०:—तर मग, पुरुषांप्रमाणेंच जर स्त्रियांना काम करावयाचें असेल, तर स्त्रियांनाही पुरुषांना देण्यांत येणारें शिक्षण दिलें पाहिजे.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—पुरुषांना आपण व्यायामाचें व संगीताचें शिक्षण दिलें आहे.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, स्त्रियांनाही दोन्ही कलांचें शिक्षण देऊन, शिवाय लष्करी शिक्षणही पुरुषांप्रमाणेंच दिलें पाहिजे.

ग्लॅ०:—तुमच्या म्हणण्याचा हा सरळच निष्कर्ष आहे.

सॉक्रे०—आपल्या पुष्कळशा कल्पना जर अंमलांत आल्या, तर त्या विलक्षण म्हणून हास्यास्पद वाटतील.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—सर्वांत जास्त हास्यकारक काय वाटेल? ज्याप्रमाणें कुरूप वृद्ध पुरुष, अंगावर सुरकुत्या पडल्या असतांही तालीमखान्यांत तालीम घेण्याचें प्रेम दाखवीत असतात, त्याप्रमाणें पुरुषांबरोबर व्यायामशाळेंत, तरुण स्त्रियांनींच नव्हे तर वृद्ध स्त्रियांनीं सुद्धां, वस्त्र-विहीन स्थितींत व्यायाम करीत राहणें, हास्यास्पद वाटणार नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. हल्लींच्या काळांत खरोखरच हें हास्यास्पद वाटेल.

सॉक्रे०:—ठीक आहे. ज्याअर्थी आपण ह्या विषयाची चर्चा सुरू केली आहे. त्याअर्थी व्यायाम व संगीत ह्यासंबंधीं असा फरक घडवून आणण्याच्या कल्पनेबद्दल, चांगल्या लोकांनीं पुष्कळ थट्टा केली तरी आपण भितां कामा नये. विशेषतः चिलखत घालणें व घोड्यावर स्वार होणें, ह्याविषयींची चेष्टा आपण मानतां कामा नये.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—उलट, ज्याअर्थी आपण वाद चालू केला आहे, त्याअर्थी आपणास कायद्याचा कठोरपणा स्वीकारला पाहिजे. वरील चेष्टा करणाऱ्या कोटिबाज लोकांना, त्यांची नेहमीची संवय टाकून देण्यास सांगून, गंभीर होण्याचा प्रयत्न करा असें आपण बजावूं. त्यांना आपण अशीही आठवण करून देऊं कीं, ज्याप्रमाणें हल्लीं अत्यंत रानटी राष्ट्रांमध्यें, नग्न स्थितींत मनुष्यांना पाहिलें जाणें हें लाजिरवाणें व हास्यास्पद समजलें जातें, त्याप्रमाणें थोड्या काळापूर्वीं ग्रीक लोकांमध्येंही समजलें जात असे. क्रीटन्सनीं पहिल्या प्रथम व लॅसिडेमोनिअन्सनीं मागाहून, जेव्हां व्यायामाचे खेळ करण्याची पद्धत पाडली, तेव्हां त्यावेळच्या विनोदप्रिय लोकांनीं, ह्या नव्या कल्पनांची फार चेष्टा केली होती. खरें ना?

सॉक्रे०—पण अनुभवानें जेव्हां असें दाखवून दिलें कीं, शरीरावर आच्छादन घालण्यापेक्षां नग्न असणेंच बरें आणि जेव्हां ह्या योजनेमुळें, डोळ्याला दिसणारा हास्यास्पद प्रकार बुद्धिवादानें नाहींसा केला जाऊन, नग्नपणाची श्रेष्ठता प्रस्थापित केली गेली, तेव्हांच मला वाटतें, असेंही सिद्ध झालें कीं, अज्ञान व दुर्गुण ह्यांच्याखेरीज इतर कोणत्याही गोष्टीला जो हसतो, अथवा जें सत् नाहीं त्याखेरीज इतर सर्व गोष्टी स्तुतीस पात्र आहेत असें समजतो, तो मूर्ख मनुष्य समजावा.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—जे आपण नियम करणार आहोंत, ते व्यवहार्य आहेत किंवा नाहींत, ह्याबद्दल आपण प्रथमतः एकमत ठरविणें जरूर आहे ना? तसेंच, थट्टेखोर अथवा गंभीर लोकांना पुढील प्रश्न

Steph विचारण्याची आपण संधि द्यावयास नको काय?

453 "मानवी स्त्रीजात पुरुषवर्गाची सर्व कामें करण्यास समर्थ आहे काय? अथवा तिला कांहीं कामें करतां येतील, कांहीं करतां येणार नाहींत अथवा एकसुद्धां काम करतां येणार नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे काय? लष्करी काम स्त्रीजातीला करतां येण्यासारखें आहे काय?" अशा रीतीनें आपण चर्चेस सुरवात केली असतां, चर्चा समाधानकारक होईल.

ग्लॅ०:—होय. हीच पद्धत उत्तम आहे.

सॉक्रे०:—विरुद्ध पक्षाची बाजू पुढें मांडण्यांत आली नाहीं, अशी तक्रार राहूं नये म्हणून विरुद्ध पक्षाची विचारसरणी मांडणें योग्य आहे ना?

ग्लॅ०:—अर्थातच.

सॉक्रे०:—तर मग, विरुद्ध पक्षाकडून आपण म्हणूं, "साक्रेटिस व ग्लॅकान्, तुमच्या विधानाविरुद्ध बाजू मांडण्याची मुळींच जरूर नाहीं. कारण राज्याच्या स्थापनेस सुरवात करण्याच्या आरंभींच तुम्हीं

स्वतः असें कबूल केलें आहे कीं, त्यांतील प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या स्वभावाला अनुरूप असेंच काम केलें पाहिजे." "होय. आम्ही हें कबूल केलें आहे." "पुरुष व स्त्री ह्यांच्या स्वभावांत विशिष्ट फरक आहे, हें तुम्ही नाकबूल करतां काय?" "अर्थात्च फरक आहे." "तर मग, विशिष्ट स्वभावानुसार निरनिराळें काम, स्त्री व पुरुष ह्यांस योजून देणें बरोबर नाहीं काय?" "निःसंशय." "पण तुम्हीं ज्याअर्थी असें म्हणतां कीं, पुरुष व स्त्रिया ह्यांचे स्वभाव अगदीं भिन्न असूनही त्यांनीं एकाच तऱ्हेचीं कामें करीत रहावें, त्याअर्थी तुमची विचारसरणी चुकीची असून तुम्हीं स्वतःच विसंगतपणाचा दोष ओढवून घेतां." माझ्या हुषार मित्रा, ह्या आक्षेपाला तुम्हीं कांहीं उत्तर देऊं शकाल काय?

ग्लॅकान्०:—ह्याच क्षणाला उत्तर सांपडणें कांहीं सोपें नाहीं. परंतु आपल्या बाजूचे जे मुद्दे असतील, ते पुढें मांडून त्यांचें विवेचन करावें, अशी मी तुम्हाला विनंति करतों.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, हे व असेच इतर आक्षेप मी पूर्वीपासूनच अपेक्षिले होते. आणि म्हणूनच स्त्रिया व मुलें ह्यांच्या मालकीसंबंधानें व मुलांच्या जोपासनेसंबंधीं प्रचलित असलेल्या कायद्यामध्यें मी ढवळाढवळ करण्यास नाखूष असून भीतही होतों.

ग्लॅ०:—खरें म्हणावयाचें म्हणजे, हें कांहीं सोपें काम दिसत नाहीं.

सॉक्रे०:—नाहींच. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, पोहण्याकरितां राखलेल्या लहान तळ्यांत तुम्हीं पडलांत काय किंवा मोठ्या सागराच्या मध्यावर पडलांत काय, तुम्हाला पोहून हें गेलेंच पाहिजे.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, एखादा डोल्फीन मासा, स्वतःच्या पाठीवर आपणांस घेऊन जाईल किंवा अनपेक्षित रीतीनें आपली कशी तरी

सुटका होईल, अशा हेतूनें ह्या वादांतून सुरक्षितपणें बाहेर पडण्याचा प्रयत्न करणें चांगलें नाहीं काय ?

ग्लॅ०:--मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—आपणाला बाहेर पडण्याचा कांही मार्ग दिसतो काय, हें पाहूं या. आपण असें कबूल केलें कीं, निरनिराळ्या स्वभावांना निरनिराळीं कामें दिलीं पाहिजेत व पुरुष व स्त्रिया ह्यांचे स्वभाव भिन्न आहेत. पण आतां आपण म्हणतों कीं, असे भिन्न स्वभाव असूनही एकाच प्रकारची कामें त्यांनीं केलीं पाहिजेत. हाच विसंगतपणा तुम्ही आमच्यावर आरोपित आहां ना ?

ग्लॅ:०—होय.

Steph 454 सॉक्रे०:--खरोखर, ग्लॅकान्, वादविवादकलेची शक्ति फार विलक्षण असते !

ग्लॅ०:—कशी काय ?

सॉक्रे०:—कारण मला वाटतें कीं, इच्छेविरुद्धही पुष्कळ लोक वादविवादाच्या फंदांत पडतात आणि नुसतें शाब्दिक युद्ध करीत असतांना त्यांना वाटतें कीं, आपण खराखुरा वादविवाद करीत आहोंत. ह्याचें कारण असें कीं, त्यांना शब्दांच्या अर्थांतील फरक समजत नसतो. कोणत्याही प्रश्नाची चर्चा सुरू झाली, म्हणजे जें कांहीं पुढें मांडण्यांत आलें असेल, त्यावर शाब्दिक युद्धकला उपयोगांत आणून, नुसत्या शब्दांवरच ते टीका करीत सुटतात. ही त्यांची पद्धत, तात्विक चर्चा करण्याची नसून, नुसती वाग्युद्धाची असते.

ग्लॅ०:— पुष्कळांची अशी पद्धत असते खरी, पण प्रस्तुत चर्चेशीं तिचा संबंध काय ?

सॉक्रे०:—खात्रीनेंच आहे. आपण अजाणतेपणानें केवळ शाब्दिक वादांत पडलों आहोंत, हें उघडच दिसतें.

ग्लॅ०:—कसें काय ?

सॉक्रे०:—'निरनिराळ्या स्वभावांच्या लोकांनीं एकाच कामामध्यें पडूं नये' ह्या विधानाचा, निव्वळ वादाच्या आवेशांत आपण अक्षरशः अर्थ करीत बसलों आहोंत. परंतु 'एकच स्वभाव' व 'निरनिराळे स्वभाव,' हे शब्द आपण कोणत्या अर्थानें वापरले; तसेंच, निराळ्या स्वभावाच्या लोकांनीं निराळे धंदे करावेत आणि त्या त्या स्वभावाच्या लोकांनीं ते ते धंदे करावेत, असें जेव्हां आपण म्हटलें, तेव्हां आपली व्याख्या काय होती—हें सर्व विचारांत घेण्याचें आपण विसरून गेलों.

ग्लॅ०:—आपण असा विचार केला नाहीं, हें खरें आहे.

सॉक्रे०:—असें जर आहे, तर आपण स्वतःला असें विचारूं कीं, टक्कल पडलेले व लांब केंस असलेले लोक, ह्यांचा एक अथवा भिन्न स्वभाव असतो? आणि भिन्न स्वभाव असतो, असें कबूल करून आपण म्हणूं कीं, जर टक्कल पडलेले लोक जोडे तयार करीत असतील, तर दीर्घ केंसांच्या लोकांनीं जोडे करतां कामा नयेत; जर दीर्घ केसांचे लोक जोडे करीत असले, तर टक्कल पडलेल्या लोकांनीं जोडे करतां कामा नयेत.

ग्लॅ०:—असें म्हणणें हास्यास्पद होईल.

सॉक्रे०:—होय. हास्यास्पद होईल. कारण सारखेपणा व भिन्नता, ह्यांचे विविष्ट प्रकार विचारांत घेऊन, आपण विशिष्ट धंदे ठरविले होते; व त्यावेळेस 'एकच' व 'निराळे' शब्द सामान्य अर्थानें वापरले नव्हते. उदाहरणार्थ, आपण म्हटलें कीं, ज्या लोकांच्या मानसिक देणग्या वैद्याच्या धंद्याला उपयुक्त असतात, त्यांचा स्वभाव एकच असतो. खरें ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आणि जो मनुष्य चांगला वैद्य असतो, त्याचा स्वभाव चांगल्या सुताराच्या स्वभावाहून निराळा असतो.

ग्लॅ०:—अर्थातच निराळा असतो.

सॉक्रे०:—म्हणून जर एखाद्या धंद्यांतील कर्तबगारींत अथवा कलेंतील कौशल्यांत, स्त्री व पुरुष ह्यांच्यांत भिन्नता दिसून आली, तर आपण म्हणूं कीं, असा धंदा (अथवा कला) स्त्रीनें किंवा पुरुषानेंच करावा. पण जर स्त्री व पुरुष ह्यांच्यामधील फरक, प्रजोत्पादन क्रियेमधील त्यांच्याकडे असणाऱ्या विभिन्न कामगिरींतच केवळ दिसून आला, तर आपण असें ठांसून सांगू कीं, स्त्री व पुरुष ह्यांच्यामधील हा फरक, कोणत्याही प्रकारें आमच्या हेतूला बाधक ठरत नाहीं. उलट, आपल्या संरक्षकांनीं व त्यांच्या बायकांनीं, एकाच प्रकारचीं कामें करणें योग्य आहे, असें सिद्ध झाल्याचें आपण समजूं.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आपल्या विरोधी पक्षाला आपण असें विचारूं कीं, राज्यकारभारांत अशी कोणती कला अथवा धंदा आहे
Steph 455 कीं, ज्यामुळें स्त्री व पुरुष ह्यांचा स्वभाव एक नसून भिन्न आहे, असें म्हणतां येईल ?

ग्लॅ०:—निःसंशय, आपणास असें विचारण्याचा अधिकार आहे.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें थोड्या वेळांपूर्वी तुम्ही उत्तर दिलें कीं, एका क्षणांत समाधानकारक उत्तर देणें शक्य नसतें, त्याप्रमाणें इतरांकडूनही असेंच सांगण्यांत येईल. पण विचार करावयास जर वेळ मिळाला, तर उत्तर देणें कठीण जाणार नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—राज्यकारभार करण्यास ज्या धंद्यांची गरज लागते, असा कोणताही धंदा स्त्रियांना करतां येईल, असें दाखवून देण्याच्या कामांत, प्रतिपक्षानें आपल्याबरोबर यावें, अशी आपण त्याला विनंति करावी ना ?

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—ठीक आहे. आपण त्याला विचारूं. "जेव्हां तुम्हीं असें म्हणतां कीं, एखाद्या मनुष्याची एखाद्या विशिष्ट विषयासंबंधीं

बुद्धि चांगली असते व दुसऱ्याची नसते, तेव्हां पहिला मनुष्य तो विषय लवकर शिकूं शकतो व दुसरा प्रयासानें शिकतो, असाच अर्थ तुम्ही करतां ना ? तसेंच, पहिला मनुष्य थोड्या शिकवणीनें सुद्धां स्वतःच पुष्कळ ज्ञान मिळवूं शकतो व दुसरा पुष्कळशा शिकवणीनें व अभ्यासानें शिकलेलें ज्ञान सुद्धां टिकवूं शकत नाहीं; पहिल्याचें मन शारिरीक शक्तीनें विकास पावतें व दुसऱ्याचें संकोच पावतें, असेंच तुम्हीं म्हणतां ना ? कोणत्याही विषयासंबंधीं, स्वाभाविक बुद्धीचें अस्तित्व अथवा अभाव ठरविण्यास, हींच साधनें तुम्ही उपयोगांत आणतांना ?

ग्लॅ०:—होय, असेंच कोणीही उत्तर देईल.

सॉक्रे०:—बरें आहे. मानवी उद्योगांची अशी कोणती शाखा तुम्हाला माहीत आहे कीं, ज्यांमध्यें पुरुषांपेक्षां स्त्रिया कनिष्ठ ठरत नाहींत ? विणकाम करणें, पॅस्ट्री ( कबाब ) तयार करणें, लोणचीं, मुरंबा घालणें, इत्यादि कलांमध्यें स्त्रिया निष्णात समजल्या जातात व ह्यांसंबंधीं त्यांचें अज्ञान हास्यास्पद समजलें जातें; पण अशा कलांमध्येंही पुरुषांपेक्षां त्या कनिष्ठ ठरत नाहींत काय ?

ग्लॅ०: —बहुतेक धंद्यांमध्यें पुरुषजात, स्त्रीजातीपेक्षां बरीच श्रेष्ठ आहे, हें तुमचें म्हणणें बरोबर आहे. पुष्कळ स्त्रिया पुष्कळ पुरुषांपेक्षां पुष्कळ गोष्टींत श्रेष्ठ असतात, हें जरी खरें असलें तरी साधारणपणें विचार केला असतां, तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणेंच वस्तुस्थिति आहे.

सॉक्रे०:—ह्यावरून मी असा निष्कर्ष काढतों कीं, राज्य सुव्यवस्थित चालण्यास जे धंदे लागतात त्यांमध्यें स्त्री, स्त्री म्हणून व पुरुष, पुरुष म्हणून उपयुक्त नसतात. स्वाभाविक देणग्या, स्त्री व पुरुष ह्यांच्या वर्गांमध्यें, इतस्ततः विखुरलेल्या सांपडतात. स्त्रीचा स्वभाव विचारांत घेतला असतां पुरुषांचे सर्व धंदे तिला करतां येण्यासारखे असतात. ती पुरुषांपेक्षां कनिष्ठ असते, एवढाच काय तो फरक.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—तर मग, सर्व कामें पुरुषांनींच काय तीं करावीं व स्त्रियांनीं कांहींच करूं नयेत, असें आपणांस म्हणतां येईल काय ?

ग्लॅ०:—असें कसें म्हणतां येईल ?

सॉक्रे०:—ह्याच्या उलट आपणांस असें म्हणतां येईल कीं, एखाद्या स्त्रीला वैद्यकीय शास्त्रांत बुद्धि असेल व दुसरीला मुळींच नसेल. एखाद्या स्त्रीची संगीतांत गति असेल, दुसरीची मुळींच नसेल.

Steph 456

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—एखाद्या स्त्रीला व्यायामाची व युद्धाची आवड असेल व दुसरीला ह्यांपैकीं कशाचीच नसेल.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—एखादीस ज्ञानाची आवड असेल व दुसरीला ज्ञानाचा तिटकारा असेल. एखादी बाणेदार असेल तर दुसरी भित्री असेल.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—हें जर खरें, तर कांहीं स्त्रिया संरक्षकाच्या कामाला लायक व कांहीं नालायक असतात. कारण पुरुषांच्या बाबतींत, हेच गुण आवश्यक म्हणून आपण ठरवले नव्हते काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—म्हणून राज्यांतील संरक्षक-कामासंबंधी असें म्हणतां येईल कीं, स्त्री व पुरुष हीं स्वभावतः भिन्न नसून, केवळ शारिरीक शक्तीचें कमी अधिक प्रमाण, त्यांच्यांतील भिन्नता दर्शविणारें असतें.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—योग्य पुरुषांच्या बरोबरीनें राज्यकारभारांत भाग घेणाऱ्या अशा योग्य स्त्रिया आपण निवडल्या पाहिजेत. कारण आपणास असें

दिसून आलें कीं, पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचा स्वभाव असून, अशा कामाला त्या योग्य असतात.

ग्लॅ०--बरोबर आहे.

सॉक्रे०:—एकाच स्वभावाच्या मनुष्यांना, एकच काम आपण दिलें पाहिजे ना ?

ग्लॅ०--होय.

सॉक्रे०:—तर मग वर्तुळाकार फिरून, आपण पूर्वीच्या मुद्यावर आलों कीं, संगीत व व्यायाम ह्यांचें ज्ञान संरक्षकांच्या बायकांना देणें, हें निसर्गाच्या विरुद्ध नाहीं.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, ज्याअर्थी आपण योजिलेला कायदा निसर्गाच्या विरुद्ध नाहीं, त्याअर्थी आपल्या कायद्याचें तत्व, हें अव्यवहार्य व केवळ काल्पनिक आहे, असें म्हणतां येणार नाहीं. उलट, आपल्या तत्वाच्या विरुद्ध असलेला प्रचलित प्रकारच, निसर्गाच्या विरुद्ध आहे असें म्हणतां येईल.

ग्लि०:—होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—आपली योजना व्यवहार्य असून, ती अत्यंत इष्टही आहे, ह्यासंबंधीं आपण प्रश्न उपस्थित केला होता ना ?

ग्लॅ०: होय.

सॉक्रे०:—ती व्यवहार्य आहे, अशी आपली खात्री झाली ना ?

ग्लॅ:—होय.

सॉक्रे०:—ती अत्यंत इष्ट आहे काय, हाच दुसरा मुद्दा ना ?

ग्लॅ०:—होय हाच.

सॉक्रे०:– ठीक आहे. स्त्रीला संरक्षकाच्या कामाला कसें योग्य करतां येईल, असा जर प्रश्न असेल, तर पुरुषांचें शिक्षण निराळें व

स्त्रियांचें निराळें, असें आपण करणार नाहीं. कारण दोघांचे स्वभाव एकच आहेत.

ग्लॅ०---होय. दोघांचें शिक्षण एकच असलें पाहिजे.

सॉक्रे०:--तर मग, पुढील प्रश्नावर तुमचें मत मला सांगा.

ग्लॅ०:--कोणता प्रश्न ?

सॉक्रे०:—एक मनुष्य दुसऱ्यापेक्षां चांगला, असें तुम्हीं कोणत्या तत्वावर ठरवितां ? अथवा सर्वांना सारख्याच योग्यतेचे समजतां ?

ग्लॅ०:—मी सर्वांना सारख्याच योग्यतेचें मानणें शक्य नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या आदर्श राज्यामध्यें तुमच्या मताप्रमाणें कोणते लोक चांगले ? आपल्या योजनेप्रमाणें सुशिक्षित असलेले संरक्षक लोक कीं जोडे तयार करणारे चांभार ?

ग्लॅ०:--हा प्रश्न विचारण्याची जरूरच नाहीं. तो अत्यंत हास्यास्पद आहे.

सॉक्रे०:—ठीक आपण वर्णिलेले स्त्री व पुरुष, सर्वोत्तम नागरीक नाहींत काय ?

ग्लॅ०:--होय. ते सर्वोत्तम नागरीक आहेत.

सॉक्रे०:—उत्तम पुरुष व स्त्रिया राज्यांत असणें, ह्यापेक्षां अधिक चांगलें काय असूं शकेल ?

ग्लॅ०:—कांहींच नाहीं.

Steph सॉक्रे०:--आपण वर्णिल्याप्रमाणें, संगीत व व्यायाम
457 ह्यांच्या शिक्षणानेंच, हा परिणाम घडून येईल ना ?

ग्लॅ०:--निःसंशय.

सॉक्रे०:--तर मग, आपली नियोजित कल्पना व्यवहार्य आहे, इतकेंच नव्हे तर, राज्यहिताच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट आहे.

ग्लॅ०:--होय.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या संरक्षकांच्या स्त्रियांनीं, सद्गुण हेंच वस्त्र समजून, वस्त्रविहीन स्थितींत व्यायाम केला पाहिजे. आणि दुसरे कोणतेही धंदे न करतां, संरक्षकांच्या कर्तव्यांत समाविष्ट असलेलीं युद्धादि कामें केलीं पाहिजेत. अर्थात् स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षां अशक्त असल्यामुळें, ह्या कामांमधील हलकीं कामेंच स्त्रियांना दिलीं जातील. उदात्त हेतूनें स्त्रिया वस्त्रविहीन स्थितींत व्यायाम करीत असताना, जेव्हां एखादा मनुष्य हंसतो तेव्हां त्या मनुष्याचें हंसणें, म्हणजे 'ज्ञानवृक्षापासून तोडलेलें अपरिपक्व फळ' होय. अशा मनुष्याला आपण कशाला हंसतों आहों व आपण काय करतों आहों, ह्याचें भानच नसतें. कारण जें उपयुक्त आहे तेंच उदात्त व जें अपायकारक ते क्षुद्र, हेंच सनातन सत्यतत्व आहे.

ग्लॅ०:—खात्रीनेंच होय.

सॉक्रे०:—स्त्रियांसंबंधीं कायदा काय कसावा, ह्या बाबतींत पहिली लाट आपण ओलांडली, असें आपणास म्हणतां येईल. आपल्या पुरुष व स्त्री संरक्षकांनीं एकत्रपणानेंच सर्व धंदे केले पाहिजेत, असें आपलें म्हणणें दडपलें जाण्याऐवजीं, उलट आपलीच कल्पना व्यवहार्य व इष्ट आहे, असें आपण प्रस्थापित केलें.

ग्लॅ०:—खरोखरच, तुम्ही ओलांडलेली लाट फार मोठी होती.

सॉक्रे०:—तुम्ही दुसरी जेव्हां पहाल, तेव्हां तिच्या मानानें ही मोठी आहे, असें म्हणणार नाहीं.

ग्लॅ०:—ठीक आहे. ती आम्हाला पाहूं द्या.

सॉक्रे:० —नुकताच सांगितलेला कायदा व त्याच्या पूर्वींचे कायदे, ह्यांच्यापासून पुढील कायदा निर्माण होतो.

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—ह्या सर्व संरक्षक स्त्रिया, पुरुषांच्या समाईक बायका असून कोणालाही स्वतःची बायको असणार नाहीं. तसेंच, मुलेंही

समाईक असून, कोणत्याही आईबापांना अथवा मुलांना, आपलीं मुलें अथवा आपले आईबाप कोणते, ह्या विषयीं माहिती करून दिली जाणार नाहीं.

ग्लॅ०—पूर्वीच्या कायद्यापेक्षांही ह्या कायद्याची व्यवहार्यता व इष्टता ठरवितांना पुष्कळ वाद माजेल.

सॉक्रे०:—स्त्रिया व मुलें हीं समाईक मालकीची असणें, हें फायद्याचें असून इष्टही आहे, हें कोणालाही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. परंतु ह्या योजनेच्या व्यवहार्यतेविषयीं पुष्कळच वाद माजेल, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—दोन्हीही मुद्दे वादग्रस्तच होतील.

सॉक्रे०:—तर मग, दोन्हीही प्रश्नांचा एकदमच विचार करावा लागेल. वरील कल्पनेची उपयुक्तता तुम्ही मान्य कराल व त्यामुळें एका प्रश्नापासून तरी माझी मुक्तता होऊन, दुसऱ्या प्रश्नाची तेवढीच मला चर्चा करावी लागेल, असें मला वाटलें होतें.

ग्लॅ०:—पण मुक्त होऊन जाण्याचा प्रयत्न करीत असतां, तुम्ही पकडले गेले आहांत, म्हणून आतां दोन्ही मुद्यांचें स्पष्टीकरण करा.

सॉक्रे०:—न्यायापुढें मला मान वाकविलीच पाहिजे. पण माझ्यावर पुढीलप्रमाणें कृपा करा. आळशी मनाचे लोक ज्याप्रमाणें प्रवासास एकटे निघाले असतांना, स्वतःशी विचार करण्याच्या सुखाची मेजवानी झोडीत असतात, त्याप्रमाणें मला सुख अनुभवण्याची
Steph परवानगी द्या. तुम्हाला माहीत आहे कीं, असे लोक
458 त्यांच्या इच्छा मूर्त स्वरूपांत आणण्याची साधनें सांपडण्यापूर्वीच, साधनांचा विचार बाजूला ठेवून व इच्छा व्यवहार्य आहेत किंवा नाहींत ह्यांचा विचार करण्याचा त्रास चुकवून, ज्या गोष्टीची ते इच्छा करतात ती जणू आपणास मिळालीच आहे, असें गृहीत धरतात आणि इच्छा सफळ झाल्यावर काय काय

गोष्टी करावयाच्या त्या ठरवून आपलें समाधान करून घेतात व अशा तऱ्हेनें अगोदरच असलेल्या आळशी मनाचा आळस वाढवितात. अशा लोकांप्रमाणें, ह्या वेळेला मी सुद्धां आळशीपणाला शरण जाऊन, योजनेच्या शक्यतेचा प्रश्न पुढील चर्चेवर ढकलण्याची इच्छा करीत आहें. ह्या वेळेला शक्यता गृहीत धरून, आपली योजना अंमलांत आणल्यावर, राज्यांतील अधिकारी मंडळानें कोणत्या योजना कराव्या, हें सांगून राज्य व संरक्षक ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें आपली योजना व्यवहाराला अत्यंत फायदेशीर आहे, असें दाखविण्याचा मी प्रयत्न करीन. तुमची परवानगी असल्यास, प्रथमतः ह्या प्रश्नांची तुमच्याबरोबर पूर्णपणें चिकित्सा करावयाची व नंतर दुसरे प्रश्न विचारांत घ्यावयाचे, असा माझा विचार आहे.

ग्लॅ०:—माझी परवानगी आहे. चर्चेला सुरवात करा.

सॉक्रे०:—जर आपले अधिकारी व त्यांचे सहाय्यक, त्यांच्या नांवाप्रमाणें योग्य असतील, तर अधिकाऱ्यांच्या हुकुमाप्रमाणें सहाय्यक वागतील व अधिकारीही हुकूम सोडतांना आपण केलेल्या कायद्यानुसारच वागून, ज्या बाबतींतील तपशील आपण त्यांजवर सोंपविला आहे, त्या बाबतींत कायद्यांचें तत्व अंमलांत आणण्याचा प्रयत्न करतील.

ग्लॅ०:—आपण अशी आशा बाळगूं.

सॉक्रे०:—कायदेपंडित ह्या नात्यानें पुरुषांची ज्याप्रमाणें तुम्ही निवड केली, त्याचप्रमाणें स्त्रियांचीही निवड करून, शक्यतोंवर एकाच स्वभावाच्या स्त्रिया व पुरुष एके ठिकाणीं आणणें तुमचें कर्तव्य आहे. ज्याअर्थी रहाण्याची व जेवणाची जागा एकत्रच असणार व कोणालाही खाजगी मालमत्ता जवळ न बाळगण्याचा निर्बंध असणार, त्याअर्थीं स्त्री व पुरुष एके ठिकाणीं राहतील आणि प्रत्यक्ष व्यायाम घेतांना व दैनिक आयुष्यक्रमांतील काम करतांना, त्यांचा सहवास होत जाऊन, स्वाभाविक प्रवृत्तीमुळेंच त्यांच्यामध्यें परस्पर संबंध जुळविले जातील. असें होणें अपरिहार्य नव्हे काय ?

ग्लॅ०:—गणिताच्या पद्धतीपेक्षां प्रेमाच्या पद्धतीनेंच असे संबंध जुळविले जातील. कारण जनसमाजाला स्वतःकडे वळविण्याची शक्ति प्रेमामध्येंच जास्त असते.

सॉक्रे०:—बरोबर आहे. पण ग्लॅकान्, स्वैरसंबंध अथवा कोणत्याही प्रकारची अव्यवस्था, सुखसमृद्ध शहरांतील लोकांमध्यें असणें म्हणजे भ्रष्टता होय. आणि म्हणूनच अधिकारी लोक, तिचा शिरकाव आपल्या शहरांत करूं देणार नाहींत.

ग्लॅ०:—हें न्याय्यच आहे.

सॉक्रे०:—तर मग, लग्नसंबंध शक्यतोंवर पवित्र ठेवण्याची आपणास काळजी घ्यावी लागेल. शिवाय अशा तऱ्हेची पवित्रता, लोककल्याण्याकरितां घडवून आणलेल्या लग्नसंबंधांत राखणें अधिकच जरूर आहे.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—वरील हेतु कसा साधावा, तें मला सांगा. तुमच्या घरांत तुम्ही शिकारी कुत्रे ठेवतां व पारध करून
Steph आणलेले पक्षीही ठेवतां. म्हणून मी तुम्हालां विनंति
459 करतों कीं, ह्या प्राण्यांची अवलाद कशी उत्पन्न करतात, हें मला सांगावें.

ग्लॅ०:—कोणत्या प्रकारची ?

सॉक्रे०:—पहिल्याप्रथम असें विचारतों कीं, जरी सर्वांचें उत्पादन चांगल्या स्थितींत झालेलें असलें, तरी ह्यांपैकीं कांहीं इतरांपेक्षां श्रेष्ठ असूं अथवा होऊं शकतात, हें खरें ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तुम्ही सर्वांचीच अवलाद उत्पन्न करतां, कीं उत्तमांची तेवढीच करण्याची काळजी घेतां ?

ग्लॅ०:—उत्तमांची तेवढीच.

सॉक्रे०:—आणि कोणत्या वयांत ? कोवळे असतांना, कीं वृद्ध असतांना, कीं तारुण्याच्या भरांत असतांना ?

ग्लॅ०:—तारुण्याच्या भरांत असतांना.

सॉक्रे०:—ह्याऐवजीं जर तुम्ही दुसरा मार्ग पत्कराल, तर पक्षांची व कुत्र्यांची अवलाद कमी दर्जाची होईल, असें तुम्हाला वाटतें काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—घोडे किंवा इतर प्राणी, ह्यांच्याविषयीं कांहीं निराळा नियम आहे काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं. अशी कल्पना करणेंही चमत्कारिक आहे.

सॉक्रे०:—हो ! हो ! माझ्या प्रिय मित्रा ! ह्याचप्रमाणें जर मानवी प्राण्यासंबंधीं नियम असला, तर आपले अधिकारी मोठे कुशल असावयास पाहिजेत.

ग्लॅ०:—होय. मानवी प्राण्यासंबंधीं हाच नियम लागू आहे. पण अधिकारी मोठे कुशल पाहिजेत, असें कां म्हणतां ?

सॉक्रे०:—कारण औषधाचा उपयोग त्यांना बऱ्याच प्रमाणांत करावा लागेल. जेव्हां अशक्त लोकांना औषधाची जरूर नसते आणि पथ्योपचारांना त्यांची तयारी असते, तेव्हां एखादा सामान्य वैद्य पुरेसा असतो. पण जेव्हां औषधोपचार करण्याची जरूर असते, तेव्हां अधिक कुशल वैद्याची गरज भासते.

ग्लॅ०:—खरें आहे. पण ह्याचा प्रस्तुत ठिकाणीं संबंध काय ?

सॉक्रे०:—पुढीलप्रमाणें. प्रजाजनांच्या हिताकरितां बहुतकरून बराचसा खोटेपणा व लुच्चेगिरी, ह्यांचा आपल्या अधिकाऱ्यांना अवलंब करावा लागेल. औषधयोजनेंत हे सर्व प्रकार उपयुक्त असतात, असें आपण म्हटल्याचें तुम्हाला आठवतें ना ?

ग्लॅ०:—होय. आणि आपलें म्हणणें बरोबरही होतें.

सॉक्रे०:—ठीक आहे. तर मग, असें दिसून येतें कीं, हें योग्य तत्व लग्न व प्रजोत्पादन, ह्या प्रश्नांना विशेष तऱ्हेनें लागूं पडतें.

ग्लॅ०:—कसें काय ?

सॉक्रे०:—आतांपर्यंत आपण जें कबूल केलें आहे, त्यावरून असें उघडच ठरतें कीं, स्त्री व पुरुष ह्यांच्यामधील उत्तमांना, शक्य तितकें वारंवार एकत्र आणलें पाहिजे व वाईटांना होतांहोईल तों एकमेकांपासून दूर ठेविलें पाहिजे. आपला समाज पहिल्या प्रतीच्या उत्कर्षाला जर आणावयाचा असेल, तर पहिल्या प्रतीच्या स्त्रीपुरुषांच्या संबंधापासून झालेलीं मुलें वाढविलीं पाहिजेत व अशक्त स्त्रीपुरुषांची संतति टाकून दिली पाहिजे. हे सर्व प्रकार अधिकारी लोकांखेरीज कोणाला कळूं द्यावयाचे नाहींत. कारण अंतस्थ भांडणांपासून, शक्यतोंवर, आपल्या संरक्षकांच्या समूहाला अलिप्त ठेवणें जरूर आहे.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें पूर्णपणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपल्याला असे कांहीं उत्सव स्थापन केले पाहिजेत कीं, ज्यावेळेस सशक्त व योग्य वधू व नवरदेव, ह्यांना एके-ठिकाणीं आणून, यज्ञविधी करून, आपल्या कवीनीं प्रसंगोचित अशा केलेल्या कविता गाऊन, त्यांचे लग्न-
Steph 460
संबंध जुळवितां येतील. परंतु लग्नांची संख्या मर्यादित करण्याचें काम, अधिकारी लोकांवर सोंपविलें पाहिजे. युद्ध, रोगराई व इतर आपत्ति, ह्यांच्यामुळें होणारे परिणाम विचारांत घेऊन, अधिकारी लोक लोकसंख्या विशिष्ट मर्यादेपर्यंतच ठेवण्याचा प्रयत्न करतील आणि आपलें शहर फार मोठें अथवा फार लहान होऊं देणार नाहींत.

ग्लॅ० – तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—मला वाटतें, चिठ्ठया टाकण्याची पद्धतही आपण योजून अशी युक्ति केली पाहिजे कीं, ज्यामुळें कनिष्ट दर्जाच्या लोकांना,

लग्नाच्या जोड्या अधिकाऱ्यांकडून जुळविल्या जात नसून, केवळ दैवानेंच जुळविल्या जात आहेत, असें वाटेल.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—रणांगणावर अथवा इतर ठिकाणीं कर्तबगारी दाखवून प्रसिद्धीस येणाऱ्या तरुण लोकांना, जीं इतर बक्षिसें व हक्क मिळतील, त्यांमध्यें स्त्रियांबरोबर संग करण्याची उदारपणें परवानगी दिली पाहिजे. कारण ह्या सबबीखालीं, अशा जोडप्यांपासून आपणांस पुष्कळ मुलें निर्माण करून घेतां येतील.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:-मुलें जन्माला आल्याबरोबर, ह्या कामाकरितां नेमलेल्या स्त्री व पुरुष अधिकाऱ्यांकडून, तीं स्त्रीकारलीं जातील. कारण राज्यांतील अधिकाराच्या जागा, स्त्री व पुरुष ह्या दोन्ही वर्गांना सारख्याच दिल्या जातील, असें मी धरून चालतों.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—हे अधिकारी, चांगल्या आईबापांचीं मुलें स्वीकारून व त्यांना सर्वसाधारण बालगृहांत ठेवून, शहराच्या विशिष्ट भागांत राहणाऱ्या विशिष्ट दायांच्या ताब्यांत देतील. पण कनिष्ट दर्जाच्या आई-बापांचीं मुलें व अपूर्णावस्थेंत जन्मलेलीं मुलें, गूढ व अज्ञात अशा जागीं लपविलीं जातील.

ग्लॅ०:—संरक्षकांची संतती शुद्ध ठेवण्याकरितां, असेंच आपण केलें पाहिजे.

सॉक्रे०:—जेव्हां स्त्रियांचे स्तन दुग्धानें भरून गेले असतील, तेव्हां त्यांना बालगृहांत आणून मुलांना पाजूं देणें—पण अशा वेळीं कोणत्याही मातेला आपलें मूल ओळखतां येणार नाहीं अशी काळजी घेणें—तसेंच, मातांच्या स्तनांत जर दूध नसेल, तर दुग्ध असलेल्या इतर स्त्रिया पुरविणें, शिवाय मुलांना दूध पाजण्याच्या वेळा मातांना ठरवून देणें,

रात्रीच्या वेळीं अर्भकावस्थेंतील इतर त्रासदायक गोष्टी, दाई व इतर नोकर-लोक ह्यांच्यावर सोंपविणें–अशाप्रकारच्या बालसंगोपनाच्या कामावर अधिकाऱ्यांनीं देखरेख ठेवावयास नको काय ?

ग्लॅ०:—मुलांची जोपासना करण्याचें काम, संरक्षकांच्या बायकांना फारच सोपें तुम्हीं करून ठेवलें आहे !

सॉक्रे०:—होय. असेंच केलें पाहिजे. आतां आपल्या आवडीच्या दुसऱ्या विषयाकडे वळूं या. आपण म्हटलेलें तुम्हास आठवत असेल कीं, मुलें आईबापांच्या तारुण्यावस्थेंतच झालीं पाहिजेत.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आयुष्यांतील तारुण्यावस्था, स्त्रियांच्या बाबतींत वीस वर्षें व पुरुषांच्या बाबतींत तीस वर्षें असावी, हें माझें मत तुम्हाला पसंत आहे ना ?

ग्लॅ०:—हीं वर्षें तुम्ही कशी ठरवितां ?

सॉक्रे०:—स्त्रियांनीं वीस वर्षांपासून चाळीस वर्षांपर्यंत मुलांना जन्म द्यावा व पुरुषांनीं उसळत्या रक्ताचा जोर ओसरल्यावर म्हणजे पंचविसाव्या वर्षांपासून तो पंचावन्नाव्या वर्षापर्यंत प्रजोत्पादन करावें, असा मी नियम करीन.

ग्लॅ०:—स्त्रीपुरुषांचा हाच काल शारिरीक व मानसिक तारुण्याचा होय.

सॉक्रे०:—म्हणून जर एखादा मनुष्य वरील वयोमर्यादेच्या अगोदर किंवा नंतर प्रजोत्पादन करावयास लागेल, तर आपण असें जाहीर करूं कीं, त्याचें हें कृत्य अधार्मिक व अन्यायी होय. कारण सद्गुणी व उपयुक्त आईबापांपेक्षांही जास्त सद्गुणी व उपयुक्त अशी प्रजा उत्पन्न व्हावी, अशा हेतूनें सपत्नीक उपाध्यायाकडून आपल्या प्रत्येक लग्नविधींत होम व प्रार्थना केल्या जातील. पण वरील प्रकारचा मनुष्य,

Steph 461

वरील धर्मसंस्कारांशिवाय अंधकारांत, गुप्त रीतीनें, केवळ विकारी मनानें, संतती उत्पन्न करीत असल्यामुळें दोषार्ह ठरेल.

ग्लॅ०:--तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:--तसेंच, एखादा मनुष्य प्रजोत्पादन करण्याच्या योग्य वयांत असतांना, तशाच वयांतील स्त्रीबरोबर जर अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय संभोग करील, तर हाच कायदा लावण्यांत येऊन, राज्यामध्यें बेकायदेशीर, धर्मपिता नसलेली व अपवित्र अशी प्रजा निर्माण केल्याचा, त्यानें गुन्हा केला असें समजण्यांत येईल.

ग्लॅ०:--तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:--परंतु वर निर्दिष्ट केलेली वयोमर्यादा, स्त्रिया व पुरुष ह्यांनीं ओलांडल्यावर, पुरुषांना फक्त मुलगी, आई, मुलीची मुलगी अथवा आजी, ह्या स्त्रिया वर्ज करून कोणत्याही स्त्रीबरोबर मैत्री करण्यास आपण परवानगी देऊं. तसेंच स्त्रियांनाही पुत्र, बाप किंवा वरची पिढी अथवा खालची पिढी, ह्या नात्यांतील पुरुष वर्ज्य करून, कोणत्याही पुरुषाबरोबर सहवास करण्याची मुभा देऊं. पण त्यांना अशी सक्त ताकीद देऊं कीं, शक्यतोंवर अशा नात्यांतील संबंधांपासून मुलें जन्मास येतां कामा नये. पण जर हें टाळतां आलें नाहीं, तर ‘अशी प्रजा वाढूं द्यावयाची नाहीं,’ ह्या तत्वानुसार अशा मुलाला त्यांनीं नाहींसें करून टाकलें पाहिजे.

ग्लॅ०:--ही योजना सुद्धां योग्य दिसते. पण पिता, कन्या आणि इतर नातीं, त्यांनीं ओळखावयाचीं कशीं ?

सॉक्रे०:--ओळखावयाचीं नाहींतच! लग्न झाल्यानंतर, सातव्या महिन्यापासून दहाव्या महिन्याच्या आंत जें मूल जन्माला येईल, तें जर मुलगा असेल तर पुत्र व मुलगी असेल तर कन्या, असें पुरुषानें समजावें. तीं मुलेंही त्याला बाप असें म्हणतील व त्यांच्या मुलांना तो आपलीं नातवंडें समजेल. हीं पुन: त्याला व त्याच्याबरोबरच्या

नवरदेवांना व वधूंना आजोबा व आजीबाई म्हणतील. ज्या काळामध्यें त्यांचे आईबाप त्यांना जन्मास आणीत होते, त्या काळामध्यें उत्पन्न होणाऱ्या मुलांनीं व मुलींनीं, एकमेकांना भाऊ व बहीण, असें म्हटलें पाहिजे. आणि आतांच म्हटल्याप्रमाणें, अशा स्त्रीपुरुषांनीं एकमेकांस विकारवशतेनें स्पर्श करतां कामा नये. परंतु जर तसा प्रसंग आला व डेल्फीयन देवतेनें आपला रुकार दिला, तर कायद्यानें भाऊ व बहीण ह्यांच्यामध्येंही शरीरसंबंधाची मुभा दिली जाईल.

ग्लॅ०:—हें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, आपल्या संरक्षकांना, अशा तऱ्हेचीं बायका व मुलें असतील. आपल्या राज्याच्या कल्पनेला अनुकूल अशी ही स्थिती असून अत्यंत उत्तम योजना आहे, अशा तऱ्हेचें आपण प्रतिपादन केलें पाहिजे. तुम्ही दुसरा कांहीं मार्ग सुचवितां काय ?

ग्लॅ०:—तुम्ही म्हणतां त्याप्रमाणेंच करा.

सॉक्रे०:—ह्या मुद्यासंबंधीं आणखी एकवाक्यता करण्यास आपण पुढील प्रश्न विचारावयास नको काय ? राज्याच्या घटनेंत, अत्यंत कल्याणकारक अशी गोष्ट कोणती कीं, जिच्या-
Stpeh 462 करितां कायदेपंडितानें आपले कायदे तयार करावे ? आणि कोणती गोष्ट अत्यंत अपायकारक म्हणून समजली जावी ? दुसरा प्रश्न असा कीं, आपण वर्णिलेली योजना कल्याणकारक आहे अथवा अपायकारक आहे ?

ग्लॅ०:—ह्या प्रश्नासंबंधीं आपण खात्रीनेंच विचार करावयास पाहिजे.

सॉक्रे०:—राज्याचे तुकडे करून, एकाऐवजीं असंख्य राज्यें निर्माण करण्यापेक्षां, अधिक अपायकारक कांहीं तुम्हाला माहीत आहे काय ? तसेंच, राज्याला एकत्रित करून, एकच राज्य संघटीत करण्यापेक्षां अधिक कल्याणकारक असें दुसरें कांहीं आहे काय ?

ग्लॅ०:--नाहीं.

सॉक्रे०:--राज्यावर आनंदाचे व दुःखाचे प्रसंग आले असताना, सर्व नागरीक जेव्हां सारखाच आनंद व दुःख मानूं लागतात, तेव्हां सुखदुःखाची समभावना त्यांना एक करीत नाहीं काय ?

ग्लॅ०:--खात्रीनेंच.

सॉक्रे०:--शहर आणि शहरवासी लोक, ह्यांना ज्या घडामोडींपासून बाधा होते, त्यांमुळें जर कांहींना आनंद व कांहींना दुःख वाटूं लागलें, तर सुखदुःखाच्या भावना पृथक्पणाच्या होऊन राज्यांत फूट उत्पन्न होत नाहीं काय ?

ग्लॅ०:--निःसंशय.

सॉक्रे०:--'माझें' व 'माझें नव्हे,' तसेंच, 'त्याचें' व 'त्याचें नव्हे,' अशा संज्ञांचा शहरवासीयांकडून भिन्न अर्थ केला गेल्यामुळेंच, अशी परिस्थिति उत्पन्न होत नाहीं काय ?

ग्लॅ०:—अगदीं असेंच.

सॉक्रे०:—एकाच वस्तूंना, 'माझ्या' आणि 'माझ्या नव्हेत,' अशा सारख्या अर्थानें जेव्हां नागरीक संबोधतात, तेव्हां तें नगर उत्तम तऱ्हेनें चालविलें जात आहे, असें समजावें ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:--अथवा दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, व्यक्तीसारखी जेव्हां नगराची स्थिति होते, तेव्हां तें सर्वोत्तम नगर होतें. आपल्या बोटांपैकीं एखादें बोट दुखावलें असताना, सर्व शरीरांतून आत्म्यापर्यंत दुःखाची भावना पसरते व तेथें एकत्रित होते आणि त्यामुळें दुखापतीची जाणीव होऊन, दुखावलेल्या भागाविषयीं सार्वत्रिक व एकाच वेळेला सहानुभूतीची भावना उत्पन्न होते. ह्यावरून आपण म्हणतों कीं, मनुष्याचें बोट दुखावलें आहे. आपल्या शरीराच्या कोणत्याही भागाविषयीं, अशाच तऱ्हेनें म्हणतां येईल कीं, जेव्हां त्याला दुखापत

होते, तेव्हां दुःख होतें व जेव्हां तो भाग सुखरूप असतो, तेव्हां सुख होतें.

ग्लॅ०:—निःसंशय, असेंच. ह्या स्थितींत आणि उत्तम रीतीनें चालविलेल्या राज्याच्या स्थितींत अत्यंत सारखेपणा आहे.

सॉक्रे०:—नागरीकांपैकीं एखाद्याला जेव्हां सुख किंवा दुःख होतें, तेव्हां इतर कोणत्याही राज्यापेक्षां आपण वर्णिलेल्या राज्याला असें वाटेल कीं, आपल्या स्वतःच्या भागालाच जणू कांहीं सुख किंवा दुःख झालें आहे व सर्व राज्य त्या व्यक्तीच्या सुखदुःखाविषयीं सहानुभूति दाखवील.

ग्लॅकान्०:—जर राज्य सुव्यवस्थित असलें, तर असेंच वाटेल.

सॉक्रे०:—आतां आपण आपल्या राज्याकडे वळूं या. जे सद्गुण आपण एकमतानें निश्चित केले आहेत, ते सद्गुण अत्यंत उत्कर्षानें आपल्या राज्यांत दिसून येतात काय अथवा दुसऱ्या एखाद्या राज्यानें आपल्या राज्याला ह्या सद्गुणांत मागें टाकलें आहे काय, हें आपण पाहिलें पाहिजे.

ग्लॅ०:—होय.

Steph सॉक्रे०:—दुसऱ्या राज्यामध्यें, तसेंच आपल्या
463 राज्यामध्यें, अधिकारी लोक व प्रजाजन असे वर्ग असतात ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ते एकमेकांना नागरीक असें संबोधतील ना ?

ग्लॅ०:—अर्थात्‌च.

सॉक्रे०:—एकमेकांना नागरीक म्हणून संबोधल्यावर, इतर राज्यांमध्यें अधिकारी लोकांना, प्रजाजन काय संबोधतील ?

ग्लॅ०:—पुष्कळ ठिकाणीं धनी म्हणून संबोधतील, पण लोकसत्ताक राज्यांत नुसते अधिकारी म्हणून संबोधतील.

सॉक्रे०:—पण आपल्या राज्यामध्यें, नागरीक ह्या संज्ञेशिवाय इतर कोणती संज्ञा, अधिकारी वर्गाला आपले प्रजाजन देतील ?

ग्लॅ०:—त्यांना संरक्षक व सहाय्यक लोकांचा वर्ग असें संबोधतील.

सॉक्रे०:—अधिकारी लोक प्रजाजनांना काय म्हणतील ?

ग्लॅ०:—कर देणारे व राज्याला पोसणारे.

सॉक्रे०:—इतर राज्यांतील अधिकारी लोक, प्रजेला काय म्हणतात ?

ग्लॅ०:—नोकर.

सॉक्रे०:—अधिकारी लोक एकमेकांना काय म्हणतात ?

ग्लॅ०:—अधिकारी-बांधव.

सॉक्रे०:—आणि आपले ?

ग्लॅ०:—संरक्षक-बांधव.

सॉक्रे०:—इतर राज्यांतील अधिकारी, स्वतःच्या अधिकारी बांधवांपैकीं, एकाला आपला मित्र व दुसऱ्याला परका असें संबोधतील काय ?

ग्लॅ०:—पुष्कळ अधिकारी असें करीत असतील.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें, एकाला आपला व दुसऱ्याला परका, असें ते मानीत नाहींत काय ?

ग्लॅ०:—होय, मानतात.

सॉक्रे०:—आपल्या संरक्षकांपैकीं कोणीही, आपल्या संरक्षक बांधवाला परका म्हणून संबोधील व समजेल काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं. कारण संरक्षक जेव्हां एकमेकांना भेटतील, तेव्हां भाऊ, बहीण, बाप, आई, पुत्र अशा नात्यांनींच त्यांनीं एकमेकांना संबोधिलें पाहिजे.

सॉक्रे०:—छान् बोललांत. पण आणखी एका प्रश्नाचें उत्तर मला द्या. कुटुंबाच्या नुसत्या नामधारी नात्यावरच तुम्ही संतुष्ट रहाल अथवा त्या नात्याप्रमाणें प्रत्येक बाबतींत त्यांनीं वागलें पाहिजे, अशी त्यांच्यापासून तुम्ही अपेक्षा कराल ? आईबापांचा मुलानें मान ठेविल

पाहिजे, त्यांना मदत केली पाहिजे आणि त्यांची आज्ञा पाळली पाहिजे; नाहींतर, धर्म व न्याय ह्यांची पायमल्ली करणारा मुलगा, स्वर्गामध्यें व इहलोकामध्येंही दुर्दशेला जाईल, अशा तऱ्हेची भाषा मुलांच्या कानावर नेहमीं पडत रहावयास नको काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच. कारण कौटुंबिक नातें, नुसतें तोंडानें सांगून त्याप्रमाणें कृति कांहीं न करणें, हास्यास्पद आहे.

सॉक्रे०:—तर मग, एखाद्या व्यक्तीवर चांगला किंवा वाईट प्रसंग आला असतां, आपल्या राज्यांतील प्रत्येक प्रजाजन, 'माझें बरें झालें,' 'माझें वाईट झालें,' असे सार्वत्रिक सहानुभूतीनें शब्द उच्चारील.

ग्लॅ०:—अगदीं खरें आहे.

Steph 464 सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें विचार करण्याची व भाषणाची पद्धति असली, म्हणजे सुखदुःखाविषयींही सर्वसाधारण सहानुभूति असते, असें आपण म्हटलें नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय आणि तें बरोबरही आहे.

सॉक्रे०:—एकाच वस्तूला, 'आपली' म्हणण्यांत समान हित मानल्यामुळें, सुखदुःखाची समभावना आपल्या नागरीकांत विशेष प्रमाणानें दिसणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय, विशेष प्रमाणांत दिसेल.

सॉक्रे०:—आपल्या राज्यघटनेच्या तत्वांमध्यें, स्त्रिया व मुलें ह्यांच्या समाईक मालकीचें तत्व, विशिष्ट असल्यामुळेंच असें दिसून येतें ना ?

ग्लॅ०:—होय, विशेषेंकरून ह्यामुळेंच.

सॉक्रे०:—सर्व शरीराचा ज्याप्रमाणें सुखदुःखाच्या गोष्टींत प्रत्येक अवयवाशीं संबंध असतो, त्याप्रमाणें सुव्यवस्थित राज्याचा प्रजेशीं असतो; अशी तुलना करून वरील प्रकारची समभावना ही अत्यंत कल्याणकारक होय, असें आपण कबूल केल्याचें तुम्हास आठवतें काय ?

ग्लॅ०:—होय. आपली ही कबुली बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, संरक्षक लोकांमध्यें स्त्रिया व मुलें ह्यांची समाईक मालकी असणें, म्हणजे राज्यहिताची पराकाष्ठा होय, असें आपण शोधून काढलें.

ग्लॅ०:—होय. बरोबर असेंच.

सॉक्रे०: - इतर शहरवासीयांकडून, संरक्षकाच्या कामाबद्दल म्हणून पोषणाइतकें जें वेतन मिळेल, त्यापलीकडे घर, जमीन अथवा इतर कांहीं खाजगी मिळकत, संरक्षकांनीं करतां कामा नये, असा जो निर्बंध आपण संरक्षकांविषयीं घालून दिला आहे, त्या निर्बंधाला धरूनच वरील व्यवस्था आहे.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पूर्वींच्या नियमांप्रमाणें व आतां आपण वर्णन करीत आहोंत त्या नियमांप्रमाणें वागलें असतां, आपले लोक अस्सल संरक्षक होतील. 'माझे नव्हे' अशा संज्ञांचे निराळे अर्थ करून, शहराचे ते तुकडे पाडणार नाहींत. इतरांपासून निराळीं अशीं स्वतंत्रपणानें घरें करून, त्यांमध्यें खास स्वतःचीं अशीं बायका व मुलें ठेवून, स्वतंत्र सुखदुःखें ते उत्पन्न करणार नाहींत. उलट, ममत्व कशाबिषयीं ठेवावें, ह्याबद्दल सर्वांचें एकमत असल्यामुळें, सुखदुःखाच्या भावनाही शक्यतोंवर सारख्याच त्यांना वाटावयास लागून, ते एकाच ध्येयाला चिकटून राहतील.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०—स्वतःच्या शरीरापलीकडे स्वतःच्या मालकीचें असें कांहींच नसल्यामुळें, दिवाणी दावे व फौजदाऱ्या आपोआप बंद होणार नाहींत काय? पैसा, मुलें व अशा इतर वस्तु, ह्यांच्यावर स्वतःची मालकी असल्यामुळें, मनुष्यामनुष्यांमध्यें उत्पन्न होणाऱ्या भांडणांपासून, संरक्षक-लोक मुक्त होणार नाहींत काय?

ग्लॅ०:—ह्यांपासून ते मुक्त झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

सॉक्रे०—तसेंच, गैरहक्कानें व जबरदस्तीनें कबजा घेण्याचे, अथवा शिवीगाळ, मारामारी, इत्यादि प्रकारचे खटले होणार नाहींत. कारण आपण असें ठरवूं कीं, समान वयाचा मनुष्य अंगावर धावून आला असतां, त्याचा प्रतिकार करून आत्मसंरक्षण करणें, हें मानाचें व न्यायाचें असून, शरीरसंरक्षण करणें आवश्यकच होय.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—अशा कायद्यांपासून आणखी एक फायदा आहे. जेव्हां एखादा मनुष्य दुसऱ्यावर चिडून जाईल, तेव्हां दुसऱ्या-
Steph वरोबर त्याला जातीनें सामना करून, स्वतःचा राग
465 शांत करतां येईल व त्यामुळें भांडणाचा शेवट विशेष भयंकर स्वरूपांत होणार नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तथापि वृद्ध मनुष्याला, स्वतःपेक्षां लहान असलेल्या माणसाला आज्ञा व शिक्षा करण्याचा अधिकार दिला जाईल.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—आणि अधिकारी लोकांच्या आज्ञेशिवाय, वृद्ध मनुष्याला मारण्याची अथवा अन्यतऱ्हेनें शिक्षा करण्याची, तरुणाला परवानगी देण्यांत येणार नाहीं. तरुण मनुष्याला, वृद्ध मनुष्याचा अपमानही करतां येणार नाहीं. कारण भीति व लज्जा, ह्या दोन संरक्षकांकडून तो परावृत्त केला जाईल. ज्या मनुष्याला पित्यासारखें मानावयाचें, त्याच्यावर प्रहार करण्यास त्याला लाज वाटेल. तसेंच, वृद्ध मनुष्यावर हल्ला केला असतां, वृद्धाच्या मदतीला त्याचे मुलगे, भाऊ, बाप, इत्यादि नातलग धांवून येतील, म्हणून त्याला भीति वाटेल.

ग्लॅ०:—होय. आपल्या कायद्यानें असे चांगले परिणाम घडून येतील.

सॉक्रे०:—तर मग, हे कायदे आपल्या लोकांमध्यें पूर्णपणें शांतता राखूं शकतील.

ग्लॅ०:—होय. पुष्कळ अंशीं.

सॉक्रे०:—जर संरक्षक-वर्गांतील लोक अंतस्थ कलहापासून मुक्त असतील, तर इतर नागरीक त्यांच्याबरोबर किंवा एकमेकांबरोबर भांडण्याची भीति राहणार नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणखी कांहीं क्षुल्लक स्वरूपाच्या वाईट परिणामापासूनही ते अलिप्त असतील. गरीब लोकांकडून श्रीमंत लोकांची केली जाणारी खुषामत, कुटुंबाचें पालनपोषण करताना येणारे गोंधळाचे व त्रासाचे प्रसंग, घरांतील मंडळींच्या व चाकरांच्या केवळ अन्नवस्त्राकरितां मिळवावयास लागणाऱ्या पैशाकरितां सोसावे लागणारे कष्ट-आतां पैसे उसनवार काढून नंतर देत नाहीं म्हणून म्हणणें, तसेंच वाईट मार्गांनीं पैसे मिळवून ते आपल्या बायकांच्या व नोकरांच्या ताब्यांत राखून ठेवण्याकरितां देणें,–हे सर्व त्रासाचे प्रसंग, उघडच आहेत आणि ते क्षुद्र असल्यामुळें वर्णन करण्यासही योग्य नाहींत.

ग्लॅ०:—हे दुष्परिणाम आंधळयाला सुद्धां दिसणारे आहेत.

सॉक्रे०:—ह्या सर्व दुष्परिणामांपासून संरक्षक लोक अलिप्त असल्यामुळें, ऑलिंपिक खेळामध्यें विजयी होणाऱ्या वीरांपेक्षांही अधिक समाधानाचें आयुष्य त्यांना उपभोगतां येईल.

ग्लॅकान्०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—आपल्या संरक्षक-लोकांना जें सौख्य मिळतें, त्याचा फारच लहान भाग ऑलिंपिक खेळांतील विजयी लोकांना मिळतो. कारण संरक्षक लोकांचा सर्व खर्च सार्वजनिक पैशांतून चालून, उलट कीर्तीही त्यांना मोठ्या प्रमाणांत मिळत असते. संरक्षकांनीं मिळविलेल्या विजयापासून सर्व राज्याचें संरक्षण होतें व ते जिवंत असतांना सरकारांतून त्यांना व त्यांच्या मुलांना, अन्नवस्त्र आणि आयुष्याच्या आवश्यक

गरजा पुरवल्या जातात आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा सन्मानानें प्रेतसंस्कार करण्यांत येतो.

ग्लॅ०:—होय, हे मोठ्या गौरवाचे हक्क होत.

सॉक्रे०:—तुम्हांला आठवत असेल कीं, 'संरक्षकांना आपण सुखी केलें नाहीं,' असा आरोप आपणावर कांहीं

Steph 466 वेळांपूर्वीं ठेवण्यांत आला होता. कारण नागरीकांजवळ जें असेल तें घेण्याचा अधिकार जरी आपण संरक्षकांना दिला, तरी त्यांच्या स्वतःच्या मालकीचें असें त्यांना कांहींच ठेवूं दिलें नाहीं. कोणत्याही एका विशिष्ट वर्गाच्या सुखाचा विचार बाजूस सारून, आपले संरक्षक हे अस्सल संरक्षक कसे होतील व आपलें सर्व राज्य सुखी कसें होईल, ह्या प्रश्नांचाच विचार आपण त्या वेळेस करीत असल्यामुळें, वरील आक्षेपाचें उत्तर पुढें देऊं, असें आपण म्हटलें होतें.

ग्लॅ०:—होय. मला आठवतें.

सॉक्रे०:—ठीक आहे. आपल्या सहाय्यक लोकांचें आयुष्य, ऑलिंपिअन विजयी वीरापेक्षांही अधिक माननीय व वांछनीय आहे, असें आपणास दिसून आल्यावर, चांभार अथवा इतर कारागीर, अथवा शेतकरी, ह्यांच्या आयुष्याची, त्यांच्या आयुष्याशीं तुलना तरी होऊं शकेल काय?

ग्लॅ०:—खात्रीनेंच होणार नाहीं.

सॉक्रे०:—त्या वेळेला जें मी म्हटलें, तें पुनः ह्या ठिकाणीं सांगणें योग्य आहे. आपले संरक्षक, त्यांचें संरक्षकत्व नष्ट होईल अशा तऱ्हेनें जर सुख घेण्याचा प्रयत्न करूं लागतील आणि नेमस्त व स्थिर अशा आयुष्यांत समाधान मानण्याऐवजीं, सुखाची मूर्ख व पोरकट कल्पना बाळगून, अधिकाराच्या जोरावर शहरांतील सर्व चांगल्या वस्तु वापरूं लागतील, तर त्यांना असें आढळून येईल कीं, एका अर्थानें "अर्ध्याची

किंमत पूर्णापेक्षां जास्त असते," हें हिजिअडचें म्हणणें खरोखरच शहाणपणाचें आहे.

ग्लॅ०:—जर ते माझा उपदेश ऐकतील, तर ते आपण ठरविलेल्या नियमांप्रमाणें व्यवस्थित आयुष्य घालवितील.

सॉक्रे०:—तर मग, शिक्षण, मुलांची जोपासना आणि शहरवासी-यांवरील पहारा, ह्या बाबतींत स्त्रियांचा दर्जा पुरुषांप्रमाणेंच समजावयाचा. त्यांना घरांत ठेविलें काय, किंवा रणांगणावर पाठविलें काय, संरक्षकांच्या कामामध्येंच त्यांनीं पुरुषांबरोबर भाग घ्यावयाचा, कुत्र्यांप्रमाणें पुरुषांच्या पाठोपाठ शिकार करावयाची आणि शक्य-तोंवर त्यांच्याबरोबरच सर्व गोष्टींत त्यांनीं भाग घ्यावयाचा. अशा तऱ्हेनें एकत्र रहात असतांना, नैसर्गिक संबंधाला अपायकारक असें कांहींच न करतां, स्त्रिया इष्ट तेंच करतील, असेंच तुमचें मत आहे ना ?

ग्लॅ०:—होय. मला हें सर्व कबूल आहे.

सॉक्रे०:—पशूंमध्यें ज्याप्रमाणें अशा तऱ्हेचा संघ असूं शकतो, त्याप्रमाणें मनुष्यांमध्येंही असूं शकेल किंवा नाहीं आणि शक्य अस-ल्यास कोणती परिस्थिति जरूर आहे, हें आपण ठरविलें पाहिजे ना ?

ग्लॅ०:—मी अशीच सूचना करणार होतों, पण तुम्ही अगोदरच तिचा निर्देश केला.

सॉक्रे०:—त्यांची युद्धांतील वागणूक कशी असेल, हें समजणें सोपें आहे.

ग्लॅ०:—कसें काय ?

सॉक्रे०:—इतर कारागीर ज्याप्रमाणें आपल्या मुलांना बरोबर घेतात, त्याप्रमाणें स्त्री व पुरुष ( संरक्षक ) आपल्या सशक्त मुलांना रणांगणावर बरोबर घेऊन जातील. मोठीं झाल्यावर त्यांना हींच
Steph 467 कामें करावयाचीं आहेत, ह्या धोरणानें त्यांना प्रेक्षकां-प्रमाणें युद्ध बघावयास लावतील. अशा वेळेस युद्ध पहाण्याखेरीज नोकरांचें काम मुलांना करावयास लागून,

तीं आपल्या आईबापांच्या उपयोगी पडतील. कुंभारांचीं मुलें स्वतः भांडीं तयार करावयास लागण्यापूर्वीं, आपल्या आईबापांचें काम बघत असतात व बारीकसारीक जिनसांची ने आण करण्यांत त्यांना मदत करीत असतात. असा प्रकार तुम्ही बघितलाच असेल ?

ग्लॅ०:—होय. मी बघितला आहे.

सॉक्रे०:—कुंभारांनीं, स्वतःच्या मुलांना काम बघण्याची व करण्याची संधी देऊन, योग्य शिक्षणानें त्यांना तयार करण्यांत, संरक्षकांपेक्षां अधिक काळजी दाखवावी काय ?

ग्लॅ०:—ही कल्पना हास्यास्पद आहे.

सॉक्रे०:—प्रत्येक मनुष्य, आपल्या मुलांच्या सान्निध्यांत, विलक्षण धैर्यानें लढत नाहीं काय ?

ग्लॅ०:—खरें आहें. पण सॉक्रेटिस, युद्धांमध्यें नेहमीं ओढवणाऱ्या दुर्दैवी प्रसंगांपैकीं एखादा ओढवून, आईबापांबरोबर मुलांचीही कत्तल होऊन, भरून न येणाऱ्या नुकसानानें शहराची शक्ति कमी होण्याची भीति संभवत नाहीं काय ?

सॉक्रे०:—हें खरें आहे. पण संभवनीय असें प्रत्येक संकट टाळण्याचे उपाय योजून ठेवण्यास, आपण बांधले गेलों आहोंत काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. जर संकटाला तोंड द्यावयाचें असेल, तर ज्यांतून निभावलें असतां, संरक्षकांची पुढें सुधारणा होईल अशाच प्रसंगीं तोंड द्यावें ना ?

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—ज्या लोकांचें तारुण्य युद्धांमध्यें जावयाचें आहे, त्यांनीं आपल्या लहानपणांत युद्धप्रकार पहाणें महत्वाचें असून, त्याकरितां थोडाबहुत धोक्याचा प्रसंगही अवलंबिला पाहिजे, असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—असें करणें अत्यंत महत्वाचें आहे.

सॉक्रे०:—तर मग, मुलांनीं युद्धामध्यें प्रेक्षक राहलेंच पाहिजे, असा नियम केला जाऊन, त्यांच्या संरक्षणाची कांहींतरी व्यवस्था केली जाईल. मग कांहीं हरकत नाहीं ना ?

ग्लॅ०: —नाहीं.

सॉक्रे०:—त्यांचे आईबाप, लढाईचे कोणते प्रसंग धोक्याचे व कोणते सुरक्षितपणाचे होतील, ह्याबद्दल अंदाज करूं शकणार नाहींत काय ?

ग्लॅ०:—बहुतकरून ते करूं शकतील.

सॉक्रे०:—असें जर आहे, तर दुसऱ्या प्रकारच्या प्रसंगांमध्यें ते मुलांना बरोबर घेतील आणि पहिल्या प्रकारच्या प्रसंगांमध्यें घेणार नाहींत.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि अनुभवानें व वयानें योग्य असे लोक, मार्गदर्शक व शिक्षक म्हणून त्यांच्यावर पहारा करण्यास ठेवतील.

ग्लॅ०:—हें योग्यच आहे.

सॉक्रे०:—तथापि, पुष्कळ लोकांना, युद्धप्रसंगीं अपेक्षेविरुद्ध परिणाम बघावे लागले आहेत, हें आपणास कबूल करावें लागेल.

ग्लॅ०:—होय. पुष्कळ वेळां.

सॉक्रे०:—म्हणून, असे प्रसंग टाळण्याकरितां आपल्या मुलांना पहिल्यापासून पंख पुरवले पाहिजेत. त्यांच्या सहाय्यानें, अडचणीच्या प्रसंगीं त्यांना पळून जातां येऊन, स्वतःचा जीव बचावतां येईल.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—मी म्हणतों, मुलांना शक्य तितक्या लहान वयांत घोड्यावर बसण्याची कला शिकविली पाहिजे आणि युद्ध बघण्याकरितां, त्यांना पाणीदार किंवा चांगल्या लढाऊ घोड्यांवर न बसवितां, चपळ व कह्यांत ठेवतां येणाऱ्या घोड्यांवर बसविलें असतां, आपल्या भावी

तीं आपल्या आईबापांच्या उपयोगी पडतील. कुंभारांचीं मुलें स्वतः भांडीं तयार करावयास लागण्यापूर्वीं, आपल्या आईबापांचें काम बघत असतात व बारीकसारीक जिनसांची ने आण करण्यांत त्यांना मदत करीत असतात. असा प्रकार तुम्ही बघितलाच असेल ?

ग्लॅ०:—होय. मी बघितला आहे.

सॉक्रे०:—कुंभारांनीं, स्वतःच्या मुलांना काम बघण्याची व करण्याची संधी देऊन, योग्य शिक्षणानें त्यांना तयार करण्यांत, संरक्षकांपेक्षां अधिक काळजी दाखवावी काय ?

ग्लॅ०:—ही कल्पना हास्यास्पद आहे.

सॉक्रे०:—प्रत्येक मनुष्य, आपल्या मुलांच्या सान्निध्यांत, विलक्षण धैर्यानें लढत नाहीं काय ?

ग्लॅ०:—खरें आहे. पण सॉक्रेटिस, युद्धांमध्यें नेहमीं ओढवणाऱ्या दुर्दैवी प्रसंगांपैकीं एखादा ओढवून, आईबापांबरोबर मुलांचीही कत्तल होऊन, भरून न येणाऱ्या नुकसानानें शहराची शक्ति कमी होण्याची भीति संभवत नाहीं काय ?

सॉक्रे०:—हें खरें आहे. पण संभवनीय असें प्रत्येक संकट टाळण्याचे उपाय योजून ठेवण्यास, आपण बांधले गेलों आहोंत काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. जर संकटाला तोंड द्यावयाचें असेल, तर ज्यांतून निभावलें असतां, संरक्षकांची पुढें सुधारणा होईल अशाच प्रसंगीं तोंड द्यावें ना ?

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—ज्या लोकांचें तारुण्य युद्धांमध्यें जावयाचें आहे, त्यांनीं आपल्या लहानपणांत युद्धप्रकार पहाणें महत्वाचें असून, त्याकरितां थोडाबहुत धोक्याचा प्रसंगही अवलंबिला पाहिजे, असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—असें करणें अत्यंत महत्वाचें आहे.

सॉक्रे०:—तर मग, मुलांनीं युद्धामध्यें प्रेक्षक राहलेंच पाहिजे, असा नियम केला जाऊन, त्यांच्या संरक्षणाची कांहींतरी व्यवस्था केली जाईल. मग कांहीं हरकत नाहीं ना ?

ग्लॅ०: —नाहीं.

सॉक्रे०:—त्यांचे आईबाप, लढाईचे कोणते प्रसंग धोक्याचे व कोणते सुरक्षितपणाचे होतील, ह्याबद्दल अंदाज करूं शकणार नाहींत काय ?

ग्लॅ०:—बहुतकरून ते करूं शकतील.

सॉक्रे०:—असें जर आहे, तर दुसऱ्या प्रकारच्या प्रसंगांमध्यें ते मुलांना बरोबर घेतील आणि पहिल्या प्रकारच्या प्रसंगांमध्यें घेणार नाहींत.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि अनुभवानें व वयानें योग्य असे लोक, मार्गदर्शक व शिक्षक म्हणून त्यांच्यावर पहारा करण्यास ठेवतील.

ग्लॅ०:—हें योग्यच आहे.

सॉक्रे०:—तथापि, पुष्कळ लोकांना, युद्धप्रसंगीं अपेक्षेविरुद्ध परिणाम बघावे लागले आहेत, हें आपणास कबूल करावें लागेल.

ग्लॅ०:—होय. पुष्कळ वेळां.

सॉक्रे०:—म्हणून, असे प्रसंग टाळण्याकरितां आपल्या मुलांना पहिल्यापासून पंख पुरवले पाहिजेत. त्यांच्या सहाय्यानें, अडचणीच्या प्रसंगीं त्यांना पळून जातां येऊन, स्वतःचा जीव बचावतां येईल.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—मी म्हणतों, मुलांना शक्य तितक्या लहान वयांत घोड्यावर बसण्याची कला शिकविली पाहिजे आणि युद्ध बघण्याकरितां, त्यांना पाणीदार किंवा चांगल्या लढाऊ घोड्यांवर न बसवितां, चपळ व कह्यांत ठेवतां येणाऱ्या घोड्यांवर बसविलें असतां, आपल्या भावी

धंद्याचें त्यांना उत्तम प्रकारें निरीक्षण करतां येईल आणि अडचणीच्या प्रसंगीं, वृद्ध व अनुभवी सेनापतींबरोबर पळून जाण्याची तयारीही ठेवतां येईल.

ग्लॅ०:—तुमची योजना बरोबर आहे.

Steph 468 सॉक्रे०:—लष्करी नोकरीचे नियमांसंबंधीं आपण आतां विचार करूं. परस्परांशीं सैनिकांचा काय संबंध असावा? ह्या विषयासंबंधीं माझीं पुढील मतें बरोबर आहेत किंवा नाहींत हें सांगा.

ग्लॅ०: तीं काय आहेत, हें अगोदर मला सांगा.

सॉक्रे०:—जर एखादा सैनिक आपली तुकडी सोडून देईल किंवा शस्त्रें टाकून देईल अथवा भित्रेपणाचें असेंच एखादें कृत्य करील, तर त्यास आपण कारागीर अथवा शेतकरी वर्गाच्या लोकांत ढकललें पाहिजे ना?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि जर एखादा सैनिक शत्रूंच्या हातीं जिवंत सांपडला, तर शत्रूची त्याच्यावर मालकी समजण्यांत येऊन, शत्रूनें त्याचें वाटेल तें करावें, अशी आपण मोकळीक द्यावी ना?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—पण जर एखाद्या सैनिकानें युद्धांत अलौकिक यश मिळविलें, तर त्याच्याबरोबर असलेल्या सैनिकांपैकीं, तरुण लोकांनीं व मुलांनीं, त्याला रणांगणावरच आळीपाळीनें पुष्पहार घालणें जरूर आहे ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—त्याच्याशीं हस्तांदोलनही त्यांनीं केलें पाहिजे ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—माझ्या दुसऱ्या ठरावाला तुम्ही क्वचित्‌च संमती द्याल!

ग्लॅ०:—कोणत्या ?

सॉक्रे०:—त्यानें सर्वांचें चुंबन घ्यावें व सर्वांनीं त्याचें चुंबन घ्यावें.

ग्लॅ०:—निःसंशय मी संमती देतों. इतकेंच नव्हे, तर मी असा नियम करतों कीं, मोहीमेवर असतांना, ज्या मनुष्याचें त्याला चुंबन घ्यावयाचें आहे, त्यानें अशा इच्छेस विरोध करतां कामा नये. कारण एखाद्या सैनिकाला, पुरुष वर्गांतील अगर स्त्रीवर्गांतील एखाद्या सोबत्याविषयीं आवड असली, तर आपल्या शौर्याचें हें बक्षिस मिळविण्याकरितां, वरील नियमामुळें त्याला जास्त उत्तेजन मिळेल.

सॉक्रे०:—ठीक आहे. आपण पूर्वीं म्हटलेंच आहे कीं, शूर मनुष्याला इतरांपेक्षां अधिक लग्नसंबंध करण्याची मुभा देण्यांत यावी. अशा बाबतींत त्याला इतरांपेक्षां निवड करण्याची सवलत अधिक देण्यांत आली असतां, अशा स्वभावाच्या पित्यापासून हवीं तितकीं मुलें उत्पन्न करतां येतील.

ग्लॅ०:—होय. आपण असें म्हटलें आहे.

सॉक्रे०:—होमरच्या मताप्रमाणें, जे आपल्या सद्वर्तनामुळें प्रसिद्धी पावतात, अशा तरुण लोकांचा सन्मान करण्याचे इतरही प्रकार आहेत. अजॅक्सनें युद्धांत कीर्ति मिळविल्यावर त्याला गोमांस देण्यांत येऊन, त्याचा विशेष गौरव करण्यांत आला. हा मान, त्याची कीर्ति वाढवून शारिरीक शक्तीही वाढविणारा होता आणि तारुण्याच्या प्रथमावस्थेंत असलेल्या शूराला योग्य होता.

ग्लॅ:—ही कल्पना अत्यंत योग्य आहे.

सॉक्रे०—ह्या मुद्यावर तरी आपण होमरची सूचना अंमलांत आणूं. आपण सुद्धां यज्ञोत्सव व तत्सदृश इतर प्रसंगीं आपल्या गुणवान सैनिकांचा, त्यांच्या योग्यतेप्रमाणें व त्यांनीं दाखविलेल्या वैशिष्ट्याप्रमाणें, केवळ गाण्यांनीं व पूर्वीं वर्णन केलेल्या सवलतींनीं सन्मान न करतां,

1 Iliad VII. 321

त्यांना मद्यपूर्ण पेले', मांस व मानाची जागा देऊन त्यांचा विशेष सन्मान करूं. ह्यामुळें शूर पुरुष व स्त्रिया ह्यांचा सन्मान केला जाऊन, त्यांचें शिक्षणही वाढविलें जाईल.

ग्लॅ०:—ही योजना उत्तम आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. ज्यावेळीं सैनिक लढाईत मारले जातील, तेव्हां आपण प्रथम जाहीर करूं कीं, जे लढतांना मारले गेले ते सुवर्णवंशाचे झाले.

ग्लॅ०:—खात्रीनेंच जाहीर करूं.

सॉक्रे०:—जेव्हां ह्या वंशापैकीं एखादा मरतो, तेव्हां हिजिअडच्या पुढील कल्पनेवर आपण विश्वास ठेवणार नाहीं काय ?

Steph *" हे लोक पिशाचयोनींत रूपांतर पावून, पृथ्वीवर
469 फिरत राहतात. ते दयाळू, पवित्र व वाईटापासून रक्षण करणारे असून, भाषण करण्याची देणगी असलेल्या मनुष्यांचे संरक्षक असतात. "

ग्लॅ०:—होय, ह्या कल्पनेवर आपण विश्वास ठेवूं.

सॉक्रे०:—असामान्य व दैवी पुरुषांचे प्रेतसंस्कार व पुरण्याच्या जागा, आपण भविष्यवाणीच्या निर्देशाप्रमाणें ठरविणार नाहीं काय ?

ग्लॅ०: - खात्रीनेंच ठरवूं.

सॉक्रे०:—त्यांचीं थडगीं, वीर पुरुषांच्या शवमंदिरांप्रमाणें समजून आपण त्यांची सन्मानानें पूजा करणार नाहीं काय ? शूर कृत्यांनीं प्रसिद्धि पावलेला कोणीही नागरीक, वार्धक्यानें अथवा इतर कारणानें मरण पावला असतां, ह्याच चाली आपण पाळूं ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच. आणि असें करणें योग्यच आहे.

सॉक्रे०:—आपल्या सैनिकांनीं शत्रूबरोबर कोणत्या प्रकारें वर्तणूक ठेवावी ?

---

1 Iliad VII 162 * Works and Dadys 121

ग्लॅ०:—कोणत्या बाबतींत ?

सॉक्रे०:—प्रथमतः गुलाम करण्याची पद्धत घ्या. ग्रीस शहरांतील स्वतंत्र लोकांना, ग्रीक लोकांनीं, गुलाम करणें न्यायाचें आहे काय ? ह्याच्या उलट, यथाशक्ति ही पद्धत मोडून काढण्याची खटपट करून, रानटी लोकांकडून आपला वंश गुलाम केला जाऊं नये, ह्या भयानें आपल्या लोकांना गुलाम न करण्याची पद्धत, त्यांनीं अमलांत आणावयास नको काय ?

ग्लॅ०:—दुसरी पद्धत अधिक चांगली आहे.

सॉक्रे०:—तर मग, त्यांनीं ग्रीक गुलाम स्वतः जवळ बाळगतां कामा नये व इतर ग्रीक लोकांनाही बाळगूं देतां कामा नये.

ग्लॅ०:—निःसंशय. असें केलें असतां, रानटी लोकांच्याविरुद्ध ते एकजुटीनें लढण्यास तयार होऊन एकमेकांना त्रास देणार नाहींत.

सॉक्रे०:—युद्धांत विजय मिळविल्यानंतर, अंगावरील शस्त्रास्त्रें काढून घेण्यापलीकडे, मृत शत्रूला अधिक नागविणें बरोबर आहे काय ? ह्या पद्धतीमुळें, भ्याड शिपाई, लढत असलेल्या शत्रूबरोबर सामना न देतां मृत शरीरावर बंदूक रोखून, आपण कामामध्यें गुंतलेलों आहोंत, असा बहाणा करीत नाहींत काय ? लुटालूट करण्याच्या अनिष्ट पद्धतीमुळें, पुष्कळ सैन्यें नाश पावलेलीं नाहींत काय ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—मृताला लुबाडणें, ही अत्यंत क्षुद्र लोभाची गोष्ट नव्हे काय ? शत्रु ज्या शरीरानें व शस्त्रांनीं लढला तें शरीर व तीं शस्त्रास्त्रें तो टाकून गेल्यावर, त्याच्या मृत शरीराविषयीं वैराची भावना ठेवणें, म्हणजे बायकी व क्षुद्र मनाचें प्रदर्शन करणें नव्हे काय ? असे लोक, कुत्रे ज्याप्रमाणें त्यांच्यावर धोंडे फेंकले जात असतांना, धोंड्यांवरच भुंकत राहून, धोंडमार करणाऱ्याला सोडून देतात, त्याप्रमाणें वागत नाहींत काय ?

ग्लॅ०:--होय. कुत्र्यांप्रमाणेंच केवळ ते वागतात.

सॉक्रे०:—मृतांना नागविणें व त्यांच्या प्रेतसंस्कारांमध्यें अडथळा आणणें, हे प्रकार आपण बंद केले पाहिजेत ना ?

ग्लॅ०:—होय. केले पाहिजेत.

सॉक्रे०:— इतर ग्रीक लोकांचें, आपल्याविषयीं चांगलें मत व्हावें अशी जर आपली इच्छा असेल, तर आपल्या शत्रूंचीं, विशेषतः ग्रीक लोकांचीं, शस्त्रास्त्रें देवळांत नेऊन, आपण तीं देवाला
Steph अर्पण करतां कामा नयेत. उलट, आपल्या बांधवांचा
470 पराजय करून मिळविलेलीं हीं विजयचिन्हें, देवळांत
नेलीं असतां, देऊळ अपवित्र होईल, अशी आपल्याला भीति वाटली पाहिजे. अर्थात् भविष्यवाणीनेंच निराळ्या तऱ्हेचें मत दिलें तर इलाज नाहीं.

ग्लॅ०:—होय. तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:--ग्रीक लोकांच्या जमिनींची नासधूस व घरांची जाळपोळ, ह्या बाबतींत तुमचे सैनिक शत्रूशीं कशा रीतीनें वागतील ?

ग्लॅ०:--ह्या विषयावर मी तुमचें मत ऐकूं इच्छितों.

सॉक्रे०:—ह्या दोन्हीही पद्धतींचा मी निषेध करून सुचवितों कीं, फक्त वार्षिक पीक तेवढें काढून न्यावें. मी असें कां म्हणतों, हें सांगावयास पाहिजे काय ?

ग्लॅ०:--होय.

सॉक्रे०:—ज्याअर्थीं युद्ध व वर्गकलह अशा संज्ञा प्रसिद्ध आहेत, त्याअर्थीं भेद दर्शविणारे दोन प्रकार आहेत. जेव्हां मित्र व नातलग ह्या लोकांशीं वैरभाव असतो, तेव्हां त्याला वर्गकलह म्हणतात. आणि ज्यावेळेस परकी अथवा शत्रु लोकांशीं वैरभाव असतो, त्यावेळेस त्याला युद्ध असें म्हणतात.

ग्लॅ०:—तुम्ही सांगितलेला फरक बुद्धीला पटणारा आहे.

सॉक्रे०:—ग्रीक लोकांची सर्व जात, एकमेकांना बंधु व नातलग मानते पण रानटी लोकांना शत्रु व परके समजते. माझें हें विधान बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून ग्रीक लोक व रानटी लोक ह्यांच्यामध्यें जेव्हां लढाई होते, तेव्हां स्वाभाविक शत्रु एकमेकांविरुद्ध लढाई करीत आहेत, असें आपण समजूं व ह्या वैरभावाला युद्ध असें संबोधूं. परंतु ग्रीक लोकांमध्यें जेव्हां असा वैरभाव उत्पन्न होतो, तेव्हां ते स्वाभाविक मित्र जरी असले तरी त्यांच्या ह्या स्थितीला विकारवश वर्ग-कलह म्हणूं आणि ह्या शत्रुत्वाला यादवी अथवा वर्गकलह असें संबोधूं.

ग्लॅ०:—ह्या मताला माझी पूर्ण संमती आहे.

सॉक्रे०:—जिला यादवी किंवा वर्ग-कलह म्हणतात, अशी स्थिति उत्पन्न होऊन शहराची जेव्हां फूट होते, तेव्हां एका पक्षानें दुसऱ्या पक्षाच्या जमिनीची नासधूस व घरांची जाळपोळ केली असतां, हा कलह पापात्मक असून दोन्ही पक्ष देशद्रोही समजण्यांत येतात. कारण जर ते देशभक्त असते, तर दाई व माता ह्यांच्याप्रमाणें पवित्र अशा आपल्या देशभूमीची, चिरफाड करण्यास ते कधींही तयार झाले नसते. विजयी पक्षानें, पराभूत झालेल्या लोकांचीं पीकें काढून घेण्यापेक्षां अधिक नुकसान कांहीं करूं नये. त्यानें दोन्ही पक्ष पुनः एकजीव होणार आहेत, अशी आशा मनांत बाळगावी व युद्ध चालू ठेवण्याचा आग्रह धरूं नये.

ग्लॅ०:—दुसऱ्या भावनेपेक्षां, ही भावना अधिक सुसंस्कृत स्थिति दाखविते.

सॉक्रे०:—ठीक आहे. तुम्ही जें शहर घडवीत आहां, तें ग्रीक शहरच आहे ना ?

सॉक्रे०:—माझ्या विवेचनांतील पाल्हाळीकपणाविषयीं तुम्ही यत्किंचितही दया न दाखवितां, किती अचानक हल्ला केला
Steph आहे ! मी नुकत्याच कोठें दोन लाटा ओलांडल्या नाहींत,
472 तोंच तुम्ही केवढी डोंगराएवढी मोठी व भयंकर अशी तिसरी लाट माझ्यावर आणीत आहांत, त्याची तुम्हाला कदाचित् कल्पना नसेल. जेव्हां तुम्ही ती पहाल अथवा ऐकाल, तेव्हां अशी आश्चर्यकारक कल्पना पुढें मांडून, चर्चा करण्यास मी कां टंगळमंगळ करीत होतों, ह्याची कारणें तुमच्या लक्षांत येऊन, तुम्ही मला क्षमा कराल.

ग्लॅ०:—अशा सुरांत जों जों तुम्ही बोलाल, तों तों ही कल्पना शक्य कशी आहे, ह्याचें विवेचन तुमच्यापासून ऐकून घेण्याची आम्हीं जास्त घाई करूं. म्हणून तुमचें स्पष्टीकरण सांगण्यास, तुम्ही तावडतोब आरंभ करा.

सॉक्रे०:—बरें आहे. न्याय व अन्याय ह्यांच्या स्वरूपाविषयीं विचार करीत असतांना, आपण प्रस्तुत मुद्यावर आलों, हें आपण विसरतां कामा नये.

ग्लॅ०:—खरें आहे. पण ह्याचा प्रस्तुत ठिकाणीं संबंध काय ?

सॉक्रे०:—कांहीं नाहीं. जर आपणाला न्याय म्हणजे काय हें शोधून काढतां आलें, तर न्यायी मनुष्याचा स्वभाव, न्यायाच्या स्वरूपापासून भिन्न असण्याऐवजीं, न्यायाचीच केवळ नक्कल होय, असें आपण दाखविलें पाहिजे काय? अथवा न्यायी मनुष्य, न्यायाच्या शक्य तितका जवळ असतो व न्यायाचा अंश, जगांतील इतर मनुष्यांपेक्षां त्याच्यामध्यें जास्त असतो, एवढें सिद्ध केलें तर आपलें समाधान होईल काय ?

ग्लॅ०:—दुसऱ्या प्रकारानेंही समाधान मानतां येईल.

सॉक्रे०:—न्यायाचें स्वरूप आणि पूर्णपणें न्यायी मनुष्याचा स्वभाव, तसेंच, अन्यायाचें स्वरूप आणि पूर्णपणें अन्यायी मनुष्याचा स्वभाव, ह्याविषयीं चर्चा करतांना आपला असा हेतु होता कीं, ह्या दोन स्वभावांना आपण आदर्श असें समजावयाचें आणि सुख व दुःख ह्या दोन बाबतींत, ह्या दोन आदर्शांचा संबंध कसा असतो हें पाहून, ज्याचा स्वभाव, न्यायाच्या किंवा अन्यायाच्या आदर्शाशीं जसा जुळत असेल, तसाच त्याचा आयुष्यक्रम बनेल असें ठरवावयाचें. पण ह्या गोष्टींची, व्यवहारांतील शक्यता दाखविण्याचा आपला केव्हांहीं विचार नव्हता.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—एखाद्या चित्रकारानें, मानवी सौंदर्याचा अत्यंत सुंदर व निर्दोष, असा एक आदर्श रंगविला आहे असें समजा. पण सत्य-सृष्टींत, चित्राइतका सुंदर मनुष्य त्याला जर दाखवितां आला नाहीं, तर त्या चित्रकाराचें कौशल्य कमी ठरतें काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—ह्याचप्रमाणें, आपणही निर्दोष राज्यसंस्थेचा आदर्श आपल्या कल्पनेनें उभारीत नव्हतों काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या वर्णनाप्रमाणें, एखादें शहर रचणें शक्य आहे, असें जर आपल्याला सिद्ध करतां आलें नाहीं, तर आपल्या कल्पनेला कांहीं बाध येईल, असें तुम्हांला वाटतें काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—ही तर मग खरी परिस्थिति आहे. तथापि तुमच्या समाधानाकरितां, कोणत्या विशिष्ट तऱ्हेनें व कोणत्या परिस्थितींत, आपलें ध्येय पूर्णत्वास नेतां येईल, हें दाखविण्याचे श्रम जर मला

घ्यावयाचे असतील, तर तुम्ही पूर्वी कबूल केलेल्या गोष्टी तुम्हांला मान्य आहेत काय, असें तुम्हाला पुन: विचारलें पाहिजे.

ग्लॅ०:—कोणत्या गोष्टी ?

सॉक्रे०:—केवळ कल्पनेनें आंखलेली रूपरेषा, व्यवहारामध्यें पूर्णत्वानें कधींही शक्यता पावेल काय ? कल्पनेइतकें सत्यत्वाशीं
Steph 473 कृतीचें सान्निध्य कधीं होणार नाहीं, असा निसर्गाचा नियम नाहीं काय ? अथवा तुमचें मत भिन्न आहे काय ?

ग्लॅ०:—नाहीं. असेंच आहे.

सॉक्रे०:—तर मग, आपली कल्पना वस्तुस्थितींत पूर्णपणें बरोबर उतरली आहे किंवा नाहीं, हें दाखविण्याची कामगिरी माझ्यावर लादूं नका. पण आपल्या वर्णनाशीं बरीचशी जुळणारी, अशी राज्याची रचना करतां येणें शक्य आहे, असें जर आपल्याला दाखवितां आलें, तर तुम्हाला कबूल करावें लागेल कीं, तुम्ही जी कल्पना मला विचार करावयास सांगतां, ती अंमलांत आणण्याची शक्यता, आपण शोधून काढली. एवढें सिद्ध झालें तर तुम्हाला समाधान वाटेल ना ? मला स्वत:ला वाटेल.

ग्लॅ०:—मलाही वाटेल.

सॉक्रे०:—प्रचलित राज्यव्यवस्थेमध्यें, अशी कोणती चूक आहे कीं, जीमुळें राज्यकारभार आपण वर्णिल्याप्रमाणें चालविला जात नाहीं, ती शोधून काढण्याचें काम आपण केलें पाहिजे. तसेंच, अत्यंत लहान फरक, शक्य तर एकच फरक घडवून आणून, आपल्या काल्पनिक राज्याप्रमाणें हल्लींचीं राज्यें कशीं सुधारतां येतील, हें दाखवून दिलें पाहिजे. असे फरक एक अथवा दोन, पण कांहीं झालें तरी संख्येनें व परिणामाच्या दृष्टीनें कमीच असले पाहिजेत.

ग्लॅ०:—असा प्रयत्न करण्याचें आपण मनावर घेऊं या.

सॉक्रे०:--ठीक आहे. एक असा फरक आहे कीं, ज्यामुळें इष्ट ती क्रान्ति आपणाला घडवितां येईल. पण खात्रीनेंच तो फरक लहानही नाहीं व सोपाही नाहीं. शक्य मात्र आहे.

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—जिला मी मोठी लाट असें म्हटलें, तिलाच तोंड देण्याचा आतां माझ्यावर प्रसंग आला आहे. खरोखरच हास्य व अपकीर्ति, ह्यांच्या लाटेनें मी वाहून जाण्याची जरी भिति असली, तरी सुद्धां ती कल्पना बोलून दाखविलीच पाहिजे. मी काय म्हणत आहे इकडे लक्ष द्या.

ग्लॅ०:—बोला.

सॉक्रे०:—राज्यामध्यें, राज्याचा अधिकार तत्वज्ञानी लोकांना मिळाल्याशिवाय, अथवा ज्यांना सध्यां राजे व सत्ताधिकारी म्हणण्यांत येतें, त्यांच्यामध्यें खऱ्या तत्वज्ञानाचें पुष्कळसें तेज उतरल्याशिवाय, म्हणजे एकाच मनुष्यामध्यें राजकीय सत्ता व तत्वज्ञान ह्यांचा मिलाफ झाल्याशिवाय, प्रिय ग्लॅकान्, शहरांची व मानवजातीची सुटका नाहीं. हल्लीं तत्वज्ञानाचें परिशीलन करणाऱ्यांस, राजकीय सत्तेपासून अलिप्त ठेवण्यांत येतें व राज्यकारभार करणारे लोक, तत्वज्ञानाचा अभ्यास मुळींच करीत नाहींत. ही परिस्थिति उपयोगाची नाहीं. तसेंच, आपण कल्पनेनें उभारलेलें आदर्श राज्य सुद्धां, असा फरक घडून आल्याशिवाय कधींही शक्यतेच्या कक्षेंत येऊन, जन्मास यावयाचें नाहीं. सामान्य समजुतीला ह्या विधानानें मोठा धक्का बसेल, ह्या जाणीवेनें मी आतांपर्यंत हें बोलून दाखविण्यास कचरत होतों. कारण राज्याला अथवा व्यक्तीला, दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें सौख्य मिळवितां येणार नाहीं, अशी लोकांची खात्री पटवून देणें कठीण आहे.

ह्यावर ग्लॅकान् उद्गारला, “ सॉक्रेटिस, जी भाषा व ज्या भावना आतां तुम्ही बोलून दाखविल्यात, त्या अशा स्वरूपाच्या आहेत

Steph 474 कीं, त्यामुळें एका क्षणाचाही विलंब न करतां, आपलीं उत्तरीयें टाकून देऊन, हातास जें शस्त्र मिळेल तें घेऊन, तुमच्यावर हल्ला करण्याकरितां, सामान्य नव्हे तर पुष्कळ प्रतिष्ठित लोकही धांवून येतील. तुम्ही वादविवादाच्या शस्त्रांनीं, जर त्यांना परतवूं शकणार नाहीं तर तुमची चांगलीच थट्टा होण्याची शिक्षा तुम्हाला भोगावी लागेल.

सॉक्रे०:—ठीक. पण हा प्रसंग तुम्हीच माझ्यावर आणला ना ?

ग्लॅ०:—होय. आणि मी योग्य तेंच केलें. पण तुम्हाला मी सोडून जाणार नाहीं, असें वचन देतों. उलट, माझ्याजवळ असलेल्या, सदिच्छा व उत्तेजन, ह्या शस्त्रांनीं मी तुम्हाला मदत करून तुमच्या प्रश्नांना उत्तरें देण्यांत, इतरांपेक्षां अधिक दक्ष राहीन. म्हणून ह्या मदतीवर विसंबून, अविश्वासू लोकांना तुमच्या विधानाची सत्यता पटवून देण्याचा प्रयत्न करा.

सॉक्रे०:—ज्याअर्थीं तुम्ही मला अशी महत्वाची मदत करण्याचें कबूल करतां, त्याअर्थीं असा प्रयत्न मी केलाच पाहिजे. जे लोक हल्ला करणारे म्हणून तुम्ही म्हणतां, त्यांच्यापासून आपली सुटका होण्याचा संभव असल्यास, मला वाटतें, त्यांना 'तत्वज्ञानी' ह्या शब्दाची व्याख्या सांगितली पाहिजे. आणि ज्या लोकांनीं राज्य केलें पाहिजे, असें आपण म्हणतों, ते कोण हेंही दाखविलें पाहिजे. तत्वज्ञानी लोकांचा स्वभाव पूर्णपणें स्पष्ट केल्यावर, आपणाला असें दाखवितां येईल कीं, अशा लोकांचें स्वाभाविक क्षेत्र तत्वज्ञानाचें परिशीलन करून राज्यकारभारांत पुढाकार घेणें, हेंच असून इतरांचें क्षेत्र तत्वज्ञान सोडून देऊन तत्वज्ञानी लोकांच्या पुढारीपणाखालीं काम करणें होय.

ग्लॅ०:—तत्वज्ञानी लोकांची व्याख्या सांगण्यास हा योग्य समय होय.

सॉक्रे०:—ठीक आहे. माझ्या मागून चला ! आपली कल्पना कोणाल्या तरी प्रकारानें स्पष्ट करून सांगतां आली तर आपण पाहूं.

ग्लॅ०:—ठीक आहे.

सॉक्रे०:—जेव्हां मनुष्य एखाद्या वस्तूवर प्रेम करतो असें आपण म्हणतों, तेव्हां त्याचें प्रेम त्या वस्तूंच्या एका विशिष्ट भागापुरतें नसून सर्व भागासंबंधीं असतें, असें आपण म्हटल्याचें तुम्हास आठवतें काय?

ग्लॅ०: —मला आठवण करून दिली पाहिजे. कारण तुम्हीं काय म्हणतां, तें मला नीट समजलें नाहीं.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, अशा तऱ्हेची भाषा दुसऱ्या मनुष्याला शोभली असती! तुमच्यासारख्या प्रणयी स्वभावाच्या मनुष्यानें हें विसरतां कामा नये कीं, मुलांवर प्रेम करणारा मनुष्य तारुण्याच्या बहरींत असलेल्या सर्व मुलांच्या शारिरीक सौंदर्यानें आकर्षिला जातो. आणि त्याला असें वाटतें कीं, ह्या सर्व तरुण मुलांनीं त्याचें लक्ष व प्रेम ओढून घ्यावें. अशाच तऱ्हेनें, तुम्हीं आपल्या प्रियपात्रांजवळ वागत नाहीं काय? एखाद्या मुलाचें नाक उंच असलें, तर तुम्हीं गौरवानें म्हणाल कीं, त्याचा चेहरा चित्तवेधक आहे. एखाद्याचें नाक वांकलेंलें असलें तर तो राजासारखा दिसतो असें तुम्हीं म्हणाल. एखाद्याचें नाक ह्या दोन टोंकाला सोडून मध्यम प्रकारचें असलें, तर त्याचा चेहरा सुंदर व प्रमाणशीर आहे असें म्हणाल. श्यामवर्णाच्या मुलांना मर्दानी तर सुंदर चेहऱ्याच्या मुलांना देवकुमार म्हणून, तुम्ही त्यांची स्तुति कराल! कोणा एका तरुण मुलाच्या गालावरील फिक्कटपणा, त्याच्या प्रियकराला सहन करतां आल्यामुळें, 'आलिव्हप्रमाणें फिक्कट,' असें विशेषण प्रचारांत आलें असावें, असें तुम्हाला वाटतें ना? एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे, सर्व प्रकारच्या सबबी सांगून, यौवनावस्थेमुळें बहर आलेल्या प्रत्येक सुंदर व्यक्तीचा तुम्ही गौरवच करीत असतां!

Steph 475

ग्लॅ०:—माझ्या स्वतःच्या उदाहरणावरून जर तुम्हाला असें

म्हणावयाचें असेल कीं, प्रणयी लोक अशा तऱ्हेनें वागतात, तर विवेचन चालूं रहावें म्हणून मी हें सर्व कबूल करतों.

सॉक्रे०:—जे लोक मद्याचे भोक्ते असतात, ते अशाच तऱ्हेनें वागत नाहींत काय? कांहींना कांहींतरी सबब सांगून ते प्रत्येक प्रकारच्या मद्याची वाखाणणी करीत नाहींत काय?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तुम्ही हेंही निःसंशय निरीक्षिलें असेल कीं, ज्या लोकांना मानाची हांव असते, त्यांना जरी सैन्याचें पुढारी होतां आलें नाहीं, तरी स्वतःभोवतीं लोकांचा जमाव ते करूं शकतात. आणि जरी मोठ्या व महत्वाच्या लोकांकडून त्यांना मान मिळवितां आला नाहीं, तरी निदान सामान्य व क्षुल्लक लोकांकडून मान मिळवितां आला म्हणजे त्यांना आनंद होतो. कारण कोणत्या तरी प्रकारें, मान मिळविण्याची त्यांना हांव असते.

सॉक्रे०:—जेव्हां आपण एखाद्याला एखाद्या गोष्टीची इच्छा असते असें म्हणतों, तेव्हां त्या गोष्टीच्या सर्व भागांची तो इच्छा बाळगतो कीं, त्यापैकीं एकाच भागाची इच्छा धरून दुसऱ्या भागांकडे दुर्लक्ष करतो?

ग्लॅ०:—सर्व भागांची तो इच्छा बाळगतो.

सॉक्रे०:—तत्वज्ञानी अथवा ज्ञानाचा भोक्ता, ज्ञानाच्या कांहीं भागाचा भोक्ता नसून, सर्व ज्ञानाचा भोक्ता असतो असें म्हणतां येईल ना?

ग्लॅ०:—होय. तो सर्व ज्ञानाचा भोक्ता असतो.

सॉक्रे०:—म्हणून, चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें कळण्याची पात्रता आली नसतांना, जर एखादा तरुण मनुष्य अभ्यासाची टाळाटाळी करूं लागला, तर आपण असें ठरवूं कीं, तो ज्ञानाचा अथवा शहाणपणाचा खरा प्रेमी नाहीं. खाद्य पदार्थांविषयीं चोखंदळ

असणाऱ्या मनुष्याला, आपण भुकेलेला व चांगला आहार असलेला म्हणत नाहीं.

ग्लॅ०: - खरें आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, ज्ञानाचा कोणताही विषय खुषीनें चाखण्यास तयार असणारा व कधींही तृप्त न होणाऱ्या ज्ञानक्षुधेनें आपल्या अभ्यासांत लक्ष घालणारा मनुष्य, खरा तत्वज्ञानी होय, असें आपण म्हणूं ना ?

ह्यावर ग्लॅकाननें उत्तर दिलें, "तुमच्या वर्णनांत पुष्कळ विचित्र लोकांचा समावेश होतो, असें तुम्हाला आढळून येईल. देखावे पहाण्याची आवड असणारेही, तत्वज्ञानी म्हणतां येईल. कारण ज्ञान संपादन करण्यांत ते आनंद मानतात. तसेंच, जे श्रवण करण्यांत आनंद मानतात, तेही तत्वज्ञानी गणतां येतील—हे लोक, शक्य तोंवर, तात्त्विक वादविवादासारख्या कार्यक्रमास गैरहजर राहून, शहरांत अथवा खेड्यांत भरणाऱ्या डायोनिशिअन उत्सवाच्या ठिकाणीं, जणूं कांहीं आपले कान, त्यांनीं गायनाच्या सर्व कार्यक्रमास भाड्यानें दिले आहेत, अशा बुद्धीनें कधींहीं न चुकतां हजर राहतील ! अशा लोकांना, अथवा असेंच दुसरे विषय अभ्यासणाऱ्या लोकांना व लहानसहान कलावंतानाही, आपण तत्वज्ञानी अशी संज्ञा द्यावयाची काय ?

सॉक्रे०:—अर्थात् नाहीं. हे खोटे तत्वज्ञानी होत.

ग्लॅ०:—तर मग, खरे तत्वज्ञानी तुम्ही कोणाला म्हणतां ?

सॉक्रे०:—ज्यांना सत्य-दर्शनाची आवड आहे त्यांना.

ग्लॅ०:—ही तुमची व्याख्या चुकीची नाहीं. परंतु तुमच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—दुसरा कोणी प्रश्न विचारणारा असता, तर कठीण काम झालें असतें. पण मला वाटतें, तुम्ही पुढील कबुली द्याल.

ग्लॅ०:—ती कोणती ?

Steph सॉक्रे०:—ज्याअर्थी सौंदर्य, कुरूपतेच्या विरुद्ध असतें,
476 त्याअर्थी सौंदर्य व कुरूपता ह्या दोन वस्तु होत.

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—ज्याअर्थी त्या दोन आहेत, त्याअर्थी त्या स्वतंत्र वस्तु होत.

ग्लॅ०:—हेंही खरें आहे.

सॉक्रे०:—न्याय व अन्याय, सत् व असत् आणि सर्वसाधारण कल्पना, ह्यांच्याविषयीं असेंच म्हणतां येईल कीं, ह्या सर्व कल्पना, स्वतंत्र वस्तूच होत. परंतु क्रिया, पदार्थ व वरील स्वतंत्र कल्पना, ह्यांचें मिश्रण झालें असतां, सर्व ठिकाणीं त्या स्वतंत्र असूनही अनेक अशा दृश्यमान् होतात.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—दृष्टिसुखाचे भोक्ते, कलावंत आणि व्यवहारी म्हणून ज्यांचें तुम्ही वर्णन केलेंत असे लोक, ज्या लोकांना खरोखर तत्वज्ञानी म्हणून म्हणतां येईल अशा लोकांपासून भिन्न असतात, असें मी वरील तत्वाच्या आधारावर म्हणतों.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अधिक स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—जे लोक दृष्टि-सुखाचे व श्रवण-सुखाचे भोक्ते आहेत, त्यांना सुस्वर नाद, रंग व आकृति हीं आवडतात आणि ज्या कलांमध्यें ह्यांचा समावेश होतो, त्या कलाही आवडतात. परंतु त्यांची बुद्धि केवल सौंदर्यतत्व जाणूं शकत नाहीं.

ग्लॅ०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—पण सौंदर्याचें केवल स्वरूप, आपल्या बुद्धीनें चिंतन करूं शकणारे लोक थोडेच असतात ना ?

ग्लॅ०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—तर मग, जो मनुष्य सुंदर वस्तूंचें अस्तित्व कबूल करून, केवल सौंदर्य मानीत नाहीं व केवल सौंदर्याचें ज्ञान करून देण्यास

जरी कोणी तयार असला, तरी ज्याची बुद्धि तें आकलन करूं शकत नाहीं, असा मनुष्य स्वप्नसृष्टींत असतो कीं जागृतावस्थेंत असतो, ह्याचा विचार करा. जेव्हां मनुष्य खऱ्या वस्तूच्या प्रतिमेला खरी वस्तु म्हणून समजतो, तेव्हां तो स्वप्नांतच वावरत नाहीं काय?

ग्लॅ०:—अशा स्थितींत तो मनुष्य स्वप्नसृष्टींतच वावरत असतो, हें मी कबूल करतों.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, ज्या मनुष्याला केवल सौंदर्य मान्य असतें व सौंदर्य तत्व ओळखतां येऊन ज्या वस्तूंमध्यें तें प्रवेश करतें, त्या वस्तूही ज्याला ओळखतां येतात; तसेंच ह्या वस्तु म्हणजे तत्व नव्हे व तत्व म्हणजे वस्तु नव्हे असें ज्याला बरोबर समजतें, असा मनुष्य स्वप्नस्थितींत आयुष्य घालवितो कीं जागृतावस्थेंत घालवितो?

ग्लॅ०:— निःसंशय जागृतावस्थेंत.

सॉक्रे०:—असें जर आहे, तर जागतेपणानें आयुष्य काढणाऱ्याच्या मानसिक अवस्थेला ज्ञान म्हणणें बरोबर होणार नाहीं काय? कारण त्याला खरें ज्ञान झालेलें असतें. तसेंच, दुसऱ्या प्रकारच्या मनुष्याच्या मानसिक अवस्थेला, तो निव्वळ समज ( मत ) प्रदर्शित करतो म्हणून समज ( मत ) दाखवणारी अवस्था म्हणणें बरोबर होईल ना?

ग्लॅ०:—होय. अगदीं बरोबर.

सॉक्रे०: – ज्ञान नसलेला पण निव्वळ समज ( मत ) असलेला मनुष्य आपणावर जर चिडून गेला आणि म्हणूं लागला कीं, आपण म्हणतों तें खरें नाहीं, तर त्याचें मन ठिकाणावर नाहीं असें त्याला कळूं न देतां, त्याचा राग शांत करून, संथपणानें आपणाला त्याची खात्री करतां येईल ना?

ग्लॅ०:—असें करणें, निःसंशय इष्टच होय.

सॉक्रे०:—आतां त्याला काय सांगावयाचें ह्याचा विचार करूं. आपण त्याला असें आश्वासन देऊं, "तुम्हाला जर खरोखर ज्ञान

झालें असेल, तर आम्हाला आनंदच वाटेल." पण असें आश्वासन दिल्यावर पुढील प्रश्न त्याला विचारूं. "ज्याला ज्ञान असतें, तो कांहीं तरी जाणतो ना किंवा कांहींच जाणत नाहीं?" ग्लॅकान, ह्या बाबतींत त्याच्यातर्फे तुम्ही उत्तर देण्याची कृपा करा.

ग्लॅ०: — त्याला कांहींतरी ज्ञान असतें.

सॉक्रे०:—जें अस्तित्वांत असतें त्याविषयीं कीं नसतें त्याविषयीं?

Steph 477 ग्लॅ०:—जें अस्तित्वांत असतें त्याविषयीं. कारण जें अस्तित्वांतच नसतें, त्याचें ज्ञान तरी कसें होणार?

सॉक्रे०:—जें पूर्णपणें अस्तित्वांत असतें, त्याचें पूर्णपणें ज्ञान होऊं शकतें आणि जें मुळीं अस्तित्वांतच नसतें, तें पूर्णपणें अज्ञातच राहणार, असें आपणास कशाही रीतीनें संशोधन केलें, तरी खात्रीनें म्हणतां येईल ना?

ग्लॅ०:—ह्याविषयीं आपली पूर्ण खात्री आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. जर एखादें असें असेल कीं जें एकाच वेळेस असेल व नसेल, तर तें पूर्ण अस्तित्वांत असणें व मुळींच अस्तित्वांत नसणें, ह्यांच्यामध्यें कोठें तरी असलें पाहिजे ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ज्याअर्थीं ज्ञानाचा संबंध, असणाऱ्या वस्तूंशीं असतो व ज्ञानाचा अभाव, नसणाऱ्या वस्तूंशीं असतो, त्याअर्थीं शास्त्र व अज्ञान ह्यांच्या मध्यावर असलेली वस्तु कीं जी असणारी व नसणारी ह्यांच्या मधली स्थिती दर्शवील, ती पहाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे ना?

ग्लॅ०:—अर्थातूच.

सॉक्रे०:—'समज' (मत) ह्याचें अस्तित्व आपण कबूल करतों ना?

ग्लॅ०:—नि:संशयच.

सॉक्रे०:—शास्त्रापासून समज (मत) भिन्न आहे अथवा शास्त्र व समज (मत) हीं एकच आहेत?

ग्लॅ०--भिन्न आहेत.

सॉक्रे०:--तर मग, समज ( मत ) व शास्त्र, ह्यांचें क्षेत्र निरनिराळें असून, दोन्हीं आपआपल्या शक्तीप्रमाणें कामें करीत असतात.

ग्लॅ०:—असेंच.

सॉक्रे०:—ज्याअर्थी आहेपणाशीं शास्त्राचा संबंध असतो, त्याअर्थी असलेली वस्तु कशी राहूं शकते, हें जाणणें शास्त्राचें क्षेत्र नव्हे काय ? परंतु माझ्या मतें, अगोदर एक फरक सिद्ध करणें जरूर आहे.

ग्लॅ०:--तो कोणता ?

सॉक्रे०:—आपल्याला व इतरांना, जें जें कांहीं करतां येतें, तें तें आपल्या सर्वसाधारण इन्द्रियांच्या द्वारें करतां येतें. उदाहरणार्थ, दृष्टि आणि श्रवण हीं इन्द्रियें घ्या.

ग्लॅ:०—मला समजलें.

सॉक्रे०:—ह्या इन्द्रियांच्या शक्तीबद्दल, माझें काय मत आहे तें मी सांगतों. ज्या रंगरूपादि गुणांमुळें, मला एकापासून दुसरी वस्तु भिन्न आहे असें म्हणतां येतें, ते गुण मला वस्तूंमध्यें दिसतात पण वरील शक्तीमध्यें दिसत नाहींत. शक्तीमध्यें तिचें क्षेत्र व कार्य फक्त मला दिसतात. ज्या शक्तींचें क्षेत्र व कार्य एक आहे त्या शक्तींना मी एकच समजतों व ज्यांची कार्यें भिन्न आहेत त्यांना निरनिराळ्या समजतों. तुमचें मत काय आहे ?

ग्लॅ०:—ह्याचप्रमाणें.

सॉक्रे०:--ठीक आहे. प्रिय मित्रा, शास्त्राला कोणती सामान्य संज्ञा तुम्ही द्याल ? शास्त्राला तुम्ही शक्ति म्हणाल काय ?

ग्लॅ०:—होय. शिवाय सर्व शक्तींमध्यें ती अत्यंत सामर्थ्यवान् आहे.

सॉक्रे०:--समज ( मत ) ही शक्ति म्हणतां येईल काय ? अथवा आपण त्याला कांहीं इतर संज्ञा द्यावी ?

ग्लॅ०:—दुसरी संज्ञा देण्याची कांहीं जरूर नाहीं. ज्यामुळें आपणाला समज ( मत ) बनवितां येतो, त्याला समज ( मत ) ह्यापलीकडे दुसरें कांहीं म्हणण्याची जरूर नाहीं.

सॉक्रे०:—पण थोड्या वेळांपूर्वी तुम्ही कबूल केलें कीं, शास्त्र व समज ( मत ) हीं एकच नव्हेत.

ग्लॅ०:—कोणता सूज्ञ मनुष्य प्रमादातीतता व प्रमादक्षमता एकच समजेल ?

Steph 478 ठीक आहे. तर मग, शास्त्रापासून समज ( मत ) भिन्न आहे, असें आपण एकमतानें निश्चित केलें.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, तत्वतःच त्यांचें क्षेत्र व उपयुक्तता निरनिराळीं आहेत.

ग्लॅ०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—अस्तित्वांतील वस्तूंचें स्वरूप जाणणें, हा शास्त्राचा विषय आहे.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—समज ( मत ) ह्याचा विषय समज ( मत ) बनविणें हा होय.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—शास्त्र ज्या वस्तूंबद्दल ज्ञान करून देतें, त्या वस्तूंचाच समज ( मत ) विचार करतें काय ? दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, समज ( मत ) व शास्त्र ह्यांचा विषय एकच आहे काय ? अथवा हें अशक्य आहे ?

ग्लॅ०:—हें अशक्य आहे. निरनिराळ्या शक्तींचें क्षेत्र निरनिराळें असतें आणि शास्त्र व समज ( मत ) ह्या दोन शक्ती असून त्या भिन्न

असतात. असा पूर्वपक्ष केल्यानंतर, शास्त्र व समज (मत) ह्यांच्या अभ्यासाचा विषय एकच असणें अशक्य आहे.

सॉक्रे०:—सत् हा जर ज्ञानाचा विषय समजला, तर सत् खेरीज दुसरा कांहींतरी, समज (मत) ह्याचा विषय असला पाहिजे.

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—नाहींपणा, हा 'समज' (मत) ह्याचा विषय असूं शकेल काय? अथवा जें अस्तित्वांतच नाहीं, त्याच्याविषयीं समज (मत) असणें सुद्धां अशक्य आहे काय? विचार करा. जेव्हां मनुष्याला 'समज' करतां येतो, तेव्हां तो कशाबद्दल तरी असतो ना? अथवा जें मुळीं नाहींच, त्याबद्दल त्याला 'समज' होऊं शकतो, असें म्हणतां येईल काय?

ग्लॅ०:—अशक्यच.

सॉक्रे०:—तर मग, मनुष्य जेव्हां आपला समज (मत) म्हणून सांगतो, तेव्हां तो कशाबद्दल तरी असतो ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—पण जें अस्तित्वांत नाहीं, तें कांहींतरी आहे, असें म्हणतां येत नाहीं. उलट, खरें बोलावयाचें म्हणजे, तें कांहींच नाहीं असें म्हणावें लागेल.

ग्लॅ० - असेंच.

सॉक्रे०:—परंतु नसणाऱ्या वस्तूंबद्दल अज्ञान असून, असणाऱ्या वस्तूंबद्दल ज्ञान असतें, असें आपण म्हटलें आहे.

ग्लॅ०:—आणि तें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, अस्तित्वांत असलेल्या वस्तु व नसणाऱ्या वस्तु, 'समज' ह्याचा विषय असूं शकत नाहीं.

ग्लॅ०:—नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून 'समज' (मत) म्हणजे अज्ञान नव्हे व ज्ञानही नव्हे.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—तर मग, ज्ञान व अज्ञान ह्यांच्या पलीकडे समज (मत) असून, तो ज्ञानाला स्पष्टपणांत व अज्ञानाला गूढपणांत मागें टाकतो काय?

ग्लॅ०:—नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, ज्ञानापेक्षां थोडा फार गूढ व अज्ञानापेक्षां थोडा फार प्रकाशमान्, असा समज (मत) असतो काय?

ग्लॅ०:—होय. ज्ञान व अज्ञान ह्यांच्यापासून तो इतका स्पष्टपणानें भिन्न असतो.

सॉक्रे:०—तर मग, ज्ञान व अज्ञान ह्या दोन टोकांमध्यें तो असतो काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, समज (मत) ह्या दोन टोकांमध्यें कोठें तरीअसतो.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—थोड्या वेळांपूर्वी आपण असें म्हटलें कीं, जी वस्तु एकाच वेळेस असते व नसते, ती केवल सत् व केवल असत् ह्यांच्यामध्यें असते. आणि अशी वस्तु, शास्त्र व अज्ञान ह्यांचा विषय होण्याऐवजीं, ह्यांच्यामधील तिसऱ्याच एका शक्तीचा विषय होते.

ग्लॅ०:—होय. असें आपण म्हटलें.

सॉक्रे०:—ही तिसरी शक्ति, समज (मत) म्हणून आपण शोधून काढली.

ग्लॅ०:—होय. आपण शोधून काढली.

सॉक्रे०:—तर मग, आतां सत् व असत् ह्यांच्यांशीं संबंध असूनही, ह्यांच्यापैकीं एक असें ज्याला म्हणतां यावयाचें नाहीं, तें काय आहे हें आपण शोधून काढलें पाहिजे. कारण अशाचा जर आपणास शोध लागला, तर समज (मत) ह्याचा तो विषय म्हणून आपणास

ठरवितां येईल. ह्याचप्रमाणें, आपणास विरुद्ध टोकांच्या शक्तीचा विषय ठरवितां येऊन, मध्यम शक्तीचा सुद्धां विषय ठरवितां येईल. माझें म्हणणें बरोबर आहे काय ?

ग्लॅ०—बरोबर आहे.

सॉक्रे०:—हे मुद्दे निश्चित केल्यानंतर, जो मनुष्य सुंदर वस्तूंचें वैचित्र्य कबूल करून, अविकारी, सनातन व निरुपाधिक,
Steph सौंदर्याचें अस्तित्व मानीत नाहीं; तसेंच दृष्टिसुखाचा
479 भोक्ता असून, सौंदर्य एक आहे, न्याय एक आहे वगैरे सांगितलें असतां ऐकून घेत नाहीं, अशा मनुष्याला मी पुढील प्रश्न विचारीन; "महाराज, ह्या सर्व सुंदर वस्तूंमध्यें, अशी एखादी वस्तु आहे काय कीं, जी कुरूप दिसणार नाहीं ? ह्या सर्व न्यायाच्या कृत्यांपैकीं, असें एखादें कृत्य आहे काय कीं, जें अन्यायाचें आहे असें वाटणार नाहीं ? अथवा ह्या पवित्र वस्तूंपैकीं अशी एखादी वस्तु आहे काय कीं, जी अपवित्र वाटणार नाहीं ?

ग्लॅकान् उद्गारला, "एका अर्थी, सुंदर व कुरूप, न्यायी व अन्यायी, पवित्र व अपवित्र, अशीं तीं दोन्ही प्रकारचीं वाटलींच पाहिजेत.

सॉक्रे०:—पुष्कळ दुप्पट वस्तूंच्या दुप्पटपणाचा जसा विचार करतां येतो, तसा त्यांच्या निम्पटीचाही विचार करतां येतो ना ?

ग्लॅ०—होय. असा करतां येतो.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें ज्या वस्तु आपण मोठ्या व लहान, हलक्या व जड, म्हणून वर्णन करतों, त्यांना त्यांच्याविरुद्ध असलेल्या वस्तूंपेक्षां, अशा संज्ञाना, अधिक अधिकार पोंचतो काय ?

ग्लॅ०:—नाहीं. विरुद्ध वस्तूनाही सारखाच अधिकार आहे.

सॉक्रे०:—ह्या पुष्कळ वस्तूंबद्दल असें म्हणणें अधिक बरोबर होईल ना कीं, त्यापैकीं प्रत्येक वस्तु तिजविषयीं जें म्हणण्यांत येतें त्याप्रमाणें असते व नसते ?

ग्लॅ०:—मेजवानीच्या प्रसंगीं अथवा मुलांची गम्मत करण्याकरितां कांहीं लोक, 'एका षंढानें वागुळाला कांहीं फेंकून मारलें,' असें कोडें घालतात. तें कशानें मारलें व वागुळ कशावर बसलें होतें, ह्या विषयीं गर्भित सूचना देऊन, ज्याप्रमाणें वरील कोडें सोडवावयास सांगतात, त्याप्रमाणें तुमची भाषा आहे. आपण ज्या वस्तूंबद्दल विचार करीत आहोंत, त्यांचेंही स्वरूप असेंच अस्पष्ट असल्यामुळें कोणालाही निश्चयात्मक असें सांगतां येणार नाहीं कीं त्या आहेत किंवा नाहींत, अथवा आहेत व नाहींतही, अथवा ह्यापैकीं कांहींच नाहींत.

सॉक्रे०:—तर मग, त्यांचें काय करावें ? सत् व असत् ह्यांच्या मधील जागेपेक्षां, अधिक योग्य जागा त्यांना देतां येईल काय ? नसणाऱ्या वस्तूंपेक्षां त्या अधिक गूढ नसल्यामुळें, त्या नसणाऱ्या वस्तूंपेक्षां अधिक कमी प्रतीच्या नाहींत व असणाऱ्या वस्तूंपेक्षां त्या अधिक प्रकाशमान् नसल्यामुळें, असणाऱ्यांपेक्षां त्या जास्त प्रतीच्या नाहींत.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून आपण आतां असा शोध लावला कीं, जनसमूहांत प्रचलित असलेल्या, सौंदर्य, न्याय इत्यादिकांच्या कल्पना, ह्या केवल सत् व केवल असत्, ह्यांच्या मध्यावर भटकत असतात.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—म्हणून आपण पूर्वीं म्हटल्याप्रमाणें, अशा प्रकारचें कांहीं उजेडांत आल्यावर, तें ज्ञानाचा विषय नसून 'समज' (मत) ह्याचा विषय आहे, असें समजण्यांत यावें. कारण मध्येंच भटकणाऱ्या ह्या वस्तु मधल्या प्रकारच्या शक्तीनेंच पकडल्या जातात.

ग्लॅ०:—आपण असें पूर्वीं ठरविलेलें आहे.

सॉक्रे०:—लोकांना सुंदर वस्तूंच्या समुदायाकडे जरी बघतां येत असलें, तरी केवल सौंदर्य समजण्याची जेव्हां त्यांना दृष्टि नसते व कोणी सांगितलें तरी ग्रहण करतां येत नसतें; तसेंच न्यायाचीं कृत्यें

जरी बघतां आलीं तरी न्यायाची केवल कल्पना त्यांना समजत नसते, तेव्हां आपण असें म्हणूं कीं, त्यांना फक्त आपला समज (मत) त्या बाबतींत सांगतां येतो. पण ज्यांच्या विषयीं ते समज बनवितात, त्यांचें त्यांना खरें ज्ञान नसतें.

ग्लॅ०:—हा तर्क योग्यच आहे.

सॉक्रे०:—पण जे चिरंतन व अविकारी वस्तु-तत्वांबद्दल विचार करीत राहतात, त्यांना आपण केवळ 'समज' बनविणारे न म्हणतां, ज्ञाते असें म्हणणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—हा तर्कही वाजवी आहे.

सॉक्रे०:—असे लोक ज्ञानाचे विषय वाखाणून, त्यांच्यावर प्रेम करतात व इतर लोक समज (मत) बनवितां येणाऱ्या विषयांवर प्रेम करतात, असें आपण म्हणणार नाहीं काय ? कारण दुसऱ्या प्रकारचे लोक, सुंदर स्वर, रंग इत्यादिकांकडे बघतात व हीं त्यांना आवडतात. पण सौंदर्याचें केवल स्वरूपाचें अस्तित्व त्यांना ऐकवत नाहीं, असें आपण म्हटल्याचें तुम्ही विसरलां काय ?

ग्लॅ०: – नाहीं. विसरलों नाहीं.

सॉक्रे०:—अशा लोकांना 'तत्वज्ञानी' म्हणण्याऐवजीं 'अर्धवट ज्ञानी' अथवा ज्ञानाची आवड असण्याऐवजीं, समज (मत) बनविण्याची आवड असणारे, असें म्हटलें तर, आपली चूक होईल काय ? आणि असें आपण त्यांचें वर्णन केलें असतां, त्यांना राग येईल काय ?

ग्लॅ०:—जर ते माझ्या सांगण्याप्रमाणें वागतील तर रागावणार नाहींत. कारण सत्याचा राग मानणें चूक आहे.

सॉक्रे०:—जे लोक खरोखर अस्तित्वांत असलेल्या वस्तूबद्दल आपलें प्रेम दाखवितात, त्यांना अर्धवट ज्ञानी म्हणण्याऐवजीं, आपण 'तत्वज्ञानी' म्हणणार नाहीं काय ?

ग्लॅ०: – खात्रीनेंच.

---

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक सहावें

Steph
484 सॉक्रे०:—ग्लॅकॉन्, अशा रीतीनें लांबलचक चर्चा करून, थोड्या फार प्रयासानें आपण खरे तत्वज्ञानी कोण व कोण नाहींत, हें शोधून काढलें.

ग्लॅ०:—होय. ही चर्चा थोडक्यांत आटपणें शक्य नव्हतें.

सॉक्रे०:—उघडच आहे. तथापि, सद्गुणी आयुष्य दुर्गुणी आयुष्यापेक्षां कसें श्रेष्ठ असतें, हें निश्चित करण्याकरितां, अजून विचारांत घ्यावयाचे शिल्लक राहिलेले प्रश्न जर आपण बाजूला ठेवले असते व केवळ वरील प्रश्नच ( म्हणजे खरे तत्वज्ञानी कोण ? ) चर्चेस घेतला असता, तर मला वाटतें, आपला वरील निष्कर्ष अधिक स्पष्टपणें काढतां आला असता.

ग्लॅ०:—मग आतां आपण कोणता प्रश्न विचारांत घ्यावा ?

सॉक्रे०:—अनुक्रमानें पुढचा प्रश्नच विचारांत घ्यावयाचा आहे. ज्याअर्थीं चिरंतन व अविकारी अशा गोष्टी ग्रहण करणारे तत्वज्ञानी होत आणि विकृति व विविधता ह्यांच्या राज्यांत वावरत असणारे लोक तत्वज्ञानी नव्हेत, त्याअर्थीं तुमच्या मतें, राज्याचे अधिकारी ह्या दोहोंपैकीं कोणते व्हावयास पाहिजेत ?

ग्लॅ०:—ह्या प्रश्नास योग्य उत्तर मी काय द्यावें ?

सॉक्रे०:—ह्या दोहोंपैकीं, राज्यांतील कायदे व चालीरीती ह्यांचें रक्षण करण्यास कोण समर्थ आहेत, हें ठरवून त्यांना संरक्षक नेमावें.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—एखाद्या गोष्टीचें संरक्षण करून ती सुरक्षित ठेवणें, ह्या कामाला अंध दृष्टीचा मनुष्य योग्य अथवा तीक्ष्ण दृष्टीचा मनुष्य योग्य, ह्याविषयीं कधीं प्रश्न उद्भवेल काय ?

ग्लॅ०:—ह्याविषयीं प्रश्नच उद्भवणार नाहीं.

सॉक्रे०:—जे लोक वस्तूंच्या खऱ्या स्वरूपाविषयीं अत्यंत अज्ञानी असून ज्यांच्यापुढें विशिष्ट ध्येय म्हणून कांहीं नसतें आणि चित्रकाराप्रमाणें केवल सत्याचें असें कांहीं सनातन प्रमाण नसल्यामुळें, ज्यांना सौंदर्य, सत् व न्याय ह्यांचे नियम प्रस्थापित करतां येत नाहींत अथवा प्रस्थापित केले असले तरी त्यांचें संरक्षण करतां येत नाहीं, अशा लोकांच्या स्थितींत व अंध लोकांच्या स्थितींत, अणुभरही फरक आहे असें तुम्हास वाटतें काय ?

ग्लॅ०:—खरोखरच कांहीं विशेष फरक नाहीं.

सॉक्रे०:—प्रत्येक वस्तूचें खरें ज्ञान ज्यांनीं मिळविलें आहे व जे व्यवहारचातुर्यांत अथवा गुणोत्कर्षाच्या कोणत्याही शाखेंत कनिष्ठ नाहींत, अशा लोकांना मागें सारून, आपण वरील प्रकारच्या अंध लोकांना संरक्षकांच्या जागेवर नेमूं काय ?

ग्लॅ०:—जर इतर गुणांमध्यें ते कमी नसतील, तर त्यांना मागें सारून दुसऱ्यांना नेमणें अत्यंत चमत्कारिक होईल. कारण ज्या गुणामध्यें ते इतरांपेक्षां श्रेष्ठ आहेत, तोच सर्वांत महत्वाचा गुण होय.

Steph 485 सॉक्रे०:—दोन्ही प्रकारचे गुण ह्याच लोकांत कसे असूं असतात, हें स्पष्ट करून सांगण्यास आपण सुरवात करावी काय ?

ग्लॅ०:—बेलाशक.

सॉक्रे०:—वादविवादाच्या सुरवातीस आपण म्हटल्याप्रमाणें, त्यांच्या खऱ्या स्वभावाची आपणांस पूर्ण परीक्षा करतां आली पाहिजे आणि मला वाटतें, जर आपलें ह्या मुद्यावर एकमत झालें, तर अशा लोकांमध्यें हे दोन्ही गुण एकत्रित असूं शकतात आणि अशाच स्वभावाचे लोक–इतर लोक नव्हेत–राज्याचे अधिकारी होण्यास लायक आहेत, असें आपण ठरवूं शकूं.

ग्लॅ०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—तत्वप्रवण स्वभावासंबंधीं आपणांस असें गृहीत धरून चालतां येईल कीं, तत्वज्ञानी लोक ज्या ज्ञानामुळें जनन व मरण ह्यांच्या चक्रांतून मुक्त असलेलें, खरें व चिरकाल टिकणारें असें अस्तित्वाचें स्वरूप दिसूं शकतें, अशा सर्व ज्ञानाचे भोक्ते असतात.

ग्लॅ०:—होय. असें आपण गृहीत धरूं.

सॉक्रे०:—असेंही आपण गृहीत धरूं कीं, तत्वज्ञानी लोकांना खऱ्या अस्तित्वाच्या सर्व भागांविषयीं प्रेम असतें व त्या भागांपैकीं कोणताही भाग लहान अथवा मोठा, सन्मान्य अथवा निंद्य असला, तरी तो टाकून देण्यास ते राजी नसतात. आपण पूर्वीं एका प्रसंगीं, महत्वाकांक्षी व प्रणयी पुरुषाविषयीं बोलतांना सुद्धां असेंच म्हटलें होतें.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—आपल्या वर्णनास जुळणाऱ्या तत्वज्ञानी लोकांच्या स्वभावांत आणखी एक तिसरें तत्व आहे किंवा नाहीं, हें पाहूं या.

ग्लॅ०:—कोणतें तत्व तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—सत्यवादीपणा–म्हणजे शक्यतोंवर कोणत्याही स्वरूपांत खोटेपणाला स्थान द्यावयाचें नाहीं; उलट खोटेपणाचा तिरस्कार करून सत्याबद्दल प्रेम ठेवावयाचें.

ग्लॅ:—होय. हा गुण सांपडणें शक्य आहे.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा! केवळ शक्यच आहे असें नव्हे, तर प्रणयी मनुष्याला आपल्या प्रियतम वस्तूंशीं निगडीत असलेल्या सर्व गोष्टींबद्दल प्रेम वाटणें, अत्यंत अपरिहार्यच आहे.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—सत्यापेक्षां, इतर कोणत्याही गुणाचा शहाणपणाशीं निकट संबंध असूं शकेल काय?

ग्लॅ०—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—एकाच स्वभावाच्या मनुष्याला, शहाणपणाबद्दल प्रेम वाटणें व असत्याबद्दलही प्रेम वाटणें शक्य आहे काय?

ग्लॅ०:—कधींही शक्य नाहीं.

सॉक्रे०: —म्हणून ज्ञानाचा खरा प्रेमी, तारुण्यापासूनच सत्याच्या शोधाकरितां झटणारा असतो.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—जेव्हां एखाद्या मनुष्याच्या इच्छा, एका विशिष्ट दिशेकडे निश्चित झालेल्या असतात, तेव्हां त्या दुसऱ्या दिशांकडे कमी जोरानें वळतात. झऱ्याच्या पाण्याची गति दुसऱ्या पात्राकडे वेगानें वळत नाहीं, असा आपला नेहमींचाच अनुभव आहे.

ग्लॅ०:—निःसंशयच!

सॉक्रे०:—म्हणून शास्त्र व त्याच्या सर्व शाखा, ह्यांच्या अभ्यासांत मनुष्याचें लक्ष लागलें, म्हणजे त्याच्या इच्छा केवळ मानसिक सुखां-कडेच केंद्रीभूत होतात व शारिरीक सुखें तो टाकून देतो. अर्थात् मनुष्याचें ज्ञानाविषयीं प्रेम, कृत्रिम नसून, खरें असलें पाहिजे.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—असा मनुष्य नेमस्त असून मुळींच लोभी नसतो. कारण ज्या वस्तूंच्या प्राप्त्यर्थ मनुष्यांना कशाही प्रकारें पैसा मिळवासा वाटतो, त्या वस्तूंना असा मनुष्य कधींच महत्व देत नाहीं.

ग्लॅ०:—खरें आहे.

Steph 486 सॉक्रे०:—तत्वज्ञानी स्वभावाची तत्वज्ञानी नसलेल्या स्वभावापासून भिन्नता दर्शवीत असतां, दुसरा एक मुद्दा तुम्ही लक्षांत घेतला पाहिजे.

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—क्षुद्रपणाकडे तुम्ही दुर्लक्ष करतां कामा नये. कारण मनाचा क्षुद्रपणा, आत्म्याला दैवी व मानवी स्वभावाचे अस्सल व सार्वत्रिक स्वरूप ग्रहण करण्यास प्रतिबंध करतो.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—उच्च विचारांत मग्न असून, काल आणि अस्तित्व ह्यांसंबंधीं चिंतन करीत राहणारा मनुष्य, ह्या मर्त्य आयुष्याला विशेष महत्व देईल, असें तुम्हाला वाटतें काय ?

ग्लॅ०:—हें अशक्यच आहे.

सॉक्रे०:—तर मग, असा मनुष्य मृत्यूला भयंकर समजेल काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून खऱ्या तत्वज्ञानांत, क्षुद्र व भित्र्या स्वभावाला स्थानच मिळणार नाहीं.

ग्लॅ०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, ज्या मनुष्याचें मन सुव्यवस्थित असून, लोभ, क्षुद्रता, आढ्यता व भित्रेपणा, ह्यांपासून जो मुक्त आहे, तो व्यवहारांत कठोर अथवा अन्यायी असूं शकेल काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून तत्वप्रवण असलेल्या व तत्वप्रवण नसलेल्या स्वभावाचे निदर्शक गुण शोधीत असतांना, तरुणपणांतच मनुष्याचें मन, न्यायी व सभ्य, किंवा एकांडें व तापट आहे, हें बघितलें पाहिजे.

ग्लॅ०:—अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—आणखी एक मुद्दा तुम्ही मुळींच गाळतां कामा नये.

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०—मनुष्याचें मन, शिक्षणामध्यें चलाख अथवा धिम्में आहे काय, हें बघितलें पाहिजे. कारण जें काम करीत असतांना मनुष्याला कष्ट वाटतात व मोठ्या मेहनतीनेंही ज्यांत त्याची क्षुल्लकच प्रगति होते, अशा कामांत मनुष्याला आनंद वाटणार नाहीं.

ग्लॅ०:—आनंद वाटणें अशक्य आहे.

सॉक्रे०:—तसेंच, जें शिकून झालें तें सुद्धां जर मनुष्याला स्मरणांत ठेवतां आलें नाहीं, तर तो ज्ञानशून्य होणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—अशा निष्फळ प्रयत्नामुळें शेवटीं तो स्वतःची निर्भत्सना करण्यास व कामाचाही तिटकारा करण्यास लागणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—म्हणून विसराळू मनाच्या लोकांना, तत्वज्ञानाच्या व्यासंगी मंडळींत आपण प्रवेश करूं देतां कामा नये. कारण चांगली स्मरण-शक्ति असणें, हा प्रवेश होण्यास आवश्यक गुण मानावयास पाहिजे ?

ग्लॅ०: —अर्थात्च.

सॉक्रे०:—आपण असेंही म्हणूं कीं; असंस्कृत व अडाणी स्वभा-वाचा कल, बेढबपणाकडे असतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—सत्य बेढब असतें कीं प्रमाणबद्ध असतें ?

ग्लॅ०:—प्रमाणबद्ध असतें.

सॉक्रे०:—इतर आवश्यक गुणांमध्यें, आपण आणखी एकभर टाकली पाहिजे. आपण असें मन शोधलें पाहिजे, कीं जें स्वभावतः सुप्रमाणबद्ध व सुंदर असून, वस्तुमात्रांचें खरोखर स्वरूप ग्रहण करूं शकतें.

ग्लॅ०-—होय. असें मन शोधलें पाहिजे.

Steph 487 सॉक्रे०:—आत्म्याला खऱ्या अस्तित्वाचें पूर्ण व समाधानकारक ज्ञान होण्यास जे गुण आतां आपण सांगितले, ते अनावश्यक अथवा एकमेकांशीं विसंगत आहेत, असें तुम्हांस वाटतें काय ?

ग्लॅ०:—ते अत्यंत आवश्यक आहेत.

सॉक्रे०:—जें काम समाधानकारक रीतीनें पार पाडण्याकरितां, एखाद्या माणसामध्यें चांगली स्मरणशक्ति, शीघ्र ग्राहकबुद्धि, उदात्त मनोभावना, सौंदर्याबद्दल सदभिरुची आणि सत्य, न्याय, धैर्य व नेमस्तपणा यांबद्दल प्रेम इत्यादि गुण आवश्यक असले व तदनुसार त्या माणसानें तें काम केलें, तर तें काम सदोष आहे असें कोणीतरी म्हणूं शकेल काय ?

ग्लॅ०:—नाहीं. टीकेची देवताही त्यांत दोष काढणार नाहीं.

सॉक्रे०:—योग्य काळानें आणि शिक्षणानें परिपूर्ण झालेल्या लोकांना, राज्याधिकाराचीं सूत्रें देण्यास तुम्ही कुरकुर कराल काय ?

ॲडिमेन्टस् मध्यें पडून म्हणाला, " सॉक्रेटिस, हे सिद्धांत कोणी आक्षेप घेण्यासारखे नाहींत हें खरें; परंतु प्रत्येक वेळेला जेव्हां हे सिद्धांत तुमच्याकडून प्रतिपादन केले जातात, तेव्हां ऐकणाऱ्यांना पुढील प्रकारची शंका येते. प्रश्नोत्तराच्या पद्धतीची संवय नसल्यामुळें, तुमच्या विचारसरणीनें ते प्रत्येक प्रश्नाचे वेळीं थोडेसे आडमार्गाला नेले जातात. पण वादविवादाचे शेवटीं, हे प्रथम क्षुल्लक वाटलेले आडमार्ग, मोठी चूक घडवून आणतात व त्यामुळें ऐकणाऱ्यांना स्वतःच्या पूर्वकल्पनांना स्वतःच विरोध करून चुकलों, असें आढळून येतें. ज्याप्रमाणें ड्राफ्ट नांवाच्या खेळांत निष्णात खेळाडूंकडून, निष्णात नसलेले लोक एका कोपऱ्यांत अडवले जाऊन, शेवटीं असें होतें कीं, त्यांना चकती ( Counter ) हलवतांच येत नाहीं;

त्याप्रमाणें तुमच्या वादांतील श्रोते, चकत्यांऐवजीं शब्दांनीं खेळला जाणारा हा ड्राफ्टचा नवा खेळ खेळत असतांना, शेवटीं अडविले जाऊन मौन स्वीकारण्यास भाग पाडले जातात. कारण जो निष्कर्ष शेवटीं तुम्हीं काढतां, तो खरा आहे अशी त्यांची मुळींच खात्री झालेली नसते. हा प्रस्तुतचा प्रसंग माझ्या म्हणण्याची सत्यता पटविणारा आहे. ह्याच वेळेस तुम्हांला एखादा मनुष्य सांगेल कीं, प्रत्येक प्रश्नाला जरी शब्दांनीं त्याला विरोध करतां आला नाहीं, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्याला असें दिसून येतें कीं, जे लोक तरुणपणीं केवळ शिक्षणाकरितां तत्वज्ञानाचा अभ्यास करून प्रौढपणींही व्यासंग चालू ठेवतात, ते अत्यंत तऱ्हेवाईक बनतात--नीतीनें वाईट बनतात असें मी म्हणत नाहीं. तसेंच, जे लोक फार सन्मान्य असे वाटतात, ते तुम्ही वाखाणलेल्या तत्वज्ञानाच्या व्यासंगामुळें, इतके नादान बनतात कीं त्यांचा देशाला कांहींच उपयोग होत नाहीं.

हें त्याचें बोलणें झाल्यावर मी म्हटलें, "हा आक्षेप खोटा आहे असें तुम्हांला वाटतें काय ?"

ॲडि०:—मला खात्रीनें सांगतां येणार नाहीं. पण तुमचें मत मी आनंदानें ऐकेन.

सॉक्रे०:—मी तुम्हाला सांगतों कीं, हा आक्षेप खरा आहे.

ॲडि०:--तर मग, जे तत्वज्ञानी लोक आपल्याच कबुलीप्रमाणें कुचकामाचे आहेत, ते अधिकारी झाल्याशिवाय नागरिकांचें दुःखनिवारण होणार नाहीं, हें विधान कसें काय बरोबर आहे ?

सॉक्रे०:--तुमच्या प्रश्नाचें उत्तर मी दृष्टांतानें देतों.

ॲडि०:--जणूं कांहीं दृष्टांत देण्याची तुम्हांला संवयच नाहीं !

सॉक्रे०:—जो विषय सिद्ध करण्यास कठीण आहे, असा विषय माझ्यावर सोंपवून तुम्ही माझी चेष्टा करतां काय ? ठीक. मी दृष्टांत

देतों तो ऐका, म्हणजे हें काम सुद्धां मी किती बारकाईनें
Steph करीत आहे, तें तुम्हांला कळेल. हे सभ्य लोक अशा
488 वाईट परिस्थितींत ठेवले जातात कीं, तशी दुसऱ्या
कोणत्याच वस्तूची परिस्थिती असूं शकणार नाहीं. म्हणून ज्याप्रमाणें चित्रकार, बोकड, हरीण व अशाच प्रकारचे विचित्र प्राणी रंगवितांना, निरनिराळ्या ठिकाणांहून साधनें जमवितात, त्याप्रमाणें ह्या लोकांच्या बचावाकरितां मला पुष्कळ ठिकाणांहून साधनें जमवावीं लागतील.

तुमच्या मनासमोर एक जहाज उभें करा व त्यावर खालील प्रकारची स्थिति आहे, अशी कल्पना करा. ह्या जहाजावरील मुख्य ( कप्तान ) इतर खलाशांपेक्षां सर्वांत उंच व धिप्पाड, परंतु बहिरा, कमी दिसणारा व नौकानयनकलेंतील कौशल्यांत थोडाबहुत कमी असलेला असा असून, जहाजाचें नेतृत्व कोणाकडे असावें ह्याबद्दल खलाशी भांडत आहेत. प्रत्येकाला असें वाटतें कीं, जहाज चालविण्याचा आपल्यालाच अधिकार असावा. बरें प्रत्येकाची तयारी तर अशी कीं, कोणीही त्या कलेचा अभ्यास केलेला नाहीं, कोणापासून शिक्षण घेतलें त्याचें नांव व कोणत्या वेळेस उमेदवारी केली, ती वेळही कोणाला सांगतां येत नाहीं. शिवाय ‘ कला शिकवितां येणें शक्यच नाहीं, ’ असें ह्या लोकांचें मत असून, ह्या मताविरुद्ध बोलणाऱ्या मनुष्याचे वाभाडे काढावयास ते तयार असतात.

अशा प्रकारें त्यांची स्वतःची स्थिति असूनही, कप्तानाच्या भोंवतीं ते सारे जमून, आपल्याला कर्णधार नेमावें म्हणून त्याच्याजवळ लोचटपणानें विनंति करीत असतात. कांहीं प्रसंगीं, त्याचें मन वळविण्याचे कांहीं जणांचे प्रयत्न अयशस्वी होतात व इतरांचे यशस्वी होतात. असें झालें म्हणजे, निराश झालेले लोक विजयी झालेल्या प्रतिस्पर्ध्यांना ठार मारतात अथवा पाण्यांत फेंकून देतात व त्या

चाणेदार स्वभावाच्या मुख्याला, एखादें अत्यंत अंमलकारक मद्य देऊन अथवा इतर कांहीं उपायानें असमर्थ करून, त्याचे हातपाय बांधून टाकतात आणि आपण स्वतः जहाजाचे स्वामी होऊन, सर्व सामुग्री आपल्या कामाकरितां वापरतात. अशा खलाशांकडून दुसरें काय होणार ? हे लोक आपला वेळ खाण्यापिण्यांत व मजेंत

Steph 489 घालवितात आणि जहाजाचें नेतृत्व स्वतःला देण्याविषयीं, कप्तानाचें मन वळवीत असतांना अथवा त्याला भाग पाडीत असतांना, जे त्यांना मदत करतात अशा खलाशांची 'लायक खलाशी,' 'उत्तम तांडेल,' 'निष्णात नावाडी' अशा विशेषणांनीं स्तुति करतात व इतरांना कुचकामाचे म्हणून निंद्य ठरवितात. खऱ्या तांडेलानें, जहाजाच्या नेतृत्वास लायक होण्याकरितां वर्ष, वर्षाचे ऋतु, आकाश, नक्षत्रें, वारे इत्यादि, कलेसंबंधीं सर्व गोष्टींचा लक्षपूर्वक अभ्यास केला पाहिजे, अशी ह्या लोकांची कल्पनाच नसते. तसेंच, नौकानयनाच्या कलेबरोबरच, कांहीं खलाशांच्या नापसंतीस न जुमानतां आपला अधिकार गाजविण्याची कला आत्मसात् करणें व त्याप्रमाणें वागणें, हेंही ते अशक्यच समजतात. अशी जहाजावर स्थिति असली म्हणजे, जो नावाडी खरोखर आपल्या कलेंत निष्णात आहे, तो वरील वर्णनाच्या खलाशांकडून, कुचकामाचा व नक्षत्राकडे बघत रहाणारा बडबड्या, म्हणून म्हटला जाणार नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ठीक. मला वाटतें, माझा दृष्टांत पुन्हां नजरेखालून घालण्यास तुम्ही मला सांगणार नाहीं. कारण तुम्हांला समजलेंच असेल कीं, तत्वज्ञानी लोकांविषयीं शहरांमध्यें जी भावना आहे, तिचेंच हें खरें चित्र आहे.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—आपल्या शहरांत तत्वज्ञानी लोकांना मान दिला जात नाहीं, म्हणून जर कोणाला आश्चर्य वाटलें, तर हा दृष्टांत त्याला सांगून उलट तुम्ही असें म्हणा कीं, तत्वज्ञानी लोकांना मान देण्यांत आला तरच आश्चर्य होय !

ॲडि०:—ठीक. असें मी सांगेन.

सॉक्रे०:—आणि त्याला असें सांगा कीं, तत्वज्ञानामध्यें पारंगत असलेले पुष्कळ सभ्य लोक जगाच्या उपयोगाचे नाहींत, हें त्याचें म्हणणें खरें आहे. पण ह्याचा दोष तत्वज्ञानी लोकांकडे येत नसून, जे लोक त्यांची सेवा पत्करण्याचें नाकारतात त्यांजकडे येतो. कारण नावाड्यानें, आपला अधिकार मानला जावा म्हणून खलाशांना विनंति करणें अथवा ज्ञानी मनुष्यानें, श्रीमंत मनुष्याचें द्वारीं तिष्ठत राहणें योग्य नव्हे. सत्य बोलावयाचें म्हणजे, ज्याप्रमाणें आजारी मनुष्यानें, आपली श्रीमंती अथवा गरीबी बाजूला ठेवून वैद्याचें घरीं गेलेंच पाहिजे, त्याचप्रमाणें राज्यकारभार चांगला चालविला जावा अशी ज्यांना इच्छा असते, त्यांनीं राज्यकारभार करण्यास योग्य आहेत अशा लोकांचे उंबरठे झिजविले पाहिजेत–राज्यकारभार करण्यास राज्यकर्ता खरोखर जर योग्य असेल, तर त्यानें ज्यांच्यावर सत्ता गाजवावयाची त्यांच्याकडे जाऊन त्यांची विनवणी करावयाची, हें अस्वाभाविकच आहे. हल्लींच्या काळांतील मुत्सद्दी लोकांची, आपण वर्णन केलेल्या खलाशांशीं तुलना केलीत व आपले हल्लींचे राजकारणी लोक ज्यांना कुचकामाचे, कल्पनातरंगांत रममाण होणारे, बडबडे लोक म्हणून म्हणतात त्यांची, अस्सल नावाड्यांशीं तुलना केलीत, तर तुमची चूक होणार नाहीं.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—अशी परिस्थिती व असे लोक असतांना, सर्वोत्तम विषयाचा म्हणजे तत्वज्ञानाचा व्यासंग, विरोधी लोकांकडून चांगला

म्हटला जाणें सोपें नाहीं. पण अत्यंत अपायकारक व अत्यंत दुराग्रही गैरसमजूत जर तत्वज्ञानाविषयीं होत असेल, तर ती तत्वज्ञानाच्या अनुयायांकडून होय. तत्वज्ञानावर आक्षेप घेणारा मनुष्य जेव्हां म्हणतो कीं, तत्वज्ञानाचा अभ्यास करणारे पुष्कळसे लोक अत्यंत नादान असतात व चांगले विद्यार्थी कुचकामाचे असतात, तेव्हां हेच लोक त्याच्या मनांत असतात; आणि हें त्याचें म्हणणें खरें आहे, हें मी कबूलच केलें आहे.

ॲडि०:—होय. तुम्ही कबूल केलें आहे.

सॉक्रे०:—चांगले लोक निरुपयोगी कां असतात, हें आपण सांगितलें आहे ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—पुष्कळसे अभ्यासू लोक नादान कां असतात, ह्याचा खल करणें आणि शक्य असेल तर ह्याला तत्वज्ञान कारण नसतें, हें ठरविणें जरूर आहे ना ?

ॲडि०:—जरूर आहे.

सॉक्रे०:—जो पूर्ण सुविद्य व सद्गुणी होऊं इच्छितो, अशा मनुष्याचा नैसर्गिक स्वभाव कसा असावा, हें वर्णन करतांना आपण जें ठरविलें, तें लक्षांत घेऊन आपण
Steph 490 वादविवाद करूं. अशा मनुष्याच्या स्वभावांतील मुख्य वैशिष्टय म्हणजे सत्य. त्यानें सत्याचा मार्ग अत्यंत भक्तिपूर्वक अनुसरला पाहिजे. कारण जर तो निव्वळ तोतया ठरला, तर खऱ्या तत्वज्ञानामध्यें त्याला कांहींही भाग घेतां येणार नाहीं.

ॲडि०:—होय. आपण असें म्हटलें आहे.

सॉक्रे०:—ह्या विषयावर प्रचलित असलेल्या मताविरुद्ध हें वैशिष्टय ठरत नाहीं काय ?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—खरा ज्ञानप्रेमी मनुष्य, खऱ्या अस्तित्वाकडे पोंचण्या करितां अत्यंत मेहनत करावयास तयार असतो. सृष्टिक्रमांतील असंख्य विशिष्ट चमत्कार कीं ज्यांचें अस्तित्व मताच्या मर्यादेंत पडतें, त्यांच्या अनुभवावरच न थांबतां, ज्ञानाची भक्ति न सोडतां व धैर्यही न सोडतां तो आपला मार्ग चालू ठेवतो. आत्म्याचा जो भाग खऱ्या अस्तित्वाचे विषय समानधर्माच्या नात्यानें जाणूं शकतो, त्या विशिष्ट भागानें प्रत्येक वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होईपर्यंत, त्याला समाधान होत नाहीं. अशा रीतीनें जें खरोखर अस्तित्वांत असतें, त्याच्या खरोखर जवळ जाऊन व त्याची ओळख करून घेऊन, त्याला ज्ञान व सत्य मिळवितां येतें. तें मिळालें असतां, त्याला जीवनांतील खरा आनंद व खरी पुष्टि मिळते व बाळंत होईपर्यंत स्त्रीस जसा वेदनांचा त्रास सोसावा लागतो, तसा त्रास ज्ञानाच्या प्राप्तीच्या वेळीं त्याला सोसावा लागून तो मुक्त होतो.

ॲडि०:—हें उत्तर सर्वोत्कृष्ट आहे.

सॉक्रे०:—अशा मनुष्याला खोटेपणाची आवड मुळीं तरी असेल काय? उलट, त्याला खोटेपणाविषयीं अत्यंत तिरस्कार वाटणार नाहीं काय?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—सत्य जर मार्गदर्शक असेल, तर त्याच्या पाठोपाठ वाईट गोष्टी येतील, असें आपण कधींही म्हणणार नाहीं.

ॲडि०:—अर्थातच नाहीं.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, सत्याच्या संगतींत सुव्यवस्थित व न्यायी स्वभाव असून शांतपणा त्याच्या पाठोपाठच येतो, असें आपण म्हणूं.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आपण आपले सिद्धांत पुनः मांडण्याची जरूर नाहीं. तसेंच, तत्वज्ञानी स्वभावाचे आणखी विशेष गुण सांगण्याचीही जरूर

नाहीं. आपण पाहिलें कीं, अशा स्वभावाचे मर्दपणा, उदात्तपणा, तीक्ष्ण ग्रहणशक्ति आणि चांगली स्मरणशक्ति, हे स्वाभाविक गुण आहेत. ह्यावर तुम्ही अशी शंका उपस्थित केली, कीं हे सिद्धांत जरी कोणालाही अमान्य करतां येण्यासारखे नसले, तरी वाद सोडून देऊन तत्वज्ञानी लोकांकडे दृष्टि फेंकली असतां, पुनः कोणीही असेंच म्हणेल कीं, कांहीं थोडे लोक कुचकामाचे आहेत व पुष्कळसे अगदीं नादान आहेत. म्हणून आपण तत्वज्ञानी लोकांविषयीं असलेल्या प्रतिकूल ग्रहाच्या कारणांची चर्चा केली व पुष्कळ लोक नादान कां असतात ह्या प्रश्नावर आतां आपण येऊन ठेपलों आहोंत. ह्याच कारणाकरितां, खऱ्या तत्वज्ञानी लोकांच्या स्वभावाची चर्चा करून व्याख्या करणें आपणांस भाग पडलें.

ॲडि०:--खरें आहे.

सॉक्रे०:—पुष्कळ लोकांमध्यें असलेला तत्वज्ञानी स्वभाव, ज्या अपायकारक कारणांनीं मारला जातो, तीं कारणें आपण अभ्यासिलीं पाहिजेत. ह्या कारणांपासून जे थोडे लोक निभावूं शकतात, ते जरी नादान म्हटले जात नाहींत, तरी तुमच्या मतें कुचकामाचे
Steph ठरतात. खऱ्या तत्वज्ञानी स्वभावाचें अनुकरण करूं
491 इच्छिणारे लोक, तत्वज्ञानी लोकांप्रमाणेंच व्यासंग ठेवून आंवाक्याबाहेर अभ्यास करावा लागल्यामुळें, कशा विचित्र चुका करतात व त्यांच्या चुकांमुळें तत्वज्ञानाची, जिकडे तिकडे तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें निंदा कशी होते, हेंही आपण विचारांत घेतलें पाहिजे.

ॲडि०:--तुम्ही म्हणतां तीं अपायकारक कारणें कोणतीं ?

सॉक्रे०:—माझ्या शक्तीप्रमाणें मी तीं वर्णन करतों. तत्वज्ञानाकरितां आवश्यक असलेले गुण म्हणून आपण जे म्हटले, ते सर्व गुण

असणारा स्वभाव, मनुष्यांमध्यें क्वचित्च सांपडतो. ह्याविषयीं सर्वांचें एकमत होईल. तुमचें मत भिन्न आहे काय ?

ॲडि०:--नाहीं. खरोखरच नाहीं.

सॉक्रे०:--असे क्वचित् सांपडणारे स्वभाव किती प्राणघातक संकटांनीं वेष्टिले आहेत, ह्याचा विचार करा.

ॲडि०:—कोणतीं संकटें ?

सॉक्रे०:--सर्वांत अत्यंत आश्चर्यकारक वाटणारी गोष्ट अशी कीं, आपण वाखाणणी केलेल्या प्रत्येक गुणाची प्रवृत्ति, हे गुण असणाऱ्या आत्म्याला तत्वज्ञानापासून परावृत्त करणारी असते. धैर्य, नेमस्तपणा वगैरे गुण आपण वर्णन केले, त्यांना अनुलक्षून मी हें म्हणतों.

ॲडि०:- हें चमत्कारिक वाटतें खरें.

सॉक्रे०:—शिवाय सौंदर्य, संपत्ति, शारीरिक शक्ति, राज्यामधील महत्वाच्या सोयरीकी व त्यापासून होणारे आनुषंगिक परिणाम, ह्या सर्व कारणांनीं आत्मा बिघडून जाण्याचा व तत्वज्ञानापासून परावृत्त होण्याचा संभव असतो. माझ्या म्हणण्याची रूपरेषा मी आतां सांगितली आहे.

ॲडि०:—होय. पण अधिक विस्तारानें शिकण्याची माझी इच्छा आहे.

सॉक्रे०:—साकल्यानें विचार करा म्हणजे तुम्हांला स्पष्ट समजेल आणि माझे अगोदरचे विचार तुम्हांला तितके विचित्र वाटणार नाहींत.

ॲडि०:--तुम्ही मला काय करावयास सांगतां ?

सॉक्रे०:—वनस्पति अथवा प्राणी सृष्टींतील बीजासंबंधीं, तसेंच ज्यांना वाढ आहे अशा सर्व वस्तूंसंबंधीं, आपणाला माहीत आहे कीं, ज्या प्रमाणांत योग्य पुष्टि, ऋतु व जमीन मिळत नाहीं, त्या प्रमाणांत अशा वस्तूंमध्यें जीं विशेष दणकट असतात, त्यांचे योग्य गुण कमी दिसतात. ह्याचें कारण मला वाटतें, जें वाईट आहे, त्यांचा जें चांगलें नाहीं त्याच्यापेक्षां जें चांगलें आहे, त्याच्याशीं जास्त विरोध असतो.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—म्हणून आपणांला असा योग्य निष्कर्ष काढतां येईल कीं, सर्वांत उत्तम स्वभावाचे जे असतात, त्यांना वाईट पोषण मिळालें असतां, कमी प्रतीच्या स्वभावापेक्षां अधिक इजा होते.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग ॲडिमेन्टस्, उच्च प्रतीचीं मनें, वाईट शिक्षण मिळालें तर अशाच तऱ्हेनें अति दुष्ट माणसें बनत नाहींत काय? मोठाले गुन्हे व मोठालीं अपकृत्यें ह्यांचा संभव, कुशिक्षणामुळें होणाऱ्या उत्तम स्वभावाच्या अधःपातापासून न होतां, क्षुद्रपणाच्या स्वभावापासून होतो अथवा कमकुवत स्वभाव, कोणतेंही मोठें कृत्य—वाईट अथवा चांगलें—करूं शकतो, असें तुम्हांला वाटतें काय?

ॲडि०:—नाहीं. माझें तुमच्याप्रमाणेंच मत आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. तत्वज्ञानी मनुष्याचा स्वभाव आपण जो ठरविला आहे, तो योग्य शिक्षण मिळालें तर पूर्ण उत्कर्षास पोंचलाच पाहिजे. पण तोच जर कां अयोग्य
Steph 492
भूमीवर पेरला जाऊन वाढविण्यांत आला, तर त्याचें अत्यंत विरुद्ध प्रकारच्या दुर्गुणांत रूपांतर होऊन केवळ एखादी देवताच दैवयोगानें त्याचा बचाव करूं शकेल. सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें तुम्हांला असें वाटतें काय कीं, सोफिस्ट लोकांकडून, तारुण्यांतच कांहीं व्यक्ती बिघडविल्या जातात अथवा कांहीं विशिष्ट सोफिस्ट, खाजगी रीतीनें फार भयंकर प्रमाणांत लोकांना बिघडवीत असतात? उलट, अशी भाषा वापरणारे लोक, स्वतःच मोठे सोफिस्ट असून, आपल्या आवडीप्रमाणें तरुण व वृद्ध स्त्रीपुरुषांना मोठ्या मेहनतीनें शिक्षण देऊन, तयार करीत असतात असें तुम्हांला वाटतें ना?

ॲडि०:—असें शिक्षण ते केव्हां देतात?

सॉक्रे०:--हे लोक नागरिकांच्या सभेमध्यें, कायदेकचेऱ्यांमध्यें, नाटकगृहांमध्यें, लष्करामध्यें अथवा मोठ्या समुदायाच्या दुसऱ्या एखाद्या सभेमध्यें जाऊन, गडबड करणाऱ्या मंडळींत बसून, ज्या गोष्टी तेथें चाललेल्या असतात, त्यांपैकीं कांहींची निंदा व कांहींची अवास्तव स्तुति करीत असतात. मोठ्यानें ओरडून व टाळया पिटून, सभोंवतालची जागा आपल्या आवाजानें दणाणून सोडतात. अशा वेळीं तरुण मनुष्याचा स्वतःच्या मनावर कसा काय ताबा राहील ? त्यानें घेतलेल्या खाजगी शिक्षणाचा तेथील निंदास्तुतीच्या वर्षावापुढें कसा काय टिकाव लागणार ? ह्या टीकाप्रवाहामध्यें वाहवत जाऊन, शेवटीं तोही वरील मनुष्यांप्रमाणेंच वंद्य कोणतें व निंद्य कोणतें हें ठरवून, त्यांचें अनुकरण करून त्यांच्यासारखाच बनणार नाहीं काय ?

ॲडि०:—सॉक्रेटिस, हा परिणाम खात्रीनेंच होणार.

सॉक्रे०:—तथापि, अत्यंत खात्रीलायक परिणाम करणारें साधन, आपण अजून सांगितलेंच नाहीं.

ॲडि०:—तें कोणतें ?

सॉक्रे०:—शिक्षक व सोफिस्ट, ह्या लोकांचें भाषण जेव्हां निरुपयोगी व अयशस्वी ठरतें, तेव्हां ह्या साधनाचा ते प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करतात. कारण तुम्हाला माहीतच आहे कीं, जे त्यांची आज्ञा पाळीत नाहींत, त्यांचे ते हक्क काढून घेतात, त्यांना दंड करतात व मृत्यूची शिक्षा करतात.

ॲडि०:—निःसंशय ते असें करतात.

सॉक्रे०:--तर मग, दुसरा कोणता सोफिस्ट अथवा खाजगी मनुष्य, अशा परिणामांचा प्रतिकार करूं शकेल ?

ॲडि०:—कोणीच नाहीं.

सॉक्रे०: -कोणालाच करतां येणार नाहीं. असा प्रयत्न सुद्धां शुद्ध मूर्खपणाचा होईल. लोकसमुदायाच्या सार्वजनिक सभांमधून जें शिक्षण

देण्यांत येतें, त्या शिक्षणानें ज्याचा स्वभाव तयार झाला
Steph आहे, त्याला सद्गुणाविषयीं निराळ्या भावनाच कधीं
493 वाटत नाहींत, वाटल्या नाहींत व वाटणारही नाहींत !

माझ्या मित्रा, मी मानवी स्वभावाविषयीं बोलत आहे. दैवी स्वभाव आपण वगळले पाहिजेत. पण तुमची खात्री असूं द्या कीं, राज्यपद्धति अशा प्रकारची असूनही, जें कांहीं राखलें गेलें आहे अथवा चांगलें करण्यांत आलें आहे, त्याला कारण ईश्वरी योजनाच होय.

ॲडि०:—माझेंही मत असेंच आहे.

सॉक्रे०:—तुमच्या मतांमध्यें आणखी एक भर टाकली पाहिजे.

ॲडि०:—कोणती ?

सॉक्रे०:—ज्यांना लोकसमुदाय सोफिस्ट संबोधून प्रतिस्पर्धीही समजतो, असे हे सर्व भाडोत्री धाडसी लोक, मोठाले जमाव लोकांचे जमले असतांना बहुजनसमाजाचींच मतें शिकवीत असतात व त्यांनाच ज्ञान म्हणून गौरवानें संबोधीत असतात. अशा लोकांची तुलना, मी पुढील वर्णनाच्या मनुष्याशीं करतों. आपल्या ताब्यांत असलेल्या एखाद्या अवाढव्य व प्रबल राक्षसाच्या लहरींचें व इच्छांचें एखाद्यानें निरीक्षण करावें—कशा तऱ्हेनें त्याच्याजवळ जावें व कशा तऱ्हेनें त्याला स्पर्श करावा, ह्याचा अभ्यास करावा—कोणत्या वेळेला आणि कोणत्या परिस्थितींत तो भयावह अथवा नम्र होतो, कोणत्या प्रसंगीं निरनिराळ्या आरोळ्या मारण्याची त्याला संवय असते, दुसऱ्या मनुष्यानें कोणते आवाज काढले असतां त्याचे सांत्वन होतें अथवा तो त्रासून जातो,—ह्या सर्व गोष्टींचा पुष्कळ दिवसांच्या परिचयानें उत्तम अभ्यास केल्यावर, ह्या ज्ञानाला त्यानें शहाणपण म्हणून म्हणावें, कला म्हणून त्याची योग्य रचना करावी व एक शाळा उघडावी. वस्तुतः ह्या लहरीं-पैकीं व इच्छांपैकीं कोणत्या चांगल्या व कोणत्या वाईट, कोणत्या न्याय्य व कोणत्या अन्याय्य, ह्याविषयीं तो पूर्णपणें अज्ञानी असतो

आणि म्हणून हीं सर्व नांवें त्या मोठ्या प्राण्यांच्या लहरींना तो लावतो. त्याला ( त्या प्राण्याला ) जें आवडतें तें चांगलें व आवडत नाहीं तें वाईट, कारण दुसऱ्या प्रकारानें त्याला ( मनुष्याला ) स्पष्टीकरणच करतां येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर सक्तीनें केल्या जाणाऱ्या गोष्टींना, तो न्याय्य व चांगल्या म्हणतो. कारण त्याला स्वतःलाच सक्तीनें केलेलें कर्म व खरें सत्कर्म, ह्यांच्यामध्यें जें खरोखर मोठें अंतर असतें, तें कळलेलें नसतें व त्यामुळें लोकांनाही त्यांतील फरक तो सांगूं शकत नाहीं. मला कृपा करून असें सांगा कीं, असा मनुष्य एक चमत्कारिक शिक्षक होणार नाहीं काय ?

ॲडि०: – होय. मला असेंच वाटतें.

सॉक्रे०:—सभा भरलेली असतांना, सभेंतील लोकांच्या लहरी व सुखांच्या कल्पना ह्यांचा अभ्यास करून, चित्रकला, संगीत अथवा राजकारण, ह्या बाबतींत बहुजनसमाजाचींच मतें सांगणें, ह्याला जो ज्ञान समजतो, असा मनुष्य व वरील वर्णनाचा मनुष्य ह्यांच्यांत कांहीं फरक आहे काय ? मनुष्य बहुजनसमाजाशीं मिसळला व स्वतःच्या एखाद्या कवितेविषयीं, कलेविषयीं अथवा राज्याकरितां केलेल्या कामगिरीविषयीं, लोकमत विचारून लोकांचा अधिकार त्यानें वाजवीपेक्षां अधिक मान्य केला, म्हणजे ते सांगतील त्याप्रमाणें करणें त्याला भागच पडतें. हें जरी खरें असलें, तरी मला सांगा कीं, लोकसमाज जें म्हणतो तेंच चांगलें व सुंदर असतें, हें सिद्ध करण्याकरितां लोकांनीं केलेलें प्रतिपादन हास्यास्पद कधींच झालें नाहीं, असा आयुष्यांत एक तरी प्रसंग तुम्हाला आठवतो काय ?

ॲडि०:—नाहीं. मला आठवत नाहीं.

सॉक्रे०:—हें जर तुम्हांला चांगलें समजलें असलें, तर दुसरा मुद्दा मी तुम्हांला सांगतों. बहुजनसमाजाला, सुंदर वस्तूंच्या

Steph 494 असंख्य समुदायांपासून विभक्त अशी सौंदर्याची केवल कल्पना, शक्य अथवा विश्वसनीय वाटेल काय? तसेंच, विशिष्ट आकृतींपासून भिन्न, अशी आकाराची केवल कल्पना अस्तित्वांत आहे, असें वाटेल काय?

ॲडि०:—नक्कीच नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, बहुजनसमाज तत्वज्ञानी नसतो.

ॲडि०:—असूं शकत नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून तत्वज्ञानी लोक, बहुजनसमाजाकडून निंद्यच ठरले जाणार.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—लोकसमुदायांशीं संगति ठेवणारे व त्यांची खुशामत करणारे धाडशी सोफिस्टही, तत्वज्ञानी लोकांची निंदाच करणार.

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—अशी जर स्थिति आहे, तर तत्वप्रवण स्वभावाच्या मनुष्यानें, आपलें ध्येय साध्य होईपर्यंत आपला अभ्यास चालूं ठेवला पाहिजे, असा त्याचा दृढविश्वास होण्यास काय योजना तुम्ही सांगतां? आपण ठरविलेले पूर्वीचे मुद्दे तुम्ही विचारांत घ्या. तीक्ष्ण ग्रहणशक्ति, चांगली स्मरणशक्ति, धीटपणाची वृत्ति व उमदेपणा, हे तत्वज्ञानी स्वभावाचे आवश्यक गुण आहेत.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—जर मानसिक शक्तीप्रमाणें, शारीरिक शक्तीही त्याच्या चांगल्या असतील, तर लहानपणापासूनच असा मनुष्य प्रत्येक बाबतींत अग्रेसरत्व पटकावणार नाहीं काय?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तो जसजसा वृद्ध होईल, तसतसा त्याचे मित्र व देशबांधव स्वतःच्या कामाकरितां त्याचा उपयोग करतील.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—पुढें तो वजनदार मनुष्य होणार आहे, अशा समजुतीनें ते त्याच्या पायांवर डोकें ठेवून, त्याची स्तुति करतील व प्रार्थना करतील.

ॲडि०:—होय. ही नित्य अनुभवांतीलच गोष्ट आहे.

सॉक्रे०:—अशा परिस्थितींत असा मनुष्य कसा वागेल असें तुम्हांला वाटतें ? विशेषत: जर तो बलिष्ठ राज्यांतील श्रीमंत व उच्चकुलोत्पन्न मनुष्य असून उंच व देखणा असला, तर कसा वागेल ? भरमसाट महत्वाकांक्षेनें फुगून जाऊन, ग्रीक व परराष्ट्रीय राजकारणाचीं कामें करण्यास आपण योग्य आहोंत, असें समजावयास लागून तो प्रतिष्ठितपणाचा आव आणणार नाहीं काय ? तसेंच, मोठेपणाच्या कल्पनेनें आणि पोकळ मूर्खपणाच्या घमेंडीनें, तो गर्विष्ठ होणार नाहीं काय ?

ॲडि०:—असेंच निःसंशय होईल.

सॉक्रे०:—अशा मनोवृत्तींत तो असतांना, शांतपणानें त्याच्याजवळ कोणी जाऊन त्याला सांगितलें, "खरोखर तुमच्याजवळ शहाणपण मुळींच नाहीं. उलट, तुम्हांलाच त्याची जास्त जरूरी आहे. शहाणपण गुलामांप्रमाणें मेहनत केल्याशिवाय संपादन करतां येत नसतें;" तर वरील वाईट व अपायकारक वातावरणांत तो असल्यामुळें, त्याचें ह्या स्पष्ट भाषणाकडे लक्ष ओढलें जाईल काय ?

ॲडि०:—कठीणच आहे !

सॉक्रे०:—पण स्वभाव चांगला असल्यामुळें व तत्वज्ञानाची उपजत आवड असल्यामुळें, अशा मनुष्यानें वरील उपदेश लक्षांत घेऊन, तत्वज्ञानाकडे आपलें पूर्ण लक्ष देण्याचें ठरविलें, तर त्याच्याकडून होणाऱ्या मदतीची व त्याच्या मैत्रीची अपेक्षा करणाऱ्या लोकांचें वर्तन, काय होईल असें तुम्हांला वाटतें ? खासगी उचापती करून, त्याच्यावर खटले भरून व त्याला त्रास देऊन, तत्वज्ञानाचा त्याच्यावर कांहींही परिणाम होणार नाहीं, अशी ते धडपड करतील ना ?

ॲडि०:—अर्थातूच असें केल्याशिवाय ते रहाणार नाहींत.

Steph 495 सॉक्रे०:—अशा परिस्थितींत, असा मनुष्य तत्वज्ञानाचा व्यासंगी राहूं शकेल काय ?

ॲडि०: – अर्थातूच नाहीं.

सॉक्रे०:—आतां तुम्हांला दिसून आलें असेल कीं, तत्वज्ञानी स्वभावाचे जे आवश्यक गुण म्हणून आपण सांगितले, ते अपायकारक परिस्थितींत ठेवले गेले असतां, तत्वज्ञानाच्या अभ्यासापासून मनुष्याला परावृत्त करतात आणि संपत्तीचे सुप्रसिद्ध फायदे, बाह्य डामडौल आणि सुस्थिति, हीं कारणें सुद्धां अशा कामांत मदत करतात.

ॲडि०:—होय. हें निरीक्षण खरें आहे.

सॉक्रे०:—माझ्या उत्तम मित्रा, उदात्त विषयाचें परिशीलन करणाऱ्या उत्तम स्वभावाचा, हा असा अत्यंत अधःपात व नाश होतो. असा स्वभाव खरोखर क्वचितूच आढळतो. जे राज्याला व त्यांतील व्यक्तींना मोठा अपाय करतात व जे राज्याच्या कल्याणाकरितां योग्य वेळीं स्वतः मेहनत घेतात, तेंही ह्या वर्गांत मोडतात. सामान्य व क्षुद्र मनाचीं माणसें, राज्याला अथवा व्यक्तींना विशेष प्रमाणांत कधींच अपाय करीत नाहींत.

ॲडि०: हें अत्यंत खरें आहे.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें असें घडून येतें कीं, तत्वज्ञानाचे जवळचे नातेवाईक म्हणून ज्यांनीं तत्वज्ञानाची बाजू धरावयाची, ते बाजूला सरून तत्वज्ञानाला असहाय व अपूर्ण परिस्थितींत टाकून देतात. असे लोक अयोग्य व असत्य आयुष्य घालवीत बसतात आणि नातलगांनीं सोडल्यामुळें, अयोग्य अशा लोकांकडून तत्वज्ञान अभ्यासिलें जाण्यास सुरवात होते. हे लोक तत्वज्ञानाला खालीं आणतात आणि तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें, तत्वज्ञानाची निर्भर्त्सना व्हावयास लागते व शेवटीं

परिणाम असा होतो कीं, तत्वज्ञानाचे कांहीं विद्यार्थी, कवडी किंमतीचे आणि पुष्कळसे मोठी शिक्षा करण्यास पात्र असे ठरतात.

ॲडि०:—हा तर सर्वसामान्य समज आहे.

सॉक्रे०:—होय. आणि तो स्वाभाविकच आहे. कारण इतर क्षुद्र लोक, मोठालीं नांवें व दिखाऊ पदव्या ह्यांनीं संपूर्ण असलेंलें हें क्षेत्र, मोकळें आहे असें बघून, आपले धंदे सोडून तत्वज्ञानाकडे धांव घेतात. ज्याप्रमाणें स्वतःच्या निंद्य धंद्यांत निष्णात असलेले गुन्हेगार लोक, तुरुंगांतून मुक्तता करून घेऊन देवळामध्यें शिरतात, त्याचप्रमाणें ह्या लोकांची कृति असते. जरी तत्वज्ञानाची निर्भर्त्सना झालेली आहे, तरी इतर धंद्यांपेक्षां अजूनही तत्वज्ञानाला अधिक मान दिला जातो. ज्यांच्या स्वाभाविक बौद्धिक शक्ती पूर्वींपासून कमी आहेत, तसेंच ज्यांचे आत्मे, काबाडकष्टाच्या व कारागिरीच्या धंद्यामुळें, त्यांच्या शरीराप्रमाणेंच विद्रूप झाले आहेत, अशा पुष्कळ लोकांना तत्वज्ञानाच्या वैभवाचा मोह वाटतो. हें खरें आहे ना ?

ॲडि०:—होय. निःसंशय असेंच.

सॉक्रे०:—अशी कल्पना करा कीं, एक टक्कल पडलेला, जुन्या वस्तु नीट करणारा गुलाम आहे. त्यानें थोडे पैसे मिळविलेले असून, त्याच्या दास्यशृंखला नुकत्याच काढल्या गेल्या आहेत. त्याला स्नान घालून व नवीन पोषाखांत नटवून, नवरा मुलगा म्हणून उभा केला आहे. त्याचा धनी दरिद्री व निराधार झाला असल्यामुळें, तो आपल्या धन्याच्याच मुलीशीं लग्न लावण्याच्या बेतांत आहे. अशा मनुष्याची व वरील मनुष्यांचीं सारखीच स्थिति नाहीं काय ?

ॲडि०:—ह्यांच्यामध्यें मला कांहींच फरक दिसत नाहीं.

Steph 496 सॉक्रे०:—अशा लग्नापासून संभवणारी प्रजा, हलक्या जातीची व क्षुद्र असणार नाहीं काय ?

ॲडि०:—दुसरी कशी असणार ?

सॉक्रे०:—तर मग, शिक्षण घेण्यास अपात्र असलेल्या लोकांनीं लायकी नसतांना तत्वज्ञानाशीं संबंध ठेवल्यामुळें, उत्पन्न होणारीं मतें व कल्पना ह्यांचें स्वरूप काय असेल ? अस्सल ज्ञानाचा पूर्ण अभाव असणारीं, मिथ्या सत्याभास उत्पन्न करणारीं, अशीं मतेंच प्रसृत होतील ना ?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस्, तत्वज्ञानाशीं संबंध ठेवण्यास योग्य, अशा लोकांचा वर्ग फार लहान असतो. ह्या वर्गामध्यें, उदार मनाचे व सुशिक्षित स्वभावाचे, हद्दपारीची शिक्षा भोगत असून, अपायकारक कारणांपासून अलिप्त असल्यामुळें, स्वतःच्या स्वभावाशीं खरेपणानें राहून तत्वज्ञानाला चिकटून रहाणारे, असे कांहीं लोक असतात. स्वतःच्या देशांतील राजकारणाकडे तुच्छतेनें बघणारे, असे लहान देशांत जन्मलेले पण मोठ्या मनाचे लोकही असतात. स्वतःच्या धंद्याबद्दल सकारण तिटकारा वाटावयास लागल्यामुळें, इतर धंद्यांतीलही कांहीं बुद्धिमान् लोक तत्वज्ञानाकडे वळतात. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें थीएजीस तत्वज्ञानाकडे वळला. इतर कोणतेंही कारण, त्याला राजकारणांतून बाहेर पाडण्यास समर्थ झालें नाहीं. थीएजीसप्रमाणें, कांहीं लोक प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें तत्वज्ञानाचा अभ्यास करणारे होतात. मला स्वतःला दैवी आदेश असल्यामुळें, तत्वज्ञान सोडावेंसें वाटत नाहीं. पण तो आदेश सांगण्याचें कारण नाहीं. माझ्या अगोदरच्या लोकांपैकीं सुद्धां तो एखाद्यालाच मिळालेला असेल. ह्या तत्वज्ञानी लोकांच्या मंडळाचा जो सभासद झाला आहे आणि आपल्याजवळ असलेला ( ज्ञानाचा ) ठेवा किती मधुर आणि धन्यता वाटावयास लावणारा आहे, हें ज्यानें अनुभविलें आहे; सार्वजनिक काम कोणीहि समंजसपणानें करीत नाहीं, अशा पूर्ण खात्रीनें ज्यानें अनेक लोकांचा वेडेपणा पाहिला आहे; न्यायी मनुष्याच्या मदतीला ज्याच्याबरोबर सुरक्षितपणें धांवून जातां

येईल, असा एकही मनुष्य नाहीं हें ज्याला समजलें आहे—इतकेंच नव्हे, तर असा प्रयत्न केला असतांना, हिंस्र पशूंच्या कचाट्यांत सांपडलेल्या मनुष्यासारखी स्थिति होईल असें ज्याला पटलें आहे; लोकांनीं केलेल्या पापकृत्यांमध्यें मदतनीस होण्यास नाखूष असूनहि, सर्व लोकांच्या क्षोभाला एकट्यानें तोंड देण्यास असमर्थ असल्यामुळें, आपल्या देशाची सेवा, मित्रांची सेवा, अथवा स्वतःचें किंवा दुसऱ्याचें कांहीं चांगलें करण्यास समर्थ होण्यापूर्वींच, आपला नाश केला जाईल हें भवितव्य ज्याला कळलें आहे—असा मनुष्य, मी म्हणतों, शांतपणा राखून स्वतःच्याच कामांमध्यें आपलें मन गुंतवून ठेवतो. ज्याप्रमाणें वादळाचे दिवशीं, वाऱ्यामुळें धूळ व पाऊस ह्यांचा हलकल्लोळ झाला असतां, एखादा मनुष्य भिंतीपाठीमागें आश्रय धरून आपलें रक्षण करतो, त्याचप्रमाणें अशा मनुष्याचें वर्तन असतें. आपल्या आश्रयाच्या जागेवर उभें राहून, सर्व मानवजातींत पसरलेला बेबंदशाहीचा प्रभाव जेव्हां तो पाहतो, तेव्हां पापी व अपवित्र कृत्यांपासून अलिप्त असें स्वतःचें आयुष्य घालवून, मृत्यु जवळ आला असतां, आनंदी चित्तानें, गंभीरपणानें व उल्हसित आशेनें जगाची रजा घेतां आली, तर त्याला समाधान वाटतें.

Steph 497 ॲडिमेन्टस म्हणाला, "जगाची रजा घेण्यापूर्वीं, पुष्कळ महत्वाचीं कामें तो करून जातो."

सॉक्रे०:—जर स्वतःला योग्य अशी राज्यघटना त्याला सांपडली नसेल, तर महत्वाचीं कामें तो करून जातो, असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण अशा घटनेमुळेंच, स्वतःची वाढ त्याला उच्च कोटीला नेतां येऊन स्वतःचें व देशबांधवांचें कल्याण करतां येईल.

सॉक्रे०:—तत्वज्ञानाविषयीं असलेल्या दुष्ट पूर्वग्रहांच्या कारणांचें व त्यापासून तत्वज्ञानाला होणाऱ्या अन्यायाचें, आपण समाधानकारक रीतीनें विवेचन केलें. तुम्हांला आणखी कांहीं सुचवावयाचें असेल तर सुचवा.

ॲडि०:—मला ह्या विषयावर अधिक कांहीं बोलावयाचें नाहीं. पण तत्वज्ञानाला योग्य अशी, आपल्या काळांत प्रचलित असलेल्यांपैकीं एखादी राज्यघटना सांगाल काय?

सॉक्रे०:—एकही नाहीं. तत्वज्ञानी स्वभावाला योग्य अशी एकही राज्यघटना अस्तित्वांत नाहीं, म्हणूनच असा स्वभाव बहकून जाऊन वाईट होतो, अशी माझी तक्रार आहे. ज्याप्रमाणें दुर्मिळ विदेशी बीं, परक्या जमिनींत पेरलें असतां, संवयीनें अशक्त होऊन आपलें विशिष्ट स्वरूप गमावून बसतें व देशांतील सामान्य रोपट्यांप्रमाणेंच शेवटीं वाढतें, त्याप्रमाणें हल्लींच्या काळांत अशा स्वभावाचा मनुष्य आपलें वैशिष्ट्य कायम राखण्यास असमर्थ होऊन, विरोधी गुणधर्म अंगीं लागून पतित होतो. पण जर त्याच्या स्वभावाला पूर्ण अनुरूप अशी राज्यघटना आढळली, तर तो असें सिद्ध करील कीं, त्याचा स्वभाव खरोखर दैवी स्वरूपाचा असून, इतर स्वभाव व धंदे केवळ मानवी होत. अशी राज्यघटना कोणती आहे, असा प्रश्न आतां तुम्हीं मला विचारणार, अशी माझी खात्री आहे.

ॲडि०:—नाहीं. तुमची चूक होत आहे. मी प्रश्न असा विचारणार होतों कीं, आपण जी राज्यघटना नुकतीच ठरविली तिचाच तुम्हीं विचार करीत आहां, कीं दुसऱ्या एखाद्या राज्यघटनेचा?

सॉक्रे०:—तिचाच. पण एक निराळा मुद्दा विचारांत घ्यावयाचा असून, तो आपण चर्चा करीत असतांना निर्देशिला आहे. तुम्ही कायदे करीत असतांना, ज्या दृष्टीनें कायदेपंडित म्हणून राज्यघटनेची पाहणी केलीत, त्याच दृष्टीनें पहाणारी अशी एक राज्यामध्यें कायमची सत्ता असावी, असें आपण म्हटलें आहे.

ॲडि०:—होय. असें म्हटलें आहे.

सॉक्रे०:—पण ह्या मुद्याचा मी विस्तार केला नाहीं. कारण तुमच्या आक्षेपांनीं मी भिऊन जाऊन मला वाटलें कीं, हें काम कंटाळवाणें व

कठीण होईल. आपल्या चर्चेमध्यें हा भाग जो राहून गेला, तो कांहीं सोपा नाहीं.

ॲडि०:—कोणता भाग ?

सॉक्रे०:—राज्याचा पूर्ण नाश ओढवला जाणार नाहीं, अशा रीतीनें सरकारनें तत्वज्ञानाचा अभ्यास कसा आंखून द्यावा, हें आपण दाखविलें पाहिजे. कारण सर्व मोठ्या गोष्टी जोखमीच्या असतात आणि अशी म्हण आहे कीं, सुंदर वस्तु दुष्प्राप्य असतात.

ॲडि०:—आपलें विवेचन पूर्ण होण्याकरितां, हा मुद्दा कांहीं झालें तरी स्पष्ट केलाच पाहिजे.

सॉक्रे०:—जी काय अडचण येईल ती फक्त शक्तीच्या कमतरतेमुळें–इच्छेच्या कमतरतेमुळें नव्हे. माझा स्वतःचा उत्साह तुम्हीं पहा. मी निर्भयपणें असें विधान करतों कीं, तत्वज्ञानाचा अभ्यास, प्रचलित पद्धतीच्या अगदीं उलट रीतीनें चालावा, म्हणून सरकारनें ठरवावें.

ॲडि०:—कोणत्या रीतीनें ?

सॉक्रे०:—जे लोक सध्यां तत्वज्ञानाचा अभ्यास करतात, ते पोरवयांतून नुकतेच बाहेर पडलेले असे तरुण असतात व
Steph 498 ते घरकाम आणि धंदा सांभाळून फावल्या वेळांतच अभ्यास करतात. अत्यंत कठीण असा जो अभ्यासांतील भाग म्हणजे ब्रह्मविद्या, * ( Dialectic ) त्याच्यामध्यें थोडेंसें लक्ष घालून ते लगेच अभ्यास सोडून देतात आणि ह्या लोकानांच, पुष्कळ ज्ञान असलेले मोठे तत्वज्ञानी म्हणून समजण्यांत येतें. ज्या लोकांचें तत्वज्ञानांतच पूर्ण लक्ष असतें, अशा लोकांचें व्याख्यान

* Dialectic—ज्या विद्येपासून आपणांस इंद्रियगम्य विषयांपासून तों अतींद्रिय विषयापर्यंत ज्ञान होतें; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष ब्रह्म किंवा सच्चिदानंदाचें दर्शन होतें, अशी विद्या. प्रश्नोत्तररूपी वादविवाद पद्धतीनें सत्यज्ञान करून देणारी ही विद्या होय.

ऐकण्यास ह्यांना बोलावण्यांत आलें असतां, व्याख्यानास येणें म्हणजे त्यांना मोठा कमीपणा वाटतो. कारण त्यांची अशी समजूत असते कीं, तत्वज्ञान हा दुय्यम धंदा म्हणूनच करण्यांत यावा. हे अर्धवट तत्वज्ञानी लोक, वृद्धावस्था आली म्हणजे हिराक्लीटस्च्या सूर्यापेक्षांही पूर्णपणें मावळून जातात. कारण त्या सूर्याप्रमाणें ह्यांच्यांत पुन्हां प्रकाशमान् होण्याची शक्यता नसते.

ॲडि०: —तर मग, कोणती योजना योग्य आहे ती सांगा?

सॉक्रे०:—ह्याच्या अगदीं विरुद्ध असलेली. तारुण्यांत व पोरवयांत ह्या लोकांना त्यांच्या वयाला योग्य असें तत्वज्ञानाचें शिक्षण द्यावें आणि शरीराचा तारुण्यांत विकास होत असतांना, त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यांत यावें; कारण तत्वज्ञानाला शरीरविकासाचा फार चांगला उपयोग होतो. ह्या काळाच्या सुमारास मनाची पक्वता होण्यास आरंभ होतो, म्हणून मानसिक श्रम जास्त कठीण असे द्यावयास पाहिजेत. शेवटीं शारीरिक शक्ती मंदावल्यावर आणि सार्वजनिक व लष्करी कामांतून निवृत्त झाल्यावर, केवळ तत्वज्ञानाच्या व्यासंगास त्यांनीं वाहून घेतलें पाहिजे. कारण इहलोकीं जर सुखानें आयुष्य काढावयाचें असेल व मृत्यूनंतर येथील आयुष्याप्रमाणें परलोकींही सुदैवी आयुष्य मिळवावयाचें असेल, तर असेंच त्यांनीं केलें पाहिजे.

ॲडि०:—सॉक्रेटिस, मी तुमच्या उत्साहाबद्दल शंका घेत नाहीं. पण थ्रॅसिमाकसादि पुष्कळ श्रोते तुम्हांला अधिक उत्साहानें विरोध करून, आपली स्पष्ट नापसंती दाखवितील अशी माझी कल्पना आहे.

सॉक्रे०: —आतांच मी व थ्रॅसिमाकस मित्र झालों आहोंत, म्हणून त्याचा व माझा तंटा लावून देऊं नका! तो व मी शत्रू होतों, असें माझें म्हणणें नाहीं. माझ्या मताप्रमाणें त्याचें व इतरांचें मन वळविल्याशिवाय अथवा पुढील जन्मामध्यें त्यांना अशा तऱ्हेचे वादविवाद

करण्याची संधी आली असतां, ह्या चर्चेचा फायदा होईल असें केल्याशिवाय, मी स्वस्थ रहाणार नाहीं.

ॲडि०:—फारच थोडी मुदत दिली म्हणावयाची!

सॉक्रे०:—सर्व काळाच्या दृष्टीनें ही मुदत खरोखर कांहींच नाहीं! पुष्कळ लोक माझ्या मतांवर विश्वास ठेवीत नाहींत, म्हणून आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण आपली प्रस्तुत कल्पना मूर्त स्वरूपांत त्यांनीं पाहिलेली नाहीं. त्यांच्यापुढें

Steph 499

आपल्या कल्पनेसारख्या इतर कल्पना मांडल्या गेल्या असतील, पण ज्याप्रमाणें आपल्या कल्पनेंत स्वाभाविक एकत्व दिसून येतें, तसें त्या कल्पनांत नसेल. स्वतःप्रमाणें परिपूर्ण असलेल्या राज्यामध्यें राज्य करणारा व शब्दांनीं व कृतींनीं सद्गुणी असणारा, असा मनुष्य त्यांनीं एक तरी पाहिला असेल काय?

ॲडि०:—खरोखर पाहिला नसेल.

सॉक्रे०:—केवल ज्ञानाच्या लालसेनें सत्याच्या संशोधनाकरितां, उच्च व उदात्त पद्धतीनें केलेले वादविवाद, त्यांनीं थोडेच वेळां ऐकले असतील. अशा तऱ्हेचे वादविवाद, खासगी चर्चेमध्यें अथवा सार्वजनिक सामन्यांमध्यें, केवळ वाद वाढवावयाचा व शाबासकी मिळवावयाची अशा हेतूनें केलेल्या कोटिक्रमांच्या वादाच्या पद्धतीपासून, दूरच राखले जातात.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—ज्यांना सध्यां भ्रष्ट नव्हे पण कुचकामाचे असें म्हटलें जातें, अशा थोड्या तत्वज्ञानी लोकांना, त्यांची खुषी असो वा नसो, जोंपर्यंत राज्यकारभाराची जबाबदारी घ्यावयास भाग पाडलें जाणार नाहीं व राज्यालाहि त्यांच्याशीं आज्ञाधारकपणानें वागावें असें वाटणार नाहीं, अथवा हल्लीं असलेले सार्वभौम राजे अथवा त्यांचे पुत्र, ह्यांच्या-

मराठी ... सं. ... नं.

मध्यें खऱ्या तत्वज्ञानाची खरी भक्ती दैवयोगानें जोंपर्यंत उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंत कोणतीही राज्यघटना अथवा व्यक्ति पूर्णत्व पावणार नाहीं, असें मी पूर्वी एका प्रसंगीं संशय व भीति वाटत असूनहि सत्याच्या आवेशानें स्पष्ट म्हटलें आहे. ह्या दोहोंपैकीं एकाचीही शक्यता नाहीं, असें म्हणणें मला असंमजसपणाचें वाटतें. जर तीं दोन्हीं अशक्य असतील, तर आपण काल्पनिक उपपत्त्या प्रतिपादन करणारे, म्हणून हेटाळलें जाणें योग्यच होईल. माझें म्हणणें बरोबर आहे ना ?

ॲडि०:—होय. बरोबर आहे.

सॉक्रे०:—तत्वज्ञानांत ज्यांनीं पहिल्या प्रतीचें प्रावीण्य संपादन केलें आहे, त्यांनीं जर पुष्कळ काळामागें राज्यकारभाराचें काम केलें आहे, अथवा आपल्या दृष्टिपथाच्या पुष्कळ पलीकडील अशा परकी देशांत, असे लोक सध्यां अथवा पुढें राज्यकारभाराचें काम सक्तीनें करीत आहेत अथवा करणार आहेत, असें जर दाखविण्यांत आलें, तर अशी राज्यघटना अस्तित्वांत होती, आहे व असणार, असें सिद्ध करण्याकरितां मी मरेपर्यंत वादविवाद करण्यास तयार आहे! कारण तत्त्वज्ञानदेवता हीच अशा राज्याची स्वामिनी असते. माझ्या मतें, आपल्या कल्पनांची मूर्तावस्था अशक्य नाहीं व आपले विचारही अव्यवहार्य नाहींत. अर्थात् त्यांतील अडचणी आपण सुद्धां कबूल करतों.

ॲडि०:—माझें सुद्धां असेंच मत आहे.

सॉक्रे०: – पण बहुजनसमाचें मत निराळें आहे, असें म्हणावयास तुम्हीं तयार आहां काय ?

ॲडि०:—कदाचित् तसें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—माझ्या चांगल्या मित्रा, बहुजनसमाजावर केवढा आरोप तुम्हीं करीत आहांत! वादाची भाषा टाकून देऊन व तत्वज्ञानी कोणाला म्हणावें, त्यांचा स्वभाव व शिक्षण कशा प्रकारचें असतें,

ह्यांविषयीं शांतपणानें माहिती सांगून, तुम्हीं बहुजनसमाजाचा ज्ञानाविषयीं असलेला दुष्ट पूर्वग्रह काढून टाकण्याचा प्रयत्न कराल, तर खात्रीनेंच लोकांचीं मतें बदलतील व त्यांच्या डोळयापुढें जे स्वभाव हल्लीं उभे राहतात, ते तुम्हीं सांगितलेल्या
Steph 500 माहितीप्रमाणें, तत्वज्ञानी स्वभावाचे आदर्श नव्हेत, एवढें त्यांना समजून येईल. तुमच्या सांगण्याप्रमाणें जरी त्यांनीं तत्वज्ञानी लोकांचें निरीक्षण केलें, तरी सुद्धां तुमच्यापेक्षां त्यांचें निराळेंच मत होऊन ते निराळेंच उत्तर देतील, असें म्हणण्याचें तुम्हीं धाडस करतां काय? दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, तुम्हांला असें वाटतें काय कीं, जो स्वतः निर्मत्सरी व सभ्य मनुष्य आहे, तो भांडखोर नसलेल्या मनुष्याबरोबर भांडेल अथवा निर्मत्सरी मनुष्याचा मत्सर करील? अशा तऱ्हेचा दुष्ट, हट्टी स्वभाव फारच थोड्या लोकांमध्यें आढळेल, पण एकंदर बहुजनसमाजांत आढळणार नाहीं, असेंच तुमचेंही मत तुम्हीं सांगाल असें मला वाटतें.

ॲडि०:—माझें मत सर्वस्वीं तुमच्याप्रमाणेंच आहे.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें झिंगलेले लोक, त्यांचा कांहीं एक संबंध नसतां कुठेंतरी आपण होऊन घुसतात, एकमेकांना शिवीगाळ करतात आणि भांडणें उकरून काढण्यांत आनंद मानून नेहमीं लोकांची निंदा करीत बसतात, त्याप्रमाणें तत्वज्ञानाच्या व्यासंगास अयोग्य असलेले लोक वागतात. अशा लोकांच्या वर्तनामुळें, तत्वज्ञानाविषयीं वाईट ग्रह उत्पन्न होतो व तो बहुजनसमाजांत पसरतो, असें मला वाटतें. तुमचें मत असेंच आहे ना?

ॲडि०:—होय.

सॉक्रे:०—ॲडिमेन्टस्, ज्याचे विचार वस्तूंच्या खऱ्या स्वरूपाविषयीं चालू असतात, त्याला मनुष्यांच्या व्यवहारांकडे लक्ष देण्यास व त्यांच्याबरोबर वादविवाद करून, मत्सर व वैर ह्या भावनांनीं दूषित

होण्यास खरोखर वेळच मिळत नसतो. आपला सर्व वेळ सुव्यवस्थित व अविकारी अशा कांहीं विशिष्ट वस्तूंबद्दल विचार करण्याकडे तो खर्च करतो. ह्या वस्तु कधीं अपाय करीत नाहींत अथवा अपाय केल्या जात नाहींत. ह्या वस्तूंची बुद्धीशीं एकतानता व सुव्यवस्थेशीं आज्ञाधारकपणा बघून, तो आपलें आयुष्य त्यांच्याप्रमाणें घालविण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्या गोष्टीविषयीं मनुष्याला आदराची भावना आहे, तिचें अनुकरण करण्याचें टाळणें शक्य आहे, असें तुम्हांला वाटतें काय ?

ॲडि०:—नाहीं. हें अशक्यच आहे.

सॉक्रे०:—दैवी व सुव्यवस्थित जें आहे, त्याच्याशीं सहवास ठेवून, तत्वज्ञानी मनुष्य, मनुष्यप्राण्याला शक्य आहे तितक्या प्रमाणांत सुव्यवस्थित व दैवी होतो. अर्थात् ह्या बाबतींत, इतरांप्रमाणें त्याच्याकडून चूक होणें शक्य आहे.

ॲडि:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—ज्या गोष्टी तत्वज्ञानी माणसाचें लक्ष उच्च वातावरणाकडे वळवतात, त्या गोष्टी लोकांच्या खासगी व सार्वजनिक आयुष्यामध्यें कशा प्रविष्ट कराव्या व आपलें व लोकांचें आयुष्य कसें सुधारावें, ह्याविषयीं त्याला योजना करावयास लावलें, तर तुम्हांला असें वाटतें काय कीं, नेमस्तपणा, न्याय व सर्व सार्वजनिक सद्गुण, ह्यांची निर्मिति करण्यांत तो निष्काळजी चित्रकाराप्रमाणें वागेल ?

ॲडि०: – खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—जर लोकसमाजाला असें पटवून दिलें कीं, आपलें वर्णन बरोबर आहे, तर त्यांना तत्वज्ञानी लोकांचा राग येईल काय ? अस्सल दैवी आदर्शाची नक्कल करणारे तत्वज्ञानी–चित्रकार, हे राज्यघटना करणारे असल्याशिवाय राज्याला खरें सुख लाभणार नाहीं, असें आपण म्हटलें तर त्यावर ते विश्वास ठेवणार नाहींत काय ?

Steph 501 ॲडि०:—त्यांना असें समजून दिल्यावर ते रागावणार नाहींत. पण हे तत्वज्ञानी, चित्र कसें रेखाटणार तें तुम्हीं सांगाल काय?

सॉक्रे०:—राज्य व मानवी प्राण्याचा नैतिक स्वभाव, ह्यांना चित्रफलक समजून, तो अगोदर स्वच्छ करून घेण्यास ते आरंभ करतील. हें काम कांहीं सोपें नाहीं. तथापि तुम्हांला माहीतच आहे कीं, इतर कलावंतांच्या व ह्यांच्या व्यवहारांमध्यें प्रथमतः हाच फरक दिसून येईल कीं, स्वच्छ फलक मिळेपर्यंत अथवा स्वतःच्या प्रयत्नांनीं तो करून घेईपर्यंत, मनुष्य अथवा शहर ह्यांच्या व्यवहारांमध्यें ते ढवळाढवळ करणार नाहींत अथवा कायदे करण्यास तयार होणार नाहींत.

ॲडि०:—हें त्यांचें करणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—त्यानंतर त्यांना आवडणाऱ्या राज्यघटनेची रूपरेषा, ते रेखाटणार नाहींत काय?

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—नंतर ही रूपरेषा भरून काढण्याचें ते काम करतील. हें करतांना ते आपले डोळे ह्या बाजूला व त्या बाजूला वळवतील. न्याय, सौंदर्य, नेमस्तपणा व इतर गुण, ह्यांच्या आदर्श प्रकारांकडे प्रथम बघतील व तद्विषयक मानवी प्राण्यांच्या प्रचलित कल्पना बघतील. अशा तऱ्हेनें त्यांच्या अभ्यासाचे निष्कर्ष एकत्रित करून व मिसळून, मानवी शरीरांत उतरविण्याचा ते प्रयत्न करतील. होमर कवीनें ज्यांना देवतुल्य व दैवी समजलें आहे, अशा मानवांचीं उदाहरणें, त्यांना ह्या कामीं उपयोगी पडतील.

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि मला वाटतें, कोठें थोडेसें पुसून व कोठें पुनः रंग भरून, ते मनुष्यांचा नैतिक स्वभाव, देवांनाही संतोष वाटेल इतका चांगला करून दाखवतील.

ॲडि०:—त्यांचें चित्र फारच सुंदर होईल.

सॉक्रे०:—तुमच्या म्हणण्याप्रमाणें, जे लोक आपल्यावर जोरानें हल्ला करीत होते, त्यांचें मन वळविण्याच्या प्रयत्नांत आपण प्रगति केली असें वाटतें ना? ज्या चित्रकाराची आपण स्तुति केली व ज्या मनुष्याच्या हातांत आपलीं शहरें दिलीं म्हणून लोकांना राग आला, तोच चित्रकार अशा राज्यघटनांचीं चित्रें काढणारा होय, असें सांगितलें तर त्यांना आतां थोडासा कमी राग येईल ना?

ॲडि०:—जर ते शहाणे असतील तर त्यांना फारच थोडा राग येईल.

सॉक्रे०:—मला सुद्धां असेंच वाटतें. कारण त्यांना आक्षेप असा काय घेतां येणार? तत्वज्ञानी लोकांना खऱ्या अस्तित्वाचें व सत्याचें प्रेम असतें, हें त्यांना नाकारतां येईल काय?

ॲडि०:—असें करणें हास्यास्पद होईल.

सॉक्रे०:—ठीक. आपण वर्णन केल्याप्रमाणें असलेला तत्वज्ञानी लोकांचा स्वभाव पूर्णावस्थेशीं संलग्न नाहीं, असें त्यांना म्हणतां येईल काय?

ॲडि०:—असें म्हणतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—शिवाय, असा स्वभाव योग्य अभ्यासक्रमाचे कक्षेंत जरी ठेवला, तरी तो पूर्णपणें चांगला व तात्विक बनणार नाहीं, असें ते म्हणतील काय? अथवा ज्या लोकांना आपण त्याज्य ठरवलें, त्यांनाच ते पसंत करतील काय?

ॲडि०:—अर्थात्च नाहीं.

सॉक्रे०:—तत्वज्ञानी लोकांना जोंपर्यंत राज्यामध्यें श्रेष्ठ अधिकार दिले जाणार नाहींत, तोंपर्यंत अशा राज्याची व त्यांतील शहरवासीयांची वाईटापासून मुक्तता होणार नाहीं आणि जी काल्पनिक राज्यघटना आपण वर्णन करीत आहोंत, ती कधींहीं मूर्तस्वरूपांत यावयाची नाहीं, असें मी म्हटलें तर त्यांना अजूनही राग येईल काय?

ॲडि०:—कदाचित् त्यांना कमी राग येईल.

Steph 502 सॉक्रे०:—ते कमी रागावतील, एवढेंच नव्हे, तर त्यांचें पूर्ण समाधान व सांत्वन होईल, असें गृहीत धरावयास तुमची काय हरकत आहे ? अशा रीतीनें आपण त्यांना लाजवून, आपल्या म्हणण्यास मान्यता द्यावयास लावूं.

ॲडि०:—खुशाल असें गृहीत धरा.

सॉक्रे०:—ठीक आहे. ह्या लोकांची खात्री करून दिली, असें आपण धरून चालूं या. राजे व सार्वभौम राजे ह्यांना तत्वज्ञानी स्वभावाची देणगी असलेले पुत्र होणें शक्यच नाहीं, असें कोणी म्हणेल काय ?

ॲडि०:—जगामध्यें एकही मनुष्य असें म्हणणारा निघणार नाहीं.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेचा जरी जन्मजात स्वभाव असला, तरी पुढें निखालस ते भ्रष्ट होतील, असें कोणी म्हणेल काय ? मी हें कबूल करतों कीं, अशा स्वभावाचें संरक्षण करणें कठीण आहे. पण मी विचारतों, काळाच्या ओघामधून अशा स्वभावाच्या पुत्रांपैकीं, एक सुद्धां भ्रष्टतेपासून संरक्षिला जाणार नाहीं, असें म्हणणारा कोणी असेल काय ?

ॲडि:०—असें कोण म्हणेल ?

सॉक्रे०:—अशा मनुष्याच्या अधिकाराखालीं, नम्र स्वभावाचें एखादें राज्य असलें, तर ज्या गोष्टी आतां अविश्वसनीय वाटतात, त्या शक्य करून तो दाखवूं शकेल.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—कारण, आपण विस्तारानें वर्णन केलेले कायदे व चालीरीति, जर राज्यकर्ता प्रस्थापील, तर शहरवासीयांना त्या पाळणें अशक्य होणार नाहीं.

ॲडि०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—आपण जें योग्य म्हणतों, तें दुसऱ्यांनाही योग्य वाटेल असें होणें, शक्यतेच्या बाहेरचें व चमत्कारिक आहे काय ?

ॲडि०:—माझ्या मतें, असें होणें चमत्कारिक नव्हे.

सॉक्रे०:—पण मला वाटतें, आतांपर्यंत झालेल्या वादविवादापासून आपण आपली खात्री करून घेतली कीं, आपली योजना जर शक्य असली तर सर्वोत्तम आहे.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—आपल्या कायद्याच्या प्रयत्नासंबंधीं आपण पुढील निष्कर्ष काढला. आपण जें म्हणतों, तें मूर्तस्वरूपांत येणें शक्य असेल तर अत्युत्तम आहे. तें मूर्तस्वरूपांत आणणें, कठीण आहे पण अशक्य मात्र खास नाहीं.

ॲडि०:—आपला हाच निष्कर्ष होय.

सॉक्रे०:—ह्या विषयाचा हा भाग आपण परिश्रमपूर्वक पूर्ण केला. आतां कोणत्या पद्धतीनें, कोणत्या अभ्यासांनीं व व्यासंगांनीं, आपल्या राज्यपद्धतीचें संरक्षण करणारा वर्ग तयार करतां येईल व हे अभ्यास निरनिराळ्या वयांत सुरू करावे—ह्या प्रश्नांचा विचार आपण करावा ना ?

ॲडि०:—होय. निःसंशय करावा.

सॉक्रे०:—स्त्रियांची मालकी, मुलांचें उत्पादन व अधिकारी लोकांच्या नेमणुकी, ह्यासंबंधीं जे कठीण प्रश्न उपस्थित झाले होते, ते गाळण्यानें मला कांहींच फायदा झाला नाहीं. ह्यांविषयीं अत्यंत पूर्ण अशी पद्धत अंमलांत आणणें, फार कठीण जाईल व तिजविषयीं लोकमतही फार विरुद्ध होईल, ह्या भीतीनें मी ते प्रश्न सोडून दिले होते. मी सावधगिरी कितीही बाळगली, तरी आतां अशी वेळ

Steph 503 आली आहे कीं, हे प्रश्न सोडविलेच पाहिजेत. स्त्रिया व मुलें ह्यांजसंबंधीं आपण विचार केला आहे, हें खरें.

पण अधिकाऱ्यांच्या नेमणुकीसंबंधीं पुन्हां नवीनच चर्चा सुरू केली पाहिजे. अधिकाऱ्यांचें वर्णन करतांना आपण असें म्हटल्याचें तुम्हांला आठवत असेल कीं, त्यांची देशभक्ति संशयातीत असण्याकरितां, सुख व दुःख ह्यांच्या प्रसंगांतून त्यांची परीक्षा घेतली पाहिजे. सहनशक्तीनें जर दगा दिला, तर आपली सत्ता जाईल ह्या धाकानें, श्रम, संकटें आणि दैवाचे विचित्र विलास, ह्यांच्या वातावरणांत असतांही आपलीं तत्वें ते सोडणार नाहींत, असें आपल्या अनुभवास आलें पाहिजे. ह्या दिव्यांतून, अग्नींतून जसें सोनें शुद्ध होऊन बाहेर येतें, त्याप्रमाणें दोषरहित जर ते बाहेर आले, तरच अधिकाराच्या जागेवर त्यांची नेमणूक करावयाची व ते जिवंत आहेत तोंपर्यंत व मेल्यानंतरही, त्यांना हक्क व देणग्या मिळावयाच्या; अशा तऱ्हेचा आपल्या विचारांचा अभिप्राय होता. पण हा प्रश्न उपस्थित करण्याची भीति वाटत असल्या-मुळें, तो बाजूला राहून लपला होता.

ॲडि०:—तुमचें वर्णन बरोबर आहे व मला पूर्णपणें असें स्मरतेंही.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, त्यावेळेस माझीं मतें उघडपणें मांडण्यास मी कचरलों होतों. पण पुढील विधान मी आतां करतोंच ! अत्यंत पूर्ण अशा तत्वज्ञानी लोकांनाच आपण संरक्षक केलें पाहिजे.

ॲडि०:—ठीक आहे.

सॉक्रे०:—तुम्हांला असे लोक फारच थोडे आढळतील. कारण तत्वज्ञानी स्वभावाचे जे निरनिराळे आवश्यक गुण म्हणून आपण सांगितले, ते एके ठिकाणीं सांपडणें कठीणच. पुष्कळ वेळां ते निर-निराळ्या लोकांत विखुरलेले दिसतील.

ॲडि०:—तुमचें म्हणणें समजलें नाहीं.

सॉक्रे०:—तुम्हांला माहीत आहे कीं, तीक्ष्ण ग्रहणशक्ति, चांगली स्मरणशक्ति, शहाणपणा, तीक्ष्ण बुद्धिमत्ता व इतर तत्सदृश गुण असलेले लोक, सहजगत्या उदार व उच्च मनाचे होत नाहींत व त्यांस नियमित,

शांत व स्थिर आयुष्य घालविण्यांत, आनंदही लगेच वाटावयास लागत नाहीं. ह्याच्या उलट, असे लोक तीक्ष्ण बुद्धीमुळें इकडे तिकडे वाहवत जातात व स्थिर आयुष्य गमावून बसतात.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तसेंच, जे लोक स्थिर स्वभावाचे असल्यामुळें, त्यांना आपणांला विश्वासानें काम द्यावें असें वाटतें व जे युद्धामध्यें डगमगत नाहींत, ते अभ्यासामध्येंही धिम्मे असतात. म्हणजे असें कीं, ते मंद व मूर्ख असतात व मानसिक श्रम त्यांना करावयाचे असताना, ते वारंवार डुलक्या घेतात व जांभया देतात.

ॲडि०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—पण आपण असें ठरविलें कीं, मनुष्यामध्यें हे दोन्ही तऱ्हेचे गुण बऱ्याच अंशीं असल्याशिवाय, त्याला उत्तम शिक्षण, मान व अधिकाराची जागा देतां कामा नये.

ॲडि०:—आपलें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०—पण अशा स्वभावाचे लोक थोडेच असणार ना ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—म्हणून श्रम, संकटें व सुखें ह्यांच्या प्रसंगांतूनच केवळ, त्यांचें वर्तन परीक्षून घेण्यांत आपण समाधान मानतां कामा नये. त्यावेळेस आपण जे मार्ग गाळले, त्या मार्गांनीं परीक्षा
Steph केली पाहिजे. त्यांना निरनिराळे विषय अभ्यासावयास
504 लावून, त्यांची बुद्धि उच्च विषयांचें अध्ययन करण्यास समर्थ आहे किंवा नाहीं, अथवा अशा परीक्षेमध्यें इतर लोक जशी माघार घेतात, त्याप्रमाणें हे माघार घेतात किंवा नाहीं, हें आपण बघितलें पाहिजे.

ॲडि०:—अशा तऱ्हेनें त्यांची परीक्षा घेणें योग्यच आहे. पण उच्च विषय तुम्ही कोणते म्हणतां ?

सॉक्रे०:--आत्म्याचे आपण तीन विभाग कल्पिले व त्यांतून न्याय, नेमस्तपणा, धैर्य व शहाणपणा हे स्वभाव शोधून काढले. हें तुम्हांला आठवतें ना ?

ॲडि०:– जर मला इतकेंही आठवलें नाहीं, तर पुढील विवेचन ऐकण्याची माझी योग्यताच नाहीं, असें समजावें.

सॉक्रे०:—हे स्वभाव शोधून काढण्यापूर्वी, आपण काय म्हटलें होतें तें तुम्हांला आठवतें काय ?

ॲडि०:—तें काय ?

सॉक्रे०:—आपण असें म्हटलें कीं, प्रश्नाचा सर्वोत्कृष्ट विचार करावयाचा असल्यास आपण निराळा व लांबचा असा मार्ग स्वीकारला पाहिजे. त्यामुळें आपल्याला विषयाची पूर्ण दृष्टि मिळते. तथापि आपण पूर्वी काढलेल्या निष्कर्षावरून हा प्रश्न सोडवितां येणें शक्य आहे, असेंही आपण म्हटलें. ह्यावर तुम्ही म्हणालां कीं, अशा रीतीनें प्रश्न सोडविला तरी सुद्धां तुमचें समाधान होईल व त्यानंतर आपण वर्णन केलेली चर्चा सुरू झाली. माझ्या मतें ती अपूर्ण होती, पण तुम्हांला समाधानकारक वाटली काय ?

ॲडि०:—माझें स्वत:चें मत विचाराल, तर ती चर्चा प्रमाणशीर होती आणि इतर लोकांचेंही हेंच मत आहे.

सॉक्रे०:—पण माझ्या मित्रा, सत्य गाठूं न शकणारें प्रमाण, केव्हांही योग्य म्हणतां येणार नाहीं. कारण जें अपूर्ण आहे, तें कोणत्याही गोष्टीचें प्रमाण असूं शकत नाहीं. लोकांना मात्र कांहीं वेळां वाटतें कीं, झालें हें विवेचन पुष्कळ आहे आणि अधिक चर्चा करण्याची जरूर नाहीं.

ॲडि०:—होय. ही सर्वसाधारण संवय असून आळशीपणापासून तिचा जन्म होतो.

सॉक्रे०:—होय. पण राज्याचे व त्यांतील कायद्याचे जे संरक्षक आहेत, त्यांना ही संवय असणें अत्यंत दूषणीय आहे.

ॲडि०—होय. मलाही असें वाटतें.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, असें जर आहे तर, संरक्षकानें लांबच्या मार्गानें गेलें पाहिजे आणि शारीरिक व्यायामाप्रमाणें बौद्धिक अभ्यासही मनापासून केले पाहिजेत. नाहींतर आपण आतांच म्हटल्याप्रमाणें उच्च दर्जाच्या शास्त्राचें ध्येय त्याला गांठतां यावयाचें नाहीं. कारण हें शास्त्र त्याच्याकडूनच अभ्यासिलें जावयाचें असतें.

ॲडि०:—काय ? आपण म्हटलीं तीं सर्वांत श्रेष्ठ शास्त्रें नव्हेत काय ? न्यायादि विषय जे आपण चर्चिले, त्यापेक्षां अधिक उच्च दर्जाचें कांहीं आहे काय ?

सॉक्रे०:—खात्रीनेंच आहे. आपण आतांपर्यंत नुसती रूपरेषा काढून भागवीत होतों. पण आतां अत्यंत पूर्ण असें विवेचन केल्या-शिवाय, आपण समाधान मानतां कामा नये. क्षुद्र महत्वाच्या विषयांवर अत्यंत परिश्रम करून, निर्दोष अशा पूर्णावस्थेपर्यंत त्यांचें विवेचन करावयाचें; पण सर्वांत अत्यंत उच्च दर्जाचे जे विषय, त्यांचें त्यांच्या महत्वाप्रमाणें अत्यंत स्पष्ट व पूर्ण संशोधन करावयाचें नाहीं, हें हास्यास्पद नव्हें काय ?

ॲडि०:—ही तुमची भावना अत्यंत न्याय्य आहे. परंतु तुम्ही जें शास्त्र अत्यंत श्रेष्ठ म्हणून म्हणतां, तें कोणतें व कशाबद्दल आहे, हें सांगितल्याशिवाय तुम्हांला कोणी सोडील काय ?

सॉक्रे०:—अर्थातच नाहीं. म्हणून तुम्हीच प्रश्न विचारा. पुष्कळ वेळां ह्याचें उत्तर तुम्ही खात्रीनेंच ऐकलें आहे. पण ह्यावेळेस एक तर तुम्ही विसरलां असाल किंवा आक्षेप घेऊन उत्तर देण्याचें
Steph 505 काम माझ्यावर सोंपवीत असाल. दुसरेंच खरें असेल असें मी समजतों. तुम्हांला असें वारंवार सांगण्यांत आलें

असेल कीं, शास्त्राचा अत्यंत उच्च विषय म्हणजे सत्पणाची कल्पना. ह्या कल्पनेंतील तत्वाच्या सहाय्यानेंच, न्याय व इतर सर्व निर्मित वस्तु उपयुक्त व फायदेशीर होतात. ह्या वेळेस हें तत्व प्रतिपादून, ह्या तत्वाशीं आपला पूर्ण परिचय झालेला नाहीं, असेंही मी म्हणणार आहे, हें तुम्हांला माहीतच आहे. हें तत्व आपणांस माहीत झाल्याशिवाय, इतर कोणतेंही ज्ञान संपादन केलें असलें तरी कांहीं फायदा होणार नाहीं; कारण सत्ची प्राप्ति झाली असल्याशिवाय, इतर कांहींही मिळालें तरी त्यापासून फायदा नसतो. सर्व मिळण्यासारख्या वस्तु मिळून, फक्त चांगल्या वस्तु मिळाल्या नाहींत तर त्यांपासून फायदा होईल, असें तुम्हांला वाटतें काय? अथवा सत् व सौंदर्य ह्यांचें ज्ञान झाल्याशिवाय, आपणाला कोणताही विषय पूर्ण समजेल काय?

ॲडि०:—मला तर शक्य वाटत नाहीं.

सॉक्रे०:—शिवाय बहुजनसमाजाला मुख्य चांगली गोष्ट म्हणजे सुख असें वाटतें व शहाण्या लोकांना ज्ञान वाटतें, हें तुम्हाला माहीत आहे.

ॲडि०:—अर्थातच मला माहीत आहे.

सॉक्रे०:—दुसऱ्या प्रकारच्या मताच्या लोकांना, ज्ञान म्हणजे काय हें सांगतां येत नाहीं आणि शेवटीं त्यांना एवढेंच म्हणणें भाग पडतें कीं, ज्ञान म्हणजे सत्चें ज्ञान.

ॲडि०:— होय. अशा तऱ्हेनें त्यांची हास्यास्पद स्थिति होते.

सॉक्रे०:—खरोखरच त्यांची अशी स्थिति होते. कारण जें सत् आहे त्याविषयींच्या तुमच्या अज्ञानाची ते निर्भर्त्सना करतात, पण लगेच ते तुमच्याजवळ अशा तऱ्हेनें बोलतात कीं, तुम्हांला तें काय आहे हें जसें कांहीं माहीतच आहे. ते सांगतात कीं, मुख्य सत् म्हणजे सत्विषयीं ज्ञान असणें. ते असें गृहीत धरतात कीं, ‘सत्’ही संज्ञा उच्चारल्याबरोबर, तुम्हांला ती समजलीच असली पाहिजे!

ॲडि०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:–आणि सत् म्हणजे सुख, अशी जे लोक व्याख्या करतात, त्यांचीही अशाच प्रकारें चूक होत नाहीं काय? कारण चांगल्या तऱ्हेच्या व वाईट तऱ्हेच्या सुखांचें अस्तित्व, त्यांना कबूल करावें लागतें.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—ह्यावरून असें निष्पन्न होतें कीं, एकच वस्तु चांगली व वाईट असें त्यांना कबूल करावें लागतें.

ॲडि०:— निःसंशय असेंच.

सॉक्रे०:—ह्यावरून असें ठरतें कीं, हा विषय अतिशय वाद-ग्रस्त आहे.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जें न्याय्य व सुंदर दिसतें पण खरोखर तसें नसतें, तें करावयास अथवा करतों आहों असें दाखवावयास अथवा तें आपणाजवळ आहे असें दाखविण्यास, जरी पुष्कळ लोक तयार होतील, तरी जेव्हां चांगल्या वस्तूंबद्दल प्रश्न येतो, तेव्हां जें निव्वळ चांगलें दिसतें तें मिळवून कोणासही समाधान वाटत नाहीं. उलट प्रत्येक जण सत्तत्वाकरितां धडपडत असतो व निदान सत्-तत्वाच्या बाबतींत, दिखाऊपणा सर्व लोकांकडून निंद्यच समजला जातो.

ॲडि०:—होय. हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—प्रत्येक आत्मा, हें सत्तत्व, आपल्या सर्व कृतींचें ध्येय म्हणून शोधत असतो. सत्तत्वाच्या अस्तित्वाची त्याला जाणीव असते, पण समाधानकारक रीतीनें त्याचें स्वरूप त्याला कळत
Steph 506 नसल्यामुळें तो गोंधळून जातो. इतर वस्तूंबद्दल जसा त्याला दृढविश्वास वाटतो, तसा ह्या तत्वाविषयीं त्याला वाटत नसल्यामुळें, त्या वस्तूंपासून होणारा फायदाही त्याला सोडावाच लागतो. म्हणून अशा अत्यंत महत्वाच्या विषया-

संबंधानें, ज्यांच्या हातांत सर्व राज्यकारभार द्यावयाचा आहे, अशा श्रेष्ठ लोकांनीं अज्ञानी असणें श्रेयस्कर आहे, असें आपण म्हणावें काय ?

ॲडि०:—मुळींच नाहीं.

सॉक्रे०:—कसेंही असो. न्याय्य व सुंदर वस्तु, सत् कशा प्रकारें होऊं शकतात, हें जर माहित नसेल, तर मला वाटतें, असा अज्ञानी मनुष्य, ह्या वस्तूंचा विशेष उपयुक्त असा संरक्षक होणार नाहीं. ज्याला सत्‌विषयीं ज्ञान नाहीं, तो न्याय व सौंदर्य चांगल्या प्रकारें जाणणार नाहीं, असा माझा तर्क आहे.

ॲडि०:—तुमचा तर्क बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग ह्या विषयासंबंधीं ज्यानें शास्त्रीय ज्ञान संपादन केलें आहे, अशा संरक्षकाच्या नेतृत्वाखालीं, आपल्या राज्यघटनेची योजना पूर्ण होणार नाहीं काय ?

ॲडि०:—निःसंशय होईल. पण सॉक्रेटिस, सततत्व म्हणजे शास्त्र किंवा सुख अथवा ह्या दोहोंहूनही भिन्न आहे काय ?

सॉक्रे०:—हो ! हो ! माझ्या मित्रा ! ह्या विषयावर इतर लोकांचीं जीं मतें आहेत तीं तुम्हांला पसंत पडणार नाहींत, हें मी पूर्वींच ओळखलें आहे.

ॲडि०:—सॉक्रेटिस ! ज्या मनुष्यानें ह्या प्रश्नांवर दीर्घ काळ विचार केला आहे, त्यानें फक्त दुसऱ्यांचीं मतें सांगावीं पण आपलीं मात्र त्याला सांगतां येऊं नयेत, हें खरोखरच मला दूषणीय वाटतें.

सॉक्रे०:—ज्या विषयांसंबंधीं आपणाला पूर्ण माहिती नाहीं, त्या विषयांवर आपणास जणूं कांहीं माहिती आहे अशा ऐटीनें बोलणें, हें तुम्ही योग्य समजतां काय ?

ॲडि०:— माहिती आहे अशा ऐटीनें बोलणें, अर्थातच चुकीचें होय. पण मला वाटतें, आपलें मत कसेंही असलें तरी स्पष्टपणें सांगण्यास तयार असणें योग्य होय.

सॉक्रे०:—पण शास्त्रापासून विभक्त असलेलीं मतें, वाईट समजलीं जाऊन तीं अंध असतात, हें तुम्हांला माहीत नाहीं काय? जे शुद्ध बुद्धीच्या मदतीशिवाय बरोबर मत बनवूं शकतात, ते सरळ मार्गानें चालणाऱ्या अंधांपेक्षां श्रेष्ठ असतात काय?

अॅडि०:—मुळींच श्रेष्ठ नसतात.

सॉक्रे०:—तर मग, तुम्हांला दुसऱ्या लोकांपासून तेजस्वी व सुंदर विषय शिकणें शक्य असतां, वाईट, अंध व वक्र, अशा विषयांवर विचार करीत बसणें आवडेल काय?

ग्लॅकॉन् मोठ्यानें म्हणाला, "सॉक्रेटिस! मी विनंति करतों कीं, तुम्ही वाद शेवटाला नेला असें समजून मागें घेऊं नका. ज्या पद्धतीनें तुम्ही न्याय, नेमस्तपणा व इतर विषय ह्यांची चर्चा केली, त्याच पद्धतीनें जरी मुख्य सत्‌ची चर्चा केली, तरी आम्हांला समाधान वाटेल.

सॉक्रे०:—होय, माझ्या मित्रा, आणि मलाही पूर्ण समाधान वाटेल. परंतु स्वतःच्या शक्तींवरच माझा विश्वास नाहीं व मला भीति वाटते कीं, माझा विचित्र उत्साह माझें हंसें करून सोडील. माझ्या सज्जन मित्रांनों, ह्यावेळेस तरी मुख्य सत्‌च्या स्वरूपाविषयींची चर्चा आपण बाजूला ठेवूं या. कारण मला वाटतें, ह्या विषयावर माझें जें सध्यां मत आहे, तें सुद्धां ह्या वेळेस प्रतिपादण्यास कठीण जाईल. परंतु तुमची ऐकण्याची इच्छा असेल, तर सत्‌तत्वाशीं अत्यंत सदृश असणारी, सत्‌तत्वाची शाखा मी वर्णन करतों. अर्थात् तुमची इच्छा नसल्यास मी वर्णन करीत नाहीं.

ग्लॅकॉन्०:—नाहीं, वर्णन कराच. शिवाय सत्‌चें स्वरूप सांगण्याचें कर्ज तुम्हांला द्यावें लागेलच.

सॉक्रे०:—मला मुख्य मुद्दलच तुम्हांला देतां येऊन, तुम्ही तें घ्यावें अशी माझी इच्छा आहे. त्यापासून मिळणाऱ्या व्याजावरच तुम्ही

Steph 507 संतुष्ट राहूं नये. तथापि मी आतां मुख्य सत्तत्वाचें फळ व अंकुरच देतों. ह्या फळाचें खोटें वर्णन मी तुमच्यावर लादणार नाहीं, एवढी काळजी तुम्ही घ्या.

ग्लॅ०:—आम्हांला शक्य असेल तेवढी काळजी आम्ही घेऊं. सुरवात करा.

सॉक्रे०:—मी करतों. परंतु पूर्वी केलेल्या विधानांची तुम्हांला आठवण करून देऊन आपलें एकमत अगोदर केलें पाहिजे.

ग्लॅ०:—कोणतीं विधानें ?

सॉक्रे०:—चर्चा करीत असतांना, आपण असें स्पष्ट म्हटलें कीं, सौंदर्य, सौजन्य इत्यादि गुणांनीं युक्त अशा वस्तूंची अनेकता आहे.

ग्लॅ०:—होय. असें म्हटलें आहे.

सॉक्रे०:—तसेंच, सौंदर्य व सत् ह्यांच्या निरुपाधिक कल्पनांचें अस्तित्व आपण मानून, ज्या वस्तूंना आपण अनेक असें संबोधतों, त्यांच्याविषयींही एक विशिष्ट निरुपाधिक कल्पना असते, असें आपण ठरविलें.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—आपण असेंही म्हणतों कीं, अनेकत्व हें डोळ्यांना दिसतें पण शुद्ध बुद्धीला दिसत नाहीं. वस्तुमात्रांतील एकत्व हें फक्त बुद्धीला पटतें, डोळ्यांना दिसत नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—दृश्य वस्तु आपण शरीराच्या कोणत्या भागानें बघतों ?

ग्लॅ०:—दृष्टीनें.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें कानानें आपण आवाज ऐकतों आणि इतर इंद्रियांनीं इंद्रियगम्य वस्तु जाणतों. हें खरें ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—बघण्याची व बघितलें जाणण्याची शक्ति, इंद्रियांच्या कारागिरानें किती अमर्याद खर्चानें उत्पन्न केली आहे, हें तुम्ही जाणलें आहे काय ?

ग्लॅ०:—बरोबर रीतीनें जाणलें नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. पुढील दृष्टीनें विचार करा. कान आणि आवाज ह्यांना जरूर लागणारी अशी कांहीं तिसरी वस्तु आहे काय कीं, जिच्यामुळें कानाला ऐकतां येतें व आवाज ऐकला जातो ? तसेंच, जिच्या अभावामुळें कान ऐकणार नाहींत व आवाज ऐकला जाणार नाहीं, अशी ती आहे काय ?

ग्लॅ०:—नाहीं. अशी तिसरी वस्तु नाहीं.

सॉक्रे०:—आणि मला वाटतें, इतर इंद्रियांपैकीं सुद्धां फारच थोड्यांना ह्या तिसऱ्या वस्तूची जरूर लागत असेल. अशी जरूर असणारें एक तरी इंद्रिय तुम्ही सांगाल काय ?

ग्लॅ०:—नाहीं. मला सांगतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—परंतु दृष्टि व दृश्य वस्तु, ह्यांच्या बाबतींत आणखी एका गोष्टीची जरूर असते, असें तुम्हांला दिसून येत नाहीं काय ?

ग्लॅ०:—मला तुमचें म्हणणें समजलें नाहीं.

सॉक्रे०:—डोळ्यांमध्यें दृष्टि आहे व दृष्टीचा मालक ती दृष्टि वापरण्याचा प्रयत्न करीत आहे आणि वस्तूंमध्यें रंग वसत आहे. पण ह्या विशिष्ट कामालाच वाहलेली अशी तिसरी गोष्ट हजर असल्याशिवाय, दृष्टीला कांहीं दिसणार नाहीं आणि रंग अदृश्यच राहतील, हें तुम्हांला माहीत आहे.

ग्लॅ०:—तिसरी गोष्ट कोणती, ती कृपा करून सांगा.

सॉक्रे०:—मी प्रकाशाला अनुलक्षून बोलतों आहे, हें उघडच आहे.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

Steph सॉक्रे०:—म्हणून असें दिसून येतें कीं, वरील सर्व
508 जोडयांमध्यें दृष्टीचें इंद्रिय आणि बघितलें जाण्याची शक्ति, ह्यांचा अत्यंत उदात्त अशा सांखळीनें सांधा जोडला जातो. त्या साखळींचें स्वरूप क्षुद्र नाहींच नाहीं. प्रकाशालाच तुम्ही क्षुद्र म्हणत असाल तर नाइलाज आहे !

ग्लॅ०:—नाहीं. क्षुद्रपणापासून प्रकाश फारच दूर आहे.

सॉक्रे०:—स्वर्गातील कोणत्या देवाला ह्या शुभ देणगीचा कर्ता व दाता असें तुम्ही म्हणाल ? कोणाचा प्रकाश तो आहे कीं, ज्यामुळें आपल्या दृष्टीला इतक्या चांगल्या तऱ्हेनें बघतां येतें आणि दृश्य वस्तु दिसूं शकतात ?

ग्लॅ०:—ह्या विषयावर एकच मत असूं शकेल. तुमच्या प्रश्नाचें उत्तर सूर्य.

सॉक्रे०:—तर मग, दृष्टि आणि ही देवता, ह्यांच्यामध्यें असलेला संबंध पुढील प्रकारचा आहे ना ?

ग्लॅ०:—त्याचें वर्णन कराल काय ?

सॉक्रे०:—दृष्टि स्वत: किंवा दृष्टीची जागा म्हणजे डोळा आणि सूर्य, हीं एकच आहेत असें म्हणतां येणार नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—तथापि मला वाटतें, सर्व इंद्रियांमध्यें सूर्याशीं फार सारखेपणा असणारें इंद्रिय म्हणजे डोळा हेंच होय.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—डोळयामध्यें असलेली शक्ति सूर्यापासूनच मिळालेली असल्यामुळें, ती बाह्य शक्ति नव्हे काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—सूर्य व दृष्टि हीं एकच नसलीं, तरी दृष्टीचें कारण सूर्य आहे व सूर्यामुळेंच दृष्टीला दिसतें, हें खरें नाहीं काय ?

ग्लॅ०:--खरें आहे.

सॉक्रे०:—सत्पासून संभव होऊन सत्शीं अतिशय साम्य असणारी जी मी शाखा म्हटली, ती सूर्यच होय. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, मुख्य सत् ज्याप्रमाणें बौद्धिक जगामध्यें शुद्ध बुद्धि आणि तिचे विषय, ह्यांच्याशीं संबंध ठेवतें, त्याप्रमाणें सूर्य, दृश्य जगामधील दृष्टि आणि तिच्या वस्तु ह्यांच्याशीं संबंध ठेवतो.

ग्लॅ०:—त्या संबंधाचें विस्तारानें वर्णन कराल काय?

सॉक्रे०:—दिवसाचा प्रकाश ज्यांवर रंग पसरत आहे, अशा वस्तूंवर मनुष्यानें पुष्कळ वेळ दृष्टि ठेवून शेवटीं चंद्र व तारका ह्यांनीं प्रकाशित केलेल्या वस्तूंवर दृष्टि फिरवली, म्हणजे त्याचे डोळे मंद होतात आणि जणूं कांहीं स्पष्ट दिसण्याची त्या डोळ्यांना शक्तीच नव्हती, असें होऊन ते जवळ जवळ अंधच होतात, हें तुम्हांला माहीत आहे ना?

ग्लॅ०:—मला पूर्ण माहीत आहे.

सॉक्रे०:—परंतु हाच मनुष्य, सूर्य प्रकाश पाडीत असलेल्या वस्तूंवर जेव्हां दृष्टि फेंकतो, तेव्हां हेच त्याचे डोळे स्पष्टपणें बघावयास लागतात व स्पष्ट दर्शन घेणारे होतात.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—अशाच तऱ्हेनें आत्म्याची स्थिति आहे अशी कल्पना करा. सत्य व खरें अस्तित्व, ह्यांनीं जी वस्तु प्रकाशित आहे, तिजवर आत्म्याचें लक्ष खिळलें, म्हणजे बुद्धीच्या जोरावर आत्मा ती वस्तु ग्रहण करतो व तिचें ज्ञानही संपादन करतो आणि अशा रीतीनें आत्मा बुद्धियुक्त आहे असें सिद्ध होतें. परंतु अंधःकारानें आच्छादित अशा जन्म व मृत्यु ह्यांच्या सृष्टीवर जेव्हां त्याचें लक्ष वेधतें, तेव्हां मताच्या अवस्थेंतच आत्मा स्थिर होतो, दृष्टि मंद होते, आत्म्याचीं मतेंही बदलत राहतात व त्याला कांहीं बुद्धि नाहीं असें समजण्यांत येतें.

ग्लॅ०:—होय. असें होतें.

सॉक्रे०:—जिच्यामुळें खऱ्या ज्ञानाचे जे विषय आहेत, त्यांना त्यांच्यांतील सत्य पुरवलें जातें व ज्याला हे विषय माहीत असतात त्याला ज्ञान करून घेण्याची बुद्धि मिळते, अशा शक्तीपासून शास्त्राचा उदय होतो व ज्ञानाच्या मार्गांत सत्याचा जो कांहीं भाग असतो, तोही ह्यामुळेंच संभवतो. ज्ञान व सत्य हीं
Steph दोन्हीं जरी सुंदर असलीं, तरी सत्‌तत्व हें त्यांच्या-
509 पासून भिन्न आहे व अधिक सुंदर आहे. ज्याप्रमाणें प्रकाश व दृष्टि, हीं सूर्यासारखी आहेत, हें म्हणणें जरी बरोबर असलें, तरी सूर्य व तीं एकच आहेत हें समजणें चुकीचें आहे; त्याप्रमाणें शास्त्र व सत्य, सत्‌शीं सदृश आहेत असें म्हणणें जरी बरोबर असलें, तरी हीं दोन्हीं सत्‌तत्वच होत, हें म्हणणें चुकीचें आहे. कारण सत्‌तत्वाचें ह्या दोहोंपेक्षां जास्त महत्वाचें स्थान आहे.

ग्लॅ०:—शास्त्र व सत्य ह्यांचा सत्‌तत्वापासून उगम असतो, एवढेंच नव्हे तर सौंदर्यांतही त्यांना सत्‌तत्व मागें सारतें. ह्यावरून त्याचें सौंदर्यही अनिर्वाच्य ठरतें. कारण सत्‌तत्व म्हणजे सुख, असें तुम्ही समजत नाहीं, असें मी धरून चालतों.

सॉक्रे०:—छे ! छे ! सुखासंबंधीं मी एक शब्द सुद्धां काढला नाहीं. पण मला वाटतें, हा दृष्टांत अधिक तपासावा हें बरें.

ग्लॅ०:—सांगा कसा तो ?

सॉक्रे०:—तुम्ही हें कबूल कराल कीं, सूर्य, दृश्य वस्तूंना बघितलें जाण्याची शक्ति देतो. इतकेंच नव्हे, तर त्यांना जीवनशक्ति, वाढ व पुष्टि सुद्धां देतो; पण सूर्य म्हणजे जीवनशक्ति नव्हे.

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच हें कबूल कराल कीं, सत्‌तत्वापासून ज्ञानाचे विषय ज्ञात होतात. इतकेंच नव्हे, तर त्यांना खरें अस्तित्वही दिलें

जातें. पण खरें अस्तित्व म्हणजे सत्‌तत्व नव्हे. कारण भव्यपणा व शक्ति, ह्या गुणांतही सत्‌तत्व अस्तित्वाहून श्रेष्ठ असतें.

ह्यावर ग्लॅकॉन् चेष्टेखोरपणानें म्हणाला, "ओहो! किती चमत्कारपूर्ण श्रेष्ठता!!"

सॉक्रे०:—ह्या विषयावरील माझीं मतें बोलण्यास तुम्ही मला भाग पाडतां, म्हणून ह्या चेष्टेलाही तुम्हीच जबाबदार आहां.

ग्लॅ०:—सूर्याची उपमा पूर्णपणें स्पष्ट केल्याशिवाय तुम्ही चर्चा बंद करूं नये, म्हणून मी विनंति करतों. इतर कांहीं गाळलें तरी चालेल.

सॉक्रे०:—खरें सांगावयाचें म्हणजे मी पुष्कळच गाळतों आहे.

ग्लॅ०:—तर मग, क्षुद्र महत्वाचेंही गाळूं नका.

सॉक्रे०:—मला वाटतें, मला पुष्कळच सोडून द्यावें लागेल. तथापि शक्यतोंवर जाणून बुजून मी कांहीं गाळणार नाहीं.

ग्लॅ०:—तुम्ही गाळूं नये, अशीच माझी विनंति आहे.

सॉक्रे०:—असें समजा कीं, दोन शक्ती अंमल गाजवीत आहेत—एकीचें क्षेत्र बौद्धिक विषय व दुसरीचें क्षेत्र दृश्य जग. हीं दोन्हीं प्रकारचीं क्षेत्रें, तुम्हांला माहीत आहेत ना?

ग्लॅ०:—आहेत.

सॉक्रे०:—एक रेषा आहे, अशी कल्पना करा. तिचे दोन भाग विषम तऱ्हेनें पाडा. त्यांतील एक भाग दृश्य वस्तु दर्शविणारा व दुसरा बौद्धिक गोष्टी दर्शविणारा असें समजा. हे दोन्ही भाग
Steph पुनः अशाच तऱ्हेनें दोन तुकड्यांनीं विभागा. नंतर
510 जर ह्या तुकडयांची लांबी, स्पष्टपणा अथवा अस्पष्टपणा दर्शविणारी अशी समजली, तर जो भाग दृश्य जग दाखविणारा म्हणून ठरला आहे, त्यांतील दोन तुकडयांपैकीं एक तुकडा सर्व प्रतिमा दर्शवील—प्रतिमा म्हणजे प्रथमतः छाया व नंतर

पाण्यामधील व घन, मऊ व तेजस्वी पदार्थांमधील प्रतिकृती होत. माझें म्हणणें तुम्हांला समजलें ना ?

ग्लॅ०:—होय समजलें.

सॉक्रे०:—दुसरा तुकडा, ह्या प्रतिमांच्या खऱ्या वस्तु दर्शविणारा, असें समजा. आपणाभोंवतीं असलेले सर्व प्राणी, सृष्टि व कला ह्यांचा त्यांत समावेश होतो.

ग्लॅ०:—उत्तम.

सॉक्रे०:—ह्या वर्गासंबंधानें तुम्ही असें कबूल कराल काय कीं, सत्यासत्याच्या दृष्टीनें नक्कल व अस्सल ह्यांमध्यें जो फरक आहे, तो मत व ज्ञान ह्यांच्या सारखाच आहे ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच मी कबूल करीन.

सॉक्रे०:—आतां आपल्या संपूर्ण रेषेंतील जो भाग बौद्धिक जग दर्शवितो, तो कसा विभागला जावा ह्याबद्दल विचार करूं या.

ग्लॅ०:—कसा विभाग करावयाचा ?

सॉक्रे०:—पुढील प्रकारें. दुसऱ्या भागाचे तुकडे छाया म्हणून उपयोगांत आणून, कल्पना गृहीत धरून, प्रथम तत्वापर्यंत प्रवास न करतां फक्त सिद्धांतापर्यंत ज्यांचें आत्म्याला संशोधन करावें लागतें, ते सर्व विषय एक तुकडा दर्शवील. दुसरा तुकडा आत्म्याचे विषय दर्शवील. गृहीत कल्पनेपासून प्रथम तत्व आत्मा कसें गांठतो, हें दर्शविणारे विषय त्यांत दाखविले जातील—ह्यांत प्रथम तत्व गृहीत धरलेलें नसतें व पहिला तुकडा ज्या छाया उपयोगांत आणतो, त्यांची मदतही घेतलेली नसते. हा प्रथम तत्वापर्यंतचा प्रवास, आवश्यक कल्पना मदतीला घेऊनच आत्मा करीत असतो.

ग्लॅ०:—तुमचें वर्णन मला नीटसें समजलें नाहीं.

सॉक्रे०:—आपण पुनः प्रयत्न करूं. प्रास्ताविक अशी थोडी टीका केली म्हणजे तुम्हांला समजावयास सोपें पडेल. तुम्हांला हें माहीत आहे

कीं, भूमिति व अंकगणित ह्या शास्त्रांचे विद्यार्थी, प्रत्येक संशोधनामध्यें सम व विषम आंकडे, आकृति, तीन प्रकारचे काटकोन इत्यादि साहित्य गृहीत धरतात. ह्या गोष्टी माहीत आहेत, असें समजण्यांत येतें आणि त्या गृहीत कल्पना स्वीकारून, त्यांचें स्पष्टीकरण ते स्वतःही करीत नाहींत व दुसऱ्यांनाही सांगत नाहींत. कारण त्या स्वयंसिद्धच आहेत, असें ते समजतात. अशा तऱ्हेनें आरंभ करून, त्यांच्या विषयाचा शेष भाग ते आक्रमण करीत जातात व संशोधनाच्या विषयाचा पूर्ण एकमतानें निष्कर्ष काढतात.

ग्लॅ०:—हें मला पूर्णपणें माहीत आहे.

सॉक्रे०:––तुम्हांला हेंही माहीत आहे कीं, स्वतःच्या मदतीला दृश्य आकृती ते घेतात व त्यांच्याविषयीं चर्चा करतात. पण खरोखर त्यांचे विचार दृश्य आकृतींबद्दल नसून त्यांच्या अस्सल कल्पनांबद्दल असतात. तसेंच, एखाद्या विशिष्ट वर्तुळाविषयीं अथवा व्यासाबद्दल ते चर्चा करीत नसून, केवल वर्तुळ अथवा केवल व्यास ह्याबद्दल ते विचार करतात. ज्यांच्या छाया व प्रतिकृती पाण्यांतही दिसूं शकतात, अशा आंकड्यांच्या व आकृतींच्या प्रतिमांचा जरी हे लोक उपयोग करतात, तरी वस्तुतः केवळ विचाराच्या दृष्टीनें बघतां येणाऱ्या कल्पनाच ते बघण्याचा प्रयत्न करीत असतात.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ह्या वस्तूंचा वर्ग मी बौद्धिक म्हणतों. पण मी म्हटलेंच आहे कीं, आत्म्याला ह्या वस्तूंच्या संशोधनाकरितां कल्पना
Steph गृहीत धराव्याच लागतात––प्रथम तत्वाकडे प्रवास
511 करणें अशक्यच असतें. कारण, ह्या गृहीत कल्पनांच्या क्षेत्राबाहेर जाणें आत्म्याला अशक्य होतें––ह्या कल्पनांच्या प्रतिमा म्हणून खालीं असलेल्या वस्तूंच्या नकलाच आत्म्याला उपयोगांत

आणाव्या लागतात. ह्या नकला अस्सलाबरोबर तुलना केल्या जाऊन, त्यांची योग्यता अडाणी लोकांकडून मोठी समजली जाते.

ग्लॅ०:—भूमिति व इतर तत्सदृश कला, ह्यांच्या विषयासंबंधानें तुम्ही म्हणत आहां, असें मी समजतों.

सॉक्रे०:—बौद्धिक जगांतील दुसऱ्या तुकड्याचा अर्थ मी पुढीलप्रमाणें करतों. ब्रह्मविद्येच्या जोरावर बुद्धीला जें पटतें, तें दर्शविणारा हा तुकडा होय. गृहीत कल्पना प्रथम-तत्वें म्हणून न समजतां, त्या साधनीभूत असणाऱ्या अशा पायऱ्या अथवा प्रेरणा होत, असें आत्मा समजतो. ह्यांच्यामुळें आत्म्याला उच्चविचार शक्तीनें, जें गृहीत नाहीं तें गांठतां येऊन व प्रत्येक वस्तूंचें मूलतत्व ओळखून, तें पक्कें ग्रहण करतां येतें. असें केल्यानंतर आत्मा मागें वळतो व ह्या प्रथम तत्वाला जें पकडतें, तें पकडतो व शेवटीं इंद्रियगम्य अशा कोणत्याही वस्तूची मदत न घेतां, केवल, स्वयंसिद्ध कल्पनाच मदतीस घेऊन तो निष्कर्ष काढू शकतो.

ग्लॅ०:—तुम्हीं अत्यंत कठीण असा विषय प्रतिपादन करीत असल्यामुळें, मला तितकें चांगलें समजलें नाहीं. पण मला इतकें मात्र समजलें कीं, ब्रह्मविद्येच्या शास्त्रानें अभ्यासिलें जाणारें अस्तित्व व शुद्धबुद्धि ह्यांचें क्षेत्र, हें कलांनीं अभ्यासिलेल्या क्षेत्रापेक्षां अधिक निश्चयात्मक असतें, असें तुम्हीं स्पष्टपणें मांडलें आहे. कलांमध्यें गृहीत कल्पनाच प्रथमतत्वें म्हणून समजल्या जातात, व कलेच्या अभ्यासी विद्यार्थ्यांना, त्या कल्पनांचा, इंद्रियांऐवजीं मनानेंच विचार करावा लागतो. हें जरी खरें असलें, तरी ज्याअर्थी ते प्रथमतत्वाकडे न वळतां गृहीत कल्पनांच्या प्रमेयांवरच आपलें संशोधन चालू ठेवतात, त्याअर्थी जे प्रश्न ते विचारांत घेतात, त्यांवर आपली शुद्धबुद्धि चालवीत नाहींत. वस्तुतः प्रथमतत्वाच्या दृष्टीनें विचार केला असतां, हे प्रश्न शुद्ध बुद्धीच्या क्षेत्रांतच येतात. मला वाटतें, भूमितिशास्त्रविदांच्या मानसिक

संवयीला शुद्धबुद्धि असें तुम्हीं नांव देत नसून, ग्रहणशक्ति असें म्हणतां. कारण मत व शुद्ध बुद्धि, ह्यांच्या दरम्यान ग्रहणशक्ति असते, असें तुम्हीं समजतां.

सॉक्रे०:—माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हांला फारच समाधानकारक रीतीनें समजला असल्याचें दिसतें. आत्म्याच्या चार अवस्था म्हणजे हे चार तुकडे, असें तुम्हीं समजा. शुद्धबुद्धि म्हणजे सर्वांत उच्च तुकडा. ग्रहणशक्ति दुसरा तुकडा. मत म्हणजे तिसरा व अनुमान म्हणजे चवथा. हे सर्व तुकडे त्यांच्या गुणानुक्रमानें लावा. आणि समजा कीं, त्यांच्या विशिष्ट विषयांत, ज्या प्रमाणांत सत्य असेल, त्या प्रमाणांत त्यांच्यामध्यें स्पष्टपणा तुम्हांला दिसून येईल.

ग्लॉ०:—तुमचें म्हणणें मला पूर्णपणें पटलें आणि तुमच्या इच्छेप्रमाणें मी त्या तुकड्यांची अनुक्रमणिका लावीन.

| Pure Reason | Understanding | Belief | Conjecture |
|---|---|---|---|
| शुद्ध बुद्धि | ग्रहणशक्ति | मत अथवा समज | अनुमान |

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक सातवें

सॉक्रे०:—ज्ञान व अज्ञान, ह्यासंबंधीं आपली स्वाभाविक स्थिति, खालीलप्रमाणें आहे अशी कल्पना करा. जमिनीखालील एका गुहेंत पुष्कळ लोक बसले असून, त्या सर्व गुहेला प्रकाशाभिमुख असा प्रवेश-मार्ग आहे. ह्या गुहेमध्यें लहानपणापासून हे लोक कोंडलेले असून, त्यांचे पाय व मान अशा तऱ्हेनें बांधलीं गेलीं आहेत कीं, त्यामुळें त्यांना जागेवरून हालतां येत नाहीं. आणि डोकीं आजूबाजूला फिरवितां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांना फक्त समोर दृष्टीस पडणाऱ्या वस्तूच तेवढ्या बघतां येतात. ह्या लोकांच्या उर्ध्व व पृच्छ बाजूस तेजस्वी अग्नी पेटत असून, अग्नी व कैदी लोक, ह्यांच्यामधून जाणारा असा एक उंच रस्ता आहे. गारुडी लोक प्रेक्षकांसमोर आपले कौशल्याचे खेळ जशा पडद्यावर दाखवितात, तशा पडद्याप्रमाणें वरील रस्त्याला लागून एक सखल अशी भिंतही आहे.

ग्लॅ०:—मी वरीलप्रमाणें कल्पना केली असें समजा.

सॉक्रे०:—लाकूड, दगड आणि इतर साधनांनीं केलेले मनुष्यांचे पुतळे व इतर प्राण्यांच्या आकृती, व इतरही विविध
Steph वस्तु घेऊन, कांहीं लोक भिंतीच्या पाठीमागून जात
515 आहेत व त्यांपैकीं कांहीं बोलत असून, कांहीं स्तब्ध आहेत अशीही कल्पना करा.

ग्लॅ०:—तुम्ही विचित्र देखावा व विचित्र कैदी वर्णन करीत आहांत.

सॉक्रे०:—ते आपल्यासारखेच आहेत! हे कैदी लोक, समोरील गुहेच्या भिंतीवर अग्नीमुळें पडत असलेल्या स्वतःच्या अथवा दुसऱ्यांच्या छायांपलीकडे, कांहीं बघूं शकतील काय?

ग्लॅ०:—डोकें न हलवतां त्यांना सर्व जन्मभर बसावें लागत असल्यामुळें, ह्यापलीकडे ते दुसरें काय पहाणार?

सॉक्रे०:—आणि त्यांच्या समोरून नेल्या जाणाऱ्या वस्तूंविषयींही त्यांचें ज्ञान असेंच मर्यादित असणार नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि जर ते एकमेकांबरोबर संभाषण करूं शकले, तर त्यांच्या समोर ते ज्या वस्तु बघतात, त्यांना संज्ञा देण्याची त्यांना सवय जडणार नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—समोरच्या भागांतून त्या तुरुंगांत जर प्रतिध्वनि ऐकूं येत असला, तर जवळून जाणाऱ्या मनुष्यांपैकीं एखाद्यानें कांहीं भाषण केलें असतां, समोरून जाणाऱ्या छायेनेंच हें भाषण केलें, असें कैद्यांना वाटणार नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय त्यांना असेंच वाटेल.

सॉक्रे०:—तर मग, मनुष्यनिर्मित वस्तूंच्या छायांनाच, ते खऱ्या वस्तु म्हणून समजतील.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आतां, ह्या कैद्यांची वरील बंधनांतून व भ्रमांतून सुटका झाली असतां, काय घडून येईल ह्याचा विचार करा. अशी कल्पना करा कीं, त्यांच्यापैकीं एकाला मुक्त करून, त्याला एकदम उभें राहण्यास व मान फिरवून प्रकाशाकडे उघड्या डोळ्यांनीं पहाव-

# प्लेटोची

# आदर्श राज्यघटना

## पुस्तक सातवें

सॉक्रे०:—ज्ञान व अज्ञान, ह्यासंबंधीं आपली स्वाभाविक स्थिति, खालीलप्रमाणें आहे अशी कल्पना करा. जमिनीखालील एका गुहेंत पुष्कळ लोक बसले असून, त्या सर्व गुहेला प्रकाशाभिमुख असा प्रवेश-मार्ग आहे. ह्या गुहेमध्यें लहानपणापासून हे लोक कोंडलेले असून, त्यांचे पाय व मान अशा तऱ्हेनें बांधलीं गेलीं आहेत कीं, त्यामुळें त्यांना जागेवरून हालतां येत नाहीं. आणि डोकीं आजूबाजूला फिरवितां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांना फक्त समोर दृष्टीस पडणाऱ्या वस्तूच तेवढ्या बघतां येतात. ह्या लोकांच्या उर्ध्व व पृच्छ बाजूस तेजस्वी अग्नी पेटत असून, अग्नी व कैदी लोक, ह्यांच्यामधून जाणारा असा एक उंच रस्ता आहे. गारुडी लोक प्रेक्षकांसमोर आपले कौशल्याचे खेळ जशा पडद्यावर दाखवितात, तशा पडद्याप्रमाणें वरील रस्त्याला लागून एक सखल अशी भिंतही आहे.

ग्लॅ०:—मी वरीलप्रमाणें कल्पना केली असें समजा.

सॉक्रे०:—लाकूड, दगड आणि इतर साधनांनीं केलेले मनुष्यांचे पुतळे व इतर प्राण्यांच्या आकृती, व इतरही विविध
Steph वस्तु घेऊन, कांहीं लोक भिंतीच्या पाठीमागून जात
515 आहेत व त्यांपैकीं कांहीं बोलत असून, कांहीं स्तब्ध आहेत अशीही कल्पना करा.

ग्लॅ०:—तुम्ही विचित्र देखावा व विचित्र कैदी वर्णन करीत आहांत.

सॉक्रे०:—ते आपल्यासारखेच आहेत! हे कैदी लोक, समोरील गुहेच्या भिंतीवर अग्नीमुळें पडत असलेल्या स्वत:च्या अथवा दुसऱ्यांच्या छायांपलीकडे, कांहीं बघूं शकतील काय?

ग्लॅ०:—डोकें न हलवतां त्यांना सर्व जन्मभर बसावें लागत असल्यामुळें, ह्यापलीकडे ते दुसरें काय पहाणार?

सॉक्रे०:—आणि त्यांच्या समोरून नेल्या जाणाऱ्या वस्तूंविषयींही त्यांचें ज्ञान असेंच मर्यादित असणार नाहीं काय?

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—आणि जर ते एकमेकांबरोबर संभाषण करूं शकले, तर त्यांच्या समोर ते ज्या वस्तु बघतात, त्यांना संज्ञा देण्याची त्यांना संवय जडणार नाहीं काय?

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—समोरच्या भागांतून त्या तुरुंगांत जर प्रतिध्वनि ऐकूं येत असला, तर जवळून जाणाऱ्या मनुष्यांपैकीं एखाद्यानें कांहीं भाषण केलें असतां, समोरून जाणाऱ्या छायेनेंच हें भाषण केलें, असें कैद्यांना वाटणार नाहीं काय?

ग्लॅ०:—नि:संशय त्यांना असेंच वाटेल.

सॉक्रे०:—तर मग, मनुष्यनिर्मित वस्तूंच्या छायांनाच, ते खऱ्या वस्तु म्हणून समजतील.

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—आतां, ह्या कैद्यांची वरील बंधनांतून व भ्रमांतून सुटका झाली असतां, काय घडून येईल ह्याचा विचार करा. अशी कल्पना करा कीं, त्यांच्यापैकीं एकाला मुक्त करून, त्याला एकदम उभें राहण्यास व मान फिरवून प्रकाशाकडे उघड्या डोळ्यांनीं पहाव-

यास लावलें आहे. आणखी असें समजा कीं, ह्या सर्व क्रिया तो मोठ्या दुःखानें पार पाडूं शकत आहे व ज्या वस्तूंच्या छाया तो पूर्वी बघण्यास समर्थ असे त्या खऱ्या वस्तु, स्वतः दीपावून गेल्यामुळें तो बघूं शकत नाहीं. ह्यावेळेस जर त्याला कोणी असें सांगितलें कीं, पूर्वी तो वस्तूंच्या केवळ छाया बघत होता व आतांच सत्याच्या सान्निध्यांत आल्यानें, त्याला वस्तूंचें अधिक खरें स्वरूप दिसत आहे, तर तो काय उत्तर देईल? तसेंच, इकडून तिकडे जात असलेल्या वस्तु त्याला दाखवून, 'ह्या वस्तु काय आहेत?' असें जर कोणी त्याला विचारील, तर तो गोंधळून जाऊन, त्याच्या दृष्टीसमोर आणलेल्या खऱ्या वस्तूंपेक्षांही पूर्वीच्या त्यांच्या छायाच अधिक खऱ्या आहेत, असें समजणार नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तसेंच, खुद्द प्रकाशाकडे त्याला बघावयास लावलें, तर त्याचे डोळे दुखावयास लागणार नाहींत काय? आणि ज्या वस्तु त्याला स्पष्टपणें दिसतात, त्यांच्याकडेच आपली दृष्टि वळवून, त्याच वस्तु, त्याला दाखविण्यांत येणाऱ्या वस्तूंपेक्षां, अधिक स्पष्ट आहेत असें तो समजणार नाहीं काय?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तसेंच, गुहेंतून खडकाळ व चढणीच्या रस्त्यावर त्याला जबरदस्तीनें कोणी नेलें आणि सूर्यप्रकाशापर्यंत नेल्या-

Steph 516 शिवाय सोडावयाचें नाहीं असें सांगितलें, तर तो त्रासून जाऊन चिडणार नाहीं काय? आणि प्रकाशापर्यंत पोंचल्यावर चकाकीनें त्याचे डोळे दिपून जाऊन, खऱ्या पदार्थांपैकीं एकही पदार्थ बघण्यास तो असमर्थ होणार नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. प्रथमतः असें होईल खरें.

सॉक्रे०:—म्हणून मला वाटतें, बाह्य सृष्टींतील वस्तु बघण्याची त्याला संवय करावी लागेल. पहिल्या प्रथम त्याला छाया कळूं लागतील. नंतर मनुष्यें व इतर पदार्थ, ह्यांची पाण्यांत उठणारीं प्रतिबिंबें, त्याला कळूं लागून नंतर खऱ्या वस्तु कळतील. ह्यानंतर आपले डोळे, तो चंद्र व इतर तारे ह्यांच्या प्रकाशाकडे लावूं शकेल आणि सूर्य व सूर्यप्रकाश ह्यांचा दिवसा अभ्यास करण्यापेक्षां, आकाशस्थ पदार्थ व आकाश ह्यांचा रात्रीच्या वेळीं अभ्यास करणें त्यांला सोपें वाटेल.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०—शेवटीं मला वाटतें, सूर्याचें स्वरूप पाण्यांत अथवा दुसऱ्या ठिकाणीं जसें दिसतें, तसें न बघतां प्रत्यक्ष सूर्य स्वतःच्या ठिकाणींच कसा दिसतो, हें बघण्यास व त्याचें चिंतन करण्यास तो समर्थ होईल.

ग्लॅ०: निःसंशय.

सॉक्रे०:—ह्याच्या पुढची पायरी म्हणजे, ऋतु व वर्षें ह्यांचा सूर्य हा जनक असून, दृश्य जगतांतील सर्व वस्तूंचा संरक्षक आहे, आणि तो ( कैदी ) व त्याचे सोबती ज्या वस्तु बघत होते, त्या सर्वांचा सूर्य एका अर्थी कारण आहे, असा सिद्धांत तो काढूं शकेल.

ग्लॅ०:—होय. हीच पुढची पायरी होय.

सॉक्रे०:—नंतर काय होईल ? पूर्वीची रहाण्याची जागा, तेथील शहाणपण व स्वतःचे जुने कैदी मित्र, ह्यांची जेव्हां त्याला आठवण होईल, तेव्हां झालेल्या फरकाबद्दल आनंद मानून आपल्या कैदीमित्रांची तो कींव करणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—जवळून जाणारी वस्तु पाहण्याची ज्याला तीक्ष्ण दृष्टि आहे व त्या वस्तूच्या अगोदर, नंतर व बरोबर जाणारी वस्तुही ज्याच्या चांगली ध्यानांत रहाते व ह्या आधारावर पुढें काय येणार आहे ह्याचें ज्याला उत्तम प्रकारें अनुमान करतां येतें, त्याला मान द्यावयाचा व

शाबासकी द्यावयाची, असा त्यांच्यामध्यें जर प्रघात असला तर प्रकाश पाहून आलेला मनुष्य, अशा शाबासकीची पर्वा करील काय? आणि ज्यांना असे मान व अधिकार मिळतात, त्यांच्याबद्दल अशा मनुष्याला मत्सर तरी वाटेल काय? ह्याच्या उलट, होमरच्या वर्णनाप्रमाणें, 'निर्धन अशा धन्याच्या जमिनी नांगरणें,' हें सुद्धां बरें आणि त्या गुहेंतील मतें व आयुष्य पत्करण्यापेक्षां, इतर कांहींही सहन करणें चांगलें, असें त्याला वाटणार नाहीं काय?

ग्लॅ०:—माझ्या मतें, अशा तऱ्हेचें आयुष्य घालविण्याऐवजीं तो इतर कांहींहीं सहन करील.

सॉक्रे०:—आणि वरील मनुष्यानें, त्या गुहेंत परत येऊन पुनः आपली पूर्वीची जागा घेतली तर काय प्रकार होईल? सूर्यप्रकाशांतून एकदम आल्यामुळें, गुहेंतील अंधकारानें स्वतःचे डोळे अंध झाले आहेत, असें त्याला आढळून येणार नाहीं काय?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—मंद व अस्थिर दृष्टि झालेल्या वरील मनुष्याला, गुहेंतील कैद्यांकडून छायांविषयीं जर मत विचारण्यांत येऊन, त्यांच्यामध्यें वाग्युद्ध बराच वेळ चाललें तर त्याचें हसें होणार नाहीं काय? तो
Steph आपली दृष्टि नष्ट करून घेण्याकरितांच गुहेबाहेर जाऊन
517 परत आला; म्हणून वर जाण्याचा प्रयत्न करणेंसुद्धां निरर्थक होय, असेंच गुहेंतील कैदी त्याच्याबद्दल म्हणणार नाहींत काय? तसेंच, अशा लोकांची मुक्तता करून त्यांना प्रकाशाकडे नेण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य, जर त्यांच्या तावडींत सांपडला, तर त्याला ठार मारण्यासही ते कमी करतील काय?

ग्लॅ०—नाहीं.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय ग्लॅकान्, वरील दृष्टांत आपण पूर्वी केलेल्या विधानांना सर्व तऱ्हेनें लावून पाहूं. दृष्टिगम्य प्रदेशाला गुहेंतील

तुरुंग समजा आणि गुहेंतील अग्निप्रकाशाला सूर्य समजा. तसेंच, वर चढून जाणें व वरील जगाचें चिंतन करणें म्हणजे आत्म्यानें बौद्धिक वातावरणांत रमणें, असें जर तुम्ही समजलांत तर माझ्या कल्पना तुम्हाला उमजतील. त्या बरोबर आहेत किंवा चुकीच्या आहेत हें फक्त ईश्वरच जाणे ! पण तें कसेंही असो. ह्या विषयासंबंधीं माझें मत पुढीलप्रमाणें आहे. ज्ञानाच्या क्षेत्रांत सत्तत्वाचें खरें स्वरूप शोधणें, हाच आपल्या सर्व संशोधनाचा शेवट आहे आणि हें तत्व क्वचित्च दिसूं शकतें. पण जर दिसलें, तर तेजस्वी व सुंदर वस्तूंचें तें उगमस्थान आहे, असें म्हटल्याशिवाय आपणास राहवणार नाहीं. हें तत्व, दृश्य जगतांत प्रकाश व सूर्य आणि बौद्धिक जगतांत सत्य व बुद्धि, ह्यांचें उगमस्थान असतें. ज्या मनुष्याला खाजगी व सार्वजनिक व्यवहारांमध्यें सूज्ञपणानें वागावयाचें आहे, त्यानें आपल्या डोळ्यासमोर ह्या सत्तत्वाचा आदर्श ठेवला पाहिजे.

ग्लॉ०:—मला तुमचें म्हणणें पूर्णपणें मान्य आहे.

सॉक्रे०:—तर मग, जे लोक उच्च वातावरणांत विहार करीत असतात, ते मनुष्यांच्या व्यवहारांत भाग घेण्यास नाखूष असतात, म्हणून तुम्ही आश्चर्य वाटून घेऊं नका. कारण त्यांचे आत्मे उच्च वातावरण सोडण्यास नाराज असतात. आतांच दिलेला दृष्टांत जर वस्तुस्थिति निदर्शक असला, तर हें स्वाभाविक नव्हे काय ?

ग्लॉ०: — होय. अगदीं स्वाभाविक आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. मानवी दौर्बल्याचा अभ्यास करण्याकरितां, ज्यानें अध्यात्मिक विषयाचें चिंतन करणें नुकतेंच सोडून दिलें आहे, ज्याची दृष्टि अजून दिपावत आहे व आपल्या सभोंवतीं असलेल्या अज्ञानांधकाराशीं ज्याचा अजून नीट परिचय झालेला नाहीं, अशा मनुष्याला, न्यायकचेरींत अथवा इतर ठिकाणीं न्यायाच्या छायांशीं अथवा छायांच्या आकृतींशीं, भांडावयास लावलें अथवा ज्या लोकांना

न्यायाच्या मूलतत्वांची ओळखही नाहीं, अशा लोकांशीं सामना करावयास लावलें, तर त्याचें वर्तन चमत्कारिक व हास्यास्पद ठरल्यास, तुम्हांला आश्चर्य वाटेल काय ?

ग्लॅ०:—मला आश्चर्य मुळींच वाटणार नाहीं.

सॉक्रे०:—बरोबर आहे. कारण शहाणा मनुष्य असें ध्यानांत
आणील कीं, दोन भिन्न प्रकारांनीं व दोन भिन्न कारणांनीं,
Steph म्हणजे प्रकाशांतून अंधकारांत व अंधकारांतून प्रकाशांत
518 एकदम गेल्यानें, दृष्टीचा त्याचप्रमाणें आत्म्याचाही गोंधळ
होतो. मन गोंधळून गेल्यामुळें ज्याला वस्तु ओळखतां येत नाहींत, असा मनुष्य जेव्हां सूज्ञ मनुष्याच्या दृष्टीस पडतो, तेव्हां त्याला अविचारीपणानें हसावयास येत नाहीं. कारण तेजस्वी आयुष्यांतून नुकताच बाहेर आल्यानें, अंधकाराच्या नाविन्यामुळें अशा मनुष्याची दृष्टि अंध झाली आहे काय ? अथवा अज्ञानाच्या गर्तेतून नुकताच तेजस्वी आयुष्यांत आल्यानें, दीपावून जाऊन त्याची दृष्टि गोंधळून गेली आहे काय ? अशा प्रश्नांनीं प्रथम चवकशी केल्याशिवाय, सूज्ञ मनुष्य पहिली स्थिति सुखावह व दुसरी अनुकंपनीय असें समजणार नाहीं. तसेंच, सूज्ञ मनुष्याला जरी हसावेंसें वाटलें, तरी तें हास्य, वरील मनुष्य उच्च वातावरणाच्या प्रकाशांतून येऊन, गुहेंत गेला असतां जें हास्य निर्माण होतें, त्यापेक्षां कमी हास्यास्पद होईल.

ग्लॅ०:—तुम्ही फार न्याय्य बोललांत.

सॉक्रे०:—हें जर खरें असलें, तर ज्याप्रमाणें अंध डोळ्यांमध्यें दृष्टि घालतां येते, त्याप्रमाणें ज्ञानविरहित असलेल्या आत्म्यामध्येंही ज्ञान घालतां येतें, असें कांहीं अध्यापकांचें जें मत आहे, तें शिक्षणाच्या खऱ्या स्वरूपाशीं विसंगत आहे, असें आपणास म्हणावें लागेल.

ग्लॅ०:—अशाच प्रकारचीं ते विधानें करतात, हें खरें आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, आपलें प्रतिपादन असें दर्शवितें कीं, प्रत्येक मनुष्याच्या आत्म्यांत अशी एक शक्ति अथवा साधन आहे कीं, त्यामुळें प्रत्येकाला शिकतां येतें आणि ज्याप्रमाणें अंधारापासून प्रकाशाकडे आपणाला दृष्टि फिरवण्याकरितां सर्व शरीर फिरवावें लागतें, त्याप्रमाणें ही शक्ति अथवा हें साधन, विनाशी जगतापासून सर्व आत्म्याबरोबर फिरविल्याशिवाय, सत्‌तत्वाचा तेजस्वीतम भाग व वस्तुतत्व, ह्यांबद्दल विचार करतां येणें शक्य नसतें. माझें म्हणणें बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—म्हणून ह्या परिभ्रमणानें अशी कला निर्माण झाली पाहिजे कीं, तीमुळें असा फरक अत्यंत सोप्या व परिणामकारक तऱ्हेनें घडवून आणण्याचें शिकवितां येईल. मनुष्यामध्यें पहाण्याची शक्ति निर्माण करणें, असें ह्या कलेचें ध्येय असणार नाहीं. कारण मनुष्य जरी चुकीच्या मार्गाला लागल्यामुळें योग्य मार्गाकडे लक्ष देत नसला, तरी सुद्धां मनुष्यामध्यें पहाण्याची शक्ति असते, असें ही कला गृहीत धरते आणि हा दोष ( अयोग्य मार्गाकडे वळणें ) दूर करणें हेंच तिचें ध्येय असतें.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आत्म्याचे दुसरे सद्गुण, शरीराच्या गुणांप्रमाणें असतात असें दिसून येतें. कारण आत्म्यामध्यें ते अगोदर वसत नसून, संवयीनें व व्यासंगानें वाढविले जातात. पण ज्ञानाचा सद्गुण, दैवी स्वरूपाचा असून त्याचा कधींही नाश होत नाहीं. उलट तो
Steph परिस्थितीच्या फरकानें, उपयुक्त व फायदेशीर अथवा
519 निरुपयोगी व हानिकारक होतो. कारण तुम्हीं असें निरीक्षण केलेंच असेल कीं, जे हुषार पण दुर्गुणी म्हणून प्रसिद्ध असतात, त्यांचे लहानगे आत्मे फार तीक्ष्ण दृष्टीचे

असतात आणि ज्या गोष्टींकडे त्यांचें लक्ष जातें, त्या गोष्टी फार सूक्ष्मपणें ते पहातात. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, अशा लोकांची पहाण्याची दृष्टि कोणत्याही प्रकारें मंद नसते. दुष्टपणाचे त्यांना गुलाम व्हावें लागल्यामुळें, ज्या प्रमाणांत ते तीक्ष्ण बुद्धीचे असतात, त्या प्रमाणांत त्यांचे हातून अधिक पापकृत्यें घडतात.

ग्लॅ०:--होय. असें आहे खरें.

सॉक्रे०:—आत्म्याला आपल्या वजनाखालीं दडपून टाकून, क्षुद्र गोष्टींकडे बघावयास लावणारीं खाद्यपेयें व इंद्रियजन्य सुखें, जर लहानपणापासूनच अशा स्वभावापासून तोडून टाकलीं—मी पुनः म्हणतों—असे स्वभाव अशा पाशांतून जर मुक्त करून त्यांना सद्वस्तूंकडेच बघावयास लावलें, तर ह्याच व्यक्तींचे आत्मे सुखांमध्यें सध्यां जशी तीक्ष्ण दृष्टि दाखवितात, तशी तीक्ष्ण दृष्टि सत्यशोधनांत दाखवितील.

ग्लॅ०:—होय. हें शक्य आहे.

सॉक्रे०:—आणखी असें पहा. आपण पूर्वी जें म्हटलें त्यापासून आवश्यक निष्कर्ष असा होऊं शकत नाहीं काय, किंवा असें संभवत नाहीं काय कीं, जे लोक अशिक्षित व सत्याबद्दल अज्ञानी आहेत आणि जे लोक सर्व आयुष्यभर शिक्षणच घेत बसले आहेत, असे दोन्ही प्रकारचे लोक राज्याचे कारभारी होण्यास नालायक होत. कारण पहिल्या प्रकारच्या लोकांचें सार्वजनिक अथवा खाजगी आयुष्य, कोणत्याही विशिष्ट ध्येयानें प्रेरित नसतें. आणि दुसऱ्या प्रकारचे लोक, अत्यंत सुदैवी अशा लोकांच्या वस्तींत आपण आहोंत अशी कल्पना करून, राज्यांतील कांहींहीं काम सक्तीशिवाय करण्यास तयार नसतात.

ग्लॅ०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून आपल्या वसाहतींत असलेल्या उदात्त स्वभावाच्या लोकांना, आपण जें अत्युच्च असें शास्त्र वर्णन केलें, तें अभ्यास

करावयास भाग पाडलें पाहिजे. वरच्या वातावरणांत जाऊन सत्‌तत्वाकडे त्यांनीं स्वतःची दृष्टि वळविली पाहिजे. पण वरच्या वातावरणांत जाऊन, पुष्कळ वेळ त्यांचें बघून झाल्यावर, हल्लीं त्यांना पुढें जी मोकळीक देण्यांत येते, ती आपण मना केली पाहिजे.

ग्लॅ०:—कोणती मोकळीक तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०: – उच्च वातावरणांतच रहाण्याची मोकळीक त्यांना देतां कामा नये. आपल्या कैदी बांधवांमध्यें मिसळून, त्यांच्या क्षुद्र अवथा उच्च श्रमांत व सन्मानांत भाग घेण्याची त्यांना सक्ती केली पाहिजे.

ग्लॅ०:—पण अशा तऱ्हेनें, उच्च आयुष्याऐवजीं त्यांना नीच आयुष्य कंठण्यास सांगून, आपण अन्याय करीत नाहीं काय ?

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, तुम्हीं हें विसरलांत कीं, राज्यामध्यें एका विविक्षित वर्गालाच अत्यंत चांगल्या प्रकारें वागूं देणें कायद्याला सम्मत नसतें. ह्याच्या उलट, राज्यामध्यें चांगल्या प्रकारें सर्वांना वागतां यावें, असाच कायद्याचा हेतु असतो. ह्या कारणाकरितां, कायदा समजुतीनें व दंडानें सर्व नागरिकांचें नियमन करतो व
Steph 520 प्रत्येक व्यक्ति सामुदायिक सुखाकरितां जें करील, त्याचा फायदा सर्वांना द्यावयास लावतो. म्हणून राज्यामध्यें उच्च प्रकारच्या स्वभावाचे लोक निर्माण करून, त्यांना मनाप्रमाणें वागण्यास कायदा मोकळीक देत नसतो. उलट, राज्यघटनेच्या योजनेंत त्यांचा उपयोग करून घ्यावा असाच कायद्याचा हेतु असतो.

ग्लॅ०:—खरें आहे. हें मी विसरलों होतों.

सॉक्रे०:—म्हणून ग्लॅकॉन्, आपल्या राज्यांतील भावी तत्वज्ञानी लोकांना आपल्या बांधवांवर लक्ष ठेवण्याची व त्यांची काळजी घेण्याची जर आणखी कामगिरी करावयास सांगितली, तर त्यामुळें त्यांना अन्याया- ऐवजीं न्यायानेंच वागविलें असें होईल. आपण त्यांना असें म्हणूं– "तुमचे इतर राज्यांत असलेले सोबती, राज्यकारभाराचें काम कर-

ण्याचें नाकारतात तें सकारणच असतें. कारण अशा लोकांची वाढ, प्रचलित असलेल्या राज्यघटनेस न जुमानतां स्वतंत्रपणानें होत असते आणि हें न्याय्यच आहे कीं, स्वयंभू रोपटें आधाराकरितां कोणावरही अवलंबून नसल्यामुळें, राखणावळीचा मोबदला देण्यास नाखूष असतें. परंतु तुमचा असा प्रकार नाहीं. कारण आम्हीच तुम्हांला राज्याकरित व तुमच्याकरितां, जणूं मोहोळाचे राजे व नेते, म्हणून निर्माण केले व इतरांपेक्षां अधिक पूर्णतेनें व चांगल्या प्रकारें शिक्षण देऊन, नागरिक व अधिकारी ह्या दोन्ही नात्यांनीं राज्यांत भाग घेण्यास समर्थ केलें आहे. म्हणून आळीपाळीनें, तुम्ही उच्च वातावरणांतून खालीं उतरून लोकगंगेमध्यें मिसळलें पाहिजे व अव्यक्त विषयांचें चिंतन करण्याची संवय केली पाहिजे. कारण अशी तुम्ही संवय केली असली म्हणजे इतर रहिवाशांपेक्षां सहस्रशः अधिक चांगल्या प्रकारें तुम्ही पाहूं शकाल आणि सौंदर्य, न्याय व सत् ह्यांचें खरें स्वरूप तुम्हाला माहीत असल्यामुळें, छाया कोणती व खरी वस्तु कोणती हें तुम्ही ओळखूं शकाल. अशा प्रकारें, आपलें राज्य इतर राज्याप्रमाणें आभास नसून सत्य आहे, असें आपणांस कळून येईल. राज्याधिकार मिळणें म्हणजे मोठा अनुग्रह आहे, असें समजून केवळ छायांकरितां आपापसांत भांडत राहणाऱ्या लोकांनींच इतर राज्यें भरलेलीं असतात. म्हणून त्यांतील आयुष्य आभासात्मक असतें. खरें म्हटलें म्हणजे ज्या राज्यांत भावी राज्यकर्ते राज्यकारभार करण्यास फार नाखूष असतात, तेंच राज्य सर्वांत उत्तम प्रकारें व शांतपणानें चालविलें जातें. आणि ज्या राज्यांत राज्यकर्ते राज्यकारभार करण्यास फार उत्सुक असतात, तें राज्य वाईट रीतीनें चालविलें जातें."

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०: तुम्हांला असें वाटतें काय कीं, तेजस्वी वातावरणांत ज्यांना बराचसा वेळ घालविण्यास मोकळीक देण्यांत आली आहे, अशा

आपल्या विद्यार्थ्यांना आपण वरीलप्रमाणें समजावून सांगितलें असतां, ते आपली अवज्ञा करून, आळीपाळीनें राज्याचें काम करण्याचें नाकारतील ?

ग्लॅ०:—अशक्य ! कारण ही आज्ञा न्याय्य असून आज्ञा पाळणारेही न्यायी प्रवृत्तीचेच आहेत. एवढेंच नव्हे, तर आधुनिक राज्यकर्त्यांच्या अगदीं उलट हेतूनें म्हणजे–अधिकाराचें काम एक आवश्यक कर्तव्य–म्हणून प्रत्येकजण करील.

सॉक्रे०:—होय, खरें आहे. भावी राज्यकर्त्याकरितां, अधिकार गाजविण्यापेक्षां अधिक चांगलें, असें आयुष्य तुम्ही शोधून काढाल तर व्यवस्थित रीतीनें चालविलेलें राज्य, तुम्हांला कदाचित् घडवून आणतां येईल. कारण अशा राज्यांतच, आयुष्याला आवश्यक
Steph असणाऱ्या ज्ञान व सदाचार ह्या गुणांनीं संपन्न–सुवर्णानें
521 संपन्न नव्हे–असे अधिकारी असूं शकतील. परंतु भिकारी व खाजगी फायद्याकरितां हपापलेले लोक, जेव्हां राज्याची सूत्रें आपल्या हातांत घेतात, त्यावेळेस सर्वत्र अव्यवस्थितपणा माजतो. कारण असे लोक, अधिकाराच्या जोरावर फायदा करून घेण्याची आपणास मुभा आहे असें समजतात. अशा राज्यांत अधिकाराची जागा भांडणाचा विषय होते आणि अशा प्रकारच्या आपसांतील कलहांमुळें, भांडणाऱ्या पक्षांचें नुकसान होतें, एवढेंच नव्हे, तर सर्व राज्याचेंही होतें.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:–खऱ्या तत्वज्ञानाच्या आयुष्याशिवाय, दुसरें कोणतें आयुष्य अधिकाराच्या जागेचा तिरस्कार करतें, हें सांगाल काय ?

ग्लॅ०:—खरोखरच मला सांगतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—पण राज्यकारभाराचे लोभी नसलेल्या लोकांनींच राज्यकारभार केला पाहिजे. नाहींतर, लोभी लोकच अधिकाराकरितां भांडत राहतील.

ग्लॅ०:--निःसंशय.

सॉक्रे०:--उत्तम प्रकारें राज्यकारभार कसा करावा, ह्याचें ज्यांना ज्ञान असून ज्यांचें आयुष्य व गुणही निव्वळ मुत्सद्दी मनुष्यापेक्षां उदात्त प्रकारचे असतात, अशा लोकांचा तुम्ही जर अव्हेर केलात, तर दुसऱ्या कोणत्या लोकांना तुम्ही राज्याच्या संरक्षकांचीं कामें करण्यास भाग पाडणार आहांत ?

ग्लॅ०:--मी अशा लोकांचा अव्हेर करण्याऐवजीं त्यांचीच निवड करीन.

सॉक्रे०:--खालच्या जगतांतून स्वर्गीय वातावरणांत ज्याप्रमाणें शूर पुरुष चढून जातात, त्याप्रमाणें वरील प्रकारचे लोक राज्यामध्यें निर्माण करून प्रकाशापर्यंत त्यांना कसें न्यावयाचें, ह्याविषयीं विचार आपण आतां करावा ना ?

ग्लॅ०:--निःसंशय माझी हीच इच्छा आहे.

सॉक्रे०:--[1]'शंख उलटा कसा करावा,' असा सामान्य प्रश्न आपणास विचारांत घ्यावयाचा नसून, आत्म्याचें रात्रीसारख्या दिवसापासून अस्तित्वाच्या खऱ्या दिवसापर्यंत कसें परिभ्रमण होतें, ह्याचा विचार करावयाचा आहे. ह्या परिभ्रमणालाच आपण खरें तत्वज्ञान म्हणूं.

ग्लॅ०:--बरोबर आहे.

सॉक्रे०:--तर मग, आपणास कोणत्या विषयाच्या ज्ञानांत अशा तऱ्हेची शक्ति आहे, ह्याचा विचार करावयास नको काय ?

ग्लॅ०:--होय. केलाच पाहिजे.

सॉक्रे०:--ग्लॅकॉन्, बदल पावणाऱ्या वस्तूपासून सत्य वस्तूकडे आत्म्याला ओढून नेणारें, असें एखादें शास्त्र मला सांगाल काय ? आपल्या विद्यार्थ्यांना तरुणपणीं लढाईचें शिक्षण दिलें पाहिजे, असें आपण म्हटल्याचें नुकतेंच मला स्मरण झालें.

---

१ एक प्रकारचा खेळ.

ग्लॅ०:—होय. असें आपण म्हटलें होतें.

सॉक्रे०:—तर मग, ज्या शास्त्राच्या शोधांत आपण आहोंत, त्या शास्त्रांत पूर्वीचा व हाही गुण असला पाहिजे.

ग्लॅ०: —कोणता गुण ?

सॉक्रे०:—युद्धप्रवण माणसांनाही त्या शास्त्राची उपयुक्तता वाटणें.

ग्लॅ०: –होय. शक्य असलें तर.

सॉक्रे०:—आपल्या पूर्वीच्या शिक्षणक्रमांत, संगीत व व्यायाम शास्त्रांचा आपण समावेश केला होता.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ज्याअर्थी शरीराची वाढ व ऱ्हास, ह्यांसंबंधीं व्यायामशास्त्र विचार करतें, त्याअर्थी ह्या शास्त्राचा विकारी व विनाशी वस्तूशीं संबंध असतो.

ग्लॅ०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—म्हणून ज्या शास्त्राचा आपण शोध करीत आहोंत, तें व्यायामशास्त्र असूं शकणार नाहीं.

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

Steph सॉक्रे०:—पण आपण चर्चिलेल्या संगीत शास्त्रा-
522 विषयीं ( Music ) तुम्हांला काय वाटतें ?

ग्लॅ०:—तुम्हाला आठवत असेल कीं, संगीत केवळ व्यायामाची नक्कल होती. कारण संगीतानें आपल्या संरक्षकांना संवयीच्या तत्वावर शिक्षण देऊन, शास्त्रीय ज्ञानाऐवजीं एक प्रकारचा सुस्वरपणा व प्रमाणशीरपणा शिकविला. संगीतानें जे विषय शिकविले ते खोटे असोत वा खरे असोत, त्यांच्यामध्येंही असेच गुण समाविष्ट होते. परंतु ज्या तऱ्हेचा फायदा आपण सध्यां शोधीत आहोंत, तसा फायदा करून देणारी एकही शाखा संगीतामध्यें समाविष्ट नव्हती.

सॉक्रे०:—तुमची स्मरणशक्ति अगदीं बरोबर आहे. कारण खरोखरच संगीतामध्यें अशा प्रकारचें कांहींच नाहीं. पण ग्लॅकॉन्, आपणाला जें पाहिजे तें कोठें मिळूं शकेल? सर्व उपयुक्त कला अधःपतन करणाऱ्या आहेत, असें आपण ठरविलें आहे.

ग्लॅ०:—निःसंशय असें आपण ठरविलें आहे. परंतु संगीत, व्यायामशास्त्र व उपयुक्त कला, ह्यांच्याशिवाय दुसरें एखादें शास्त्र शिल्लक आहे काय?

सॉक्रे०:—ह्यांच्यापलीकडचें व ह्यांच्यापासून भिन्न, असें जर आपणास कांहीं सांपडलें नाहीं, तर सर्व ठिकाणीं लागू पडणाऱ्या विषयांपैकीं एक विषय विचारांत घेऊं.

ग्लॅ०:—कोणता विषय?

सॉक्रे०:—सर्व कला, विचारमालिका व शास्त्रें, हीं ज्याचा उपयोग करून घेतात व प्रत्येक मनुष्यानें प्रथमतः जो विषय शिकला पाहिजे, असा तो सर्वसाधारण विषय आहे.

ग्लॅ०:—त्याचें स्वरूप मला सांगा.

सॉक्रे०:—एक, दोन व तीन असे अंक, ज्या शास्त्रानें भिन्न आहेत असें दाखवितां येतें, त्या शास्त्राला मी अंकगणित शास्त्र म्हणतों. प्रत्येक कलेला व शास्त्राला, ह्या शास्त्राचा उपयोग करून घेणें भाग पडत नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—युद्धाचें शास्त्र, अंकशास्त्रापैकींच नव्हे काय?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—पलामिडिस सर्व प्रसंगीं असें सिद्ध करतों कीं, अॅगॅमेम्नॉन् हा एक मूर्ख सेनापति होता. तुमच्या लक्षांत आलें असेल कीं, पलामिडिसनें अंकपद्धति शोधून काढून ट्राय शहरीं रांगेनें सैन्य लावलें व जहाजें इत्यादि सर्व गोष्टींची गणती करून ठेवली. ह्यावरून

असा निष्कर्ष निघतो कीं, त्या काळापूर्वीं वरील गोष्टींची गणती करण्यांत आलेली नव्हती व अॅगॅमेम्नान्‌ला अंकशास्त्राचें ज्ञान नसल्यामुळें, स्वतःचे पाय सुद्धां मोजतां येत नव्हते. हें जर खरें असेल, तर अॅगॅमेम्नान् हा सेनापति म्हणून कसा काय होता ?

ग्लॅ०:—ही गोष्ट जर खरी असली, तर माझ्या मतें तो एक विचित्र सेनापति होता.

सॉक्रे०:—तर मग, गणिताचें ज्ञान सैनिकाला असणें आवश्यक आहे, असें आपण ठरविणें जरूर आहे ना ?

ग्लॅ०:—होय. सैन्याची व्यवस्था कशी करावी अथवा धीटपणा आंगीं कसा आणावा, हें शिकण्याकरितां ह्या ज्ञानाची जरूर आहे.

सॉक्रे०:—ह्या शास्त्राविषयीं तुमची व माझी कल्पना एकच आहे काय ?

ग्लॅ०:—तुमची काय कल्पना आहे ?

सॉक्रे०:—ज्या शास्त्रांच्या शोधांत आपण आहोंत, त्या शास्त्रांपैकींच विचार करावयास लावणारें असें हें एक शास्त्र आहे;
Steph परंतु आत्म्याला खऱ्या वस्तुतत्वाकडे नेणारें असें तें
523 आहे, असें समजून त्याचा कोणीही योग्य उपयोग करीत नाहीं.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—मी प्रयत्न करीन. हा हेतु साध्य करण्याकरितां मी ज्या गोष्टी उपयुक्त किंवा अनुपयुक्त समजतों, त्याविषयीं तुमची संमति अथवा नापसंति दर्शवून, मला तुम्ही मदत करावी. कारण ह्या शास्त्राच्या स्वरूपाविषयीं माझे तर्क बरोबर आहेत किंवा नाहींत, हें आपणांस त्यामुळें स्पष्टपणें समजेल.

ग्लॅ०:—तुमचें स्पष्टीकरण मला सांगा.

सॉक्रे०:—ठीक आहे. मी सांगतों. तुम्हांला असें दिसून आलें असेल कीं, आपल्या दृष्टीला कांहीं पदार्थ पूर्णपणें दिसून येतात व त्यामुळें विचारशक्तीला चालना मिळत नाहीं. ह्याच्या उलट, कांहीं पदार्थ दृष्टीला अपूर्ण दिसतात व त्यामुळें विचारशक्तीवर फार जोराचा ताण बसतो.

ग्लॅ०:—दूर अंतरावरून दिसणारे पदार्थ व यथादर्शन चित्रकला, ह्याविषयींच तुम्ही म्हणत आहांत.

सॉक्रे०:—मी काय म्हणतों, तें तुम्हांला बरोबर समजलें नाहीं.

ग्लॅ०:—तर मग, कोणते पदार्थ तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—जे पदार्थ एकाच वेळेला दोन परस्पर विरोधी संवेदना उत्पन्न करीत नाहींत, त्या सर्व पदार्थांना मी अनुद्‌बोधक असें म्हणतों. ह्याच्या उलट, जे पदार्थ अशा विरोधी संवेदना उत्पन्न करतात, त्यांना मी उद्‌बोधक म्हणतों. ह्याचा अर्थ असा कीं, जवळचा अथवा दूरचा जरी पदार्थ असला, तरी दृष्टीला दोन सारख्याच ठळक पण विरोधी संवेदना होतात. माझें म्हणणें तुम्हांला पुढील उदाहरणानें अधिक स्पष्टपणें कळेल. लहान, मधलें व तिसरें, अशीं तुमचीं तीन बोटें विचारांत घ्या.

ग्लॅ०:—ठीक आहे.

सॉक्रे०:—अगदीं जवळून तीं पहावयाची आहेत असें समजा. आतां ह्यासंबंधीं एक मुद्दा मी तुम्हांला विचारांत घेण्यास सांगत आहे.

ग्लॅ०: -तो कोणता ?

सॉक्रे०:—तीं सर्व बोटेंच असल्यामुळें, ज्या बोटाकडे आपण पहात आहोंत, तें बोट मधलें किंवा बाजूचें, पांढरें किंवा काळें, जाड किंवा पातळ असलें, तरी कांहीं भेद वाटत नाहीं. कारण जोंपर्यंत ह्या मुद्यांबद्दलच आपण विचार करतों, तोंपर्यंत मनाला, बोट म्हणजे काय

आहे असा विचार करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. वरील उदाहरणांत, बोट हें बोट नसून दुसरें कांहींतरी आहे, असें दृष्टीकडून मनाला माहीत करून दिलें जात नाहीं.

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून साहजिकच, अशा संवेदना विचाराला चालना देणाऱ्या अथवा उद्बोधक नसतात.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पण बोटांच्या निरनिराळ्या आकारांविषयीं काय म्हणतां येईल? दृष्टीला त्यांतील फरक समाधानकारक रीतीनें करतां येतो काय? एखादें बोट मध्यावर अथवा बाजूला असल्यामुळें,
Steph दृष्टीला कांहीं फरक वाटत नाहीं काय? त्याचप्रमाणें
524 स्पर्शाला जाडपणा व बारीकपणा, कठीणपणा व मृदुपणा, समाधानकारक तऱ्हेनें अजमावतां येतो काय? इतर इंद्रियांच्या संवेदनांमध्येंही असा दोष नसतो काय? वरील इंद्रियांची पुढील प्रकारें स्थिति नसते काय? उदाहरणार्थ, ज्या इंद्रियाला कठीणपणा जाणतां येतो, त्याला मृदुपणाही जाणावा लागत नाहीं काय? आणि तें इंद्रिय एकच वस्तु कठीणही व मृदुही आहे, असें मनाला माहीत करून देत नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ज्यावेळीं स्पर्शेंद्रिय, एकाच वस्तूला कठीण व मृदु म्हणतें, तेव्हां मन गोंधळून जात नाहीं काय? जेव्हां हलकी वस्तु जड आहे व जड वस्तु हलकी आहे, असें मनाला सांगण्यांत येतें, तेव्हां जडपणा व हलकेपणा ह्यांच्या अर्थाविषयीं शंका उत्पन्न होत नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. अशा प्रकारच्या संवेदना मनाला चमत्कारिक वाटून त्यांचें स्पष्टीकरण करणें आवश्यक होतें.

सॉक्रे०:—म्हणून मनाला स्वाभाविकपणेंच, अशा परिस्थितींत तर्कशक्ति व विचार ह्यांचें सहाय्य घ्यावें लागून, प्रत्येक संवेदना एक आहे अथवा दुहेरी आहे, हें ठरविण्याचा प्रयत्न करावा लागतो.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जर दुहेरी आहे असें वाटलें, तर प्रत्येक संवेदनेचा प्रत्येक भाग स्वतंत्र स्वभावाचा व एकत्रित आहे, असें उघड नाहीं काय ?

ग्लॅ०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—तर मग, प्रत्येक जर एक आहे आणि दोन्ही मिळून दोन होतात, तर मन असा निष्कर्ष काढील कीं, तीं दोन स्वतंत्र करतां येणारीं आहेत. कारण स्वतंत्र करतां येण्यासारखीं नसतीं, तर मनाला एवढेंच म्हणतां आलें असतें, तीं एक असून दोन नाहींत.

ग्लॅ०:--खरें आहे.

सॉक्रे०:—दृष्टीच्या इंद्रियानें, आपल्याला मोठ्या वस्तु व लहान वस्तु भिन्न आहेत, असें ज्ञान न होतां, उलट आपला गोंधळ झाला. माझें म्हणणें बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—पण विचारशक्तीला, इंद्रियज्ञान स्पष्ट करण्याकरितां ही पद्धत उलट करावयास आणि मोठ्या व लहान वस्तु विलग आहेत, असें मानावयास भाग पडलें.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, अशा तऱ्हेचा विरोध आपणांस, मोठेपणा व लहानपणा म्हणजे काय, असा प्रश्न विचारावयास लावीत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आणि अशाप्रकारें, बुद्धीचे विषय आणि दृष्टीचे विषय ह्यांमध्यें भेद करण्यास आपण शिकत नाहीं काय ?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—कांहीं विषय विचारांना चालना देतात व कांहीं विषय विचारांना जागृत करीत नाहींत, असें जें मी थोड्या वेळापूर्वी म्हटलें, त्याचा वरील प्रकारें अर्थ होतो-पहिल्या वर्गामध्यें अशा वस्तु असतात कीं, इंद्रियांवर एकाच वेळेस त्यांच्या विरोधी संवेदनांचाही आघात होतो. पण दुसऱ्या वर्गामध्यें असें कांहींच घडून येत नाहीं.

ग्लॅ०:—तुम्हीं काय म्हणतां तें आतां मला समजलें व माझी त्याला संमति आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. संख्या व एकपणा, ही वरील दोन वर्गांपैकीं कोणत्या वर्गांत मोडतात ?

ग्लॅ:०—मला उत्तर देतां येत नाहीं.

सॉक्रे०:—पण आपलीं पूर्वीचीं विधानें तुम्हांला निर्णय देण्यास मदत करतील. दृष्टीनें अथवा इतर इंद्रियानें, बोटाप्रमाणें एकपणा जर ग्रहण करतां आला, तर त्या एकपणांत खऱ्या
Steph अस्तित्वाकडे मनाला ओढण्याची शक्ति नसणार. परंतु
525 एकपणाच्या सर्व दृश्यांमध्यें विरोधाचें मिश्रण असलें व त्यामुळें एकपणाप्रमाणेंच अनेकपणाही दिसून आला, तर शंका उपस्थित होऊन गडबड उडून जाईल. आणि विचारशक्तीला हलवलें जाऊन, 'एकपणाचें केवल स्वरूप काय ?' असा प्रश्न विचारावा लागेल. अशा प्रकारें एकांकांचा अभ्यास आपणांस खऱ्या अस्तित्वाचें चिंतन करण्यास लावील.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. एकांकामध्यें हा गुण विशेष प्रमाणांत असतो. कारण तीच वस्तु त्याचवेळेला एक वाटते व अनंत वाटते.

सॉक्रे०:—एकांकाची जर ही स्थिति, तर सर्व अंकांचीही ही स्थिति असणार नाहीं काय ?

ग्लॅ:०—निःसंशय अशीच.

सॉक्रे०:—ठीक आहे. पण अंकगणित केवळ अंकांबद्दलच विचार करतें.

ग्लॅ:—होय.

सॉक्रे०:—आणि तें आपणांस सत्याप्रत नेतें.

ग्लॅ०:—होय. विलक्षण रीतीनें.

सॉक्रे:—म्हणून असें दिसून येईल कीं, आपण शोधांत आहोंत त्या अभ्यासांपैकीं, अंकगणित हा एक अभ्यास आहे. कारण लष्करी मनुष्याला, आपल्या सैनिकांची रचना करण्याकरितां, अंकगणिताचें ज्ञान आवश्यक असतें. तसेंच, विकारी जगताला बाजूला सारून सत्यत्वाला चिकटून राहण्याकरितां व वादविवादकुशल होण्याकरितां तत्वज्ञानी मनुष्यानेंही तें अभ्यासिलें पाहिजे.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणि आपला संरक्षक हा सैनिक असून तत्वज्ञानीही आहे.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, म्हणून ह्या विषयाचा अभ्यास करणें कायद्यानें भाग पाडलें पाहिजे. जे लोक राज्यांतील महत्वाच्या कारभारांत भाग घेणारे व्हावयाचे आहेत, त्यांचें गणितशास्त्राच्या अभ्यासाकडे मन वळविलें पाहिजे. त्यांनीं ह्या विषयाचा अभ्यास, निव्वळ हौशी लोकांप्रमाणें न करतां, अत्यंत चिकाटीनें केला पाहिजे. इतका कीं, त्यामुळें शुद्ध बुद्धीच्या मदतीनें त्यांना अंकाच्या स्वरूपाबद्दल विचार करतां येईल. पण व्यापारी व दुकानदार लोकांप्रमाणें, क्रयविक्रयाकरितां हें शास्त्र त्यांनीं शिकतां कामा नये. युद्धाच्या कामांत उपयोग व्हावा व आत्मा विकारी जगापासून खऱ्या व सत्य गोष्टींकडे वळावा, म्हणून त्यांनीं ह्या शास्त्राचें ज्ञान संपादन केलें पाहिजें.

ग्लॅ०:—तुम्हीं सांगतां तें स्तुत्य आहे.

सॉक्रे०:—गणितशास्त्राबद्दल बोलत असतांना माझ्या नुकतेंच ध्यानांत आलें कीं, तें शास्त्र फार चांगलें असून आपल्या इच्छा पूर्ण करण्याकरितां त्याचा पुष्कळ प्रकारें उपयोग करून घेतां येईल. अर्थात् व्यापारी हेतूनें हें शास्त्र न शिकतां, केवळ ज्ञानाच्याच हेतूनें शिकलें पाहिजे.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—आपण आतां म्हटल्याप्रमाणें, हें शास्त्र आत्म्याला उच्च वातावरणांत नेतें आणि जे अंक दृश्य व स्पृश्य आहेत त्यांच्याविषयीं चर्चा करावयाची नाहीं असें हळुहळू शिकवून, आत्म्याला अंकाच्या केवल स्वरूपाविषयीं विचार करावयास लावतें. कारण तुम्हांला माहीत आहे कीं, चांगले गणिती लोक, वादविवादांत एकांक सोडण्याच्या प्रयत्नाला हास्यास्पद ठरवितात. कारण एकांकाचें जर तुम्ही तुकडे पाडले तर ते पुन्हा त्याचा गुणाकार करतात; आणि एकांकानें आपले एकत्व सोडूं नये व असंख्य स्वरूप होऊं नये म्हणून फार काळजी घेतात.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—ग्लॅकान्, आतां असें समजा कीं, ह्या लोकांना कोणी असा प्रश्न विचारला, "माझा हुशार मित्रांनो! अंकाच्या कोणत्या प्रकारासंबंधीं तुम्ही चर्चा करीत आहांत?
Steph 526 तुमचें म्हणणें असें कीं, प्रत्येक एकांक समान व अविभाज्य आहे. पण अशा तऱ्हेचा एकांक ज्यांत साधला जातो असे अंक कोठें आहेत ते दाखवाल काय?" अशा प्रश्नांना ते काय उत्तर देतील असें तुम्हांला वाटतें?

ग्लॅ०:—'केवळ कल्पनेनेंच विचार करतां येणाऱ्या अंकांबद्दल आम्ही विचार करीत आहोंत,' असें माझ्या मतें तें उत्तर देतील.

सॉक्रे०:--तर मग, माझ्या मित्रा, हें शास्त्र आपणांस अत्यंत आवश्यक नाहीं काय ? हें शास्त्र मनाला शुद्ध सत्याच्या शोधनांत शुद्ध बुद्धीचा उपयोग करण्यास भाग पाडतें ना ?

ग्लॅ०:—होय. ह्या शास्त्रामध्यें हा गुण विशेष प्रमाणांत दिसून येतो.

सॉक्रे०:—ज्या लोकांना अंकगणिताची आवड आहे, त्या लोकांची बुद्धि इतर प्रकारचीं शास्त्रेंही लवकर ग्रहण करते, असें तुम्ही निरीक्षिलें असेलच ! तसेंच, मंद बुद्धीच्या लोकांनाही, ह्या शास्त्राचें शिक्षण दिलें असतां, त्यांना इतर कांही फायदा मिळवितां आला नाहीं तरी पूर्वीपेक्षां ते हुषार होतात.

ग्लॅ०:—हें खरें आहे.

सॉक्रे०:—आणि माझी अशी खात्री आहे कीं, विद्यार्थ्याला शिकण्यास त्रास व मेहनत फार पाडणारें, असें अंकगणिताशिवाय दुसरें कोणतेंही शास्त्र, तुम्हांला सहजासहजीं सांपडणार नाहीं.

ग्लॅ०:--खात्रीनेंच सांपडणार नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून ह्या सर्व मुद्यांचा विचार करतां, हें शास्त्र टाकून न देतां, उत्तम स्वभावाच्या लोकांना शिक्षण देण्यासाठीं उपयोगांत आणलें पाहिजे.

ग्लॅ०:—माझें म्हणणें तुमच्यासारखेंच आहे.

सॉक्रे०:—हा मुद्दा निश्चित झाला असें आपण समजूं या. अंकगणितासारख्या दुसऱ्या एका शास्त्राचाही आपण विचार करावा काय ?

ग्लॅ०:—भूमितिशास्त्रासंबंधीं तुम्ही म्हणतां काय ?

सॉक्रे०:--होय.

ग्लॅ०:—हें उघड आहे कीं, ह्या शास्त्राचा जो भाग लष्करी डावपेंचाला उपयोगी आहे, तो आपल्याला आवश्यकच आहे. कारण तळ देऊन पडणें, माऱ्याच्या जागा धरून बसणें, सैन्याला जवळ जवळ ठेवणें अथवा लांब लांब ठेवणें, तसेंच रणांगणावर जाण्यापूर्वी

अथवा गेल्यावर सैन्याची हालचाल करणें, ह्या सर्व कामाकरितां लष्करी मनुष्य भूमिति चांगल्या प्रकारें जाणणारा पाहिजे.

सॉक्रे०:—तथापि भूमितीचें व अंकगणिताचें सामान्य ज्ञान लष्करी कामाला पुरेसें होईल. ह्या शास्त्रांच्या अभ्यासांतील मोठा व बराचसा पुढला भाग, सत्‌तत्वाच्या आवश्यक स्वरूपाचें चिंतन करण्यास उपयुक्त आहे किंवा नाहीं हाच खरा मुद्दा आहे. खऱ्या अस्तित्वाचा जो अत्यंत आनंदमय भाग आत्म्यानें बघणें आवश्यक असतें, तो भाग ज्या वातावरणांत असतो, त्या वातावरणांत जें आत्म्याला घेऊन जातें, त्याची प्रवृत्ति वरील प्रकारची असते.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, भूमिति आत्म्याला खऱ्या अस्तित्वाचें जर चिंतन करावयास भाग पाडीत असेल, तर तिचा आपल्याला उपयोग आहे. पण जर विकारी व विनाशी गोष्टीच आपल्या नजरेस भूमिति आणून देत असेल, तर आपणांला तिची गरज नाहीं.

ग्लॅ०:—होय. आपण असेंच म्हणूं या.

सॉक्रे०:—भूमितीशीं ज्यांचा सामान्य परिचय झाला
Steph आहे, अशा लोकांनाही कबूल करावें लागेल कीं,
527 भूमितिशास्त्र, त्याच्या अभ्यासकांकडून जी भाषा वापरण्यांत येते, त्या भाषेशीं अत्यंत विसंगत असतें.

ग्लॅ०:– कसें काय?

सॉक्रे०:—मला वाटतें, हे लोक अत्यंत हास्यास्पद व भिकारी पद्धतीनें बोलत असतात. कारण वर्ग करणें, गुणाकार करणें, बेरीज करणें, अशी भाषा वापरून, जणूं कांहीं ते व्यापारांत गुंतलेले आहेत व त्यांच्या सर्व सिद्धांताना व्यावहारिक ध्येय आहे, अशा प्रकारें बोलत असतात. पण वस्तुतः ह्या शास्त्राचा अभ्यास ज्ञानवृद्धीकरितांच करावयाचा असतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आणखी एका मुद्यावर आपलें एकमत व्हावयास नको काय?

ग्लॅ०:—तो कोणता?

सॉक्रे०:—क्षणभंगुर वस्तूंच्या ज्ञानाकरितां नव्हे तर चिरंतन वस्तूंच्या ज्ञानाकरितां, भूमितिशास्त्र अभ्यासावयाचें असतें.

ग्लॅ०:—हा मुद्दा ताबडतोब मान्य होण्यासारखा आहे.

सॉक्रे०:—तर मग, प्रिय मित्रा! भूमितिशास्त्र आत्म्याला सत्याकडे ओढून तत्वज्ञानाची प्रवृत्ति निर्माण करील व सध्यां अन्यायानें खालीं दाबून टाकलें जात असलेल्या तत्वज्ञानाला वर आणील.

ग्लॅ०:—होय. भूमिति हें काम जोरदारपणें करूं शकेल.

सॉक्रे०:—म्हणून तुमच्या सुंदर शहरांतील नागरिकांना तुम्ही स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, भूमितीच्या अभ्यासांत त्यांनीं लक्ष घालणें अत्यंत आवश्यक आहे. शिवाय भूमितीचे आनुषंगिक फायदे सुद्धां क्षुल्लक नाहींत.

ग्लॅ०:—ते कोणते?

सॉक्रे०:—युद्धाच्या हालचालींसंबंधीं जे तुम्ही फायदे सांगितले, त्यांशिवाय आखणी एक विशिष्ट फायदा आहे. ज्ञानाच्या सर्व विषयांमध्यें, ज्या विद्यार्थ्यानें भूमितीचा अभ्यास केला आहे त्या विद्यार्थ्याची ग्रहणशक्ति, ज्यानें भूमितीचा अभ्यास केलेला नाहीं अशा विद्यार्थ्यापेक्षां अतिशय तीव्र असते. म्हणून विद्यार्थ्यानें भूमितीचा अभ्यास केला आहे किंवा नाहीं, ह्या गोष्टीला विशेष महत्व द्यावें लागेल.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या तरुण लोकांना, हा दुय्यम अभ्यास म्हणून शिकवावा काय?

ग्लॅ०:—होय. आपण असें करूं.

सॉक्रे०:—तसेंच ज्योतिर्विद्या हा एक तिसरा विषय म्हणून ठेवण्यास तुमची संमति आहे काय ?

ग्लॅ०:—माझी संमति आहे. कारण ऋतु, महिने, वर्षें, ह्यांसंबंधीं असलेल्या विशेष ज्ञानाचा फायदा, शेतकरी व नावाडी लोकांनाच होतो असें नाहीं, तर सेनापतीलाही होतो.

सॉक्रे०:—निरर्थक विषयांच्या अभ्यासाचा आपण आग्रह धरीत आहोंत, असें बहुजनसमाजाला वाटूं नये, म्हणून तुम्ही जी भीति प्रदर्शित करीत आहांत, त्यामुळें मला तुमची गंमत वाटते ! ह्या सर्व अभ्यासांनीं, आत्म्याच्या दृष्टीला इतर व्यवसायांमुळें जो अंधपणा व मंदपणा आलेला असतो, तो पार नाहींसा केला जातो, अशा विधानावर विश्वास बसणें खरोखरच कठीण आहे. आत्म्याच्या दृष्टीचें संरक्षण करणें, सहस्र डोळ्यांच्या संरक्षणापेक्षांही अधिक महत्वाचें आहे. कारण आत्म्याच्या ह्या दृष्टीनेंच सत्य दिसूं शकतें. म्हणून ज्यांचे आपल्याप्रमाणें विचार आहेत असे लोक, आपण नियो-
Steph जिलेल्या विषयांबद्दल पूर्ण पसंति दाखवितील. पण ज्या
528 लोकांना हें तत्त्व मुळींच मान्य नाहीं, त्यांना हे विषय निरर्थक वाटतील. कारण त्यांना व्यावहारिक उपयुक्तते-पेक्षां त्यांपासून विशेष फायदा आहे असें वाटणार नाहीं. म्हणून ह्यांच्यापैकीं कोणत्या पक्षाबरोबर तुम्ही चर्चा करीत आहांत, हें तावडतोब ठरवून घ्या; अथवा कोणताही पक्ष मनांत न धरतां, स्वतःच्या जबाबदारीवरच जर तुम्हांला वाद करावयाचा असेल, तर ह्या वादविवादापासून दुसऱ्या कोणाला फायदा झाला तर तुम्ही तक्रार करतां कामा नये.

ग्लॅ०:—मी दुसराच मार्ग स्वीकारतों. माझें भाषण व माझीं प्रश्नोत्तरें, माझ्या स्वतःच्या जबाबदारीवरच मी करण्यास तयार आहे.

सॉक्रे०:—थोड्या वेळांपूर्वी भूमिती नंतर ज्योतिर्विद्येचा आपण अनुक्रम लावला; पण हा अनुक्रम चुकीचा होता.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आणखी एका मुद्यावर आपलें एकमत व्हावयास नको काय ?

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—क्षणभंगुर वस्तूंच्या ज्ञानाकरितां नव्हे तर चिरंतन वस्तूंच्या ज्ञानाकरितां, भूमितिशास्त्र अभ्यासावयाचें असतें.

ग्लॅ०:—हा मुद्दा ताबडतोब मान्य होण्यासारखा आहे.

सॉक्रे०:—तर मग, प्रिय मित्रा ! भूमितिशास्त्र आत्म्याला सत्याकडे ओढून तत्वज्ञानाची प्रवृत्ति निर्माण करील व सध्यां अन्यायानें खालीं दाबून टाकलें जात असलेल्या तत्वज्ञानाला वर आणील.

ग्लॅ०:—होय. भूमिति हें काम जोरदारपणें करूं शकेल.

सॉक्रे०:—म्हणून तुमच्या सुंदर शहरांतील नागरिकांना तुम्ही स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, भूमितीच्या अभ्यासांत त्यांनीं लक्ष घालणें अत्यंत आवश्यक आहे. शिवाय भूमितीचे आनुषंगिक फायदे सुद्धां क्षुल्लक नाहींत.

ग्लॅ०:—ते कोणते ?

सॉक्रे०:—युद्धाच्या हालचालींसंबंधीं जे तुम्ही फायदे सांगितले, त्यांशिवाय आणखी एक विशिष्ट फायदा आहे. ज्ञानाच्या सर्व विषयांमध्यें, ज्या विद्यार्थ्यानें भूमितीचा अभ्यास केला आहे त्या विद्यार्थ्याची ग्रहणशक्ति, ज्यानें भूमितीचा अभ्यास केलेला नाहीं अशा विद्यार्थ्यापेक्षां अतिशय तीव्र असते. म्हणून विद्यार्थ्यानें भूमितीचा अभ्यास केला आहे किंवा नाहीं, ह्या गोष्टीला विशेष महत्व द्यावें लागेल.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—तर मग, आपल्या तरुण लोकांना, हा दुय्यम अभ्यास म्हणून शिकवावा काय ?

ग्लॅ०:—होय. आपण असें करूं.

सॉक्रे०:—तसेंच ज्योतिर्विद्या हा एक तिसरा विषय म्हणून ठेवण्यास तुमची संमति आहे काय?

ग्लॅ०:—माझी संमति आहे. कारण ऋतु, महिने, वर्षें, ह्यांसंबंधीं असलेल्या विशेष ज्ञानाचा फायदा, शेतकरी व नावाडी लोकांनाच होतो असें नाहीं, तर सेनापतीलाही होतो.

सॉक्रे०:—निरर्थक विषयांच्या अभ्यासाचा आपण आग्रह धरीत आहोंत, असें बहुजनसमाजाला वाटूं नये, म्हणून तुम्ही जी भीति प्रदर्शित करीत आहांत, त्यामुळें मला तुमची गंमत वाटते! ह्या सर्व अभ्यासांनीं, आत्म्याच्या दृष्टीला इतर व्यवसायांमुळें जो अंधपणा व मंदपणा आलेला असतो, तो पार नाहींसा केला जातो, अशा विधानावर विश्वास बसणें खरोखरच कठीण आहे. आत्म्याच्या दृष्टीचें संरक्षण करणें, सहस्र डोळ्यांच्या संरक्षणापेक्षांही अधिक महत्वाचें आहे. कारण आत्म्याच्या ह्या दृष्टीनेंच सत्य दिसूं शकतें. म्हणून ज्यांचे आपल्याप्रमाणें विचार आहेत असे लोक, आपण नियोजिलेल्या विषयांबद्दल पूर्ण पसंति दाखवितील. पण ज्या

Steph 528 लोकांना हें तत्त्व मुळींच मान्य नाहीं, त्यांना हे विषय निरर्थक वाटतील. कारण त्यांना व्यावहारिक उपयुक्ततेपेक्षां त्यांपासून विशेष फायदा आहे असें वाटणार नाहीं. म्हणून ह्यांच्यापैकीं कोणत्या पक्षाबरोबर तुम्ही चर्चा करीत आहांत, हें तावडतोब ठरवून घ्या; अथवा कोणताही पक्ष मनांत न धरतां, स्वतःच्या जबाबदारीवरच जर तुम्हांला वाद करावयाचा असेल, तर ह्या वादविवादापासून दुसऱ्या कोणाला फायदा झाला तर तुम्ही तक्रार करतां कामा नये.

ग्लॅ०:—मी दुसराच मार्ग स्वीकारतों. माझें भाषण व माझीं प्रश्नोत्तरें, माझ्या स्वतःच्या जबाबदारीवरच मी करण्यास तयार आहे.

सॉक्रे०:—थोड्या वेळांपूर्वीं भूमिती नंतर ज्योतिर्विद्येचा आपण अनुक्रम लावला; पण हा अनुक्रम चुकीचा होता.

ग्लॅ०—कसा काय ?

सॉक्रे०:—सरलरेषा भूमितीचा विचार केल्यावर, घनपदार्थांचा स्वतंत्रपणानें विचार न करतां, आपण घनपदार्थ परिभ्रमणस्थितींत कसे असतात ह्याबद्दल विचार करूं लागलों. पण खरा अनुक्रम म्हणजे द्विपरिणामांचा विचार केल्यावर त्रिपरिणामांचा विचार करणें होय. ह्यामुळें आपणास घनाकृतींचा व घनपरिणामांचा विचार करतां येतो.

ग्लॅ०:—खरें आहे. पण हे विषय अजून संशोधिलेले नाहींत.

सॉक्रे०:—त्यांचें संशोधन न होण्याची कारणें दोन आहेत. पहिलें कारण म्हणजे हे विषय कठीण आहेत आणि कोणतेंही राज्य त्यांना आश्रय देत नसल्यामुळें, त्यांचें संशोधनही उत्साहानें केलें जात नाहीं. दुसरें असें कीं, जे लोक हे विषय संशोधितात, त्यांना मार्गदर्शकाची जरूर असते. कारण त्याच्यावाचून ते कांहींच शोध लावूं शकणार नाहींत. असा मार्गदर्शक सांपडणें अगोदर कठीण असतें. आणि जरी मिळाला तरी, हल्लींचे गर्विष्ठ विद्यार्थी त्याच्या सूचना ऐकणार नाहींत. पण जर सरकारच ह्या अभ्यासाला मान्यता देऊन स्वत: मार्गदर्शक म्हणून राहील, तर हे विद्यार्थी नम्रपणा दाखवितील आणि ह्या विषयाचें सारखें जोरानें संशोधन झाल्यामुळें त्याचें खरें स्वरूप स्पष्ट होईल. कारण हल्लीं सुद्धां, सामान्य लोकांकडूनच नव्हे तर, ज्यांना त्याच्या उपयुक्ततेबद्दल कांहीं सांगतां येत नाहीं अशा संशोधकांकडून, ह्या विषयाची अवहेलना व संक्षेप केला जात असूनही हा विषय स्वत:च्या सौंदर्यानेंच प्रगति पावत आहे. म्हणून सरकारच्या आश्रयानें वरील अडचणी दूर केल्या असतां, हा विषय पूर्ण उजेडांत येईल, ह्याविषयीं मला संशय वाटत नाहीं.

ग्लॅ०:—ह्या विषयामध्यें विशिष्ट आकर्षण आहे हें खरें आहे. पण तुम्ही जें आतां म्हणत होतां तें अधिक स्पष्ट करा. भूमिति म्हणजे समान पातळींचें संशोधन, अशी व्याख्या तुम्ही केलीत असें मला वाटतें.

सॉक्रे०:—होय.

ग्लॅ०:—भूमितीनंतर तुम्ही ज्योतिर्विद्येचा क्रम लावला; पण नंतर तो क्रम चुकीचा ठरविला.

सॉक्रे०:—होय. जितकी मी घाई करावयास जातों तितकी माझी प्रगति कमी होते. भूमितीनंतर खरोखर घनभूमितीचाच क्रम साहजिक येतो. परंतु ह्या विषयाचा अभ्यास विचित्रपणानें होत असल्यामुळें मी तो गाळला व भूमितीनंतर ज्योतिर्विद्येचा म्हणजे घनपदार्थांच्या गतीच्या अभ्यासाचा क्रम लावला.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—जें शास्त्र आपण आतां गाळलें, तें सरकार जेव्हां उत्तेजन देईल तेव्हां पुढें येईल, असें समजून ज्योतिर्विद्या हा अभ्यासक्रमांतील चवथा विषय म्हणून ठरवूं.

ग्लॅ०:—साक्रेटिस्, ही कल्पना योग्य आहे. थोड्याच वेळांपूर्वी मी ज्योतिर्विद्येबद्दल जी अडाणीपणानें स्तुति केली त्याबद्दल तुम्ही माझी चेष्टा केलीत. म्हणून आतां तुमच्या तत्वा-
Steph 529 प्रमाणेंच मी ह्या विद्येची स्तुति करतों. ज्योतिर्विद्या आत्म्याला वर बघावयास लावून, ह्या जगांतील वस्तूं-वरून दृष्टि काढून वरच्या जगाकडे नेते, हें कोणालाही स्पष्टच आहे.

सॉक्रे०:—माझ्याशिवाय इतर सर्वांना जरी हें स्पष्ट असलें, तरी माझें मत भिन्न असल्यामुळें मला हें विधान स्पष्ट वाटत नाहीं.

ग्लॅ०:—मग तुमचें काय मत आहे?

सॉक्रे०:—ज्योतिर्विद्येला जे लोक तत्वज्ञानाइतकी श्रेष्ठ ठरवितात, ते लोक आत्म्याला निःसंशय खालीं बघावयास लावतात.

ग्लॅ०:—तें कसें?

सॉक्रे०:—जें शास्त्र आकाशस्थ वस्तूंविषयीं विचार करतें त्याच्या खऱ्या स्वरूपाची फारच उच्च कल्पना तुम्ही बाळगतां! एखादा

मनुष्य आपलें डोकें मागें टाकून, नकशीदार तक्तपोशीचें चिंतन करून त्यापासून ज्ञान घेऊं लागला, तर आपल्या डोळ्यांनीं तो विचार करीत नसून आपल्या बुद्धीनेंच करतो आहे असें तुम्ही म्हणाल. कदाचित् तुमची कल्पना बरोबर असून माझी मूर्खपणाची असेल. मला स्वतःला असें वाटतें कीं, कोणतेंही शास्त्र जर खऱ्या व अदृश्य वस्तूबद्दल विचार करणारें नसलें, तर तें आत्म्याला वर बघावयास लावीत नाहीं. मनुष्य आकाशाकडे आचरटपणानें बघत असला काय किंवा अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनीं जमिनीकडे बघत असला काय, त्यापासून फरक कांहींच होत नाहीं. जोंपर्यंत तो इंद्रियानीं जाणतां येणाऱ्या वस्तूंबद्दल अभ्यास करीत आहे, तोंपर्यंत त्यानें ज्ञान म्हणून कांहीं संपादन केलें आहे, असें मी कबूल करणार नाहीं. कारण कोणतेही इंद्रियगम्य विषय शास्त्रीय पद्धतीनें अभ्यासतांच येत नाहींत. आणि म्हणून माझें असें म्हणणें आहे कीं, एखाद्या पोहणाऱ्या मनुष्याप्रमाणें, समुद्रामध्यें अथवा सुक्या जमिनीवर, आपल्या पाठीवर पडून जरी तो अभ्यास करीत असला, तरी त्याचा आत्मा वर बघत नसून खालींच बघतो.

ग्लॅ०:—मला योग्य शिक्षा झाली! कारण तुमच्या वाग्दंडास मी पात्रच होतों! परंतु आपल्याला ज्या हेतूंकरितां ज्योतिर्विद्या अभ्यासिली जावी असें वाटतें, त्या हेतूंच्या दृष्टीनें ज्योतिर्विद्या प्रचलित असलेल्या पद्धतीपेक्षां निराळ्या पद्धतीनें अभ्यासिली पाहिजे, असें जें तुम्ही म्हटलें त्याचें स्पष्टीकरण कराल काय?

सॉक्रे०:—मी स्पष्ट करतों. हें तारकामय आकाश, दृश्य जगताचा एक भाग असल्यामुळें, दृश्य वस्तूंमध्यें जरी अत्यंत सुंदर व पूर्ण असलें, तरी खऱ्या परिभ्रमणांपेक्षां तें पुष्कळच कनिष्ट समजलें पाहिजे. केवल गति व केवल मंदता, खऱ्या अंकामध्यें व खऱ्या आकारामध्यें शिरून, हीं परिभ्रमणें व त्यांचा परस्परसंबंध घडवून आणीत असतात व तीं दृष्टिगम्य नसून बुद्धीनें व विचारानेंच जाणतां येणारीं असतात, असें मला वाटतें. तुमचें मत भिन्न आहे काय?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून तारकामय आकाश उच्च विषयांच्या अभ्यासाचा आदर्श समजावा. डेडालसनें अथवा दुसऱ्या एखाद्या कारागिरानें काढलेल्या उत्तम आकृतींप्रमाणें आकाशाचा उपयोग करावा. कारण मला वाटतें, ज्याला भूमितीचें ज्ञान आहे अशा मनुष्याला
Steph 530 अशा आकृती अत्यंत सुंदर वाटतील. परंतु केवल सारखेपणा, केवल दुप्पटपणा, अथवा दुसरें एखादें केवल प्रमाण, ह्यांची खरी कल्पना त्यांपासून होईल, असें त्याला स्वप्नांत सुद्धां वाटणार नाहीं.

ग्लॅ०:—निःसंशय ही कल्पना हास्यास्पद आहे.

सॉक्रे०:—खरा ज्योतिर्विद, तारकांच्या गति अशाच भावनांनीं पाहील असें तुम्हाला वाटत नाहीं काय? ह्याचा अर्थ असा कीं, आकाश व त्यांतील वस्तु, स्वर्गीय कारागिरानें अत्युत्तम सौंदर्यासहित निर्माण केल्या आहेत, असें तो समजणार नाहीं काय? परंतु दिवसाचें रात्रीशीं प्रमाण, ह्या दोहोंचें महिन्याशीं प्रमाण, महिन्याचें वर्षाशीं प्रमाण व इतर तारकांचें सूर्य व चंद्र ह्यांच्याशीं व एकमेकांशीं प्रमाण, ह्यांविषयीं जर एखादा मनुष्य म्हणूं लागला कीं, त्या दृश्य व भौतिक वस्तु विकाररहित व स्थिर आहेत, तर त्या मनुष्याकडे तो तुच्छतेनें बघणार नाहीं काय? आणि त्यांची खरी स्थिति समजून घेण्यांत अवास्तव परिश्रम करणें, तो हास्यास्पद समजणार नाहीं काय?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें ऐकल्यानंतर मलाही आतां असेंच वाटतें.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें आपण भूमितींत प्रमेयासंबंधी विचार करतो त्याप्रमाणें ज्योतिर्विद्येचा अभ्यास करूं. पण जर ज्योतिर्विद्या खरोखर समजून घेण्याचा आपला हेतु असेल व त्यामुळें आत्म्याची स्वाभाविक बुद्धि खरोखर उपयुक्त करून घ्यावयाची असेल, तर आपणांस आकाशांतील वस्तूंविषयीं विचार करणें सोडून द्यावें लागेल.

ग्लॅ०:—पण तुमची ही पद्धत, प्रचिलित असलेल्या जोतिर्विद्येच्या अभ्यासाच्या पद्धतीपेक्षां पुष्कळ अधिक परिश्रमाची आहे, असें मला खात्रीनें वाटतें.

सॉक्रे०:—होय. आपण कायदेपंडित म्हणून जर उपयुक्त होणार असलों, तर अशाच प्रमाणांत दुसऱ्याही पद्धती आपणांस ठरवाव्या लागतील, असें मला वाटतें. असो. दुसरें कोणतें शास्त्र तुम्ही सुचवितां ?

ग्लॅ०:—विचार केल्याशिवाय तें मला सुचवितां येणार नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. गति निरनिराळ्या प्रकारची असूं शकते. ह्या प्रकारांची पूर्ण संख्या एखादा विद्वान् तत्वज्ञानी सांगू शकेल. पण आपल्यासारख्या लोकांना माहीत असलेले प्रकार दोन आहेत.

ग्लॅ०:—ते कोणते ?

सॉक्रे०:—एक आपण अगोदरच वर्णन केला आहे. दुसरा त्याच्या सारखाच आहे.

ग्लॅ०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें आपले डोळे आकाशांतील वस्तूंच्या गती ओळखण्याकरितां आहेत, त्याप्रमाणें आपले कान गतींची सुसंगति ओळखण्याकरितां आहेत, असें दिसून येईल. आणि ह्यामुळें पायथोगोरिअन्स् म्हणतात त्याप्रमाणें दोन सारखीं शास्त्रें तयार झालीं आहेत. ग्लॅकॉन्, आपलेंही असेंच मत आहे ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आपली चर्चा फार लांबेल, ह्या कारणाकरितां पायथागोरीअन्सना आपण हा व आणखी कांहीं प्रश्न विचारूं. परंतु तोंपर्यंत आपलें तत्व कायम ठेवूं.

ग्लॅ०:—कोणतें तत्व ?

सॉक्रे०:—आपल्या विद्यार्थ्यांना ह्या शास्त्रांची कोणतीही अपूर्ण शाखा अभ्यासूं देतां कामा नये. तसेंच, ज्योतिर्विद्येसंबंधीं बोलत

Steph 531 असतांना आपण आतांच म्हटलें कीं, सर्व वस्तूंचा ज्या बिंदूवर शेवट झाला पाहिजे, तो बिंदु शेवटीं ज्या शास्त्राला गांठतां येणार नाहीं, असें कोणतेंही शास्त्र अभ्यासू देतां कामा नये. कारण तुम्हाला माहीत असेल कीं, स्वरशास्त्र ( Harmony ) हें ज्योतिर्विद्येसारखेंच अभ्यासिलें जात आहे. ज्योतिर्विदांप्रमाणेंच स्वरशास्त्रपंडित, सूर आणि सूरांचा मेळ कानांनींच ओळखतात व म्हणून निष्फळ परिश्रम करीत असतात.

ग्लॅ०:— खरोखरच ते स्वतःला हास्यास्पद करून घेतात. पुनरावृत्तीं-बद्दल (Repetitions) ते बोलतांना, जणूं कांहीं आपल्या शेजाऱ्यां-कडून सूर काढण्याचा निश्चय केला आहे, अशा तऱ्हेनें आपले कान तीक्ष्णपणें लावतात. नंतर एक पक्ष म्हणतो, मधला स्वर अजूनही ओळखतां येतो आणि तो अत्यंत लहान असल्यामुळें, त्यालाच प्रमाण समजलें पाहिजे. दुसरा पक्ष म्हणतो कीं, सूर आतां एकात्मता पावले आहेत. अशा तऱ्हेनें दोन्ही पक्ष आपल्या बुद्धीऐवजीं कानांनाच महत्व देतात.

सॉक्रे०:—जे लोक तारांना त्रास देऊन खुंट्यांवर ( Pegs ) त्यांना छेडतात, अशाच लोकांना अनुलक्षून तुम्ही म्हणत आहांत. तारांवर प्लेक्ट्रमनें ( Plectrum ) दिलेले आघात, तारांचा चिडखोरपणा, मुग्धपणा व हट्टीपणा, ह्याविषयीं बोलून ही उपमा लांबविण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. अशा लोकांसंबंधीं मी बोलत नसून, स्वरशास्त्रा-बद्दल ज्यांचा सल्ला घ्यावयाचा असें आपण ठरविलें, त्या लोकांसंबंधीं मी बोलत आहें. कारण ज्योतिर्विदांप्रमाणेंच हे लोक वागतात. म्हणजे असें कीं, ऐकतां येणाऱ्या स्वरांमधील गणितीप्रमाण हे शोधून काढतात. पण कोणते अंक एकमेकांशीं सुसंगत आहेत व कोणते नाहींत व त्यांतील भेदाचें कारण काय, अशा प्रश्नांसंबंधीं ते विचार करीत नाहींत.

ग्लॅ०:— ह्या कामाला मानवी शक्ती पुरी पडणार नाहीं.

सॉक्रे०:—हें काम इतर दृष्टीनें जरी निरर्थक असलें, तरी सौंदर्य व सत् ह्यांच्या संशोधनास अत्यंत उपयुक्त आहे, असें म्हणणें वाजवी होईल.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—जर वर निर्देशिलेल्या शास्त्रांचा अभ्यास, आपणांस त्यांचे परस्पर संबंध व संगति दाखवून, त्या सर्वांना एकत्र बांधण्याचे जे दुवे आहेत, त्यांचें स्वरूप शिकवील, तर मला वाटतें, ह्या शास्त्रांचा लक्षपूर्वक अभ्यास आपल्या हेतूच्या सिद्धीस मदत करील आणि ह्याकरितां केलेला परिश्रम निष्फळ होण्याऐवजीं यशस्वी होईल.

ग्लॅ०:—सॉक्रेटिस, माझी सुद्धां अशीच भावना आहे. पण तुम्ही म्हणतां तें काम फार मोठें आहे.

सॉक्रे०:—प्रस्तावनेसंबंधीं तुम्ही म्हणतां काय ? अथवा कशाविषयीं म्हणतां ? जें शास्त्र आपणास शिकावयाचें आहे त्याची ही प्रस्तावना आहे, असें आपणास स्मरण करून देण्याची खरोखर जरूर नाहीं. कारण ह्या विषयांत ( गणित ) पारंगत असलेल्या लोकांना, तुम्ही ब्रह्मविद्यानिष्णात ( Dialectician ) म्हणणार नाहीं, असें मी समजतों.

ग्लॅ०:—ह्यांपैकीं कोणालाही मी ब्रह्मविद्यानिष्णात समजत नाहीं.

सॉक्रे०:—जे लोक प्रथम तत्वांच्या चर्चेत भाग घेण्यास असमर्थ असतात, त्या लोकांना आवश्यक ज्ञानाचा, एक कण तरी माहीत असतो काय ?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—आतां आपण ब्रह्मविद्येच्या शास्त्रापर्यंत येऊन पोहोंचलों नाहीं काय ? हें शास्त्र बुद्धीच्या प्रदेशांत पडत असल्यामुळें, केवळ दृष्टीच्या शक्तीलाच त्याचें अनुकरण करतां येतें. आपण पूर्वीं म्हटल्याप्रमाणें, दृष्टि प्रथम खऱ्या प्राणीमात्रांकडे
Steph 532
स्थिरतेनें बघण्याचा प्रयत्न करते, नंतर तारकांकडे बघते

व शेवटीं खुद्द सूर्याकडे बघते. जेव्हां एखादा मनुष्य, ब्रह्मविद्येच्या साहाय्यानें, इंद्रियगम्य ज्ञानाच्या मदतीशिवाय बुद्धीच्या मार्गानें, सत्तत्वाच्या संशोधनास लागतो व शुद्धबुद्धीच्या योगानें सत्तत्वाचें खरें स्वरूप ग्रहण करीपर्यंत डगमगत नाहीं, तेव्हां ज्याप्रमाणें दृष्टीनें मनुष्याला दृश्य जगाच्या अंतापर्यंत जातां येतें, त्याप्रमाणें हा मनुष्य बौद्धिक जगताच्या अंतापर्यंत जाऊं शकतो.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि ह्या प्रगतीलाच तुम्ही ब्रह्मविद्या म्हणतां.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, कैद्यांची शृंखलांतून मुक्तता, आकृतींच्या छायेपासून प्रत्यक्ष आकृतींपर्यंत व प्रकाशापर्यंत त्यांचें गमन आणि गुहेंतून सूर्यप्रकाशापर्यंत त्यांचें आरोहण, आणि तेथें गेल्यावर प्राणी, वनस्पति आणि सूर्यप्रकाश वस्तुतः त्यांना बघतां न येऊन त्यांचीं पाण्यांतील प्रतिबिंबें त्यांना दिसणें, (हीं प्रतिबिंबें खरोखर दैवी व सद्वस्तूंच्या छाया होत. कारण सूर्याबरोबर तुलना करतां, जो गुहेंतील प्रकाश आकृतींच्या छाया पाडतो, त्याला केवळ प्रतिमाच म्हणतां येईल.)—हे मुद्दे, मी म्हणतों, आपण वर वर्णन केलेल्या सर्व कलांच्या अभ्यासांमध्यें सारखेच दिसून येतील. ह्या अभ्यासांमध्यें, आत्म्याचा अत्यंत उदात्त भाग उच्च कोटीला नेण्याचें सामर्थ्य असतें. आणि ज्या वस्तु खरोखरच अस्तित्वांत आहेत, त्यांतील जो उत्तम भाग त्याचें चिंतन करण्यास हे अभ्यास मदत करतात. शरीराचा अत्यंत तेजस्वी भाग म्हणजे दृष्टि. तिला भौतिक जगांतील अत्यंत तेजस्वी पदार्थांचें चिंतन करण्यास जशी मदत होते, तशी आत्म्यालाही वरील अभ्यासांनीं होते.

ग्लॅ०:—मी स्वतः हें विधान मान्य करतों. परंतु स्वीकारण्यास तें कठीण आहे, असें मी कबूल करतों. पण दुसऱ्या दृष्टीनें विचार

करतां, हें नाकबूल करणें सुद्धां कठीण आहे. तथापि त्याविषयीं चर्चा ह्याच प्रसंगीं पूर्ण व्हावयाची नसून, पुढें अनेक प्रसंगीं त्याची पुनरावृत्ति व्हावयाची असल्यामुळें, तुमच्या तत्वाचा खरेपणा धरून चालूं आणि तें शास्त्र काय आहे ह्यासंबंधीं, ज्याप्रमाणें प्रस्तावनेबद्दल आपण चर्चा केली, त्याप्रमाणें चर्चा करूं. म्हणून ब्रह्मविद्येचें स्वरूप, तिचे विभाग व मार्ग, ह्याविषयीं आम्हाला सांगा. कारण हे मार्गच आपणाला आपल्या इच्छित स्थळीं बहुतकरून नेतील.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय ग्लॅकॉन्, जरी माझी खुषी असली तरी ह्यापुढें माझ्याबरोबर तुम्हांला येववणार नाहीं. माझ्या
Steph कल्पनेप्रमाणें जें सत्‌तत्व मला दिसत आहे, त्या
533 सत्‌तत्वाचें नुसतें सादृश्य नव्हे तर खरें स्वरूप तुम्हांला आतां दिसणार आहे. माझें म्हणणें बरोबर आहे किंवा चुकीचें आहे, हें निश्चयात्मक सांगण्यास मी धजावत नाहीं. पण आपलें विशेष चुकलेंलें नाहीं, असें मला खात्रीनें वाटतें.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ज्या मनुष्यानें आपण वर्णन केलेल्या शास्त्रांत प्रावीण्य संपादन केलें आहे, त्याला ब्रह्मविद्येनेंच सत्याचें स्वरूप पहावयास मिळेल, इतर कोणत्याही तऱ्हेनें मिळणार नाहीं.

ग्लॅ०:—ह्या मुद्यावरही तुमचें हें विधान निश्चयात्मक म्हणतां येईल.

सॉक्रे०:—प्रत्येक विशिष्ट वस्तूच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना, पद्धतशीर रीतीनें करून देण्याचा प्रयत्न इतर कोणतीही पद्धत करूं शकत नाहीं, अशा आपल्या विधानाला कोणीही विरोध करणार नाहीं. कारण सामान्यतः सर्व कला, लोकांचीं मतें व गरजा ह्यांसंबंधीं विचार करणाऱ्या असतात, अथवा शरीरांची उत्पत्ति, रचना व रक्षण ह्यांच्या संबंधीं विचार करणाऱ्या असतात. आपल्या मतें सत्यस्वरूपाबद्दल ज्यांना थोडेसें ज्ञान असतें, अशीं भूमिति व तिच्यासारखीं दुसरीं शास्त्रें,

ह्यांच्यासंबंधीं आपणांस असें आढळून येतें कीं, ह्या शास्त्रांनीं खऱ्या अस्तित्वाबद्दल स्वप्नांतच कल्पना करावी! कारण जोंपर्यंत गृहीत कल्पना तीं तपासत नाहींत व त्यांचें स्पष्टीकरणही करीत नाहींत, तोंपर्यंत जागतेपणीं त्यांना खरें अस्तित्व कळणार नाहीं. कारण मनुष्य जेव्हां त्याला माहीत नसलेलें पहिलें तत्व गृहीत धरून चालतो व ह्या अज्ञात अशा तत्वावर पुढील सिद्धांताचें जाळें विणून शेवटीं निष्कर्ष काढतो, तेव्हां अशा सिद्धांताना शास्त्र म्हणून संबोधतां येईल काय?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून फक्त ब्रह्मविद्याच पुढील मार्ग स्वीकारते. प्रथम तत्वापर्यंत सरळ जाऊन, ती आपलें स्थान अढळ करण्याकरितां गृहीत कल्पनांचा त्याग करते. आत्म्याचा चक्षु अज्ञानीपणाच्या चिखलांत पूर्णपणें गाडलेला बघून, आपण चर्चा केलेल्या कलांच्या मदतीनें हळुहळू त्याला बाहेर काढून उच्च वातावरणांत नेते. ह्या कलांना आपण रूढ पद्धतीप्रमाणें शास्त्रें म्हणून म्हटलें आहे. परंतु ज्या अर्थी (समज) मतापेक्षां अधिक व शास्त्रापेक्षां कमी स्पष्टता त्यांच्यामध्यें दिसून येते, त्याअर्थी त्यांना निराळें नांव दिलें पाहिजे. आपण पूर्वी दुसऱ्या एका प्रसंगीं, त्यांना मानसिक क्रिया व्यक्त करणारीं म्हणून, ग्रहणशक्ति असें संबोधिलें. पण महत्वाच्या विषयाबद्दल विचार करण्याचें आपण ठरविलें असल्यामुळें, नुसत्या नांवाबद्दल वाद करीत बसणें निरर्थक आहे, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. कारण मनाची स्थिति, ज्यामुळें स्पष्टपणें व्यक्त करतां येईल, असें नांव दिलें असतां आपलें भागण्यासारखें आहे.

सॉक्रे०:—पूर्वीप्रमाणेंच पहिल्या भागाला शास्त्र, दुसऱ्या भागाला ग्रहणशक्ति, तिसऱ्याला श्रद्धा व चवथ्याला अनुमान, असें म्हणण्यांत

मला समाधान वाटतें. दुसऱ्या दोन्ही मिळून मत (समज) तयार होतें आणि अगोदरच्या दोन्ही मिळून बुद्धि तयार होते. मत (समज) हें बदल पावणाऱ्या वस्तूंबद्दल व बुद्धि सत्याबद्दल विचार करते. ज्याप्रमाणें सत्याचा विकृतीशीं संबंध आहे, त्याप्रमाणें बुद्धीचा मताशीं संबंध आहे, व ज्याप्रमाणें बुद्धीचा मताशीं संबंध आहे, त्याप्रमाणें शास्त्राचा श्रद्धेशीं आहे आणि ग्रहणशक्तीचा अनुमानाशीं आहे. परंतु मनाच्या क्रियांचे हे विषय, आणि मत व बुद्धि ह्यांच्या क्षेत्रांतील दुहेरी विभागणी, ह्यांच्यामध्यें जो सारखेपणा आहे तो आपण सोडून देऊं या. नाहींतर ग्लॅकॉन्, आपण पूर्वी केलेल्या वादापेक्षांही जास्त वाद करावा लागेल.

Steph 534

ग्लॅ०:—मला जें कांहीं समजलें, तदनुसार ह्या सर्व मुद्यांना मी अनुमोदन देतों.

सॉक्रे०:—प्रत्येक वस्तूच्या तत्वाबद्दल जो विचारपूर्वक माहिती करून घेत असतो, त्याला तुम्ही ब्रह्मविद्याप्रवीण म्हणाल ना? आणि अशी माहिती स्वतःला अथवा दुसऱ्याला ज्याला सांगतां येत नाहीं, त्यानें आपली शुद्धबुद्धि ह्या विषयावर खर्च केलेली नाहीं, असें तुम्ही म्हणाल ना?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जोंपर्यंत मनुष्याला सत्तत्वाचें आवश्यक स्वरूप, इतर सर्व दुसऱ्या गोष्टींपासून वेगळें करून तर्कपद्धतीनें बरोबर सांगतां येत नाहीं, तसेंच जोंपर्यंत विवेचनपद्धतींत एकही चूक न करतां सत्तत्वावरील सर्व आक्षेपांचें, मताच्या जोरावर नव्हे तर सत्याच्या जोरावर, निरसन करतां येत नसल्यामुळें वाग्युद्धांत जय मिळवितां येत नाहीं, तोंपर्यंत त्याला सत्तत्व अथवा सद्वस्तु कळली नाहीं, असें तुम्हीं म्हणणार नाहीं काय? त्याला सत्तत्वाचा आभास म्हणून जें कांहीं

समजलें असेल, तें शास्त्राऐवजीं मताचें फळ नव्हे काय ? तो हल्लींच्या आयुष्यांत नुसता झोंपा काढीत असून, स्वप्नें अनुभवीत आहे व ज्यामध्यें सदैवच त्याला निद्रा घ्यावी लागणार आहे, अशा दुसऱ्या जगामध्यें जाईपर्यंत तो कधीं जागाही होणार नाहीं, असें तुम्हीं म्हणणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. मी खात्रीनेंच असें म्हणेन.

सॉक्रे०:- ज्या मुलांच्या स्वभावर व शिक्षणावर तुम्हीं लक्ष ठेवीत आहांत, तीं मुलें जोंपर्यंत लेखणीच्या फटकाऱ्याप्रमाणें अविवेकी आहेत, तोंपर्यंत राज्यांमध्यें त्यांना अधिकारी नेमून, अत्यंत महत्वाच्या प्रश्नांचा निकाल करण्याचा अधिकार द्याल काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—ब्रह्मविद्येचीं शस्त्रें, ज्यामुळें शास्त्रीय रीतीनें वापरण्याचें त्यांना समजेल, असें शिक्षण त्यांनीं मुख्यत्वेंकरून घ्यावें असा कायदा तुम्हीं कराल ना ?

ग्लॅ०:—होय, तुमच्या मदतीनें मी असा कायदा करीन.

Steph सॉक्रे०:—सर्व शास्त्रांच्या शिखरावरचा दगड म्हणून
535 ब्रह्मविद्येचें अधिष्ठान असतें व शास्त्रांची श्रेणी पूर्ण झाल्यामुळें इतर कोणतेंही शास्त्र ब्रह्मविद्येच्या शास्त्रावर ठेवतां येणार नाहीं, असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय, तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून ज्या लोकांना हे अभ्यास आपण करावयास सांगणार, त्यांची निवड करणें व अभ्यासाची वांटणी कोणत्या तत्वावर करावयाची हें निश्चित करणें, हीं कामें आतां तुम्हांला केलीं पाहिजेत.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—कांहीं वेळापूर्वीं अधिकाऱ्यांची निवड करतांना, कोणत्या तऱ्हेचे लोक आपण पसंत केले होते, हें तुम्हांला आठवतें काय ?

ग्लॅ०: — खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ठीक आहे. जे गुण आपण त्यावेळेस निर्देशिले, ते गुण ज्यांच्यांत आहेत अशा लोकांचीच आपण निवड करूं. ह्याचा अर्थ असा कीं, अत्यंत निश्चयी, शूर व शक्य तोंवर सुंदर, अशा लोकांनाच पसंत करणें आवश्यक आहे. उदात्त व दृढनिश्चयी स्वभाव असूनही, ह्या शिक्षणाच्या पद्धतीला अनुकूल असे त्यांच्यामध्यें गुण असले पाहिजेत.

ग्लॅ०:—ते कोणते ?

सॉक्रे०:—अभ्यासामध्यें, तीक्ष्णबुद्धि व तीक्ष्ण ग्रहणशक्ति, हे दोन गुण आवश्यक आहेत. कारण शारीरिक व्यायामापेक्षां कठीण अभ्यासक्रमच मनाची परीक्षा पहाणारे असून, अभ्यासांच्या परिश्रमांचा शरीराशीं संबंध नसल्यामुळें, एकट्या मनावरच त्यांचा ताण पडतो.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून चांगली स्मरणशक्ति, निर्भय वागणूक आणि आपल्या कामाविषयीं पूर्ण प्रेम, हे गुण असलेला मनुष्यच आपण शोधून काढला पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास शारीरिक मेहनत करून, शिवाय पुष्कळ बौद्धिक ज्ञान संपादन करणें शक्य आहे, असें तुम्हांला वाटतें काय ?

ग्लॅ०:—नाहीं. ज्या मनुष्याच्या बौद्धिक शक्ती उत्तम प्रकारच्या नाहींत, अशा माणसाची आम्हीं मुळींच निवड करणार नाहीं.

सॉक्रे०:—हल्लीं तत्वज्ञानाविषयीं जो चुकीचा समज लोकांमध्यें प्रचलित आहे आणि तत्वज्ञानाची जी अपकीर्ति झाली आहे, ह्यांचें कारण मी पूर्वीं म्हटल्याप्रमाणें हेंच आहे कीं, लोक तत्वज्ञानाचा अभ्यास, स्वतःची नालायकी असूनही करीत असतात. वस्तुतः, तत्वज्ञानाचा अभ्यास हलक्या लोकांनीं करावयाचा नसून, अस्सल लोकांनींच करावयाचा असतो.

ग्लॅ०:—असे अस्सल लोक कोणते ?

निवड ५/५/२०

सॉक्रे०:—तत्वज्ञानाच्या अभ्यासकानें प्रथमतः आपल्या अभ्यासावरील प्रेमांत खंड पाडतां कामा नये. म्हणजे त्यानें अर्धवट अभ्यासी, अर्धवट आळशी असें असतां कामा नये. जो मनुष्य व्यायाम, शिकार आणि शारीरिक परिश्रम, ह्यांचा शोकी असून अभ्यास, श्रवण, चिकित्सा इत्यादि बौद्धिक परिश्रमांचा द्वेष करणारा असतो, त्याला अशा वाईट संवयी जडलेल्या असतात. तसेंच, ज्या लोकांचें स्वतःच्या कामावर प्रेम नसतें, तेही असेच अर्धवट असतात.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—तसेंच, जो आत्मा स्वैच्छिक असत्याचा तिटकारा करतो व स्वतः अथवा दुसरे लोक खोटें बोलले असतां संतप्त होतो, तोच आत्मा जर अनैच्छिक असत्य शांतपणानें स्वीकारूं लागला आणि अज्ञान दाखवून दिलें असतां, असमाधानी न होतां एखाद्या डुकराप्रमाणें अज्ञानांत लोळण घेण्यांत आनंद मानूं लागला, तर तो सत्याच्या दृष्टीनें लंगडा अथवा कच्चा आहे, असें आपणांस म्हणतां येणार नाहीं काय?

ग्लॅ०:—निःसंशय तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—नेमस्तपणा, धैर्य, मनाची उदात्तता आणि इतर सद्गुण, ह्यांच्या दृष्टीनें कुलीन व नीचोद्भव लोक कोणते, हें
Steph 536 आपण शोधलें पाहिजे. कारण जेव्हां सरकार अथवा खाजगी लोक, ह्यांना अशा सद्गुणांची पारख नसते, तेव्हां ते अजाणतेपणानें, सत्याच्या दृष्टीनें अर्धवट व नीचोद्भव अशा लोकांना, अधिकारी अथवा मित्र करतात.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून ह्या सर्व बाबतींत आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. जर आपण शरीरानें व मनानें सुव्यवस्थित असे लोक निवडून काढून, त्यांना उच्च अभ्यास व कडक शिस्त ह्यांच्या वळणा-

खालीं तयार केलें, तर खुद्द न्यायालाही आपणांमध्यें दोष काढतां येणार नाहीं आणि आपलें राज्य व त्याची घटना ह्यांचें आपणांस रक्षण करतां येईल. पण जर आपण निराळ्या तऱ्हेचे विद्यार्थी निवडले, तर आपण अयशस्वी होऊन तत्वज्ञानावर हास्याचें अधिक जोरदार वादळ ओढवून घेऊं.

ग्लॅ०:—असा प्रकार लाजिरवाणा होय.

सॉक्रे०:—खात्रीनेंच. पण ह्याच क्षणाला मी स्वतःलाच हास्यास्पद करून घेतलें आहे, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—आपण गंभीरपणें चर्चा करीत आहोंत, असें समजून मी उगाच आवेशानें बोललों. तत्वज्ञानाची अवास्तव निर्भर्त्सना होत असलेली पाहून, निर्भर्त्सना करणारांवर मी इतका चिडून गेलों कीं, माझा आवेश मला आवरतां आला नाहीं.

ग्लॅ०:—छे! निदान मी ऐकत असतांना तरी मला असें वाटलें नाहीं.

सॉक्रे०:—पण मी बोलत असतांना मला असें वाटलें. असो. पूर्वी आपण जसे वयातीत लोक पसंत केले, तसे लोक ह्या कामांत आपणास चालणार नाहींत, हें आपण विसरतां कामा नये. मनुष्य जसा वृद्ध होत जातो तसा पुष्कळ गोष्टी तो शिकूं शकतो, हें सोलनचें म्हणणें चुकीचें आहे. कारण एकवेळ त्याला धांवतां येईल, पण शिकतां येणार नाहीं. म्हणून बौद्धिक परिश्रमांचें काम तरुण लोकांवरच सोंपविलें पाहिजे.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—अंकगणित, भूमिति आणि ब्रह्मविद्येची तयारी होण्यास जें प्राथमिक शिक्षण आवश्यक आहे त्याच्या सर्व शाखा, आपल्या विद्यार्थ्यांना

लहानपणांतच शिकवल्या पाहिजेत. पण हें शिक्षण देतांना त्यांच्यावर सक्ति करतां कामा नये.

ग्लॅ०:--असें कां ?

सॉक्रे०:--स्वतंत्र मनुष्याच्या विद्याजर्नांत, कोणत्याही तऱ्हेची गुलामगिरीची छटा मिसळतां कामा नये. कारण सक्तीच्या शारीरिक श्रमांचा शरीरावर वाईट परिणाम होत नाहीं, हें जरी खरें असलें तरी मनाच्या बाबतींत, कोणताही अभ्यास सक्तीनें केला असतां तो दृढमूल होत नाहीं.

ग्लॅ०:--हें खरें आहे.

Steph 537 सॉक्रे०:--म्हणून मित्रोत्तमा, मुलांवर कोणत्याही प्रकारची सक्ति न करतां, खेळकरवृत्तीनें त्यांना अभ्यास करावयास लावलें पाहिजे. त्यामुळें त्यांच्या विशिष्ट स्वभावाचा कल कोणत्या विषयाकडे आहे, हें आपणांस लवकर ओळखतां येईल.

ग्लॅ०:--तुमची सूचना योग्य आहे.

सॉक्रे०:--प्रत्यक्ष युद्धाच्या दृष्टिपथांत, मुलांना घोडयावर बसवून नेलें पाहिजे व सुरक्षित प्रसंगीं रणक्षेत्रावर आणून, जवान शिकारी कुत्र्यांप्रमाणें त्यांना रक्ताची चव दाखविली पाहिजे, असें आपण म्हटल्याचें तुम्हांला आठवतें ना ?

ग्लॅ०:--मला पक्कें आठवतें.

सॉक्रे०:--ज्यांनीं ह्या सर्व श्रमांत, अभ्यासांत व संकटांत विशेष आत्मसंयमन दाखविलें असेल, अशा लोकांचीच आपण निवड केली पाहिजे.

ग्लॅ०:--कोणत्या वयाच्या कालांत केली पाहिजे ?

सॉक्रे०:--आवश्यक शारीरिक मेहनतीचा काळ संपल्यानंतर, जीं दोन तीन वर्षें इतर कांहीं करतां येत नसल्यामुळें फुकट जात असतात,

त्या काळांत वरील निवडणूक केली पाहिजे. कारण थकवा व झोंप, हीं अभ्यासाची शत्रू असून, शारीरिक व्यायामांतील वागणूक, ही प्रत्येकाच्या स्वभावाची महत्वाची कसोटी असते.

ग्लॅ०:--खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्या काळानंतर, वीस वर्षांच्या तरुण लोकांतून निवडलेले हे विशिष्ट लोक, इतरांपेक्षां अधिक सन्मानिले जातील आणि लहानपणीं त्यांना जीं निरनिराळीं शास्त्रें शिकविण्यांत आलीं तीं एकत्रित करून, त्यांचा एकमेकांशीं व सत्यत्वाशीं काय संबंध आहे, हें त्यांना दाखविण्यांत येईल.

ग्लॅ०:--होय. अशाच प्रकारचें शिक्षण मूलग्राही व कायम टिकणारें असें होईल.

सॉक्रे०:—आणि ब्रह्मविद्येचें हें एक फार प्रबल असें गमक होय. कारण कोणताही विषय सम्यक् तऱ्हेनें जो अभ्यासूं शकतो, त्यालाच ब्रह्मविद्याप्रवीण म्हणतां येतें.

ग्लॅ०:—माझें मत असेंच आहे.

सॉक्रे०:—म्हणून सम्यक् ज्ञानांत जे उत्तम प्रकारची योग्यता दाखवितात व अभ्यासांतच नव्हे तर लढाई व शिस्तीच्या इतर शाखांमध्यें सुद्धां जे अत्यंत निग्रह दाखवितात, त्यांच्यावर तुम्ही लक्ष ठेविलें पाहिजे. आणि तीस वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे ते जेव्हां होतील तेव्हां तुमच्या निवडक लोकांतूनही त्यांना बाजूला काढून अधिक मान दिला पाहिजे व त्यांच्यापैकीं, दृष्टि व इतर इंद्रियें ह्यांना बाजूला सारून सत्याच्या संगतीनें सत्य अस्तित्व कोण गाठूं शकतात, त्यांची ब्रह्मविद्याशास्त्राच्या कसोटीनें परीक्षा घेतली पाहिजे. माझ्या मित्रा ! अत्यंत सावधगिरी राखण्याचा हाच काल होय.

ग्लॅ०:—कोणत्या विशिष्ट कारणाकरितां ?

सॉक्रे०—ब्रह्मविद्येमुळें झालेला जो मोठा वाईट परिणाम हल्लीं दिसून येतो, तो तुम्हाला माहीत नाहीं काय ?

ग्लॅ०:—कोणता ?

सॉक्रे०:—ह्या विद्येचे विद्यार्थी उद्धट बनतात.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तुम्हाला ह्या गोष्टीचें आश्चर्य वाटतें काय ? अशा लोकांना तुम्हीं मुळींच क्षमा करणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—अशाच तऱ्हेचें दुसरें उदाहरण देऊन मी सांगतों. अशी कल्पना करा कीं, लबाडीनें बदललेला एक मुलगा, मोठ्या व श्रीमंत घराण्यांत खुषमस्कऱ्यांच्या संगतींत वाढविला गेला आहे.
Steph पुढें वयांत आल्यावर, खरे आईबाप कोण हें जरी
538 त्याला शोधून काढतां आलें नाहीं, तरी आतांपर्यंत ज्यांना तो आपले आईबाप समजत असे, ते खरे नव्हेत हें त्याला कळून आलें आहे. आपली अदलाबदल झाली आहे ह्याविषयीं जेव्हां त्याला ज्ञान नव्हतें, तेव्हां व आतां ज्ञान झाल्यावर, खुषमस्करे व बनावट आईबाप ह्यांच्याशीं त्याची वर्तणूक काय होईल, ह्याची तुम्ही कल्पना कराल काय ? अथवा माझें मतच तुम्ही ऐकूं इच्छितां ?

ग्लॅ०:—तुमचें मतच ऐकूं इच्छितों.

सॉक्रे०:—ठीक आहे. मला वाटतें कीं, जोंपर्यंत त्याला ह्या सत्याचें ज्ञान नसेल, तोंपर्यंत बाप, आई व इतर नातलग, ह्यांना तो खुषमस्कऱ्यांपेक्षां जास्त मान देऊन त्यांचें कधींच कमी पडूं देणार नाहीं आणि महत्वाच्या बाबतींत त्यांची अवज्ञा करणार नाहीं.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, जेव्हां सत्य त्याला कळून येईल, तेव्हां त्याचा आपल्या आईबापांविषयींचा आदर व मान कमी होऊन, खुषामत्यां-

विषयीं त्याला फार आदर वाटूं लागेल. ते सांगतील तें ऐकून घेऊन, त्यांच्या इच्छेप्रमाणें तो वागूं लागेल व त्यांच्यामध्यें उघडपणें मिसळूं लागेल. जर तो स्वतः सुस्वभावी असला, तरच बनावट आईबापांची व खोट्या नातलगांची पर्वा बाळगील. एरवीं मुळींच बाळगणार नाहीं.

ग्लॅ०:—तुमचें वर्णन अत्यंत स्वाभाविक आहे. परंतु ह्या उदाहरणाचा संबंध, जे ब्रह्मविद्येचे अभ्यासू आहेत, त्यांच्याशीं कसा पोंचतो ?

सॉक्रे०:—मी सांगतों. लहानपणापासून न्याय्य व सुंदर वस्तूंबद्दल आपलीं निश्चित मतें असतात आणि आईबापांपुढें नेहमीं नम्रपणानें वागण्याचें जसें आपणांस शिक्षण दिलें जातें, तद्वत्च ह्या मतांना मान देण्याचें व तीं पाळण्याचें आपणास शिक्षण देण्यांत येत असतें.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, आत्म्याची खुषामत करून, त्याला आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न, सुखोत्पादक व्यवसाय करीत असतात. आपण खरोखर सद्गुणी असलों, तर हे सुखात्मक व्यवसाय आपलीं मनें वळवूं शकत नाहींत आणि आपल्या पूर्वजांचीं मतें आपण वंदनीय समजून त्यांच्याबद्दल निष्ठा बाळगूं शकतों.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—परंतु अशा मनुष्यापुढें सौंदर्याविषयीं जेव्हां प्रश्न उद्भवतो, तेव्हां कायदेपंडितांनीं दिलेलें नेहमींचें उत्तर, ब्रम्हविद्येच्या कसोटीनें असमाधानकारक वाटतें. जी वस्तु तो सुंदर म्हणून म्हणतो ती तितकीच कुरूप असते, असें वादविवादांत भिन्न वेळां येणाऱ्या अपजयामुळें त्याला कबूल करावें लागतें. त्याचप्रमाणें ज्यांना तो नेहमीं वंदनीय समजत असे, अशा न्यायाच्या, सज्जनपणाच्या व इतर वस्तूंच्या कल्पनाही असमाधानकारक आहेत, असें त्याला कळून येतें. असें झाल्यावर, जुन्या मतांबद्दल आदर व आज्ञाधारकपणा त्याला कितपत वाटेल, असें तुम्हांला वाटतें ?

ग्लॅ०:—पूर्वीसारखा आदर व आज्ञाधारकपणा त्याला वाटणार नाहीं, हें उघडच आहे.

Steph 539 सॉक्रे०:—आणि जोंपर्यंत पूर्वीच्या मतांचा तो आदरही करीत नाहीं व स्वीकारही करीत नाहीं व खरीं तत्वें त्याला शोधून काढतां येत नाहींत, तोंपर्यंत वासनांना खुलविणाऱ्या आयुष्याचीच त्याला आसक्ति वाटेल ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, आज्ञाधारकपणा टाकून देऊन तो बेकायदेशीर वागावयास लागेल.

ग्लॅ०:—ह्यांत मुळींच संशय नाहीं.

सॉक्रे०:—ब्रह्मविद्येच्या विद्यार्थ्यांची ही स्वाभाविक स्थिति नाहीं काय आणि म्हणून मोठ्या उदार हृदयानें ती क्षम्य समजावयास नको काय ?

ग्लॅ०:—शिवाय ती कींव करण्यासारखीही आहे.

सॉक्रे०:—ह्या तीस वर्षांच्या लोकांबद्दल कींव वाटण्याचा प्रसंग न यावा, म्हणून ब्रह्मविद्येची त्यांना ओळख करून देतांना, अत्यंत सावधगिरी बाळगावयास नको काय ?

ग्लॅ:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तरुण लोकांना, ब्रह्मविद्येंत लुडबुड करण्याची मनाई करणें सावधगिरीचें होणार नाहीं काय ? कारण तुमच्या हें पहाण्यांत आलें असेल कीं, मुलांचा जेव्हां ब्रह्मविद्येशीं प्रथमच परिचय होतो, तेव्हां ती विद्या एक प्रकारची करमणूक समजून, तिचा नेहमीं विरोध करण्याच्या कामीं तीं उपयोग करावयास लागतात व खंडनविद्येचा अभ्यास करणाऱ्या लोकांच्या युक्त्याप्रयुक्त्यांची नक्कल करतात—जो कोणी जवळ येईल, त्याला तर्कशास्त्रानें फाडून त्याचे तुकडे तुकडे करून टाकण्यांत त्यांना कुत्र्यांच्या पिल्लांप्रमाणें आनंद वाटतो.

ग्लॅ०:—होय. ह्यापेक्षां त्यांना अधिक प्रिय कांहींच नसतें.

सॉक्रे०:—म्हणून पुष्कळ जयापजय जेव्हां ते अनुभवतात, तेव्हां पूर्वींचीं मतें लवकरच अविश्वसनीय म्हणून ठरवितात. अशा वृत्तीमुळें, जगाच्या दृष्टीनें, ते व तत्वज्ञानाचा पक्ष दूषणीय ठरले गेले आहेत.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—पण मध्यम वयाचा मनुष्य अशा मूर्खपणानें वाहून जाणार नाहीं. केवळ करमणुकीकरितां विरोध करणाऱ्या लोकांचें अनुकरण करण्याऐवजीं, जे लोक वादविवादानें सत्याची परीक्षा करीत असतात, अशांचेंच अनुकरण तो करील आणि आपल्या श्रेष्ठ शहाणपणानें, तत्वज्ञानाच्या अभ्यासाविषयीं लोकांचा आदर कमी न करतां वाढवीत राहील.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—हल्लींच्या पद्धतीमुळें, नालायक असलेल्या मनुष्यास देखील ब्रह्मविद्येचा अभ्यास करण्यास मोकळीक असते. ह्यामुळें होणारा दुष्परिणाम टाळण्याकरितां, ज्या लोकांना ब्रह्मविद्येचा परिचय करून द्यावयाचा, त्यांचे स्वभाव स्थिर व व्यवस्थित असले पाहिजेत, असें जें आपण थोडया वेळापूर्वी म्हटलें तें योग्य नव्हतें काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ब्रह्मविद्येचें ज्ञान होईपर्यंत ह्याच अभ्यासाकडे मनुष्यानें सतत लक्ष दिलें पाहिजे ना ? शारीरिक व्यायामाच्या पूर्णतेला लागणाऱ्या वर्षांपेक्षां दुप्पट अधिक वर्षें ह्या विद्येच्या अभ्यासांत त्यानें पूर्ण लक्ष घातलें पाहिजे ना ?

ग्लॅ०:—सहा वर्षें कीं चार वर्षें तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—वर्षांची संख्या महत्वाची नाहीं. तथापि पांच वर्षें धरून चालूं. ह्यानंतर आपण जी गुहा म्हणून वर्णन केली, तींत त्यांना

पाठवून देऊन, तरुणांना योग्य अशीं युद्धाची अथवा
Steph इतर कामें करावयास लावलें पाहिजे. ह्यामुळें आपल्या
540 शेजाऱ्यांबरोबर कसें वागावें, हें त्यांना कळून येईल.
ह्या ठिकाणीं सुद्धां, मोहाचा प्रसंग आला असतांना आपल्या कामांत ते अचल राहतात किंवा थोडेबहुत घाबरून जातात, ह्याची तुम्ही परीक्षा घेतली पाहिजे.

ग्लॅ०:—हा काळ किती वर्षांचा तुम्ही ठरवितां ?

सॉक्रे०:—पंधरा वर्षांचा. पन्नास वर्षांचे वृद्ध झाल्यावर, जे लोक मोहाच्या सर्व प्रसंगांतून सुरक्षितपणानें निभावून गेले आहेत आणि कर्तव्याच्या अथवा शास्त्राच्या प्रत्येक शाखेंत ज्यांनीं यश संपादन केलें आहे, अशा लोकांना आयुष्यांतील शेवटचें काम करावयास सांगितलें पाहिजे. अशा लोकांनीं, सर्व वस्तु प्रकाशित करणाऱ्या सर्वव्यापी प्रकाशाकडे आपल्या आत्म्याची दृष्टि लावून, सत्‌तत्वाचें दर्शन करून घेतलें पाहिजे व आपल्या देशाची, बांधवांची व स्वतःची सुव्यवस्था करण्याच्या कामांत, ह्या सत्‌तत्वाचा आदर्श त्यांनीं आपल्यापुढें ठेवला पाहिजे. अशा लोकांचा मुख्य व्यवसाय जरी तत्वज्ञान हा असला, तरी प्रत्येकाची पाळी आली म्हणजे सार्वजनिक आयुष्यांतील जबाबदारीचीं व अधिकाराचीं कामें, स्वेच्छेनें नव्हे तर टाळतां येणें अशक्य म्हणून, देशाच्या हिताकरितां त्यांनीं केलीं पाहिजेत. अशा तऱ्हेनें, स्वतःसारखे चांगले संरक्षक नवीन पिढींत तयार करून व स्वतःच्या जागेवर त्यांची नेमणूक करून, ‘भाग्यशाली लोकांच्या बेटावर’ ते रहावयास निघून जातील. सार्वजनिक खर्चांतून त्यांच्या स्मरणार्थ, सरकारकडून पुतळे उभारले जातील आणि पिथिअन भविष्यवाणीनें हुकुम केला, तर त्यांना उपदेव समजून अथवा निदान अत्यंत सुखी व देवतुल्य मनुष्यें समजून, त्यांच्याकरितां यज्ञ करण्यांत येतील.

ग्लॅ०:--सॉक्रेटिस ! कुशल शिल्पकाराप्रमाणें, तुम्ही अधिकारी पुरुषांचे अत्यंत सुंदर व निर्दोष असे पुतळे तयार केलेत.

सॉक्रे०:—ग्लॅकॉन्, 'अधिकारी बायकांचे सुद्धां', असें म्हणा. कारण स्वाभाविक गुणांमध्यें, स्त्रिया पुरुषांची बरोबरी करणाऱ्या असल्यामुळें, मी जें बोललों, तें स्त्रियांपेक्षां पुरुषांना जास्त अनुलक्षून होतें, असें तुम्ही समजूं नका.

ग्लॅ:—आपल्या वर्णनाप्रमाणें, समानतेच्या तत्वावर पुरुषांबरोबर स्त्रियांनीं भाग घ्यावयाचा असल्यामुळें, तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—तर मग, राज्य व राज्यकारभार ह्यांविषयीं जी कल्पना आपण पुढें मांडली आहे, ती एक केवळ स्वप्न नसून दुर्धर पण शक्य अशी कल्पना आहे, हें तुम्हाला कबूल आहे ना ? आणि आपण म्हटल्याप्रमाणें, तिची सिद्धता खऱ्या तत्वज्ञान्यांपैकीं अनेकांना जरी नाहीं, तरी निदान एकाला राज्याचे सर्वाधिकार दिल्यानेंच, शक्य आहे ना ? असा मनुष्य, हल्लींच्या काळांतील मानसन्मान, क्षुद्र व कवडी किंमतीचे समजून त्यांचा तिरस्कार करणार नाहीं काय ? न्याय व त्यापासून मिळणारा मान ह्यांचें श्रेष्ठत्व त्याला पटल्यामुळें, सर्व कर्तव्यां-मध्यें न्यायानें वागणें, हें अत्यंत उच्च कर्तव्य समजून, न्यायाचा स्वतःला एकनिष्ठ सेवक व भक्त म्हणून, राज्यामध्यें तो सर्वप्रकारें सुधारणा करणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—हें कसें काय घडवून आणावयाचें ?

सॉक्रे०:—शहरामध्यें जे दहा वर्षांहून अधिक वयाचे आहेत, त्यांना खेडेगांवांत पाठवून दिलें पाहिजे. आणि त्यांच्या लहान मुलांना ताब्यांत घेऊन, त्यांच्यामधील त्यांच्या आईबापांचे स्वभाव काढून
Steph टाकून, आपण पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें, खऱ्या तत्वज्ञानी
541 लोकांच्या चालीरीती व कायदे, ह्यांच्या वातावरणांत त्यांना वाढविलें पाहिजे व शिक्षण दिलें पाहिजे. आपण

वर्णन केलेलें राज्य व घटना स्थापित होऊन, त्यांची भरभराट होण्यासही अत्यंत शीघ्र व सुकर पद्धत नाहीं काय ? आणि ज्या राष्ट्रांत हिचें बीं रोवलें गेलें तें धन्य नाहीं काय ?

ग्लॅ०:—खरोखर असेंच. सॉक्रेटिस, अशी घटना मूर्तस्वरूपांत येण्याचें साधनही तुम्ही बरोबर सांगितलें, असें मला वाटतें.

सॉक्रे०: – अशा तऱ्हेचें राज्य व तत्सदृश व्यक्ति, ह्यांचें विवेचन आपण तृप्ति होईपर्यंत केलें नाहीं काय ? कारण अशी व्यक्ति कोणत्या स्वभावाची असेल, हें स्पष्टच आहे असें मी धरून चालतों.

ग्लॅ०: - स्पष्टच आहे. प्रस्तुत चर्चा पुरी झाली, असें मला वाटतें.

---

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक आठवें

सॉक्रे०:—ग्लॅकान्, आपलें पुढील मुद्यांवर एकमत झालें. आपली आदर्श राज्यघटना जर पूर्णत्वाला न्यावयाची असेल, तर स्त्रिया व मुलें हीं समाईक मालकीचीं समजून शिक्ष-
Steph 543 णाच्या सर्व शाखांमध्यें त्यांना सारखेंच शिक्षण दिलें पाहिजे; तसेंच, युद्धाच्या व शांततेच्या काळांतही स्त्री–पुरुषांचे समान व्यवसाय समजून, ज्यांनीं तत्वज्ञानामध्यें प्रावीण्य व युद्धामध्यें कौशल्य दाखविलें आहे, अशा लोकांनाच राजे करण्यांत आलें पाहिजे.

ग्लॅ०:—होय. ह्या मुद्यांवर आपलें एकमत आहे.

सॉक्रे०: – ह्याशिवाय आपण असेंही कबूल केलें कीं, राज्यकर्त्यांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर, राज्यांतील सैनिकांना विशिष्ट वर्णनाच्या वसतिस्थानांत ठेविलें पाहिजे. ह्या स्थानांमध्यें, आपल्या सूचनांप्रमाणें सर्व लोकांची समाईक मालमत्ता समजण्यांत येईल. अशा वसति–स्थानांचें स्वरूप ठरविल्यावर, तुम्हांला आठवत असेल कीं, सैनिकांनीं स्वतःच्या म्हणून कोणत्या गोष्टी समजाव्या, हेंही आपण ठरवून टाकलें.

ग्लॅ०:—होय. मला आठवतें. हल्लींच्या खाजगीमालमत्ता–पद्धतीचा आपण निषेध केला आणि ठरविलें कीं, सुशिक्षित सैनिक व संरक्षक या

नात्यानें, संरक्षकांच्या कामगिरीचा मोबदला म्हणून, त्यांच्या दर्जाला शोभेल असें अन्नवस्त्र, दरवर्षी इतर नागरिकांपासून त्यांना देण्यांत यावें व संरक्षकांनीं राज्याची व स्वतःची सर्व प्रकारें काळजी घ्यावी.

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. पण ज्याअर्थी आपण हा विषय संपविला आहे, त्याअर्थी कोणत्या मुद्यापासून आपण विषयांतर केलें, हें आठवूं या. म्हणजे आपणांला पूर्वीचा मार्ग सांपडूं शकेल.

ग्लॉ०:—हें कांहीं कठीण नाहीं. आतां जसें तुम्ही बोलत आहां, तसेंच त्यावेळेसही बोलत होतां कीं, आदर्श राज्यघटनेची चर्चा पुरी झाली असून आपण वर्णिलेल्या राज्याला 'सुराज्य' असें म्हणतात, व तत्सदृश नागरिकाला सज्जन म्हणून म्हणतात. ह्यापेक्षां अधिक चांगलें राज्य आणि अधिक चांगला मनुष्य यांचें वर्णन करणें तुम्हांला शक्य होतें असें आम्हांला वाटलें. पण त्याच वेळेस
Steph तुम्हीं असें म्हटलें कीं, जर आपण उत्कृष्ट म्हणून वर्णि-
544 लेली राज्यघटना बरोबर असली, तर इतर राज्यघटना चुकीच्या होत. इतर राज्यघटनांचे तुम्ही चार मुख्य प्रकार सांगितलेत. त्यांचे दोष दाखविल्याशिवाय व तत्सदृश मनुष्यांचेही दोष दाखविल्याशिवाय, उत्तम प्रकारचा मनुष्य सर्वांत सुखी व वाईट प्रकारचा मनुष्य सर्वांत दुःखी असतो, असें आपणांस ठरवितां येणार नाहीं, असें तुम्ही म्हटल्याचेंही मला आठवतें. ह्या चार राज्यघटना कोणत्या, असें मी तुम्हांस विचारलें असतां, पॉलिमारकस व ॲडिमेन्टस ह्यांनीं आम्हांस अडथळा केला. त्यानंतर प्रस्तुत मुद्यापर्यंत तुम्ही चर्चा केली.

सॉक्रे०:—तुमची आठवण अगदीं बरोबर आहे.

ग्लॉ०:—तर मग एखाद्या मल्लाप्रमाणें तुम्हीं वाग्युद्धास तयार रहा. आणि मी पूर्वीचाच प्रश्न तुम्हांला विचारल्यावर, तुमच्या ओंठावर जें उत्तर त्यावेळीं नाचत होतें तेंच तुम्हीं द्या.

सॉक्रे०:—मी स्वतः शिकस्तीचा प्रयत्न करीन.

ग्लॅ०:—ज्या चार राज्यघटना तुम्ही निर्देशिल्या, त्यांचें वर्णन ऐकण्याची माझी विशेष इच्छा आहे.

सॉक्रे०:—ह्या प्रश्नाचें उत्तर देणें अगदीं सोपें आहे. ज्या घटनांचा मी निर्देश केला आणि ज्यांना विशिष्ट नांवें देण्यांत आलीं आहेत, त्या अशा. प्रथमतः क्रिट व स्पार्टा ह्यांची राज्यघटना घ्या. ही बहुतांकडून वाखाणली जाते. नंतर दुसरी म्हणजे अल्पप्रजासत्ताक ( Oligarchy ) राज्यपद्धति. ही फारशी वाखाणली जात नसून, बरीच दोषपूर्ण असते. नंतर बहुप्रजासत्ताक राज्यघटना ( Democracy ). ही दुसऱ्या घटनेपासून फार निराळी असली तरी तिच्या पाठोपाठ येणारी आहे. शेवटची म्हणजे अरेरावराज्यपद्धति ( Despotism ). ही अत्यंत गाजलेली, पण पूर्वींच्या सर्व पद्धतींहून अगदीं भिन्न आहे. ही पद्धति सर्वांत वाईट असून ती एक प्रकारचा रोग आहे. मला वाटतें, दुसरी आणखी एखादी घटना, विशिष्ट स्वरूपाची व स्वतंत्र अशी तुम्हांला सांगता येणार नाहीं. आतां सांगितलेल्या घटनांमध्यें समाविष्ट होणाऱ्या, क्षुल्लक स्वरूपाच्या मांडलीक राज्यपद्धती व विकत घेतले जाणारे संस्थानसमुदाय, ग्रीक लोकांमध्यें जसे सांपडतात तसे रानटी लोकांमध्येंही सांपडतात.

ग्लॅ०:—होय. त्यांचे विचित्र प्रकार आपणांस ऐकूं येतात.

सॉक्रे०:—मनुष्यस्वभावांच्या अनुरोधानें राज्यघटनांचे निरनिराळे प्रकार होतात; म्हणून मनुष्यस्वभावाच्या प्रकारांइतक्याच राज्यघटना बनणार, हें उघड आहे. कारण, आपल्याला असें म्हणतां येणार नाहीं कीं, राज्यघटना, राज्यामधील प्रजाजनांच्या नैतिक स्वभावापासून उगम पावत नसून, एखाद्या झाडावर अगर खडकावर उगवतात.

ग्लॅ०:—राज्यघटनांचा उगम मनुष्यस्वभावांतूनच होतो, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—म्हणून राज्यघटना पांच प्रकारच्या असल्या, तर व्यक्तीं-मध्येंही पांच प्रकारचे स्वभाव असले पाहिजेत.

ग्लॅ०: —निःसंशय.

सॉक्रे०:—उत्तमजनराज्यपद्धती (Aristocracy)
Steph सारखा ज्याचा स्वभाव असून, ज्याला आपण सज्जन व
545 न्यायी समजतो, अशा मनुष्याचें आपण पूर्वीच वर्णन केलें आहे.

ग्लॅ०:—होय. केलें आहे.

सॉक्रे०:—स्पार्टन-राज्यघटनेशीं सादृश्य असलेल्या युद्धप्रिय व महत्त्वाकांक्षी पण कमी प्रतीच्या लोकांचें वर्णन करण्यास आपण सुरुवात करूं व नंतर अल्पप्रजासत्ताक, बहुप्रजासत्ताक, आणि अरेरावसत्ताक स्वभावाच्या लोकांचें वर्णन करूं. ह्यामुळें अत्यंत अन्यायी मनुष्य कसा असतो, हें आपणांस पहातां येऊन, त्याची अत्यंत न्यायी मनुष्याशीं तुलना करतां येईल. आणि अशा तऱ्हेनें शुद्ध न्याय आणि शुद्ध अन्याय, ह्यांपासून सुख व दुःख काय उत्पन्न होतें, हें शोधून काढून न्याय व अन्याय ह्यांचे गुणावगुण ठरवितां येतील. त्यानंतर एकतर थ्रॅसिमॅकसच्या म्हणण्याप्रमाणें आपण अन्यायाचें अवलंबन करावें किंवा पुढील विवेचनानुसार न्यायाचा आश्रय करावा.

ग्लॅ०:—आपण वादविवाद अशाच क्रमानें केला पाहिजे.

सॉक्रे०:—अगोदर राज्यपद्धतीचें निरीक्षण करावयाचें व नंतर व्यक्तीकडे वळावयाचें, अशा रीतीनें आपलें विवेचन अधिक स्पष्ट होईल. म्हणून प्रस्तुत प्रसंगीं आपण महत्वाकांक्षी राज्यघटनेचें परीक्षण करूं. प्रचारांत असलेलें दुसरें एकादें नांव मला माहीत नसल्यामुळें तिला आपण मानीजन-राज्यघटना ( Timocracy ) म्हणूं. आणि त्या दृष्टीनें महत्वाकांक्षी मनुष्याचें परीक्षण केल्यावर, अल्पप्रजासत्ताक

राज्यपद्धति ( Oligarchy ) व तिजसारखा मनुष्य ह्यांचें परीक्षण करूं. त्यानंतर बहुप्रजासत्ताक-पद्धति बघून, तिजसारख्या स्वभावाच्या मनुष्याबद्दल विचार करूं. शेवटीं जें शहर जुलमी राजाकडून चालविलें जातें त्यांत प्रवेश करून, अरेराव-राज्यपद्धतीचें व तत्सदृश आत्म्याचें निरीक्षण करूं. इतकें परीक्षण केल्यावर आपणांस समाधानकारक निर्णय देतां येईल.

ग्लॅ०: —परीक्षण करून निर्णय देण्याची ही पद्धत न्याय्य दिसते.

सॉक्रे०:—उत्तमजनराज्यपद्धतींतून मानीजनराज्यपद्धति कशी उत्पन्न होते, ह्याचें वर्णन करूं या. कोणत्याही राज्यघटनेंत जेव्हां फरक होतो, तेव्हां तो अधिकारीमंडळांत भांडणें झाल्यामुळेंच होतो. जोंपर्यंत तें मंडळ एकमतानें चालत असतें, तोंपर्यंत तें कितीही लहान असलें, तरी त्याचा पाडाव होणें शक्य नसतें.

ग्लॅ०: —होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग ग्लॅकान्, आपल्या राज्याला धक्का कसा बसेल आणि सहाय्यक वर्ग व अधिकारीवर्ग ह्यांच्यामध्यें व आपआपसामध्यें फाटाफूट कशी होईल ? होमरप्रमाणें म्यूझिस देवतांना, " पहिल्या-प्रथम भेदभाव कसा उत्पन्न झाला, " असा प्रश्न आपण विचारावा काय ? म्युझिस देवतांनीं शोकपूर्ण उच्च स्वरांत, बाह्यतः गंभीरपणानें, पण खरोखर आपल्याला लहान मुलांप्रमाणें समजून चेष्टेनें पुढील-प्रमाणें उत्तर दिलें, अशी आपण कल्पना करावी काय ?

ग्लॅ०:—देवता आपणांस काय उत्तर देतील ?

सॉक्रे०:—" खरोखर अशा राज्याला धक्का बसणें कठीण आहे. पण ज्याअर्थीं जन्माला आलेली प्रत्येक वस्तु कधींतरी नाशही पावणारच, त्याअर्थीं तुमची राज्यघटना सर्वकाळ टिकणारी नाहीं. कालांतरानें तिचाही नाश ठेवलेलाच ! तिचा नाश पुढील पद्धतीनें होईल.

वनस्पतींच्या जगतामध्येंच नव्हे, तर प्राणिमात्राच्या
Steph जगतांत सुद्धां शारीरिक व मानसिक फलोत्पादकता व
546 वंध्यता ह्यांचे फरक होत असतात आणि प्रत्येक वस्तूच्या
आयुष्यांतील दीर्घतेप्रमाणें हे फरक कांहीं विशिष्ट वर्तुळाकार संक्रमणानें होत असतात. तुमच्या वंशांतील फलोत्पादकता व वंध्यता ह्यांच्याविषयीं असें म्हणतां येईल कीं, जरी तुमचे राज्याधिकारी कितीही सुशिक्षित, शहाणे व गणिताचे नियम सूक्ष्मपणें पाळणारे असले, तरी योग्य काळ चुकवून अयोग्य काळीं ते मुलांना जन्म देतील. दैवीजातीचें चक्र पूर्ण अंकामध्यें समाविष्ट असतें. पण मानवी वंशचक्र भूमितीच्या अंकाप्रमाणें असल्यामुळें, जन्मकाळचे चांगले व वाईट गुणही त्याप्रमाणें ठरतात. म्हणून जेव्हां तुमचे संरक्षक, ह्या विषयाच्या अज्ञानामुळें अयोग्य काळीं लग्नसंबंध जमवतील, तेव्हां अशा संबंधाचीं मुलें गुणसंपन्न अथवा सुदैवी होणार नाहींत. पूर्वींच्या लोकांकडून ह्यांच्यापैकीं उत्तमांना, अधिकाराच्या जागेवर जरी स्थापन करण्यांत आलें तरी ते अपात्र ठरतील. आपल्या वडिलांच्या जागेवर ते आरूढ झाल्यावर, संरक्षकाच्या योग्य कर्तव्याला न जुमानतां, ते आमचा (देवतांचा) प्रथम अपमान करावयास लागून, नंतर संगीत व व्यायामशास्त्र ह्यांची निंदा करतील. अशा तऱ्हेनें, तुमचे तरुण लोक अधिक कुशिक्षित होतील. पुढील पिढींत अधिकारी लोकही, हिजिअडच्या जातीप्रमाणें असलेल्या तुमच्या जातींतील (म्हणजे सोनें, रुपें, तांबें, लोखंड ह्यांतील) भेद न समजणारे असे नेमण्यांत येतील.
लोखंड व चांदी, तसेंच सोनें व तांबें ह्यांचें मिश्रण केलें
Steph जाऊन, त्यामुळें श्रेष्ठ-कनिष्ठ भाव व अव्यवस्थितपणा
547 उत्पन्न होईल. ज्या ठिकाणीं अशा दोषांचें बीजारोपण
झालें, त्या ठिकाणीं शत्रुत्व व युद्धें उत्पन्न व्हावयाचींच. ह्यावरून आम्ही निश्चितपणानें म्हणूं शकतों कीं अशा पिढीची वाढ फाटाफुटीला जन्म देणारी होईल.''

ग्लॅ०:—होय. म्युझिस देवतांचें उत्तर योग्य आहे, हें आम्ही कबूल करतों.

सॉक्रे०:—म्युझिस देवता जें बोलतात तें अयोग्य कसें असणार ?

ग्लॅ०:—म्युझिस देवता आणखी काय म्हणतात ?

सॉक्रे०:—" भेदभाव सुरू झाला म्हणणे दोन्ही पक्ष लवकरच निरनिराळे होऊं लागतील. लोहवर्ण व ताम्रवर्ण ह्यांच्या जाती पैसे मिळवावयास लागून, चांदी, सोनें, जमिनी व घरें ह्यांचा संग्रह करतील. दुसऱ्या दोन संपन्न जाती ( सोनें व रुपें ह्यांच्या ) दारिद्र्याचा अभाव असल्यानें, सद्गुण व जुनी व्यवस्था ह्यांच्याकडे मन वळवितील. परंतु परस्परांमधील भांडणाच्या तीव्र स्वरूपामुळें, दोन्ही पक्षांना तह करावा लागेल. ह्या तहाचें स्वरूप असें होईल कीं, जमिनी व घरें सर्वांनीं विभागून घेऊन पूर्वी स्वतंत्र असलेले त्यांचे स्नेही व अन्नदाते, ह्यांना कनिष्ठ जात म्हणून गुलाम व नोकर करण्यांत यावें आणि दोन्ही पक्षांनीं युद्ध व आत्मसंरक्षण ह्या कामांना वाहून घ्यावें. "

ग्लॅ०:—मानीजनराज्यपद्धतीचा उगम कसा होतो, हें तुम्ही बरोबर सांगितलेंत.

सॉक्रे०:—उत्तमजनराज्यपद्धति व अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धति, ह्या दोन टोंकांतील मध्यबिंदू म्हणून ही घटना समजली जाईल ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—असा फरक झाल्यानंतर, ही नवीन राज्यसंस्था कशा तऱ्हेनें वागेल ? पूर्वीची घटना व अल्पप्रजासत्ताक घटना ह्यांचा मध्यबिंदू, अशी ही घटना असल्यामुळें दोन्ही घटनांचें कांहीं अंशीं अनुकरण करून, शिवाय स्वतःचें असें वैशिष्ट्य ती राखणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—सैनिकवर्गाकडून अधिकारी लोकांना दिला जाणारा मान, शेतकी, हस्तकौशल्याचीं कामें व इतर अर्थोत्पादक धंदे, ह्यां-

पासून सैनिकांची अलिप्तता, सार्वजनिक जेवणाच्या सोयी, व्यायाम व लष्करी शिक्षणाबद्दल भक्ति–ह्या सर्व बाबतींत पूर्वीच्या राज्यघटनेचेंच अनुकरण ही घटना करणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—अशा राज्यसंस्थेंत असणारे शहाणे लोक, साध्या व अस्सल स्वभावाचे नसून मिश्र स्वभावाचे असल्यामुळें,
Steph त्यांना अधिकाराच्या जागा देण्यांत भीति बाळगणें,
548 शांततेपेक्षां युद्धाकडे ज्यांचा कल आहे, अशा तेजस्वी पण आकुंचित मनाच्या लोकांना जवळ करणें, युद्धाकरतां ज्या कला व युक्त्या जरूर असतात त्यांना महत्त्व देणें व सदोदित भांडणें चालू ठेवीत असणें–अशा पुष्कळ बाबतींत ही राज्य-घटना विशिष्टपणा दाखवील ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०—अल्पप्रजासत्ताक राज्यांतील लोकांप्रमाणें हे लोक संपत्तीचे लोभी असतील आणि सोनें व चांदी ह्याविषयीं उत्कट पण गुप्त प्रेम बाळगतील. त्यांच्याजवळ कोठडया व खाजगी खजिने असल्यामुळें, त्यांना आपली संपत्ति गुप्तपणें ठेवतां येईल व भिंतीचीं घरें असल्यामुळें, खाजगी घरट्यांप्रमाणें त्यांचा उपयोग करून, आपल्या बायकांकरितां अथवा मर्जीस येईल त्यांच्याकरितां, आपली संपत्ति सढळ हातानें खर्च करतां येईल.

ग्लॅ०:—अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—त्यांचा लोभी स्वभाव इतरांच्या पैशांच्या बाबतींत त्यांना उधळेपणा करावयास लावीत असला, तरी आपल्या स्वतःच्या पैशा-विषयीं ते फार कंजूषपणा दाखवितील. पैशाला ते फार मान देत असल्यामुळें, आपल्या जवळचा पैसा लपवीत राहून, पैशापासून मिळणारीं सुखें ते गुप्त तऱ्हेनें भोगतील आणि लहान मुलें ज्याप्रमाणें

आपल्या बापाला टाळतात, त्याप्रमाणें कायद्याला ते टाळीत राहतील. कारण तत्वज्ञानाची मैत्रीण अशी जी म्यूज देवता, तिचा अपमान करून संगीतापेक्षां व्यायामाला त्यांनीं अधिक मान दिल्यामुळें, त्यांचें शिक्षण समजुतीनें न होतां सक्तीनें झालेलें असतें.

ग्लॅ०:—चांगलें व वाईट, ह्यांचें मिश्रण असलेलीच राज्यघटना तुम्ही वर्णन करीत आहां.

सॉक्रे०:—होय. ती मिश्रच आहे. परंतु तेजस्वी तत्त्वाचा त्यांत प्रभाव असल्यामुळें, अत्यंत स्पष्टपणें एक गोष्ट तिजमध्यें दिसून येते. ती म्हणजे पक्षाभिमान व कीर्तीचें प्रेम.

ग्लॅ०:—निःसंशय दिसून येते.

सॉक्रे०:—वरील राज्यघटनेचा अशा तऱ्हेचा उगम असून जवळ जवळ अशा तऱ्हेचें स्वरूप असतें. सामान्य रूपरेषा करण्यांतच आपण समाधान मानून घेतलें, तर मला वाटतें, विशेष विस्तार करण्याचें कारण नाहीं. एवढ्या रूपरेषेवरूनही अत्यंत न्यायी व अत्यंत अन्यायी मनुष्याचे स्वभाव आपण भिन्न दाखवूं शकूं. कारण कोणतीही राज्यघटना व कोणताही स्वभाव, ह्यांचें कांहींही न गाळतां विस्तारानें विवेचन करणें अत्यंत निराशाजनक असतें.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्या घटनेला अनुरूप असा कोण मनुष्य आहे? त्याचा उगम व स्वभाव सांगाल काय?

ॲडिमेन्टस् म्हणाला, "आपला मित्र ग्लॅकॉन् हा पक्षाभिमानी मनुष्याचा निदर्शक म्हणतां येईल."

सॉक्रे०:—पक्षाभिमानी म्हणून कदाचित् जुळणारा असेल. पण पुढील मुद्यांचा विचार केला असतां, ग्लॅकान्‌चा स्वभाव अशा वर्णनाशीं जुळणारा नाहीं, असें मला वाटतें.

ॲडि०:—ते कोणते मुद्दे?

सॉक्रे०:—तो ग्लॅकानूपेक्षां अधिक स्वतंत्र वृत्तीचा व वाङ्मयाचा कमी शोकी असला पाहिजे. शिवाय अभ्यासी व श्रवण-
Steph प्रिय असून वक्ता नसला पाहिजे. सुशिक्षित माणसा-
549 प्रमाणें असा मनुष्य जरी गुलामांचा तिरस्कार करणार नाहीं, तरी तो गुलामांजवळ कठोरपणानें व स्वतंत्र लोकांशीं नम्रपणानें वागेल. अधिकारी लोकांशीं तो अत्यंत आज्ञाधारकपणानें वागेल. व्यायाम व मैदानी खेळ ह्यांचा तो शोकी असल्यामुळें, युद्धाला शोभेसे असे बाहुबलाचें व इतर पराक्रमांचें यश मिळवून, तो प्रसिद्धी व सत्ता मिळवील. पण वक्तृत्व अथवा दुसरी एखादी कला साध्य करून, मान किंवा सत्ता मिळविणें त्याला जमणार नाहीं.

ॲडि०: खरें आहे. अशा प्रकारच्या राज्यपद्धतीचाही असाच स्वभाव असतो.

सॉक्रे०: – असा मनुष्य आपल्या तरुणपणांत संपत्तीचा तिरस्कार करून, वृद्धपणांत तिला मान देणार नाहीं काय ? कारण त्याच्यामध्यें द्रव्यलोभी मनुष्याची छटा असून, उत्तम संरक्षकाची संगत सोडल्यामुळें त्याच्याजवळचा सद्गुणही दोषापासून अलिप्त नसतो.

ॲडि०:—उत्तम संरक्षक कोणता ?

सॉक्रे०:—सुसंस्कृत बुद्धिवादात्मक चिकित्सा. कारण अशी चिकित्साच, आपल्या अस्तित्वानें व सान्निध्यानें मनुष्याला सर्व आयुष्यभर सद्गुणांच्या सहवासांत ठेवूं शकते.

ॲडि०:—हें वर्णन योग्य आहे.

सॉक्रे०:—मानीजनराज्यपद्धति असलेल्या राज्यांतील तत्सदृश मानधन पुरुषाचा असा स्वभाव असतो.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—अशा मनुष्याची उत्पत्ति पुढील प्रकारें सांगतां येईल. असा मनुष्य उत्तम बापाचा तरुण मुलगा असतो. त्याचा बाप दोषपूर्ण

राज्यांत रहाणारा असून, मान, अधिकार, खटले, इत्यादि प्रकार टाळणारा व संकटांत सांपडून घेण्याऐवजीं स्वतः नुकसान सोसण्यास तयार असणारा असा असतो.

ॲडि०ः—तरुण मुलाच्या स्वभावाची वाढ कशी होते, ह्याचें वर्णन कराल काय ?

सॉक्रे०ः—अशा स्वभावाची वाढ, जेव्हां मुलगा आपल्या बापाविरुद्ध आईनें केलेल्या तक्रारी ऐकावयास लागतो, तेव्हांपासून सुरू होते. त्याचा बाप राज्यकारभारमंडळाचा सभासद नसल्यामुळें, त्याच्या आईचा इतर स्त्रियांकडून अपमान केला जातो. नवरा पैसे मिळविण्याचें विशेष मनावर घेत नाहीं, कायदेकचेऱ्यांमधून पक्षकार म्हणून भांडत बसत नाहीं, सामना करीत नाहीं, मोठाल्या सभांतून वाग्युद्ध करीत नाहीं–उलट ह्या सर्व गोष्टींबद्दल फार उदासीनता दाखवून स्वतःशींच विचार करीत बसून, तिच्याविषयींही अनास्थाच दाखवितो–ह्या सर्व कारणांनीं चिडून जाऊन ती आपल्या मुलाला सांगते, " तुझे वडील पराक्रमी पुरुष नसून अत्यंत आळशी आहेत. " इतरही निवडक वाक्यें ती वापरते. स्त्रिया पुरुषांसंबंधीं बोलावयास लागल्या म्हणजे ठराविक निवडक वाक्यें बोलण्याची त्यांना संवय असते ! हें तुम्हांला माहीत असल्यामुळें अशा वाक्यांचा उच्चार करण्याची जरूर नाहीं.

ॲडि०ः—स्वतःच्या स्वभावाला अनुरूप अशीं पुष्कळ वाक्यें त्यांच्या संग्रहीं असतात.

सॉक्रे०ः—आपल्या धन्याचें हित व्हावें अशी इच्छा बाळगणारे वृद्ध नोकरही, खाजगी तऱ्हेनें धन्याच्या मुलाजवळ अशा प्रकारचें बोलत असतात. धन्याच्या ऋणकोविरुद्ध अथवा धन्याला त्रास देणाऱ्या मनुष्याविरुद्ध धन्याकडून कांहींच कायदेशीर इलाज केला जात नसला, तर हे नोकर लोक धन्याच्या मुलाला तो मोठा झाला म्हणजे उत्तेजन देऊन, अशा सर्व लोकांचा सूड घेण्यास सांगून बापा-

पेक्षां अधिक मर्दपणा दाखवावयास सांगतात. मुलगा बाहेर गेला असतां, अशाच प्रकारचीं उदाहरणें त्याच्या ऐकण्यांत व पहाण्यांत येतात. शांत प्रकृतीचे व कोणत्याही व्यवहारांत न
Steph पडणारे असे लोक, शहरांत बावळट समजले जाऊन
550 त्यांना कोणीच मान देत नाहीं. ह्याच्या उलट, लुडबुड
करणारे लोक नांवाजले जाऊन वाखाणलेही जातात. हें सर्व ऐकून व पाहून आणि आपल्या बापाचें संभाषण ऐकून व त्याचे व्यवसाय इतरांच्या व्यवसायांबरोबर बारकाईनें तपासून, दोन परिणामांनीं तो दोन बाजूला ओढला जातो. एका बाजूनें, त्याचा बाप ( मुलाच्या ) आत्म्यांतील विवेचक तत्वाला पाणी घालून वाढवीत असतो, तर दुसऱ्या बाजूनें इतर लोक त्याच्या स्वभावांतील क्षुधात्मक व तेजस्वी तत्वाला पाणी घालून वाढवीत असतात आणि त्याचा स्वतःचा स्वभाव जरी वाईट नसला, तरी वाईट लोकांत तो मिसळत असल्यामुळें, ह्या दोन परिणामांच्या संयुक्त वजनानें मधल्या स्थितीकडे तो ओढला जातो. म्हणजे तापट व भांडखोर अशा मध्यम तत्वाला, आपल्या मनाचें राज्य स्वाधीन करून देऊन, बाणेदार व महत्त्वाकांक्षी असा मनुष्य तो बनून जातो.

ॲडि०:—अशा स्वभावाची उपपत्ती, तुम्ही बरोबर वर्णन केली.

सॉक्रे०:—अशा प्रकारें दुसऱ्या प्रकारची राज्यघटना व तशा प्रकारच्या स्वभावाचा मनुष्य आपण वर्णन केला.

ॲडि:–होय.

सॉक्रे०: – एश्चिलसच्या शब्दांत म्हणावयाचे म्हणजे, पुढील प्रकारच्या राज्यघटनेप्रमाणें असलेल्या मनुष्यस्वभावाचें वर्णन करावयास आपण सुरवात करावी काय ? अथवा आपल्या योजनेप्रमाणें, तशा प्रकारच्या राज्याच्या वर्णनास अगोदर सुरवात करावी काय ?

ॲडि०:—बेलाशक.

सॉक्रे०:—ह्यानंतर क्रमानें जी घटना येते ती अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धति होय.

ॲडि०:—अल्पप्रजासत्ताकराज्यपद्धति म्हणजे कोणत्या प्रकारची घटना म्हणतां ?

सॉक्रे०:—मालमत्तेच्या वैशिष्ट्यावर रचलेली राज्यघटना. ह्या घटनेंत श्रीमंत लोक राज्यकर्ते असून, गरीब लोकांना राज्यकारभारांत मुळींच भाग नसतो.

ॲडि०:—मला समजलें.

सॉक्रे०:—मानीजनराज्यपद्धतींतून अल्पप्रजासत्ताकराज्यपद्धतीकडे संक्रमण होण्याच्या प्रथम पायऱ्या आपण वर्णावयास नकोत काय ?

ॲडि०:—होय. आपण वर्णन केल्याच पाहिजेत.

सॉक्रे०—एकाद्या आंधळ्या माणसालाही, हें संक्रमण कसें होतें तें दिसूं शकेल.

ॲडि०:—कसें काय ?

सॉक्रे०:—खाजगी खजिन्यांत सोन्याचा प्रवेश सुरू झाला म्हणजे आतांच आपण वर्णन केलेली राज्यपद्धति नाश पावते. कारण पहिला परिणाम असा होतो कीं, धनीलोक संपत्ति खर्च करण्याचे प्रकार शोधून काढतात आणि कायद्याचा दुरुपयोग करून स्वतःला व आपल्या बायकांना, त्याचें उल्लंघन करावयास लावतात.

ॲडि०:—त्यांनीं असें केलें नाहीं तरच आश्चर्य !

सॉक्रे०:—नंतर ते एकमेकांकडे मत्सरी दृष्टीनें बघावयास लागून स्पर्धा सुरू करतात. ज्या सर्वसाधारण मंडळाचे ते सभासद असतात, त्या मंडळावरही ह्या स्पर्धेचा परिणाम होतो.

ॲडि०:—हें साहजिकच आहे.

सॉक्रे०:—त्यानंतर संपत्ति मिळविण्याच्या मार्गांत ते प्रगति करूं लागतात आणि ज्या प्रमाणांत त्यांचा संपत्तीविषयीं आदर वाढत जातो, त्या प्रमाणांत त्यांचा सद्गुणाविषयीं आदर कमी होतो. कारण संपत्ति व सद्गुण, ह्यांना एका तराजूच्या दोन पारड्यांत ठेवून त्यांचें वजन मापण्यांत आलें, तर त्यापैकीं एक खालीं पडेल व दुसरें वर जाणार नाहीं काय ?

ॲडि०:—हें अगदी खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून संपत्ति व संपन्न लोक ज्या राज्यांत मान्यता

Steph 551 पावतात, त्या राज्यांत सद्गुण व सद्गुणी लोक अपमानिले जातात.

ॲडि०: उघडच आहे.

सॉक्रे०:—आणि जें सन्मानिलें जातें, तें आचरलें जातें आणि जें अपमानिलें जातें, तें उपेक्षिलें जातें.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून असे लोक भांडखोर व महत्वाकांक्षी होण्याऐवजीं फायदा उकळणारे व लोभी असे होतात आणि श्रीमंत लोकांची स्तुति व गुणवर्णन करून, त्यांना अधिकाराच्या जागा देतात; पण गरीब लोकांचा तिरस्कार करतात.

ॲडि०:—खरोखर असेंच करतात.

सॉक्रे०:—सरतेशेवटीं ते अल्पप्रजासत्ताक राज्यघटनेचें प्रधान लक्षण असा कायदा करतात. त्या कायद्यानें अमुक एक रक्कम ठरवून, त्या रकमेपर्यंत ज्याच्याजवळ संपत्ति नाहीं, त्याला राज्यकारभारांत मुळींच हक्क देत नाहींत. ही विशिष्ट घटना जर अगोदर धाक घालून त्यांना प्रस्थापित करतां आली नाहीं, तर हातामध्यें शस्त्रें घेऊन ते अंमलांत आणतात. माझें मत चुकीचें आहे काय ?

ॲडि०:—नाहीं. तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—एका शब्दांत म्हणावयाचें म्हणजे ह्यालाच अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना म्हणतात.

ॲडि०:—खरें आहे. पण ह्या घटनेचा स्वभाव काय व तिच्यांत दोष कोणते ?

सॉक्रे०:—ह्या घटनेचा पहिलाच दोष, तिच्या मूलभूत कायद्याच्या स्वरूपांत आहे. जर एखाद्या उत्तम नावाड्याला, केवळ तो गरीब आहे म्हणून जबाबदारीची जागा दिली नाहीं, तर काय परिणाम होईल ?

ॲडि०:—जलप्रवास फारच धोक्याचा होईल!

सॉक्रे:०—हेंच तत्त्व, इतर कोणत्याही धंद्याच्या व्यवस्थेला लागत नाहीं काय ?

ॲडि०:—होय, लागतें.

सॉक्रे:० राज्यकारभार ह्यांतून वगळतां काय ? अथवा ह्यांत समाविष्ट करतां ?

ॲडि०:—मुख्यत्वेंकरून त्याच्याच मी समावेश करतों. कारण राज्यकारभार अतिशय कठीण आणि महत्त्वाचा असतो.

सॉक्रे०:—तर मग, अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या दोषांपैकीं हा एक दोष असून तो भयंकर स्वरूपाचा आहे.

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—पुढील दोष पहिल्याहून कमी भयंकर आहे काय ?

ॲडि०:—कोणता ?

सॉक्रे०:—अशा शहरामध्यें एकजूट खात्रीनेंच नाहींशी होईल. एका शहराचीं दोन शहरें होऊन, एक श्रीमंत लोकांचें व दुसरें गरीब लोकांचें होईल व एकाच ठिकाणीं असूनही हीं शहरें एकमेकांच्या विरुद्ध कट करीत राहतील. असा दोष उत्पन्न होणार नाहीं काय ?

ॲडि०:—हा दोष पहिल्याइतकाच भयंकर आहे.

सॉक्रे०:—आणखी असें पहा-लोकांच्या अंगांत युद्ध करण्याची शक्ति नसणें, हें केव्हांही अभिनंदनीय नाहीं. ( युद्ध करण्यास बहुतकरून ते असमर्थच होतील. ) कारण अशी वस्तुस्थिति होते कीं, अधिकारी लोक जेव्हां लोकांना युद्ध करावयास सांगून, त्यांच्या हातांत शस्त्रास्त्रें देतात, तेव्हां शत्रूपेक्षांही त्यांना लोकांचेंच भय अधिक वाटतें आणि लोकांचें जेव्हां युद्धांत सहाय्य घेत नाहींत, तेव्हां स्वत:च्या अल्पसंख्येमुळें ते असमर्थ ठरतात ! पैशाच्या लोभामुळें युद्धाचे करही ते द्यावयास नाखूष असतात हें निराळेंच !

ॲडि०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

Steph 552 सॉक्रे०:—कांहीं वेळापूर्वी जें तत्त्व आपण प्रतिपादिलें त्याकडे वळूं या. अशा राज्यपद्धतीमुळें, एकाच मनुष्याला, एकाच वेळेस, शेतकीचें, व्यापाराचें व युद्धाचें काम करावें लागणें, बरोबर आहे असें तुम्हांला वाटतें काय ?

ॲडि०:—नाहीं. मुळींच नाहीं.

सॉक्रे०:—ह्या पद्धतीमुळें दुसऱ्या इतर दोषांपेक्षां अधिक वाईट व इतर पद्धतींत दिसून न येणारा, असा पुढील दोष उत्पन्न होत नाहीं काय ?

ॲडि०: – तो कोणता ?

सॉक्रे०:—एका मनुष्याला आपली सर्व मालमत्ता विकावयास परवानगी देणें व दुसऱ्यास ती विकत घेऊं देणें, हा दोष मी सांगत आहे. ह्या दोषामुळें मालमत्तेच्या पहिल्या मालकाला, व्यापारी, कारागीर, घोडेस्वार अथवा पायदळ सैनिक, अशा कोणत्याही नात्यानें शहरांत रहातां येईनासें होऊन, निराधार व भिकारी बनविलें जातें.

ॲडि०:—आतांपर्यंत सांगितलेल्या राज्यपद्धती, असा प्रकार घडूं देत नव्हत्या.

सॉक्रे०:—अशा प्रकारची आपत्ति अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धतीप्रमाणें राज्यघटना असली म्हणजे टाळतां येत नाहीं. एरवीं कांहीं लोकांनीं बेसुमार श्रीमंत असणें व कांहींनीं अगदीं भिकारी असणें, अशी स्थिति संभवतच नाहीं.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणखी एक मुद्दा तुम्ही विचारांत घ्या. असा मनुष्य आपल्या ऐश्वर्याच्या दिवसांत पैसे खर्च करीत असतांना, उत्तम नागरिकत्वाच्या दृष्टीनें, थोडासा तरी राज्याला उपयोगी होता काय? उलट, राज्यकारभार करीत असूनही, तो खरोखर अधिकारीही नव्हता व राज्याचा नोकरही नव्हता; केवळ राज्याचें उत्पन्न उधळणारा एक प्राणी होता!

ॲडि०:—दुसरेंच वर्णन खरें आहे. तुम्ही म्हणतां तसा बाह्यात्कारीं तो अधिकारी होता, पण खरोखर उधळपट्टी करणाराच प्राणी होता.

सॉक्रे०:—तर मग, ज्याप्रमाणें भ्रमर मधमाशांच्या पोळयांत वाढून त्यांनाच त्रास देणारा होतो, त्याप्रमाणें असा मनुष्य आपल्या घरामध्यें भ्रमरासारखा वाढून राज्याला त्रास देणारा होतो, असें आम्ही म्हटलें तर तें योग्य आहे ना?

ॲडि०:—सॉक्रेटिस, निःसंशय तो असाच वागतो.

सॉक्रे०:—ॲडिमन्टस्, देवानें उडणाऱ्या भ्रमरांना दंश करण्याची शक्ति जरी दिलेली नाहीं, तरी त्यानें चालणाऱ्या भ्रमरांपैकीं कांहींना दंशविरहित ठेवून, बाकीच्यांना भयंकर दंश करण्याची शक्ति दिलेली आहे. ज्यांना दंश करतां येत नाहीं, असे लोक म्हातारपणीं भिकारी होऊन जातात. पण जे दंश करणारे आहेत, त्यांच्यामधूनच गुन्हेगार उत्पन्न होत नाहींत काय?

ॲडि०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—जेव्हां शहरांत भिकारी लोक तुमच्या दृष्टीस पडतात, तेव्हां असें समजा कीं, त्याच ठिकाणीं चोर, खिसेकापू, देवळांत दरोडा घालणारे व अशाच तऱ्हेचे इतर गुन्हे करणारे लोक, लपत छपत असतात.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ठीक. आणि अल्पप्रजासत्ताक पद्धतीच्या राज्यांत भिकारी लोक दिसत नाहींत काय ?

ॲडि०:—होय दिसतात. अधिकारी लोकांखेरीज बहुतेक सर्व भिकारीच असतात.

सॉक्रे०:—तर मग, आपणास असें निश्चयानें म्हणतां येणार नाहीं काय कीं, अशा राज्यामध्यें दंश करणारे पुष्कळ वाईट लोक असून त्यांना नेहमीं दाबांत ठेवण्याची दक्षता अधिकाऱ्यांना बाळगावी लागते ?

ॲडि:—होय. आपणांस खात्रीनेंच असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—शिक्षणाचा अभाव, कुशिक्षण व कुराज्यपद्धति, ह्यांमुळेंच अशी स्थिति होते ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धतीनें जें राज्य चालविलें जाईल त्याचा हा किंवा अशा प्रकारचा स्वभाव असेल. निदान इतके दोष तरी त्यांत असणारच !

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—अल्पप्रजासत्ताकराज्यद्धतीनें जें राज्य चालविलें जातें, त्याचें वर्णन आपण आतां थांबवूं. (ह्या पद्धतींत मालमत्तेच्या वैशिष्ट्यावर अधिकारी नेमले जातात.)

Steph 553 आतां आपण ह्या पद्धतीशीं जुळणारा ज्याचा स्वभाव आहे, अशा मनुष्याचा उगम व वाढ कशीं होतात हें पहाण्यास सुरवात करूं.

ॲडि०:—बेलाशक.

सॉक्रे०:—मानधन मनुष्य जो आपण वर्णन केला, त्याचें अल्पप्रजासत्ताक वृत्तीमध्यें जें संक्रमण होतें, तें पुढील तऱ्हेनें किंवा जवळ जवळ तशाच तऱ्हेनें होत नाहीं काय ?

ॲडि०:—कोणत्या तऱ्हेनें ?

सॉक्रे०:—मानधन मनुष्याला एक मुलगा असतो. तो प्रथम आपल्या बापाची बरोबरी करण्यास झटून त्याचें अनुकरण करतो. नंतर खडकावर ज्याप्रमाणें जहाज आदळतें, त्याप्रमाणें त्याचा बाप राज्यामध्यें आपटला जाऊन मालमत्तेसकट फेंकून दिला जातो, असें मुलाला अकस्मात् दिसून येतें. सेनापतीचें जबाबदारीचें काम अथवा इतर कांहीं मोठ्या अधिकाराचें काम, बापानें केलें असूनही त्याच्यावर खटला भरून चवकशी करण्यांत येते. तीमध्यें खोट्या साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या जाऊन व त्याला दोषी ठरविण्यांत येऊन, ठार मारण्यांत येतें अथवा हद्दपार करण्यांत येतें, अथवा हक्क काढून घेण्यांत येऊन त्याचें सर्व सत्त्व हिरावून घेण्यांत येतें.

ॲडि०:—हें सर्व घडणें शक्य असतें.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, हें सर्व दिसून आल्यावर आणि सर्व संपत्ति गमावल्यानंतर, मुलगा भिऊन जातो आणि महत्वाकांक्षा व तेजस्वी तत्व ह्यांना आपल्या हृदयसिंहासनावरून फेंकून देतो. दारिद्र्यावस्थेनें तो नमला गेल्यामुळें पैसे मिळविण्याच्या मार्गाला लागून, क्षुद्र व क्षुल्लक काटकसर आणि काबाडकष्ट करून संपत्ति सांठवतो. असा मनुष्य आपल्या हृदयसिंहासनावर क्षुधा व लोभ ह्यांचें तत्व स्थापित करतो व एखाद्या पौर्वात्य राजाप्रमाणें त्या तत्वाला आपला राजाच समजून, हिरेमाणकें इत्यादिकांनीं त्याला शृंगारून, आंखूड तरवार त्याच्या बाजूला बांधतो, असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

ॲडि०:—होय. मला असें वाटतें.

सॉक्रे०:—परंतु विवेचक व तेजस्वी तत्वांना तो वरील तत्वाच्या डाव्या व उजव्या बाजूस जमिनीवर बसावयास सांगून, त्यांना प्रजा व गुलाम असें समजतो. विवेचक तत्वाला, संपत्ति कशी वाढवावी ह्याशिवाय इतर कोणत्याही विषयाबद्दल संशोधन करण्यास किंवा विचार करण्यास मनाई करतो. दुसऱ्या म्हणजे तेजस्वी तत्वाला, संपत्ति किंवा संपन्न लोक ह्यांच्याखेरीज दुसरें कांहींहीं वाखाणावयाचें नाहीं व संपत्तीच्या अर्जनाशिवाय अथवा अशा हेतूच्या साधनार्थ जें उपयुक्त असेल, त्याशिवाय इतर कोणत्याही विषयाबद्दल महत्वाकांक्षा ठेवावयाची नाहीं, असें बजावून ठेवतो.

ॲडि०:—महत्वाकांक्षी मनुष्याचें इतकें जलद व पूर्ण रीतीनें लोभी मनुष्यांतच रूपांतर होणें शक्य आहे.

सॉक्रे०:—तर मग, असा मनुष्य अल्पप्रजासत्ताक प्रवृत्तीचा आहे काय?

ॲडि०—ज्या मनुष्यापासून त्याचें रूपांतर झालें आहे, त्या मनुष्याचा स्वभाव, अल्पप्रजासत्ताकपद्धतीच्या पूर्वींची जी राज्यपद्धति तिच्या-सारखा होता हें निश्चित आहे.

सॉक्रे०:—अल्पप्रजासत्ताक राज्यपद्धतीशीं त्याचें सादृश्य आपण पाहूं या.

ॲडि०:—होय. पाहूं या.

Steph 554 सॉक्रे०:—ठीक. प्रथमतः संपत्तीला सर्वांत अधिक महत्व देणें, ह्या बाबतींत त्याचें अल्पप्रजासत्ताकराज्य-पद्धतीशीं सादृश्य नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच आहे.

सॉक्रे०:—कंजूषपणानें वागणें, काबाडकष्ट करणें, अगदीं आवश्यक तेवढ्या गरजा भागवून इतर कोणत्याही बाबतींत खर्च न करणें व इतर इच्छा निरर्थक समजून त्यांना ताब्यांत ठेवणें—ह्या बाबतींतही त्याचें वरील राज्यपद्धतीशीं सादृश्य दिसून येत नाहीं काय ?

ॲडि०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, कृपणपणानें वागून प्रत्येक गोष्टींतून फायदा काढावयाचा व पैसा सांठवावयाचा, अशी त्याची बुद्धि असते, आणि पुष्कळ लोकांकडून असा स्वभाव वाखाणला जातो. आपण आतां वर्णन केलेल्या राज्यपद्धतीशीं अशा मनुष्याचें सादृश्य असतें, असें समजण्यांत माझी चूक होते आहे काय ?

ॲडि०:—मला वाटतें, तुमचें म्हणणें बरोबर आहे. अल्पप्रजासत्ताक-राज्यपद्धति व आपण चर्चा करीत असलेला मनुष्य, पैशालाच काय तें महत्व देतात, हें निश्चित आहे.

सॉक्रे०:—माझ्या मतें ह्याचें कारण असें कीं, शिक्षणाकरितां अशा मनुष्यानें कष्ट केलेले नसतात.

ॲडि०:—मला सुद्धां असेंच वाटतें. कारण एरवीं त्यानें गायक-नर्तक मंडळाचा, अज्ञानासारखा अंध पुढारी नेमून, त्याचा एवढा सन्मान केला नसता.

सॉक्रे०:—हें अगदीं खरें आहे. शिक्षणाच्या अभावामुळें, भ्रमर-वृत्तीच्या भिकार अथवा गुन्ह्याला प्रवृत्त करणाऱ्या वासना, अशा मनुष्यामध्यें वाढत जाऊन, केवळ दूरदर्शीपणाच्या विचारांनींच त्याच्याकडून त्या दाबल्या जातात, असें आपणांस म्हणतां येईल ना ?

ॲडि०:—नि:संशय आपणांस असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—अशा लोकांचीं वाईट कृत्यें दृष्टोत्पत्तीस केव्हां येतात, हें तुम्हांला माहीत आहे काय ?

ॲडि०:—केव्हां ?

सॉक्रे०:—ज्या ठिकाणीं मुलांचे पालक म्हणून ते असतात किंवा इतर ठिकाणीं जेव्हां अन्यायानें वागण्याचें त्यांच्या पूर्ण हातांत असतें, अशा वेळीं.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:--ह्यावरून स्पष्टच दिसून येतें कीं, जेव्हां इतर व्यवहारांमध्यें बाह्यात्कारी न्याय्य वर्तनानें, त्याला चांगलें नांव मिळवितां येतें, तेव्हां स्वतःच्या वाईट वासनांना सक्तीनें तो दाबून टाकीत असतो. ह्या वासनांचें तो बुद्धिवादानें नियमन करीत नाहीं अथवा अशा वासनांची पूर्ति करणें चुकीचें आहे, अशी आपली समजूत करून घेत नाहीं. केवळ परिस्थितीमुळें आणि असेल त्यालाही मुकावें लागेल ह्या भीतीमुळें, त्यांना तो दाबून टाकीत असतो.

ॲडि०:—होय. हें अगदीं स्पष्ट आहे.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, ह्या लोकांना स्वतःचा पैसा ज्या वेळेस खर्च करावयाचा नसतो, त्यावेळेस भ्रमराप्रमाणें ह्यांच्या वासना दिसून येतात.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—म्हणून असा मनुष्य शांत–चित्त कधींही असत नाहीं. त्याचें मन एकाग्र नसून द्विधा असतें. पण सामान्यतः त्याच्या उच्च मनोवृत्ती नीच वासनांना दाबून ठेवीत असतात.

ॲडि०:—खरें आहे.

Steph 555 सॉक्रे०:—ह्या कारणामुळें, मला वाटतें, इतरांपेक्षां असा मनुष्य बाह्यतः प्रतिष्ठित दिसेल. परंतु एकवाक्यता व सुस्वरता, ह्यांनीं संयुक्त असलेला आत्म्याचा सद्गुण मात्र त्याच्यापासून लांब दुसरीकडे पळून जाईल.

ॲडि०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:—जेव्हां एखादें बक्षिस मिळवावयाचें असतें अथवा सन्माननीय कौशल्याची करामत दाखवावयाची असते, तेव्हां असा कंजूष मनुष्य अत्यंत हीन प्रतिस्पर्धी बनतो, ह्यांत संशय नाहीं. कारण, अशा सामन्यामध्यें व चढाओढीमध्यें भाग घेतला असतां, स्वतःच्या खर्चिक वासना चेतविल्या जातील अशी त्याला भीति वाटते. म्हणून कांहीं भागांना

युद्धावर पाठवावयाचें, अशी अल्पप्रजासत्ताकराज्याची पद्धत तो अंमलांत आणून, स्वतःच्या पैशाची बचत व स्वतःचा अपजय करून घेतो.

ॲडि०: – अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—अल्पप्रजासत्ताक पद्धतीचें राज्य व कंजूष स्वभावाचा वित्तपारधी, ह्यांच्यांत जें सादृश्य व समानधर्मत्व आहे, त्याविषयीं अजूनही आपली खात्री होत नाहीं काय ?

ॲडि०:—अगदीं पूर्ण खात्री झाली.

सॉक्रे०:—मला वाटतें, आपण आतां बहुसत्ताकराज्यपद्धति कशा प्रकारें उत्पन्न होते आणि ती उदयास आली असतां तिचा स्वभाव काय असतो, ह्याचें विवेचन करावयास आरंभ करूं या. ह्यामुळें अशा स्वभावाचा मनुष्यही आपणास शोधून काढतां येऊन, त्याच्याविषयीं निर्णय देतां येईल.

ॲडि०:—आपणाला जर पद्धतशीर चर्चा करावयाची असेल, तर असेंच केलें पाहिजे.

सॉक्रे०:—अल्पप्रजासत्ताकराज्यपद्धतीमधून बहुसत्ताकराज्यपद्धतींत होणारें संक्रमण, बेसुमार संपत्तीच्या अनियंत्रित तृष्णेमुळें घडून येत नसतें काय ? बेसुमार संपत्ति, ही अत्यंत सुदैवाची गोष्ट असून तिचें संपादन हें कर्तव्यकर्म होय, असें समजलें जात नाहीं काय ? आणि हें संक्रमण पुढील तऱ्हेनें होत नाहीं काय ?

ॲडि०:—ती तऱ्हा वर्णन करून सांगाल काय ?

सॉक्रे०:—अल्पप्रजासत्ताकराज्यामध्यें, ज्याअर्थीं अधिकाऱ्यांची सत्ता ही केवळ त्यांच्याजवळ असलेल्या मोठ्या संपत्तीवर अवलंबून असते, त्याअर्थीं दुर्व्यसनी तरुण लोकांजवळ असलेल्या मालमत्तेची त्यांनीं उधळपट्टी करूं नये, अशा तऱ्हेचा कायद्याचा निर्बंध, अधिकारी लोक घालूं इच्छित नाहींत. कारण, अशा तरुण लोकांची मालमत्ता

खरेदी करून व त्यांना उसनें पैसे देऊन, स्वत:ला अधिक श्रीमंत व अधिक सन्माननीय होतां येईल, अशी अधिकाऱ्यांना आशा वाटत असते.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आतांपर्यंतच्या चर्चेवरून स्पष्टच आहे कीं, राज्यांतील नागरिकांना संपत्तीला मान देणें व त्याच वेळेस नेमस्तपणाही योग्य मर्यादेंत राखणें, शक्य नसतें. कारण ह्यांपैकीं एकाकडे तरी त्यांचें दुर्लक्ष होणारच.

ॲडि०:—हें अगदीं स्पष्टच आहे.

सॉक्रे०:—अशा राज्यांतील अधिकारी लोक, निर्बंध स्वैराचाराला मोकळीक देऊन, उच्चकुळांतील लोकांना गरीब होण्यास पुष्कळ वेळां भाग पाडतात.

ॲडि०:—होय. असें ते करतात.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेनें दरिद्री झालेले लोक, माझ्या मतें, शहरामध्यें चावा घेण्याच्या तयारीनें लपतछपत असतात. ह्यांच्यापैकीं कांहीं लोक कर्जबाजारी असतात, कांहीं मतस्वातंत्र्य व हक्क गमावलेले असतात आणि कांहीं ह्या दोन्हीं प्रकारच्या आपत्तींनी ग्रासलेले असतात. हे सर्व लोक, त्यांच्या मालमत्तेच्या नवीन मालकांविरुद्ध व सुस्थितींत असलेल्या सर्व लोकांविरुद्ध, द्वेषबुद्धीनें गुप्त कट करीत राहून क्रांति करण्यास उत्सुक असतात.

ॲडि०—खरें आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, भांडवलवाले लोक स्वत:च्या हितसंबंधांत गर्क राहून, आपल्या शत्रूंकडे लक्ष न देण्याचें ढोंग करीत असतात. आणि त्या शत्रूंपैकीं एखादा निर्धन झालेला जेव्हां
Steph त्यांच्या तावडींत सांपडतो, तेव्हां विषमय असा पैसा
556 त्याला कर्जाऊ देऊन, मुद्दलापेक्षां दुप्पट रक्कम त्याच्या-

कडून वसूल करून घेतात. अशा प्रकारें, त्यांच्याकडून मधुपवृत्तीचे व भिकारी लोक राज्यामध्यें वाढविले जातात.

ॲडि०:—होय. असें ते करतात.

सॉक्रे०:—आणि मालमत्ता इच्छेला येईल त्याप्रमाणें विकून टाकण्याची सक्त मनाई करून, ह्या वाईट गोष्टीचें निर्दालन करण्याचेंही ते मनावर घेत नाहींत अथवा अशा भयंकर गोष्टींची वासलात लावण्याचा एक कायदा आहे, त्याचा अवलंब करण्यासही ते तयार होत नाहींत.

ॲडि०:—तुम्ही कोणता कायदा म्हणतां ?

सॉक्रे०:—पहिल्या उपायाच्या खालोखाल चांगला व नागरिकांना सद्गुणी होण्यास भाग पाडणारा असा तो आहे. कारण, जर असा सर्वसाधारण कायदा करण्यांत आला कीं, आपखुषीनें केले जाणारे करार ते करार करणाऱ्याच्या योग्य जबाबदारीवरच करण्यांत यावे, तर हल्लीं शहरांतून निर्लज्जपणानें करण्यांत येत असलेले पैशाचे व्यवहार कमी होतील आणि आपण वर्णन केलेले वाईट परिणामही कमी होतील.

ॲडि०:—होय. पुष्कळ कमी होतील.

सॉक्रे०:—पण सध्यां असा प्रकार आहे कीं, जीं निरनिराळीं आमिषें मी सांगितलीं, तीं अधिकारी मंडळाला आपल्या प्रजेशीं आडदांडपणानें वागण्यास उत्तेजन देतात. आपण जर खुद्द अधिकारी वर्ग व त्यांचीं मुलें, ह्यांजकडे बघितलें तर आपणांस असें दिसून येतें कीं, त्यांच्यातील तरुण लोक शरीरानें व मनानें चैनी व आळशी होऊन, इतके सुस्त व बायकी बनतात कीं, त्यांना सुखाचा मोह आवरत नाहीं व दुःख सहन करवत नाहीं.

ॲडि०:—खात्रीनेंच ते असे बनतात.

सॉक्रे०:—आणि त्यांची वडील मंडळी, पैसे मिळविण्याशिवाय इतर गोष्टींबद्दल उदासीन असतात व गरीब लोकांप्रमाणें सद्गुणाबद्दलही निष्काळजी असतात.

ॲडि०:— निःसंशय.

सॉक्रे०:—अशी परिस्थिति असतांना, अधिकारी लोक व त्यांचे प्रजाजन, यात्रेच्या अथवा मोहीमेच्या प्रसंगांत, बरोबरीनें प्रवास करणारे अथवा बरोबरीचे सैनिक म्हणून जेव्हां एके ठिकाणीं येतात; अथवा संकटाच्या प्रसंगांत जेव्हां ते एकमेकांच्या वर्तुणुकीचे साक्षीदार असतात–कारण अशा वेळेस गरीब लोक श्रीमंत लोकांकडून तिरस्कारले जाणें शक्य नसतें. युद्धामध्यें पुष्कळ वेळां असें घडून येतें कीं, चैनीमध्यें वाढलेला व चंगळ असल्यामुळें पुष्ट झालेला श्रीमंत मनुष्य, बारीक व कष्टाळू गरीब मनुष्याच्या शेजारीं उभा केला जातो— तेव्हां गरीब मनुष्याजवळ, श्रीमंत मनुष्य आपली दुःस्थिति श्वासोच्छ्वास प्रयासानें करीत सांगत असतो. अशा सर्व प्रसंगीं, आपल्याच भित्रेपणामुळें असे नालायक मनुष्य श्रीमंत बनूं शकतात, असें गरीबांना वाटल्याशिवाय राहील काय ? व खाजगी भेटीमध्यें "आपले अधिकारी कुचकामाचे आहेत," असें एकमेकांशीं ते म्हणणार नाहींत काय ?

ॲडि०:—माझी खात्री आहे, ते असें म्हणतील.

सॉक्रे:—नेहमीं रोगट असणाऱ्या शरीराला, बाहेरचें लहानसें कारणही आजार आणण्यास पुरतें आणि कांहीं वेळां बाहेरच्या कारणा-शिवायही त्याच्यामध्यें बिघाड होतो. अशा रोगी शरीराप्रमाणें ज्या शहराची स्थिति आहे असें हें शहर, अल्पसत्ताक पक्षाकडून अथवा बहुसत्ताक पक्षाकडून, बाहेरच्या शत्रूंचें सहाय्य मागित-

Steph 557

ल्याच्या क्षुल्लक सबबीवरून, असाध्य रोगाला व अंतस्थ कलहाला बळी पडत नाहीं काय ? अथवा बाह्य कारणांशिवायही तें कधीं कधीं अंतस्थ फाटाफुटीनें त्रस्त होत नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—गरीब लोक, जेव्हां विरुद्ध पक्षाच्या कांहीं लोकांना मारून, इतरांना हद्दपार करून, व नागरिकत्वाचे हक्क व अधिकार उरलेल्या लोकांना सारखे वाटून देऊन विजयी होतात, तेव्हां बहुसत्ताक राज्यघटना उदयास येते. अशा राज्यघटनेंत, अधिकाराच्या जागाही चिठ्ठ्या टाकून दिल्या जातात.

ॲडि०:—होय. प्रत्यक्ष युद्ध पुकारल्यामुळें म्हणा अथवा दुसऱ्या पक्षानें घाबरून जाऊन माघार घेतल्यामुळें म्हणा, बहुसत्ताक राज्यघटना स्थापन होते, हें तुम्ही बरोबर वर्णन केलेंत.

सॉक्रे०:—आतां हे लोक राज्यकारभार कोणत्या पद्धतीनें चालवितात आणि त्यांच्या घटनेचें स्वरूप काय? कारण ह्या पद्धतीशीं साम्य असणारा मनुष्य, अशाच प्रकारच्या वैशिष्ट्यानें युक्त असा आपणांस आढळून येईल.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पहिल्याप्रथम म्हणजे, असे लोक स्वतंत्र असून, शहरामध्यें आचाराचें व भाषणाचें स्वातंत्र्य नसतें काय? तसेंच मनुष्याला स्वतःच्या इच्छेप्रमाणें करण्याची मुभा नसते काय?

ॲडि०:—होय. आपणांस असें सांगण्यांत येतें.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेचें स्वातंत्र्य जेव्हां दिलेलें असतें, तेव्हां प्रत्येक नागरिक मर्जीला येईल त्याप्रमाणें आपला आयुष्यक्रम ठरवील, हें उघड आहे.

ॲडि०:—होय, हें स्पष्टच आहे.

सॉक्रे०:—म्हणून मला असें वाटतें कीं, ह्या राज्यघटनेंत स्वभाववैचित्र्य पुष्कळ दिसून येईल.

ॲडि०:—निःसंशय दिसून येईल.

सॉक्रे०:—कदाचित् ही राज्यपद्धति सुंदर असूं शकेल. प्रत्येक जातीच्या फुलांनीं चमकत असलेल्या वेलबुट्टीच्या पोषाखाप्रमाणें, ही

राज्यघटना फार सुंदर समजण्यांत येईल. आणि ज्याप्रमाणें मुलें व स्त्रिया ह्यांना चित्रविचित्र पोषाख आवडतात, त्याप्रमाणें पुष्कळ लोकांना, ही मानवी स्वभाववैचित्र्यानें पूर्ण अशी राज्यघटना, अत्यंत सुंदर वाटेल !

ॲडि०:--निःसंशय पुष्कळांना सुंदर वाटेल.

सॉक्रे०:—आणि आपणाला हव्या असलेल्या राज्यघटनेचें संशोधन, ह्या राज्यघटनेंत करणें हितावह होईल.

ॲडि०:—कसें काय ?

सॉक्रे०:—कारण, मी मघांशीं म्हटलें त्या प्रकारचें स्वातंत्र्य ह्या घटनेंत असल्यामुळें, प्रत्येक प्रकारची राज्यपद्धति त्यांत दिसून येईल. ज्या मनुष्याला आपल्याप्रमाणें राज्य स्थापन करावयाचें आहे, त्यानें बहुसत्ताक स्वरूपाच्या शहरांत जावें. निरनिराळ्या राज्यघटनांचा तो बाजारच जणू कांहीं असतो ! त्यांमधून पसंतीस पडेल ती घटना त्यानें शोधून काढावी व स्वतःच्या निवडीप्रमाणें आपलें राज्य स्थापावें.

ॲडि०:—कारण निरनिराळे नमुने मिळण्यास त्याला मुळींच अडचण पडणार नाहीं.

सॉक्रे०:—अशा राज्यामध्यें, तुमचें बुद्धिसामर्थ्य जरी अधिकाराची जागा पत्करण्यास योग्य असलें, तरी तुम्ही त्या जागेवर काम केलेंच पाहिजे अशी सक्ती असणार नाहीं. तसेंच जर तुम्हाला ही राज्यपद्धति आवडत नसेल, तर तिला शरण जाण्याची तुम्हाला जरूर पडणार नाहीं. इतर नागरिक युद्धावर गेले असतां, तुम्ही गेलेंच

Steph पाहिजे अथवा तुम्हाला शांतता नको असली तर तुम्ही

558 शांतता राखलीच पाहिजे असेंही नाहीं. तसेंच कायद्यानें, तुम्हांला एखाद्या अधिकाराच्या जागेची अथवा पंच म्हणून बसण्याची मनाई केली असली, तरी सुद्धां तुमच्या इच्छेला येईल

तर हीं दोन्हीं कामें तुम्हाला करतां येतील. अशा तऱ्हेचा आयुष्यक्रम, त्या क्षणापुरता तरी मोठ्या दैवी सुखाचा वाटणार नाहीं काय ?

ॲडि०:—त्या क्षणापुरता वाटणें शक्य आहे.

सॉक्रे०:—आणखी असें पहा. न्यायाधीशानें ज्यांच्या खटल्याची चवकशी करून निकाल दिलेला असतो, अशा लोकांचा नम्रपणा मोठा नखरेबाज असतो ! अशा राज्यांत, ज्या लोकांना देहान्तशासन अथवा हद्दपारी झाली आहे, ते तसेच राहून रस्त्यांमध्यें एखाद्या वीरा-प्रमाणें भटकत असतात ! जणूं कांहीं त्यांना कोणी बघत नाहीं अथवा त्यांच्याबद्दल कोणी भीति बाळगत नाहीं ! अशी उदाहरणें तुम्हीं बघितलीं आहेत ना ?

ॲडि०:—मी अशीं उदाहरणें पुष्कळ पाहिलीं आहेत.

सॉक्रे०:—अशा राज्याची सहनशक्ति अथवा क्षुद्र गोष्टींकडे लक्ष न देण्याची उदारता, आश्चर्यकारक नव्हे काय ? एवढेंच नव्हे, तर आपण आपल्या राज्याची उभारणी करीत असतांना, जें एक महत्वाचें तत्व घालून दिलें कीं, लहानपणापासून सुंदर वस्तूंच्या वातावरणांत व सर्व सुंदर विषयांचा अभ्यास करण्यांत ज्यानें आपले दिवस घाल-विलेले नाहींत व ज्याचा स्वभावही अलौकिक नाहीं, असा मनुष्य चांगला होणें शक्य नाहीं, ह्या तत्वाचा अशी राज्यपद्धति धिःकार करते. कारण अशा राज्यपद्धतींत, जे लोक राजकारणांत शिरतात त्यांनीं एवढें नुसतें म्हटलें कीं, "जनसमाजाचें आम्हीं कल्याण इच्छितों," म्हणजे अशा लोकांचे पूर्वीचे व्यवसाय काय होते, ह्याची मुळींसुद्धां चवकशी न करतां त्यांना सन्मानाला चढविले जाऊन, आपण घालून दिलेल्या तत्वाला मोठ्या दिमाखानें पायाखालीं तुडविलें जातें !

ॲडि०:—होय. मोठ्या ऐटीनें तुडविलें जातें.

सॉक्रे०:—बहुसत्ताक राज्यघटनेचीं हीं कांहीं तत्वें मी सांगितलीं. अशाच तऱ्हेचीं आणखी कांहीं आपणास सांगतां येतील. आणि बहुतांशीं ही बहुसत्ताक राज्यघटना, सर्वांना आवडणारी, बेशिस्त व विचित्रवर्णी असून, सर्व सारख्या दर्जाचे असोत वा नसोत, सर्वांना समान दर्जानें वागविणारी अशी होईल.

ॲडि०:—तुम्ही ज्या गोष्टी सांगितल्या त्या विख्यातच आहेत !

सॉक्रे०:—आतां अशाच तऱ्हेच्या व्यक्तीचा स्वभाव परीक्षण करण्यास मी तुम्हाला सांगतों. राज्यपद्धतीच्या उगमाप्रमाणें, अशा स्वभावाच्या उगमाचें संशोधन आपण करावें काय ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—असा मनुष्य, अल्पसत्ताकपद्धतिनिष्ठ कंजूष स्वभावाच्या माणसाचा मुलगा असून, अशा बापाच्या हाताखालीं वाढून त्याच्या प्रमाणें त्याचा स्वभाव झालेला असेल, असें मी म्हटलें तर बरोबर होणार नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—बापाप्रमाणें असा मुलगा, जीं सुखें उधळेपणास प्रवृत्त करून पैसे मिळविण्यापासून परावृत्त करतात, अशा सुखांवर कडक दाब ठेवील. ह्या सुखांना अनावश्यक सुखें म्हणतात, हें तुम्हांला माहीत आहेच.

ॲडि०:—खात्रीनेंच दाब ठेवील.

सॉक्रे०:—आपली भाषा सुबोध व स्पष्ट व्हावी, म्हणून आवश्यक व अनावश्यक वासनांची व्याख्या, आपण अगोदर करावी ना ?

ॲडि०:—होय करावी.

सॉक्रे०—ज्या वासना आपणास टाळतां येणें शक्य नाहीं व ज्यांचें समाधान झालें असतां आपलें हित होतें, त्या आवश्यक वासना

म्हणणें योग्य नाहीं काय? अशा वासना अनुभवल्याशिवाय आपल्याला राहवेल काय?

ॲडि०:--खात्रीनेंच नाहीं.

steph सॉक्रे०:—तर मग, अशा वासना आवश्यक म्हणणें
559 न्यायाचें आहे.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—लहानपणापासून योग्य शिक्षणानें आपणास ज्या वासना सोडून देतां येतात व ज्यांचें अस्तित्व आपल्या कल्याणाचें कधींच नसून, कांहीं बाबतींत अहितकारक असतें, अशा वासनांना अनावश्यक म्हणणें बरोबर आहे ना?

ॲडि०:—होय. बरोबर आहे.

सॉक्रे०:—वासनांची सर्व साधारण कल्पना यावी, म्हणून अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक प्रकारच्या वासनांचें उदाहरण देणें बरोबर होणार नाहीं काय?

ॲडि०:—होय. बरोबर होईल.

सॉक्रे:०—आरोग्य व शारीरिक बळकटी, ह्यांस पुरेशी अशी अन्नाविषयीं (साधी भाकर व मांस) असलेली वासना आवश्यक वासना नव्हे काय?

ॲडि०:—मलाही असेंच वाटतें.

सॉक्रे०:--भाकरीबद्दल वासना दोन कारणांनीं आवश्यक असते. भाकरी केवळ हितावहच नव्हे तर शरीरयात्रेला आवश्यक असतें.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—पण शरीराला बळकटी आणण्यापुरेशीच मांसाबद्दल वासना आवश्यक समजावी.

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—स्वादिष्ट व चवदार पक्वान्नांबद्दल भूक असणें, म्हणजे अनावश्यक वासना असणें नव्हे काय? कारण लहानपणापासूनच्या शिस्तीनें व शिक्षणानें, पुष्कळ लोकांना अशी वासना टाकून देतां येण्यासारखी असते. अशी वासना शरीराला अपायकारक असून, ज्ञानाच्या व सद्गुणाच्या व्यासंगांत आत्म्याला अडथळा करणारी असते.

ॲडि०:—होय. अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्या दुसऱ्या प्रकारच्या वासना, खर्चांत आणणाऱ्या असतात व पहिल्या प्रकारच्या वासना, वस्तूंच्या उत्पादनास मदत करणाऱ्या असल्यामुळें, पैसे मिळवून देणाऱ्या असतात.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—प्रेमाचा विकार व इतर वासना, ह्या विषयींही आपणास असें म्हणतां येईल काय?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:— ज्या मनुष्याला आपण भ्रमर म्हणून संबोधिलें, तो खर्चांत आणणारीं वरील सुखें व वासना ह्यांनीं त्रस्त झालेला असून, अनावश्यक वासनांचा नेहमीं गुलाम झालेला असतो. पण ज्या मनुष्याच्या वासना आवश्यक प्रकारच्या असतात, तो कंजूष व अल्पसत्ताकपद्धतिनिष्ठ प्रवृत्तीचा असतो, असें आपण वर्णन केलें नाहीं काय?

ॲडि०:—होय. आपण असें वर्णन केलें.

सॉक्रे०:— अल्पसत्ताक स्वभावाचा मनुष्य बहुसत्ताक स्वभावाचा कसा होतो, हें आपण पाहूं या.

ॲडि०:—होय. तो असें रूपांतर कसें पावतो?

सॉक्रे०:—अज्ञानाच्या व कंजूषपणाच्या वातावरणांत वाढ झाल्यानंतर, तरुण मनुष्य जेव्हां मधुकरवृत्तीच्या लोकांप्रमाणें मध चाखावयास लागून, विविध प्रकारचीं सुखें अनुभवण्यास मिळवून देणाऱ्या

भयंकर व रानटी स्वभावांच्या लोकांची ओळख करून घेतो, तऱ्हां अल्पसत्ताकस्वभावांतून बहुसत्ताक स्वभावांत त्याचें रूपांतर होतें.

ॲडि०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—राज्यांतील दोन पक्षांपैकीं, एका पक्षाला समान स्वभावाची परकीय मदत मिळाल्यामुळें, ज्याप्रमाणें राज्यांत बदल होतो, त्याप्रमाणें तरुण मनुष्याच्या स्वभावांतही, वासनांच्या दोन पक्षांपैकीं, एका पक्षाला समान स्वरूपाच्या बाहेरच्या वासनानीं मदत केल्यामुळें बदल होतो, असें आपणास म्हणतां येणार नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच म्हणतां येईल.

सॉक्रे०:—बापाच्या अथवा इतर नातेवाईकांच्या निर्भत्सनेमुळें अथवा उपदेशामुळें, तरुण मनुष्यामध्यें असलेल्या अल्पसत्ताक तत्वाला आधार मिळाला म्हणजे त्याच्या
Steph 560 अंतःकरणांतील वासनांच्या दोन पक्षांमध्यें झटापट होऊं लागून युद्ध सुरू होतें.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि कधीं कधीं बहुसत्ताकपक्ष अल्पसत्ताकपक्षाला शरण जातो आणि तरुण मनुष्याच्या मनाला लाज वाटावयास लागल्यामुळें, कांहीं वासना मारल्या जातात अथवा हांकलून दिल्या जातात, व पुन्हां व्यवस्थितपणा आणला जातो.

ॲडि०:—होय. कधीं कधीं असें घडून येतें.

सॉक्रे०:—परंतु घालवून दिलेल्या वासनांच्या सारख्याच कांहीं नवीन वासना, गुप्त प्रकारानें वाढीस लागलेल्या असतात व बापानें दिलेल्या शिक्षणांत शास्त्रीय ज्ञानाचा अभाव असल्यामुळें, त्या असंख्य व बळकट होतात.

ॲडि०:—होय. अशी सामान्यतः स्थिति असते.

सॉक्रे०:—ह्या वासना त्याला आपल्या जुन्या सोबत्यांकडे ओढून नेतात आणि त्यांच्याशीं गुप्त सहवास ठेवून दुसऱ्या अनेक वासना निर्माण करतात.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणि शेवटीं मला वाटतें, ह्या वासना तरुण मनुष्याच्या हृदयाच्या बालेकिल्यावर हल्ला करतात. कारण जे देवांचे आवडते आहेत, अशा लोकांच्या मनावर, पूर्ण ज्ञान, सुंदर विषय व सत्कल्पना ह्यांचा जसा पहारा असतो, तसा पहारा ह्या मनुष्याच्या मनावर त्यांना दिसून येत नाहीं.

ॲडि०: —खरें आहे.

सॉक्रे०: —उलट खोट्या व निराधार कल्पना व मतें, ह्या मनुष्याच्या हृदयांत उदित होऊन, त्याचें मन काबीज करतात.

ॲडि०:—होय. असें करतात.

सॉक्रे०:—शेवटीं असा मनुष्य *लोटस फळ भक्षण करणाऱ्या लोकांच्या देशांत परत जाऊन, त्यांच्याबरोबरच उघडपणें रहावयास लागतो. त्याच्या आत्म्यामध्यें असलेल्या कंजूषपणाच्या तत्वाला, त्याच्या नातलगांनीं मदत पाठविली असतां, हीं अहंमन्य तत्वें हृदयाच्या किल्ल्याचे दरवाजे बंद करून, मदतीस आलेल्या सैन्यास प्रवेश करूं देत नाहींत. इतकेंच नव्हे, तर वडील माणसांकडून उपदेशाच्या स्वरू-

* Lotos-eaters म्हणून उत्तर आफ्रिकेंत एक जात आहे, असें ग्रीक लोक मानीत. हे लोक Lotos लोटस फळ भक्षण करून रहात असत. हे फळ खजूरासारखें गोड लागत असे. बाहेरच्या देशांतून आलेल्या लोकांनीं हें फळ भक्षण केलें असतां, त्यांना आपल्या देशास परत जाण्याची विस्मृति होई. यूलिसिस व त्याचे सोबती त्रोजन युद्ध संपल्यावर स्वदेशास परत येत असतां Lotos-eaters च्या देशाला लागले होते व त्यांना स्वदेशाची विस्मृति पडली होती, असें Homer होमर कवीनें आपल्या Odyssey काव्यांत वर्णन केलें आहे.

पांत आलेल्या शिष्टाईला सुद्धां धुडकावून लावतात; लज्जेला मूर्खपणा असें संबोधून, तिला अनादरपूर्वक हद्दपार करतात व आत्मसंयमनाला भ्याडपणा असें विशेषण देऊन, हांकलून लावतात. तसेंच, निरर्थक वासनांची मदत घेऊन, नेमस्तपणा व व्यवस्थित खर्च म्हणजे गांवढळपणा व अनुदारपणा असें सिद्ध करून, त्यांना बाहेर घालवून देतात. अशा प्रकारें हीं तत्वें स्वतः जातीनिशीं लढून विजयी होतात ना ?

ॲडि०:—निःसंशय विजयी होतात.

सॉक्रे०:– त्यांच्या ताब्यांत असलेल्या मनुष्याच्या आत्म्यामधून वरील सद्गुणांना घालवून लावल्यानंतर आणि त्याला मोठ्या गूढ गोष्टींमध्यें प्रविष्ट केल्यानंतर, हीं तत्वें उद्धटपणा, अव्यवस्थितपणा, दुर्वृत्तपणा व निर्लज्जपणा, ह्यांना मोठ्या समारंभानें त्यांच्या डोक्यावर मुगूट चढवून व त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन तरुण मनुष्याच्या अंतःकरणांत लगेच प्रस्थापित करून देतात.
Steph 561 उद्धटपणा म्हणजे चांगली वागणूक, अव्यवस्थितपणा म्हणजे स्वातंत्र्य, दुर्वृत्तपणा म्हणजे औदार्य व निर्लज्जपणा म्हणजे शौर्य, अशीं मोहक नांवें त्यांच्याकडून देण्यांत येतात. आवश्यक वासनांची पूर्ति केली म्हणजे झालें, अशा वातावरणांत जो लहानपणापासून वाढला आहे, असा मनुष्य वर सांगितलेल्या प्रकारानें, तरुणपणांत बदलत नाहीं काय व त्यामुळें तो अनावश्यक व घातकी सुखांना पूर्ण मुभा देत नाहीं काय ?

ॲडि०:—होय. हें उघडच आहे.

सॉक्रे०:—त्यानंतर असा मनुष्य, आवश्यक सुखांकरितां जितका पैसा, मेहनत व वेळ खर्च करतो, तितकाच अनावश्यक सुखांकरितां करावयास लागतो. पण स्वतःचें स्वैरवर्तन मर्यादित ठेवण्याइतका सुदैवी बनून, व वृद्धापकाळीं विकारांची बंडाळी पुष्कळ अंशीं कमी झाल्यामुळें, हद्दपार केलेल्या कांहीं गुणांना परत बोलवून, हल्ला करणाऱ्या

दुर्गुणांच्या जर तो सर्वस्वी आधीन गेला नाहीं, तर निरनिराळ्या सुखांमध्यें भेद न मानतां, दैवयोगानें जें सुख पुढें येईल त्याच्या आहारीं पडून, त्या सुखाची पूर्ति झाल्यावर दुसरें सुख अनुभवण्यास लागावयाचें व कोणत्याच सुखाचा तिटकारा न करतां, सर्वांचाच सारखा परामर्ष घ्यावयाचा अशी त्याला संवय होईल.

ॲडि०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—होय. आणि त्याला जर असें सांगण्यांत आलें कीं, कांहीं सुखें चांगल्या व सन्मान्य अशा वासनांच्या समाधानाकरितां आहेत व कांहीं वाईट वासनांच्या पूर्तीकरितां आहेत; म्हणून पहिल्या प्रकारचीं सुखें अनुभवण्यांत यावींत व मान्य समजावींत, परंतु दुसरी निंद्य समजून तीं जिंकण्यांत यावींत, तर हा सदुपदेश तो स्वीकारीत नाहीं अथवा आपल्या हृदयाच्या किल्लयांत त्याला प्रवेश करून देत नाहीं. उलट हा उपदेश मान डोलवून तो ऐकतो व म्हणतो कीं, वासना सर्व सारख्याच असून सर्वांना सारखाच मान दिला पाहिजे.

ॲडि०:—होय. त्याची वर्तणूक अशीच असते.

सॉक्रे०:—म्हणून, तत्कालिक वासनेचें समाधान करून घेण्यांतच तो आपलें आयुष्य काढीत असतो. कांहीं दिवस तो संगीत व मद्य ह्यांच्या सान्निध्यांत बेहोष होऊन राहील, तर कांहीं दिवस शारीरिक व्यायामच घेत बसेल. कांहीं दिवस आळसांत वेळ घालवून सर्वच गोष्टींकडे दुर्लक्ष करील व नंतर तत्वज्ञानाच्या व्यासंगांत आयुष्य घालविण्यास लागेल. पुष्कळ वेळां सार्वजनिक कामांमध्यें भाग घेऊन, तत्कालिक स्फूर्तीप्रमाणें उठून भाषण करील व आचरणही करील. त्याला कीर्तीचा लोभ असल्यामुळें, मोठ्या सेनापतीचें अनुकरण करण्याचा तो प्रयत्न करील व नंतर यशस्वी व्यापाऱ्याचा त्याला हेवा वाटूं लागला कीं, व्यापारीही बनेल. अशा प्रकारें आयुष्यांत खरोखर व्यव-

स्थितपणा व नेमस्तपणा मुळींच नसूनही, तो स्वतःचें आयुष्य मजेदार, स्वतंत्र व सुखावह समजून जीवितयात्रा शेवटास नेईल !

ॲडि०:—"स्वातंत्र्य व समता" हीं ध्येयें असणाऱ्या मनुष्याच्या आयुष्याचें तुम्हीं चांगलें वर्णन केलें.

सॉक्रे०:—होय. आणि मला वाटतें, पुष्कळ स्वभावांच्या वैचित्र्यानें पूर्ण, असें हें आयुष्य आहे. आपण जें शहर वर्णन केलें, त्याला अनुरूप असा हा वैचित्र्यपूर्ण मनुष्य आहे. पुष्कळ स्त्रिया व पुरुष अशा मनुष्याच्या आयुष्याचा हेवा करतील. अशा मनुष्याच्या स्वभावांत, पुष्कळ राज्यपद्धती व स्वभाव ह्यांचे नमुने पहावयास सांपडतील.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—असा मनुष्य बहुसत्ताक स्वभावाचा आदर्श म्हणून समजावें काय ?

ॲडि०:—होय.

Steph सॉक्रे०:—आतां सर्वांत अत्यंत सुंदर अशी राज्य-
562 पद्धति व सर्वांत अत्यंत सुंदर असा मनुष्य म्हणजे अरेराव-
राज्यघटना व जुलमी मनुष्य, ह्यांचें वर्णन करण्याचें काम काय तें उरलें आहे !

ॲडि०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय मित्रा, अरेरावराज्यघटना कशी उत्पन्न होते, तें मला सांग. बहुसत्ताकराज्यपद्धतीची ती रूपांतरीत आवृत्ति आहे, हें उघडच आहे.

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें अल्पसत्ताकराज्यपद्धति बहुसत्ताकराज्यघटनेला जन्म देते, त्याप्रमाणेंच बहुसत्ताकराज्यघटना अरेरावराज्यघटनेला जन्म देते ना ?

ॲडि०:—हें विधान स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—अल्पसत्ताकपद्धति, ज्या गोष्टीला अत्यंत चांगली म्हणून समजत असे व जिच्यामुळें अल्पसत्ताकपद्धति स्थापन झाली, ती गोष्ट म्हणजे बेसुमार संपत्ति. होय ना ?

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—पण संपत्तीची तृप्त न होणारी अशी वांछा व पैसे मिळविण्यापलीकडे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची उपेक्षा, ह्या कारणांनींच अल्पसत्ताकपद्धतीचा नाश झाला.

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—अल्पसत्ताकपद्धतीप्रमाणें बहुसत्ताकराज्यघटना सुद्धां, ज्या विषयाला ती राज्याची शोभा अथवा राज्याचें परम कल्याण समजते, त्या विषयासंबंधीं अतृप्त वासना ठेवल्यानेंच नाश पावेल, असें आपणांस म्हणतां येईल ना ?

ॲडि०:—तुमच्या मताप्रमाणें असा कोणता विषय ?

सॉक्रे०:—स्वातंत्र्य ! कारण मला वाटतें, बहुसत्ताक शहरामध्यें तुम्हांला असें सांगण्यांत येईल कीं, स्वातंत्र्य हेंच खरें ऐश्वर्य असून स्वतंत्रवृत्तीच्या माणसाला असेंच शहर योग्य होय.

ॲडि०:—अशी भाषा फार प्रचारांत आहे.

सॉक्रे०:—थोड्याच वेळांपूर्वीं मी जें म्हणत होतों, त्याकडे वळूं या. एकाच विषयाची अतृप्त अशी हांव धरून, इतर सर्व विषयांची उपेक्षा केल्यामुळें, अल्पसत्ताकपद्धतीप्रमाणें बहुसत्ताकराज्यघटना सुद्धां बदलून जाऊन अरेरावराज्यघटनेचा मार्ग साहजिकच मोकळा केला जाईल. हें माझें मत बरोबर आहे ना ?

ॲडि०:—तें कसें काय ?

सॉक्रे०:—जेव्हां स्वातंत्र्याकरितां तहानलेलें बहुसत्ताकपद्धतीचें शहर, दुष्ट लोकांच्या अधिकाराखालीं येतें, तेव्हां योग्य मर्यादेच्या पलीकडे तें स्वातंत्र्यरूपी मद्य प्यावयास लागतें आणि जर अधिकारी

लोक अत्यंत नम्र होऊन ह्या मद्याचे विपुल पेले देण्यास तयार झाले नाहींत, तर त्यांना निंद्य म्हणून टरवितें.

ॲडि०:—होय. असेंच केलें जातें.

सॉक्रे०:—असें शहर, राज्याधिकाऱ्यांशीं जे आज्ञाधारकपणानें वागतात त्यांना खुषीचे गुलाम व कुचकामाचे लोक म्हणून संबोधतें. आणि जे अधिकारी, प्रजाजनांप्रमाणें वागतात व जे प्रजाजन, अधिकारी लोकांप्रमाणें वागतात, त्यांना असें शहर सार्वजनिक व खाजगीरीत्या वाखाणतें. म्हणून अशा शहरांत स्वातंत्र्य अतिरेकाला जात नाहीं काय ?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, अशा प्रकारची अंदाधुंदी खाजगी घरांतून शिरकाव करते आणि जिकडे तिकडे पसरून शेवटीं पशूंमध्यें सुद्धां प्रस्थापित होते.

ॲडि०:—ह्याचा अर्थ आम्ही काय समजावयाचा ?

सॉक्रे०:—माझ्या म्हणण्याचा अर्थ असा. बाप आपल्या मुलांप्रमाणें वागण्याचा सराव ठेवून, आपल्या मुलांना नेहमीं भिऊन असतो. मुलगा बापाप्रमाणें वागतो व आपलें

Steph 563

स्वातंत्र्य सिद्ध करण्याच्या हेतूनें, आपल्या आईबापांना मान देत नाहीं अथवा भीत नाहीं. आणि मूळचे नागरिक लोक, देशांत स्थायी झालेले परके लोक व अगदीं परके लोक, हे सर्व सारख्याच दर्जानें वागावयास लागतात.

ॲडि०:—अशा वस्तुस्थितीचा परिणाम तुम्ही बरोबर सांगितला.

सॉक्रे०:—मी कांहीं परिणाम तुम्हांला सांगितले. अशाच प्रकारच्या आणखी कांहीं किरकोळ गोष्टी, मी तुम्हांला सांगतों. अशा परिस्थितींमध्यें, शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना भिऊन त्यांची खुषामत करतात व

विद्यार्थी आपल्या शिक्षकांचा तिरस्कार करतात. सामान्यतः बोलावयाचें म्हणजे, तरुणलोक वृद्धांचें अनुकरण करतात आणि बोलण्यांत व वागण्यांत त्यांच्या बरोबर सामना करतात. तसेंच वृद्धलोक तरुणांचें अनुकरण करून त्यांच्याबरोबर थट्टामस्करी करतात. नाहींतर 'दुर्मुखलेले व अधिकार गाजविणारे,' अशा निंदाव्यंजक शब्दांनीं तरुणांकडून आपणांस हिणवण्यांत येईल, असें त्यांना भय वाटतें.

ॲडि०:—अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—परंतु अशा राज्यपद्धतींत, जेव्हां गुलाम म्हणून विकत घेतलेले स्त्रीपुरुष, विकत घेणाऱ्या लोकांप्रमाणेंच स्वातंत्र्यानें वागावयास लागतात, तेव्हां स्वातंत्र्याची मर्यादा शेवटच्या टोंकाला पोंचते. स्त्रिया व पुरुष ह्यांच्या परस्पर संबंधांत स्वातंत्र्य व समता ह्यांची मर्यादा किती विस्तार पावते, हें सांगावयास मी जवळ जवळ विसरूनच गेलों होतों !

ॲडि०:—एथ्रिलसच्या भाषेंत म्हणावयाचें म्हणजे, जे शब्द आपल्या ओंठावर आहेत त्यांचा उच्चार आपण केला पाहिजे ना ?

सॉक्रे०:—अर्थात्‌च ! प्रत्यक्ष अनुभव असल्याशिवाय, अशा राज्यपद्धतींत पाळलेलीं जनावरें सुद्धां किती मोकाटपणानें वागत असतात, हें सांगितलें तर विश्वास बसणार नाहीं. कारण आपल्यांत म्हण आहे त्याप्रमाणें, खरोखर शिकारी कुत्रा म्हणजे घराची मालकीण बनतो; आणि घोडे व गाढवें सुद्धां, स्वातंत्र्य व प्रतिष्ठा दर्शविणारी गति स्वीकारून, रस्त्यामध्यें त्यांच्या मार्गांतून दूर न सरणाऱ्या माणसाच्या अंगावर धावून जाण्यास लागतात. पाळलेलीं इतर जनावरेंही स्वातंत्र्यानें मदांध झालेलीं असतात !

ॲडि०:—जणूं कांहीं माझाच अनुभव तुम्ही मला बोलून दाखवीत आहांत ! मी खेड्यांतून जेव्हां प्रवास करतों, तेव्हां वरील प्रकार माझ्या नेहमीं अनुभवास येतो.

सॉक्रे०:—ह्या सर्व गोष्टी एकत्र मांडून पुढील निष्कर्ष निघतो. नागरिकांचा आत्मा इतका हळवा बनतो कीं, गुलामगिरी निदर्शक अगदीं क्षुल्लक गोष्टी सुद्धां, त्यांना चीड आणून उतावीळ करतात. तुम्हांला माहीतच आहे कीं, धनीपणाची छाया सुद्धां त्यांना सहन करवत नसल्यामुळें, प्रस्थापित अथवा रूढ असलेले कायदे सुद्धां, ते शेवटीं जुमानीत नाहींत.

ॲडि०:—मला हें चांगलेंच माहीत आहे.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, माझ्या मतें अशा सुंदर व रंगेल आरंभांतूनच अरेराव राज्य-घटना निर्माण होते.

ॲडि०:—खरोखरच रंगेल! पण ह्या पुढची पायरी कोणती?

सॉक्रे०:—अल्पसत्ताकपद्धतीमध्यें जो रोग उत्पन्न होऊन ती पद्धति नष्ट पावली, तोच रोग बहुसत्ताक-राज्यपद्धतीमध्यें जास्त बळकटीनें व कडक रीतीनें उत्पन्न होतो व स्वैराचारानें
Steph तो अधिक बिघडला जाऊन, बहुसत्ताकराज्यघटनेला
564 आपला गुलाम करतो. खरोखर कोणत्याही प्रकारचा अतिरेक झाला, म्हणजे त्याचा प्रतिकारही विरुद्ध दिशेनें झाल्यावांचून रहात नाहीं, हें तत्व आपणांला वर्षांतील ऋतु, प्राणी व वनस्पतींची सृष्टि, ह्यांच्यामध्यें पण विशेषतः राज्यपद्धतींमध्यें दिसून येतें.

ॲडि०:—स्वाभाविक आहे.

सॉक्रे०:—राज्यामध्यें आणि व्यक्तीमध्यें, स्वातंत्र्याच्या अतिरेकाचें रूपांतर गुलामगिरींत होतें.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—म्हणून बहुतांशीं बहुसत्ताकराज्यपद्धतीच, अरेरावराज्यघटनेचा पाया घालून ठेवते. ह्याचा अर्थ असा कीं, अत्यंत पराकाष्टेचें स्वातंत्र्य, अत्यंत भयंकर स्वरूपाच्या गुलामगिरीचा पाया रचतें.

ॲडि०:—हें विधान योग्य आहे.

सॉक्रे०:—तथापि, मला वाटतें, तुमचा प्रश्न हा नव्हता. तुम्ही असें विचारीत होतां कीं, बहुसत्ताक व अल्पसत्ताक पद्धतींना जडणारा व बहुसत्ताकराज्यपद्धतीचें अरेरावींत स्थित्यंतर करणारा, असा रोग कोणता ?

ॲडि:—होय. असाच माझा प्रश्न होता.

सॉक्रे०:—ठीक. आळशी व उधळे लोकांच्या वर्गाचा मी पूर्वी निर्देश केला होता. त्यांतील शूर लोक पुढारी असून, भित्रे लोक अनुसरण करणारे असतात. चावरे व न चावणारे, अशा भ्रमरांशीं त्यांची आपण तुलना केल्याचें तुम्हांला आठवत असेल.

ॲडि०:—होय आणि ती तुलना बरोबर होती.

सॉक्रे०—शरीरामध्यें ज्याप्रमाणें कफ व पित्त असतात, त्याप्रमाणें कोणत्याही राज्यपद्धतींत ह्या दोन वर्गांचें अस्तित्व असल्यानें, अव्यवस्था उत्पन्न होते. म्हणून निष्णात वैद्य व कायदेपंडीत ह्यांनीं, मधाचें पोळें राखणाऱ्या धूर्त मनुष्याप्रमाणें, अशांचा शिरकाव टाळण्याकरितां अगोदर उपाय योजिले पाहिजेत. परंतु इतकें करूनही त्यांचा शिरकाव झाला, तर शक्य तितक्या लवकर पोळ्यासकट त्यांना छाटून टाकलें पाहिजे.

ॲडि०:—निःसंशय त्यांनीं असेंच केलें पाहिजे.

सॉक्रे०:—आपणांला जें पहावयाचें आहे तें स्पष्टपणें दिसण्याकरितां, पुढील प्रकारें ह्या विषयाचा विचार करूं या.

ॲडि०:—कशा प्रकारें ?

सॉक्रे०:—बहुसत्ताकराज्य तीन भागांमध्यें विभागलें आहे अशी आपण कल्पना करूं. आणि खरोखर तें असेंच असतें. आपण जो वर्णन केला, तो माझ्या मतें, ह्यांपैकीं एक भाग होय. आणि हा भाग बहुसत्ताकराज्यांत, अल्पसत्ताकराज्याप्रमाणें स्वैराचारामुळेंच निर्माण होतो.

ॲडि०:--खरें आहे.

सॉक्रे०:—पण बहुसत्ताक राज्यामध्यें तो जास्त बलवान् असतो.

ॲडि०:—कसा काय ?

सॉक्रे०:—अल्पसत्ताकराज्यामध्यें असा वर्ग तिरस्कृत होऊन अधिकारापासून हांकलून दिलेला असतो. म्हणून तो अव्यवस्थित व अशक्त ठरतो. पण बहुसत्ताकराज्यामध्यें, मला वाटतें, थोड्या अपवादांखेरीज, अशा वर्गाचें मुख्य अधिकारीमंडळच असतें. त्यांच्यामधील तीव्र बुद्धीचे लोक भाषण व कृतीही करतात. इतर लोक सभोंवतालच्या बाकांवर बसून टाळ्यांचा गजर करीत असतात व विरोधी पक्षाला बोलूनही देत नाहींत. अशा प्रकारें, बहुसत्ताकपद्धतीचे (क्षुल्लक अपवाद सोडले असतां) सर्व व्यवहार अशा मंडळाच्या हातांतच असतात.

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:--ह्याशिवाय दुसरा एक वर्ग, लोकसमूहापासून नेहमी वेगळा पाडला जात असतो.

ॲडि०:—तो कोणता ?

सॉक्रे०:—द्रव्यार्जनाच्या पाठीमागें लागलेल्या लोकांपैकीं व्यवस्थित स्वभावाचे लोकच सामान्यतः सर्वांत अधिक श्रीमंत होतात.

ॲडि०:--असें होणें साहजिक आहे.

सॉक्रे०:—म्हणून मी असा निष्कर्ष काढतों कीं, मधुकरवृत्तीचे ऐदी लोक, अशा लोकांकडूनच पुष्कळसा पैसा उकळतात.

ॲडि०:—खात्रीनेंच. गरीब लोकांकडून पैसा कसा काय उकळला जाणार ?

सॉक्रे०:--आणि अशाच व्यवस्थित लोकांना श्रीमंत म्हटलें जातें व ऐदी लोक त्यांच्यावर चरत असतात.

ॲडि०:—अशी स्थिति असते खरी.

सॉक्रे०:—बहुसत्ताक राज्यामध्यें तिसरा वर्ग अशा लोकांचा असतो कीं, ज्यांना स्वतः काबाडकष्ट करावे लागतात. हे लोक
Steph 565 राजकारणांत पडत नाहींत व त्यांची आर्थिक स्थितीही निकृष्ट असते. बहुसत्ताक राज्यामध्यें अशा लोकांचा वर्ग एकत्रित झाला, तर तो सर्वांत संख्येनें मोठा व महत्त्वाचा असतो.

ॲडि०:—खरें आहे. परंतु मधाचा ( संपत्तीचा ) भाग मिळाला, तरच हे लोक एकत्र होतात.

सॉक्रे०:—आणि म्हणूनच, ह्या वर्गाला संपत्तीचा थोडा भाग मिळतोच. ह्या वर्गाचे जे पुढारी असतात, ते श्रीमंत लोकांच्या पैशाची लूट करून, स्वतःकरितां सर्वांत मोठा भाग निराळा ठेवून, बाकी सर्व ह्या वर्गांतील लोकांना वाटून टाकतात.

ॲडि०:—होय. अशा प्रकारें ह्या वर्गाला भाग मिळतो खरा.

सॉक्रे०:—जे लोक अशा तऱ्हेनें लुटले जातात, त्यांना कामकरी वर्गापुढें यथाशक्ति भाषण करून, आपला बचाव करणें भाग पडतें.

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्या त्यांच्या वागणुकीमुळें ते स्वतः क्रांतिकारक नसले तरी सुद्धां, विरुद्ध पक्षाकडून, कामकरी वर्गाच्या विरुद्ध कट करणारे व अल्पप्रजासत्ताकपद्धतीचे मित्र म्हणून आरोपिले जातात.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—शेवटीं माहितीच्या अभावीं व नालस्ती करणाऱ्या लोकांच्या खोडसाळ प्रयत्नांनीं, जेव्हां कामगार वर्ग अजाणतेपणानें त्यांचें नुकसान करण्यास तयार झालेला दिसतो, तेव्हां हे लोक, स्वतःची इच्छा असो अथवा नसो, खरेखुरे अल्पसत्ताकनिष्ठ बनतात. ज्या चावऱ्या मधुकरांबद्दल आपण बोललों, त्यांच्या चाव्यानेंच अशी परिस्थिति निर्माण होते.

ॲडि०:—होय. अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्यामुळेंच, एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाविरुद्ध दोषारोप, खटले व चवकशा सुरू होतात.

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आणि बहुजनसमाजाच्या हितसंबंधांचें रक्षण करणारा एक विशिष्ट पुढारी निवडून काढून, त्याचें पोषण करून त्याला मोठेपणाला लोक चढवीत नाहींत काय ?

ॲडि०:—होय. अशी त्यांची पद्धत असते.

सॉक्रे०:—म्हणून जेव्हां एखादा जुलमी मनुष्य निर्माण होतो, तेव्हां त्याचा उगम अशा पुढारीपणांतूनच होतो–अशा बुंध्यांतूनच तो उगवतो.

ॲडि०:—हें अगदीं उघड आहे.

सॉक्रे०:—असा लोकनायक, जुलमी मनुष्य कसा बनत जातो ? अरकेडियांतील लिसिअन झ्यूसच्या देवळासंबंधीं जी प्रचलित कथा आहे, त्या कथेंतील मनुष्याप्रमाणें जेव्हां असा पुढारी वागावयास लागतो, त्या वेळेपासूनच त्याच्यामध्यें असा फरक होऊं लागत नाहीं काय ?

ॲडि०:—कोणती कथा ?

सॉक्रे०:—वरील देवळांत, इतर बळी दिलेल्या प्राण्यांच्या आंतड्यां-बरोबर मनुष्यप्राण्याचेंही आंतडें मिसळलेलें असे. त्यायोगें जो कोणी भाविक, मनुष्य–प्राण्याचें आंतडें चाखी, तो लांडगा बनून जाई. ही कथा तुम्हीं ऐकलेली नाहीं काय ?

ॲडि०:—होय. मीं ऐकली आहे.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें ज्ञातिबांधवांचें रक्त शिंपडतांना लोकांकडून मुळींच विरोध न झाल्यामुळें, जर लोकनायक दिक्कत मानीनासा झाला,

Steph 566 स्वतःच्या शत्रूंवर अत्यंत घाणेरड्या गुन्ह्यांचे खटले करून, त्यांना फांशीची शिक्षा ठोठावून, मानवी जीव घेऊन, आपल्या बांधवांचें जर अपवित्र जिभेनें व ओठांनीं तो रक्त चाखावयास लागला, तसेंच हद्दपार करणें, वध करणें, व कर्जमुक्त करून जमिनीची पुन्हा वांटणी करणें, अशा गोष्टी जर तो करावयास लागला, तर असा मनुष्य शत्रूंकडून नष्ट तरी केला जाईल अथवा लांडग्यांत रूपांतर पावून जुलमी तरी बनेल ! अशा मनुष्याचें दुसरें भवितव्य काय असणार ?

ॲडि०:--अशा भवितव्यांतून त्याची सुटका नाहीं !

सॉक्रे०:—श्रीमंत वर्गाबरोबर ज्याचें भांडण आहे त्याचें असेंच भवितव्य असणार.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—असा मनुष्य हद्दपार झाल्यानंतर, शत्रूंचा विरोध असूनही जर पुनः देशांत आला, तर तो पूर्ण जुलमी मनुष्य बनलेला नसतो काय ?

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—जेव्हां त्याचे शत्रू त्याला हांकलून लावण्यास अथवा राजद्रोहाचा खटला करून ठार मारण्यास असमर्थ होतात, तेव्हां ते त्याला गुप्त रीतीनें मारून टाकण्याचे उपाय योजतात.

ॲडि०:—होय. त्यांचा हा नेहमींचाच उपाय असतो.

सॉक्रे०:—परंतु जुलमी लोक, हा गुप्त धोका टाळण्याकरितां प्रसिद्ध युक्तीचा अवलंब करतात. लोकपक्षाचा पुढारी गमावला जाऊं नये, म्हणून त्याला शरीरसंरक्षक देण्यांत यावा, अशी ते लोकांजवळ मागणी करतात.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि लोकही ही त्यांची मागणी मान्य करतात. कारण स्वत:बद्दल जरी त्यांना खात्री असली, तरी पुढाऱ्याबद्दल त्यांना भीति वाटते.

ॲडि०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—क्रोइसूस् जसा भविष्यवाणीच्या निर्देशाप्रमाणें, हेरमुस नदीच्या कांठानें पळून जातो, मध्यें कोठें थांबत नाहीं व भ्याड म्हटला जाण्याची पर्वा करीत नाहीं, तसा श्रीमंतीमुळें बहुसत्ताक राज्याचा शत्रु म्हणून गणला गेलेला श्रीमंत मनुष्य, वरील प्रकार पाहून पळून जातो व भ्याड म्हटला जाण्याची पर्वा करीत नाहीं !

ॲडि०:—कारण पळून जाण्याची दुसरी संधीही त्याला मिळणार नाहीं !

सॉक्रे०:—आणि ज्यांना पकडण्यांत येतें, त्यांना ठार मारण्यांत येतें.

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—परंतु जो पुढारी असतो, त्याची निराळीच तऱ्हा असते. 'त्याचा विस्तीर्ण देह भूमीवर पडला जाण्याऐवजीं,' तो स्वत:च पुष्कळांना आपल्या मार्गांतून उडवून देतो आणि राज्याच्या रथांत त्याला बसविला जाऊन, तो पूर्ण जुलमी मनुष्यांत रूपांतर पावतो !

ॲडि०:—नि:संशय.

सॉक्रे०:—अशा मनुष्याच्या व असा जुलमी मनुष्य ज्या राज्यांत वास करतो त्या राज्याच्या, सुखाविषयीं आपण आतां चर्चा केली पाहिजे ना ?

ॲडि०:—होय. आपण ही चर्चा करूं या.

सॉक्रे०:—जुलमीपणाला जेव्हां त्यानें नुकतीच सुरवात केलेली असते, तेव्हां भेटणाऱ्या प्रत्येक इसमाला तो सस्मित नमस्कार करीत नाहीं काय ? जुलमीपणाची कल्पना जोरानें नाकारून, सार्वजनिक व खाजगीरीत्या, लोकांना पुष्कळ आश्वासनें तो देत नाहीं काय ?

तसेंच लोकांना व आपल्या पक्षाच्या मंडळींना, जमिनींच्या देणग्या व कर्जाची सूट देऊन, इतर सर्व लोकांशीं नम्रपणानें व दयाळूपणानें वागण्याचें, तो ढोंग करीत नाहीं काय ?

ॲडि०:—असेंच त्याचें वागणें असतें.

सॉक्रे०:—परंतु आपल्या कांहीं शत्रूंबरोबर सख्य जमवून व कांहींचा नाश करून, बाह्य शत्रूंच्या काळजींतून मुक्त झाल्यावर, लोकांना पुढाऱ्याची नेहमीं गरज भासावी, म्हणून सदोदित युद्धप्रसंग तो उपस्थित करीत राहतो.

ॲडि०:—हें वर्तन स्वाभाविक आहे.

Steph 567 सॉक्रे०:—तसेंच युद्धाच्या करांनीं प्रजाजनांना भिकार करून, आवश्यक गरजा भागविण्यांतच त्यांना काळ काढावयास लावून, त्यांच्याविरुद्ध कट करण्यास त्यांच्यांत जोमच रहाणार नाहीं, असें करण्याचा त्याचा आणखी हेतु नसतो काय ?

ॲडि०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—त्याला जे शांततेनें राज्य करूं देणार नाहींत, अशा स्वातंत्र्यप्रेमी लोकांचा जेव्हां त्याला संशय येतो, तेव्हां शत्रूंबरोबर युद्ध करण्यास त्यांना पाठवून देऊन, मुळींच गाजावाजा न करतां त्यांच्या भयांतून तो मुक्त होत नाहीं काय ? ह्या सर्व कारणांकरितां जुलमी मनुष्याला, सदोदित युद्ध उपस्थित करीत राहणें, आवश्यक असतें ना ?

ॲडि०:—होय. आवश्यक असतें.

सॉक्रे०:—ह्यामुळें, असा मनुष्य लोकांकडून अधिकाधिक तिरस्कृत होत जातो.

ॲडि०:—तो झालाच पाहिजे.

सॉक्रे०:—त्याच्या पक्षाकडील कांहीं धीर व वजनदार गृहस्थ, स्वतःचें मत त्याच्याजवळ व आपापसांत निर्भयपणें बोलून, त्याच्या पद्धतींतील दोष दाखविणार नाहींत काय ?

ॲडि०:—अशी आशा बाळगतां येईल.

सॉक्रे०:—मग ह्या जुलमी मनुष्याला, स्वतःचा अधिकार कायम राखण्याकरितां स्वतःच्या मार्गांतून अशा लोकांना बाजूला काढून, शेवटीं कोणीही महत्त्वाचा मित्र अथवा शत्रु शिल्लक रहाणार नाहीं, असें करावें लागेल.

ॲडि०:—खात्रीनेंच करावें लागेल.

सॉक्रे०:—त्याला चाणाक्षपणानें कोण धीट, कोण उदार मनाचा, कोण दूरदर्शी व कोण श्रीमंत, हें ओळखून काढावें लागेल व शेवटीं त्याची अशी कांहीं चमत्कारिक स्थिति होईल कीं, स्वतःची इच्छा असो वा नसो, अशा सर्व लोकांचा शत्रु बनून व त्यांच्याविरुद्ध कट करून, शहरांतून त्यांची घाण त्याला काढून टाकावी लागेल.

ॲडि०:—किती छान शुद्धि ही !

सॉक्रे०:—शरीरांतील घाण, ज्या पद्धतीनें वैद्य काढून टाकतो, त्या पद्धतीच्या अगदीं उलट अशी ही पद्धत आहे ! कारण वैद्य, वाईट तेवढें काढून टाकून चांगलें राहूं देतो; परंतु जुलमी मनुष्य, चांगलें तेवढें बाहेर काढून टाकतो व वाईट तसेंच राहूं देतो !

ॲडि०:—त्याला राज्य चालवावयाचें असलें, तर हाच मार्ग स्वीकारावा लागतो.

सॉक्रे०—खरोखर, त्याला अशा लोकांच्या संगतींत रहावें लागतें कीं, ज्यांच्यापैकीं बहुतेक लोक कुचकामाचे असतात. ह्यामुळें त्यांच्या तिरस्कारांत तरी रहावें अथवा मुळीं जगूंच नये, अशी खेदकारक स्थिति त्याची होते !

ॲडि०:—दुसरा इलाजच नसतो.

सॉक्रे०:—म्हणून, ज्या प्रमाणांत अशा वागणुकीमुळें लोकांच्या तिरस्काराला तो पात्र होत असतो, त्या प्रमाणांत त्याला अधिक विश्वासू शरीरसंरक्षक बाळगावे लागतात.

ॲडि०:--अर्थात्च.

सॉक्रे०:--पण तो कोणावर विश्वास ठेवूं शकेल? आणि असे विश्वासू लोक त्याला कोठून मिळणार?

ॲडि०:--पैशाच्या आशेनें पुष्कळ लोक त्याच्याजवळ जमतील.

सॉक्रे०:--माझी खात्री आहे, तुमच्या मनांत मधुकरवृत्तीचे आणखी कांहीं विदेशी समूह उभे राहले आहेत.

ॲडि०:--होय. तुमची समजूत खोटी नाहीं.

सॉक्रे०:—परंतु स्थानिक लोकांतूनच, भरती करावयास तो अनमान करील काय?

ॲडि०:—कोणत्या मार्गानें?

सॉक्रे०:—नागरिकांजवळ असलेले गुलाम काढून घेऊन व त्यांना स्वतंत्र करून, आपले शरीरसंरक्षक म्हणून तो त्यांना बाळगणार नाहीं काय?

ॲडि०:—निःसंशय तो असें करण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं. खरोखर, हेच लोक त्याचे मोठे विश्वासू नोकर म्हणून होऊं शकतील.

सॉक्रे०:—तुमच्या वर्णनाप्रमाणें, जुलमी मनुष्य मोठा दैववान् व सुखी समजला पाहिजे! कारण पूर्वीच्या लोकांचा नाश

Steph 568 करून, तो अशा लोकांना आपले मित्र व विश्वासू नोकर करूं शकतो.

ॲडि०:—असा मार्ग तो स्वीकारतो, हें खरें आहे.

सॉक्रे०:—हे त्याचे नवे नागरिक, त्याची पुष्कळ स्तुति करून त्याच्याशीं स्नेह करतात; पण चांगले लोक त्याचा तिरस्कार करून, त्याला टाळीत नाहींत काय?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—शोकपर्यवसायी नाटकांना, सबळ कारणांवरूनच लोक चांगलीं समजतात व यूरिपिडिसला त्यांचा निष्णात लेखक समजतात.

ॲडि०--कोणत्या कारणावरून ?

सॉक्रे०:—पुढील वाक्य त्यानें जें लिहिलें आहे, त्यावरून तो विचारी मनाचा असला पाहिजे. ‘ जुलमी वृत्तीचे लोक शहाण्या लोकांबरोबर संभाषण केल्यानें शहाणे होतात. ’ आणि ज्या लोकांबरोबर जुलमी मनुष्य संगत ठेवतो, त्यांनाच कवि ‘ शहाणे ’ म्हणतो.

ॲडि०:—युरिपिडिसनें व इतर कवींनींही, जुलमीपणा हा देवतुल्य गुण समजून त्याची स्तुति केली आहे.

सॉक्रे०:—शोकपर्यवसायी काव्यांचे लेखक शहाणे असल्यामुळें, आपण व आपलें अनुकरण करणाऱ्या इतर घटनाकर्त्यांनीं, अशा लेखकांना ते जुलमीपणाचे स्तुतिपाठक असतात, म्हणून राज्यांत प्रवेश करूं दिला नाहीं, तर क्षमा करतील !

ॲडि०:—सर्व सभ्य शोकपर्यवसायी काव्यलेखक तरी आपणांस क्षमा करतील !

सॉक्रे०:—परंतु इतर राज्यांमध्यें ते जातील व लोकसमाजाला जमा करून, सुंदर, मोठ्या व परिणामकारक आवाजाची नटमंडळी पैदा करून, आपलीं नाटकें ऐकवतील व अशा तऱ्हेनें प्रचलित राज्यपद्धतींचें रूपांतर, अरेरावराज्यपद्धती व बहुसत्ताक राज्यपद्धती ह्यांमध्यें घडवून आणतील, असें मला वाटतें.

ॲडि०: - खात्रीनेंच ते असें करतील.

सॉक्रे०:—ह्या त्यांच्या कामगिरीबद्दल, मुख्यतः जुलमी राजांकडून व थोड्या प्रमाणांत बहुसत्ताक राज्यांकडून, त्यांना मोबदला दिला जाऊन, सन्मानही केला जातो. पण ज्या प्रमाणांत राज्यपद्धतींच्या टेंकडीवर ते अधिक अधिक चढत जातात, त्या प्रमाणांत जणूं कांहीं श्वासाचा कोंडमारा झाल्यामुळें, त्यांचा सन्मान अधिक अधिक मंदावत जातो.

ॲडि०:—अगदीं असेंच.

सॉक्रे०: – असो. हें विषयांतर झालें. जुलमी राजाचें चांगलें, मोठें, विविध प्रकारचें व नेहमीं बदलणारें, असें सैन्य कसें काय पोसलें जातें, ह्याची आपण चर्चा करूं.

ॲडि०:—धार्मिक व पवित्र अशी मालमत्ता जर शहरांत कांहीं असली, तर जुलमी मनुष्य ती खर्चून टाकील, हें उघडच आहे. आणि ज्या प्रमाणांत अशा विक्रीचें उत्पन्न होईल, त्या प्रमाणांत लोकांना जे युद्ध-कर म्हणून द्यावे लागतात ते कमी होतील.

सॉक्रे०:—पण वरील प्रकारचें उत्पन्न सरल्यावर तो काय करील ?

ॲडि०:—मग जिव्हाळ्याचे मित्र, भोजनभाऊ आणि प्रेमपात्रें, ह्यांच्या व स्वतःच्या पोषणाकरितां, तो बापाच्या इस्टेटींतून पैसे काढील.

सॉक्रे०:—तुम्ही काय म्हणतां, तें मी समजलों. ज्या लोकपक्षानें त्याला उत्पन्न केलें, तोच त्याचें व त्याच्या मित्रांचें पोषण करील.

ॲडि०: – असें केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

सॉक्रे०:—कृपा करून तुमच्या विधानाचें स्पष्टीकरण करा. अशी कल्पना करा कीं, लोकांना हें नापसंत होऊन ते असें म्हणूं लागले आहेत कीं, बापानें वयांत आलेल्या मुलाचें पोषण करणें अन्यायाचें असून, उलट मुलानेंच बापाला पोसलें पाहिजे. कारण लोकांनीं
Steph त्याला निर्माण करून पुढारी केला तो अशा हेतूनें नव्हे
569 कीं, जेव्हां तो मोठा होईल तेव्हां लोकपक्षानें त्याचें गुलाम
व्हावें आणि त्याचें व त्याच्यासारख्या इतर मंडळींचें पोषण करावें—उलट त्यांचा हेतू असा होता कीं, त्याच्या पुढारीपणाखालीं, राज्यांतील श्रीमंत व शिष्ट म्हटल्या जाणाऱ्या वर्गापासून त्यांची मुक्तता करण्यांत यावी. म्हणून ज्याप्रमाणें बाप आपल्या मुलाला त्याच्या बंडखोर मित्रांसकट घरांतून हांकलून देतो, त्याप्रमाणें अशा परिस्थितींत लोकपक्षानें, अशा जुलमी मनुष्याला त्याच्या मित्रांसकट निघून जाण्याची आज्ञा केली, तर काय होईल ?

ॲडि०:—लोकपक्षाला हें खात्रीनेंच कळून येईल कीं, ज्या मुलाला त्यांनीं उत्पन्न केलें, लाडावलें व चढविलें, त्याच्यापुढें लोकपक्ष अगदींच असमर्थ आहे व अशा मुलाला हांकलून लावण्याचा प्रयत्न करणें, म्हणजे अशक्तानें सशक्ताबरोबर सामना करणें होय !

सॉक्रे०:—काय म्हणतां ? जुलमी मनुष्य आपल्या बापावर हात उगारील काय ? आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणें बाप वागत नाहीं, म्हणून त्याला मारील काय ?

ॲडि०:—बापाच्या हातांतून शस्त्रें काढून घेऊन, असें तो करणारच !

सॉक्रे०:—तुम्ही असें सिद्ध करतां कीं, जुलमी मनुष्य पितृहत्या करणारा असून, म्हाताऱ्या माणसाची शुश्रूषा करणारी कठीण हृदयाची दाई आहे. ह्या स्थितीनंतर राज्य उघड व बोलून चालून अेरावसत्ताक होईल; आणि लौकिक म्हणीप्रमाणें प्रजाजन, स्वतंत्र लोकांच्या राज्याच्या अग्नींतून बाहेर निघून, गुलामांनीं चालविलेल्या अेरावी पद्धतीच्या फोंफाट्यांत पडतील ! म्हणजे प्रजाजनांना स्वैर व अमर्याद स्वातंत्र्याच्या वातावरणांतून, अत्यंत कठोर व कडवट अशा गुलामगिरीच्या वातावरणांत रहावें लागेल.

ॲडि०:—निःसंशय अशीच स्थिति व्हावयाची !

सॉक्रे०:—बहुसत्ताक राज्यपद्धतींतून अेरावसत्ताक पद्धतीचा जन्म कसा होतो व तिचें स्वरूप काय असतें, ह्याविषयीं आपण समाधानकारक चर्चा केली, असें जर आपण म्हटलें, तर तें योग्य आहे ना ?

ॲडि०:—होय. आपण अगदीं समाधानकारक चर्चा केली.

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक नववें

Steph सॉक्रे०:—बहुसत्ताक प्रवृत्तीच्या मनुष्याचें अरेरावी
571 प्रवृत्तींत रूपांतर कसें होतें व तें झाल्यानंतर त्याचा स्वभाव कसा बनतो व त्याचें आयुष्य सुखावह होतें कां दुःखावह होतें, ह्या प्रश्नांचा आपणांस विचार करावयाचा आहे.

ॲडि०:—खरें आहे. हा विषय अजून राहिला आहे.

सॉक्रे०:—आणखी एक प्रश्न शिल्लक असलेला तुम्हांला माहीत आहे काय ?

ॲडि०:—कोणता ?

सॉक्रे०:—मला वाटतें, वासनांची संख्या व त्यांचें स्वरूप आपण समाधानकारक रीतीनें निश्चित केलीं नाहींत आणि जोंपर्यंत ही उणीव शिल्लक आहे, तोंपर्यंत आपली चर्चा दुर्बोधच राहील.

ॲडिः—ही उणीव भरून काढण्याची वेळी गेली काय ?

सॉक्रे:०—खात्रीनेंच नाहीं. मी जो विशिष्ट मुद्दा पुढें मांडणार आहे, त्याचा विचार करा. कांहीं अनावश्यक सुखें व वासना, माझ्या मतें बेकायदेशीर असतात. प्रत्येकामध्यें अशा वासना असतातच, परंतु कांहीं लोकांमध्यें कायद्यांच्या व विवेक-बुद्धीच्या निर्बंधांमुळें उच्च वासना स्थापित केल्या जाऊन, वरील सुखें व वासना पूर्णपणें नाहींशा

होतात अथवा कमजोर वासना तेवढ्याच राहतात; आणि दुसऱ्या लोकांच्या बाबतींत त्या वासना बळकट व असंख्य होऊन बसतात.

ॲडि०:—तुम्ही कोणत्या वासना म्हणतां ?

सॉक्रे०:—सुषुप्तावस्थेंत असतां ज्या वासना जागृत होतात, त्यांविषयीं मी म्हणत आहें. विवेकी, नम्र व अधिकार गाजविणारा असा आत्म्याचा भाग जेव्हां झोंपीं गेलेला असतो, तेव्हां मांस व मद्य ह्यांनीं आकंठ भरलेला रानटी, पाशवी भाग प्रमत्त होतो व झोंप झुगारून देऊन, आपल्या वासनांची तृप्ति करण्याकरितां प्रयत्न करावयास लागतो. तुम्हांला माहीत आहे कीं, अशा वेळीं लज्जा व विचार ह्यांनीं मुक्त असल्यामुळें, अमूक एक गोष्ट करण्यास तो धजावणार नाहीं, असें होतच नाहीं. आईशीं अथवा एखाद्या पुरुषाशीं, देवतेशीं अथवा पशूशीं, अपवित्र असा संगम आपल्या मनानें करण्यास तो कचरत नाहीं. अत्यंत अमानुष असा खून करण्यास अथवा अत्यंत अशुद्ध असें मांस खाण्यास तो मागेंपुढें पहात नाहीं. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे, मूर्खपणाच्या अथवा उद्धटपणाच्या कोणत्याही थराला तो जाईल.

ॲडि०:—तुमचें वर्णन अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—परंतु मला वाटतें, जेव्हां निरोगी व नेमस्त मनुष्य, झोंपावयास जाण्यापूर्वीं, विवेचक भागाला जागृत करून त्याला उच्च विचार व चर्चा ह्यांच्या मननसुखाची मेजवानी देतो; तसेंच वासनात्मक भागानें, स्वतःच्या आनंदानें व दुःखानें आत्म्याच्या उच्चतम
Steph 572 भागाला त्रास देऊं नये म्हणून व उच्चतम भागाला एकाग्रतेनें व चिकाटीनें भूत, वर्तमान व भविष्य ह्या काळांतील अज्ञात असें ज्ञान प्राप्त करून घेण्याची मोकळीक मिळावी म्हणून, वासनांची थोडीशी तृप्ति करून, वासनात्मक भागाला झोंप येईल असें करतो; तसेंच विकाराची प्रत्येक उसळी

दाबून तेजस्वी तत्त्वाचें शमन करतो—म्हणजे ह्या तीन तत्त्वांपैकीं दोन तत्त्वांना शांत ठेवून, ज्ञानाच्या तिसऱ्या तत्त्वाला जागृत करून झोंपावयास जातो, तेव्हां तुम्हांला माहीत आहे कीं, त्याला सत्याचें ज्ञान होऊं शकतें आणि स्वप्नामध्यें जीं दृश्यें त्याला दिसतात, तीं मुळींच गैरशिस्त नसतात.

ॲडि०:—अगदीं तुमच्या मताप्रमाणेंच माझें मत आहे.

सॉक्रे:० वरील विचार सांगत असतां आपण बरेच वाहवत गेलों. आपणांला म्हणावयाचें इतकेंच कीं, आपल्या प्रत्येकामध्यें उच्छृंखल व दुराचारी वासनांची एक भयंकर जात वसत असते. आपण पूर्ण जितेंद्रिय आहों, असें बाह्यतः दिसत असलें, तरी तें खरें नसतें. कारण झोंपेमध्यें अशा वासना जागृत होतात. माझें म्हणणें तुम्हांला बरोबर वाटत असून तुमचेंही मत असेंच आहे काय, हें मला कृपा करून सांगा.

ॲडि०:—होय. माझें मत असेंच आहे.

सॉक्रे०:—लोकनायकाचा जो स्वभाव आपण वर्णन केला, त्याची आठवण करा. धनार्जनाच्या वासना तेवढ्याच मानणारा आणि करमणूक व डामडौल तृप्त करणाऱ्या अनावश्यक वासनांचा तिरस्कार करणारा अशा कंजूष बापाच्या तालमींत, अशा मनुष्याचें लहानपणापासून शिक्षण झालेलें नसतें काय?

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आपण आतांच वर्णन केलेल्या वासनांनीं परिपूर्ण अशा रंगेल लोकांबरोबर संगति ठेवून, त्यांच्याप्रमाणेंच मदोन्मत्त होऊन, तो आपल्या बापाच्या कंजूषपणाचा तिटकारा करतो. परंतु त्याला बिघडवून टाकणाऱ्या लोकांपेक्षां त्याचा स्वभाव चांगला असल्यामुळें, दोन विरुद्ध प्रवृत्तींकडे तो आकर्षिला जाऊन, शेवटीं तो मधल्या स्वभावाच्या प्रवृत्तीचा स्वीकार करतो. आणि स्वतःच्या समजुतीप्रमाणें, प्रत्येक सुख

पूर्ण नेमस्तपणानें अनुभवून, अनुदार व बेकायदेशीर आयुष्य न घालवितां, तो अल्पसत्ताक वृत्तींतून बहुसत्ताकवृत्तीचा बनविला जातो.

ॲडि०:—अशा मनुष्याबद्दल आमचें हेंच मत होतें व आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. आतां अशी कल्पना करा कीं, असा मनुष्य वयोमानाप्रमाणें वृद्ध झाला असून, त्याचा तरुण मुलगा त्याच्या तालमींत वाढविला जात आहे.

ॲडि०:—मीं कल्पना केली असें समजा.

सॉक्रे०:—पुढें अशी कल्पना करा कीं, त्याच्या बापानें जे मार्ग अनुसरले तेच मार्ग हा तरुण मुलगा अनुसरीत आहे. बेकायदेशीर वागण्याची अथवा त्याला बिघडवणाऱ्या लोकांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची त्याला मोकळीक मिळाली असून, त्याचा बाप व इतर नातलग हे जरी मध्यम प्रतीच्या वासनांना दुजोरा देत असले, तरी दुसऱ्या बाजूनें तितक्याच जोराचा प्रतिकार कर-
Steph ण्यांत येत आहे. अशा वेळीं जुलमी प्रवृत्ति उत्पन्न
573 करणारे हे भयंकर जादुगार, इतर मंत्रांनीं जर ह्या तरुण मनुष्याचें मन वळविण्यांत निराश झाले, तर उधळपट्टी करणाऱ्या वासनांचा पुरस्कार करणारा असा एक प्रमुख विकार, त्याच्या मनांत उत्पन्न करतात. हा विकार म्हणजे पंख असलेला मोठा मधुकर होय. अशा लोकांनीं उत्पन्न केलेल्या विकाराचें वर्णन दुसऱ्या रीतीनें तुम्ही करूं शकाल काय ?

ॲडि०:—मला करतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—असें झाल्यानंतर धूप, सुवासिकें, सुमनहार, मद्य व आहारविहार विषयक क्षुद्र सुखें, ह्यांनीं परिपूर्ण अशा इतर वासना ह्या भ्रमराच्याभोंवतीं गुंगारा घालीत असतात व त्याला खूप चढवून देऊन, त्याच्यामध्यें इच्छेची तीव्र जाणीव उत्पन्न करतात. त्या वेळे-पासून हा प्रमुख विकारभ्रमर उन्मादाला आपला शरीरसंरक्षक करून

वेडेपणाकडे ओढला जातो. ज्या चांगल्या मतांमुळें व वासनांमुळें शरम वाटूं लागेल, अशीं मतें व वासना स्वत:मध्यें त्याला आढळून आलीं, तर त्यांना तो घालवून देतो व नेमस्तपणालाही काढून टाकून उन्मादानें आपणास भारून घेतो.

ॲडि०: —जुलमी मनुष्याच्या उत्पत्तीचें तुम्हीं बरोबर वर्णन केलें.

सॉक्रे०: —ह्याच कारणामुळें प्रेमालाही पूर्वींपासून जुलमी म्हटलें आहे ना ?

ॲडि०:—होय. बहुतकरून ह्या कारणामुळेंच.

सॉक्रे०:—माझ्या मित्रा, दारुड्या मनुष्यही जुलमी प्रवृत्तीचा नसतो काय ?

ॲडि०:—खरें आहे.

सॉक्रे०:—आणि आपणांला हेंही माहीत आहे कीं, वेडा अथवा मेंदू बिघडलेला मनुष्य, मनुष्यांवरच नव्हे तर देवांवरही अधिकार गाजविण्याची आपली लायकी आहे असें समजतो !

ॲडि०:—खात्रीनेंच !

सॉक्रे०: —म्हणून मित्रोत्तमा, जेव्हां स्वभावानें, संवयीनें अथवा दोन्हीं कारणांनीं मनुष्य अरेरावी बनतो, तेव्हां मद्याच्या वा प्रेमाच्या वा वेडेपणाच्या आधीन तो झाला आहे असें समजावें.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—अशा प्रकारें त्याचा उगम व स्वभाव असतात. पण तो राहतो कसा ?

ॲडि०: —तुम्हींच मला हें सांगितलें पाहिजे.

सॉक्रे०:—ठीक आहे. ज्या लोकांचीं मनें, अंतस्थ जुलमी विकारानें पूर्णपणें गुलाम केलेलीं असतात, त्या लोकांचें आयुष्य मेजवान्या, नाचरंग, मद्यपान, वेश्या व अशाच प्रकारचीं सुखें अनुभवण्यांत जात असतें.

ॲडि०: – खात्रीनेंच.

सॉक्रे०:—प्रत्येक दिवशीं व प्रत्येक रात्रीं, गरजांमधून उत्पन्न होणाऱ्या भयंकर वासना उदय पावतात ना ?

ॲडि०:—होय. पुष्कळच.

सॉक्रे०:—ह्यामुळें जवळ असलेलें उत्पन्न लवकर संपून जातें.

ॲडि०:—अर्थातूच.

सॉक्रे०:—त्यानंतर पैसे उभारण्याच्या योजना सुचल्या जाऊन, मालमत्तेचा नाश सुरू होतो.

ॲडि०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जेव्हां उत्पन्नाची प्रत्येक बाब सरून जाते, तेव्हां शरीराला चिकटून राहिलेल्या भयंकर वासना आकांडतांडव करावयास लागत नाहींत काय ? प्रभुत्व गाजविणारा विकार व त्याचे संरक्षक म्हणून असलेल्या इतर वासना, ह्यांच्या आधीन असल्यामुळें, असे लोक रागाच्या आवेशांत एखाद्या श्रीमंत मनुष्याला फसवेगिरीनें व अत्याचारानें लुबाडण्यास तयार होत नाहींत काय ?

ॲडि०:—होय. असें त्यांना करावेंच लागतें.

Steph सॉक्रे०:—कारण त्यांना लुबाडावयास सांपडलें
574 नाहीं, तर भयंकर यातना व दुःखें भोगावीं लागतात.

ॲडि०:—होय.

सॉक्रे०:—मागाहून उत्पन्न झालेलीं सुखें, ज्याप्रमाणें पूर्वीच्या सुखांना मागें टाकून, त्यांनीं जें कांहीं मिळविलें होतें तें घेऊन बसतात, त्याप्रमाणें असा मनुष्य आपल्या आईबापांना स्वतः त्यांच्यापेक्षां लहान असूनही, मागें सारणार नाहीं काय ? तसेंच स्वतःच्या वांट्याची संपत्ति सरली म्हणजे तो आपल्या बापाच्या संपत्तींतून स्वतःचा खर्च करणार नाहीं काय ?

ॲडि०: —निःसंशय असें तो करील.

सॉक्रे०: – त्याचे आईबाप जर त्याच्या इच्छांना विरोध करूं लागले, तर त्यांना फसविण्याचा तो प्रथम प्रयत्न करणार नाहीं काय ?

ॲडि०:––खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आणि फसवितां येणें शक्य नसलें, तर अत्याचार करून त्यांना लुबाडण्यास तो मागेंपुढें पाहील काय ?

ॲडि०: – अर्थात्‌च नाहीं.

सॉक्रे०:—त्याचे वृद्ध आईबाप जर त्याला प्रतिकार करूं लागले, तर अरेरावी वृत्ति दाखविण्यास तो कमी करील, असें तुम्हांला वाटतें काय ?

ॲडि०: — अशा मनुष्याच्या आईबापांबद्दल मला काळजीच वाटते !

सॉक्रे०:—ॲडिमेन्टस्, आणखी असें पहा कीं नात्याचा संबंध नसलेल्या व अनावश्यक अशा वेश्येविषयीं त्याचें प्रेम नवीन असतें; पण स्वतःला जन्म देणारी व आवश्यक अशी जी आई तिजविषयींचें प्रेम जुनें असतें. तसेंच संबंध नसलेल्या पण भर तारुण्यांत असलेल्या अनावश्यक मित्राविषयीं त्याला वाटणारें प्रेम नवीन असतें; पण निस्तेज, वृद्ध व जुना मित्र अशा स्वतःच्या बापाविषयीं त्याचें प्रेम जुनें असतें. अशी स्थिति असल्यामुळें, आपल्या प्रिय वेश्येकरितां व मित्राकरितां, आईबापांना मारठोक करून, वेश्या व मित्र ह्यांना घरांत आणून, तो आपल्या आईबापांना त्यांचे गुलाम करणार नाहीं काय ?

ॲडि०:—माझी खात्री आहे, तो असें करील.

सॉक्रे०: – जुलमी वृत्तीच्या मुलाचे आईबाप होणें मोठें भाग्याचें होय !

ॲडि०:—होय !

सॉक्रे०:—आईबापांजवळ असलेली मालमत्ता सरल्यानंतरही, सुखाचे भुंगे त्याच्याभोंवतीं नेहमीं चिकटून राहिल्यामुळें, एखाद्या घरांत जबरदस्तीनें घुसणें, अथवा रात्रीच्या अंधारामुळें वाट चुकलेल्या प्रवाशांचे कपडे हिरावून घेणें, हा त्याचा पहिला धिटाईचा पराक्रम होईल.

नंतर एखाद्या देवळांतील ऐवज चोरून नेण्याचेंही तो योजील. मध्यंतरीं वाईट व चांगल्या कृत्यांसंबंधीं, जीं लहानपणापासून जुनीं व न्याय्य मतें त्यानें मनांत बाळगलीं होतीं, तीं गुलामगिरीपासून मुक्त झालेल्या मतांकडून पराभूत होतील. कारण, हीं दुसरीं मतें अधिष्ठित असलेल्या विकाराची संरक्षक असल्यामुळें, त्या विकाराकडून त्यांना मदत केली जाते. जोंपर्यंत कायद्याला व बापाला तो जुमानीत होता व त्याचें
अंतःकरण बहुसत्ताक प्रवृत्तीचें होतें, तोंपर्यंत हीं मतें
Steph सुषुप्तावस्थेंतील स्वप्नामध्येंच काय तीं स्वतंत्र होत होतीं.
575 पण आतां हा विकार त्याचा पूर्ण धनी झाल्यावर, जो
स्वभाव स्वप्नामध्यें व मधून मधूनच त्याचा असा व्हावयाचा, तो आतां जागृतावस्थेंतही त्याचा नेहमींचा असा झाला. भयानक खून, निषिद्ध मांस व अपवित्र कृत्य, ह्यांपैकीं कांहींही तो आतां करण्यास दचकणार नाहीं. अत्यंत बजबजपुरी व बेकायदेशीरपणा ह्यांनीं परिपूर्ण असलेला हा विकार, त्याच्या हृदयांत वस्ती करून त्याच्यावर अधिकार गाजवीत असतो. हा विकार पूर्ण अधिकारी बनल्यामुळें, ह्या मनुष्याला, जुलमी राजाप्रमाणें अमर्याद बेपर्वाईनें वागण्यास तो उत्तेजन देऊन, स्वतःच्या व इतर वासनांच्या पोषणाकरितां उपाययोजना करावयास लावतो. दुष्ट लोकांची संगत, वाईट संवयी व वरील विकार, ह्यांच्यामुळें मनावरील दाब नाहींसा होऊन, वरील वासना अंतःकरणांत प्रवेश करतात. अशा मनुष्याच्या आयुष्याचें जें मी वर्णन केलें, तें चुकीचें आहे काय ?

ॲडि०:—नाहीं. बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि शहरांमध्यें अशा स्वभावाचे लोक थोडेच असले व इतर लोक जर शांत विचाराचे असले, तर हे लोक शहर सोडून देतात आणि दुसऱ्या एखाद्या जुलमी मनुष्याच्या संरक्षकवर्गांत सामील होतात; अथवा युद्ध जर कोठें चालू असलें, तर पगारी सैनिक म्हणून

नोकरी करतात. पण जर शांततेच्या काळीं ते शहरांत रहात असले, तर शहरांतच लहान प्रमाणावर नुकसानकारक पुष्कळ गोष्टी करीत बसतात.

ॲडि:—त्या कशा प्रकारच्या ?

सॉक्रे०:—चोरी अथवा घरफोडी करणें, खिसे कापणें, कपडे चोरणें, देऊळ लुटणें, मनुष्य पळवून नेणें, अशासारखे ते गुन्हे करतात; आणि जर त्यांना चहाडी करण्याची कला अवगत असली, तर गुप्त हेराचें काम करून खोट्या साक्षी देतात व लांचही खातात.

ॲडि०:—असे लोक जर थोडे असले, तर ह्या गोष्टी थोडया प्रमाणांत नुकसान करणाऱ्या असतात.

सॉक्रे०:—ज्या गोष्टी लहान त्यांचें महत्त्वही लहानच असतें, आणि म्हणूनच ह्या सर्व नुकसानकारक गोष्टी, राज्यामध्यें जरी लांचखाऊपणा व दु:ख वाढवितात तरी जुलमीपणाइतकें त्यांचें प्राबल्य वाढत नाहीं. असे लोक व त्यांचे अनुयायी जेव्हां राज्यामध्यें असंख्य होऊन, लोकांच्या मूर्खपणामुळें त्यांना मदत केली जाते, तेव्हां स्वत:पैकींच अत्यंत जुलमी वृत्तीच्या मनुष्याला ते नायक बनवितात.

ॲडि०:—अशा मनुष्याची प्रवृत्ति पुष्कळच जुलमीपणाची असते, म्हणून त्याला नायक करण्यांत येतें.

सॉक्रे०:—शहरांतील लोक जोंपर्यंत खुषीनें आज्ञा पाळतात, तोंपर्यंत सर्व कांहीं ठीक चालतें. पण ते जेव्हां विरोध करूं लागतात, तेव्हां जुलमी मनुष्य आपल्या तरुण सोबत्यांची मदत घेऊन, स्वत:च्या आईबापांना जसें शासन करतो, तसें त्यांना शासन करतो व अशाच लोकांच्या मदतीनें आपल्या पितृदेशावर अथवा क्रीटन्स् म्हणतात त्याप्रमाणें मातृदेशावर अधिकार गाजवीत राहतो. अशा मनुष्याच्या वासनांचा हाच शेवट होय !

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—अधिकार मिळण्याच्या अगोदरही असे लोक, असाच स्वभाव खासगी व्यवहारांत दाखवीत नाहींत काय? इतर लोकांशीं ते व्यवहार करतांना असें दिसून येतें कीं, त्यांचे सर्व सोबती,
Steph खुषमस्करे व आश्रित असे असतात. आणि ह्या जुलमी
576 लोकांना जेव्हां दुसऱ्यापासून कांहीं मिळवावयाचें असतें,
तेव्हां त्याच्यापुढें गुडघे टेंकून व दाट मैत्रीचा निर्लज्जपणें सर्व आविर्भाव करून, ते आपलें काम साधतात. पण एकदां काम साधलें म्हणजे लगेच ओळखसुद्धां विसरून जातात!

ॲडि०:—अगदीं असेंच.

सॉक्रे०:—ह्याप्रमाणें सर्व आयुष्यभर ते मैत्रीशिवाय राहतात व नेहमीं धनी किंवा गुलाम असतात. कारण जुलमी स्वभावाच्या मनुष्याला खरें स्वातंत्र्य व मैत्री कधींच अनुभवतां येत नाहीं.

ॲडि०:—अर्थात्‌च नाहीं.

सॉक्रे०:—अशा लोकांना आपण विश्वासघातकी म्हटलें तर बरोबर होईल ना?

ॲडि०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—न्यायाच्या स्वरूपाविषयीं आपण जे पूर्वी सिद्धांत काढले आहेत, ते जर बरोबर असतील तर हे लोक विश्वासघातकी असतात. इतकेंच नव्हे, तर अत्यंत अन्यायी असतात.

ॲडि०:—आपले सिद्धांत निःसंशय बरोबर आहेत.

सॉक्रे०:—अत्यंत दुष्ट मनुष्याचें थोडक्यांत आपण वर्णन करूं या. कल्पनेनें ज्या स्थितीचें आपण वर्णन केलें, तशी खरोखर स्थिति अशा मनुष्याची असते.

ॲडि०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—अत्यंत जुलमी स्वभावाच्या मनुष्याला अनियंत्रित सत्ता मिळाली म्हणजे असाच त्याचा शेवट होतो. ज्याप्रमाणांत त्याचें

जुलमी आयुष्य वाढत जातें, त्याप्रमाणांत आपल्या वर्णनाशीं त्याचें साम्य अधिक जमत जातें.

ग्लॅकान म्हणाला, " हें निःसंशय खरें आहे. "

सॉक्रे०:--असें जर आहे, तर जो अत्यंत दुर्वृत्त मनुष्य असतो, तो अत्यंत दुःखीही असतो, असें सिद्ध होत नाहीं काय ? जनसमाजाचीं मतें कितीही भिन्न असोत, पण जितक्या तीव्र व दीर्घ प्रमाणांत अशा मनुष्याची जुलमी वागणूक चालू असते, तितक्या प्रमाणांत त्याचें आयुष्यही दुर्वृत्त व दुःखपूर्ण होत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:-जें राज्य जुलमी राजाच्या अधिकारांत असतें, त्या राज्याचा निदर्शक असा हा जुलमी मनुष्य असतो व बहुसत्ताकवृत्तीचा मनुष्य बहुसत्ताकराज्य निदर्शक असतो, असें आपणांस म्हटल्याशिवाय राहवेल काय ?

ग्लॅ०:--खात्रीनेंच राहवणार नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून सद्गुण व सौख्य, ह्या बाबतींत जशी शहरांची तुलना करतां येते, तशीच मनुष्यांचीही करतां येईल ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—सद्गुणाच्या बाबतींत, जुलमी मनुष्याच्या अधिकाराखालील शहर व आपण प्रथम वर्णन केलेल्या राजानें अधिकृत केलेलें शहर, ह्यांच्यामध्यें काय फरक दिसून येतो ?

ग्लॅ०:--तीं अगदीं एकमेकांच्या विरुद्ध असतात. एक अत्यंत सद्गुणी तर दुसरें अत्यंत दुर्गुणी.

सॉक्रे०:—कोणतें सद्गुणी व कोणतें दुर्गुणी, हें मी तुम्हांला विचारीतच नाहीं. कारण तें उघडच आहे. पण सुख व दुःख ह्यांचा प्रश्न, अशाच तऱ्हेनें तुम्ही सोडवणार ना ? समाजाचा जो एक केवळ

घटक, अशा जुलमी मनुष्याकडे अथवा केवळ त्याच्या निकट असलेल्या लोकांकडे बघून, आपण दिपून जातां कामा नये. राज्याची सर्व-सामान्य पहाणी करून नंतर मत बनवणें, हें आपलें कर्तव्य समजून, राज्यांतील प्रत्येक भागाचें आपण निरीक्षण केलें पाहिजे.

ग्लॅ०:—ठीक. तुमची सूचना योग्य आहे. प्रत्येकाला हें स्पष्टच दिसून येतें कीं, जुलमी राजाच्या हाताखालील शहर, अत्यंत दुःखी असतें व एकसत्तात्मक शहर, अत्यंत सुखी असतें.

सॉक्रे०:—ह्या दोन राज्यपद्धतीच्या लोकांविषयीं मत ठरवीत असतांना, जो लहान मुलाप्रमाणें बाह्यभाग तेवढाच निरीक्षण
Steph न करतां, व जुलमी मनुष्याच्या बाह्य दिमाखानें दिपून
577 न जातां, मनुष्यस्वभावाचें सूक्ष्मपणें निरीक्षण करतो, अशा मनुष्याच्या मताचा आपण स्वीकार केला पाहिजे, असें मी तुम्हांस सुचविलें, तर तें बरोबर होणार नाहीं काय? ज्या मनुष्याबद्दल विचार करावयाचा आहे, त्या मनुष्याच्या घरांत राहून त्याचें वर्तन ज्यानें पाहिलें आहे, कुटुंबांतील मंडळींशीं तो कसा वागतो, हें ज्यानें पाहिलें आहे–कारण मनुष्य आपल्या घरामध्यें नाटकी आविर्भाव पूर्णपणें टाकून देत असतो–सार्वजनिक संकटप्रसंगींही, त्याची वागणूक ज्यानें बघितली आहे, अशा अधिकारी न्यायाधीशालाच जर ह्या सर्व गोष्टी विचारांत घेण्यास सांगून, सुख व दुःख ह्या बाबतींत जुलमी मनुष्याची तुलना इतरांबरोबर काय होते, ह्याविषयीं मत देण्यास सांगितलें तर तें योग्य होईल ना?

ग्लॅ०:—ही सूचना सुद्धां अत्यंत न्याय्य आहे.

सॉक्रे०:—आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास समर्थ असा मनुष्य आपणांस पाहिजे आहे. म्हणून, ज्याअर्थीं अशा वर्णनाच्या लोकांचा आपण अनुभव घेतला आहे, त्याअर्थीं आपणच योग्य न्यायाधीश आहोंत, असें मानणें बरोबर नाहीं काय?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—पुढील दृष्टीनें, ह्या प्रश्नांचा विचार करण्यास मी तुम्हांस विनंति करतों. राज्य व व्यक्ति, ह्यांच्यामधील साम्य ध्यानांत धरून व दोहोंचा व्यक्तिशः विचार करून, ज्या परिस्थितींत हीं दोन्हीं असतात ती परिस्थिति मला सांगा.

ग्लॅ०:—कोणत्या परिस्थितीविषयीं तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—राज्याबद्दल अगोदर विचार करूं. जुलमी मनुष्याच्या अधिकारांत जें राज्य असतें, तें स्वतंत्र असतें कां परतंत्र असतें ?

ग्लॅ०:—पूर्ण गुलामगिरींत असतें.

सॉक्रे०:—असें असूनही, त्यांत धनी व स्वतंत्र लोक असतात, असें दिसून येतें.

ग्लॅ०:—कांहीं लोक असे असतात, हें खरें आहे. पण राज्यांतील बहुतेक लोकांना—आणि त्यांच्यातील उत्तमांनाही—अत्यंत अपमानकारक व दुःखकारक गुलामगिरींत रहावें लागत असतें.

सॉक्रे०:—ज्याअर्थी जुलमी मनुष्य अशा राज्यासारखा असतो, त्याअर्थी त्याच्या स्वतःचें बाबतींतही, असाच प्रकार दिसणार नाहीं काय ? त्याचा आत्मा गुलामगिरीच्या ओझ्याखालीं दडपला जाणार नाहीं काय ? जे त्याच्या आत्म्याचे उत्तम भाग, ते गुलाम केलेले व जो भाग क्षुद्र पण अत्यंत भ्रष्ट व वेडगळ, तो प्रभुत्व पावलेला, असें त्याच्यासंबंधीं दिसून येणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—असेंच दिसून येणार.

सॉक्रे०:—मग तुमच्या मताप्रमाणें, असा आत्मा गुलाम असेल कीं स्वतंत्र असेल ?

ग्लॅ०:—खात्रीनें गुलामच असणार !

सॉक्रे०:—जुलमी मनुष्याच्या गुलामगिरींत असलेलें शहर, स्वतंत्र वृत्तीनें वागण्यास असमर्थ असेल ना ?

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०—तर मग, जुलमीपणानें अधिकृत असलेला आत्माही स्वत:च्या इच्छेप्रमाणें वागूं शकणार नाहीं. उलट विकारयुक्त इच्छेच्या पाशवी शक्तीनें, तो ओढला जाऊन अव्यवस्थित व पश्चातापदग्ध असा होऊन राहील.

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—जुलमानें अधिकृत असलेलें शहर, श्रीमंत असेल कीं दरिद्रि असेल ?

ग्लॅ०:—दरिद्रीच असणार ?

Steph 578 सॉक्रे०:—तर मग जुलमी आत्माही, नेहमीं दरिद्री व लोभी असणार.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि अशा तऱ्हेचें शहर व मनुष्य, साहजिकच भीतिग्रस्त असणार ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्या शहरापेक्षां दुसऱ्या एखाद्या शहरामध्यें अधिक रडारड, आर्त स्वर, शोक व दु:खें, तुम्हांला सांपडतील काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—वासना व आकांक्षा ह्यांनीं वेडावून गेलेल्या जुलमी मनुष्याखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीच्या ठिकाणीं तुम्हांला इतक्या भयंकर प्रकारची दु:खकारक स्थिति दिसून येईल काय ?

ग्लॅ०:—कशी काय दिसणार ?

सॉक्रे०:—ह्या व ह्यासारख्या इतर गोष्टी विचारांत घेऊन, हें शहर सर्वांत अत्यंत दु:खी होय असें तुम्ही ठरविलें, असें मी समजतों.

ग्लॅ०:—हें माझें मत बरोबर नाहीं काय ?

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण ह्याच गोष्टी विचारांत घेऊन, तुम्ही जुलमी मनुष्याचें, कसें वर्णन कराल ?

ग्लॅ०:—मी म्हणेन कीं, सर्व मनुष्यांत त्याच्याइतका दुःखी कोणीच नाहीं.

सॉक्रे०:—येथें तुमची चूक होते आहे.

ग्लॅ०:—कशी काय ?

सॉक्रे०:—सर्वांहून हा अधिक दुःखी, असें म्हणतां येणार नाहीं.

ग्लॅ०:—मग कोणास म्हणतां येईल ?

सॉक्रे०:—पुढील मनुष्य अधिक दुःखी होय, असें तुम्हांला दिसून येईल.

ग्लॅ०:—कोणता ?

सॉक्रे०:—जुलमी वृत्तीमुळें ज्याला खासगी आयुष्य सुखानें घालवितां येत नाहीं, असा मनुष्य. कारण सार्वजनिकरीत्या त्याला नेहमीं जुलमी सत्ता गाजवावी लागत असणें, हें त्याचें मोठें दुर्दैव होय.

ग्लॅ०:—तुमच्या पूर्वीच्या बोलण्यावरून तुमचें म्हणणें बरोबर आहे, असा मी तर्क करतों.

सॉक्रे०:—होय, पण नुसते तर्क करून समाधान मानून घेऊं नका. उलट, आपण ज्या तर्कबुद्धीनें चर्चा करीत आहोंत, तिच्या मदतीनें पूर्णपणें ह्या विषयाचा विचार करा. कारण चांगलें किंवा वाईट आयुष्य कोणतें हें ठरविणें, हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—ह्या प्रश्नाचा विचार करतांना, आपण खालील गोष्टी लक्षांत धरून चर्चेस सुरवात केली पाहिजे.

ग्लॅ०:—त्या कोणत्या गोष्टी ?

सॉक्रे०:—शहरांमध्यें पुष्कळ गुलाम बाळगणारे असे श्रीमंत लोक असतात. त्यांच्याविषयीं स्वतंत्र विचार केला पाहिजे. जुलमी मनुष्याशीं

त्यांचें साम्य एका बाबतींत असतें. ती बाब म्हणजे ते सुद्धां पुष्कळ लोकांवर अधिकार गाजवीत असतात. जुलमी मनुष्याजवळ गुलामांची संख्या अधिक असते, हाच काय तो दोहोंत फरक असतो.

ग्लॅ०:—होय. एवढाच फरक.

सॉक्रे०:—असे लोक निर्धास्त असतात व नोकरांची त्यांना भीति वाटत नसते, हें तुम्हांला माहीत आहे ना ?

ग्लॅ०:—होय. पण त्यांची भीति त्यांना कां वाटावी ?

सॉक्रे०:—वाटूं नयेच. पण ह्याचें कारण तुम्हांला माहीत आहे काय ?

ग्लॅ०:—होय. कारण, सर्व शहर प्रत्येक व्यक्तीचें रक्षण करीत असतें.

सॉक्रे०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे. पण अशी कल्पना करा कीं, एखाद्या देवतेनें पन्नास अथवा अधिक गुलाम जवळ बाळगणाऱ्या श्रीमंत मनुष्याला, त्याची बायको, मुलें, सर्व संपत्ति व गुलाम ह्यांच्यासह, जेथें स्वतंत्र लोक त्याला मदत करूं शकणार नाहींत, अशा वाळवंटांत नेऊन टाकलें आहे. अशा परिस्थितींत आपण स्वतः व आपलीं बायकामुलें, आपल्या नोकरांकडून ठार मारलीं जातील, अशी त्याला भयंकर धास्ती वाटणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. भयंकर धास्ती वाटेल.

सॉक्रे०—आणि म्हणून त्यावेळेपासून त्याला स्वतःच्या कांहीं गुलामांची खुषामत करणें भाग पडून व मोठालीं वचनें देऊन, कांहीं कारण नसतांही त्यांना स्वातंत्र्य द्यावें
Steph 579 लागणार नाहीं काय ? ह्यामुळें नोकरांची खुषामत करणारा मालक म्हणून तो समजला जाणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—असें जर तो करणार नाहीं तर त्याचा मृत्यू ठरलेलाच !

सॉक्रे०:—पण अशी कल्पना करा कीं, त्याच्या सभोंवतीं, ज्यांना एका मनुष्यानें इतरांवर धन्याचे अधिकार गाजविणें सहन होत नाहीं,

इतकेंच नव्हे तर, ज्यांना असा अधिकार गाजविणारा मनुष्य सांपडला असतां त्याला भयंकर शिक्षा दिल्याशिवाय राहवणार नाहीं, अशा लोकांचा जमाव ठेवण्यांत आला, तर वरील मनुष्याची काय अवस्था होईल ?

ग्लॅ०:—असा मनुष्य अधिक भयंकर संकटांत सांपडेल. कारण संरक्षण करणारे लोकच त्याचे शत्रू होतील !

सॉक्रे०:—तर मग, जुलमी मनुष्य अशाच प्रकारच्या तुरुंगांत नसतो काय ? कारण, आपण वर्णन केल्याप्रमाणें जर त्याचा स्वभाव असला, तर पुष्कळ भयप्रद गोष्टीनीं व वासनांनीं तो ग्रस्त असतो, व जरी तो लोभी व चौकसवृत्तीचा असला, तरी कोणत्याही स्वतंत्र नागरिकाप्रमाणें प्रवास करण्याची व सृष्टीचे देखावे पहाण्याची त्याला मोकळीक नसते. घरामध्यें स्वतःला दडवून घेऊन, स्त्रीसारखें आयुष्य त्याला काढावें लागल्यामुळें, जे नागरिक दूरदेशीं प्रवास करतात व सृष्टीचे भव्य देखावे पहातात, त्यांच्याबद्दल त्याला हेवा वाटतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेची त्याची वाईट स्थिति असूनही, खाजगी आयुष्य सोडावयास लावून, जेव्हां त्याला दैवयोगानें जुलमी सत्ता देण्यांत येते, तेव्हां त्याची ह्याहूनही अत्यंत वाईट स्थिति होते. कारण ज्याप्रमाणें एखाद्या रोगिष्ट व इंद्रियासक्त मनुष्याला एकांतवासांत दिवस काढूं न देतां, इतर लोकांबरोबर झुंज खेळण्यास व भांडण करण्यास भाग पाडलें जावें, त्याप्रमाणें स्वतःवरच ज्याला अधिकार गाजवितां येत नाहीं, अशा ह्या मनुष्याला दुसऱ्यावर अधिकार गाजविण्यास भाग पाडलें जातें.

ग्लॅ०:—सॉक्रेटिस, निःसंशय ह्या दोन्ही गोष्टी सारख्या आहेत व तुमचें वर्णनही अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—माझ्या प्रिय ग्लॅकॉन्, जुलमी मनुष्याची स्थिति अत्यंत वाईट नसते काय ? आणि तुमच्या मताप्रमाणें ज्या मनुष्याचें आयुष्य अत्यंत दुःखी असें असतें, त्याच्यापेक्षांही अशा मनुष्याचें आयुष्य अधिक असह्य व दुःखी नसतें काय ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—म्हणून वस्तुतः, खरा जुलमी मनुष्य अत्यंत हीन प्रकारचा गुलाम असून, अत्यंत दुर्गुणी मनुष्याची खुषामत करणारा असतो. स्वतःच्या इच्छा, लहान प्रमाणांत सुद्धां जरी तो पुरवूं शकत नसला, तरी असंख्य गोष्टींची त्याला अत्यंत गरज भासूं लागते. आणि अध्यात्मिक दृष्टीनें पाहिलें असतां, असा मनुष्य खरोखर भिकारीच असतो. ज्या राज्यावर तो राज्य करतो, त्या राज्याप्रमाणें जर त्याचा स्वभाव असला, तर सर्व आयुष्यभर भय, क्षोभ व दुःखें ह्यांनीं तो गांजून जात असतो. अेरावी राज्याप्रमाणेंच खरोखर त्याचा स्वभाव नसतो काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—शिवाय त्याच्या हातांत असलेल्या अधिकारामुळें, तो
Steph अधिकाधिक मत्सरी, अविश्वसनीय, अन्यायी, मैत्रीरहित
580 व अपवित्र बनून प्रत्येक दुर्गुणाचा संवर्धक होतो. ह्या
सर्व दुर्गुणांमुळें, प्रथमतः तो स्वतःच दुःखी होऊन नंतर जवळ असलेल्या लोकांनाही दुःखी करतो.

ग्लॅ०:—कोणीही शहाणा मनुष्य ह्या विधानाला विरोध करणार नाहीं.

सॉक्रे०:—सर्व खटल्याचा विचार केल्यानंतर ज्याप्रमाणें न्यायाधीश निर्णय देतो, त्याप्रमाणें तुम्ही सुखाच्या बाबतींत कोणाचा नंबर पहिला, कोणाचा दुसरा वगैरे ठरवून, एकसत्ताक, अल्पसत्ताक, बहुसत्ताक, मानीजनसत्ताक व अेरावसत्ताक लोकांची अनुक्रमणिका निश्चित करा.

ग्लॅ०:—ह्यासंबंधीं निर्णय करणें सोपें आहे. ज्याप्रमाणें नृत्यगीत-मंडळीमध्यें प्रत्येकाच्या प्रवेशाप्रमाणें अनुक्रम लावतात, त्याप्रमाणें सद्गुण व दुर्गुण, सुख व दुःख, ह्या बाबतींत मी ह्या लोकांची अनुक्रमणिका लावीन.

सॉक्रे०:—तर मग, ललकाऱ्याला बोलावावें कीं मी स्वतःच जाहीर करावें ?—" अरिस्टानचा पुत्र असा निर्णय देत आहे कीं, जो अत्यंत उत्तम व न्यायी मनुष्य असतो म्हणजे जो मनुष्य एकसत्ताक वृत्तीनें राहून स्वतःवर राजाप्रमाणें अधिकार गाजवितो तो सर्वांत सुखी होय आणि जो मनुष्य अत्यंत वाईट व अन्यायी वृत्तीचा असतो म्हणजे जो मनुष्य जुलमी वृत्तीचा असून स्वतःवर व शहरावर पूर्णपणें अरेरावी सत्ता गाजवितो, तो मनुष्य सर्वांत दुःखी होय."

ग्लॅ०:—तुम्हीं असें जाहीर करावें.

सॉक्रे०:—माझ्या जाहीरनाम्यांत असेंही मी आणखी घालावें काय कीं, सर्व मनुष्यांना व देवांना जरी असे स्वभाव ओळखतां आले नाहींत, तरी वरील विधानांत फरक होणार नाहीं ?

ग्लॅ:—असेंही करा.

सॉक्रे०:—ठीक. हें एक जाहीर झालें. आणखी एक दुसरें विधान आपणांस पसंत पडलें तर जाहीर करावें लागेल.

ग्लॅ०:—तें कोणतें ?

सॉक्रे०:—ज्याअर्थी प्रत्येक व्यक्तीचा आत्मा तीन भागांमध्यें विभागून राज्यांतील तीन वर्गांशीं त्यांचें साम्य दाखविण्यांत आलें आहे, त्याअर्थी दुसरें एक विधान जाहीर होऊं शकेल.

ग्लॅ०:—तें कोणतें ?

सॉक्रे०:—तें असें. ज्याअर्थी आत्म्याचे तीन भाग आहेत त्याअर्थी प्रत्येक भागाला अनुरूप अशी तीन सुखें आहेत; त्याप्रमाणेंच तीन वासना व तत्त्वें आहेत असें मला वाटतें.

ग्लॅ०:—तुमच्या म्हणण्याचें स्पष्टीकरण कराल काय?

सॉक्रे०:—आपण ठरविलें कीं, आत्म्याच्या एका भागानें मनुष्य ज्ञान करून घेतो व दुसऱ्या भागानें तेजस्विता दाखवितो. तिसरा भाग विविध प्रकारचा असल्यामुळें, त्याला आपणांस विशिष्ट असें नांव देतां आलें नव्हतें; म्हणून त्याचें अत्यंत महत्वाचें जें
Steph 581 वैशिष्टय त्यानेंच त्याला आपण संबोधिलें होतें. क्षुधा, तृष्णा, मैथुन इत्यादि इंद्रियजन्य सुखांचा तीव्र आवेग ह्या भागांत असल्यामुळें, आपण त्याला वासनात्मक म्हटलें आणि द्रव्यलोभी म्हणूनही आपण त्याचें वैशिष्टय दाखविलें. कारण अशा वासनांची पूर्तता होण्याकरितां द्रव्याचेंच मुख्य सहाय्य लागतें.

ग्लॅ०:—होय. आपलें म्हणणें बरोबर होतें.

सॉक्रे०:—ह्या तिसऱ्या भागाचें सुख व त्याची प्रवृत्ति, ह्यांचा विषय फायदा मिळविणें हा असतो, असें जर आपण म्हटलें, तर आत्म्याच्या ह्या भागाविषयीं अशा संक्षिप्त वर्णनानें आपण स्पष्ट कल्पना आणून दिल्यासारखें होणार नाहीं काय? द्रव्यलोभी अथवा अर्थप्रेमी, असें या भागाचें वर्णन करणें बरोबर होणार नाहीं काय?

ग्लॅ०:—बरोबर होईल असें मला वाटतें.

सॉक्रे०:—आत्म्याच्या तेजस्वी भागाची प्रवृत्ति, अधिकार, विजय व कीर्ति मिळविण्याकडेच नसते काय?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—युद्धप्रेमी अथवा महत्त्वाकांक्षी, असें ह्या भागाला म्हणणें योग्य नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. अगदीं योग्य.

सॉक्रे०:—ठीक. आत्म्याच्या ज्या भागानें आपण ज्ञान घेत असतो, त्याविषयीं म्हणावयाचें म्हणजे, सत्य कसें असतें हें जाणण्यापलीकडे

त्याचें कशांतच लक्ष नसतें. आणि ह्या भागाला संपत्ति व कीर्ति ह्यांविषयीं मुळींच किंमत वाटत नसते.

ग्लॅ०:—होय. अगदीं मुळींच वाटत नसते.

सॉक्रे०:—ह्याला आपण ज्ञानप्रेमी अथवा शहाणपणाची आवड असणारा, असें म्हणणें योग्य आहे ना?

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—कांहीं लोकांमध्येंच हा भाग प्रभुत्व गाजविणारा असून, इतर लोकांमध्यें, परिस्थितीप्रमाणें वरील दोन भागांपैकीं पहिला अथवा दुसरा प्रबल नसतो काय?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून आपणांला मनुष्याचे ज्ञानप्रेमी, युद्धप्रेमी व अर्थप्रेमी असे तीन वर्ग करतां येतील.

ग्लॅ०:—होय. खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ह्या तीन वर्गांमध्यें, तीन प्रकारचीं सुखें अनुक्रमानें असतात.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—ह्या तीन तऱ्हेच्या लोकांना आळीपाळीनें जर तुम्ही विचारलेंत, कीं सर्वांत सुखकारक आयुष्य कोणतें, तर प्रत्येकजण इतरांपेक्षां आपलेंच आयुष्य वाखाणीत बसेल. अर्थ-प्रेमी मनुष्याला विचारलेंत, तर तो सांगेल कीं, नफा मिळविण्यापासून जें सुख होतें, त्याच्याशीं सन्मानाचें सुख व ज्ञानसंपादनाचें सुख ह्यांची तुलना केली असतां, हीं दोन्ही सुखें निरर्थक आहेत. त्यांच्यापासून पैसे मिळवितां आले, तरच तीं सुखावह होत, असें तो मानतो.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—महत्वाकांक्षी मनुष्य काय म्हणेल? पैशापासून मिळणाऱ्या सुखाला तो क्षुद्र समजून, ज्ञानापासून मिळणाऱ्या सुखाला नुसती

वाफ म्हणेल. कारण ह्या दोन सुखांपासून कीर्ति मिळत नसली, तर तीं व्यर्थ होत, असें तो मानतो.

ग्लॅ०:—अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—ज्ञानप्रेमी मनुष्य, सत्याचें ज्ञान करून घेणें व सदोदित ज्ञानाच्या परिशीलनांत असणें, ह्यांत जें सुख असतें, त्या सुखापुढें इतर सुखें क्षुद्र आहेत, असें समजत नाहीं काय? इतर सुखांना तो आवश्यक समजतो. कारण जर तीं आवश्यक नसतीं, तर त्यांच्याबद्दल त्याला इच्छाच उत्पन्न झाली नसती. हें खरें आहे ना?

ग्लॅ०: खात्रीनेंच.

सॉक्रे०:—सौंदर्याची अथवा नीतीची दृष्टि बाजूला ठेवून, प्रत्येक
Steph प्रकारचें सुख व तदनुसार आयुष्य, ह्यापासून आनंद व
582 दुःखविमोचन कितपत होतें, ह्याविषयीं वाद उपस्थित
झाला असतां, वरील तीन मनुष्यांपैकीं खरें मत कोणाचें, असें म्हणतां येईल?

ग्लॅ०: —मला ह्या प्रश्नाचें उत्तर देतां येणार नाहीं.

सॉक्रे०: —ठीक आहे. पुढील तऱ्हेनें ह्या प्रश्नाकडे पहा. निर्णय बरोबर देतां यावा, म्हणून कोणतें साधन उपयोगांत आणावें? अनुभव, शहाणपणा व तर्क, ह्यांशिवाय अधिक चांगलें साधन आहे काय?

ग्लॅ०:—अर्थातच नाहीं.

सॉक्रे०:—आपण आतां वर्णन केलेल्या सुखांचा अनुभव, ह्या तीन मनुष्यांमध्यें सर्वांत अधिक कोणाला आहे? नफा मिळण्याचें ज्याला नेहमीं प्रेम वाटत असतें, तो मनुष्य सत्याच्या खऱ्या स्वरूपाचा इतका अभ्यास करीत असतो काय कीं, त्यामुळें ज्ञानप्रेमी मनुष्याला नफ्याचें सुख जितकें माहिती असतें, त्याहून त्याला ज्ञानापासून मिळणाऱ्या सुखाची जास्त माहिती असते?

ग्लॅ०: – अर्थात्‌च नाहीं. ज्ञानाची आवड असलेल्या मनुष्याला, लहानपणापासून फायदा मिळविण्याच्या सुखाची चव घ्यावी लागतच असते. परंतु ज्याला फायद्याचें प्रेम वाटत असतें अशा मनुष्याला, खरोखर अस्तित्वांत असलेल्या वस्तूंचें स्वरूप काय आहे, ह्याचा अभ्यास करून, त्या सुखाच्या गोडीची चव घेऊन त्या सुखाचा परिचय करून घेणें जरूर नसतें—नव्हे त्याची जरी प्रवृत्ति असली, तरी सुद्धां हें सुख अनुभवणें त्याला कठीण जाईल, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—तर मग, दोन्ही सुखांशीं प्रत्यक्ष परिचय असण्याच्या बाबतींत, ज्ञानप्रेमी मनुष्य अर्थप्रेमी मनुष्यापेक्षां श्रेष्ठ असतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच असतो.

सॉक्रे०—कीर्तीचें प्रेम बाळगणारा मनुष्य कसा असतो ? ज्ञानप्रेमी मनुष्य जसा कीर्तीच्या सुखाला परिचित असतो, तसा हा मनुष्य ज्ञानाच्या सुखाशीं परिचित असतो काय ?

ग्लॅ०:—नाहीं. आपल्या ध्येयपूर्तीच्या मार्गांत असणाऱ्या प्रत्येक मनुष्याला मान मिळतच असतो. श्रीमंत मनुष्याला पुष्कळ लोकांकडून जसा मान दिला जातो, तसा धैर्यशाली व सूज्ञ लोकांनाही मान दिला जातो. म्हणून लोकांकडून मान दिला गेला असतांना जें सुख मिळतें, त्या सुखाशीं ह्या सर्वांचाच परिचय होत असतो. परंतु सत्याच्या चिंतनांत जें सुख मिळतें, त्या सुखाची चव ज्ञानप्रेमी मनुष्याशिवाय कोणालाच माहिती नसते.

सॉक्रे०:—म्हणून प्रत्यक्ष परिचयाच्या बाबतींत, ह्या तिघांमध्यें ज्ञानप्रेमी मनुष्यच उत्तम न्यायाधीश होय.

ग्लॅ०:—अगदीं असेंच.

सॉक्रे०:—शिवाय ज्ञान व अनुभव, ह्यांच्यावर त्यालाच हक्क सांगतां येतो.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आणखी असें पहा कीं, ज्या शक्तीनें निर्णय देतां येतो ती शक्ति, नफा किंवा मान ह्यांच्याबद्दल प्रेम वाटणाऱ्या मनुष्याजवळ नसून, फक्त ज्ञानप्रेमी मनुष्याजवळच असते.

ग्लॅ०:—अशी कोणती शक्ति ?

सॉक्रे०:—बुद्धीच्या साहाय्यानेंच निर्णय देतां येतो, असें आपण म्हटलें नव्हतें काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ज्ञानप्रेमी मनुष्याजवळच बुद्धीची शक्ति विशेषेंकरून असते.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—म्हणून जर प्रश्नांचा निर्णय, धन व नफा ह्या साधनांनीं करावयाचा असला, तर अर्थ-प्रेमी मनुष्यानें केलेली स्तुति व निंदा हींच अत्यंत खरीं ठरतील.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—तसेंच कीर्ति, विजय व धैर्य, हीं साधनें जर निर्णयाच्या कामाला योग्य समजण्यांत आलीं, तर कीर्ति व युद्ध ह्यांची आवड असणाऱ्या मनुष्याचा निकाल अत्यंत खरा मानावा लागेल.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—पण जर अनुभव, ज्ञान व बुद्धि, हीं सर्वोत्तम साधनें म्हटलीं, तर काय म्हणतां येईल ?

ग्लॅ०:—ज्ञानप्रेमी व तर्कप्रेमी मनुष्यानें केलेली स्तुति, अर्थात्‌च अत्यंत न्याय्य समजण्यांत येईल.

सॉक्रे०:—जर सुखांची संख्या तीन असली, तर आत्म्याच्या ज्या भागानें आपण ज्ञान घेत असतों, त्या भागाचें सुख
Steph 583 सर्वांत अधिक आनंददायक नाहीं काय ? आणि हा भाग ज्या मनुष्यामध्यें प्रबल असतो, त्याचें आयुष्य सर्वांत अधिक आनंदमय नाहीं काय ?

ग्लॅ०:—निःसंशयच असणार. ज्ञानी मनुष्याला स्वतःचें आयुष्य वाखाणण्याचा पूर्ण अधिकार आहे.

सॉक्रे०:—आणि कोणतें आयुष्य व कोणतें सुख, दुय्यम महत्वाचें आहे, असें न्यायाधीश जाहीर करील ?

ग्लॅ०:—युद्धप्रेमी व महत्वाकांक्षी मनुष्याच्या सुखालाच दुसरा नंबर देईल. कारण द्रव्यार्जन करणाऱ्या मनुष्याच्या सुखापेक्षां, ह्या सुखाचाच पहिल्या सुखाशीं अधिक जवळ संबंध येतो.

सॉक्रे०:—तर मग, फायदा मिळविणाऱ्या मनुष्याच्या सुखाचा नंबर शेवटीं लागतो.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—ह्याप्रमाणें अन्यायी मनुष्याचा न्यायी मनुष्याकडून दोनदां लागोपाठ पराभव केला जातो. आतां तिसरा व शेवटचा सामना, संरक्षक देव आलिम्पियन झ्यूस, ह्याचें स्मरण करून सुरू करा. "ज्ञानी मनुष्याच्या सुखाखेरीज, इतर सर्व सुखांमध्यें कांहींतरी असत्यपणा व कमअस्सलपणा असून, चित्राच्या ओबडधोबड रूपरेषेप्रमाणें तीं अस्पष्ट असतात," असें एका विद्वान् मनुष्यानें मला सांगितलेलें आहे. ह्या शेवटच्या सामन्यांतील पराभव सर्वांत महत्वाचा व निश्चयात्मक होय.

ग्लॅ०:—बरोबर आहे. पण तुमचें म्हणणें स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—तुम्ही जर मदत केली, तर पुढील चर्चेंत आपला हेतु सिद्धीस जाईल.

ग्लॅ०:—तुम्ही प्रश्न विचारण्यास सुरवात करा.

सॉक्रे०:—दुःख हें सुखाच्या विरुद्ध असतें ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—सुख व दुःख, ह्यांचा एकाच वेळीं अभाव, अशी स्थिति असते ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच असते.

सॉक्रे०:—म्हणजे सुख व दुःख, ह्या दोन टोंकांमधील एका बिंदूवर मन स्थिर होतें, हें तुम्ही निराळ्या शब्दांत कबूलच करतां. तुमच्या म्हणण्याचा असाच अर्थ होतो ना ?

ग्लॅ०:—होय, असाच.

सॉक्रे०:—आजारी असतांना लोक जी भाषा वापरतात, ती तुम्हांला आठवते काय ?

ग्लॅ०:—कोणती ?

सॉक्रे०:—ते म्हणतात कीं, आरोग्यापेक्षां अधिक आनंददायक कांहीं नाहीं. पण वस्तुतः आरोग्याचा हा आनंद, अशा लोकांना आजारी पडण्यापूर्वी आढळून आलेला नसतो.

ग्लॅ०:—होय. ही भाषा मला आठवते.

सॉक्रे०:—अत्यंत दुःखांत असलेले लोक, दुःखविमोचनासारखें आनंददायक कांहीं नाहीं, असें म्हणतांना तुम्ही ऐकलें असेल.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—अशा तऱ्हेच्या इतर प्रसंगींही, तुम्हांला आढळून येईल कीं, लोक जेव्हां असमाधानी स्थितींत असतात, तेव्हां ते प्रत्यक्ष आनंदाची स्तुति करीत नसून, वस्तुतः असमाधानी स्थितीपासून मुक्तता व स्वास्थ्य ह्यांचीच केवळ वाखाणणी करतात.

ग्लॅ०:—खरें आहे. आणि ह्याचें कारण, अशा वेळेस ही दुःखविमुक्त स्थिति खरोखरच आल्हाददायक वाटत असते.

सॉक्रे०:—अशाच तऱ्हेनें आपणांस म्हणतां येईल कीं, जेव्हां मनुष्याचा आनंद बंद होतो, तेव्हां स्वास्थ्यही दुःखावह होतें.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—म्हणून सुख व दुःख ह्यांच्यामध्यें स्थित होणारी जी स्वस्थता, ती एकदां सुखकारक व एकदां दुःखकारक असली पाहिजे.

ग्लॅ०:—होय, असें दिसून येईल.

सॉक्रे०:—जें सुखही नाहीं व दुःखही नाहीं, तें दोन्ही होऊं शकेल काय ?

ग्लॅ०:—मला असें वाटत नाहीं.

सॉक्रे०:—मनामध्यें जेव्हां सुख व दुःख ह्यांचें वास्तव्य असतें, तेव्हां त्या दोन्ही भावनाच असतात ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—परंतु एकाच वेळेस अनुभवास येणारा सुखाचा व
Steph दुःखाचा अभाव, ह्या दोहोंमधील अशी एक निःसंशय
584 स्वास्थ्याची स्थिति दर्शविणारा असतो, असें आपण आतांच म्हटलें नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०—तर मग, दुःखाचा अभाव आनंददायक अथवा सुखाचा अभाव दुःखदायक, असें वर्णन करणें बरोबर होईल काय ?

ग्लॅ०:—बरोबर होणार नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून स्वास्थ्याची जी स्थिति आपण वर्णन केली, ती दुःखकारक स्थितीशीं केलेल्या तुलनेनें आनंददायक व सुखकारक स्थितीशीं केलेल्या तुलनेनें दुःखदायक, अशी निव्वळ बाह्यात्कारीं दिसून येते. वस्तुतः ती तशी नसते. खऱ्या सुखाच्या कसोटीला अशीं सुखें मुळींच टिकावयाचीं नाहींत. कारण अशीं सुखें, मोहाचेच प्रकार होत.

ग्लॅ०:—आपल्या वादाचा निष्कर्ष असा होतो, हें मी कबूल करतों.

सॉक्रे०:—सुख म्हणजे दुःखाचा विराम व दुःख म्हणजे सुखाचा विराम, असा सृष्टिनियम आहे, अशी ह्या क्षणाला तुमची जी कल्पना झाली असेल ती काढून टाकण्याकरितां, तुम्हीं जीं सुखें दुःखाच्या विरामापासून उद्भवत नाहींत, त्या सुखांकडे लक्ष द्या.

सॉक्रे०:—ह्या प्रश्नाचा निराळ्या दृष्टीनें विचार करा. क्षुधा, तृष्णा आणि अशाच इतर संवेदना, शारीरिक रिक्तता दाखवीत नाहींत काय ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें अज्ञान व मूर्खपणा, मानसिक रिक्तता दाखवीत नाहींत काय ?

ग्लॅ०:—होय, खात्रीनेंच.

सॉक्रे०:—अन्नानें शरीराची व ज्ञानानें मनाची तृप्ति होत नाहीं काय ?

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—खऱ्या तत्वामुळें झालेली तृप्ति, कमी खऱ्या तत्वाच्या तृप्तीपेक्षां अधिक खरी अथवा कमी ठरेल काय ?

ग्लॅ०:—ज्या प्रमाणांत तत्व खरें असेल, त्याप्रमाणांत तृप्ति दिसून येईल.

सॉक्रे०:—भाकर, मांस, पेय व सर्वसाधारण अन्न, ह्या पदार्थांच्या तत्वांत असलेला शुद्ध सत्‌भाव, खरें मत (समज), शास्त्र, ज्ञान व सर्व सद्गुण, ह्यांच्यामधील शुद्ध सत्‌भावापेक्षां अधिक मोठा असतो, असें तुम्हांला वाटतें काय ? तुमचें मत बनविण्यापूर्वी, ह्या प्रश्नाकडे पुढील प्रकारें लक्ष द्या. अविकारी, अमर व सत्य अशाशीं ज्याचा संबंध असतो, व जें स्वतःच अविकारी, अमर्त्य असून तत्सदृश वस्तूंमध्यें दिसून येतें, त्याच्यामध्यें सत्‌भाव अधिक दिसून येतो ना ? अथवा विकारी व मर्त्य अशाशीं ज्याचा संबंध असतो व जें स्वतःच विकारी व मर्त्य असून तत्समानधर्मी वस्तूंमध्यें दिसून येतें, त्याच्यामध्यें सत्‌भाव अधिक दिसून येतो, असें तुम्हांस वाटतें काय ?

ग्लॅ०:—पहिल्या प्रकारच्या म्हणजे अविकारी वस्तूंचाच सत्‌भाव हा विशिष्ट गुणधर्म आहे, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—अविकारी वस्तूंमध्यें, सत्भावापेक्षां शास्त्राचा प्रवेश कमी प्रमाणांत असतो काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—तसेंच सत्य कमी प्रमाणांत असतें काय ?

ग्लॅ०:—नाहीं.

सॉक्रे०:—म्हणजे सत्य जर कमी प्रमाणांत असलें, तर सत्भावही कमी प्रमाणांत असतो ना ?

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—सामान्यत: म्हणावयाचें म्हणजे, शरीराची सर्व प्रकारें सुधारणा ज्या साधनांनीं केली जाते त्या साधनांत, आत्म्याची उन्नति ज्या साधनांनीं करण्यांत येते त्या साधनांपेक्षां, कमी सत्भाव असतो.

ग्लॅ०:—होय. फारच थोड्या प्रमाणांत असतो.

सॉक्रे०:—आत्म्यापेक्षां शरीर कमी सत्य व कमी अस्सल तुम्ही समजत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. मी समजतों.

सॉक्रे०:—अधिक खऱ्या सत्तत्वांनीं जें भरलेलें आहे व जें स्वत: अधिक खरें आहे, तें सत् व अस्सलपणा ह्यांत कमी असलेल्या वस्तूंपेक्षां अधिक पूर्ण नाहीं काय ?

ग्लॅ०:—नि:संशय.

सॉक्रे०:—स्वाभाविक अनुरूप अशा वस्तूंनीं पूर्ण असणें, आनंददायक असल्यामुळें जो विषय खरोखर अधिक भरलेला व खऱ्या वस्तूंनीं भरलेला असतो, तो खऱ्या अर्थानें खऱ्या सुखांना जन्म देणारा असतो व जो विषय कमी खऱ्या वस्तूंमध्यें भाग घेतो, तो कमी खरेपणानें व कमी मजबूतीनें भरलेला असून कमी खऱ्या व कमी विश्वसनीय सुखांना अनुभवतो.

ग्लॅ०:—हा निष्कर्ष अगदीं अपरिहार्य आहे.

सॉक्रे०:—जे लोक ज्ञान व सद्गुण ह्यांना अपरिचित असून आपला वेळ सदोदित मेजवान्या व तत्सदृश करमणूकींत घालविणारे असतात, ते उच्च मार्गावर फक्त मध्यबिंदूपर्यंत नेण्यांत येऊन पुनः
Steph खालीं ओढले जातात. एवढ्या मर्यादेमध्येंच ते सर्व
586 आयुष्यभर भटकत असतात व कधींही ह्या मर्यादेबाहेर जाऊन वर बघूं शकत नाहींत अथवा खऱ्या उच्चपणापर्यंत पोंचत नाहींत. खऱ्या वस्तुतत्वाचें त्यांना ज्ञान नसल्यामुळें, खात्रीलायक व शुद्ध सुख त्यांना कधींच चाखतां येत नाहीं. ढोरांप्रमाणें ते नेहमीं खालतीं बघत असतात आणि जेवणाच्या टेबलाभोंवतीं डोकें खुपसून, सारखे चरत राहून व लठ्ठ बनून, प्रजोत्पादन करीत राहतात. भोगांची लालसा तृप्त करण्याकरितां ते एकमेकांना आपल्या लोखंडी खुरांनीं व शिंगांनीं लाथा व टकरा मारीत असतात व तृप्त न होणाऱ्या विकाराच्या धुंदींत एकमेकांना ठारही मारून टाकतात. ह्याचें कारण असें कीं, स्वतःच्या स्वभावांतील कम अस्सल व कामासक्त असा भाग, असत्य वस्तूंनीं ते पोषीत असतात.

ग्लॅ०:—सॉक्रेटिस ! तुम्ही एखाद्या दैवी वाणीप्रमाणें, बहुजनसमाजाचें आयुष्य वर्णन केलें.

सॉक्रे०:—खऱ्या सुखाची केवळ ओबडधोबड रूपरेषा व छाया, अशा दुःखमिश्रित सुखांशीं हे लोक परिचय ठेवतात. हीं सुखें दुःखाच्या सान्निध्यामुळें व तुलनेमुळें फार मोठीं व आकर्षक वाटून, मूर्ख लोकांमध्यें ह्या सुखांबद्दल वेडसर विकार उत्पन्न होतो. स्टैसिकोरस म्हणतो त्याप्रमाणें, ट्राय येथें जसे अस्सल हेलेनच्या अज्ञानामुळें, हेलेनच्या केवळ आभासाकरितां योद्धे लढत राहले, तसे हे लोक ह्या सुखांच्या अभिलाषानें भांडत राहतात !

ग्लॅ०:—अशी स्थिति होणें स्वाभाविकच आहे.

सॉक्रे०:—आतां तेजस्वी तत्वाबद्दल आपण विचार करूं. विचार व शहाणपण ह्यांना सोडून देऊन, कीर्ति, विजय आणि राग, ह्यांच्या पूर्तीकरितां जेव्हां मनुष्य धडपडत असतो, तेव्हां महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन तो मत्सर करावयास लागतो, अथवा युद्धाच्या प्रेमामुळें दांडगाई करावयास लागतो अथवा असमाधानामुळें उत्पन्न होणाऱ्या रागाच्या आधीन होतो. अशावेळीं मघाशीं वर्णन केल्याप्रमाणेंच परिणाम होणार नाहींत काय ?

ग्लॅ०:—पूर्वीप्रमाणेंच परिणाम होतील.

सॉक्रे०:—तर मग, पुढील निष्कर्ष निघत नाहीं काय ? अर्थप्रेमी व महत्वाकांक्षी तत्वांना परिचित असलेल्या सर्व वासनांपैकीं ज्या वासना, शास्त्र व बुद्धि ह्यांचा नेतेपणा स्वीकारतात व ज्ञान जीं सुखें दाखवील त्यांच्याबद्दल प्रयत्न करून साध्य करून घेतात, त्या वासनांनाच सत्यप्रेमामुळें खरीं सुखें सांपडतील. इतकेंच नव्हे तर त्यांना अनुरूप अशीं सुखें मिळतील. कारण प्रत्येकाला जें उत्तम वाटतें तें त्यास अनुरूपही असतें.

ग्लॅ०:—होय. अत्यंत अनुरूप असतें, ह्यांत संशय नाहीं.

सॉक्रे०:—म्हणून सर्व आत्मा, जोंपर्यंत अभेदबुद्धीनें ज्ञानप्रेमी तत्वाचा नेतेपणा स्वीकारीत असतो, तोंपर्यंत प्रत्येक
Steph भागाला, आपलें योग्य कर्तव्य पूर्णपणें करतां येईल
587 अथवा न्यायीपणानें वागतां येईल. इतकेंच नव्हे तर उत्तम, अस्सल व योग्य सुखें त्याला अनुभवतां येतील.

ग्लॅ०:—अगदीं बरोबर.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, इतर दोन तत्वांपैकीं एका तत्वाचें जेव्हां प्रभुत्व होतें, तेव्हां त्या तत्वाचें अनुरूप सुख तर त्याला मिळत नाहींच; उलट इतर तत्वांना तें परकीय व खरें नव्हे असें सुख शोधण्यास लावतें.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—एखादी वस्तु तत्वज्ञान व बुद्धिवाद ह्यांपासून जितक्या प्रमाणांत दूर असते, तितक्या प्रमाणांत ती असे वाईट परिणाम घडवून आणण्यास समर्थ असत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. असा संभव पुष्कळच असतो.

सॉक्रे०:—कायदा व सुव्यवस्था, ह्यांपासून जी वस्तु अत्यंत दूर असते, ती बुद्धिवादापासूनही दूर असत नाहीं काय ?

ग्लॅ०:—हें उघडच आहे.

सॉक्रे०:—कायदा व सुव्यवस्था ह्यांच्यापासून विकारी अथवा जुलमी वासना अत्यंत दूर असतात, हें सिद्ध झालेलें नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. अत्यंत दूर असतात.

सॉक्रे०:—एकसत्तात्मक व नियमित वासना, ह्या कायदा व सुव्यवस्था ह्यांच्या अत्यंत जवळ असत नाहींत काय ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तर मग, जुलमी मनुष्य हा खऱ्या व अनुरूप सुखापासून अत्यंत दूर असतो व राजा ( एकसत्तात्मक ) अगदीं जवळ असतो.

ग्लॅ०:—हें विधान नाकारतां येणें शक्य नाहीं.

सॉक्रे०:—आणि म्हणून जुलमी मनुष्य फारच त्रासिकपणानें आयुष्य काढील व राजा (एकसत्तात्मक) फार आनंदानें दिवस घालवील.

ग्लॅ०:—हेंही नाकारतां येणें शक्य नाहीं.

सॉक्रे०:—जुलमी मनुष्याचें आयुष्य, (एकसत्तात्मक) राजाच्या आयुष्यापेक्षां किती दुःखकारक असतें, ह्याची तुम्हांला कल्पना आहे काय ?

ग्लॅ०:—नाहीं.

सॉक्रे०:—सुखें तीन प्रकारचीं आहेत. एक अस्सल व दोन खोटीं. शेवटच्या दोन सुखांच्या मर्यादेचें, जुलमी मनुष्यानें उल्लंघन केलेलें

असतें आणि कायदा व बुद्धिवाद ह्यांचा सहवास टाकून देऊन, गुलामगिरीच्या सुखांना आपला शरीरसंरक्षक बनवलेलें असतें. अशा मनुष्याच्या गौणत्वाचें प्रमाण सांगणें कठीण आहे, पण कदाचित् खालीलप्रमाणें तें सांगतां येईल.

ग्लॅ०:—कसें काय?

सॉक्रे०:—अल्पसत्ताक प्रवृत्तीच्या मनुष्यापासून खालीं मोजलें असतां, जुलमी मनुष्याचा नंबर तिसरा लागतो. कारण बहुसत्ताक मनुष्याचा नंबर मध्यें लागतो.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आपण पूर्वी केलेलीं विधानें खरीं धरलीं असतां, जुलमी मनुष्य जें सुख अनुभवीत असतो, तें सुख नक्कलेची नक्कल होय. कारण त्याची अस्सल प्रत अल्पसत्ताकवृत्तीच्या मनुष्याजवळ असते.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—उत्तमजनसत्ताकवृत्ती व एकसत्ताकवृत्ती एक समजून जर एकसत्तात्मक मनुष्यापासून मोजलें, तर अल्पसत्ताक मनुष्याचा तिसरा नंबर लागतो.

ग्लॅ०:—होय. हें खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून खऱ्या सुखापासून, जुलमी मनुष्य तीनाच्या तिप्पट दूर असतो.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—जुलमीपणाचें सुख, भूमितीच्या शास्त्रानुसार नवाच्या अंकानें दर्शविलें जाईल.

ग्लॅ०:—बरोबर असेंच.

सॉक्रे०:—आणि ह्या अंकाचा वर्ग व घन केला असतां, जुलमी मनुष्य किती लांब अंतरावर दूर केला जातो, हें स्पष्टच होतें.

ग्लॅ०:—होय, गणिती माणसाला हें स्पष्टच आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, जुलमी मनुष्यापासून खऱ्या सुखाच्या बाबतींत ( एकसत्तात्मक ) राजा किती दूर असतो, हें सांगावयाचें असलें तर गुणाकारानें सांगतां येईल कीं, ( एकसत्तात्मक ) राजा ७२९ पटीनें जुलमी मनुष्यापेक्षां सुखानें राहतो अथवा जुलमी मनुष्य ७२९ पटीनें ( एकसत्तात्मक ) राजापेक्षां दुःखी असतो.

ग्लॅ०:—न्यायी मनुष्य व अन्यायी मनुष्य, सुखदुःखाच्या बाबतींत
Steph किती दूर अंतरावर आहेत, हें तुम्ही गणितानें सिद्ध
588 करून मोठा अजब निष्कर्ष काढला !

सॉक्रे०:—दिवस, रात्री, महिने व वर्षें गणनेंत घेतलीं असतां, हा हा आंकडा बरोबर असून तो मानवी आयुष्याला लागू आहे, अशी माझी पक्की खात्री आहे.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—सज्जन व न्यायी मनुष्य, दुष्ट व अन्यायी मनुष्याला सुखाच्या बाबतींत जर इतका मागें टाकतो, तर सौंदर्य, सद्गुण व सुशोभित आयुष्य, ह्या बाबतींतही दुष्ट मनुष्याला तो पुष्कळ मागें टाकणार नाहीं काय ?

ग्लॅ०:—पुष्कळच मागें टाकील.

सॉक्रे०:—ठीक आहे. वादविवादाच्या ह्या मर्यादेपर्यंत आपण येऊन पोहोंचलों. आतां आपण वादाच्या आरंभाकडे वळूं या. न्यायीपणानें वागणारा अशी कीर्ति मात्र असून, खरोखर जो अन्यायीपणानें वागतो, त्याला अन्यायापासून फायदा होतो, असें विधान आपणांपुढें मांडण्यांत आलें होतें. बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—होय. असें विधान करण्यांत आलें होतें.

सॉक्रे०:—ज्याअर्थीं न्यायाच्या व अन्यायाच्या परिणामांविषयीं आपलें एकमत झालें आहे, त्याअर्थीं ज्या मनुष्यानें वरील प्रकारचें विधान केलें, त्याच्याबरोबर वाद करण्यास ही वेळ योग्य आहे.

ग्लॅ०:—आपण सुरवात कशी करावी ?

सॉक्रे०:—वक्त्याला त्याच्या विधानाचा अर्थ काय होतो, हें समजून देण्याकरितां आत्म्याची मूर्ति आपण कल्पनेनें घडविली पाहिजे.

ग्लॅ०:—कशा प्रकारें ?

सॉक्रे०:—पुराणांत वर्णन केलेल्या किमीरा, सिला, सरबिरस इत्यादि राक्षसांप्रमाणें, आपण एखाद्या प्राण्याची कल्पना केली पाहिजे. पुराणांत इतरही राक्षस वर्णिले आहेत. अशा राक्षसांमध्यें, निरनिराळ्या जाती एकत्र वाढून पुढें त्या एकरूप होतात.

ग्लॅ०:—आपण अशा गोष्टी ऐकतों खरें !

सॉक्रे०:—पहिल्याप्रथम असंख्य डोक्याचा नानारंगी राक्षस कल्पनेनें उभा करा. पाळींव व रानटी जनावरांच्या डोक्यांची रांग त्याच्याभोंवतीं असून, आळीपाळीनें ह्या प्राण्यांना तो स्वतः उत्पन्न करूं शकतो, अशी कल्पना करा.

ग्लॅ०:—हुषार कारागीरच ह्या कामाला पुरा पडेल ! पण मेणापेक्षां व मेणासारख्या इतर पदार्थांपेक्षां, कल्पना ही अधिक लवचिक असल्यामुळें, ही कल्पना आम्ही केली असें समजा.

सॉक्रे०:—नंतर सिंहाचा आकार व त्यानंतर मनुष्याचा आकार बनवा. परंतु ह्या तिन्हींमध्यें पहिलें रूप सर्वांत मोठें व दुसरें त्याच्या खालोखाल मोठें, असें करा.

ग्लॅ०:—हें करणें सोपें असल्यामुळें, तें केलें असें समजा.

सॉक्रे०:—ह्या तिघांना एकत्र वाढूं देण्याकरितां तिघांना एक करा.

ग्लॅ०:—असें मी केलें, असें समजा.

सॉक्रे०—शेवटीं ह्या सर्वांना, तिन्हींपैकीं एकाचें, म्हणजे मनुष्याचें रूप द्या. ह्यामुळें जो बाहेरचें कातडें तेवढें पहातो व आंतील कांहीं पहात नाहीं, त्याला असा भास होईल कीं, हें फक्त मनुष्यप्राण्याचेंच रूप आहे.

ग्लॅ०:—असें मी केलें, असें समजा.

सॉक्रे०:––जो मनुष्य असें म्हणतो कीं, अशा मनुष्यप्राण्याला दुर्गुणी असणें फायद्याचें असतें व न्यायानें वागणें
Steph हिताचें नसतें, त्या मनुष्याला आपण पुढील उत्तर देऊं
589 कीं, त्याचें म्हणणें जर खरें धरलें, तर ह्या विचित्र
राक्षसाला व सिंहाला नेहमीं सुग्रास खाद्य पुरवून बळकट करणें, व त्यांतील मनुष्याला मात्र उपाशी मारून व अशक्त करून, तो ह्यांपैकीं ( राक्षस व सिंह ) एकाच्या तरी पूर्ण ताब्यांत राहील, असें करणें फायद्याचें आहे. आणि ह्या तिघांची ( राक्षस, सिंह व मनुष्य ) कधींही एकजूट होऊं न देतां, उलट ते एकमेकांशीं भांडत राहतील व एकमेकांना चावा घेऊन खावून टाकतील, असें करणें सुद्धां फायद्याचेंच आहे.

ग्लॅ०:––जो मनुष्य अन्यायाची स्तुति करतो, त्याचें म्हणणें अशाच अर्थाचें होईल.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, न्यायाच्या फायद्याचा पुरस्कर्ता असें म्हणेल कीं, कृती व शब्द असेच पाहिजेत कीं, ज्यामुळें अंतस्थ मनुष्याला वरील मनुष्यप्राण्यावर पूर्ण अधिकार गाजवितां येईल व सिंहाची मदत घेऊन, ह्या पुष्कळ डोक्यांच्या प्राण्याला, त्याच्यांतील पाळींव भागांची जोपासना करून व रानटीपणा दाबांत ठेवून सुधारतां येईल, व अशाप्रकारें सर्व भागांचें व स्वतःचें ऐक्य साधतां येईल.

ग्लॅ०: – जो न्यायाची स्तुति करतो, त्याची विधानें अशाच प्रकारचीं असतात.

सॉक्रे०:—तर मग, न्यायाची स्तुति करणारा सर्व दृष्टीनें सत्यच बोलेल. कारण सुख, कीर्ति अथवा फायदा, ह्या बाबतींत सद्गुणी मनुष्याची स्तुति करणारा मनुष्य, खरें बोलणारा असून विरुद्ध बाजूनें बोलणाऱ्या मनुष्याची सर्व टीका पोकळ व अज्ञानीपणाची असते.

ग्लॅ०:—माझें मत अगदीं असेंच आहे.

सॉक्रे०:—विरुद्ध बाजूनें बोलणाऱ्याची चूक अज्ञानमूलक असल्यामुळें शांतपणानें त्याचें मन वळविण्याचा आपण प्रयत्न करूं. त्याला विचारूं, "महाराज! आपल्यांतील पाशवी स्वभावाला, दैवी भागाच्या अंमलाखालीं जें आणतें तें सत् व आपल्यांतील नम्र स्वभावाला रानटी भागाचा जें गुलाम करतें, तें असत् नव्हे काय?" ह्या प्रश्नाला तो होकारार्थी उत्तर देणार नाहीं काय?

ग्लॅ०:—माझा जर त्यानें उपदेश ऐकला तर तो होय म्हणेल.

सॉक्रे०:—ह्याच विचारसरणीनें, अन्यायानें सोनें घेणें कोणालाही फायदेशीर होईल काय? कारण ज्या क्षणाला मनुष्याला सोनें घेण्याची बुद्धि होते, त्याच क्षणाला त्याच्यामधील उत्तम भाग अत्यंत वाईट भागाचा गुलाम बनतो. रानटी व दुष्ट लोकांना आपला मुलगा अथवा मुलगी विकून, एखाद्या मनुष्याला कितीही मोठी संपत्ति मिळवितां आली, तरी ह्यामुळें खरा फायदा होतो काय? जो मनुष्य स्वतःमधील दैवी भागाला, निर्दयपणें आपल्या आसुरी व तिरस्करणीय भागाचा गुलाम बनवतो, तो दुर्दैवी नव्हे काय? एरिफिलीनें आपल्या नवऱ्याच्या जीवाची किंमत म्हणून हार घेतला; परंतु ह्यापेक्षांही अधिक हानिकारक लांच असा मनुष्य घेत नाहीं काय?

Steph 590

ग्लॅ०:—त्याच्या वतीनें उत्तर देऊन मी म्हणतों कीं, खरोखरच ही अधिक हानिकारक गोष्ट आहे.

सॉक्रे०:—अनियमितपणामुळें, वरील अजस्र, बहुरूपी व भयंकर प्राण्याला वाजवीपेक्षां अधिक स्वातंत्र्य मिळतें, म्हणून अनियमितपणा असंख्य वेळां निंद्य ठरला गेला आहे, असें तुम्हांला वाटत नाहीं काय?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—सिंह व सर्प ह्यांच्या स्वभावासारखीं तत्वें जेव्हां प्रमाणाबाहेर वाढविलीं व चढविलीं जातात, तेव्हां मनुष्याला हट्टी व असंतुष्ट म्हटलें जात नाहीं काय ?

ग्लॅ० — होय.

सॉक्रे०:—चैन व बायकीपणा, ह्या दुर्गुणांमुळें मनुष्य भित्रा होऊन नादान व सुस्त बनतो; म्हणून ह्या दुर्गुणांची निर्भत्सना केली जात नाहीं काय ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—जेव्हां मनुष्य ह्या ( सिंहासारख्या ) तेजस्वी प्राण्याला भयंकर राक्षसाचा गुलाम करून, त्या राक्षसाची पैशाची तहान भागविण्याकरितां, तेजस्वी प्राण्याचा पहिल्यापासून सारखा अपमान करतो व त्याला सिंहाचें माकड बनवितो, तेव्हां खुषमस्करी व गुलामगिरी अशीं निंदाप्रचुर संबोधनें वापरण्यांत येतात ना ?

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें खात्रीनेंच बरोबर आहे.

सॉक्रे०:—आडदांडपणा व ग्राम्यपणा, हे दुर्गुण अपकीर्तीकारक कां समजले जातात ? स्वतःमधील उदात्त तत्व अशक्त झाल्यामुळें, जेव्हां मनुष्य विकारांच्या स्वाधीन होऊन ह्या दुर्गुणांची खुषामत करावयास लागतो, तेव्हांच तो आडदांड व ग्राम्य अभिरुचि असलेला असें म्हटलें जातें ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—उत्तम मनुष्य ज्या अधिकारी शक्तीकडून नियमन केला जातो, त्या सारख्या शक्तीकडून वरील प्रकारचा मनुष्य नियमन केला जावा, म्हणून आपण असें म्हणूं कीं, ज्याच्यामध्यें दैवीतत्व श्रेष्ठ आहे अशा उत्तम मनष्याचा तो नोकर झाला पाहिजे. थ्रॅसिमॅकसच्या मतें, प्रजेच्या अनहिताकरतांच प्रजेवर अधिकार गाजविला जातो; पण आमचें मत निराळें आहे. आमचें असें म्हणणें आहे कीं, प्रत्येक

मनुष्याच्या हृदयांत असलेल्या सूक्ष्म व दैवीशक्तीनें त्याच्यावर अधिकार गाजवावा; पण हृदयांत जर अशी शक्ति नसेल, तर बाहेरच्या शक्तीनें तरी त्याच्यावर अधिकार गाजवावा. अशा योजनेनें आपण सर्व लोक समान दर्जानें वागविले जाऊन, शक्य तोंवर मित्रत्वाच्या नात्यानें राहण्यास समर्थ होऊं.

ग्लॅ०:—होय. हें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—सर्व प्रजाजनांचा मित्र असा जो कायदा, त्याचाही हाच हेतु असतो. मुलांच्या बाबतींत जी देखरेख आपणाकडून ठेवण्यांत येते, तीमध्यें सुद्धां हाच हेतु असतो. आपल्या आदर्श राज्य-
Steph 591 घटनेप्रमाणें, मुलांची मनोभूमिका तयार केल्याशिवाय व त्यांच्या स्वभावांतील उदात्त तत्व वाढीस लावून, त्या तत्वाला त्यांच्या हृदयांचा संरक्षक व राजा केल्याशिवाय, त्यांना आपणाकडून स्वातंत्र्य देण्यांत येत नाहीं. उदात्त तत्व संरक्षक बनल्यानंतरच, मुलांना त्यांच्या मताप्रमाणें वागण्याची आपण मोकळीक देतों.

ग्लॅ०:—होय. हें उघडच आहे.

सॉक्रे:०—तर मग ग्लॅकॉन्, कोणत्या तत्त्वावर व कोणत्या विचारसरणीनें आपणांला असें म्हणतां येईल कीं, मनुष्यानें अन्यायी अथवा अनियमीत बनून किंवा अपकीर्तीकारक कृत्य करून, दुर्गुणामध्यें खोल बुडून जाणें फायद्याचें आहे ? अशा वागण्यानें त्याला आपली श्रीमंती वाढवितां आली अथवा अधिक सत्ताही प्राप्त करून घेतां आली, तरी त्यापासून त्याचा फायदा आहे असें म्हणतां येईल काय ?

ग्लॅ०:—कोणत्याही मुद्यानें आपणांस असें प्रस्थापित करतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—अन्यायाचें कृत्य लपवून व शिक्षा चुकवून होणाऱ्या फायद्यांचें समर्थन, आपण कोणत्या मुद्यावर करूं शकूं ? जो नजर चुकवून

पळून जातो तो अधिक दुर्गुणी होतो, असें म्हणणें बरोबर नाहीं काय ? उलट, त्याला जर पकडण्यांत येऊन शिक्षा करण्यांत आली, तर त्याच्यामधील पाशवी भाग शांत होऊन नियमन केला जातो व सभ्य भाग मुक्त होऊन सर्व आत्मा उदात्त प्रवृत्तींत वाढविला जातो. अशा-प्रकारें ज्या प्रमाणांत आत्मा शरीरापेक्षां अधिक मौल्यवान् असतो, त्याप्रमाणांत नेमस्तपणा, न्याय व ज्ञान ह्यांच्या संपादनानें, शक्ति, सौंदर्य व आरोग्य ह्यांनीं संपन्न असलेल्या शरीरापेक्षांही, अधिक मौल्यवान् स्थिति आत्म्याला प्राप्त होते.

ग्लॅ०:—होय. तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०:—म्हणून मी असा निष्कर्ष काढतों कीं, बुद्धिमान् मनुष्य आपल्या सर्व शक्ती ह्या ध्येयाप्रीत्यर्थ उपयोगांत आणील. ज्या अभ्यासामुळें स्वभाव उदात्त बनविला जाईल, त्या अभ्यासांचा तो आदर करील व इतर अभ्यासांचा तिरस्कार करील.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—शारीरिक आरोग्य व व्यायाम ह्यासंबंधीं तो पुढील प्रकारें काळजी घेईल. पाशवी व अविवेकी सुखांत तो निमग्न तर राहणार नाहींच, पण आरोग्याचीही तो विशेष पर्वा करणार नाहीं. शक्ति, आरोग्य, सौंदर्य इत्यादि गोष्टी जर त्याला नेमस्त करण्यास समर्थ नसतील, तर त्यांचें संपादन करणें तो विशेष महत्त्वाचें समजणार नाहीं. कारण, शरीराची एक-तानता राखीत असतांना, आत्म्याची सुस्वरता रक्षण केली जावी, एवढाच त्याचा हेतु असेल.

ग्लॅ०:—संगीताचा ( संस्कृतीचा ) जर तो अस्सल पुरस्कर्ता असेल, तर असाच वागेल.

सॉक्रे०:—द्रव्यार्जन करीत असतांना सुद्धां, एक प्रकारची पद्धत व सुस्वरता तो राखील. जनसमूहानें अभिनंदनाचा जरी वर्षाव केला,

तरी हुरळून जाणार नाहीं व अगणित संपत्ति संपादन करण्याची धडपड करून स्वतःला दुःखांत ओढवून घेणार नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—आपल्या अंतःकरणाला नेहमीं स्मरून वागून, अनुकूल अथवा प्रतिकूल आर्थिक परिस्थितींत सुद्धां, तो आपल्या मनाचा गोंधळ होऊं देणार नाहीं. उलट, आदर्श तत्वांनुसार आपल्या धनाचा व्यय अथवा संचय करण्याचा तो यथाशक्ति प्रयत्न करील.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—आणि ज्या सन्मानानें तो अधिक चांगला मनुष्य होईल असें त्याला वाटेल, त्या सन्मानाचा स्वीकार करण्यांत
Steph तो आनंद मानील; पण ज्या खासगी व सार्वजनिक
592 सन्मानाच्या समारंभांनीं त्याच्या मनाची सुस्थिति बिघडेल, असे समारंभ तो टाळील.

ग्लॅ०:—अशा प्रकारें वागण्याचें जर त्याचें मुख्य ध्येय असलें, तर राजकारणांत पडणें त्याला पसंत पडणार नाहीं.

सॉक्रे०:—तुमचें मत चुकीचें आहे. जन्मभूमीच्या राजकारणांत तो कदाचित् पडणार नाहीं; पण आपल्या आदर्श शहराच्या राजकारणांत तो खात्रीनें भाग घेईल. कदाचित् दैवी चमत्कार जन्मभूमीच्या राजकारणांतही त्याला लक्ष घालावयास लावील!

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें मी समजलों. तुमच्या मतें, ज्या शहराची घटना आपण पूर्ण केली व जें केवळ कल्पना क्षेत्रांतच आहे, अशा शहराच्या राजकारणांत तो भाग घेईल. कारण पृथ्वीवर कोठेंही असें शहर सांपडेल, असें मला वाटत नाहीं.

सॉक्रे०:—ज्या मनुष्याला असें शहर पहावयाची इच्छा असेल व त्याप्रमाणें सुसंघटित आत्मोन्नति करावीशी वाटत असेल, त्याला अशा

शहराचा आदर्श स्वर्गांत सांपडेल ! सध्यां अथवा भविष्यकाळीं, असें शहर पृथ्वीवर अस्तित्वांत असूं शकेल किंवा नाहीं, हा प्रश्न मुळींच महत्वाचा नाहीं. कारण कांहींही झालें तरी, इतर शहरांमध्यें प्रचलित असलेले आचार बाजूला सारून, आदर्श शहराचेच आचार तो अंमलांत आणील.

ग्लॅ०:—अशाच तऱ्हेनें तो वागेल असें मला वाटतें.

# प्लेटोची
# आदर्श राज्यघटना

## पुस्तक दहावें

सॉक्रे०:—आपल्या राज्यघटनेसंबंधीं ज्या योजना आपण केल्या त्या निःसंशय योग्य होत्या, असा माझा विश्वास निर-
Steph निराळ्या तऱ्हेनें विचार करून शाबित झाला. पण
595 काव्यासंबंधीं केलेल्या नियमांवरून तर तो विशेषच दृढ झाला.

ग्लॅ०:—त्या नियमांचें स्वरूप काय?

सॉक्रे०:—अनुकरणात्मक जी काव्याची शाखा आहे, तिला कोणत्याही सबबीवर शहरांत शिरकाव करूं देतां कामा नये—अशा स्वरूपाच्या नियमांना अनुलक्षून मी बोलत आहें. आत्म्याच्या विशिष्ट भागांची आपण व्याख्या केल्यानंतर, आतां अशा प्रकारचें काव्य मना केलें पाहिजे, ह्याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं.

ग्लॅ०:—तुमच्या विधानाचें स्पष्टीकरण कराल काय?

सॉक्रे०:—शोकपर्यवसायी नाटकें व अनुकरणात्मक काव्यें लिहिणारे लेखक ह्यांच्या जवळ तुम्ही माझी निर्भत्सना करणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. म्हणून मी तुम्हांला असें सांगतों कीं, अनुकरणात्मक सर्व काव्य, ज्यांना त्याच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान नाहीं, अशा लोकांच्या बुद्धीला विघातक आहे.

ग्लॅ०:—तुमच्या म्हणण्याचा भाव काय?

सॉक्रे०:—मला लहानपणापासून होमर कवीबद्दल प्रेममूलक आदर वाटत असल्यामुळें, स्पष्टपणें बोलण्यास जरी धीर होत नसला, तरी-सुद्धां माझें मत मला तुमच्यापुढें मांडलें पाहिजे. मी होमर कवीला सुंदर, शोकरसप्रधान काव्यें लिहिणाऱ्यांचा जनक व नेता समजतों; परंतु सत्याची हानि करून, कोणत्याही मनुष्याला मान देणें अन्यायाचें असल्यामुळें, मला जें कांहीं सांगावयाचें आहे, तें मी सांगतोंच !

ग्लॅ०:—बेलाशक सांगा.

सॉक्रे०:—तर मग, माझें म्हणणें ऐका अथवा माझ्या प्रश्नांना उत्तर द्या.

ग्लॅ०:—तुमचे प्रश्न विचारा.

सॉक्रे०:—अनुकरणाचें सामान्यतः स्वरूप काय असतें, हें तुम्ही मला सांगू शकाल काय ? कारण मला स्वतःलाच, त्याचें खरें स्वरूप काय आहे, तें माहीत नाहीं.

ग्लॅ०:—म्हणून मला तें माहीत असावें, असें तुम्ही समजतां !

सॉक्रे०:—तुम्हाला माहीत असणें, कांहीं अशक्य नाहीं. कारण
Steph असें पुष्कळ वेळां दिसून येतें कीं, अदूरदृष्टीच्या लोकांना
596 तीक्ष्ण दृष्टींच्या लोकांपेक्षां वस्तु लवकर दिसतात.

ग्लॅ०:—खरें आहे. पण तुमच्या समोर जर मी हा शोध लावला, तर तो प्रगट करण्याचें मला धैर्य होणार नाहीं. म्हणून तुम्हीच हा शोध लावा.

सॉक्रे०:—ठीक आहे. असें करतांना आपली नेहमीची पद्धत सुरू करावी काय ? मला वाटतें, आपण प्रत्येक उदाहरणांत एक विशिष्ट तत्व अथवा कल्पना अस्तित्वांत असते असें समजतों, व ह्या कल्पनेंत ज्यांना एकच नांव देण्यांत येतें अशा सर्व वस्तु समाविष्ट असतात. तुम्हांला समजलें ना ?

ग्लॅ०:—होय. मला समजलें.

सॉक्रे०:--तर मग, ह्या असंख्य वस्तूंपैकीं एक कोणती तरी विचारांत घेऊं या. उदाहरणार्थ, पलंग व मेज ( Table ) पुष्कळ असतात, हें तुम्हांला मान्य आहे.

ग्लॅ०:—अर्थात्.

सॉक्रे०:—परंतु ह्या वस्तूंसंबंधीं कल्पना किंवा मूलतत्वें दोनच आहेत. एक पलंगाची कल्पना व दुसरी मेजाची.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ह्या वस्तु तयार करणारा कारागीर, पलंग अथवा मेज अथवा इतर वस्तु घडवीत असतांना, वस्तूंची कल्पना डोळ्यासमोर ठेवूनच, काम करीत असतो ना? कारण कोणत्याही कारागीरास, प्रत्यक्ष कल्पना तयार करणें अशक्यच असतें.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—परंतु पुढील कारागीराचें तुम्ही कसें वर्णन कराल?

ग्लॅ०:—कोणत्या कारागीरासंबंधीं तुम्ही म्हणतां?

सॉक्रे०:—कारागीरांच्या कार्यक्षेत्रांत ज्या वस्तूंचा समावेश होतो, त्या सर्व वस्तु जो तयार करतो त्याला अनुलक्षून मी म्हणतों.

ग्लॅ०:—असा मनुष्य विलक्षणच हुशार असला पाहिजे!

सॉक्रे०:—जरा विचार करा, म्हणजे तुमचें हें विधान सयुक्तिक आहे, अशी तुमची खात्री होईल. हा कारागीर मनुष्यनिर्मित सर्व वस्तु तयार करतोच, पण जमिनीवर जें कांहीं उगवतें, तेंही तो निर्माण करतो. सर्व सजीव वस्तूंना व स्वतःलाही तो उत्पन्न करतो. शिवाय आकाश, पृथ्वी, देव, आकाशांतील नक्षत्रें व पाताळांतील सर्व प्राणीही, त्याच्याच कारागिरीनें उत्पन्न होतात.

ग्लॅ०:—किती असामान्य कुशल मनुष्याचें तुम्ही वर्णन करीत आहांत!

सॉक्रे०:—तुम्ही श्रद्धाहीन दिसतां ! तुमच्या मतें, अशा कारागीराचें अस्तित्व अशक्यच आहे काय ? अथवा तुमचा असा समज आहे काय कीं, इतक्या विविध वस्तूंचा कारागीर, एका अर्थी असूं शकेल व दुसऱ्या अर्थी नसेलही ? तुम्हांला स्वतःलाही अशा विविध वस्तु एका तऱ्हेनें निर्माण करतां येतील, असें वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:—कोणत्या तऱ्हेनें ?

सॉक्रे०:—ती तऱ्हा कठीण तर नाहींच, पण अत्यंत जलद व विविध प्रकारांनीं करतां येण्यासारखी आहे. सर्वांत अत्यंत जलद तऱ्हा म्हटली म्हणजे, एक आरसा घ्यावयाचा व सर्व बाजूनें तो फिरवावयाचा. अशा तऱ्हेनें, तुम्हांला सूर्य, आकाशांतील नक्षत्रें, पृथ्वी, तुम्ही स्वतः व इतर सजीव निर्जीव प्राणी, वनस्पति आणि आतांच निर्दिष्ट केलेल्या सर्व वस्तु तयार करतां येतील.

ग्लॅ०:—होय. ह्या वस्तूंचे देखावे बघतां येतील, पण अस्तित्वांत असलेल्या वस्तु मात्र करतां येणार नाहींत !

सॉक्रे०:—बरोबर आहे. तुमचें निरीक्षण मुद्याला धरून आहे. माझ्या मतें, चित्रकारही अशाच कारागीरांच्या वर्गांत मोडतो. होय ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—आणि त्याच्या सर्व कलाकृती असत्य असतात, असें तुम्ही म्हणाल अशी माझी कल्पना आहे. तथापि, चित्रकार एका अर्थानें पलंग निर्माण करीत नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. चित्रकार दिखाऊ पलंग तयार करूं शकतो.

सॉक्रे०:—तर मग, पलंगाच्या कारागीराबद्दल काय म्हणाल ?
Steph थोड्याच वेळांपूर्वीं तुम्ही असें म्हटलें कीं, त्याला जरी
597 पलंगाची वस्तुतत्व दर्शविणारी अशी कल्पना तयार करतां येत नसली, तरी तो एक विशिष्ट (भौतिक) पलंग तयार करतो.

ग्लॅ०:—होय. मी असें म्हटलें.

सॉक्रे०:—ज्याअर्थी जें खरोखर अस्तित्वांत असतें, तें त्याला तयार करतां येत नाहीं, त्याअर्थी आपण असें म्हटलें पाहिजे कीं, तो खरी वस्तु निर्माण करीत नसून, खऱ्या वस्तूसारखी कांहींतरी पण खरी नव्हे, अशी वस्तु तयार करतो. पलंग करणारा अथवा दुसरा एखादा कारागीर जें काम करतो, तें पूर्ण खरें असतें, असें जर कोणी वर्णन केलें, तर तें खरें म्हणतां येईल काय ?

ग्लॅ०:—तत्वज्ञानी लोकांच्या मतानें, तें खरें असणार नाहीं.

सॉक्रे०:—वस्तुतत्वाशीं तुलना करतांना, पलंगासारख्या भरीव वस्तूही छायेप्रमाणें असतात, ह्यांत आपणांस आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

ग्लॅ:—खरें आहे.

सॉक्रे०:—नक्कल करणाऱ्या मनुष्याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा करतांना, ह्याच उदाहरणांचा आपण उपयोग करावा ना ?

ग्लॅ०:—तुम्हाला पसंत असेल तर करावा.

सॉक्रे०:—ठीक आहे. तर मग, तीन प्रकारचे पलंग आपण ठरविले. पहिल्या प्रकारचा पलंग स्वभावसिद्ध असून तो ईश्वरनिर्मित असतो. कारण अशा पलंगाचा, ईश्वराशिवाय दुसरा कोणी कारागीर असूं शकेल काय ?

ग्लॅ०:—नाहीं.

सॉक्रे०:—पलंगाचा दुसरा प्रकार, सुताराकडून केला जातो.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—तिसरा प्रकार, चित्रकाराकडून केला जातो ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ह्याप्रमाणें तीन प्रकारचे पलंग आपण सिद्ध करून, त्यांचे चित्रकार, सुतार, व ईश्वर असे तीन कारागीर ठरविले.

ग्लॅ०:—होय. आपण तीन कारागीर ठरविले.

सॉक्रे०:—ईश्वरानें स्वेच्छेनें म्हणा अगर सक्तीनें म्हणा, एकच पलंग विश्वांत निर्माण केला व तो म्हणजे पलंगाची निरुपाधिक कल्पना होय. पण ह्याप्रकारचे दोन अथवा दोहोंपेक्षां अधिक पलंग, ईश्वरानें कधींही निर्माण केले नाहींत व तो करणारही नाहीं.

ग्लॅ०:—असें कां ?

सॉक्रे०:—कारण ईश्वरानें दोन पलंग निर्माण केले तर तिसरा एक पलंग मानावा लागेल. कारण ह्या पलंगाच्या कल्पनेच्याच आधारावर पहिले दोन पलंग निर्माण होतील. आणि हा तिसरा पलंगच आदर्शभूत होईल, पहिले दोन होणार नाहींत.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें बरोबर आहे.

सॉक्रे०—हें ध्यानांत आणून व खऱ्या पलंगाचा खरा कर्ता होण्याची इच्छा धरून, ईश्वरानें एकच आदर्श पलंग निर्माण केला. कारण एका अनिश्चित पलंगाचा, एक अनिश्चित कर्ता होणें, त्याला पसंत पडलें नाहीं.

ग्लॅ०:—होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—ह्या आदर्श पलंगाचा कर्ता म्हणून, ईश्वराला संबोधणें तुम्हांला मान्य आहे ना ?

ग्लॅ०:—होय. आणि हे न्याय्यच आहे. कारण स्वतःच्याच कृतीनें त्यानें हा आदर्श, निरुपाधिक पलंग व इतर वस्तु निर्माण केल्या आहेत.

सॉक्रे०:—सुतारासंबंधीं आपण काय म्हणूं ? पलंगाचा कारागीर, असें आपण त्याला संबोधिलें पाहिजे ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे:—चित्रकारास, वस्तूचा कारागीर व कर्ता म्हणतां येईल काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, पलंगासंबंधीं त्याची काय करामत असते ?

ग्लॅ०:—ईश्वर व सुतार हे ज्या वस्तूचे कारागीर आहेत, त्या वस्तूची नक्कल करणारास, चित्रकार असें संबोधतां येईल.

सॉक्रे०:—वस्तूच्या कल्पनेपासून दुप्पट दूर असणाऱ्या वस्तूचा जो कर्ता असतो, त्यालाच तुम्ही नक्कल करणारा म्हणून म्हणतां ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—शोकपर्यवसायी नाटक लिहणारा कवि, हा नक्कल करणारा असल्यामुळें, त्याच्याविषयींही आपणास असेंच म्हणतां येईल. इतर नकल्यांप्रमाणें, तोही सर्वाधीश व सत्य ह्यांच्यापासून तिसऱ्या नंबरावर असतो.

ग्लॅ०:—होय. असें दिसतें.

सॉक्रे०:—नक्कल करणाऱ्या कलावंताचें स्वरूप, आपण एकमतानें
Steph ठरविलें. पण मला चित्रकारासंबंधीं, एका प्रश्नाचें उत्तर
598 द्या. चित्रकार हा निर्मित असलेल्या मूळ वस्तूची नक्कल करतो, कीं कारागीराच्या कृतींची नक्कल करतो ?

ग्लॅ०:—कारागीराच्या कृतींची.

सॉक्रे०:—ह्या कृती जशा खऱ्या स्वरूपांत असतात तशांची, कीं त्या निव्वळ दिसतात तशांची ?

ग्लॅ०:—तुमचा प्रश्न अधिक स्पष्ट कराल काय ?

सॉक्रे०:—माझा प्रश्न असा. जेव्हां पलंगाकडे तुम्ही आडव्या बाजूनें अथवा कोणत्याही बाजूनें बघतां, तेव्हां पलंगाचें एकत्व बदलतें काय ? अथवा जेव्हां पलंग बदलला आहे असें दिसतें, तेव्हां तो एकच असतो काय ? आणि असेंच दुसऱ्या वस्तूंबद्दलही म्हणतां येतें ना ?

ग्लॅ०:—दुसऱ्या प्रकारचें वर्णन खरें आहे. पलंग निराळा आहे असें वाटतें, पण वस्तुतः तो बदललेला नसतो.

सॉक्रे०:—पुढील मुद्याचा तुम्ही विचार करावा, असें मला वाटतें. चित्रकला खऱ्या वस्तूंचा खरा स्वभाव नक्कल करण्याचा अभ्यास करते

कीं वस्तूंच्या बाह्य स्वरूपाची नक्कल करण्याचा अभ्यास करते? दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, आभासाची नक्कल करते अथवा सत्याची नक्कल करते ?

ग्लॅ०:—आभासाची नक्कल करते.

सॉक्रे०:—म्हणून नक्कल करण्याची कला, माझ्या मतें, सत्यापासून पूर्णपणें विलग असते. ही कला बाह्यत: विशेष परिणाम करूं शकते. कारण, ती वस्तूच्या लहान व क्षुद्र अशा भागाची नक्कल करते. उदाहरणार्थ, चांभार, सुतार अथवा इतर कारागीर, ह्यांच्या धंद्यांविषयीं चित्रकाराला कांहीं ज्ञान नसतांही, तो आपणांस ह्या कारागीरांचें चित्र काढून देतो. एखादा उत्तम चित्रकार, सुताराचें चित्र काढून व तें लांब अंतरावरून दाखवून, मुलांना व वेडगळ लोकांना, तो खरोखरच सुतार आहे, असें भासवून खात्रीनेंच फसवूं शकतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०—माझ्या मित्रा ! ह्या सर्व बाबतींत, आपणांस काय वाटलें पाहिजे तें मी तुम्हांला सांगतों. आपल्याजवळ येऊन असें कोणी सांगू लागला, "सर्व कलांचें ज्याला ज्ञान आहे, इतकेंच नव्हे तर कोणापेक्षांही अधिक सूक्ष्मपणानें ज्यानें प्रत्येक कलेमध्यें ज्ञान मिळविलें आहे असा मनुष्य, मला आढळला आहे;" तर त्याला आपण एका गारुड्या नकल्याच्या तावडींत सांपडलेला वेडगळ म्हणूं. कारण शास्त्र, अज्ञान व नक्कल, ह्यांतील भेद त्याला कळत नसल्यामुळें, तो वरील प्रकारच्या गारुड्याला चुकीनें सर्वज्ञ समजतो.

ग्लॅ०: – हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—आतां आपण शोकपर्यवसायी नाटक लिहिणारे नाटककार व त्यांचा पुढारी होमर, ह्यांच्याबद्दल विचार करूं. आपणांस कांहीं लोकांकडून असें सांगण्यांत येतें कीं, नाट्यलेखन करणाऱ्या कवींना सर्व कलांचे ज्ञान असतें; एवढेंच नव्हे तर, सद्गुण व दुर्गुण ह्यांच्याशीं

संबंध असलेल्या सर्व मानवी व दैवी गोष्टीही त्यांना
Steph माहीत असतात. ह्या लोकांचें म्हणणें असें कीं, कोण-
599 त्याही विषयावर लिहिण्यापूर्वी, चांगल्या कवीला त्या
विषयाचें ज्ञान असल्याशिवाय, कांहींच लिहितां येणार नाहीं. म्हणून अशा लोकांची भूल झाली आहे किंवा काय, ह्याचा आपण विचार केला पाहिजे. अशा लोकांची गांठ नकल्यांशीं पडून त्यांच्याकडून ते इतके फसविले गेले असावेत कीं, कवींच्या नाट्यकृती पहात असतांना, त्या सत्यापासून दुप्पट दूर असतात व केवळ आभासात्मक असल्यामुळें, सत्याचें ज्ञान नसतांही करून दाखवितां येण्यासारख्या असतात, हें त्यांना कळलें नसावें; अथवा कदाचित् ह्या लोकांचें म्हणणें बरोबर असून, सामान्य जनसमूहाला वाटतें त्याप्रमाणें, खरोखरच कवींना वर्ण्य विषयांचें ज्ञान असेलही.

ग्लॅ०:—वरील प्रश्नांचा आपण विचार केला पाहिजे.

सॉक्रे०:—एखाद्या मनुष्याला अस्सल व नक्कल दोन्हीही करतां येण्यासारखीं असतां, नक्कल करण्याच्या कामामध्येंच सर्व लक्ष घालून, आपण मोठें उदात्त कार्य करतों आहोंत असें समजून, आपल्या आयुष्याचें ध्येय नक्कल करणें हेंच होय, असें तो ठरवील काय ?

ग्लॅ०:—मला असें वाटत नाहीं.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, ज्या वस्तूंची तो नक्कल करतो, त्या वस्तूंच्या सत्यस्वरूपाचें त्याला ज्ञान झालें असलें, तर मला वाटतें, नक्कल करण्याऐवजीं आपला सर्व उद्योग खऱ्या कृत्यांकडे वळवून, मृत्यूनंतर उदात्त कृत्यें हींच आपलीं जिवंत स्मारकें राहतील, असा प्रयत्न करून, स्वतः स्तुतिपाठक होण्याऐवजीं, स्वतः स्तुतीचा विषय बनण्याचीच तो महत्वाकांक्षा बाळगील.

ग्लॅ०:—माझेंही मत तुमच्यासारखेंच आहे. कारण अशी महत्वाकांक्षा बाळगण्यांतच, त्याला अधिक कीर्ति व फायदा मिळवितां येईल.

सॉक्रे०:—होमरला अथवा इतर कवींना, सामान्य विषयांसंबंधीं आपणांस पुढील प्रश्न विचारण्याची गरज नाहीं. जर प्राचीन अथवा अर्वाचीन कवी, वैद्यकीय कलेमध्यें निव्वळ वैद्यकीय भाषेची नक्कल करणारे नसून खरोखर निष्णात असे होते, तर एक्सलिपिअस प्रमाणें त्यांनीं गुणकारी औषधें कां शोधून काढलीं नाहींत अथवा एक्सलीपीअसनें जसे आपले शिष्य तयार केले, तसे कवींनीं आपल्या ज्ञानानें, आयुर्वेद-विद्यासंपन्न असे शिष्य कां तयार केले नाहींत ? असे वैद्यकीसंबंधीं प्रश्न आपण होमरला अथवा इतर कवींना विचारणार नाहीं. तसेंच इतर कलां-विषयींही आपण त्यांना असे प्रश्न विचारणार नाहीं. परंतु युद्ध, सैन्याची हालचाल, शहरांची व्यवस्था, शिक्षण इत्यादि मोठमोठे सुंदर विषय, जेव्हां होमर आपल्या काव्यांमध्यें वर्णन करतो, तेव्हां पुढील प्रश्न विचारणें न्याय्यच आहे. “ प्रिय होमर, आमच्या व्याख्येप्रमाणें तुम्ही आभासाचे कर्ते नसून, सत्यापासून दुप्पट दूर असण्याऐवजीं जर एक पायरीच दूर आहांत; तसेंच खासगी व सार्वजनिक आयुष्यामध्यें, कोणत्या व्यवसायांमुळें मनुष्यें चांगलीं अथवा वाईट होऊं शकतात, हें जर तुम्ही सांगूं शकतां, तर लिसर्गस ज्याप्रमाणें लॅसिडिमॉन शहराच्या घटनेचा कर्ता आहे अथवा इतर शहरांच्या घटनांचे ज्याप्रमाणें इतर कर्ते आहेत, त्याप्रमाणें तुम्ही कोणत्या शहराच्या घटनेचे कर्ते आहांत ? चांगले कायदे तुम्ही करून दिलेत, म्हणून कोणतें राज्य तुम्हांला दुवा देतें ? ज्याप्रमाणें इटली व सिसिली चारोन्डासला आपला घटना-कार समजतात व आम्हीं सोलोनला समजतों, त्याप्रमाणें कोणतें राज्य तुम्हांला असा मान देतें ? ” असा प्रश्न विचारला असतां, तो कोणत्या राज्याचें नांव सांगूं शकेल ?

ग्लॅकॉन म्हणाला, “कोणत्याच नाहीं. जे कवी त्याला आपला पूर्वज
Steph म्हणून समजतात, त्यांच्याकडूनही आपणाला अशी
600 माहिती मिळत नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. होमरच्या काळांतील एखादें युद्ध, होमरच्या सेनाधिपत्यामुळें अथवा सल्यामुळें चांगल्या तऱ्हेनें शेवटास गेलें, असें तरी कधीं घडलेलें आहे काय?

ग्लॅ०:—नाहीं. असें कधींच घडलेलें नाहीं.

सॉक्रे०:—मिलेशियन थेल्स व सिथिअन ॲनाचार्सिस, ह्यांनीं ज्याप्रमाणें उपयुक्त कला व व्यावहारिक गोष्टी, ह्यासंबंधीं असंख्य शोध लावले, त्याप्रमाणें होमर कवीनें कधीं केलेलें आहे काय?

ग्लॅ०:—नाहीं. अशापैकीं त्यानें कांहीं एक केलेलें नाहीं.

सॉक्रे०:—होमर कवि सार्वजनिक आयुष्यांत जरी पडला नाहीं, तरी खाजगी तऱ्हेनें शिक्षण देऊन, ज्यांना त्याच्या संगतींत आनंद वाटत असे, असे शिष्य त्यानें कधीं तयार केले काय? अथवा त्याच्या शिष्यांनीं, होमर पद्धतीचें आयुष्य, म्हणून लोकांना उदाहरण घालून दिलें काय? पायथॅगोरसविषयीं असें म्हणण्यांत येतें कीं, मित्र म्हणून तो लोकांना विशेष आवडत असे व त्याचे शिष्य आपण पायथॅगोरिअन पद्धतीनें आयुष्य घालवितों, असें अजूनहि अभिमानानें सांगत असतात.

ग्लॅ०:—सॉक्रेटिस, अशा तऱ्हेनें होमरविषयीं कांहीं सांगण्यांत येत नाहीं. उलट होमरविषयीं ज्या गोष्टी सांगण्यांत येतात, त्या खऱ्या असल्या तर क्रिओफिलस नांवाच्या एका मित्राला, त्यानें जें शिक्षण दिलें तें क्रिओफिलसच्या नांवापेक्षांही हास्यास्पद आहे! कारण आपणांस असें सांगण्यांत येतें कीं, क्रिओफिलसनें जोंपर्यंत होमर जिवंत होता, तोंपर्यंत त्याची उपेक्षाच केली.

सॉक्रे०:—होय. अशी गोष्ट सांगण्यांत येते. पण ग्लॅकॉन्, निव्वळ नक्कल करण्यापेक्षां जर होमरला वस्तूंचें अधिक ज्ञान असतें व लोकांना शिक्षण देऊन जर त्यांना तो सद्गुणी करूं शकत असता, तर तुम्हांला

असें वाटतें काय कीं, आपल्या भोंवतीं असंख्य स्नेही जमवून, त्यांच्याकडून प्रेम व आदर तो संपादन करूं शकला नसता ? अबडेराचा प्रोटॅगोरस, सिऑसचा प्रॉडिकस व इतर लोक, त्यांच्या वेळच्या लोकांना नुसतें एवढें म्हणत, “ जोंपर्यंत आम्हांला तुम्ही शिक्षणमंत्री करीत नाहीं, तोंपर्यंत तुमचें शहर अथवा घर व्यवस्थित-पणानें राखलें जाणार नाहीं; ” व त्याचा लगेच लोकांवर इतका परिणाम होत असे कीं, ते त्यांना अत्यंत प्रेमानन्दानें आपल्या खांद्यावर उचलून नेत असत! अशी त्यावेळेस स्थिति असतांना, होमर व हिजिअड हे कवी, जर खरोखर लोकांना सद्गुणी करण्यास समर्थ असते, तर त्यांना आपलीं काव्यें गाऊन दाखवीत भटकत राहण्यास, त्या वेळच्या लोकांनीं भाग पाडलें असतें काय ? उलट, देशबांधवांकडून त्यांना हृदयाशीं सोन्यापेक्षांही अधिक जवळ धरण्यांत येऊन, स्वदेशां-तच राहण्यास भाग पाडण्यांत आलें नसतें काय ? अथवा जरी त्यांनीं स्वदेशांत राहण्याचें नाकारलें असतें, तरी सुद्धां ते जिकडे गेले असते तिकडे त्यांचे शिष्य, पूर्ण शिक्षण संपादन करीपर्यंत, त्यांच्याबरोबर राहले नसते काय ?

ग्लॅ०:—सॉक्रेटिस, तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—तर मग, होमरादि सर्व काव्यलेखक, सत्याचें ज्ञान करून न घेतां, सद्गुण व इतर विषयासंबंधीं लिहितांना, त्यांच्या

Steph 601 पोकळ छायांचीच नक्कल करतात, असा आपण निष्कर्ष काढला पाहिजे ना ? आपण आतांच म्हणत होतों, त्याप्रमाणें, जोडे शिवण्याच्या कलेसंबंधी चित्रकार जरी पूर्ण अनभिज्ञ असला, तरी सुद्धां चांभाराचें तो असें चित्र काढूं शकेल कीं, जें रंग व आकार ह्यांवरूनच परीक्षा करणाऱ्या व कलेविषयीं त्याच्यासारख्याच अनभिज्ञ असणाऱ्या लोकांना, चांभाराचेंच चित्र आहे असें वाटेल.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—त्याचप्रमाणें मला वाटतें, आपणांस असें म्हणतां येईल कीं क्रियापदें, नामें, इत्यादि प्रकारच्या रंगांनीं, चित्रकाराप्रमाणें कवीसुद्धां कित्येक धंद्यांचें केवळ नक्कल करण्यापुरतेंच ज्ञान असूनही, चित्र काढूं शकतो व त्यामुळें जेव्हां चर्मकर्म, सेनापत्य अथवा इतर कोणत्याही विषयासंबंधीं वृत्तांत, लयांत व स्वरसंगतींत कवि वर्णन करतो, तेव्हां त्याचें लिखाण, त्याच्यासारखेच जे अज्ञानी व भाषेच्या विलासावरून परीक्षा करणारे असतात, त्यांच्या मतें उत्तम काव्य म्हणून ठरलें जातें. कारण लय आणि स्वरसंगति ह्यांच्यामध्यें स्वाभाविकच मोहनी असते. संगीताचा आकर्षकपणा काढून टाकून, कवींचें लेखन निव्वळ गद्य स्वरूपांत वाचलें असतां, त्यांची कामगिरी किती क्षुल्लक स्वरूपाची ठरते, हें तुम्हाला माहीत आहेच.

ग्लॅ०:—होय. मला माहीत आहे.

सॉक्रे०:—कांहीं लोकांचे चेहरे, सौंदर्याऐवजीं केवळ यौवनामुळें टवटवीत असतात. पण यौवनसुलभ टवटवी निघून गेल्यावर, ते सुकून जातात. असाच प्रकार काव्याचा होत नाहीं काय ?

ग्लॅ०:—अगदीं असाच.

सॉक्रे०:—आतां पुढील मुद्याचा तुम्ही विचार करा. आपल्या मताप्रमाणें, मूर्तीचा कर्ता हा नक्कल करणारा असून, त्याला फक्त बाह्यस्वरूपच कळतें; पण वस्तुतत्व कळत नाहीं. असेंच ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ह्याविषयीं समाधानकारक चर्चा आपण केली पाहिजे. अर्धवट चर्चा करून उपयोगी नाहीं.

ग्लॅ०:—ठीक आहे.

सॉक्रे०:—लगाम व लगामाची वादी ह्यांचें चित्र, एकादा चित्रकार काढूं शकत नाहीं काय ?

ग्लॅ०:—शकतो.

सॉक्रे०:—परंतु लगाम व त्याची वादी, ह्यांची घडणावळ कशी करावी, हें चित्रकाराला कळतें काय ? जिनगर व लोहार ह्यांनाही ह्या विषयाचें ज्ञान नसून, तें फक्त घोड्यावर जो स्वार होऊन ह्या गोष्टी वापरतो, त्यालाच असतें ना ?

ग्लॅ०: – खरी वस्तुस्थिति अशीच असते.

सॉक्रे०:—सर्व वस्तूंबद्दलही आपणांस असेंच म्हणतां येईल ना ?

ग्लॅ०:—तुम्ही काय म्हणतां ?

सॉक्रे०:—प्रत्येक वस्तूमध्यें, तीन कला समाविष्ट असतात. पहिल्या कलेचें क्षेत्र, वस्तूचा उपयोग करणें. दुसऱ्या कलेचें क्षेत्र, ती वस्तु निर्माण करणें व तिसऱ्या कलेचें क्षेत्र, त्या वस्तूची नक्कल करणें.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—सजीव व निर्जीव वस्तूंतील, तसेंच प्रत्येक मानवी कृत्यांतील, सौंदर्य व सत्य, हीं वस्तूंच्या निर्मितींतील हेतूंवरूनच ठरवावयाचीं असतात ना ?

ग्लॅ०:—होय. खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून वस्तूचा उपयोग करणाऱ्या मनुष्यानें, त्या वस्तूची माहिती चांगल्या प्रकारें करून घेतली पाहिजे आणि तिचा उपयोग करतांना त्याला ज्या अडचणी अथवा सोयी वाटल्या, त्यांची कल्पना ती वस्तु निर्माण करणाऱ्या माणसाला करून दिली पाहिजे. उदाहरणार्थ, मुरली वाजविणारा मनुष्य, कलेच्या व्यासंगाकरितां ज्या मुरली वापरतो, त्यांची माहिती मुरली तयार करणाऱ्या करागीराला सांगतो व कारागीर त्यानें केलेल्या सूचनांप्रमाणें मुरली तयार करतो.

ग्लॅ०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—चांगली मुरली कोणती व वाईट कोणती, ह्याचें एकाला

ज्ञान असतें व त्यानें दिलेल्या माहितीवरून दुसरा मुरली तयार करून देतो. असेंच ना ?

ग्लॅ०:—होय. असेंच.

सॉक्रे०:—वाद्यांचें ज्याला पूर्ण ज्ञान आहे, अशा मनुष्याशीं वाद्य करणाऱ्यानें सहवास ठेवला असल्यामुळें व त्याच्या
Steph 602 सूचनेप्रमाणें तो काम करीत असल्यामुळें, वाद्यांच्या सौंदर्याविषयीं अथवा वाईटपणाविषयीं, त्याला योग्य समज असतो. परंतु वाद्यांचा जो उपयोग करतो, त्याला ह्या वाद्यांविषयीं शास्त्रीय ज्ञान असतें.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—परंतु जो नक्कल करणारा असतो, त्याला ह्यांपैकीं कोणत्या प्रकारचें ज्ञान असतें ? ज्या वस्तूंचें तो वर्णन करतो, त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करून, स्वतःच्या कृती सुंदर व योग्य आहेत किंवा नाहींत, ह्याविषयीं शास्त्रीय ज्ञान त्याला असेल काय ? अथवा ज्या मनुष्याला वस्तूंचें खरें ज्ञान आहे, त्याच्याशीं सहवास ठेवण्यास त्याला भाग पाडलें असतां व त्यानें केलेल्या सूचनांप्रमाणें काम करावयास लावलें असतां, त्याला योग्य समज करून घेतां येईल काय ?

ग्लॅ०:—वस्तूंविषयीं शास्त्रीय ज्ञान अथवा योग्य समज, त्याला मुळींच असणार नाहीं.

सॉक्रे०:—म्हणजे असें सिद्ध होतें कीं, नक्कल करणाऱ्या मनुष्याला, ज्या गोष्टींची तो नक्कल करतो, त्यांच्या सौंदर्याविषयीं अथवा वाईटपणाविषयीं शास्त्रीय ज्ञान अथवा योग्य समज नसतो.

ग्लॅ०:—असें दिसून येतें.

सॉक्रे०:—वर्ण्यविषयासंबंधीं, कवि विलक्षण बुद्धिमत्ता दाखवील ना ?

ग्लॅ०:—छे ! असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—पण वस्तूंमधील चांगलेपणा अथवा वाईटपणा कशावर अवलंबून असतो, ह्याविषयीं अज्ञ असूनही कवि नक्कलच करीत राहील, आणि अडाणी लोकांमध्यें, सौंदर्यविषयक ज्या कल्पना प्रचलित असतात, त्यांचें अनुकरण करीत बसेल.

ग्लॅ०:—दुसरें काय करणार ?

सॉक्रे०:—म्हणून आपण असें ठरविलें कीं, नक्कल करणारा मनुष्य ज्या गोष्टींची नक्कल करीत असतो, त्यांविषयीं अत्यंत अनभिज्ञ असतो; आणि म्हणून अनुकरण कला, ही केवळ करमणूक होय. आयाम्बिक किंवा एपिक पद्धतीनें, शोकपर्यवसायी काव्य लिहिणारे कवी सर्वांत श्रेष्ठ नक्कल करणारे होत.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे:—अनुकरण कला, सत्यापासून दुप्पट दूर नाहीं काय ?

ग्लॅ०:–होय.

सॉक्रे०:—अनुकरण कला, मनुष्याच्या कोणत्या भागावर आपले प्रयोग चालवितें ?

ग्लॅ०:—तुमच्या मतें कोणता भाग ?

सॉक्रे०:—मी सांगतों. एकाच आकाराच्या वस्तु, आपल्या डोळ्यांपासून ज्या प्रमाणांत दूर असतात, त्या प्रमाणांत भिन्न दिसतात.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ज्या वस्तु पाण्यामध्यें पाहिल्या असतांना वांकलेल्या दिसतात, त्याच बाहेर काढल्या म्हणजे सरळ दिसतात. त्याचप्रमाणें वर्णविभ्रमसुलभ दृष्टीला, त्याच वस्तु अंतर्गोल अथवा बहिर्वक्र दिसतात. अशाच प्रकारचा गोंधळ, आपल्या आत्म्यामध्यें वसत असतो, ह्यांत संशय नाहीं. अशा प्रकारच्या आपल्या स्वाभाविक दुर्बलतेमुळेंच, चित्रकला, जादुगारी व अशाच प्रकारच्या इतर कला, आपल्यावर चेटूक करूं शकतात.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—कल्पनांची जादुगारी नाहींशी करण्याकरितांच, मापन करणें, गणित करणें, वजन करणें, अशा बौद्धिक पद्धती उदयास आल्या नाहींत काय ? लांबी, संख्या व वजन ह्यांच्या अस्पष्ट कल्पना घालवून टाकून, त्यांच्या ठिकाणीं वजन, माप व गणित ज्यामुळें योग्य प्रकारें करतां येईल, अशा बौद्धिक पद्धतीची स्थापना झाली नाहीं काय ?

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—आत्म्यामधील विवेचक तत्वाचेंच हें कार्य नव्हे काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—परंतु वस्तूंचें वारंवार मापन करून, जेव्हां हें तत्व आपणांस असें कळवितें कीं, एक वस्तु दुसरीपेक्षां मोठी अथवा लहान अथवा सारखी आहे, तेव्हां त्याच वस्तूंच्या त्याच क्षणीं दिसून येणाऱ्या बाह्य स्वरूपांमुळें, ह्या तत्त्वाशीं विरोधही केला जातो.

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—एकाच वस्तूविषयीं एकाच वेळेस, आत्म्याच्या एकाच भागानें, विरुद्ध मतें बाळगणें अशक्य आहे, असें आपण म्हटलेलें नाहीं काय ?

ग्लॅ०:—होय. आणि आपलें म्हणणें योग्य होतें.

Steph 603 सॉक्रे०:—तर मग, आत्म्याच्या ज्या भागाचें मत मापनाच्या विरुद्ध असतें, तो भाग मापनाप्रमाणें ज्याचें मत आहे, अशा भागाशीं एकरूप असणार नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—परंतु मापन व गणित ह्यांच्यावर जो भाग भिस्त ठेवतो, तो आत्म्याचा उत्तम भाग होय.

ग्लॅ०:—निःसंशय.

सॉक्रे०:—म्हणून ह्या भागाशीं ज्या भागाचा विरोध आहे, तो आत्म्याच्या कनिष्ठ भागांपैकीं एक भाग होय.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—चित्रकलेसंबंधीं अथवा सामान्यतः सर्व अनुकरणात्मक कलेसंबंधीं विवेचन करीत असतांना, हाच मुद्दा मी निश्चित करण्याचा प्रयत्न करीत होतों. सत्यापासून दूर असणाऱ्या कामांतच, अनुकरण कला गढून गेलेली असते व ती ज्ञानापासून दूर असलेल्या तत्वाशीं सख्य करून व त्याची दासी म्हणून राहून, कोणताही चांगला हेतु साधत नाहीं.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—अनुकरण कला म्हणजे क्षुद्र मित्राची क्षुद्र दासी व क्षुद्र कृतीची जननी होय.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—दृष्टीशीं संबंध असलेल्या कलेसंबंधींच फक्त असें म्हणतां येतें काय? श्रवणेंद्रियाशीं संबंध असलेल्या कलेसंबंधीं म्हणजे काव्या-विषयींही, असें म्हणतां येणार नाहीं काय?

ग्लॅ०:—बहुतकरून आपणांस असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—चित्रकलेच्या संभाव्य पुराव्यावरच आपणांस विसंबून राहतां कामा नये. काव्याची कला ज्या बुद्धीच्या भागाशीं निगडित असते, त्याविषयीं आपण शोध करून, तो कुचकामाचा अथवा चांगला आहे, हें ठरवून घेण्याच्या मार्गास लागलें पाहिजे.

ग्लॅ०:—अर्थात्च.

सॉक्रे०:—आपण पुढीलप्रमाणें विवेचन करूं या. स्वेच्छेनें अथवा सक्तीनें केलेल्या कृतींच्या परिणामांवरून, जे स्वतःला सुस्थितींत अथवा दुःस्थितींत आहोंत असें समजतात आणि अशा परिस्थितींत ज्यांना आनंदाची व दुःखाची जाणीव असते, अशा मनुष्यांचेंच अनुकरण-कला अनुकरण करीत असते. ह्या विवेचनांत आणखी कांहीं तुम्हांला भर घालावयाची आहे काय?

ग्लॅ०:—नाहीं. कांहीं नाहीं.

सॉक्रे०:—आतां अशा विविध परिस्थितींत असणाऱ्या मनुष्याच्या मनाची ऐक्यावस्था असते काय ? अथवा ज्याप्रमाणें आपण दृष्टी-संबधानें बोलत असतांना म्हटलें कीं, एकाच वेळेला, एकाच विषया-संबंधीं, मनुष्याची परस्परविरोधी मतें बनतात, त्याचप्रमाणें अशा परिस्थितींत असलेल्या मनुष्याची, आत्मविरोधी व विसंगत अशी स्थिति होते ना ? मला वाटतें, ह्या विषयावर आतां पुनः एकमत करण्याचें कारण नाहीं. कारण आपल्या पूर्वीच्या वादविवादावरून आपण असें ठरविलें आहे कीं, एकाच वेळेस अनुभवास येणाऱ्या विरोधी भावना आपल्या आत्म्यांत अनंत भरलेल्या असतात.

ग्लॅ०:—आणि जें आपण ठरविलें, तें बरोबर होतें.

सॉक्रे०:—होय. बरोबर होतें. पण त्यावेळेस जी गोष्ट आपण गाळली होती, ती आतां विचारांत घेतली पाहिजे.

ग्लॅ०:—ती कोणती ?

सॉक्रे०:—त्यावेळेस आपण म्हटलें कीं, सज्जन मनुष्य स्वतःचा मुलगा अथवा अशीच अत्यंत प्रिय वस्तु गमावली असतां होणारें दुःख, इतरांपेक्षां अधिक धैर्यानें सहन करील.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

Steph 604 सॉक्रे०:—पण त्याला मुळीं दुःखच होणार नाहीं काय ? अथवा दुःख होणें अपरिहार्य समजून, दुःख झालें असतां तो शांतपणा स्वीकारील ?

ग्लॅ०:—तो शांतपणा स्वीकारील, हेंच अधिक खरें होय.

सॉक्रे०:—समान दर्जाच्या लोकांची दृष्टि त्याच्याकडे लागली असतां, तो आपल्या दुःखाबरोबर झुंज खेळून विशेष प्रतिकार करील कीं एकट्याशींच विचार करीत बसला असतां करील ?

ग्लॅ०:—इतरांचें त्याच्याकडे लक्ष लागलें असतां, अधिक जोरानें तो दु:खाशीं टक्कर देईल, असें मला वाटतें.

सॉक्रे०:—पण जेव्हां तो एकटा असेल, तेव्हां ज्या गोष्टी इतरांनीं बघितल्या असतां अथवा ऐकल्या असतां त्याला लाज वाटेल, अशा पुष्कळ गोष्टी तो करील अथवा बोलेल.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—त्याला स्वत:च्या दु:खाचा प्रतिकार करण्यास जें भाग पाडतें, तें बुद्धि व कायदा ह्यांचें तत्वच ना ? आणि दु:खाच्या भावनेनेंच त्याला शोक करण्यास प्रोत्साहन मिळतें ना ?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०—एकाच वस्तूबद्दल, एकाच वेळेस, जेव्हां मनुष्याला विरुद्ध भावना वाटावयास लागतात, तेव्हां त्याच्यामध्यें दोन स्वतंत्र तत्वें आहेत, असें आपल्या प्रतिपादनावरून सिद्ध होतें.

ग्लॅ०:—अर्थात्‌च.

सॉक्रे०:—त्यांपैकीं एक तत्व, कायद्याच्या आज्ञा पाळण्यास तयार असतें ना ?

ग्लॅ०:—कायद्याच्या कोणत्या आज्ञा ?

सॉक्रे०:—कायदा असें सांगतो कीं, दुर्दैवाच्या प्रसंगीं, मनुष्यानें शक्यतों शांत राहिलें पाहिजे, आणि असमाधानाच्या सर्व भावना दाबल्या पाहिजेत. कारण दुर्दैवाच्या प्रसंगांतून चांगलें अथवा वाईट काय घडून येणार आहे, ह्याची आपणांला कल्पना करतां येत नसते व उतावळेपणापासून तर कांहींच फायदा होणारा नसतो. मर्त्य आयुष्यांतील कोणताही प्रसंग विशेष काळजी करण्याइतका महत्वाचा नसतो. परंतु दु:ख मात्र संकटाच्या प्रसंगीं जें तावडतोब वर्तन आपण करावयास पाहिजे असतें, त्याच्या आड येत असतें.

ग्लॅ०:—कोणत्या वर्तनासंबंधीं तुम्ही म्हणतां ?

सॉक्रे०:—ज्याप्रमाणें एखादा खेळाडू, त्याला जें दान पडलें असेल तदनुसार सोंगट्यांच्या जागा फिरवितो, त्याप्रमाणें जी गोष्ट घडून आली आहे तिच्यासंबंधीं विचार करणें आपलें कर्तव्य असून, बुद्धि जो मार्ग सुचवील त्या मार्गानें संकटाला तोंड देण्याची आपण व्यवस्था केली पाहिजे. मुलांना जमिनीवर पडून दुखापत झाली असतां, जखम झालेल्या भागाला तीं नुसतें घट्ट धरून बसतात व ओरडत सुटतात. त्याप्रमाणें आपण वर्तन न करतां, आपल्या आत्म्याच्या ज्या भागाला व्याधि झाली आहे, तो भाग बरा करण्याकरितां धांवून जाण्याची, आत्म्याला संवय लावली पाहिजे व औषधाच्या साहाय्यानें दुःख थांबविलें पाहिजे.

ग्लॅ०: – दुःखप्रसंगीं हेंच वर्तन उत्तम होय.

सॉक्रे०:—आपल्या आत्म्याचा चांगला भाग बुद्धिवादाचें नेतृत्व स्वीकारण्यास तयार असतो.

ग्लॅ०:—उघडच आहे.

सॉक्रे०:—ह्याच्या उलट, जो भाग आपणांस दुःखाची आठवण देऊन शोक करावयास लावतो व ज्याला विलाप करीत बसण्यांत नेहमीं अतृप्त अशी गोडी वाटते, तो अविवेकी, आळशी व भित्रा आहे, असें आपणांस म्हणतां येईल ना ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच असें म्हणतां येईल.

सॉक्रे०:—अशी स्थिति असल्यामुळें, चिडखोर स्वभाव, नक्कल करण्यास विविध व असंख्य सामुग्री पुरवितो. परंतु सूज्ञ
Steph व शांत स्वभाव, एकरूप व अविकारी असल्यामुळें,
605 नक्कल करण्यास कठीण जातो. नाटकगृहामध्यें सर्व प्रकारच्या लोकांच्या जमावाला, अशा स्वभावाची नक्कल

करून दाखविली असतां, ती समजावयास कठीण जाते. कारण अशी मन:स्थिति लोकसमूहाला अपरिचित असते.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—म्हणून हें स्पष्टच आहे कीं, नक्कल करणाऱ्या कवीला, शांत स्वभावाच्या आत्म्याशीं कांहीं एक कर्तव्य नसतें आणि जगामध्यें जर त्याला प्रसिद्धि मिळवावयाची असेल, तर अशा आत्म्याचें रंजन करण्यांत, तो आपली बुद्धिमत्ता खर्च करणार नाहीं. चिडखोर व विकारी स्वभावांची सहजपणें नक्कल होण्यासारखी असल्यामुळें, अशा स्वभावाशींच त्याचें कार्य असतें.

ग्लॅ०:—हें स्पष्टच आहे.

सॉक्रे०:—तर मग, चित्रकाराच्या जोडीलाच त्याला बसविणें बरोबर होईल. कारण सत्याची कसोटी लावली असतां, ज्या क्षुद्र वस्तु होत, अशाच वस्तु निर्माण करण्यांत व आत्म्याच्या स्वसदृश कनिष्ठ भागाशीं सहवास ठेवण्यांत, चित्रकाराप्रमाणेंच त्याचें वर्तन असतें; म्हणून आपण सुसंघटित राज्यांत कवीला प्रवेश मिळूं देतां कामा नये. कारण आत्म्याच्या क्षुद्र भागाला तो उद्दीपित करून व खाद्य पुरवून सशक्त करतो आणि विवेचक भागाचा नाश करतो. ज्याप्रमाणें एखादा मनुष्य दुर्व्यसनी प्रजाजनांना बलवान् करून व त्यांच्या हातांत शक्ति देऊन, सुशिक्षित वर्गाचा नाश करतो, त्याचप्रमाणें नक्कल करणारा कवि, प्रत्येक व्यक्तीमध्यें वाईट स्वभावाचें बिजारोपण करतो. कारण मोठें व लहान ह्यांतील भेद समजत नसल्यामुळें, एकाच वस्तूला, एकदां मोठी व एकदां लहान असें जो भाग समजतो, त्या अविवेकी भागाचें कवि पोषण करीत असतो. अशा प्रकारें सत्यापासून अत्यंत दूर असलेल्या आभासांचा, कवि जनक असतो.

ग्लॅ०:—बरोबर आहे.

सॉक्रे०:—पुष्कळ सज्जन माणसांचेंही नुकसान करण्याची काव्यांत शक्ति आहे, असा काव्यावरील सर्वांत मोठा आरोप, आपण अजून पुढें आणला नाहीं.

ग्लॅ०:—हा निःसंशयच मोठा आरोप होय. परंतु तो आपणांस सिद्ध करतां आला पाहिजे.

सॉक्रे०:—म्हणून पुढील प्रतिपादन ऐका. एखादा शोकग्रस्त नायक, आपलें दुःख प्रदीर्घ भाषणानें व्यक्त करीत आहे, अथवा कांहीं पात्रें, आपल्या छातीवर हात मारून शोक करीत आहेत, अशीं होमर अथवा इतर कवी ह्यांच्या काव्यांतील वर्णनें, आपल्यापैकीं चांगले लोक वाचीत असतांना आनंद पावतात व भावनावश होऊन शोकमग्न पात्रांशीं समरस होतात; आणि अशा मनःस्थितींत आणून सोडणाऱ्या कवींची मनःपूर्वक स्तुति करीत सुटतात, हें तुम्हांला माहीतच आहे.

ग्लॅ०:—खात्रीनेंच माहीत आहे.

सॉक्रे०:—परंतु स्वतःवर जेव्हां दुःखाचा प्रसंग येतो, तेव्हां विरुद्ध आचरण करण्यांतच आपण अभिमान बाळगतों. कारण शांतपणानें दुःख सोसणें, हें पौरुषत्वाचें लक्षण असून, ज्या वर्तनाच्या वर्णनाची आपण स्तुति केली, तें वर्तन बायकीपणाचें आहे, असें आपण समजतों. हें तुम्हाला माहीत आहे ना ?

ग्लॅ०:—होय. माहीत आहे.

सॉक्रे०:—जें वर्तन स्वतः करणें आपण निंद्य व लाजिरवाणें समजतों, तें वर्तन दुसरा एखादा करीत असतांना, त्याविषयीं तिरस्कार वाटण्याऐवजीं आनंद वाटणें व त्याची स्तुति करणें योग्य आहे काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच योग्य नाहीं.

सॉक्रे०:—निराळ्या दृष्टीनें तुम्ही विचार केलात, तर योग्य आहे असें वाटेल.

ग्लॅ०:—कोणत्या दृष्टीनें ?

सॉक्रे०:—आपल्या स्वतःवर जेव्हां दुःखाचे प्रसंग येतात, तेव्हां मुक्तकंठानें शोक व विलाप करून, दुःख हलकें करण्याची तीव्र इच्छा असलेल्या भागाला, आपण दाबांत ठेवीत असतो. पण असा भागच तृप्ति होईपर्यंत कवींकडून पोसला जातो व तोच कवींच्या वर्णनशक्तीच्या विलासांत

Steph 606

आनंद घेत असतो. अशा वेळेस बुद्धि व सदाचार, ह्यांच्या अपुऱ्या शिक्षणामुळें, विशेष सुसंस्कृत नसलेला असा आपल्या आत्म्यामधील अत्यंत उदात्त भाग, स्वतः इतरांचीं दुःखें पहाण्यांत गुंतलेला असल्यामुळें व अकालीं दुःख करणाऱ्या बाह्यतः सज्जन मनुष्याची स्तुति अथवा कींव करण्यांत कमीपणा ससजत नसल्यामुळें, वरील कनवाळू भागावरील पहारा ढिला सोडतो. दयेच्या भावनेपासून मिळणारें सुख, हा फायदाच होय असें त्याचें मत असल्यामुळें, सर्व काव्यच निंद्य ठरवून, हें सुख गमवावेसें त्याला वाटत नाहीं. कारण इतर लोकांचें आचरण आपल्यावर नक्की परिणाम करणारें असतें व अनुकंपेची भावना, लोकांच्या दुःखावर प्रथम पोसली जाऊन दृढ झाल्यावर, पुढें स्वतःवर जेव्हां दुःखाचे प्रसंग येतात, तेव्हां ती दाबांत ठेवण्यास फार कठीण जाते, असा विचार फारच थोड्या लोकां न करतां येतो.

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—हेंच प्रतिपादन विनोदी वाङ्मयास लागू पडत नाहीं काय ? स्वतः जो विनोद करण्यास तुम्हांला लाज वाटते, तो नाटकांच्या प्रवेशांत अथवा खाजगी आयुष्यांत ऐकला असतां, तुम्हाला आनंद वाटतो व तो अनीतिकारक आहे असें तुम्ही समजत नाहीं. आपण विदूषक म्हणून समजलें जावें, असें तुम्हांला वाटत नसल्यामुळें, हास्य उत्पन्न करणाऱ्या तत्वाला, तुम्ही बुद्धीच्या लगामानें नेहमीं दाबून धरतां; पण वरील प्रसंगीं, तो लगाम ढिला सोडून ह्या तत्वाला मोकळें

सोडतां. अशा तऱ्हेनें, ह्या तत्वाला तुम्ही दुजोरा दिल्यामुळें, विनोदी काव्य लिहिणाऱ्या कवीचाच स्वभाव, अजाणतेपणानें स्वतःच्या वर्तनांत स्वीकारीत असतां.

ग्लॅ०: --खरें आहे.

सॉक्रे०:—आपल्या सर्व कृत्यांत, प्रेम, क्रोध, लोभ, दुःख, सुख इत्यादि मनोविकार व भावना ज्या दिसून येतात, त्यांच्यावर कवींच्या काव्यामुळें परिणाम घडून येत नाहीं काय? कारण काव्यानें अशा भावनांना पाणी घातल्यामुळें, अनावृष्टीमुळें त्या मरून जाण्याऐवजीं चांगल्या पोसल्या जातात. आपलें आयुष्य अधिक सुखी व सद्गुणी होण्यास, अशा भावना दाबांत ठेवणें आवश्यक असतें; पण काव्य उलट त्यांनाच सत्ता गाजविण्यास शिकवितें.

ग्लॅ०:—मला हें नाकबूल करतां येणार नाहीं.

सॉक्रे०:--ग्लॅकॉन्! जेव्हां होमरकवीचे स्तुतिपाठक तुम्हांला भेटून असें सांगतात–" ग्रीस देशाला होमरनें सुशिक्षित केलें असल्यामुळें, मानवी कारभारांच्या सुव्यवस्थेचा उपदेशक म्हणून त्याचीं काव्यें अभ्यासिलीं पाहिजेत व मनुष्यानें आपलें स्वतःचें आयुष्य त्याच्या उपदेशानुसार नियमित केलें पाहिजे"– तेव्हां अशा सद्धेतुप्रेरित लोकांचा, तुम्ही प्रेमानें सत्कार करून, होमर हा शोककाव्यामध्यें अग्रगण्य कवि होय, असें कबूल केलें पाहिजे. पण तुम्ही हें विसरतां कामा नये कीं, ईश्वर-विषयक स्तोत्रें व सदाचारविषयक कविता, ह्यांशिवाय राज्यामध्यें इतर काव्यांचा शिरकाव करूं द्यावयाचा नाहीं. कारण वीणाकाव्याच्या अथवा महाकाव्याच्या, अत्यंत मधुर अशा काव्यदेवतेला, तुम्ही राज्या-मध्यें प्रवेश करूं दिलात म्हणजे कायदा व बुद्धिवाद ह्यांची सर्वसंमत तत्वें अधिष्ठित होण्याऐवजीं, सुख व दुःख ह्यांचेंच अधिष्ठान होईल.

Steph 607

ग्लॅ०:—हें अगदीं खरें आहे.

सॉक्रे०:—ज्याअर्थी आपण काव्याच्या विषयाकडे वळलों आहोंत, त्याअर्थी ज्या कलेची प्रवृत्ति आपण वर्णन केल्याप्रमाणें असते, त्या कलेला आपण राज्यांतून हद्दपार ज्या तत्वावर करतों, त्या तत्वाचें बौद्धिक समर्थन जें आपण केलें तें पुरेसें आहे. परंतु आपण फार कडक टीका केली, असा काव्यदेवतेनें आपणावर आरोप करूं नये, म्हणून आपण तिला असें म्हणूं कीं, तत्वज्ञान व काव्य ह्यांच्यामधील भांडण पुरातन काळापासून आहे. 'आपल्या धन्यावर भुंकणारा भांडखोर कुत्रा,' 'मूर्ख लोकांप्रमाणें घमेंडखोर भाषणांत जोरदार,' 'देवतुल्य निरुपद्रवी लोकांचा तांडा,' 'तीक्ष्ण बुद्धीचे दरिद्री तत्वज्ञानी,' अशा प्रकारच्या हजारों ओळी, तत्वज्ञान व काव्य ह्यांचें पुरातन भांडण दर्शविणाऱ्या आहेत. पण असें असलें तरी, आपण एवढें कबूल करूं कीं, मनोरंजन हें ध्येय असणारें काव्य व अनुकरण कला, हीं जर सुव्यवस्थित राज्यामध्यें त्यांचें अस्तित्व असण्याकरितां, कांहीं सबळ कारणें दाखवितील, तर आपण आनंदानें त्यांना परत बोलावूं. मनोरंजक काव्याची आपणांवर मोहिनी पडते, हें आपण जाणून आहोंत; पण सत्याचा विश्वासघात करणें पाप होय. माझ्या मित्रा, काव्याची—विशेषत: होमरच्या काव्याची—तुमच्यावर मोहिनी पडते, हें माझें म्हणणें बरोबर नाहीं काय?

ग्लॅ०:—होय. माझ्यावर काव्याचा परिणाम फार होतो.

सॉक्रे०:—म्हणून वीणागीताच्या पद्धतीनें अथवा इतर प्रकारानें, काव्य-देवतेनें स्वत:चें समर्थन केल्याशिवाय, तिला दिलेली हद्दपारीची शिक्षा कायम ठेवणें बरोबर आहे ना?

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—स्वत: कवि नसले तरी जे काव्याचे शोकी व आश्रयदाते आहेत, अशा लोकांनाही काव्याची बाजू गद्यामध्यें आपण मांडावयास सांगूं. त्यांनीं असें दाखविलें पाहिजे कीं, काव्य हें मनोरंजनात्मक तर

संपत्ति अथवा अधिकार अथवा काव्य ह्यांच्या मोहानें न्यायादि सद्गुणांकडे मनुष्यानें दुर्लक्ष करणें हिताचें नाहीं.

ग्लॅ०:—माझेंही मत असेंच आहे व मला वाटतें इतर कोणीही असेंच म्हणेल.

सॉक्रे०:—अजून आपण सदाचरणापासून मिळणारे मुख्य फायदे व सर्वांत मोठीं बक्षिसें, ह्यासंबंधीं चर्चा केली नाहीं.

ग्लॅ०:—आतांपर्यंत वर्णन केलेल्यांपेक्षां, जर तीं अधिक मोठीं असलीं, तर त्यांचें महत्वही विशेष असणार.

सॉक्रे०:—परंतु थोड्या कालावधींत, महत्वाची कोणतीही गोष्ट साध्य होईल काय? बाल्यावस्था व वृद्धावस्था ह्यांमधील काळ, अनंतकालाच्या दृष्टीनें थोडाच होय, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—कांहींच नाहीं म्हणणें अधिक बरोबर होईल.

सॉक्रे:०—तर मग अमर्त्य वस्तूनें, ह्या क्षुल्लक कालाविषयीं काळजी करावी व अनंतत्वाकडे दुर्लक्ष करावें, असें तुम्हांला वाटतें काय?

ग्लॅ०:—अमर्त्य वस्तूनें अनंतत्वासंबंधीं विचार केलाच पाहिजे, असें मला वाटतें. पण तुमच्या म्हणण्याचा रोख काय आहे?

सॉक्रे०:—आपला आत्मा अमर्त्य असून, तो कधींही नाश पावत नाहीं, हें तुम्ही शिकलां नाहीं काय?

माझ्याकडे आश्चर्यानें पाहून ग्लॅकान् म्हणाला, "नाहीं, खरोखर मी शिकलों नाहीं. पण ह्या सिद्धांताचें तुम्ही समर्थन करूं शकाल काय?"

सॉक्रे०:—मी प्रामाणिक मनुष्य असल्यामुळें, मला करतां येईलच पण तुम्हाला सुद्धां करतां येईल. तें फार सोपें आहे.

ग्लॅ० – मला कठीणच वाटतें. पण तुमच्या म्हणण्याप्रमाणें जर तें इतकें सोपें आहे तर तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

सॉक्रे०:—मग लक्षपूर्वक ऐका.

ग्लॅ०:—ठीक आहे. मी ऐकतों आहे.

सॉक्रे०:—एका गोष्टीला चांगली व दुसरीला वाईट, असें तुम्ही म्हणतां ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—ह्या दोन संज्ञांच्या अर्थाविषयीं, एकच मत आपण धरतों ना?

ग्लॅ०:—कोणतें मत तुम्ही धरतां?

सॉक्रे०:—माझ्या मतें 'वाईट' म्हणजे 'जें नाश करतें व बिघडवितें' आणि 'चांगलें' म्हणजे 'जें रक्षण करतें व फायदा करून देतें,' असा अर्थ समजला जातो.

ग्लॅ०:—माझेंही मत असेंच आहे.

सॉक्रे०—प्रत्येक वस्तूंत वाईटपणा व चांगलेपणा असतो ना? उदाहरणार्थ, डोळयांना खुपऱ्या येणें, सर्व शरीराला
Steph व्याधि होणें, धान्याला कीड लागणें, लांकडाला बुरशी
609 चढणें, तांब्याला व लोखंडाला गंज येणें अथवा दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, प्रत्येक वस्तूंत स्वाभाविक वाईटपणा असतो ना?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आणि एखाद्या वस्तूला अशांपैकीं व्याधि जडली, म्हणजे ती वस्तु खराब होऊन शेवटीं पूर्णपणें नाश पावत नाहीं काय?

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून प्रत्येक वस्तु, तिच्या स्वाभाविक वाईटपणाशिवाय किंवा दुर्गुणाशिवाय, इतर कोणत्याही कारणानें नाश पावत नाहीं. कारण जें चांगलें असतें, तें कशाचाही नाश करणार नाहीं. तसेंच जें चांगलेंही नसतें व वाईटही नसतें, तेंही कशाचा नाश करणार नाहीं.

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—तर मग, अस्तित्वांत असलेल्या वस्तूंमध्यें आपणांस जर अशी एक वस्तु सांपडली कीं, जी एका विशिष्ट प्रकारच्या वाईटपणामुळें जरी खराब होऊं शकली, तरी तिचा भंग अथवा नाश होऊं शकणार नाहीं, तर आपणांस असें खात्रीनें म्हणतां येईल कीं, अशी वस्तु कधींही नाश पावणार नाहीं.

ग्लॅ०:—हा निष्कर्ष वाजवी आहे.

सॉक्रे०:—आत्म्याला भ्रष्ट करणारी अशी एकही वाईट गोष्ट नाहीं काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच आहे. आपण नुकतेच वर्णन केलेले, अन्यायीपणा, अनियमितपणा, भित्रेपणा व अज्ञानीपणा, हे दुर्गुण आत्म्याला भ्रष्ट करतात.

सॉक्रे०:—पण ह्या दुर्गुणांपैकीं, एक तरी आत्म्याचें विसर्जन अथवा नाश घडवून आणील काय ? ह्यासंबंधीं तुम्ही नीट विचार करा. नाहीं तर आपली अशी समजूत होईल कीं, अन्यायी व मूर्ख मनुष्यानें केलेले गुन्हे जेव्हां उघडकीस येतात, तेव्हां अन्याय ही आत्म्याची भ्रष्टावस्था असल्यामुळें, त्याचा अन्यायानें नाश होतो. पुढीलप्रमाणें ह्या बाबतींत विचार करा. रोग म्हणजे शरीराचा खराबपणा होय व तो शरीराची हानि करून अशा स्थितीला शरीर आणतो कीं, त्याला शरीरच म्हणतां येत नाहीं ! आतांच आपण निर्दिष्ट केलेल्या सर्व वस्तू, त्यांच्या स्वाभाविक दुर्गुणामुळें अशाच भ्रष्ट होत जाऊन, शेवटीं नाश पावतात. माझें म्हणणें बरोबर आहे ना ?

ग्लॅ०:—होय.

सॉक्रे०:—आत्म्याची परीक्षा ह्याच पद्धतीनें करा. आत्म्यामध्यें जेव्हां अन्याय व इतर दुर्गुण वास्तव्य करतात, तेव्हां ते स्वतःच्या सहवासामुळें व अधिष्ठानामुळें आत्म्याची खराबी करतात व शेवटीं

त्याचा नाश करून शरीरापासून त्याला तोडून टाकतात. हें विधान खरें आहे काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच नाहीं.

सॉक्रे०:—स्वतःच्या भ्रष्टतेमुळें एखादी वस्तु नाश पावली जाणें शक्य नसतां, ती दुसऱ्या वस्तूच्या भ्रष्टतेमुळें नाश पावली जाईल, असें मानणें अविचारीपणाचें आहे.

ग्लॅ०: —खरोखर अविचारीपणाचें आहे.

सॉक्रे०: —ग्लॅकॉन् ! अन्न बुरसलेलें असलें अथवा खराब झालेलें असलें अथवा कसेंही असलें, तरी अन्नाच्या खराबपणामुळें शरीर नाश पावतें, असें आपण समजत नाहीं. अन्नाचा खराबपणा जर शरीराला अनुरूप असा रोग शरीरांत उत्पन्न करूं शकला, तर आपण असें म्हणूं कीं, शारीरिक दुर्गुण अथवा शारीरिक रोग, हें शरीराच्या नाशाचें तात्कालिक कारण असून, अन्न हें दूरचें कारण आहे. पण अन्न ही वस्तु शरीरापासून भिन्न असल्यामुळें, तिच्या खराबीमुळें शरीर खराब होतें-म्हणजे स्वतःमध्यें खराबपणा नसतांही बाह्य खराबपणामुळें शरीर वाईट होतें—ही कल्पना आपण जोरानें नाकारूं.

Steph 610

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे.

सॉक्रे०:—ह्याच युक्तिवादानें आपण असें म्हणूं कीं, जोंपर्यंत शरीराचा खराबपणा आत्म्याची खराबी घडवून आणीत नाहीं, तोंपर्यंत बाहेरील वाईट वस्तु, आत्म्यामध्यें स्वतःचा विशिष्ट रोग असल्याशिवाय आत्म्याचा नाश करूं शकत नाहीं. कारण आपण जर असें समजलों, तर एक वस्तु दुसऱ्या वस्तूच्या वाईटपणामुळें नाश पावते, असें कबूल करावें लागेल.

ग्लॅ०:—हें विधान योग्य आहे.

सॉक्रे०:—ठीक आहे. हें तत्व आपण खोडून काढूं या. पण

जोंपर्यंत तें खोडून टाकलें गेलें नाहीं, तोंपर्यंत ताप अथवा इतर रोग, अथवा प्राणघातकी आघात, अथवा सर्व शरीराचे तुकडे तुकडे करण्याची क्रिया ह्यांनीं आत्म्याचा नाश होऊं शकेल, असें आपण म्हणतां कामा नये. कारण वरील कारणांनीं शरीराची दुर्दशा झाली असतां, आत्मा अधिक अन्यायी व अपवित्र होतो, असें अगोदर सिद्ध झालें पाहिजे. आत्मा अथवा एखादी वस्तु, स्वतःच्या स्वाभाविक वाईट-पणापासून अलिप्त असतांना, बाह्य वस्तूंतील वाईटपणा त्यांचा नाश करूं शकेल, असें आपण कोणालाही म्हणूं द्यावयाचें नाहीं.

ग्लॅ०:—मरणाऱ्या लोकांचे आत्मे मृत्यूमुळें अधिक अन्यायी होतात, असें कोणालाही सिद्ध करतां येणार नाहीं.

सॉक्रे०:—परंतु ह्या विवेचनाला जर कोणी विरोध करण्यास धजावून, आत्मा अमर आहे असें कबूल करण्याचें टाळण्याकरितां म्हणूं लागला कीं, मरणारा मनुष्य अधिक भ्रष्ट व अन्यायी होतो, तर मला वाटतें, जर विरोध करणारा म्हणतो तें बरोबर असेल, तर आपल्याला असें मानावयास लागेल कीं, रोगाप्रमाणें अन्यायसुद्धां मनुष्याचा नाश करणारा आहे. सध्यां आपणांस असें आढळून येतें कीं, अन्यायी लोकांना अन्यायी कृत्यांच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा होऊन, ते मारले जातात. पण वरील तत्वाप्रमाणें आपणांस असें समजावें लागेल कीं, ज्या-प्रमाणांत ह्या भयंकर रोगाचा ( अन्यायाचा ) अन्यायी माणसावर आघात झाला असेल, त्याप्रमाणांत लवकर अथवा हळुहळू तो मरण पावेल !

ग्लॅ०:—जो अन्यायाचीं कृत्यें करतो, त्याच्या मरणाला जर अन्याय कारण होत असेल, तर अन्याय फार भयंकर आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कारण तो त्रासापासून त्याची मुक्तता करतो. पण मला उलट असें वाटतें कीं, अन्याय अन्यायी मनुष्याला सशक्त करून जागरूक ठेवतो व इतरांना ठार मारतो. कारण स्वतःच्या मालकाला मारण्याच्या प्रवृत्तीपासून, अन्याय अत्यंत दूर असतो.

सॉक्रे०:—तुम्ही छान बोललांत! कारण आत्मा स्वतःच्या दुर्गुणामुळें च वाईटपणामुळें मारला जात नाहीं, हें जर खरें आहे, तर दुसऱ्या वस्तूंचा नाश करणारा वाईटपणा, तदनुरूप वस्तूंच्या खेरीज आत्म्याचा अथवा कोणाचाही नाश करूं शकणार नाहीं.

ग्लॅ०:—होय. हा तर्क स्वाभाविकच आहे.

Steph 611 सॉक्रे०:—म्हणून ज्याअर्थी दुसऱ्याच्या अथवा स्वतःच्या वाईटपणामुळें आत्मा नाश केला जात नाहीं, त्याअर्थी हें उघडच आहे कीं, आत्मा सदोदित अस्तित्वांत असतो व म्हणून अमर असतो.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—ठीक आहे. हें सिद्ध झालें असें आपण समजूं. पण अस्तित्वांत असलेल्या आत्म्यांची संख्या सारखीच राहिली पाहिजे. कारण कोणत्याही आत्म्याचा जर नाश केला जात नसेल, तर ते कमीही होणार नाहींत अथवा आणखी वाढणारही नाहींत. कारण अमर वस्तूंचा वर्ग जर अधिक झाला, तर कोणत्यातरी मर्त्य वस्तूनें त्यांची संख्या वाढविली असली पाहिजे. अशा तऱ्हेनें, शेवटीं प्रत्येक वस्तु अमर्त्यच होईल.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—परंतु बुद्धि आपल्याला असें मत स्वीकारूं देणार नाहीं, म्हणून हें मत आपण टाकून दिलें पाहिजे. आत्म्याच्या आवश्यक स्वरूपांत, वैचित्र्याची विपुलता, विभिन्नता व भेद असतील, अशी कल्पनासुद्धां आपण करूं नये.

ग्लॅ०:—तुमचें म्हणणें मला समजलें नाहीं.

सॉक्रे०:—आत्माचें अमरत्व जर आपण सिद्ध केलें आहे, तर त्यामध्यें पुष्कळ भागांचें मिश्रण असूं शकेल काय?

ग्लॅ०:—अर्थात् नाहीं.

सॉक्रे०:—आतांच्या आपल्या विवेचन पद्धतीनें, आत्म्याचें अमरत्व नि:संदेह सिद्ध झालें आहे. दुसऱ्या प्रकारांनींही तें सिद्ध करतां येईल. परंतु आत्म्याचें खरें स्वरूप जाणावयाचें असेल तर, शरीर व इतर वाईट गोष्टी ह्यांच्या सहवासानें खराब झालेला आत्मा, अशा दृष्टीनें त्याच्याकडे न बघतां, बुद्धिवादानें त्याच्या शुद्ध स्वरूपाचें चिंतन केलें पाहिजे; म्हणजे त्याचें अप्रतिम सौंदर्य उघड दिसून येईल आणि न्याय, अन्याय व इतर गोष्टी ह्यांविषयीं जी आपण चर्चा केली तिचेंही स्पष्ट स्वरूप दिसून येईल. हल्लीं जसा आत्मा दिसतो तशा स्वरूपांत त्याचें वर्णन आपण केलें आहे. ग्लॉकस नांवाच्या जलदेवासारख्या स्थितींत, आपण त्याला बघितला आहे. त्याचें मूळ स्वरूप सहज दिसणारें नाहीं. कारण त्याच्या शरीराचे जुने अवयव भंगून गेले आहेत अथवा लाटांच्या आघातांनीं चिरडून जाऊन खराब होऊन गेले आहेत. शंख, समुद्रवेली, दगड इत्यादि बाह्य पदार्थ त्याच्या अंगाला चिकटले असल्यामुळें, तो एखाद्या रानटी पशूप्रमाणें दिसत असून, पूर्वीचें त्याचें स्वाभाविक स्वरूप बदलून गेलें आहे. आपण चिंतन करीत असलेल्या आत्म्याची हजारों वाईट गोष्टींनीं अशीच स्थिति झाली आहे. पण ग्लॅकॉन्, आपणाला आत्म्याच्या एकाच भागावर आपलें लक्ष्य स्थिर केलें पाहिजे.

ग्लॅ०:—कोणत्या भागावर ?

सॉक्रे०:—ज्ञानाची आवड असलेल्या भागावर आपण लक्ष्य दिलें असतां, दैवी, अमर व सनातन वस्तूशीं आत्म्याचा निकट संबंध असल्यामुळें, त्याला कोणाचा सहवास अथवा प्रेम हवेसें वाटतें, हें आपणांला कळेल. तसेंच, सत्तत्त्वाचा अभ्यास आत्म्यानें केला असतां, त्यापासून मिळणाऱ्या उत्तेजनानें
Steph 612 समुद्रांतून तो वर काढला जाऊन, आणि जमिनीवर पूर्वी उपजीविका करीत असल्यामुळें व चमचमीत अशा

मेजवान्या झोडीत असल्यामुळें, त्याच्याभोंवतीं चिकटणारे दगड, शंख, मातीचे ओबडधोबड पदार्थ, ह्यांच्यापासून तो विलग केला जाऊन, त्याचें खरें स्वरूप कसें असतें, हें कळून येईल. त्यानंतर तो बहुरूपी आहे कीं एकरूपी आहे अथवा कसा आहे, हें आपण बघूं शकूं. मानवी आयुष्यांतील आत्म्याच्या भावना व त्यांचें आविष्करण, ह्याविषयीं आपण आतां पुष्कळ चर्चा केली आहे, असें मला वाटतें.

ग्लॅ०:—होय. केली आहे.

सॉक्रे०:—आपलें विवेचन चालू असतां, दुय्यम विचार आपण बाजूला ठेवले आणि होमर आणि हिजिअड ज्यांचें वर्णन करतात अशीं न्यायामुळें मिळणारीं बक्षिसें व कीर्ति विचारांत न घेतां आपण असें संशोधिलें कीं, न्याय हा स्वभावतःच आत्म्याला अत्यंत उत्तम वाटत असतो व गिजिसची आंगठी व हेडसचें शिरस्त्राण नसलें, तरीसुद्धां आत्मा न्यायी कृत्येंच आचरतो.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:- ग्लॅकॉन्, इतर सद्गुणांबरोबर न्यायाला, ईश्वर व मनुष्यें ह्यांच्यापासून जीं मोठीं व पुष्कळ बक्षिसें, ह्या जन्मांतच नव्हे तर मृत्यूनंतरही मिळतात, त्यांचा आपण आतां विचार करावा ना?

ग्लॅ०:—निःसंशय करावा.

सॉक्रे०:—वाद चालू असतां तुम्ही जें उसनें घेतलें होतें, तें मला परत देतां ना?

ग्लॅ०:—मी काय उसनें घेतलें होतें?

सॉक्रे०:—न्यायी मनुष्याची कीर्ति तो अन्यायी आहे अशी व अन्यायी मनुष्याची कीर्ति तो न्यायी आहे अशी असावी, असें मी तुम्हांला गृहीत धरून दिलें होतें. कारण तुमचें मत असें होतें कीं, मनुष्यें व देव ह्यांच्यापासून खरी स्थिति लपविणें जरी अशक्य असलें,

तरी वादाकरितां म्हणून वरीलप्रमाणें स्थिति गृहीत धरली, तरच शुद्ध न्यायाची तुलना शुद्ध अन्यायाशीं करतां येईल. तुम्हांला हें आठवतें ना ?

ग्लॅ०:--मला आठवलें नाहीं, तर मी दोषी ठरेन.

सॉक्रे०:—पण आतां अन्यायी व न्यायी मनुष्यांसंबंधीं ज्याअर्थी आपण निर्णय दिला आहे, त्याअर्थी न्यायाच्या वतीनें मी असें मागतों कीं, देव व मनुष्यें ह्यांच्या मतें न्यायाची जी खरी किंमत आहे, ती मान्य केली जावी. आणि बाह्यस्वरूपावरून जें यशाचें बक्षिस न्यायाला मिळतें व न्यायी मनुष्यालाच जें देण्यांत येतें, तें न्यायाला मिळावें. कारण आतां हें सिद्ध झालें आहे कीं, खरोखर न्यायी असल्यामुळें जीं सुखें मिळतात, तीं न्यायानें वागणाऱ्यांनाच न्यायाकडून सचोटीनें दिलीं जातात.

ग्लॅ०:—तुमची मागणी न्याय्य आहे.

सॉक्रे०:—न्यायी व अन्यायी मनुष्यांचा खरा स्वभाव काय असतो, ह्याविषयीं देवांची चूक झालेली नसते, ही कबुली तुम्ही मला प्रथम परत कराल ना ?

ग्लॅ०:--आम्ही परत करूं.

सॉक्रे०:—असें जर आहे तर, आपण पूर्वी कबूल केल्याप्रमाणें, न्यायी लोक देवांचे आवडते होतील पण अन्यायी लोक त्यांना दृष्टीसमोर सुद्धां नकोसे वाटतील.

ग्लॅ०:—खरें आहे.

सॉक्रे०:—पूर्वीच्या पापांमुळें भोगावें लागणारें थोडेंबहुत दुःख
Stpeh सोडून दिलें असतां, देवांचा जो आवडता मनुष्य असतो,
613 त्याला सर्व उत्तम प्रकारच्या वस्तु देवांकडून मिळतात,
असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

ग्लॅ०:--खरें आहे.

सॉक्रे०:—म्हणून न्यायी मनुष्याच्या बाबतींत आपण गृहीत धरलें पाहिजे कीं, दारिद्र्यांत, आजारीपणांत अथवा दुसऱ्या एखाद्या संकटांत जरी तो आयुष्य काढीत असला, तरी सर्व कांहीं त्याच्या अंतिम फायद्याकरितां घडत असतें. मग तो फायदा त्याला ह्या जन्मीं मिळो अथवा पुढच्या जन्मीं मिळो. कारण जो मनुष्य न्यायीपणानें वागण्याचा व सदाचारानें मानवीप्राण्याला शक्य असेल तितकें देवाप्रमाणें बनण्याचा प्रामाणिकपणें प्रयत्न करीत असतो, त्याची देवांकडून कधींही उपेक्षा होणार नाहीं.

ग्लॅ०:—जो देवासारखा आहे, तो देवाकडून उपेक्षिला जाणें शक्य नाहीं.

सॉक्रे०:—परंतु अन्यायी मनुष्याच्या बाबतींत आपण विरुद्ध मत स्वीकारलें पाहिजे.

ग्लॅ०:—खात्रीनेंच.

सॉक्रे०:—तर मग वरील प्रकारचीं बक्षिसें न्यायी मनुष्याला देवांकडून मिळतात.

ग्लॅ०:—माझीही अशीच समजूत आहे.

सॉक्रे०:—परंतु मनुष्यांकडून त्याला काय मिळतें ? खरें बोलावयाचें म्हणजे पुढील प्रमाणें प्रकार होतो ना ? शर्यतींत ज्याप्रमाणें कांहीं लोक सुरवातीच्या जागेपासून वळण्याची खूण येईपर्यंत चांगले धावतात, पण पुढें निशाणापर्यंत जाण्यास दमतात; त्याप्रमाणें हुषार असलेल्या अन्यायी लोकांचें वागणें होत नाहीं काय ? असे लोक आरंभ मोठ्या चपळाईनें करतात खरा, पण शेवटीं त्यांचें हसें होऊन तेजोभंग होतो व बक्षिस मिळण्याऐवजीं त्यांना निमूटपणें निघून जावें लागतें ! परंतु जे खरोखर चांगले धावणारे आहेत, तेच शेवटीं बक्षिस मिळवून यशस्वी होतात. न्यायी मनुष्याची स्थिति सामान्यत: अशीच नसते काय ? आयुष्यांतील प्रत्येक कृत्यांत व प्रत्येक बाबतींत, शेवटीं ते

चांगलें नांव कमावून, आपल्या बांधवांकडून बक्षिसें मिळवीत नाहींत काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच ते मिळवतात.

सॉक्रे०:—तर मग, अन्यायी मनुष्याविषयीं तुम्ही जसें म्हणालांत, तसें न्यायी मनुष्याविषयीं मला म्हणूं द्याल ना ? न्यायी लोक वृद्धापकाळीं त्यांच्या इच्छेप्रमाणें अधिकाराची जागा पत्करतात, आणि त्यांच्या पसंतीस येईल त्या कुटुंबाशीं, स्वतःचे व स्वतःच्या मुलींचे लग्नसंबंध जुळवितात. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे, तुम्ही अन्यायी मनुष्यासंबंधीं जें कांहीं बोललांत, तें सर्व मी न्यायी मनुष्यासंबंधीं बोलतों. आणि अन्यायी मनुष्यांविषयीं मी असें म्हणेन कीं, त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक जरी तरुणपणांत पकडले गेले नाहींत तरी शेवटीं पकडले जाऊन, आपलें हसें करून घेतात. आणि वृद्धापकाळीं विपत्तींत सांपडून, स्वबांधवांकडून व परकी लोकांकडूनही अपमानिले जातात. त्यांना फटके मारण्यांत येऊन पीडनयंत्रानें छळण्यांत येतें व त्यांचे डोळेही भाजले जातात. अशा तऱ्हेच्या कर्णकठोर रानटी शिक्षा त्यांना भोगाव्या लागतात, असें मी वर्णिलें असें तुम्ही समजा. पण मला तुम्ही असें वर्णन करूं द्याल काय ?

ग्लॅ०:—खात्रीनेंच. कारण तुमचें वर्णन खरें आहे.

सॉक्रे०:—न्यायी मनुष्य न्यायानें वागत असल्यामुळें, त्यांना न्याया-
Steph कडून चांगल्या वस्तु मिळतात. शिवाय देव व मनुष्यें
614 ह्यांच्याकडूनही ह्या जन्मींच वरील प्रकारचीं बक्षिसें, शाबासकी व देणग्या त्यांना मिळतात.

ग्लॅ०:—होय. हीं बक्षिसें चांगलीं व खात्रीचीं असतात.

सॉक्रे०:—परंतु न्यायी व अन्यायी मनुष्यांना, मृत्यूनंतर परलोकांत जो मोबदला मिळतो, त्याच्या संख्येच्या व महत्त्वाच्या मानानें, हीं कांहींच नाहींत. न्यायी व अन्यायी मनुष्यांना, त्यांच्या कर्मांचें फल

काय मिळतें, हें वर्णिल्याशिवाय आपल्या वादविवादाचा समारोप होणार नाहीं.

ग्लॅ०:—वर्णन कराच! कारण ह्या वर्णनाहून अधिक आनंददायक असें मला कांहींच वाटणार नाहीं.

सॉक्रे०:—ठीक आहे. ओडिसिसूनें अल्सिनसला जशी लांबलचक गोष्ट सांगितली तशी गोष्ट न सांगतां, मी तुम्हांला पॅम्फिलियांत जन्मलेला अरमिनिअसचा पुत्र अर, हा लढाईत मारला गेला असतां, त्याची काय हकीकत झाली तें सांगतों. लढाईत मारले गेलेल्या लोकांचीं कुजलेल्या स्थितींत असलेली शरीरें, दहा दिवसांनीं जेव्हां पुरण्याकरितां काढण्यांत आलीं, तेव्हां अरचें शरीर ताजेतवानें असें दिसून आलें. म्हणून त्याला घरीं नेऊन पुरावयाचें ठरलें. पण बाराव्या दिवशीं, तो चितेवर पडलेला असतां जीवंत झाला व परलोकीं त्यानें जें काय पाहिलें त्याचें वर्णन करूं लागला. त्यानें पुढीलप्रमाणें गोष्ट सांगितली:—

त्याच्या शरीरांतील आत्मा जेव्हां बाहेर निघून गेला, तेव्हां इतरांच्या आत्म्यांबरोबर एका गूढ जागेवर येईपर्यंत तो भ्रमण करता झाला. ह्या जागेला दोन खिंडारें होतीं. तीं दोन्ही पृथ्वीमध्येंच पण जवळजवळ अशीं होतीं व त्यांच्या अगदीं समोरच आकाशांत वरतीं दोन खिंडारें होतीं. ह्या खिंडारांच्या मध्यजागीं न्यायाधीश बसले होते. हे न्यायाधीश, न्यायी लोकांना निकाल सांगून व त्या निकालाची त्यांच्या शरीराला कांहींतरी खूण बांधून, त्यांना तेथून वर जाण्याचा मार्ग निर्देशित होते. त्याचप्रमाणें अन्यायी लोकांनाही, त्यांच्या अपकृत्यांचा पुरावा त्यांच्या पाठीला बांधून, डाव्या बाजूच्या रस्त्यानें खालीं जाण्यास सांगत होते. अर जेव्हां स्वतः त्या जागीं आला, तेव्हां त्याला सांगण्यांत आलें कीं, तेथील स्थितीचा वृत्तांत त्यानें मर्त्य लोकांतील मनुष्यांना कळवावा. ह्याकरितां परलोकांत जे कांहीं प्रकार घडतील, ते पहाण्याची व ऐकण्याची त्याला आज्ञा करण्यांत आली. नंतर अर सभोंवतीं बघत राहला.

आत्म्यांना निकाल सांगण्यांत आल्यावर, एका बाजूनें ते आकाशांतील अथवा समोरच्या पृथ्वीवरील खिंडारांतून निघून जात असलेले त्यानें बघितले. तसेंच दुसऱ्या दोन खिंडारांच्या ठिकाणीं, पृथ्वीवरून वर आलेले आत्मे हिडिस व मलाच्छादित व स्वर्गांतून खालीं आलेले आत्मे शुद्ध व तेजस्वी असे त्यानें बघितले. प्रत्येक आत्मा प्रवास-श्रमांनीं खिन्न झालेला दिसत होता. मोठा उत्सव भरावयाचा असला म्हणजे, ज्याप्रमाणें कुरणांत जाऊन आपलीं विश्रांतिस्थानें लोक पहातात त्याप्रमाणें ह्या आत्म्यांनीं केलें. एकमेकांनीं आपल्या ओळखीच्या आत्म्यांशीं नमस्कार चमत्कार केला. जे स्वर्गांतून खालीं आले अशा आत्म्यांनीं, पृथ्वीसंबंधीं व पृथ्वीवरून

Steph 615

आलेल्या आत्म्यांनीं स्वर्गासंबंधीं एकमेकांना प्रश्न विचारले. पृथ्वीवरून आलेल्या आत्म्याना, पृथ्वीवर भोगाव्या लागलेल्या हजार वर्षांतील दुःखांची व त्रासांची आठवण झाल्यामुळें, स्वतःची हकीकत ते शोक करीत व अश्रू ढाळीत सांगत होते. ह्याच्या उलट, जे आत्मे स्वर्गांतून खालीं आले, ते स्वर्गीय विलासांचें व सुंदर वस्तूंचें वर्णन करीत होते. ग्लॅकॉन, वरील गोष्टी तपशीलवार सांगण्यास पुष्कळ वेळ लागेल. म्हणून अरला जे महत्वाचे मुद्दे वाटले, तेवढेच मी सांगतों. आत्म्यांनी केलेल्या प्रत्येक गुन्ह्याबद्दल आणि वैयक्तिक दुखापतीबद्दल त्याना दसपट शिक्षा भोगावी लागली. मानवी आयुष्याची मर्यादा शंभर वर्षें धरण्यांत येऊन शिक्षेचें चक्र दर शंभर वर्षांनीं फिरल्यामुळें, प्रत्येकाला प्रत्येक गुन्ह्याची शिक्षा दहा वेळां भोगावी लागली. ह्याप्रमाणें ज्यांनीं पुष्कळ खून केलेले होते अथवा ज्यांनीं शहरांचा व सैन्यांचा विश्वासघात करून त्यांना गुलाम केलें होतें अथवा इतर दुष्ट कृत्यांत जे साथीदार झाले होते, त्यांना त्यांच्या प्रत्येक अपकृत्याबद्दल दसपट यातना भोगाव्या लागल्या. ह्याच्या उलट, ज्यांनीं दानधर्म करून पवित्रपणानें व न्यायीपणानें

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळ प्रत ... सं. विं ५०३ ता. २०।६।७२

आयुष्य घालविलें होतें, त्यांना त्याचप्रमाणांत योग्य बक्षिस देण्यांत आलीं. जन्मानंतर ज्यांना लगलीच मृत्यु आला होता, त्यांच्याविषयीं अरनें माहिती सांगितली, पण तिचा निर्देश करण्याचें कारण नाहीं. तथापि अरच्या वर्णनाप्रमाणें, अधार्मिकता, आईबापांची अवज्ञा, व जवळच्या नातलगांचा खून, ह्या कृत्यांबद्दल शिक्षा फारच ज़बर होत्या. आणि धर्मनिष्ठा व आज्ञाधारकपणा ह्यांना बक्षिसेंही फार मोठीं होतीं. महान् अरडिअस कोठें आहे, म्हणून जेव्हां एका आत्म्यानें दुसऱ्या आत्म्याला विचारलें, तेव्हां अर जवळच उभा असून ऐकत होता. हजार वर्षांपूर्वीं हा अरडिअस पॅम्फिलिया शहराचा राजा होता. आपल्या वृद्ध पित्याला व भावाला त्यानें ठार मारलें असून इतरही पुष्कळ दुष्ट कृत्यें केलीं होतीं. ज्या आत्म्याला वरील प्रश्न विचारला गेला होता, त्यानें उत्तर दिलें:–"तो आलेला नाहीं व इकडे येणें शक्यही नाहीं. कारण नुकतेंच आम्हाला एक अत्यंत भयंकर दृश्य दिसलें. सर्व दुःखें भोगून झाल्यावर आम्ही त्या खिंडाराजवळ जाऊन वर चढण्याच्या बेतांत होतों; इतक्यांत् अरडिअस् व त्याजबरोबर असलेले जुलमी राजे आम्ही बघितले. त्याच्याबरोबर बडे गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध असलेले इतरही लोक होते. हे लोक जेव्हां ताबडतोब वर चढण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां त्या खिंडारानें त्यांना मागें परतवलें. कारण ज्यांची सुधारणा होणें अशक्य अशा पापी लोकांपैकीं, अथवा ज्यांनीं आपल्या गुन्ह्यांचें परिमार्जन केलेलें नाहीं अशांपैकीं, जर कोणी वर चढण्याचा प्रयत्न करूं
Steph लागला तर हें खिंडार ओरडूं लागे. खिंडाराची आरोळी
616 ऐकल्याबरोबर, भयंकर व रागीट दिसणारे लोक, पुढें येऊन अशा लोकांना पकडून दूर फेंकून देत असत. अरडिअसचे व इतर लोकांचे हात, पाय व तोंड बांधून टाकण्यांत येऊन, चाबकांनीं त्यांची चामडी काढण्यांत आली. नंतर त्यांना

बाजूला काढून घेऊन, कांट्यांच्या झुडुपांवर लोंकरीप्रमाणें पिंजण्यांत आलें व त्यांना अशा यातना भोगण्यास कां लावलें, हें आजुबाजूनें जाणाऱ्यास समजाऊन देण्यांत येऊन, अरडिअस इत्यादिकांना टारटरस-मध्यें ( नरकांत ) फेंकून देण्यांत येणार आहे, असें जाहीर करण्यांत आलें. अनेक भीतिजनक आरोळ्या आम्ही आतांपर्यंत ऐकल्या होत्या. परंतु आमच्यापैकीं कोणी वर जाण्याचा प्रयत्न करूं लागला असतां, अशी आरोळी पुनः होईल काय, म्हणून आम्हांला जशी धास्ती वाटली, तशी पूर्वीं कधींच वाटली नव्हती. म्हणून जेव्हां आम्हांला ती आरोळी ऐकूं आली नाहीं, तेव्हां आम्ही सर्व मोठ्या आनंदानें वर चढून आलों." वरील वर्णनावरून शिक्षा व यातना ह्यांच्या प्रकारांची तुम्हाला कल्पना येईल. बक्षिसेंही तशींच मोठीं होतीं.

कुरणामध्यें आत्मे आल्यावर जेव्हां सात दिवस उलटून गेले, तेव्हां आळीपाळीनें प्रत्येकाला ती जागा सोडून जाण्याचा हुकूम झाला. आठव्या दिवशीं ते निघाले व तीन दिवस प्रवास करून, शेवटीं चवथ्या दिवशीं ते अशा ठिकाणीं आले कीं, तेथून त्यांना खालीं सर्व आकाश व पृथ्वी ह्यांवर पसरणारा एक उजेडाचा सरळ खांब, इंद्र-धनुष्यासारखा, पण त्याहून अधिक तेजस्वी व स्पष्ट असा दिसला. एक दिवसाच्या प्रवासानंतर, ह्या खांबापर्यंत ते येऊन पोहोंचले. ह्या प्रकाशाच्या मध्यावर जाऊन त्यांना असें दिसलें कीं, ह्या खांबाचीं दोन्हीं टोकें सांखळीनें आकाशाला बांधलीं गेलीं होतीं. ज्याप्रमाणें दोरखंड ट्रीरिमी लढाऊ जहाज बांधून ठेवतो, त्याप्रमाणें हा दीपस्तंभ आकाशाला गवसणी घालून, सर्व विश्वचक्र धरून ठेवतो. ह्या दोन टोकांना अदृष्टदेवतेची चरकी बांधलेली असते, व तिजमुळें विश्वाचीं परिभ्रमणें चालू राहतात. ह्या चरकीचा दांडा व आकडा, पोलादाचे केलेले असतात व चाती, पोलाद व इतर धातूंच्या मिश्रणानें केलेली असते. ह्या चातीचें स्वरूप खालीलप्रमाणें वर्णन करतां येईल. सामान्य

चातीप्रमाणें तिचा आकार असतो. परंतु अरच्या वर्णनाप्रमाणें आपल्या-समोर पुढील चित्र उभें केलें पाहिजे. मोठी पोकळ अशी चाती आहे. ती आंत पूर्णपणें पोखरलेली असून, तिच्यामध्यें ज्याप्रमाणें एका पेटींत दुसरी पेटी बसवितात, त्याप्रमाणें तिच्यापेक्षां लहान पण तशीच चाती समाविष्ट केली आहे. नंतर दुसऱ्या चातीमध्यें तिसरी, तिसरींत चवथी व अशा तऱ्हेनें आणखी चार; अशा एकमेकांमध्यें समाविष्ट केलेल्या एकंदर आठ आहेत. प्रत्येक चातीचा कांठ बाहेरच्या चातीपेक्षां वर असतो व सर्वांचा एकत्र मिळून एक भरीव भोंवरा होतो. ह्या भोंवऱ्याचा दांडा आठव्या चातीच्या मध्यांतून जाणारा असतो. पहिली व सर्वांत बाहेरची चाती, सर्वांत रुंद कांठाची असते. सहावी हिच्या खालोखाल जरा कमी रुंदीची. नंतर चवथी, नंतर आठवी,
Steph नंतर सातवी, नंतर पांचवी, व नंतर तिसरी. दुसरीचा
617 कांठ सर्वांत अत्यंत अरुंद असतो. सर्वांत मोठ्या चातीचा कांठ निरनिराळ्या रंगांनीं सुशोभित असून, सातवीचा तर अत्यंत तेजस्वी असतो. आठवीचा रंग सातवीपासून मिळालेला असून, दुसरीचा व पांचवीचा वरील चातीसारखाच पण अधिक भडक असतो. तिसरीचा फिकट असून, चवथीचा कांहींसा तांबडा व सहावीचा तिसरीसारखाच फिकट असतो. चरकी समवेगानें फिरत राहते, परंतु ती फिरत असतांना आंतील सात चक्रें विरुद्ध दिशेनें हळुहळू फिरत असतात. ह्यांच्यापैकीं आठवी अत्यंत जलद फिरते आणि तिच्यानंतर सातवी, सहावी, पांचवी, ह्या एकजुटीनें फिरत राहतात. चवथी आपलें परिभ्रमण ह्यांच्यापेक्षां कमी वेगानें संपविते. तिसरीचा वेगामध्यें चवथा नंबर लागतो व दुसरीचा पांचवा लागतो. अदृष्ट देवतेच्या गुडघ्याखालीं चरकी फिरत असते. तिच्या प्रत्येक चक्रावर एक जलदेवता उभी असते व ती एका आवाजांत एक सूर गुणगुणत चक्राभोंवतीं फिरत असून आठी सुरांतून स्वरसंगति निघत

असते. तीन निरनिराळ्या सिंहासनावर, समांतर अंतरावर, तीन सटव्या ( Fates ) बसलेल्या असतात. अदृष्टदेवतेच्या ह्या लाचेसिस, क्लोथो व ॲट्रोपोस अशा नांवाच्या मुली होत. शुभ्र वस्त्रें नेसून व डोक्यावर माळा घालून, त्या जलदेवतांच्या संगीताला साथ देत असतात. लाचेसिस गतकालाचें, क्लोथो चालू कालाचें व ॲट्रोपोस भविष्य-कालाचें, गीत म्हणत असतात. क्लोथो आपल्या उजव्या हातानें चरकीचा सर्वांत बाहेरचा कांठ घेते व मधून मधून गरगर फिरवीत राहते. ॲट्रोपोस डाव्या हातानें आंतलीं चक्रें फिरवीत असते व लाचेसिस, कोणत्याही एका हातानें प्रत्येक चातीला स्पर्श करीत असते.

आत्मे ह्या ठिकाणीं आल्यावर, लाचेसिसकडे जाण्याचा त्यांना हुकूम झाला. एका व्याख्यात्यानें, ह्या सर्वांना अनुक्रमानें उभें केलें आणि लाचेसिसच्या मांडीवरून पुष्कळशा चिठ्ठया व आयुष्याचे नमुने काढून घेऊन, एका उंच सभास्थानावर उभें राहून पुढील भाषण केलें:—" अदृष्टदेवतेची कन्या लाचेसिस काय म्हणत्ये, तें सर्वजण ऐका. अल्पायुषी आत्म्यांनो ! जनन आणि मरण ह्यांचें नवीन चक्र सुरू व्हावयाचें आहे. तुमचें भवितव्य तुम्हांला ठरवून दिलें जाणार नाहीं. उलट, तुम्हांलाच तें निवडावें लागेल. पहिल्याप्रथम जो चिठ्ठी उचलील, त्यानें आपलें आयुष्य निवडून घ्यावें व तें अनुल्लंघनीय असें समजावें. सद्गुण कोणाचा दास होत नसतो, म्हणून जो सद्गुणाचा सत्कार करील अथवा अनादर करील, त्याला सद्गुणाचा अधिक अथवा कमी लाभ होईल. निवड करण्याऱ्या मनुष्यानें स्वतःवरील जबाबदारी ओळखावी. कारण स्वर्गस्थ देवता निर्दोषी होत ! " व्याख्यात्यानें असें बोलून, आत्म्याच्या जमावापुढें चिठ्या टाकून दिल्या. प्रत्येक आत्म्यानें, त्याच्या बाजूला जी चिठ्ठी पडली, ती उचलून घेतली. अरला

Steph 618

मात्र असें करण्याची मनाई होती. प्रत्येकानें आपला नंबर कोणता, तें पाहून घेतलें. हें झाल्यानंतर, हजर

असलेल्या आत्म्यांच्या संख्येपेक्षांही पुष्कळ प्रकारच्या आयुष्यांचे नमुने, त्यांच्यापुढें ठेवण्यांत आले. येथें सजीव वस्तूंचे व सर्व प्रकारच्या मानवी आयुष्यांचे नमुने होते. त्यांच्यामध्यें अनियंत्रित सत्ता देणाऱ्या राज्यपद्धती होत्या. त्यांपैकीं कांहीं कायम टिकणाऱ्या व कांहीं मध्येंच नष्ट होऊन शेवटीं दारिद्र्य, हद्दपारी व भिक्षांदेही अनुभवण्यास लावणाऱ्या होत्या. शारीरिक सौंदर्य, शारीरिक शक्ति व खेळांतील नैपुण्य अथवा उच्चकुल व पूर्वजांचे पराक्रम, ह्यांनीं विख्यात असलेल्या प्रसिद्ध लोकांचीं आयुष्यें, तेथें मांडलेलीं होतीं. त्याचप्रमाणें प्रसिद्ध नसलेल्या पुरुषांच्या आयुष्यांचे व प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध अशा स्त्रियांच्या आयुष्याचे नमुने होते. परंतु आत्म्याचा निश्चित असा स्वभाव, त्यांत कोठेंही समाविष्ट केलेला नव्हता. कारण प्रत्येक जन्माच्या फरकामुळें, आत्म्यामध्येंही फरक होत असतो. पण इतर सर्व बाबतींत, आयुष्यांतील विविध प्रकारांचें मिश्रण दिसून येत होतें. संपत्ति, दारिद्र्य, रोग व आरोग्य हीं दिसून येत होतीं. शिवाय मध्यम स्थितीचेही नमुने होते.

माझ्या प्रिय ग्लॅकान्, हा क्षण मोठा महत्त्वाचा असतो. कारण ह्यावरच मनुष्याचें सर्व आयुष्य अवलंबून असतें. म्हणून आपल्यापैकीं प्रत्येकाचें कर्तव्य असें ठरतें कीं, इतर सर्व विषय सोडून देऊन असें शास्त्र शोधून काढावयाचें व अभ्यासावयाचें कीं, जें चांगलें व वाईट आयुष्य ह्यांतील फरक ओळखून देईल व आतां आपण ज्या गोष्टी सांगितल्या, त्या गोष्टी संघशः व विलगपणानें, सद्गुणी आचरणावर काय परिणाम करूं शकतात, ह्याचा विचार करावयास लावून यथाशक्ति चांगल्या आयुष्याची निवड करावयास लावील. दारिद्र्य अथवा श्रीमंती ह्यांच्या वातावरणांत सौंदर्य असतांना, आत्म्यावर चांगला अथवा वाईट परिणाम काय घडून येतो, हें ह्या शास्त्रानें कळेल. उच्च अथवा नीच कुलांतील जन्म, खाजगी अथवा सार्वजनिक

आयुष्य, शारीरिक बळकटी अथवा दुबळेपणा, तीक्ष्ण अथवा मंद बुद्धि, आत्म्याच्या नैसर्गिक अथवा बाह्य प्रवृत्ती, इत्यादि गोष्टींच्या मिश्रणानें काय परिणाम होतो, तें वरील शास्त्रानें समजून घेऊन, ज्या आयुष्यामुळें आत्मा अधिक अन्यायी बनावयास लागतो तें वाईट व ज्याच्यामुळें आत्मा अधिक न्यायी होऊं लागतो तें चांगलें, अशा तऱ्हेनें विचार करून, आत्म्याच्या स्वरूपाकडे नेहमीं लक्ष ठेवून, वरील माहितीच्या आधारावर आपल्याला चांगलें व वाईट आयुष्य ह्यांमध्यें निवड Steph 619 करतां येईल. कारण जिवंतपणीं अथवा मृत्यूनंतरही, अशी निवड करणें योग्य होय, असें आपण अनुभविलें आहे. परलोकांत गेल्यावर, अशा मताला जर मनुष्य दृढनिश्चयानें चिकटून राहील, तर तो संपत्ति अथवा इतर वाईट गोष्टी ह्यांच्या दिमाखानें दिपावून जाणार नाहीं व दुसऱ्यांचे हक्क बळकावून बसण्यासारखीं वाईट कृत्यें करून, दुसऱ्यांचे नुकसानीस व स्वतःच्या अधिक दुःखास तो कारण होणार नाहीं. तो नेहमीं मध्यम स्थितीचा आयुष्यक्रम स्वीकारील आणि शक्यतों ह्या आयुष्यांत व पुढील आयुष्यांतही कोणत्याहि एका मार्गाला अतिशय वाहून घेणार नाहीं. कारण सौख्याचा हाच मार्ग होय.

असो. परलोकांतून आलेल्या मनुष्यानें पुढें असें सांगितलें. "त्याप्रसंगीं तो व्याख्याता म्हणाला, "अगदीं शेवटच्या मनुष्यानें सुद्धां, जर विचारपूर्वक एखाद्या आयुष्याची निवड करून, शेवटपर्यंत टिकाव धरला, तर त्याला आपलें आयुष्य वाईट आहे असें आढळून येणार नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांत समाधान वाटेल. म्हणून पहिल्या-प्रथम येणाऱ्या लोकांनीं, निष्काळजीपणानें निवड करूं नये व शेवटच्या लोकांनीं निराश होऊं नये." असें त्याचें भाषण संपतांच, पहिल्या प्रथम ज्यानें चिठ्ठी उचलली होती, तो पुढें आला व अनियंत्रित जुलमी सत्तेचें आयुष्य त्यानें निवडून घेतलें. तो

अतिशय अविचारी व लोभी असल्यामुळें, निवड करण्यापूर्वी प्रत्येक मुद्दा पूर्णपणें विचारांत घेण्यास थांबला नाहीं. कारण त्यांतील इतर दुःखांबरोबर, स्वतःच्या मुलांना स्वतःलाच खावयास भाग पाडणारें दुःख, त्याच्या लक्षांत आलें नाहीं. स्वस्थपणानें जेव्हां त्यानें विचार केला, तेव्हां तो दुःखी होऊन शोकानें छाती बडवून घेऊं लागला व व्याख्यात्यानें जरी पूर्वी बजाविलें होतें, तरी-सुद्धां दैवाला दोष देऊं लागला. स्वतःला दोषी समजण्याचें सोडून देऊन, तो इतरांवर आपल्या दुर्दैवाचें खापर फोडूं लागला. तो स्वर्गांतून आलेल्या लोकांपैकीं असून, पूर्वीच्या आयुष्यांत त्यानें सुसंघटित राज्यांत दिवस काढले असल्यामुळें, केवळ संवयीनें सद्गुणी बनलेला होता; पण त्याच्या सद्गुणीपणाला तत्वज्ञानाची जोड नव्हती. अरच्या वर्णनाप्रमाणें, अशा तऱ्हेनें फसलेल्या लोकांपैकीं, अर्ध्याहून अधिक लोक स्वर्गांतून आलेले असल्यामुळें, त्यांनीं कधींही दुःखाच्या अनुभवानें मिळणारें शिक्षण घेतलेलें नव्हतें. जे पृथ्वीवरून लोक आले होते, त्यांच्यापैकीं पुष्कळ लोकांनीं अशा निष्काळजीपणानें निवड केली नाहीं. कारण त्यांना स्वतःला दुःखाचा अनुभव असून दुसऱ्यांचेंही दुःख त्यांनीं पाहिलें होतें. वरील कारणामुळें व चिठ्यां-मधील विचित्र दैवघटनेमुळें, पुष्कळ आत्म्यांनीं चांगलें आयुष्य वाईटाकरितां व वाईट चांगल्याकरितां बदलून घेतलें. पण पृथ्वीवर जन्म घेतल्यानंतर, मनुष्यानें जर उच्च तत्वज्ञानाचा व्यासंग ठेवला आणि अगदीं शेवटच्या प्रकारचें आयुष्य सोडून, इतर आयुष्य त्याला पसंत करावयास मिळालें, तर आपणांस परलोकांतून जी माहिती मिळाली आहे, तीवरून असें निश्चित म्हणतां येईल कीं, अशा मनुष्याचें पृथ्वीवर तर सुखाचें आयुष्य होईलच, पण ह्या मर्त्यभूमींतून परलोकांत व परलोकांतून पुनः मर्त्यभूमींत त्याचा जो प्रवास होईल, तो ओबड-धोबड जमिनीखालच्या मार्गानें न होतां स्वर्गाच्या स्वच्छ व सुंदर

मार्गानें होईल. अरच्या मतें प्रत्येक आत्म्यानें आपलें आयुष्य कसें पसंत केलें, हा देखावा आश्चर्यकारक असून, खेद, हास्य व चमत्कार ह्यांनीं भरलेला होता. पूर्वीच्या आयुष्याचा अनुभव वरील प्रकारची निवड करण्यास आत्म्यांना उपयोगी पडत होता. आर-
Steph फिअस म्हणून जो आत्मा पूर्वी पृथ्वीवर जन्मला होता,
620 त्या आत्म्यानें हंसाचें आयुष्य पसंत केलें; कारण स्त्रियांकडून तो मारला गेला असल्यामुळें, स्त्री जातीचा त्याला इतका तिटकारा आला होता कीं, स्त्रीच्या पोटीं जन्माला येणें त्यानें नाकारलें! थॅमिरसच्या आत्म्यानें बुलबुलचें आयुष्य पसंत केलें. हंसानें आपला स्वभाव बदलून, मनुष्याचें आयुष्य पत्करल्याचेंही अरनें पाहलें. इतर गानप्रिय प्राण्यांनीं हंसाचें अनुकरण केलें. विसावी चिठ्ठी ज्यानें उचलली त्या आत्म्यानें सिंहाचा जन्म निवडला. अचिलसच्या कवचाविषयीं निर्णय झालेला आठवल्यामुळें, टेलामॉनचा पुत्र अजॅक्स ह्यानें मनुष्यजन्म नाकारून सिंहाचा घेतला. अॅगॅमेम्नान्च्या आत्म्याला, मर्त्यभूमींत भोगाव्या लागणाऱ्या दुःखामुळें नरदेहाचा तिटकारा वाटून, त्यानें गरुडाचें आयुष्य पत्करलें. अॅटलान्टाच्या आत्म्यानें, मधल्या चिठ्यांपैकीं एक चिठ्ठी उचलली. मल्लाच्या आयुष्यांत मोठी कीर्ति मिळते, म्हणून तो जन्म पत्करण्याचा मोह तिला आवरतां आला नाहीं. पॅनोपिअसचा पुत्र एपिअस, ह्याच्या आत्म्यानें निष्णात मजूर स्त्रीचा जन्म घेतला. लांब अंतरावर, सर्वांच्या शेवटीं थेरसिटस ह्या विदूषकानें, माकडाचें रूप घेतलेलें अरनें बघितलें. ओडिसिअसच्या आत्म्यानें सर्वांच्या शेवटीं चिठ्ठी उचलली. पूर्वजन्मांतील दुःखाच्या आठवणीनें त्याची महत्वाकांक्षा इतकी मंदावली होती कीं, तो पुष्कळ वेळ शांततेचें व स्वास्थ्याचें आयुष्य शोधीत राहला. सर्वांनीं उपेक्षिलेलें व बाजूला पडलेलें असें तें थोड्या प्रयासानें शेवटीं त्याला सांपडलें. तें सांपडल्याबरोबर मोठ्या आनंदानें तें पसंत करून तो म्हणाला,

"पहिल्या प्रथम जरी चिठ्ठी उचलली असती, तरी हीच निवड मी केली असती." अशा तऱ्हेनें, इतर कांहीं प्राण्यांनीं मनुष्यप्राण्यांत अथवा इतर जातीच्या प्राण्यांत रूपांतर करून घेतलें. अन्यायी प्रवृत्तींच्या प्राण्यांनीं रानटी व न्यायी प्रवृत्तीच्या प्राण्यांनीं पाळीव प्राण्यांमध्यें रूपांतर केलें. ह्यामुळें सर्व प्रकारच्या आयुष्यांचें मिश्रण दिसून आलें.

अशा प्रकारें आत्म्यांनीं आयुष्य पसंत केल्यावर ते लाचेसिस देवतेकडे आळीपाळीनें गेले. तिनें प्रत्येक आत्म्याचें आयुष्य रक्षण करण्याकरितां व त्याची निवड पूर्ण करण्याकरितां, प्रारब्धदेवतेला बरोबर पाठवून दिलें. ह्या प्रारब्धदेवतेनें, प्रत्येक आत्म्याला क्लोथो देवतेजवळ अशा तऱ्हेनें नेलें कीं, तिच्या हातानें फिरविल्या जाणाऱ्या चरकीच्या परिभ्रमणानें, प्रत्येकाचें नशीब मंजूर करण्यांत आलें. त्या देवतेला स्पर्श करून, प्रारब्धदेवतेनें आत्म्यांना अट्रोपोसच्या
Steph चरकीकडे नेऊन, क्लोथोनें केलेलें भवितव्य अनुल्लंघनीय
621 असें केलें. त्यानंतर आत्मे सरळ अदृष्ट–देवतेच्या सिंहासनाखालीं गेले. इतर आत्मे गेल्यानंतर अरही गेला. नंतर ते पोळून टाकणाऱ्या उष्ण हवेंतून वृक्ष व लता ह्यांनीं विरहित अशा शुष्क विस्मरण–मैदानावर आले. जेव्हां संध्याकाळ झाली, तेव्हां ज्या नदीचें पाणी कोणत्याही भांड्यानें धरतां येणें अशक्य, अशा अनास्था नदीच्या कांठीं त्यांनीं मुक्काम केला. ह्या ठिकाणीं सर्व आत्म्यांना कांहीं ठराविक प्रमाणांत पाणी पिण्यास भाग पाडण्यांत आलें. परंतु अदूरदर्शी आत्मे ठराविक प्रमाणाबाहेर पाणी प्याले. प्रत्येक आत्मा पाणी प्यायल्यानतर सर्व कांहीं विसरून गेला. आत्मे विश्रांति घेण्यास गेल्यावर, मध्यरात्रीं मेघनाद होऊन धरणीकंप झाला आणि एका क्षणांत झट्दिशीं उदयास येणाऱ्या तारकांप्रमाणें, सर्व आत्मे निरनिराळया जन्मांत घालण्यांत आले. अरला पाणी पिण्याचा

प्रतिबंध करण्यांत आला होता. परंतु कोणत्या मार्गानें त्याला आपलें पूर्व शरीर मिळालें, हें त्याला समजलें नाहीं. सकाळीं अकस्मात् जेव्हां तो जागा झाला तेव्हां चितेवर आपण पडून असल्याचें त्याला दिसलें.

अशा तऱ्हेनें, ग्लॅकॉन्, ही गोष्ट रक्षण करण्यांत येऊन तिचा नाश झाला नाहीं. ह्या गोष्टीमधील सूचनांप्रमाणें आपण जर वागलों, तर आपलेंही ती रक्षण करील. लिथे म्हणजे अनास्था नदीच्या कांठावरून आपण सुरक्षितपणें निभावून जाऊन, आपले आत्मे भ्रष्ट होणार नाहींत. खरोखर, आत्मा अमर असून, सत् व असत् ह्यांना वागवून घेणारा असतो, असा जो मी उपदेश केला, त्याप्रमाणें जर आपण वागलों, तर सन्मार्गाला आपण नेहमीं चिकटून राहून भक्तियुक्त अंतःकरणानें ज्ञानयुक्त न्यायाचें आचरण करूं आणि पृथ्वीवरील आयुष्यांत परस्परांचें व देवांचें प्रेम संपादन करूं. एवढेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें खेळांमध्यें विजयी झालेले लोक, अभिनंदन करणाऱ्या लोकांकडून बक्षिसें जमवीत जातात, त्याप्रमाणें आपण आपल्या सद्गुणी आचरणाबद्दल स्वर्गांत बक्षिसें मिळवीत असतांना सुद्धां, परस्परांचें व देवांचें प्रेम संपादन करूं. वरील उपदेशाप्रमाणें वागलें असतां, आयुष्यांत व आपण जो आतां हजार वर्षांचा प्रवास केला त्या प्रवासांतही आपण उत्कर्षाला कधींही मुकणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा: क्र. ..........

समाप्त.

# ग्रीक पुराणांतील कांहीं कथा.

**अगॅमेम्नान्** Agamemnon.

हा एत्रिअसचा ( Atreus ) मुलगा व मेनिलॉस ( Menelaus ) ह्याचा भाऊ. ह्यानें स्पार्टामधील राजकन्या क्लिटेम्निस्त्रा ( Clytemnestra ) हिच्याशीं लग्न केलें. मेनिलॉसच्या पत्नीचें म्हणजे हेलेनचें पारिसनें हरण केल्यावर त्रोजन युद्ध ( Trojan war ) झालें. त्यांत ग्रीक सैन्याचें आधिपत्य अगॅमेम्नान्कडे होतें. त्यानें ह्या युद्धांत पुष्कळ पराक्रम केला. ॲचिलीसबरोबर ब्रिसेल्स ( Brisels ) नांवाच्या गुलाम केलेल्या स्त्रीवरून त्याचें भांडण झालें. त्रोजन युद्ध संपल्यानंतर घरीं आल्यावर त्याचा स्वस्त्रीकडून जाराच्या मदतीनें खून करण्यांत आला.

**अजॅक्स** Ajax.

हा टेलामॉन्चा पुत्र. ( Telamon. ) हा ग्रीक योध्यांमध्यें अत्यंत शूर योद्धा म्हणून प्रसिद्ध होता. हेलेनचें पारिसनें हरण केल्यावर जें त्रोजन युद्ध झालें, त्या युद्धांत हा ग्रीक लोकांच्या बाजूनें लढला. अचिलीसच्या ( Achilles ) मृत्यूनंतर त्याच्या कवचासंबंधीं यूलिसीस ( Odysseus ) व अजॅक्स ह्या दोघांमध्यें भांडण झालें. तें कवच यूलिसीसला देण्याचें ठरविण्यांत आल्यामुळें अजॅक्सनें आत्महत्या केली.

**ॲटलान्टा** Atalanta.

ही अर्केडीयांतील सुंदर व सशक्त स्त्री. हिच्या बापानें ही जन्मल्यावर आपणाला मुलगा झाला नाहीं, म्हणून हिला टाकून दिलें. तिचें पालनपोषण लांडग्याकडून झालें अशी कथा आहे. ही सशक्त व फार चपळ असल्यामुळें, धांवण्याच्या शर्यतींत तिला जिंकणाऱ्या पुरुषाबरोबरच लग्न करण्याचें तिनें जाहीर केलें. शर्यतींत अयशस्वी होणाऱ्या पुरुषाला आपल्या प्राणांस मुकावें लागे. शेवटीं मिलेनिअननें (Milenion) हिला युक्तीनें फसवून शर्यत जिंकली. शर्यत सुरू असताना अफ्रोडाईट ( Aphrodite ) देवतेनें दिलेलीं फळें त्यानें मध्येंच खालीं टाकलीं. तीं उचलून घेण्याकरितां ॲटलान्टा थांबल्यामुळें मिलेनिअन शर्यत जिंकूं शकला. म्हणून ॲटलान्टानें त्याच्याबरोबर लग्न केलें.

**ऑरफिअस्** Orpheus.

ग्रीक पुराणांतील ही एक प्रसिद्ध व्यक्ति आहे. हा थ्रेसचा राजा ओइग्रस ह्याचा मुलगा. ह्याच्या आईचें नांव संगीत देवता कॅलिओपी ( Calliope ). हा सारंगी ( lyre ) इतकी उत्तम वाजवीत असे कीं, सर्व सृष्टि गानमुग्ध होई. ह्यानें यूरिडिस ( Eurydice ) देवतेशीं लग्न केलें. तिच्या मृत्यूनंतर, आपल्या सारंगीवादनानें मृतलोकांतील देवांना खूष करून तिला पृथ्वीवर आणण्यास तो निघाला. परंतु मृतलोकांतून बाहेर पडण्यापूर्वीच त्यानें तिच्याकडे मागें वळून पाहिल्यामुळें ती अदृश्य झाली व त्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. आपल्या पत्नीवर त्याचें निःसीम प्रेम होतें. परंतु त्याचें हें निःसीम प्रेम थ्रेशिअन स्त्रियांना सहन न झाल्यामुळें त्यांच्याकडून तो ठार मारला गेला.

**ओडिशिअस** Odysseus. (ह्याला Ullysses यूलिसिस असेंही म्हणतात.)

इथाकाचा राजा लाअर्टीस ह्याचा हा पुत्र. हेलेनच्या पाणिग्रहणाच्या वेळीं हा हजर होता. परंतु तिची प्राप्ति होणार नाहीं असें पाहून हेलेनची चुलत बहीण पेनिलोप ( Penelope ) हिची त्यानें मागणी केली व ती मान्य झाली. मेनिलॉसबरोबर हेलेनचें लग्न झालें. तिचें हरण केलें, असतां, पाणिग्रहणाच्या वेळीं जमलेल्या सर्व राजांनीं हरण करणाऱ्याविरुद्ध युद्ध केलें पाहिजे, अशी अट घालण्यांत आलेली होती. पारिसनें हेलेनचें हरण केलें, म्हणून ट्रोजन युद्ध झालें. त्या युद्धांत यूलिसिसला मेनिलॉसच्या बाजूनें लढावें लागलें. त्यानें युद्धसमयीं पराक्रम चांगला केला व युक्तिबाजपणाही दाखविला. अचिलीसच्या मृत्यूनंतर त्याचें कवच ह्याला देण्यांत आलें. ट्रोजन युद्ध संपल्यानंतर तो इथाकाला परत येण्यास निघाला. परंतु त्याच्यावर पुष्कळ संकटें आलीं व निरनिराळ्या प्रदेशांत त्याला वास करावा लागला. दहा वर्षांनीं तो स्वदेशांत परत येऊं शकला. सिक्लाप्स नांवाच्या राक्षसास अंध करून त्यानें आपली सुटका करून घेतली. सर्से (Circe) नांवाच्या जादुगारीणीच्याही तावडींत तो सांपडला होता. त्याच्यावर आलेल्या संकटांचें वर्णन होमरनें Odyssesy काव्यांत केलें आहे. इथाकाला परत आल्यावर, त्याच्या प्रिय पत्नीस म्हणजे पेनिलोपीस पुनः लग्न करण्याकरितां छळणाऱ्या राजपुत्रांस त्यानें मारून टाकलें व तिच्याबरोबर सुखानें संसार करता झाला.

# प्लेटोची आदर्श राज्यघटना,
## ह्या ग्रंथांत आलेल्या महत्वाच्या विषयांची
# सूची.

**अर्थ**—राज्याला जरुरी ८०. युद्धाच्या कामाला अनावश्यक १७३. फिजिशिअन व इजिप्शिअन् लोकांना आवड १९८. मानीजन राज्यपद्धति व अल्पसत्ताक पद्धति ह्यांचें वैशिष्ट्य ३९३, ३९८, ३९९, ४०५, ४२३. वासनात्मक भागाच्या पूर्तीला साहाय्यक ४५८. दूषणीय ११५, ४७७. अर्थोत्पादनाची कला ६. अर्थप्रेमी मनुष्याचें सुख ४५९, ४७०.

**अधिकारी**—अधिकारी अथवा राज्यकर्ता ह्याचा खरा व लौकिक अर्थ २८, २९. ते आपल्या हिताचीच काळजी करतात काय? २५, ३३, ३४, ३५. त्यांची स्खलनक्षमता २६. त्यांचा मोबदला ४०. वृद्ध लोकांतून निवड १५६. सुख-दुःखांच्या प्रसंगांतून कसोटी १५९. असत्याचा उपयोग करण्याची परवानगी २३९. मित्र व संरक्षक अशी भावना २४७. खऱ्या अधिकाऱ्याची लोकांनीं विनवणी केली पाहिजे २९२. ते तत्वज्ञानी असले पाहिजेत ९१, २६७, २८३, ३०७, ३०८, ३०९, ३१४, ३४६, ३४७, ३४८, ३८३, ३८६. आवश्यक गुण ३१८, ३७४. आवश्यक कर्तव्य म्हणून अधिकार-स्वीकार ३४७, ३८३. अंकगणित, भूमिति, ज्योतिर्विद्या व स्वरशास्त्र ह्यांचें ज्ञान ३५१ ते ३६७. तिसाव्या वर्षी ब्रह्मविद्येशीं परिचय ३७८, ३७९, ३८०, ३८१, ३८२. पसतिसाव्या वर्षीं सार्वजनिक आयुष्य-क्रमांतील कर्तव्यास आरंभ व पन्नासाव्या वर्षी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास मोकळीक ३८३. मृत्युनंतर सन्मान १६०, २५२, २५८, ३८३.

**अन्याय**—पासून फायदे ३४, ३५. थ्रॅसिमाकसची व्याख्या. अन्याय म्हणजे 'चांगलें धोरण' ४३. अन्याय म्हणजे दुर्गुण व अज्ञान ४८. राज्य व व्यक्ती ह्यांना अपायकारक ५०, ५१, ५२. 'कोणीही आपखुषीनें न्याय्य वर्तन करीत नसतो,' ह्या तत्त्वाचें विवेचन व पूर्ण अन्यायी माणसाचें वर्णन ६२, ६३, ६४. अन्यायाचीं स्तुतिस्तोत्रें ७१, ७२, ७३, ७४, ११८. अन्याय करण्याची अंगांत धमक नसलेले लोकच अन्यायाची निंदा करतात ७३. राज्यांतील

अव्यवस्था व आत्म्यामधील अव्यवस्था म्हणजे अन्याय १९५, २१५. अन्यायापासून होणारी हानि ४७६, ४७७. अन्यायी मनुष्याचें होणारें हसें ५१९.

**अनुकरण-कला**—होमर व इतर कवी ह्यांच्या वाङ्मयांतील पद्धत ११९, १२०, १२१, १२२, १२३. तिचें सामान्य स्वरूप ४८४, ४८५, ४८६. स्वभावावर होणारा परिणाम १२४, १२५, १२६. काव्य अनुकरणात्मक असून सत्यापासून पूर्ण विलग असतें ह्या तत्त्वाचें विवेचन ४८५, ४८६, ४८७, ४८८, ४८९, ४९०. कलावंत अज्ञानी असतात ४९७, ४९८. आत्म्याच्या क्षुद्र भागाचें उद्दीपन ५०४.

**आदर्श राज्य-घटना**—शक्यतेचें विवेचन २६३, २६५, २६६, २६७, ३८३, आदर्श व मूर्तस्वरूप २६७.

**आत्मा**—आत्म्याचें कार्य ५४, ५५. आत्म्यांतील सौंदर्य १३५, १३६. आत्मिक व शारीरिक सौंदर्य १३८. आत्मा व शरीर ह्यांची समभावना २४५, २४८. आत्म्याचा अज्ञानांतून ज्ञानांत प्रवेश ३४२, ३४८. आत्म्याला बदल पावणाऱ्या वस्तूपासून सत्य वस्तूकडे नेण्यास गणितशास्त्राची मदत ३५०, ३२६, ३५७, ३६०, ४९९. चांगलें व वाईट अशीं दोन तत्त्वें १८९. आत्म्यांतील तीन तत्त्वें-विवेचक, तेजस्वी व विषयोपभोगी-त्यांचें वर्णन १९८ ते २१२, ३२०, ३९७, ४४०, ४५८. आत्म्याच्या चार अवस्था ३३४, ३३५, ३७१, ३७२. विरोधी भावना ५०१. आत्म्याचा कच्चेपणा १३५, ३७५. आत्म्याचें अमरत्व ५१०, ५११. आत्म्यांची संख्या, शरिराच्या सहवासानें आत्म्याची खराबी, ग्लॅकासशीं साम्य ५१५, ५१६. मृत्युनंतरची स्थिति ५२१, ५२२, ५२३. जन्मांतर ५२६ ५२७, ५२८, ५२९, ५३०. नेमस्तपणामुळें आत्म्यामध्यें घडून येणारी एकतानता १८८, २११, २१२, २१३, २१४. आत्म्याची दृष्टि ३४३, ३६१, ३७१, ३८३. आत्म्याचे व राज्यपद्धतींचे प्रकार २१८, २१९.

**आयुष्य**—प्राथमिक अवस्थेमधील ८३, ८४. वृद्धपणीं उत्साहशून्यता ४. वाईट गोष्टींनीं भरलेलें ९८. सद्गुणाशिवाय असहनीय २१७. अनंतकालाच्या दृष्टीनें आयुष्य क्षुल्लक ५१०. सदाचार कष्टसाध्य ६९. न्यायप्रिय मनुष्याचें

आयुष्य अधिक फायदेशीर असतें काय ? ४१. ज्ञानप्रेमी, युद्धप्रेमी व अर्थ-प्रेमी अशा मनुष्यांचें आयुष्य ४५९, ४६०, ४६१, ४६२. स्त्रियांचें आयुष्य पुरुषांच्या आयुष्याप्रमाणेंच महत्त्वाचें २२४, २२५. प्राथमिक गरजा ७७, ७८. तारुण्यावस्था २४२

**ईश्वर**—वाईटाचा कर्ता नव्हे ६९, ९८, ९९, १००, ११६. कधीं बदलत नाहीं १००. असत्यास रुकार देत नाहीं १०३. सर्व वस्तूंचा कारागीर ४८५. अन्यायी लोकांना अनुकूल असतो असा समज ६६, ७०. दुष्ट लोकांकडून देणग्या घेणारे, अस्तित्त्वांतच नसणारे, मानवी प्राण्यांच्या कारभारांत लक्ष न घालणारे अशी देवांविषयीं लौकिक समजूत ७०, ७१. देवांविषयींचीं वर्णनें अप्रयोजकपणाचीं असतात ९५, ९६, ९७, १११, ११२, १४९. देव शोक करीत बसतात व हंसतात अशीं वर्णनें त्याज्य १११, ११२. परकी लोकांचा वेष घेऊन देव रात्रीं भटकत असतात असें वर्णन १०३. देव एकमेकांबरोबर व राक्षसा-बरोबर भांडतात, युद्ध करतात अशीं वर्णनें ९६.

**कला**—पूर्णावस्था गांठणें हें ध्येय ३१. स्वतःच्या विषयाचें हित ३२, ३३, ३७, ३८, ३९. स्वभावावर होणारा परिणाम १३४. सौंदर्य १३५. देखरेख ठेवण्याची जरुरी १३६. कलेंतील ध्येयवाद २६५. व्यावहारिक उपयुक्तता ३७०. कलावंत व तत्त्वज्ञानी २७१, २७२. सर्व वस्तूंचा तीन कलांत समावेश ४९६.

**कवी**—आपल्या काव्यावरील प्रेम ६. कोड्याची भाषा १०. न्यायासंबंधीं कवीचें वर्णन ६७ ते ७२. तरुणांना वाईट शिक्षण देणारे ९४, ९५, ११६, ११७, ११८, १४९. निर्बंधाची आवश्यकता ९७, ९८, १३०. राज्यांतून हद्दपारी १३०, ४३६, ४८३, ५०४, ५०६, ५०७. सत्यापासून दुप्पट दूर ४८६, ४९१. नक्कल करणारे ४९४, ४९५.

**कायदा**—कायदे चुकीनें केले जाण्याचा संभव २६. संगनमतानें ठरविले गेले असा समज ६०. कायद्यांची जरूर लागणें १४३, १४४. किरकोळ विषयांसंबंधीं केलेले कायदे निरर्थक १७७, १७८, १७९, १८०. बहुसत्ता-कशाही राज्यांत कायदा झुगारून दिला जातो ४२५. सर्वांचा मित्र असणारा कायदा ४७९.

**कारागीर**—त्यांची राज्याला जरुरी ८०. 'आजारी असण्यास वेळ नाहीं ' १४६.

**काव्य**—काव्याच्या पद्धती ११९, १२०, १२१, १२२. राज्यांतील काव्याचें स्थान १३०, ४३६, ४८३, ५०४, ५०६, ५०७. विकारांचें पोषण ५०६. काव्य व तत्त्वज्ञान ५०८. काव्यांतील आकर्षकता ४९५.

**कौटुंबिक आयुष्य**—राज्य व कौटुंबिक जीवन २४२, २४३ त्रासाचे प्रसंग २५१.

**गरीब लोक**—आजारी असण्यास वेळ नसलेले १४६. श्रीमंत व गरीब लोकांचें भांडण ३९९, ४००. अल्पसत्ताक राज्यांत बहुसंख्याक ४०२, ४०३. संकटाचे वेळीं श्रीमंताकडून तिरस्कारले जात नाहींत ४११.

**गुलाम**—पक्षाभिमानी मनुष्याचें गुलामांजवळ कठोर वागणें ३९५. बहुसत्ताक राज्यांत पुष्कळ स्वातंत्र्य ४२५. धन्याविरुद्ध भांडण करण्यास नेहमीं तत्पर ४५४. गुलामगिरी मृत्यूपेक्षांही भयावह १०९. ग्रीक लोकांना ग्रीक लोकांनीं गुलाम करणें अनिष्ट २०९.

**तत्वज्ञान**—डोकें दुखण्याचें कारण १४७. तत्वज्ञानापासून परावृत्तता २९६. तत्वज्ञान व बहुजनसमाज ३०१, ३०२. तत्वज्ञानाची असहाय्यता ३०३. तत्वज्ञान व इतर धंदे ३०५. खरें व खोटें तत्वज्ञान ३०५, ३०६, ३०८. तत्वज्ञान व राज्याधिकारी ३०७. तत्वज्ञान शिकण्यास योग्य काल ३०९, ३८२. दुय्यम धंदा ३०९. तत्वज्ञानाविषयीं दुष्ट पूर्वग्रह ३१२, ३१३, ३१४, ३१५. तत्वज्ञान कुचकामाचें होय अशी समजूत होण्याचीं कारणें ३४१, ३७४, ३७५, ३८१, ३८२. तत्वज्ञान उत्तम संरक्षकाचें काम करतें ३९५. तत्वज्ञान व काव्य ५०७, ५०८. पुढील जन्माची निवड करण्यास परलोकीं उपयोगी पडणारें ५२७.

**तत्वज्ञानी**—सभ्यपणा आवश्यक गुण ९०, ९१, ९२, १५३, २८६. काल व अस्तित्व ह्यासंबंधीं चिंतन करीत राहणारा ३८६. चांगली स्मरणशक्ति २९५, ३०१, ३१४. खऱ्या अस्तित्वाचें संशोधन करणारे २८३, २८४, २८५, २९४, ३१२, ३१५, ३४८, ३७८, ४५९, ४६१. उत्तम गुण असणारे २८३, २८४, २९५, २९६, ३०१. अधःपाताची संभवता २९६, २९७. जगाची रजा घेणारा ३०६. निर्मत्सरी व सभ्य ३१२, ३१३. गणितशास्त्रज्ञ असला पाहिजे ३५६. त्याची सुखें ४६०. तत्वज्ञानी राज्या,

धिकारी झाले पाहिजेत. २६७. सर्व ज्ञानाचे भोक्ते २७०, २७१, २८६, २९४. खरे व खोटे तत्वज्ञानी २७०, २७१, २७३, २८२, २८३, २९६, २९८, ३०१, ३०५, ३०६, ३१२, ३७४. संरक्षकांचीं कामें करण्यास योग्य ९०. ते नादान कां समजले जातात? २८९, २९०, २९१, २९२. त्यांची संख्या लहान असते ३०५, ३१०, ३११, ३१९. आदर्श राज्य-घटनेची रूपरेषा ठरविणारे ३१४, ३१५, ३८३, ४८१. त्यांचें शिक्षण ३१८, ३१९. तत्वज्ञानी व कवी ५०८.

**तरुण लोक**—अन्यायाच्या फायद्याचीं लौकिक वर्णनें ऐकून तरुणांच्या मनावर होणारा परिणाम ७०, ७१. रूपक कोणतें व खरें कोणतें हें तरुणांना कळत नसतें ९६, ९७. राज्याधिकारी तरुण असतां कामा नयें १५६. वृद्धांचा अपमान व प्रतिकार करण्यास मनाई २५८. सार्वजनिक सभांमधून होणाऱ्या बेजबाबदार भाषणांनीं तरुणांचीं मनें बिघडविलीं जातात २९८. ब्रह्म-विद्येच्या प्रथम परिचयानें तरुणांच्या बुद्धीवर होणारा वाईट परिणाम ३८१, ३८२.

**तेज**—संरक्षकांमध्यें सभ्यपणा व तेज ह्यांचें साहचर्य असलें पाहिजे ९०, १५२, ३१८. उत्तरेकडच्या प्रदेशांतील लोकांचा तेजस्वी स्वभाव १९८. लहान मुलांतसुद्धां दिसून येतें २०९. आत्म्यामधील तेजस्वी तत्त्व २०८, ३२०, ३९७, ४४१; ४५८. विवेचक तत्त्वाच्या अधिकारांत असलें पाहिजे २११. मानीजन-राज्यपद्धतींत प्राबल्य ३९४, ३९७. महत्त्वाकांक्षा हें वैशिष्ट्य ४५८. त्याचीं सुखें ४७१. कवींच्या कलाविलासाला उपयुक्त असा स्वभाव ५०४, ५०५, ५०६.

**दुर्गुण**—आत्म्यामधील रोग २१७, ५१२, ५१३, ५१४. अनंत प्रकार २१८. हास्यास्पद २२६. दुर्गुणांचीं मोहक नांवें ४२०

**दृष्टि**—एक शक्ति २७५. प्रकाशाची आवश्यकता ३२७. अमोलिक देणगी ३२७. बुद्धीशीं तुलना ३२८, ३६९. विरोधी संवेदना ३५२, ४९८, ५०१. दृश्य जगत् ३३९.

**धैर्य**—संरक्षकांमध्यें आवश्यक गुण ८९, १०७, १५९, १६५, १८५, १८६, ३१९. मृत्यूची भीति बाळगणें धैर्याशीं विसंगत आहे १०७, २८६. ज्या

गोष्टींबद्दल लोकांना भीति वाटली पाहिजे त्या गोष्टींबद्दल लोकांनीं भीति बाळगिली पाहिजे, अशा मताचें रक्षण म्हणजे धैर्य १८६, २१२. नुसत्या निर्भयपणापासून भिन्नता १८७. तत्त्वज्ञानी स्वभावाचा गुण २८६, २९५, ३०१. अभ्यासामध्यें धिम्मेपणा ३१९.

**न्याय**—सत्य बोलणें व घेतलेली वस्तू परत देणें अशी व्याख्या. ९. बलिष्ठाचें हित २४, ७४. आत्म्याचा गुण ५५. मित्रांचें चांगलें करणें व शत्रूंचें वाईट करणें १०, ११, १९. न्यायी मनुष्य एकप्रकारचा चोर १५. मानवी सद्गुण १८. अलौकिक चांगला स्वभाव ४३. स्वसदृश माणसाविरुद्ध न्यायी मनुष्य जात नाहीं ४५. न्याय म्हणजे ज्ञान व सद्गुण असून तो ऐक्य घडवून आणणारा असतो ४९, ५०. सर्वांत उच्च वर्गाचीं सुखें मिळविणारा ५८, ७४. नेमस्तपणा, धैर्य व शहाणपणा ह्यांच्याशीं स्पर्धा करणारा १९३. श्रमविभागाचें तत्व १९३. न्यायाचें स्वरूप व मूळ ५९, ६०. करारांचें स्वरूप ६०. दिखाऊ न्यायीपणाची स्तुति ६६, ७२. लौकिकापुरता ७०. युद्धाच्या व शांततेच्या-काळीं उपयुक्त १२. कोणालाही अपाय करीत नाहीं १९. सोन्यापेक्षां मौल्य-वान २१. त्रासदायक व कठीण ६८. आत्म्याचें आरोग्य २१६. कवींचीं न्यायासंबंधीं वर्णनें ६७, ६८, ६९, ७०, ७१. पूर्ण न्याय ६३. अन्यायापेक्षां फायदेशीर २१७, ४७६, ४७७. न्यायाचा विजय ४५७, ५१७, ५१८, ५१९. राज्यामधील न्याय ७७, १९०. राज्य व व्यक्ती ह्यांमधील न्यायाचें साम्य १९६, १९७, १९८, २०९, २१०. केवल न्याय २८०, २८१, ३१८, ३४१, ३४२.

**नेमस्तपणा**—नेमस्तपणा ११३, ११४, १८८, १८९. नेमस्तपणा व प्रेम १३९. संगीतांतील साधेपणांतून निर्माण होणारा १४३, १५२. आत्म्यांतील एकतानता १८८, २१०, २१२, २१४. तत्वज्ञानी मनुष्याचा गुण २८५, २९४, २९६.

**प्रेम**—सौंदर्याचें प्रेम १३७, १३८. शारीरिक व आत्मिक १३८. प्रेम व ज्ञानाचें प्रेम २६९. सर्व भागासंबंधीं प्रेम २७०, २८४. जुलमी प्रवृत्ति ४४३, ४४५. प्रणयी मनुष्य ठेवींत असलेलीं नांवें २६९. मद्याचे शोकी २७०. दृष्टिसुखाचे व श्रवणसुखाचे भोक्ते आणि केवल सौंदर्य २७२, २७९, २८०, २८१, ३०१, ३१४, ३२६.

**बहुजन समाज**—अधिकाऱ्यांची स्तुति करणारा १८०. सत् व सौंदर्य ह्यांविषयीं चुकीच्या कल्पना ३००. तत्वज्ञानी लोकांविषयींचा दुष्ट पूर्वग्रह दूर करतां येईल ३१२. त्याचीं सुखें ४७०. प्रबल राक्षस, लहरीप्राणी २९९, ३००. त्याचा वेडेपणा ३०५.

**ब्रह्मविद्या**—तत्वज्ञानांतील अत्यंत कठीण भाग ३०८. त्याचे विषय ३३३, ३३४, ३७८. दृष्टीशीं तुलना ३६९. सत्-तत्वापर्यंत भिडणारी व गृहीत कल्पनांचा त्याग करणारी ३७१. सर्व शास्त्रांच्या शिखरावर असणारी ३७३. अधिकारी लोकांनीं अभ्यासनीय ३७८. ह्या विद्येचा वाईट परिणाम ३७९. अभ्यासाचा काल ३८२. खंडन विद्येपासून भिन्नता ३८१. वस्तु तत्वांची कल्पना असणाऱ्यालाच ब्रह्मविद्या प्रवीण म्हणतां येतें. ३७२.

**बुद्धि**—बौद्धिक जगाचे विषय ३३१, ३३२, ३४१. दृश्य जगाशीं बुद्धीच्या विषयांची तुलना ३३१, ३६९. बुद्धि आणि सत् तत्व ३२९.

**मत (समज)**—खरें मत व धैर्य १८५, १८६, १८७. मत व ज्ञान २७२, २७३, २७४, २७५, २७६, २७७, २७८, ३२९, ३३२, ३७२. मत बनविण्याची आवड असणारे २८०, २८१. अंधपणा ३२५. मताचे व बुद्धीचे विषय ३७१, ३७२.

**मालमत्ता**—खाजगी व समाईक १६५, १६७, १७२, २४९, ३८६. अल्पसत्ताकपद्धतींत राजकीय हक्कांचें गमक ३९८, ३९९, ४००. मालमत्तेच्या विक्रयावर निर्बंध ४१०.

**मुलें**—तेजस्वीपणा जन्मजात असतो पण विवेचक तत्व नंतर साध्य होतें २०९. स्वातंत्र्य कां देण्यांत येत नाहीं ४७९. राज्यांतील स्थान १६२, १६३, २२०, २३६, ३८६. अयोग्य गोष्टी ऐकण्याची मनाई ९४, ११६, ११७. सुंदर व शोभिवंत वस्तूंच्या वातावरणांत वाढ १३६. करमणूकीच्या खेळांतून शिक्षण १७७, ३७७, घोड्यावर बसण्यास शिकविलें पाहिजे. २५५. आपल्या आईबापांबरोबर रणांगणावर युद्धप्रसंग बघितले पाहिजेत. २५३, २५४, २५५, ३७७. एका वर्गांतून दुसऱ्या वर्गात घातलें पाहिजे १६२, १७४ कनिष्ठ दर्जाचीं व बेकायदेशीर मुलें टाकून देण्यास हरकत नाहीं २४१, २४२, २४३.

**मृत्यु**—अंतकाल जवळ आला असतां वृद्ध लोकांना वाटणारी भीति ७. संरक्षकांना मृत्यूचें भय वाटतां कामा नये १०७, १०९, २८६. मृत्यूपेक्षां गुलामगिरी भयावह १०९.

**युद्ध**—युद्धाचीं कारणें ८६, ८७, १७१, १७२, ३९२. एक धंदा ८७, १७२. स्त्रिया, पुरुष व मुलें ह्या सर्वांनीं युद्धांत भाग घेतला पाहिजे २२५, २२६, २५३, २५४, २५५, २६३, ३७७. युद्धासंबंधीं नियम २५४, २५५, २५६, २५७, २५८, २५९, २६०, २६१, २६२, २६३. युद्ध व वर्ग कलह २६०, २६१. युद्ध कांहीं लोकांच्या उचापतीनें होतें २६२. मानीजनराज्यपद्धतीचा विशेष ३९३. अल्पसत्ताक पद्धतींत युद्धाची भीति ४०१. श्रीमंत व गरीब लोकांची युद्धप्रसंगीं भेट ४११. जुलमी मनुष्याला युद्ध उपस्थित करणें आवश्यक असतें ४३३, ४३४.

**योद्धा**—यशस्वी योध्याचें बक्षीस २५६, २५७, २५८. गणिताचें ज्ञान आवश्यक ३५०, ३५१, ३५६, ३५८.

**राजा**—पौर्वात्य राजा ४०४. राजा व जुलमी मनुष्य ह्यांच्या सुखांची तुलना ४७२, ४७३, ४७४. राजे व तत्त्वज्ञानी २६७.

**राज्य**—( शहर ) उत्पत्तीची मीमांसा ७७, ७८. व्यक्ती व राज्य ह्यांचे संबंध ७६, १९५, २१०, २४५, २४६, ३८८, ४५१ ऐक्याची जरूरी व साधन १७३, १७४, २४७, २४८, २४९. राज्यांतील आवश्यक गुणांचें विवेचन १८३, १८४, १८५, १८६, १८८, १८९, १९०. कुटुंब-व्यवस्था २२०. विलासी शहर ( राज्य ) ८५, ८६. उत्तम राज्यांतील भिन्न वर्ग व त्यांचीं कर्तव्यें ८७, १६२, १६३, १६९, १९३, १९५, २०९, २१०, २१४, २२६. राज्यांतील अधिकारी लोक तत्वज्ञानी असावयास पाहिजेत ९१, २६७, २८३, ३०७, ३०८, ३०९, ३१४, ३४६, ३४७, ३४८, ३८३, ३८६. स्त्रिया, मुलें व मालमत्ता समाईक मालकीचीं १६५, २२०, २३६, २३७, २४५, २४८, २४९, ३८६. सर्व राज्य सुखी असलें पाहिजे १६८, २५२, २५३, ३४५, ३४६. युद्धामध्यें इतर राज्यावर सहज जय मिळवितां येईल. १७१, १७२. राज्यांतील तीन प्रमुख वर्ग २०९. एकसत्तात्मक अथवा उत्तमजनसत्तात्मक असूं शकेल. २१८. ऐक्याची भावना असल्यामुळें भांडणें व फिर्यादी ह्यांपासून मुक्तता. २४७, २४८, २४९, २५०, २५१. अशा राज्याची शक्यता. २६३, २६६, २६७, ३११, ३८३, ३८४. दैवी आदर्शाची नक्कल. ३१३, ३८३, ४८१, ४८२. अशा राज्याच्या स्थापनेस सुरवात. ३१४,

३१५, ३८३. नाशाचीं कारणें. ३९०, ३९१. उत्तम राज्य म्हणजे ज्यामध्यें राज्यकर्ते राज्यकारभार करण्यास नाखूष असतात तें. ३४५, ३४६, ३४७, ३४८. राज्याचे प्रकार. २१८, ३८७, ३८८. त्यांचीं रूपांतरें. ३८९, ३९०. अस्तित्वांत असलेलीं राज्यें ऐक्यता निदर्शक नसून तीं बहुतेक भ्रष्ट आहेत. १७३, ३०५, ३४४, ३४६, ३४७, ४८२.

**राज्यघटना**—उत्तमजन राज्यपद्धतीचें वर्णन चवथ्या पुस्तकांत आलें आहे. बाकी सर्व घटना दोषपूर्ण होत ३८८ त्यांचे प्रकार व लौकिक समजूत २४, २५, ३४. मानधन घटना ३८९, ३९०, ३९२. तत्सम मनुष्य ३९५, ३९६, ३९७. अल्पप्रजासत्ताक घटना ३९८, ३९९, ४००, ४०१, ४०२, ४०३. तत्सम मनुष्य ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४०८, ४७३. बहुसत्ताक राज्यघटना व तत्सम मनुष्य. ४०८, ४०९, ४१२, ४१३, ४१४, ४१७, ४२०, ४२१, ४२२, ४२३, ४२४, ४२५, ४४१, ४४२, ४७३. अेरराव राज्यघटना व तत्सम मनुष्य ४२२, ४२३, ४२६, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४३३, ४३४, ४३५, ४३६, ४३७, ४३८, ४३९, ४४०, ४४१, ४४२, ४४३, ४४४, ४४५, ४४६, ४४७, ४४८, ४४९ ४५०, ४५१, ४५२, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ४७२, ४७३, ४७४, ५२२, ५२३.

**रोग**—रोगाची उत्पत्ति १४३. योग्य उपाय १४४, १४५, १४८. वैद्यांना स्वानुभव उपयुक्त १५०. रोग आणि दुर्गुण २१५, २१६, ५१२.

**वासना**–वासना व विवेचक तत्त्व ह्यांचें युद्ध २०७, २०८. साध्या व विशिष्ट २००, २०१, २०२. आवश्यक व अनावश्यक ४१५, ४१६, ४१७, ४१८.

**विवेचक तत्त्व**—आत्म्यांतील तत्व २०६, २०७, २०८, २०९, २११, २१२, ३९७, ४३९, ४५७, ४५८, ४६०, ४६१, ४६२. अधिकार गाजविण्यास लायक २०९, २१०, २११, २१२. ज्ञानाची आवड असणारें ४५९. त्याचीं सुखें ४६१, ४६२. कल्पनांची जादुगारी नाहींसें करणारें ४९९.

**वैद्य**—खरा वैद्य केवळ पैसे मिळविणारा नसतो ३०, ३१, ३२. विलासीपणा वाढला म्हणजे वैद्याची अधिक गरज ८६, १४३. रोगट व अव्यवस्थित स्थितींत आयुष्य घालविणाऱ्या माणसांस वैद्यांनीं औषध देऊं नये १४५, १४६, १४७, १४८, १७९. उत्तम वैद्य व उत्तम न्यायाधीश ह्यांची तुलना १४९, १५०, १५१.

**वृद्धत्व**—वृद्ध लोकांच्या तक्रारी आणि सोफोक्लीसचे उद्गार ४. संपत्ति असल्यामुळें वृद्धपणात समाधान ५, ८. वृद्ध लोक पुढील आयुष्यासंबंधीं काळजी करीत बसतात ७. वृद्धच राज्यांमध्यें अधिकारी होण्यास योग्य १५६, २५०.

**व्यायाम**—शरिराच्या सुस्थितीला उपयुक्त ९३, १४०, ३४९. आत्म्याच्या सुधारणेकरितांही आवश्यक १५३. संगिताप्रमाणें व्यायामाचें शिक्षण सर्व आयुष्यभर १४०. अति व्यायामाचे अनिष्ट परिणाम १४१, १५३, १५५, ३७८. साधी पद्धत १४२, १५२. जुनी पद्धत कायम राखणें १७५. संगीताच्या सहाय्यानें आत्मिक एकतानता २११. स्त्रियांनाही आवश्यक २२४, २२५, २२६, २३२,२३३, २३५. बौद्धिक परिश्रमांची जोड दिली पाहिजे ३७४, ३७५. योग्य कालमर्यादा ३७७, ३७८.

**शरीर**--स्वयंपूर्ण नसतें ३१. शरीर व आत्मा ह्यांच्या सौंदर्याचा मिलाफ १३८. शरीराची अतिशय काळजी सद्‌गुणी व बौद्धिक आयुष्यास विघातक १४७. शरीर व त्याचे अवयव ह्यांची राज्याशीं तुलना २४५, २४६, २४८, २४९. आत्म्यापेक्षां शरीर कमी सत्य व कमी अस्सल ४६९.

**शहाणपण**--शहाणपण व अन्याय ४४, ४५, ४६, ४७. राज्यांतील स्थान १८३, १८४, १८५. सत्याशीं निकट संबंध २८४, २८५. एक शक्ति ३४३, ३४४. स्वाभाविक देणगी ३४३

**शहाणा मनुष्य**--सज्जन असतो ४७ व्याख्या २१२. त्यानें श्रीमंत लोकांचें द्वारीं तिष्ठत राहणें योग्य नाहीं २९२. जुलमी मनुष्याचा सोबती असा प्रवाद ४३६. खरें सुख ज्ञानी माणसालाच ४६३. त्याचें आयुष्य ४७९, ४८०.

**शास्त्रें**--विशिष्ट विषयांमुळें विशिष्ट शास्त्रें २०३. शास्त्रांचा केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनें अभ्यास करावयाचा नाहीं ३५९, ३६०, ३६४, ३६५. सर्व शास्त्रांमधील संगति ३६८. गृहीत कल्पनांचा आधार ३७१. परस्पर सबंध ३७८. अंकगणित ३३३, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४, ३५५, ३५६, ३५७, ३५८. भूमिति ३३३, ३५८, ३५९, ३६०, ३६१, ३६२, ३६३. ज्योतिर्विद्या ३६१, ३६३, ३६४, ३६५, ३६६. स्वरशास्त्र ३६७, ३६८.

**शिक्षण**--शरीराला व्यायामाचें व मनाला संस्कृतीचें ९३, १४०. आत्म्याला दोन्हीं प्रकारचें आवश्यक १५३. कथात्मक वाङ्मय ९३, ९४, ९५. कवींची वाईट शिकवण ९५, ११६, ११७, ११८, १४९, ४९३, ४९४, ५०६,

५०७. साधी पद्धत १२९, १४३. गीतें १३०, १३१. अनुकरणात्मक १३२. चांगल्या वातावरणाची आवश्यकता १३६. चालीरीती व आचार ह्यांच्यावर परिणाम १७५, १७६, १७७, १७८. करमणूकींतून आरंभ १७७, ३७७. ठराविक पद्धतींत बदल करणें हानिकारक १७५. स्त्रिया व पुरुष ह्यांना एकच शिक्षण २२४, २२५, २५३. वाईट शिक्षणाचा परिणाम २९७. स्वाभाविक शक्तीचा उपयोग करणें म्हणजे शिक्षण होय. ३४३. सक्ति उपयोगी नाहीं ३७७. संरक्षकांचें शिक्षण ९१, ९२, ९३, १८५, १८६, १८७, ३४८, ३४९. तत्त्वज्ञानोंचें शिक्षण ३०८, ३०९, ३१९, ३३६ ते ३७९. तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाचा आरंभ काल ३०९, ३७७. ब्रह्मविद्येची प्रस्तावना ३७०, ३७१.

**सत्य**—मनुष्य स्वेच्छेनें सोडून देत नाहीं १५८, १५९. तत्त्वज्ञानी लोकांचें ध्येय २८२, २८३. ते २८७, २९३, २९४, ३१३, ३१४, ३१५, ३४७, ३४८, ३७८, ४५८, ४५९, ४६०, ४६१, ४६२. शहाणपणाशीं निकट संबंध २८५. प्रमाणबद्धता २८७. अपूर्णता चालावयाची नाहीं ३२०, ३२१. सत्य व सत्भाव ४६९. सत्याचें प्रेम इहलोकीं व परलोकीं आवश्यक ५२७, ५२८. असत्य तत्त्वज्ञानी मनुष्याला तिरस्करणीय वाटतें २९४. खरें असत्य व शाब्दिक असत्य १०३, १०४. एक तेजस्वी असत्य १६१, १६२. राज्याधिकाऱ्यांना असत्य बोलण्याची परवानगी १०४, ११३ १६१, २३९. ईश्वर असत्याला रुकार देतो असें वर्णन निषिद्ध १०५, १०६. कवींची असत्य वर्णनें ९५, ९६, १०७, १०८, १४९.

**सत् तत्व**—रक्षण करणारें तत्व ५११. सत्‌तत्व व सुख ३२२, ३२३, ३३० सत् पेक्षां श्रेष्ठ ३३०, ३३१ निरुपाधिक कल्पना ३२६, ३८३. अत्यंत तेजस्वी ३४३. अत्यंत श्रेष्ठ ज्ञान ३२२, ३५९. स्वरूप ३२२, ३२३, ३२८, ३२९. सद्वस्तूंत लवकर फरक होत नाहीं १०१. चांगल्या वस्तूंचें वर्गीकरण ५७, ५८, ७४. आयुष्यांतील चांगल्या गोष्टी मनुष्याला बिघडविणाऱ्या होऊं शकतात २९६, ३०३.

**सत् तत्वाची कल्पना**—सत्याचें उगमस्थान ३२९, ३३०. सूर्याशीं तुलना ३२८, ३३९, ३४०, ३४१. ज्ञानप्रेमी मनुष्यानें ग्रहण केली पाहिजे ३७२. कल्पना व दृश्य वस्तू २७२, २७३, ३२६. गृहीत कल्पना ३३२, ३३३. प्राथमिक स्वरूप ३५२. निरुपाधिक कल्पना ४८५, ४८६, ४८७, ४८८.

**सज्जन मनुष्य**—वाईट स्वभावांची व कृत्यांची नक्कल करणें तिरस्करणीय समजेल १२६, १२७. अधिकाराची जागा कां स्वीकारतो? ४०, ४१. स्वरूप ४७, ४८. दुर्दैवी असतो. ६९, ७०. स्वावलंबी असून दुःख सहन करणारा ११०, ५०१. वाईट गोष्टींचा अनुभव नसल्यामुळें भोळा असतो १२० जुलमी माणसांचा तिरस्कार करतो ४३५. देवतुल्य व देवांचा मित्र ५१८, ५१९.

**संगीत**—व्यायामाच्या अगोदर शिकवावयाचें व वाङ्मयाचा त्यांत अंतर्भाव करावयाचा ९३. शिक्षणांतील स्थान ९४, ९५, १३०, १३१, ३४९, ३५०. साध्या व शुद्ध पद्धतीचा स्वीकार १२८, १२९. व्यायामाप्रमाणें सर्व आयुष्यभर संगीताचें शिक्षण व सौंदर्याचें प्रेम हें त्याचें ध्येय १४०. साधेपणा नेमस्तपणा घडवून आणतो १४३, १५२. संगीताच्या पूर्ण आधीन होण्याचे परिणाम १५३, १५४, १५५. ठराविक पद्धतीला चिकटून राहलें पाहिजे १७५, १७६. स्त्रियांना शिकविलें पाहिजे २२४. पद्धतींत बदल केला असतां कायद्यांवर परिणाम १७६.

**संपत्ति**—वृद्धपणांत वाटणारा फायदा ५, ६. संपत्तीचा श्रेष्ठ उपयोग ६, ७, ८. धंद्यावर व राज्यावर होणारे परिणाम १७०, १७१, १७२, १७३. अल्पसत्ताक व मानीजनसत्ताक राज्यपद्धतींत संपत्तीची प्रतिष्ठा ३९३, ३९९, ४००, ४०३, ४०४, ४२३. सद्गुणाला अपायकारक ३९९. द्रव्यार्जनांत नेमस्तपणा ४८१ संपत्तिमान् लोक गरीबांचे शत्रू १७३, ४००, ४०१ ज्ञानी व श्रीमंत २९२. बहुजनसत्ताकपद्धतींत श्रीमंतांना लुबाडलें जातें ४२८, ४२९.

**संरक्षक वर्ग**—राज्यांतील संरक्षक वर्ग तत्त्वज्ञानी असला पाहिजे ९१, ९२, २८२, २८३, ३०९, ३११, ३१५, ३१८, ३४५, ३४६, ३४७, ३४८, ३५६, ३८३, ३८४, ३८६, ३८७. तेजस्वी व शांत असला पाहिजे ८९, ९०, १५२, १५३, ३१८, ३१९. सुखदुःखाच्या प्रसंगांतून त्यांची परीक्षा घेतली पाहिजे १५९, १६०. सोनें व रुपें ह्यांचें मिश्रण असतें १६२. संरक्षकवर्गाचें सुख १६७, १६८, १६९, १७०, २५१, २५२, ३०९, ३४४, ३४५. ह्या वर्गातच ज्ञान असेल १८४. नागरिकांशीं बंधुत्वाचें नातें २४४ ते २५१. नेमस्त असला पाहिजे २५२. सहाय्यक व संरक्षकवर्ग १६०, १६१, १६२. शूर असला पाहिजे ८९, १०७, १५९, १६५, १८५, १८६, ३१९. शोक करतां कामा नये १०९, ११०.

हंसतां कामा नये ११२. नेमस्त असलें पाहिजे ११३, ११४. धनलोभी असतां कामा नये ११५, ११६. शूर, सभ्य, धार्मिक व सन्माननीय अशा स्वभावांची व कृत्यांचीच नक्कल केली पाहिजे १२५, १२६, १३८. डोरिअन व फ्रिजिअन स्वरमेळ एवढेच शिकलें पाहिजेत १३१, १३२. नियमितपणा पाळला पाहिजे १३९, १४०. चांगल्या वातावरणांत वाढविलें पाहिजे १३६. युद्धाला उपयुक्त असें शिस्तीचें शिक्षण १४०, १४१, १४२, १७१, १७२, ३४९, ३८६. कायद्याची व औषधाची मदत लागणार नाहीं असें वर्तन १५२. एकत्र जेवण व सैनिकाची जीवनपद्धति १६४, १६५. सोनें, रुपें, अथवा कोणत्याही तऱ्हेची मिळकत जवळ बाळगावयाची नाही १६५, १६७, १६८, १७२, २४९. लहानपणी घोड्यावर बसून युद्ध-प्रसंग बघितले पाहिजेत २५५, ३७७. युद्धांतील वागणूकींसंबंधीं नियम २५३ ते २६३. स्त्रीसंरक्षक २३२, २३३, २३७, २३८, २५७, ३८४.

**सद्गुण**—सद्गुण आणि न्याय ४७. कष्टसाध्य ६९. सद्गुण आणि स्वरमेळ १३४. सद्गुण आणि सुख १३९. शरीराच्या अति काळजीमुळें साध्य होत नाहीं १४७. सद्गुण मनुष्याला शहाणा करतो १५१. चार भाग १८३, १८४, १९३ राज्य आणि व्यक्ति ह्यांच्यामध्यें दिसून येणारा १९७, २०९, २१०. आत्म्याचें आरोग्य २१६, ५११, ५१२, ५१३, ५१४. एकत्व २१८. संवयीचा परिणाम ३४३, ५२८, ५२९. संपत्ति सद्गुणाला विघातक ३९८, ३९९. तत्त्वज्ञानी मनुष्याचे सद्गुण २८३, २८४, २९५, २९६, ३०१. राज्यांतील स्थान १८२, १८३.

**समाईक जीवन**—राज्यांतील समाईक जीवन २३७, २४९, २५१. संरक्षकांचें एकत्र व समाईक जीवन १६५, १६८, २४९, ३८६. स्त्रिया व मुलें ह्यांचेवर समाईक मालकी १६५, २२१, २३५, २३६, २४९, २५१. समभावना २४८, २४९.

**स्त्रिया**—स्त्रियांना करतां येणार नाहींत असे धंदे आहेत काय? २३०, २३१. विभिन्न आवडी २३२. नवऱ्याविरुद्ध तक्रारी ३९६. पुरुषांच्या व स्त्रियांच्या स्वभावांत मानीव भिन्नता २२७, २२८. पुरुषांपेक्षां कनिष्ठ २३१. पुरुषांप्रमाणेंच शिक्षण दिलें पाहिजे २२४, २२५, २३५, २५३, २६३. संरक्षकांचें काम २३२, २३७, २५७, ३८४. स्त्रिया व मुलें समाईक मालकीचीं २२१, २३५, २३६, २३७, २४८, २४९, ३८६.

**सुख**--सद्‌गुणाची अति सुखाशीं संगत होऊं शकत नाहीं १३९, १४०. सुख व प्रेम १३९, १४०. सुख म्हणजे सत् अथवा ज्ञान ३२२, ३३०. श्रेष्ठ सुख ४६३. दुःख विमोचनाचें सुख व मनाची भावना ४६४, ४६५. जुलमी मनुष्याला खरें सुख मिळत नसतें ४७२, ४७३, ४७४. ज्ञानार्जनाचें सुख २८५, २८६. इंद्रियविषयक सुखें ३४४, ४७०. तत्त्वज्ञानी मनुष्यास शारीरिक सुखाची किंमत वाटत नाहीं २८५. आवश्यक व अनावश्यक सुखें ४१५, ४१६, ४१७, ४२०, ४२१, ४४१, ४६०. मान्य व निंद्य ४२१. सुखाचे तीन प्रकार व त्यांची वर्गवारी ४५८ ते ४६४. सुवासाचें सुख ४६६. बहुजनसमाजाचीं सुखासंबंधीं मतें ४६७. विकारी लोकांचीं सुखें ४७०, ४७१. ज्ञानी मनुष्याचें सुख ४७१, ४७२.

**सूर्य**--सत् तत्त्वाच्या कल्पनेशीं तुलना ३२८, ३२९. दृष्टीचा जनक ३३०. हिराक्लीटसाचा सूर्य ३०९.

**सोफिस्ट**--( सार्वजनिक आयुष्यांत नांवलौकिक मिळविण्यास आवश्यक असलेलें शिक्षण देणारे लोक. प्रस्तुत ग्रंथांत थ्रेसिमाकस हा अशा लोकांचा योग्य निदर्शक दाखविला आहे. तरुण लोकांना पैसे घेऊन ज्ञान देणारा असा हा वर्ग असे. साक्रेटिसानें ह्यांच्या ज्ञानासंबंधीं पुष्कळ टीका केली आहे, ) त्यांचें न्यायासंबंधीं मत २४, २५. शाब्दिक लटपटी २७, २८. बहुजन समाजाचीं मतें व सोफिस्ट २९७, २९८, २९९, ३००.

**श्रमविभाग**--७९, ८०, ८७, १२३, १२४, १२९, १७४, १९३, १९७, २०९, २१०, २१४, २२६. न्यायाचा भाग १९३, १९७, २१०. जमिनींची विभागणी ४३१, ४३३.

**ज्ञान**--ज्ञानाचें स्वरूप २७४, २७५, २७६, २७७, २७८. ज्ञान एक शक्ति आहे २७५, ३३४, ३३५, ३७१. जन्मपूर्व शक्ति ३४३. इंद्रियांची मदत ३६४. सक्तीची निरर्थकता ३७७. धैर्याचा पाया १८६. ज्ञान व मत २७३ ते २७८, ३२९, ३३२, ३७२, ३७३. ज्ञान व सुख ३२२. ज्ञान व शहाणपण १८४, श्रेष्ठ ज्ञान ३२१, ३३७, ३३८. सर्वोत्तम ज्ञान ५२७. छायांचें ज्ञान ३३३, ३३४, ३७२. विवेचक तत्त्वाचें वैशिष्ट्य ४५८.

क्र. ५१५

REFBK-0005856